मा. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. २१५
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — काव्येतिहास संग्रह
५९ संपादक — म. ब. नामजोशी
मासिक क्रमांक — २८ सन — १८७८
अंक वर्ष १ ते व ११

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. गा. नं. १८०१५
ता. ९।६।५३
ठाणे.

# सूचना.

आम्हीं श्रीरामदासकृत रामायणापैकीं युद्धकांड छापण्यास बरेच दिवस आरंभ केला आहे. दुसरीं तीन कांडेंही आम्हांस मिळालीं आहेत. तर याच्या आणखी प्रती कोणापाशीं असल्यास त्या आमच्याकडे पाठविण्याची कृपा करावी म्हणजे शुद्ध करण्याच्या कामास मदत होईल. काम झालें म्हणजे त्यांच्या त्यांस परत केल्या जातील.

**का० सं० व्यवस्थापक.**

---

## विषयक्रम.


**बखरी.**

थोरले शाहू महाराज यांचे चरित्र समाप्त ....... १०१–१०२

थोरले शाहू महाराज यांचे चरित्राची अनुक्रमणिका . १–२

पंतप्रधान याची शकावली ....... ......... ....... . ९–१६

नागपूरकर भोंसल्यांचे संबधाचे कागदपत्र ... .....११७–१२०

**मराठी कविता.**

श्रीरामदासस्वामिकृत युद्धकांड ..... .. ......... ३३–४०

अनेक कवि—पांडुरंगकृत नारायणराव पेशवे याचें चरित्र—अमृतरायकृत शुक-चरित्र ...... १५९–१६६

**संस्कृत काव्यें.**

अनेके—श्रीशंकराचार्यकृत वेदांतसार .. ...... ...... . ५३–६०

श्रीशिवकाव्यम् – ........... ........... .....१०१–१०८

[illegible]

किल्याचे अधिकारी यांजशीं राजकारण राखिलें होतें. व महाराजांची आज्ञा होती. आणखी खर्चास व बक्षिसें देऊन चार दिवस अंताजी शिवदेव व लोक राणी साहेबांकडील वरते राहिले ते उतरोन दिल्हे. यावरून राणी साहेबांनीं संभाजी राजे यांस फौजसुद्धां यावें म्हणून लिहून आणविलें. यावरून महाराजांनीं बापूजी खंडेराव यास दुसरे वेष देऊन त्यांजकडील कारभारी यांणीं व जीजाबाई साहेबानीं या खटलियांत आपण पडून शेवटास जावयाचें नाहीं. [ असें ] राजे यांस सांगितल्यावरून पुढें न येता माघारे जावें ऐसें जालें. महाराजांचे शरीरीं व्यथा बहुत झाली. सर्वांस प्रधानासह बोलावून, " राज्यास धणी पुत्र करून, सर्वांनी आज्ञेत चालून राज्य देवब्राह्मणांचें हें एक विचारें रक्षावें, " आज्ञा केली. आणि शके १६७१ शुक्लनाम संवत्सरे सन खमसेन मया व अल्फ मार्गशीर्ष वद्य तृतीया शुक्रवारीं देह ठेवून कैलासवास केला. तों पर्यंत राज्याभिषेक ७६ गुदरले.

याप्रमाणे शाहू महाराज याणीं बेचाळीस वर्षे राज्याभिषेक यवनाचे नजरबंदीतून येऊन अप्रतिहत आज्ञा पृथ्वीचे ठायीं ऐसें करून परम पुण्यश्लोक होत्साते कैलासवास केला. तो समय परम दारुण! सर्व प्रजा व लोक अष्टप्रधान आदि करून यांस प्रळयच गुजरला! प्रधानपंत व गोविंदराव कारभारी व सरदार यांणीं शहरची नाकेबंदी करून, वाड्या भोंवत्या चौक्या व कारखाने यास चौक्या पहारे याप्रमाणें करून, प्रधानपंत वगैरे गोविंदराव याचे वाडियांत येऊन बसले. आणि राणीसाहेब यांचे तीर्थरूप[१७] कुवारजी शिर्के यास बोलावून नेले आणि सांगितलें जे, " बाईसाहेबाची मर्जी कशी आहे? महाराजांसारखें रत्न गेले. पुढें राज्यभार चालणें त्यास आम्हास सर्वांस घेऊन महाराजांची आज्ञा जाली आहे त्याप्रमाणें राज्याचे अधिकारी करून करावयाचें आहे. आम्ही सर्व आज्ञांकित, महाराज तेच बाईसाहेब आहेत. किंवा सहगमन करण्याचा संकल्प आहे. हे विचारून यावें " म्हणून पाठविलें. आणि " आपणापाशीं बखेडा करणार कारभारी यांचा बंदोबस्त महाराजाचे आज्ञेनें करितों" म्हणून सांगून पाठविलें. आणि दादोबा प्रतिनिधी आणि यमाजीपंत व त्याचे लोक या भोंवते आपले लोक पाठवून नजरबंदी करविली. शिर्के यांणी बाईसाहेबांस निरोप सांगितला. तेव्हां बाईसाहेबीं विचार केला जे, "सर्व प्रकारें बलवान् प्रधानपंत व गोविंदराव व सर्व कारभारी होऊन ताराबाईचे नातु राज्यावर बसवणें हे राजकारण सिद्ध जालें. तेच पुत्र घेऊन आपण रहावें तरि त्यांचे आज्ञेत चालून ताराबाईचे आज्ञेत चालावें यात शोभा रहावयाची नाहीं. आपण दादोबा व यमाजीपंत यांचे नादीं लागून

---

१७. बाद कफ " नाऊ " असें म्हणतात.

प्रधान, चिटणीस व कारभारी सर्व तोडिले आणि मलसतही प्रतिनिधीनें शेवटास नेली नाहीं. याउपरि रहाणें व्यर्थ आहे." म्हणोन सहगमन करण्याचा निश्चय केला. "जाली ती गोष्ट बरीच जहाली. महाराज गेले, आम्हास रहावयाचें नाहीं. तुम्ही सर्व महाराजाची आज्ञा जाली असेल तसें करून राज्य राखावें," बोललीं. पदर टाकिला. आणि साहित्य लौकर करावें म्हणून आज्ञा पाठविली. याप्रमाणें निरोप येताच तात्काळ प्रतिनिधी व यमाजीपंत यास आणावयास पाठविलें. यमाजीपंत कुळबिणीचे घरात गुप्तरूपें राहिले ते आणून बेड्या घालून कैद केले. आणि पुरंदर व कावनई किल्यावर रवाना केले.

या नंतरि सर्व कारभारी व प्रधानपंत व प्रजा यांणीं दोन पालख्या तयार करून वाडयांत गेले. सर्व कारखान्यास कुलपें घालून चौकी पहारे बंदोबस्त केला. आणि उभयतां पालखींत सर्व राजोपचार वस्त्रें, जवाहीर, अलंकार करून समारंभे गेले. तेथील विधि यथाशास्त्र करणें तो केला. यानंतर उत्तर कार्य मालोजी भोंसले मुंगेकर यांजपासोन चालतें केलें. लक्षावधि रुपये दानधर्म, यथाविधि दानें, ब्राम्हणांस देकार व भोजनें करविलीं. पानगावांस आधीं बंदोबस्त केला होता. सर्व कारखाने व शागिर्द पेशा हत्ती, घोडे, जवाहीर पोषाक व खजीना देऊन बापूजी खंडेराव चिटणीस व बरोबर चिंतो विनायक ताराबाई साहेबाकडील देऊन महाराज राजाराम साहेबांस आणावयासि गेले. बरोबर प्रधानपंत यांजकडील लिंबाजी अनंत म्हणोन सरदार फौजसुद्धां दिल्हे. ते पानगांवीं जाऊन मार्गशीर्ष अखेर निघोन येता मार्गी दर्याबाई निंबाळकरीण फौजसुद्धा बरावर घेतली. आईसाहेब खालीं राहून राजे आले त्यांची भेट बहुत दिवसांची म्हणून श्रीकृष्णातीरीं शकुन्तेश्वर याचे देवालयीं घेतली. सर्व लोक सामोरे जाऊन भेटले. शहरात जाणें ते सुमुहूर्तानें जावें म्हणून वडुथ आरळें नजीक मुक्काम करून राजे राहिले. तेथें सर्व सरदार लोक प्रजा याच्या भेटी होऊन म्हसवे मुक्कामीं आले. याप्रमाणें शाहू महाराजाचें अवतारचरित्र समाप्त झालें. शिवाजी राजे यांचे अंशच निर्माण होऊन राज्य केलें. तें चरित्र समाप्त जालें. श्री शाहू महाराज छत्रपति व सकवार बाईस दहन श्री कृष्णा वेण्या सगमीं प्रवाहांत जालें. त्या स्थळीं महाराजाचें लिंग पाषणाचें व बाई साहेबाची मूर्ती यांची स्थापना केली. ते उभय प्रवाह कर्त्रींत मोठे मोठे पाषाणादि पदार्थ जातात त्या स्थळीं अचल पाषाणरूपें अद्याप प्रत्यक्ष राहिलें.

चरित्र समाप्त.

---

१४ ग्रांड डफ यांणीं जो बाळाजीवर आरोप केला आहे त्यास येथ काहीं आधार नाहीं

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| शिवाजी-कर्तृत्व-बालपण-कैद .. . | २-३ |
| शाहू व राजाराम यांचा संकेत . | ४ |
| शाहूच्या लग्नाचा विचार ... .. | ४ |
| बादशाही दरबारांत शाहूचें वर्तन | ४-५ |
| शाहूचीं लग्नें-बिल्वाई .. ... | ५ |
| ताराबाई-औरंगजेबाचें मरण . | ६ |
| मराठ्यांचा दगा-शाहूस सोडण्याचा विचार-नेमणूक-बेगम व शाहू-राजेरजवाडे व शाहू-शाहू नर्मदापार होतो . .. | ७-१० |
| मराठे सरदारांचें अनुकूलत्व-त्यांस बक्षीस .. . ... . | १० |
| ताराबाईचा विरोध व तयारी ... | ११ |
| पारदची गावगढी-फत्तेसिंग भोंसले .. .. .. .. | १२-१३ |
| धनाजी व प्रतिनिधी-खेडची लढाई-शाहूचा जय-बक्षीस . | १३-१४ |
| सातान्यावर चाल-सचीवाचा मृत्यु-शेखमिरा-सातारा हस्तगत | १४-१६ |
| राज्याभिषेक . . ... | १६ |
| परळी संस्थानची व्यवस्था ... | १६ |
| ताराबाईशी विघाड-शेखमिरा व चिटणीस यांची हुशारी-धनाजीचा मृत्यु . ... | १६-१७ |
| बाळाजी विश्वनाथ ... ... | १७ |
| पन्हाळ्याकडील हकीकत-रामराजाची उत्पत्ती .. . .. .. | १८ |
| प्रधान पदांची व्यवस्था-सातारा राजधानी-सचिव-शाहूचा मनमिळाऊपणा ... .. | १८-२० |
| जाधवराव व बाळाजी विश्वनाथ यांमध्यें बखेडा-शाहूकडे फिर्याद ... . . | २०-२२ |
| जाधवराव मोंगलाकडे जातो | २३-२४ |
| प्रतिनिधीवर रोष-चिटणिसांचें स्तुत्य वर्तन ... | २५-२६ |
| दिल्लीकडील वृत्त व संकाजी मल्हार . . ... ... | २६-२७ |
| दमाजी थोरात-सचिवाची सुटका | २७-२८ |
| दमाजी थोराताचा धर्मलंडपणा | २८ |
| खटावकर-प्रतिनिधीचा बहुमान | २८-२९ |
| कान्होजी आंग्रे व त्याच्याशीं तह | ३०-३१ |
| बाळाजी विश्वनाथ पंत प्रधान | ३१-३२ |
| सेनापति-इतर अष्टप्रधान व दरकदार ... . | ३२-३३ |
| राज्यव्यवस्था-कारखाने . .. | ३३-३६ |
| फत्तेसिंग भोंसले-प्रांतांची वाटणी | ३६-३७ |
| दिल्लीचे वर्तमान व सय्यदांचें राजकारण. ... . | ३७-४० |
| सय्यदांशीं तह . . | ४१ |
| बाळाजी विश्वनाथ दिल्लीस-तहाची मंजुरी . ... | ४१-४३ |
| बाळाजीचा सन्मान-निजामाशीं कटकट ... | ४३ |
| कान्होजी आंग्र्याचा सन्मान-रंग . . . ... ... | ४४ |
| बाळाजीपंत नानांचा मृत्यु-बाजीराव . . ... | ४५ |
| खंडेराव दाभाड्याचा मृत्यु-त्रिंबकराव दाभाडे व पिलाजी गायकवाड . . . . ... | ४५-४६ |
| परशुराम त्रिंबक याचा काळ-श्रीपतराव प्रतिनिधि . | ४६ |
| बाजीराव यांची हिंदुस्थानांत स्वारी-जाण्याचा बेत-राजसभेंत त्याचें हिंमतीचें भाषण . | ४६-४८ |
| बाजीरावाची रवानगी-शिंदे व होळकर-सोन्याच्या दांडीची चवरी . . . | ४८-४९ |
| कर्नाटकांत मराठ्यांची स्वारी | ४९-५० |
| बुंदेलखंडचीं पत्रें व त्याची तजवीज ... ... ... ... | ५०-५१ |
| त्रिंबकराव व बाजीराव . ... | ५१-५२ |
| दक्षणा ... ... .. ... | ५३ |
| दाभाडे व पेशवे यांचा समेट | ५३-५४ |
| यशवंतराव महादेव पोतनीस... | ५४ |
| निजामाचें तहाचें बोलणें-प्रतिनिधींचा सल्ला ... .. | ५५-५६ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| संभाजीची खटपट–त्याचा निजामाशीं एकोपा ... | ५६–५७ |
| संभाजीस शाहूचें पत्र ... ... | ५७–५८ |
| शाहूच्या प्रधानाची तयारी-बाजीरावाचें सेनाधिपत्य ... ... | ५८–५९ |
| मराठी कावा–निजामाची हैराणगत–त्याच्या मेळ्यांत फूट-तह | ५९–६२ |
| उदाजी चव्हाण–शाहूचा उदार स्वभाव ... ... | ६२–६३ |
| अजातशत्रु ... ... | ६३ |
| चव्हाण व संभाजी यांचा एकोपा प्रतिनिधीचा जय | ६३–६४ |
| कान्होजीचें मरण–त्याचे पुत्र . | ६४ |
| रघूजी भोंसले सेनासाहेबसुभा | ६४–६५ |
| खंडो बल्लाळ यांचा काळ–चिटणिशीची व्यवस्था ... . | ६५ |
| संभाजीचें सल्ल्याचें बोलणें–दोन राजांची भेट . ... . . | ६५–६७ |
| चव्हाण .. ... .. | ६७ |
| जंजिऱ्याचा शिद्दी व तिकडील मसलत .. ... ... | ६८–७० |
| मानाजी व तुळाजी आंग्रे ... | ७०–७१ |
| बादशाही थाटाची स्वारी... ... | ७१–७४ |
| संभाजीची पुनः भेट ... | ७४ |
| आंग्र्याकडील हकीकत–सचिव | ७४ |
| साष्टी व वसई .. . ... | ७४–७६ |
| अंतर्व्यवस्था . .. . | ७६ |
| मानाजी आंग्र्याची मर्दुमकी... | ७६–७७ |
| नादीरशहा–मराठ्यांची तयारी–बाजीरावाचा मृत्यु . | ७७–८० |
| कोंकणांतील वर्तमान–व बाळाजी बाजीराव यास वस्त्रें . | ८१ |
| बाळाजीची हिंदुस्थानांत स्वारी–सदाशिव चिमणाजी ... | ८२ |
| सेनासाहेबसुभा व पेशवे यांचा समेट ... . ... ... | ८३ |
| जिवाजी खंडेराव चिटणीस . | ८४ |
| बापूजी नाईक जोशी बारामतीकर . ... | ८४–८५ |
| निजाम उल्मुल्क याचे पुत्र . | ८६ |
| गुजराथ प्रांताचा बंदोबस्त–दमाजी गायकवाड. ... ... | ८६–८७ |
| चिटणिशी व दुसरे दरखाची व्यवस्था .. ... | ८७ |
| महाराजाचा पुण्यप्रताप.. .. | ८७–९० |
| बाळाजीपंताची नम्रता व राजनिष्ठा .. . . ... | ९०–९२ |
| शाहूची अप्रतिहत आज्ञा ... | ९२ |
| राण्या व नाटकशाळा . . . | ९२–९३ |
| खंड्या कुत्रा–महाराजाची उदास वृत्ति . ... ... ... | ९३ |
| शाहूचें आणखी एक लग्न ..... | ९४ |
| संभाजीची आणखी एकदा भेट–श्रीपतरावाचा मृत्यु ... | ९४ |
| मल्हारी हत्ती–संततीची दुराशा–सगुणाबाईचा काळ ... | ९४–९५ |
| राजतीर्थांचा महिमा... . | ९५ |
| गोविंदराव चिटणिसावर मर्जी–दत्तक घेण्याचा विचार .. | ९५–९६ |
| चाफळ संस्थानचा बंदोबस्त... | ९६–९७ |
| मंत्रीपदाची व्यवस्था ... | ९७ |
| शाहूचें दुखणें–दत्तक निवडण्याचा विचार–सकवारबाईचा बखेडा | ९७–९९ |
| सकवार बाईचें प्राबल्य–चिटणीस व प्रधान यांच्या जिवास धोका–ताराबाईचा नातु–राज्य करूं म्हणणाऱ्याची विल्हेवाट–शाहूचें देहावसान . ... | ९९–१०१ |
| सकवार बाई सती–प्रतिनिधि व त्याचे कारभारी यांस बंधन–रामराजाचें आगमन... . | १०१–१०२ |

१. शके १६६५, सन ११५३. खांसा स्वारी राजदर्शनास जाऊन पुण्यास आली; भाऊ साहेब गडा [ ! ] बेदनूर पर्यंत जाऊन सातारियास आली—कलम.

१. शके १६६६, सन ११५४. खासा स्वारी छ १८ सवाल कार्तिकमासीं नाशिकास जाऊन कोंकणांत शिरून पुण्यास आले. ताराऊ[३२] साहेबांबराबर भाऊ साहेब होते.— कलम.

१. शके १६६७ सन ११५५. भाऊसाहेब व दादासाहेब व जनोबा बाबा सातार्‍यास जाऊन राजदर्शन घेऊन पुण्यास आले. महादाजी आबाजी पुरदरे कारभारी स्वारी भेलसें करून छ १३ रजबीं, श्रावणमासात आले. या सालास श्रीमतांस माधवराव[३३] साहेब पुत्र झाले— कलम.

१. शके १६६८, सन ११५६. खासा स्वारी राजदर्शन घ्यावयास गेले. तेथें निरोप घेऊन खांसा व दादासाहेब व जनोबा व विश्वासराव व सौभाग्यवती गोपिकाबाई सुद्धा निघोन छ १० रबिलावलीं पंढरीस जाऊन छ २४ जमादिलावलीं पुण्यास दाखल झाली. भाऊसाहेबाची स्वारी निराळी कारभारी सखारामपंत[३४] बोकील, निसबत पुरदरे, फौज बरोबर घेऊन कर्नाटकांत जाऊन बाहादूर बिंडा घेऊन बेदनुराकडून वगैरे छ ३ जिल्हेजीं गेले, ते छ २ जमादिलावलीं पुण्यास आले. मातोश्री ताई[३५] काशीयात्रा करून घरास आली. जनोबाबावा यांचा काळ झाला. कलम.

१. शके १६६९, सन ११५७. खासा स्वारी व कारभारी छ ८ जिल्हेज मार्गशीर्षमासी निघोन, फौजेस नालबंदी देऊन, खानदेशांतून बेदरपर्यंत गेले. तों नासिरजग व कारभारी रामदासपंत ऐसे चालोन आले. लढाई होतां असीउंबरीवर येऊन तह झाला. छ[३६] ९ रबिलावलीं पुण्यास येऊन हिंदुस्थान ममसुदाबाद प्रांतीं जाऊन छावणी केली. कलम.

१. शके १६७० सन ११५८. खांसास्वारी हिंदुस्थान प्रांतीं छावणीस होते

---

३२ ताराऊ=ताराबाई. इजला यात्रेस नेलें होतें असें दिसतें “स्वारी भेलसें पायगडावरून उज्जनी-ची खडणी घेऊन माघारें आले. भाऊ साहेब कोंकणात किल्ले पहावयास गेले. मग येऊन बयाबाईचें लग्न केलें” असें दुसर्‍या बखरींत आहे. बयाबाई ही चिमाजी आप्पा याची मुलगी ही ओंकार यांजकडे दिली.

३३. माधवराव याचा जन्म सावनूर येथें झाला बाईसाहेबांची व माधवरावाची ओज व जतन नबाबसाहेब यांणीं नीट ठेविली त्यावरून माधवराव नबाबांस ‘ मामा ’ असें म्हणत असत.

३४. हे प्रसिद्ध सखारामपंत बापू. याचा वाडा सासवडास आहे. यांस हिवरें गांव इनाम होतें.

३५ ताई—ह्या कोण ? बाजीरावाचें कुटुंब काशीताई ?

३६ येथें ९ किंवा ५ ई स्पष्ट कळत नाहीं

तिकडील खंडण्या ममसुद्धाबादेसुद्धां घेऊन, प्रयागस्नान करून, देशीं आले. पस्तीस हजार फौजेस नालबंदी देऊन, महादाजी आबाजी पुरंदरे यांस घरीं ठेवून, फौजेसुद्धां राजदर्शनास गेले. कलम.

१. शके १६७१, सन ११५९. खासास्वारी फौजेसुद्धां सातान्यास असतां महाराजांचे शरीरास अस्वस्थ झालें. तेव्हां अष्टप्रधान व भोंसले वगैरे यांजवळ फौज थोडी, प्रधान यांजवळ फौज भारी पाहून, राज्याची बंदोबस्ती करावयास आज्ञा करून, मार्गशीर्ष शुद्ध नवमीस देह विसर्जन झालें. तेव्हां बाई सती जावयास तयार झाली. त्यांचें साहित्य करून, मिरवत क्षेत्र माहुलीस आणून कृष्णेत दहन केलें. बाई सती गेली व दोन नाँटकशाळा बराबर गेल्या. तेथें कृष्णेत जागा बांधली आहे. महाराज ताराऊसाहेब राजाराम यांची स्त्री राजेश्रींनीं आ ज बें त ठेविली होती. वाड्यांत तिचा बंदोबस्त करून पानगांवीं ताराऊसाहेब यांची नात दरयाबाई निंबाळकरीण ताराऊसाहेबांचा लेक वेडा शिवाजी [ त्या ] चा लेक राजाराम याचा भाँऊ होता त्यास ताराऊ साहेब गुप्त खर्चास पाठवीत होती. त्यास निंबाळकरणीने पानगांवास आणिलें. हें वर्तमान राजेश्रींस कळलें होतें. त्यानीं खंडेराव न्यायाधीश यांस पाठविलें.

महाराजांचा काळ झाला तेव्हां श्रीमंतीं मातबर माणूस व फौज पाठवून निंबाळकरीण बाई सुद्धां सातान्यास आणून समारंभ, अन्नसत्र [ करून ] सिंहासनीं राज्यावर स्थापिलें. छ ८ सफर पौषमास. अष्टप्रधानांस वस्त्रें झालीं. राजाराम राजे, प्रधान बाळाजी बाजीराव, याप्रमाणें होऊन प्रतिनिधीचे मुतालीक यमाजी शिवदेव यास कैद करून किल्यास पाठविलें. ताराऊसाहेबांचा व हुजूरदार [ ? ] राजेश्रींकडून यांचा बंदोबस्त करून नाना पुरंदरे तेथें कारभारावर ठेविलें. भाऊसाहेब यांजबराबर फौज देऊन सांगोल्याकडे पाठविलें. खासे पुण्यास येऊन, चिरंजीव विश्वासराव यांस दीक्षित पटवर्धन याची कन्या वधू करून, मोठा समारंभ झाला. लग्नसिद्धी झाली. अष्टप्रधान वगैरे सर्व लग्नास आले होते. वाड्या भोंवतीं वाडे होते ते पाडून मंडप केले होते. पुण्याची वस्ती वाढू लागली. रंगभट्ट ढेंकणे वगैरे याचे वाडे पाडले होते त्यास दुसरी जागा नेमून दिली. नंतर जँयापा शिंदे यांस कारभारी रामचंद्रबाबा शेणवई

३७. नाटकशाळा=राखा, उपस्त्रिया.

३८. 'यांचा भाऊ होता' या शब्दांचा संबंध व अर्थ दुर्बोध आहे

३९. रामराजास गादीवर बसविण्याचे कामीं जी खटपट झाली ती 'थोरले शाहू महाराज यांचें चरित्र' पृष्ठ ९८-१०१ यात वर्णिली आहे

४०. जयापा हा राणूजीचा मुलगा याने मारवाडात नागोर शहरास वेढा घातला असतां त्यास मारेकऱ्यानीं मारिलें. भाऊसाहेबांची बखर पृ० १५।१६।१७ पहा.

मा. २०१६
८१६१३७



सरकारांतून नेमून दिले होते त्यांचे व सरदारांचे न बने करितां मल्हारजी होळकर यांचे विचारें दूर केले. आणि उभयतां सरदार हिंदुस्थानात स्वारीस पाठविले. कलम.

१. शके १६७२ सन ११६०. खांसास्वारी व महादाजी आबाजी पुरंदरे फौजेस नालबंदी देऊन श्रावणमासीं डेऱ्यादाखल होऊन चरोळीचे तळावर गेले. तेथे भाऊसाहेब सांगोल्याकडून आले. रामचंद्रबाबा भाऊसाहेबांस भेटले होते. त्यास घेऊन श्रीमंतास भेटविलें. आणि श्रीमंतांजवळ बोलणें घातलें कीं, कारभार आम्हीं करूं. तेव्हां हें बोलणें रामचंद्रबाबाचे सकेतें असें समजलें. तो मजकूर महादाजी आबाजी पुरंदरे यांस कळला. श्रीमंतांचें बोलणें झालें कीं, भाऊसाहेब कारभार करूं म्हणतात. तेव्हां पुरंदरे यांणीं उत्तर केलें कीं, आम्ही चाकर, भाऊसाहेब भाऊ आहेत, त्यांचें न ऐकिल्यास दौलत फौटेल[४१]. असें म्हणून निरोप घेऊन पुण्यास आले. भाऊ साहेबास रामचंद्र बाबानीं पुढें करून नजर छत्तीस लक्ष रुपये दिले. पुरंदरे यांचे विद्यमानें फौजेस नालबंदी पावून तयार होती. भाऊसाहेब व रामचंद्रबाबा कारभार करूं लागले. तों निजाममुलुक यांचे लेक नासरजंग व सलाबतजंग व निजाम अलीखा व बसालतजंग व मोगल अली फुलचेरीकडे[४२] आले होते. तेथें नासरजंग याचा काळ जाला, ही खबर आली. त्यावरून भाऊसाहेब कर्नाटकांत जाऊन भागानगरास गेले. तों मागे दमाजी गाईकवाड सातान्यास आला. सातान्यास रामराजे राज्यावर होते त्यांणीं [ व ] ताराऊसाहेब याणी आपली आज्ञा चालवून दमाजी गाईकवाड बोलाविला. तो वीस हजार फौजेनिशीं आला. पुणें पळों लागलें. पुण्यास मुतालकीवर बाबा फडणीस होते. महादाजीपंत पुरंदरे आपले घरीं असतां उभयतानीं विचार करून गाईकवाड यास चिठ्ठी पाठविली. तो पुण्यास न येतां सातान्यास गेला. नाना पुरंदरे तेथें होते. त्याशीं व यांशीं लढाई होऊं लागली. ही बातमी भागानगरास जाताच शहरापासून सतरा लक्ष रुपये खडणी घेऊन तेरावे दिवशीं सातान्यास दाखल झाले. गाईकवाड यास धरून कैद केला. सातान्याचा बंदोबस्त करून श्रीमंत पुण्यास गाईकवाडास घेऊन येऊन आबजी कवडे याचे वाड्यांत मुजमदाराचे घरापुढे ठेविला. नंतर पर्वतीचे देवालयास काम लाविलें. व दक्षणेचे ब्राह्मणास डोंगरासभोंवतीं सोपे बांधून देकारास जागा केली[४३]. कलम.

---

४१ पेशव्याची बखर पान ६२ व टीप ८ पहा

४२ फुलचरी=पांदेचरी

४३ "खासास्वारी बरोबर भाऊसाहेब कर्नाटकात सावनूर पावेतों गेले पुढें महादोबा बाबा रवाना करून उभयतां पुणियास आले. महादोबा अखेरीस आले दमाजी गायकवाड सातारियास आले होते" दुसरी बखर

१. शके १६७३ सन ११६१. श्रीमंत स्वारीस निघाले. कारभारी भाऊ साहेब व रामचंद्र बाबा. उमाबाई दाभाडी येऊन भेटली. त्यांचे संस्थानाचा बंदोबस्त केला. निजाममुल्काचा काळ झाला. नासरजंग हिंदामुदीखां-[४४] नाचे लढाईंत मृत्यु पावला. सैल्तनत[४५] लुटली गेली सबब दक्षिणेस दुसरा सुभा यावा हें राजकारण शिंदे, होळकर यांस करावयास पूर्वीं लिहिलें होतें [ तें ] त्यांणीं करून आणिलें. महादाजी आबाजी कारभारातून राहिले होते. त्यास सरदारी देऊन, पुणें देशाचा सुभा त्याचे पुत्र नीलकंठ महादेव याचे नावें करून त्यांस स्वारी बराबर घेऊन गेले. हिंदुस्थानांतून मोठे फौजेनिशीं जयापा शिंदे व मल्हारजी होळकर हे दिल्लीहून पादशहापासून गाजुदीखान फरोजंग [ यास ] दक्षिणेस सुभेदारी करून घेऊन येतात, ही बातमी आली. तेव्हा नासरजंग यांचे धाकटे भाऊ सलाबतजंग व बसालतजंग व निजाम अल्लीखान व मोगल अल्ली भागानगरीं असतां त्यास खबर कळली. त्यांणीं दिल्लीस पत्रें पातशहास पाठविलीं आणि श्रीमंतांकडे सरलष्करखान व जानोजी जसवंत निंबाळकर यास बोलावयास पाठविलें. तों दिल्लीहून पत्र आलें म्हणून वकिलांचें लिहिणें श्रीमंतास भाद्रपदमासीं आलें कीं, नबाबास पत्रें दिल्लीहून आलीं आहेत. तुमचें काम दक्षिणेचें तुम्हांस बहाल असें म्हणून आश्विन मासीं गाजुदीनखान व मल्हारजी होळकर व जयापा शिंदे फौजेसुद्धां औरंगाबादेस दाखल झाले. मसलतदार सय्यद हसमतखां व महमदखान होते. त्यांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें कीं, शिंदे व होळकर उभयता सरदार आपले भेटीस येतील. सय्यद लष्करखान व जानोजी निंबाळकर आले आहेत त्यास निरोप न देतां बराबर घेऊन शहागडावर यावे. आम्हीही मागाहून येतो. आपले आमचे विचारें ठरेल तसें होईल. त्याजवरून श्रीमंतानीं कूच करून, खान व निंबाळकर [ यास ] घेऊन शहागडावर गेले. होळकर व शिंदे येऊन भेटले. मागाहून गाजुदीनखान यावे तों त्यास औरंगाबादेस नबाबाकडे मेजवानी झाली. मृत्यु पावले. श्रीमंतीं सरलष्करखान व जानोजी निंबाळकर यांस निरोप दिला. मल्हारजी होळकर हिंदुस्थानात गेले. शिंदे देशीं राहिले. सरलष्करखान व निंबाळकर बसालतजंग यास जाऊन भेटले. नंतर बिघाडीचा अर्थ पेशव्याच्या दृष्टीस पडला तेव्हां मल्हारजी होळकर यांस पत्रें पाठविलीं. बसालतजंग व दिवाण रामदास पंत व इंग्रेज[४६] जंगी फरासी सामान सुद्धां मोठी फौज घेऊन चालून आले. तेव्हा

---

४४. हिंदामुदी=हिदायत मोयदीनखान-हा निजामुल्मुल्क यांच्या लेंकीचा पुत्र यास मुजफरजंग असेंही म्हणतात

४५. सलतनत=जिंदगी, सर्वस्व.

४६ 'इंग्रज' हें चुकीचें आहे. हा फरासीस माशर बुस्सी हा होय

महादाजी आबाजी पुरंदरे मार्गी [ ? ] असतां कारभारांतून मन काढून होते. सरकारचे फौजेवर ग्रहणाचे पौर्णिमेस छापा घातला. असा इंबरीवर मोंगल आला. पुण्यांत पळण झाली. दुसरे दिवशीं लढाई होतां पाच हजार फौजेनें चालून महादाजी आबाजी पुरंदरे व दत्ताजी शिंदे व महादजी शिंदे जारगीर व कोन्हेर त्रिंबक एकबोटे वगैरे अकरा असामींनीं डोलीं[१७]ची अबारी खालीं केली. तेव्हां सरकार फौज येऊन अंबारी लुटली. मोंगल शिकस्त झाला. जहागीर देऊन सल्ला करून गेला. होळकर याचीं पत्रें आलीं कीं, रोहिले पठाण कमाऊनचे पहाडांत आहेत. त्याचे निस्तनाबूद करावे असे होते, परंतु स्वामीं-कडून एक दोन पत्रें आलीं कीं, कळेल तैसा निर्गम करून तुम्हीं येणें. त्यावरून रोहिले पठाण यांचा व वजिरांचा सलोका करून देऊन कूच करून, भागीरथी उतरून, दक्षणतीरास आलों; वजीरही एक दोन दिवसात येतील; मजल दरमजल येत आहोंत; त्यास वजिराकडून व दिल्लीहून बातमी आली कीं, स्वामीचा व सलाबतजंगाचा सलोक जाला. त्यास सल्ला जाला नसला तरि तसेंच लिहून पाठवावें. मजल दरमजल येत आहोंत. सल्ला झाला असला तरि इकडेही कामकाजें आहेत, यामध्यें जसें वृत्त असेल तशी आज्ञा केली पाहिजे. मोंगलाचे छाप्यांत बाबूराव फडणीस याचे पायांस गोळा चाटून गेला. रामचंद्रबावा कारभारी याणीं कर्जाची* पट्टी लोकांवर घातली. कलम.

१. शके १६७४ [१८]सन ११६२. खांसा स्वारि, कारभारी भाऊ साहेब व रामचंद्रबावा, कर्नाटकात जाऊन श्रीरंगपट्टण पर्यंत गेले. मार्गीं होळहुनूरचें ठाणें घ्यावयास मोर्चे लाविले. तेथें भाऊ साहेब व रामचंद्रबावा मोर्च्यांत तीन दिवस बसले होते. नंतर कोन्हेर त्रिंबक एकबोटे यास आज्ञा केली. ते गेले. मागाहून श्रीमंताजवळून कृष्णा पलांडा व रामजी पवार व रूपतराव व बाबाजी पडवळ वगैरे अकरा असामी कोन्हेर पंताजवळ जाऊन किल्यावर चढले. कृष्णाजी गोळी लागून ठार झाला. किल्ला फत्ते झाला. अकरा असामींस बक्षिसें दिलीं. पलांडा मजकूर यास मु स ई ची [ ? ] पाटिलकी दिली. रघुनाथ बाजीराव याची स्वारी निराळी करून सखाराम भगवत कारभारी दिले. त्याणीं आमदाबादेस जाऊन हिंदुस्थानात शिंदे होळकर [यांसह] गेले. खासा स्वारी करनाटकांतून घरास आले. रामचंद्र बावा कारभारास आहेत. गणपतीच्या

---

१७. डोलाची अबारी=झोंपा घेता येईल अशी ? ही खांसेनबाबाची असावी

* हें या स्वारीचें कर्ज असावें

१८. " स्वारी बरोबर भाऊ व दादा मासिक पावेतों होते पुढें खासा व भाऊ कोंकणांतून पुणियास आले. दादा साहेब गुजराथेंत आमदाबाद घेऊन था ( ? ) लनेरीं होळकर सुद्धां मिळोन हिंदुस्थानांत गेले." दुसरी बखर

मार्गे लक्षुमणपंत कोणी गृहस्थ नादत होते त्यांची जागा घेऊन घर बांधिलें. तेथें तीन वर्षे कारभार करून मृत्यु पावले. त्यांस दत्तपुत्र सदाशिव रामचंद्र झाले. पुरंदरे घरीं होते त्यास सरदारी सांगितली. त्यात हरी गोपाळ सुपेकर सरदारीवर होते. सुभ्याचें काम नारो आपाजी करीत होते. विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग वगैरे कोंकणात, तेथें अम्मल इदलशाई विजापुराकडील प्रथम, नंतर अमात्य बावडेकर, नंतर कान्होजी आंग्रे वर्षे वीस, त्याचा लेक सखोजी त्यास लेक संभाजी व मानाजी, त्यास लेक संभाजी, त्यास तुळाजी, त्यास लेक मानाजी कुलाब्याकडे असत. कलम.

१. शके १६७५ सन ११६३. देशीं स्वारी असता माधवराव साहेबांचें लग्न शिवाजी बल्लाळ पागेकडे अशी [ ? ] उंबरीस होते. त्यांची कन्या सौभाग्यवती रमाबाई निश्चय करून लग्न केलें. बाबा व बाबुराव फडणीस व आबा मुजुमदार व माहिपतराव चिटणीस व कृष्णराव पारसनीस व कोन्हेर त्रिंबक एकबोटे यास पालख्यांची नक्षे दिलीं. दादा साहेब व कारभारी सखारामपंत हिंदुस्थानात छावणीस आहेत. कोंकणात अम्मल आंग्रे याचा. महादाजी आबाजी पुरंदरे घरीं. कारभारास भाऊ साहेब आहेत. कलम.

१. शके १६७६ सन ११६४ श्रीमंत देशीं सिंहस्थास गंगातीरास जाऊन आले. महादाजी आबाजी पुरंदरे यांबरोबर सरकारचे कारखाने व फौज देऊन तोफखाना नवा सजवून माधवराव पानसे कुळकर्णी मौजे सोनोरी[५१] तालुके करेपठार यास कारखाना सांगोन बराबर देऊन [५०]कर्नाटकांत[५०] पाठविलें. त्यांनीं कर्नाटकात जाऊन बिदनूरची खडणी घेऊन, अखेरीस सासवडास आले. कारखाने व निशाणें सरकारात पाठवून दिलीं. स्वारींतून मुशाफरजंग. गारदियांचा सरदार, पळून गेला. दादासाहेब हिंदुस्थान छावणी कुंभेरीकडे. कारभारी सखारामपंत बापू. कोंकणांत आंग्रे यांजवर स्वारी आली. खंडोजी माणकर व रामाजी महादेव व संकाजी निळकंठ वगैरे जाऊस किल्ले घेऊन अम्मल सरकारी झाला. पर्वतीचे देवळाचें काम तयार झालें. पूजा एका-

---

४९ हे सोलापूरकर जोशी.

५०. "भाऊस्वारी व भाऊ माधवराव यांचें लग्न करून कर्नाटकात गेले तेरदळ, जमखिंडी घेऊन माघारे आले दादा साहेब हिंदुस्थानात कुंभेरीस गेले." दुसरी बखर तेरदळ हल्ली सांगलीकराकडे आहे

५१. सोनोरी ता० पुरंदर हा गाव पानसे यास इनाम आहे जवळच मल्हारगड नावाचा किल्ला आहे तो त्याजकडे होता हल्लीं सोनोरी येथे पानशाचीं मुख्य तीन घराणीं आहेत माधवराव हे शिवाजी माणकेश्वर याचे चिरंजीव पानशाच्या घराण्याची संक्षिप्त हकीगत वरील माधवराव पानसे याचे वंशज केशव बापूराव पानशे यांनीं आम्हाकडे पाठविली आहे याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों

दशीस खासे जाऊन करूं लागले. पर्वती संस्थान केलें. चतुर्थीस थेउरास स्वारी जात होती. थेऊर व आळंदी व गणेशखिंड व [ ? ] पाषाण या मार्गें झाडें लाविलीं. पुण्याची वस्ती वसली. शेतें मोडून वसाहत झाली. स्वारी सासवडास जाऊन महादाजी आबाजी पुरंदरे यांस पुण्यास घेऊन आले. कलम.

१. शके १६७७ सन ११६५. श्रीमंतांस नारायणरावसाहेब पुत्र झाले. दादा साहेब हिंदुस्थानांतून तीन वर्षें छावणी करून आले. कारभारी सखारामपंत असतां कृष्णराव बल्लाळ काळे व त्रिंबकजीपंत लेले व चिंतो विठ्ठल त्याजवळ आहेत. जानकीबाई दादासाहेबांची स्त्री निवर्तली. दुसरें लग्न कृष्णातीरीं गलगलें येथें स्वारींत झालें. सौभाग्यवती आंणदीबाई नांव ठेविलें. सलाबतजंग भागानगरींहून चालून आले त्यांशीं सल्ला केला. सावनुरांत मुरारजी घोरपडे हिंदुराव त्यास पेशजी स्वारींतून मुजाफरजंग रुसून गेला होता तो त्यांशीं मिळून सावनूर बळाऊन लढाई लागली. त्यावर श्रीमंत व भोंसले नागपूरकर व नबाब [ अशी ] लाख फौज जमा झाली. मोर्चे लाविले. ते सालीं महादाजी आबाजी व कोन्हेर त्रिंबक घरीं होते त्यास बोलावून घेतलें. मुसा भुशी फिरंगी नबाबाकडील त्यानें तोफांचा मार देऊन गांवकुसू पाडिलें. हल्ला जाला. कोन्हेर त्रिंबक यास कपाळास गोळी चाटून गेली. भाऊसाहेब व पुरंदरे मोर्च्यांत होते. मुरारराव घोरपडे कौल घेऊन भेटीस गेले. सल्ला जाला. मुजाफरखान चाकर ठेवून श्रीमंतांनीं बराबर घेतला. निजामअल्ली भागानगरास गेले. नागपुरास भोंसले निरोप घेऊन गेले. पर्वतीस तळ्याचें काम लाविलें. खासे जाऊन बसत होते[५५]. कलम.

१. शके १६७८[५६] सन ११६६. खासा स्वारी फौजेनिशीं नालबंदी देऊन साठ हजार फौज घेऊन कारभारी भाऊसाहेब [ असे ] कृष्णातीरास गेले. करनाटक प्रांतींचे वकील आले. खंडण्याचा करार करून घेऊन तोफखाना

---

५१. नित्य आळंदीस जाणाऱ्या एका गौळी जातीच्या वारकऱ्यानें झाडें लाविलीं असें सांगतात तें या वरून खोटें ठरतें.

५२. "खासा स्वारी कृष्णेपर्यंत जाऊन माघारी आली नंतर सिंहस्थाकरितां नासिकास गेले. दादा साहेब हिंदुस्थानांत." दुसरी बखर

५३. कृष्णराव हे निजामाकडील पेशव्याचा प्रसिद्ध वकील जो गोविंदराव काळे त्याचे तीर्थरूप.

५४. ही ओक याची कन्या.

५५. "कुंभेरीहून दादा देशीं आले. जानकीबाई प्रसूत होऊन मरण पावली उपरांत गलगल्यास लग्न करून सावनुरास स्वारीस (खासाकडे) गेले. याच सालीं तुळाजी आंग्रे धरून आणिले." दुसरी बखर.

५६. "सु० स० सब्बा खमसैन (मया व अलफ् ११५७ इ० स० १७५६) खासा स्वारी श्रीरंगपट्टणास गेली बरोबर भाऊ दादासाहेब कितुरास." दुसरी बखर.

जगी सामानें[५७] बरोबर असतां श्रीरंगपट्टणास गेले. तेथें कुंभार राजा. त्याजवळ हैदर नाईक जमादार होता. मोर्चे देऊन सत्तावीस दिवस लढाई केली. खासा भाऊ साहेब[५८] मोर्च्यांत होते. मोर्च्यांतील तोफ एक फुटली त्यानें माणसें जायां झालीं. नंतर सल्याचें बोलणें होऊन, छत्तीस लाख रुपयांचे होन व पंधरा लक्षाची हुंडी, एकूण एकावन लक्ष रुपये खडणी घेऊन श्रीमंत ज्येष्ठमासीं तुंगभद्रेवर आले. नदीस पाणी फार होतें. श्रीमतांनीं पूजा करून प्रार्थना केली. उतार होऊन लष्कर उतरून आलें. पुढें कृष्णेवरही याप्रमाणें झालें. लष्कर उतरून पार आलें. श्रीमंत आलीकडे आल्यावर कृष्णेस पाणी पूर्ववत् प्रमाणें जाहलें! दर कूच निघोन सत्ताविसावे दिवशीं पुण्यास दाखल जाहले. दादासाहेब यास कारभारी सखाराम भगवत हे व होळकर समागमें स्वारी हिंदुस्थानांत पाठविली. कलम.

१. शके १६७९ सन ११६७. स्वारी[५९] श्रीमत विश्वासराव, कारभारी बाबूराव फडणीस, सरदार दत्ताजी शिंदे, फौज सुद्धां व हुजरात पागा व सरदार निजाम अल्लीखां याजवर रवाना केलें. त्यांजकडील वकील पांच लक्ष रुपयांची जहागीर देतों म्हणोन बोलण्यास आले. तें श्रीमतांनीं न ऐकतां बिघाड दाखविला. नवाब चालून आले. बरोबर विठ्ठल सुंदर दिवाण होते. निजाम अल्लीखां येतात हें ऐकून भाऊसाहेब फौजे सुद्धां डेरां दाखल होऊन मागाहून चालले. हुजुरात पंचवीस तीस हजार घेऊन कूच दर कूच नाशकास जाऊन, गंगास्नान करून, नगर किल्याजवळ फरा [ ? ] बागांत मुक्काम केला. विश्वासराव यांची व नवाब बहादुर याची लढाई होऊ लागली. दत्ताजी शिंदे यांनीं तरवार फार केली. नवाब शिकस्त होऊन पचवीस लक्ष रुपयांची जहागीर व किल्ले देऊन सल्ला केला. उभयतां श्रीमताच्या भेटी झाल्या. या पूर्वीं नवाबाची भेट विश्वासराव यांनीं भगवतराव कडेकर [ ? ] याचे विद्यमानें घेतली होती. नवाब निघोन गेले. उभयतां श्रीमत पुण्यास आले. हिंदुस्थानांत दादासाहेब छावणी करून राहिले. कारभारी सखारामपत व जनार्दन बल्लाळ फडणीस होते. त्यांत फडणिसांचा काळ झाला.[६०] कलम.

---

५७. जगीसामान=लढाऊ सामान, दारू गोळा वैगेरे

५८. यावरून व मागील पुढील मजकुरावरून भाऊस लढाईचा सराव नव्हता असें बिलकुल होत नाहीं

५९. "सु० स० समान खमसैन (म० अ० ११५८ ई० स० १७५७) खासास्वारी बरावर भाऊ तादुळजे पर्यंत गेले. नवाब निजामअल्लीखा याजपासून २५ लक्षांची जहागीर घेतली. दादासाहेब किनुरास" दुसरी बखर.

६०. भाऊ साहेबांची बखर पृ० ३६ व ३७ पहा.

[ ४१ ] ॥ श्री लक्ष्मीकांत ॥

हुकूमनामा सरकार श्रीमंत महाराज राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा बे॥ शिवराव पांडुरग सु॥ सीत अर्बेन मयातैन आलफ. छावणी फौज सोनेगांव येथे फौजेंत तुमचे कडील कारकून दाखल्याचे कामीं आहेत त्यांस सांप्रत ज्याप्रमाणें छावणी फौज माहाराजगज येथें शिरस्ता चालत आला त्याप्रमाणेंच याही फौजेंत राहील हें समजोन हा हुकूमनामा तुम्हास सादर केला असे. त्यास तुम्ही छावणी फौज सोनेगांव येथून आपले कारकून दाखल्याचे कामीं आहेत त्यांजला मैदमरसुद्धा बोलावून घेणे. जाणिजे छ० १ माहे शवाल सन १२५५ साल फसली मोर्तब सुद.

[ ४२ ] ॥ श्री लक्ष्मीकांत ॥

राजश्री बाळाजी रामचंद्र गोसावी यांस

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य— श्रे॥ रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा दंडवत सु॥ सन इसने अशर मयातैन व अलफ राजश्री अमृतराव पांडुरग यानीं विनतीपत्र पाठविलें त्याजवरून सरकारचे समजण्यांत आलें [ कीं ] पेंढारी यांची जमाव येकायेकीं कोणास बातमी न समजतां नागपूर शहरचे जवळ येवून मगळवारी पेंठेस आग दिल्ही. आणि चहूकडून येकच बलवा केला. त्या प्रसगीं तुम्हीं जातीनीं जाऊन तोफखाना व बाणाच्या कैच्या[1] रवाना केल्या होत्या त्या माघाऱ्या आणोन, तोफखान्याचा गोलदाज वगैरे एकत्र करून पेंढारी याची लढाई घेऊन त्या लोकांचे पारपत्य करून शहर वाचविलें व त्यांचे मागे धावून जाऊन जागजागीं ज्या ज्या रुखावर त्यांचा राह त्या त्या रुखावर तोफेचा आणि बाणांचा[2] मार करून परागदा केलें. इत्यादिक मजकूर सरकारचे समजण्यांत आले. यास तुम्ही तीर्थस्वरूप कैलासवासी बाबासाहेब[3] यांचे वेळेपासून वडिलोपार्जित सरकार चाकरी ऐसीच निःसीम पणें करीत आलां, व फार दिवस सरकारचे पदरीं अन्न खात आलां व सरकारची सेवा ही करीत आला तेव्हा तुह्माविषयीं सरकारची खातरजमा आहेच. हल्लीचे वेळेस सरकारची खांसा स्वारी प्रसंगीं नसतां मेहनत केली आणि अमृतराव पांडुरग यास गोळी लागून जखमी जाले असतां सर्वत्रांस समेटून राजश्री शिवराव पांडुरग यांस पुढें करून सरकारचा नक्षा कायम ठेविला याचा संतोष सरकारास फार झाला. त्यास ऐसी चाकरी तुमचे वडिलांपासून होतच आली आहे. त्याप्रमाणें हल्लीं तुम्ही केली व पुढेंही करीत जाणें. तुह्माकडेस हजेरी गणती वगैरे फौजेची आहे त्याप्रमाणें

1. दगा
2. बाण दारूचे
3. भवानीपत काळू.

चालेल आणि तुमचे वंशस्याचा निर्वाह शिलशिल्यानुरूप सरकारांतून होईल, एविशीं तुम्ही आपली खातरजमा ठेवणें. नाणिजे छ ५ माहे रविलावल. बहुत काय लिहिणें. (शिक्का.)

[ ४२ ] नवाबाची व जानोजी भों- सलेची कलमबंदी.

**सवाल १.**—वराड प्रांतीं तह पहिले पासून आहे. त्याप्रमाणें अमल सुरळीत चालावा. त्यांत खलश[1] नसावा. ज्यास्ती उपद्रव करूं नये. कलम.

**ज० १.**—खलेल आम्हाकडून जाहला असला तरि जाबसाल खाम हिशेब मनास आणून करू. पुढे तहाप्रमाणें चालू येणेंप्रमाणें.

**स० २.**—सालमजकुरीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांची स्वारि वऱ्हाड प्रांतीं आली. भोंसले याचा हिस्सा म्हणून महालों महाल ऐवज घेतला. त्याची रसीद एकदर महालों महालची द्यावी कीं, जो आकार मामलत रुईनें होईल त्यांत सरकार हिस्सा जाऊन बाकी ह्याचा हिस्सा राहील त्यात तो ऐवज मजुरा द्यावा.

**ज० २.**—ऐवज सालमजकुरीं न पुरतां येत्या सालांत राहिला ऐवज मजुरा देऊं. रसीद वाजवी असावी.

**स० ३.**—देवगड चांदा येथील पेशकशीचा ऐवज सुदामत[2] प्रमाणें देत नाहींत. त्याचा मागील हिशेबाप्रमाणें ऐवज नगद द्यावा. व पुढील सावकारी निशा द्यावी. कलम.

**ज० ३.**—[ ही जागा मूळात कोरी आहे.]

**स० ४.**—गंदिया व ठाणें सांप्रत नवीन घेतले आहेत त्यांत सुदामत ठाणें राहत आहेत ते ठाणें सोडावीं. ठाणें आमचीं. कलम.

**ज० ४.**—तहाखेरीज घेतलीं असतील तरि माघारी घ्यावीं.

**स० ५.**—सांप्रत फौजेचे उपद्रयामुळें वऱ्हाड मुलूख प्रात खराबीत आले. त्यास कौलपत्र देऊन आकाराचा पैसा घेऊन त्याची उस्तवारी करावी; उभयतां कडून कौलास अंतर नसावें. ज्यास्त उपद्रव न करावा.

**ज० ५.**—प्रांत उभयतांचा आहे. त्यास उभयपक्षीं उचित तें करावें.

**स० ६.**—वऱ्हाड प्रांतीं सुभा राहील त्यानें व सरकारचे सुभेदारानें आपापले तहाप्रमाणें अम्मल करून सुरळीत वर्तावें; हिशेबाप्रमाणें महालाचा वसूल द्यावा; जहागीरदार वगैरेंचे महालास उपद्रव न द्यावा. कलम.

---

१. दुजाभाव. २. पूर्वंचालीप्रमाणें.

ज० ६—सदर्हू प्रांत तुमचा आमचा आहे त्यास उभयतांनीं परस्परें जें उचित तें करावें. येणेंप्रमाणें.

स० ७—जहागीरदाराचे महालांत तह व गावखर्च व सरदेशमुखी वजा करून बाकी निमेनिमे ऐवज घेत जावा; त्या करारात अतर नसावें. कलम.

ज० ७.—[ही जागा मूळांत कोरी आहे]

स० ८.—पागेकरी वगैरे पतकी महालात राहतात. त्यांनीं वागगा उपद्रव रयतीस न द्यावा. कलम.

ज० ८.—जें उचित तें उभयतांनीं करावें.

स० ९.—भागानगर व बेदर व अवरगाबाद वगैरे प्रांतीं घांसदाणा नबाब असफज्याचे वेळेस न होतां, साप्रत ही खास फौज त्या प्रांतीं असल्यास घेऊं सकत नाहींत. फौज मोहीमशीर असतां मागें उपद्रव देतात ते न करावा. कलम.

ज० ९.—घांसदाणा नबाब असफज्याचे वेळेस व नासरजग याचें इनायत झाला. घासदाणा मामूल घेणें. येणेंप्रमाणें.

स० १०—प्रगणे नाचणगाव वगैरे महाल वर्षापार आहेत त्याचा तहाचे वेळेस इजारा करून दिल्हा. त्या तागाईत तो ऐवज न आला तो नगद द्यावा पुढें सावकारी निशा जाली यास महाल त्याजकडेस रहावेत नाहीं तरि सदर्हू महाल सोडावेत.

ज० १०—सदर्हू इजाऱ्याचे तहाप्रमाणें ऐवज बेमुजीब हिशेब भरून तागाईत राजे बहादुर दिल्हा. आलीकडेस सनदा आहेत त्यास कराराप्रमाणें सनदा असल्यास उत्तम.

स० ११—साबाजी भोंसले यांस जागिर बशर्त चाकरी करावी म्हणून दिल्ही. त्यास कराराप्रमाणें फौज चाकरीस नाहीं. सबब फौज चाकरीस द्यावी. अथवा महाल सोडावे.

ज० ११.—चाकरी बशर्त परंतु आज पावेतों चाकरी केली नाहीं. जहागीर आसफज्यापासून आहे.

स० १२—आमनेरचा किल्ला यास दिल्हा. सबब कीं, हे येऊन सरकारांत सामिल जाहले. पुढें सामिल राहून कितीएक मनसुबे करावे, तो याजकडे सामिलातींत अतर जहाले सबब किल्ला व महाल सोडावा. दिकत नसावी.

ज० १२.—बेमोजिब सनद जवाबसाल आहे.

स० १३.—राजाराम बाबूराव सुभेदार आपले सुभ्यांत अम्मल करितात. त्यास बुडविलें त्याची माल मवेशी व सरकारच्या तोफा वगैरे माघाऱ्या द्याव्या. क० १

ज० १३.—बाजवी.

**स० १४.**—निंबाळकर वगैरे त्यांचे महालात पैसे वगैरे वाजवी घेतले ते जमीदाराचे रुजुवातीनें सदर्हू ऐवज माघारा द्यावा. कलम १.

**ज० १४.**—बत्तिसा लक्षाची जहागिर श्रीमतांनें दिली त्या महालाचा वसूल नवाबचे सरकारात अगर जहागिरदारांकडे जमीदाराकडे त्या वेळीं सदर्हू निंबाळकर वगैरे यांचे तालुक्यात घेतला असेल.

**स० १५.**—हवेली बाळजपूर याचा मक्ता सरदेशमुखी मोकाश पावती घासदाणा वगैरे कुल मुकरार रुपये २५००० पंचवीस हजार अक्षरीं पचवीस हजार घेत जावे. याचप्रमाणें तहनामा आहे त्यास सांप्रत कराराशिवाय ऐवज अधिक घेतला असेल तो ऐवज माघारा दरोबस्त दिला पाहिजे. कलम १.

**ज० १५.**—[ ही जागा मूळात कोरी आहे ]

## [ ४४ ] भोंसल्यांच्या लढाया आणि *तहनामे.

### [ १ ] पहिला रघोजी

तारीख चद्र १२ माहे जून सन १८२१ इसवी साहेब अल्लीशान बहादूर [ रेसिडन्ट साहेब ] यानीं हुकूम केला जे, ज्या लढाया जाहाल्या त्याच्या नतर बोलाचाली काय जहाली व गोष्ट मान काय जाहाली ते कळवावी.

मोठे रघोजी भोसले याचे वेळेस पाच लढाया जाहाल्या एक [ १ ] कान्होजी भोंसल्याची [ २ ] दुसरी बंगाल्याची [ ३ ] तिसरी देवगडची [ ४ ] चवथी चांद्याची [ ५ ] पाचवी निजामअल्लीखाची. या पाच लढाया जाहाल्या यांशिवाय भोपाळाकडेस पेशवे साहेबांबरोबर गेले होते व बुंदेलखडाकडे व त्रिचनापल्लीकडे व चंदीचदावराकडेस गेले होते. जाण्याचें कारण मुलूख लुटावा आणि खडण्या घ्याव्या, इतके कारण; सवालजबाब नाहीं; याचा तपशील या प्रकारें:—

१. प्रथम रघोजी भोंसले साहेबांस सेनासाहेबीची पदवी मिळून कान्होजी भोंसलेचे कामावर स्थापित जाहाले. कान्होजी, चुलत चुलता याशी व रघोजीशीं लढाई उमरावती व बाळापूर यांचेमध्यें जाहाली. तेव्हां कान्होजीचे बोलणें राजा शाहूशीं काय जहालें हें न समजलें. परंतु कान्होजी भोंसल्याची सेलतनत[2] बिघडल्या नंतर त्याचे पुत्राशीं व रघोजीशीं करार मदार जाहाला त्याचा बजिन्नस तहनाम्याचा आहे. नक्कल सन ११४९ जे

* प्रस्तुत लेख बराच मोठा आहे व त्यात कोठें युद्धसग्रामाची हकीकत सविस्तर दिली आहे. या समग्र लेखाची दुसरी प्रत आमच्या पाशीं नाहीं तथापि इतर ठिकाणीं यांतील कित्येक गोष्टींचा उल्लेख आला आहे व तहनाम्यांच्या सबध प्रती मिळाल्या आहेत ह्मणून हा लेख जितका सुबोध करवला तितका केला आहे.

१ पहिला रघोजी.

२ सलतनत—सलतान—सलतन = फौजफाटा, घोडेस्वार

निघाले बळें मार साही जणांचे । महावीर ते गर्जती विक्रमाचे ॥
रणामंडळीं पारखे वीर कैसे । दळेंशीं बळें धावती काळ जैसे ॥ ४८ ॥
महा मार दोहीं दळीं एक जाला । कपी वीर राक्षेस कीती निमाला ॥
पुढें वानरीं घोर घातें निघातें । रणीं भग्न केलें तयां राक्षसांतें ॥ ४९ ॥
तयां देखता लोटला दिव्य घोडा । नरां अंतकू कोपला वीर गाढा ॥
बळें हाणतां शस्त्र वाजे घडाडां । तुटों लागले पादपाणी धडाडा ॥ ५० ॥
बहू वेग संहारिती सर्व सेना । कपी पाहती अश्व कोठें दिसेना ॥
पुढें पाहतां पाहतां लाग वेगीं । अकस्मात तें आदळे खड्ग अंगीं ॥ ५१ ॥
बहूसाल तेणें [v]तया वानराच्या । ग्रिवा कापिल्या थोर माहा विरांच्या ॥
कपी-वाहिनीचा रणीं आट जाला । [w]भुमी लोटिले शोणितें पूर आला ॥ ५२ ॥
कपी वीर ते खोंचले भग्न जाले । महा मार देखोनि वेगें[x] पळाले ॥
कितीएक ते सुग्रिवा आड गेले । पुढें अंगदें सर्व ही स्वस्थ केले ॥ ५३ ॥
उणें देखिलें धांवला शीघ्र कोपें । बळें ताडिला अश्व तो वज्र-थापें ॥
नरा-अंतकाला रणीं अंत आला । बहू मेद-मांसें भुमी गाळ जाला ॥ ५४ ॥
नरा-अंतका मारिलें अंगदानें । पुढें वीर ऊठावले घोर त्राणें ॥
रणामंडळा माजि ते शीघ्र आले । तया अंगदा ही कपी साह्य जाले ॥ ५५ ॥
करी नीळ तो युद्ध माहोदराशीं । महा वीर देवांतकू मारुताशीं ॥
भिडे त्रीशिरा पार्श्व तो ऋषभेशी । बळें झुंझती चौघे तीघां जणांशीं ॥ ५६ ॥
पुढें माडिला थोर सहार तेथें । रणीं माजलीं तें बहूसाल प्रेतें ॥
महावीर ते धीर संग्राम-सेरे । बळें धांवती एकमेकां पुढारें ॥ ५७ ॥
विरश्री बळें दूर टाकूनि शंका । रणीं हाणती घाय ते येकमेकां ॥
महा थोर संग्राम साही जणांचा । पुरीं पूरला अंत त्या राक्षसांचा ॥ ५८ ॥
गजारूढ माहोदरू त्या निळानें । रणामाजि देवांतकू मारुतीनें ॥
महा वीर पारश्व त्या ऋषभानें । रणीं झुंजतां पाडिले थोर मानें ॥ ५९ ॥
बळें कोपला तो अती चडकाया । रथू लोटिला शत्रु तेणें जिताया ॥
कपी वीर ते आडवे शीघ्र आले । पुढें चालतां सर्व ही भग्न केले ॥ ६० ॥
रथीं बैसला पर्वता सारखा तो । म्हणे राम हा कोण युद्धासि येतो ॥
वदे शीघ्र बीभीषणू रम्य वाचा । रघूनायका पुत्र हा रावणाचा ॥ ६१ ॥
सखा होय सौमित्र तुह्मासि जैसा । अतीकाय तो मेघनादासि तैसा ॥
न लेखी कपी वाहिनीचा उठावा । तुह्मीं कीं सुमित्रा-सुतें हा वधावा ॥ ६२ ॥

---

v. 'रिसां' पा० भे० w 'भुमीलागिं शोणीत तो पूर आला' पा० भे०. x. 'मार्गें' पा० भे०.

म्हणे त्यासि पाहा बरें रावणारी । उभा राहिला शीघ्र कोदंड-धारी ॥
विरश्री बळें बाणिली दिव्य शोभा । रणामडळीं ठाण माडूनि ऊभा ॥ ६३ ॥
पुढें रावणें ओढिला बाण जैसा । यदे आदरें वीर सौमित्र तैसा ॥
पहावें घडी येक राजीव-नेत्रें । वधीतों बळें दैत्य मुहूर्त-मात्रें ॥ ६४ ॥
पुढें पावला तो अती चड काया । yबहू बोलती येकमेकां छळाया ॥
तया येकमेकांस निर्वाण जालें । शरां सोडिलें व्योम सपूर्ण केलें ॥ ६५ ॥
शरा तोडिती एकमेका विराचे । पुन्हा मागुती भार येती शराचे ॥
बळें भीडती बाणबाणास कैसे । पडों लागती छेदिले सर्प जैसे ॥ ६६ ॥
शरीं राक्षसें व्योम सपूर्ण केलें । विरें लक्ष्मणें शीघ्र छेदूनि नेलें ॥
रिपू कोपला मागुते बाण सोडी । बळें वीर सौमित्र तात्काळ तोडी ॥ ६७ ॥
पुढे वीर रामानुजें ते चि काळीं । नभीं मडपू घातला बाणजाळीं ॥
किती चूकले भार येतां शरांचे । देहे खोंचले एकमेकां विराचे ॥ ६८ ॥
विरश्री बळें दुःख नाहीं तयाचें । नभीं पाहती देव कौतूक त्याचें ॥
बळें थोकलीं युद्ध होतां खणाणां । तया मस्तकू डोलवी रामराणा ॥ ६९ ॥
भला रावणी वीर हा चंडदेही । दुजा मानवी वीर सौमित्र तो ही ॥
महावीर दोघे रणामाजि कैसे । बळें मातले भीडती काळ जैसे ॥ ७० ॥
पुढें शीघ्र सौमित्र तो वज्र-ठाणें । बळें तोडिलें शीर चद्रार्ध बाणे ॥
रणीं पाडिला तो अती चडकाया । बळें लागले दैत्य मागे पळाया ॥ ७१ ॥
बहूसाल ते मृत्युपथेंचि गेले । परी अल्प घायाळ मागें पळाले ॥
पुरी माजि जाऊन लंकापतीला । भयें सांगती सर्व सहार झाला ॥ ७२ ॥
बहू झुजतां झुजतां भग्न जाले । रणीं सर्व ही पुत्र-मत्री निमाले ॥
नरां वानराला जयो प्राप्त जाला । क्षयो राक्षसां शीघ्र टाकूनि आला ॥ ७३ ॥
पुढे रावणू तो भुमी अग घाली । तया ऐकतां मूर्छना शीघ्र आली ॥
शरीरीं नसे शुद्धि सर्वै उडाली । बहू दैन्यवाणी दशा प्राप्त जाली ॥ ७४ ॥
करी रावणू शोक शंकारहीतू । सभा-मंडपीं धांवला इंद्रजीतू ॥
पिता शीघ्र आलिंगिला मेघनादें । म्हणे काय जी शीणतां व्यर्थ खेदें ॥ ७५ ॥
बहूता परी जनकू शीकवीला । म्हणे शीघ्र मारूनि येतों रिपूला ॥
तेणें रावणू शोक साडूनि ठेला । बहूसाल सन्मानिलें त्या सुताला ॥ ७६ ॥
बहू दीस होती गळां रत्न माळा । तये पाहतां मोल थोडें भुगोळा ॥
करीं घेतली माळिका आवडीनें । सुताच्या गळां घातली तेzत्वरेनें ॥ ७७ ॥

---

६१. कोदड=धनुष्य ६२. राजीव=कमल. ६३. मुहूर्त=अत्यल्प काळ. y. 'बळें' पा० भे०. ६४ रावणी=रावणाचा पुत्र. ६५ जनक=बाप (रावण). z. 'रावणानें' पा० भे०.

रणा चालिला वीर संग्राम सैरा । दळेंशीं बळें लोटला भार सैरा ॥
रथां घोडियां कुंजरा [66]मीति नाहीं । बहूसाल वाद्यें पुढें एक घाई ॥ ७८ ॥
महा वैभवेशीं रणामाजि आला । तया इंद्रजीतें रणीं होम केला ॥
[a]यथायोग्य पूर्णाहुतीचेनि तोषें । रथू दीधला अग्निवर्णू [67]हुताशें ॥ ७९ ॥
रथू तोमरू-खड्ग बाणीं विराजे । वरी रावणी तो महा वीर साजे ॥
उडाला रथेंशीं बळें अंतराळें । असंभाव्य सोडी तळीं बाण-जाळें ॥ ८० ॥
बळें सूटले बाण त्या राक्षसाचे । बहू खोंचले भार [68]गोळांगुळाचे ॥
[b]फुटों लागले कोंपळे पादपाणी । भयें बोलती वानरें दैन्य वाणी ॥ ८१ ॥
कितीएक ते वीर भेणें पळाले । पुढें जात जाताचि चौरंग केले ॥
कितीएक धाकें विरां आड जाती । अकस्मात तेथें चि ते भेदिजेती ॥ ८२ ॥
कपी-वाहिनीमाजि आकांत जाला । रणीं तो विरें वीर सर्वे निमाला ॥
सुमित्रा-सुतू बोलिला राघवाला । बहू आट जाला रिसां वानरांला ॥ ८३ ॥
पुढें बोलतां बोलतां ते चि काळीं । अकस्मात ते भेदिले बाण-जाळीं ॥
निचेष्टीत भूमी मनुष्यें गळालीं । विरें इंद्रजीतें [c]बहु ख्याति केली ॥ ८४ ॥
बळी रावणी एकला वीर जेठी । कपी पाडिले लक्ष कोट्यानुकोटी ॥
महा वीर ते धीर मेरू बळाचे । प्रतापें सुराहूनि ते विक्रमाचे ॥ ८५ ॥
रिसां वानरां सर्व संहार केला । पुरी माजि तो येश घेऊनि गेला ॥
नमस्कार केला तया रावणाला । दळेंशीं बळें राम शत्रू निमाला ॥ ८६ ॥
रणीं सर्व ही पाडिले प्रेतराशी । बहूसाल आनंद त्या रावणासी ॥
महा सूख लंका-पुरीमाजि ऐसें । पुढें वर्तलें वानरांमाजि कैसें ॥ ८७ ॥
कपी रीस[d] ते पर्वता तुल्य कैसे । निमाले रणीं [e]पाडिले वृक्ष जैसे ॥
तयांमाजि कल्याण दोघा जणाला । कपी मारुती आणि बीभीषणाला ॥ ८८ ॥
रणें माजलें सर्व ही प्रेतरूपी । तया माजि ते दोघे [69]उद्विग्न रूपी ॥
विचारूनिया [70]वन्हि-शीखा उजेडें । रणा शोधिलें सर्व [f]तिहीं निवाडें ॥ ८९ ॥
रणा शोधितां सर्व सेनेसि अंत । तयामाजि तो बोलिला जांबुवंत ॥
पुढे वीर ते शीघ्र धांवूनि आले । तया पाहतां बाण आंगीं बुडाले ॥ ९० ॥
बहूसाल तो रीस घायाळ जाला । बळी[g] बाण-जाळीं रणीं आकळीला ॥
महावीर बीभीषणें ऊठवीला । बळें बाण वोढूनियां स्वस्थ केला ॥ ९१ ॥

---

६६. मिति=गणति a 'तयालागि' पा० भे० ६७ हुताश=विस्तव. ६८. गोलांगुल =वानर. b. 'तुटों' पा० भे० c 'रणीं' पा० भे० d. 'वीर' पा० भे० e ठेविले पा० भे० ६९ उद्विग्न=दु खी. ७० वन्हिशिखा=विस्तवाची ज्वाला f ही तें पा० भे० g. 'बहू' पा० भे०

पुढें ऋक्ष बीभीषणालागीं पुसे । महावीर ते मुख्य आहेत कैसे ॥
म्हणे जांबुवतासि नैॠत्य-नाथू[७१] । विरा पुससी काय जाला अनर्थू ॥ ९२ ॥
महावीर दोघे निचेष्टीत जाले । [h]परी सुग्रिवादीक सर्वे निमाले ॥
रणामाजि ते शोधिली सर्व सेना । समस्तामध्यें एक तोही [1]दिसेना ॥ ९३ ॥
प्रसगीं निरूपी यथातथ्य मानू । मनामाजि तो जांबुवतू निवांतू ॥
म्हणे वीर बीभीषणू जांबुवता । समस्तासि कल्याण ते साग आतां ॥ ९४ ॥
म्हणे ऋक्ष तो मारुतीवीण कांहीं । विरां ऊठवाया दुजा प्रेल नाहीं ॥
क्षिराब्धी-तटीं योजनें चारि कोटी । गिरी द्रोण आणील हा वीर जेठी ॥ ९५ ॥
महा रम्य द्रोणाचळू भव्य रूपी । तया मस्तकीं औषधी दिव्यरूपी ॥
बळें आणितां ऊठती सर्व सेना । कपी मारुतीवीण दूजा दिसेना ॥ ९६ ॥
म्हणे जांबुवतासि नैॠत्य-नाथू । असंभाव्य तू सागशी दूर पथू ॥
गमे प्रेल हा सर्वथा ही घडेना । गिरी मारुतीचेनिही आणवेना ॥ ९७ ॥
म्हणे गा विरा काय तू बोलिलाशी । कपी सारखा मारुता भावितोशी ॥
परी जाणहा ईश्वरू साक्ष रूपी । कळेना जना रुद्र पूर्ण-प्रतापी ॥ ९८ ॥
बहु स्तूति केली तया मारुताची । तयें तोषली वृत्ति बीभीषणाची ॥
म्हणे गा विरा सकटीं धांव घालीं । बळें ऊठवीं सर्व सेना निमाली ॥ ९९ ॥
कपी मारुती उत्तरें सिद्ध जाला । मनीं चिंतिलें राम-पादांबुजाला[७२] ॥
महावीर आणील द्रोणाचळातें । पुढें वीनवी दास तो श्रोतयांतें ॥ १०० ॥

---

## प्रसंग ५वा प्रारंभ.

उभा राहिला वीर मंदार जैसा । मनाहूनि पूढें बळें वेग तैसा ॥
रूपें कर्कशू पाहतां पाहवेना । बहूसाल उचाट त्या राहवेना ॥ १ ॥
अकस्मात तो व्योम[१]-पथें उडाला । मही झोकली पन्नगा[२] भार जाला ॥
बहू झोंकिले[a] कूर्म[३] वाराह[४] दंती[५] । झडा चाचरे[b] ते धरा[६] सावरीती ॥ २ ॥
स्फुरद्रूप सर्वांग वाजे झडाडा । उडाले नभीं वृक्ष वातें फडाडा ॥
असभाव्य पिंजारिलें पुच्छ[७] मागे । नभोमंडळीं[८] जातसे लागवेगे ॥ ३ ॥
बहू लंघिली फोकळी घेग केला । द्विपें[९] पाच ही शीघ्र टाकूनि गेला ॥
उडाला बळें पांच सिंधू[१०] अगाधू[११] । पुढें देखिला साहवा क्षीर[१२] सिंधू ॥ ४ ॥

---

७१ नैॠत्यनाथ=राक्षसाचा स्वामी. h 'कपी' पा० भे. 1 'वदेना' पा० भे०. ७२ पादांबुज=पदकमल. १ व्योम=आकाश २ पन्नग=शेष, सर्प a. 'झोकले' पा० भे०. ३ कूर्म=कासव. ४ वराह=डुकर ५. दंती=हत्ती. b. 'चांचरीती' पा० भे०. ६. धरा=पृथ्वी ७ पुच्छ=शेपूट. ८ नभोमंडळ=आकाशमंडळ ९ द्वीप=बेट. १०. सिंधु=समुद्र ११ अगाध=खोल १२ क्षीर=दूध.

तयाच्या शिरीं उंच आकाश पंथें । विरें देखिलें रम्य द्रोणाचळातें ॥
तया मस्तकीं दिव्य वल्ली अपारा । प्रभा फाकली तेज कल्लोळ सैरा ॥ ५ ॥
पुढें देखतां मारुता सावरेना । धरीतां बळें तेज हाता चढेना ॥
महा औषधी दिव्य शैल्या निशैल्या । कपी देखतां सर्व ही गुप्त झाल्या ॥ ६ ॥
तया पर्वताची बहु स्तुति केली । परी नायके सर्व ही व्यर्थ गेली ॥
बहूसाल त्या [13]अचळें गर्व केला । पुढें मारुता कोप तात्काळ आला ॥ ७ ॥
महा थोर धिःकार केला तयासी । बळें शीघ्र उत्पाटिलें पर्वतासी ॥
गिरी घेतला पुच्छ वेष्टीत माथां । कपी-राज तो चालिला व्योम पथा ॥ ८ ॥
रणीं जाहला सर्व संहार जेथें । महावीर आला अकस्मात तेथें ॥
[14]निशा दाटली अंधकारें दिसेना । गिरी ठेवितां देखिली सर्व सेना ॥ ९ ॥
पिता पावला तो बळें मारुतीचा । रणीं वास नेला तया औषधींचा ॥
सुगंधें चि ते वीर आरोग्य जाले । कपी सर्व ही मृत्यु मारूनि ठेले ॥ १० ॥
दळेशीं बळें ऊठला रामराजा । स्फुराणें रणीं[c] गर्जती वीर-फौजा ॥
पुढें मारुतें घेतलें पर्वताला । क्षिराब्धी तटीं शीघ्र ठेवूनि आला ॥ ११ ॥
तुलेना गती शक्ति माहा विराची । कळेना करी कोण संख्या[15] बळाची ॥
दिसे पाहतां वानरू वेषधारी । परी जाणिजे सत्य हा त्रिपुरारी[16] ॥ १२ ॥
निशीच्या [17]पदें चारि कोटी उडाला । गिरी दों[d]पदीं शीघ्र घेऊनि आला ॥
पुन्हा मागुती तीपदा माजि नेला । प्रभातें चि चौथे पदीं प्राप्त जाला ॥ १३
सहस्रेक [18]गांवें गिरी[19] स्थूल मोठा । असंभाव्य या मारुतीचा चपेटा ॥
उडाला नभीं योजनें कोटि सोळा । नसे शोधितां दूसरा या भुगोळा ॥ १४ ।
बहू पंथ चाले रवी भार नाना । बहू भार बाहे फणी[20] तो उडेना ॥
गरूडासि तो आचळू हालवेना । दुजी साम्यता ब्रह्म गोळीं दिसेना ॥ १५ ॥
पुढें मारुती भव्य आनंद-रूपी । नभोमंडळीं भानु[21] जैसा प्रतापी[22] ॥
महा वीर तैसा दळामाजि आला । समस्तासि देखोनि आनंद जाला ॥ १६ ॥
सखा तो जिवाचा असे दूरि देशीं । सदा लागले चित्त हें त्याजपाशीं ॥
पुढें पाहतां तो अकस्मात आला । तया सारिखें [e]जाहले मारुताला ॥ १७ ॥
कपीनें कसें पाहिलें राघवासी । पुढें देखिलें लोभियानें धनासी ॥
तथा बाळकें देखिलें जननीळीं[23] । तया सारिखें जाहलें मारुताला ॥ १८ ॥

---

१३ अचळ=पर्वत १४ निशा=रात्र c 'कपी' पा० भे० १५. संख्या=गणना. १६ त्रिपुरारी=शिव १७ पद=चवथा हिसा (प्रहर). d. द्रोण तो' पा० भे०. १८ गांव=योजन=चार कोस १९ गिरी=पर्वत २०. फणी=शेष २१. भानु=सूर्य २२ प्रतापी =ऊन पाडणारा, पक्षीं शूर e. 'वाटलें राघवाला पा० भे०. २३ जननी=आई

नमस्कारिलें त्या रघुनायकासी । उभा राहिला हात जोडोनि पाशीं ॥
म्हणे राम धन्य गा धन्य वीरा । कपी काय द्यावे तुझ्या उपकारा ॥ १९ ॥
अगा मारुती तुझिया उपकारें । जिवा ऋण जालें बहूसाल भारें ॥
सदा सर्वदा आमुची थोर चिंता । समस्तासि तू एकला प्राण-दाता ॥ २० ॥
म्हणे मारुती सर्व स्वामी प्रतापें । प्रभू काय कीजेल म्यां दीनरूपें ॥
समर्था तुझेनी कृपेवीण कांहीं । स्वता अल्पही कार्य होणार नाहीं ॥ २१ ॥
बहूतां परी मारुतें स्तूति केली । मनोवृत्ति ते राघवाची निवाली ॥
पुढें राघवें रुद्र संतुष्ट केला । बहूतां परी आदरें गौरवीला ॥ २२ ॥
प्रसगें कपी नाथ सुग्रीव बोले । म्हणे मारुती प्राण त्वा रक्षियेले ॥
कुळामाजि जालासि पूर्ण प्रतापी । कपीचीं कुळें सर्व ही श्लाघ्यरूपी ॥ २३ ॥
कपी सर्व ही बाण-जाळें निमाले । तुझीया प्रतापें पुन्हा जन्म जाले ॥
प्रसगें सखा राघवें निर्मिलासी । कपी कारणें तूं बहू कष्टलासी ॥ २४ ॥
तया बोलता मारुता सूख जालें । पुन्हा मारुतें ही बहू तोषवीलें ॥
असो हे बहूसाल पाल्हाळ-गोवी । कथा राहिली ते पुढें चालवावी ॥ २५ ॥
कपी-नाथ बोले रघूनायकासी । नये रावणू चडदुःखें रणासी ॥
तरी शीघ्र लंकापुरी जाळवावी । समर्थें कपींलागिं आज्ञा करावी ॥ २६ ॥
पुढें बोलिजे सुग्रिवालागिं देवें । तुम्हीं कल्पिलें कार्य सिद्धीस न्यावें ॥
कपी राम-आज्ञेस घेऊनि वेगीं । विरालागिं आज्ञा करी ते प्रसगीं ॥ २७ ॥
तुम्हीं लागवेगें चुड्या पाजळीजे । बळें शीघ्र लंकापुरी दग्ध कीजे ॥
करीं घेतले उच बाधूनि भारे । कपी धांवती एकमेकां पुढारे ॥ २८ ॥
चुड्या पावकें सर्व ही दीप्त केल्या । अकस्मात लंकापुरीमाजि नेल्या ॥
बळाचे कपी धांवती लक्ष कोटी । चुड्या खेळती थोर आनंद पोटीं ॥ २९ ॥
शिखीं लागतां शीघ्र जाले उमाळे । निळे पीवळे श्वेत आरक्त काळे ॥
बहू लागला चंड वारा भरारां । पुरी माजि तो वन्हि धावे सरारा ॥ ३० ॥
गृहागोपुरें जाहला एक वेळा । असंभाव्य हेलावती तीव्र ज्वाळा ॥
दिशा दाटल्या धूम्र आकाश-पंथें । पिडा जाहली खेचरां भूचरांतें ॥ ३१ ॥
मळें धूविलीं तीं तया रावणानें । सळें ऊसणें घेतलें पावकानें ॥
बळें लागतां थोर कोपें कडाडी । बळें माजला वन्हि पोटीं धडाडी ॥ ३२ ॥

---

२४. कपी-नाथ=वानराधिपति २५. श्लाघ्य=स्तुत्य. २६ निमाले=मेले. २७. शिखा=ज्वाला. २८. श्वेत=पांढरा. २ आरक्त=लाल ३०. चंड=सपाट्याचा. ३१ वन्हि=विस्तव. ३२. गोपुर=देवडी. ३३ खेचर=आकाशात हिंडणारे ३४. भूचर=पृथ्वीवर हिंडणारे. ३५. पावक=विस्तव

बळें क्रोध आला तया पावकाला । वरी वात वेगीं बळें साह्य जाला ॥
शिखीं चालिल्या अंतराळीं धडाडां । जळों लागली दिव्य लंका भडाडां ॥ ३३ ॥
अपारें घरें गोपुरें रम्य सारें । बहूसाल [३६]धामोदरें थोर थोरें ॥
पडों लागलीं दग्ध होतां धबाबा । महा राक्षसी तोंड घेती खबाबां ॥ ३४ ॥
ध्वनी राक्षसाची असंभाव्य जाली । मुखें बोलती आगि रे आगि आली ॥
कितीएक राक्षेस धावूनि आले । अकस्मात ते वीर सर्वै [f]मिळाले ॥ ३५ ॥
बळें धावली ते असंभाव्य सेना । पुढें जावया लाग कोठें दिसेना ॥
शिखा धांवती वन्हिच्या पाठि लागे । पळाले बळी प्राण घेऊनि वेगें ॥ ३६ ॥
बळें सूटलीं वैभवें राक्षसांचीं । बहू दाटलीं वाट प्रेतें विराचीं ॥
कितीएक ते धीट नेटें जळाले । कितीएक ते वीर मागें पळाले ॥ ३७ ॥
त्रिकूटाचळीं थोर आकांत जाला । असंभाव्य राक्षेस कीती निमाला ॥
स्त्रिया बाळकें जेथ जेथें पळालीं । शिखा लागतां तेथ तेथें जळालीं ॥ ३८ ॥
पळायासि मागें पुढें रीघ नाहीं । जळाले पुरीमाजि ते सर्व कांहीं ॥
बहू [३७]कुंजरें [३८]शाकटें [३९]अश्व नाना । निमाले [४०]रथी [४१]सारथी सर्व सेना ॥ ३९ ॥
सहस्रें दहा [४२]भूवनें रावणाचीं । जळालीं बहू संपदा वैभवाची ॥
सुवस्ता अळंकार दिव्यांबरांचीं । सुगंधेल [४४]आज्यादि नाना [४५]रसांची ॥ ४० ॥
गुरें वासरें जाळिलीं पावकानें । बहू [४६]हाट बाजार [४७]केणी-दुकानें ॥
बहूतां जणाचें बहू वित्त गेलें । त्रिकूटाचळा पावकें शुद्ध केलें ॥ ४१ ॥
बहू [४८]बेवसायी भले मोठ मोठे । [४९]भुसारी जरी जोहरी आणि [५०]चाटे ॥
जळाले बहू वित्त हाणोनि घेती । धरेना कदा सांवरेना [५१]रुदती ॥ ४२ ॥
सभा-मंडपीं राक्षसीं हाक नेली । म्हणे पाहतां काय लंका जळाली ॥
दहा योजनें तीसरा भाग जो कां । बळें जाळिली वानरीं [g]सर्व लंका ॥ ४३ ॥
तया रावणा वाटली सर्व चिंता । म्हणे पाठवावे रणीं कोण आतां ॥
न दीसे मुखीं मदली सर्व शोभा । पुढें बोलिला शीघ्र कुंभा निकुंभा ॥ ४४ ॥
म्हणे वानरीं जाळिली सर्व लंका । तयांशीं करा युद्ध टाकूनि शंका ॥
तया सांगता सर्व ऊदीन जाले । महा वीर ते सात युद्धा निघाले ॥ ४५ ॥
बळी कुंभ नीकुंभ जंघ प्रजंघें । दळें सिद्ध केलीं बळें लागवेगें ॥

---

* शिखा=ज्वाला ३६. धाम=घर f ‘जळाले’ पा० भे०. ३७ कुंजर=हत्ती. ३८. शकट=गाडा ३९ अश्व=घोडा. ४० रथी=रथांत बसणारे ४१. सारथी=रथ हाकणारे. ४२. भुवनें=घरें .४३. दिव्यांबरें=उचीं वस्त्रें ४४ आज्य=शेळीचें तूप (अजा=शेळी) ४५. रस=पातळ पदार्थ ४६. हाट=बाजार ४७ केणी=जिन्नस ४८. बेवसायी=उद्योगी, व्यापारी ४९. भुसारी=धान्य विकणारे. ५०. चाटे=कापड विकणारे. ५१. रुदती=रडती. g. ‘शीघ्र’ पा० भे०

महा वीर झुंझार तो वीरूपाक्षू । दळीं चालिला क्रोधनू शोणिताक्षू ॥ ४६ ॥
बळी सात ही ते रथारूढ जाले । महा वीर राक्षेस सर्वै मिळाले ॥
दळें चालिलीं राक्षसाचीं अपारें । भुमी शेष साहू म्हणे थोर भारें ॥ ४७ ॥
बहू दग्ध लंकापुरी होय जेथें । बळें चालिले भार तेणें चि पंथें ॥
निमिष्यांत कुंभे विरें ते चि काळीं । महा मेघ तो पाडिला बाण-जाळीं ॥ ४८ ॥
बळें मातला वन्हि तो वीझवीला । त्रिकूटाचळीं लोक आनंदवीला ॥
विझाली पुरी शीघ्र तेणे चि मार्गें । निघाली पुढें वाहिनी ¹लागवेगें ॥ ४९ ॥
रणामंडळा पारखे वीर आले । कपि द्रुमपाणी बळें सिद्ध जाले ॥
समस्तांपुढें अंगदू वीर रागें । रणीं लोटला क्रोधनू लागवेगें ॥ ५० ॥
बळें फोडिली हाक कल्पांत जैशी । रणीं मांडलें युद्ध दोघांजणांशीं ॥
विरें विंधिलें वानरालागिं बाणीं । कपी कोपला अंगदू शैल-पाणी ॥ ५१ ॥
गिरी टाकिता क्रोधनू गुप्त जाला । महा पर्वताचे तळीं तो निमाला ॥
तया सांव्हया शोणिताक्षू निघाला । तयें अंगदू भेदिला भग्न केला ॥ ५२ ॥
रणीं वीर लक्षूनियां बाण घाली । बळें गेलिया अंग भेदूनि भाली ॥
उणें देखता शीघ्र मैंदें द्विवीदें । तेंहू घेतला हाक देऊनि क्रोधें ॥ ५३ ॥
कपी वीर धांवोनि युद्धासि आला । रणीं अंगदालागिं तो साह्य जाला ॥
तवं शीघ्र येरीकडे लागवेगें । बळें धावले ते विरश्रांत रागें ॥ ५४ ॥
प्रजंघे युपाक्षें तया शोणिताक्षा । दिल्हे ¹पूट धांवोनि घेऊनि पक्षा ॥
त्रिवर्गा त्रिवर्गीं रणीं युद्ध जालें । शरीं राक्षशीं व्योम संपूर्ण केलें ॥ ५५ ॥
शिळा शीखरें वृक्ष पाषाण-घातें । कपी वीर ते हाणिती राक्षसांतें ॥
समारंगणीं दूर टाकोनि शंका । बळी नीकुरें भेदिती एकमेका ॥ ५६ ॥
तवं अंगदें थोर अद्भूत केलें । बळें वाड झुंबाड तें उन्मुळीलें ॥
प्रजंघासि हाकूनि क्रोधें बहूतें । रणीं झोडिला पाडिला वृक्ष घातें ॥ ५७ ॥
पुढें देखिले त्या युपाक्षासि मैंदें । बळें गर्जला तो कपी घोर नादें ॥
रणीं झुंझतां थोर आवेश मैंदा । शिळा टाकितां जाहला ʲचूर्ण चैंदा ॥ ५८ ॥
द्विवीदें विरें पाडिला शोणिताक्षू । उणा देखिला सर्व नैऋत्य पक्षू ॥
तिघां राक्षसा थोर संहार जाला । रणामाजि युद्धासि तो कुंभ आला ॥ ५९ ॥
पिता कुंभकर्णू महावीर जैसा । तया सारिखा लोटला कुंभ तैसा ॥

५२ वाहिनी=फौज ¹. 'वातवेगें' पा० भे०. ५१. द्रुमपाणी=झाडें आहेत हातांत ज्याच्या असे. ५१. शैल पाणी=डोंगर आहे हातांत ज्याच्या असा. ५५ सांव्हया=मद-त करण्यास. ५६ तरु=झाड. ¹ 'पूर' पा० भे०, ʲ 'शीर' पा० भे०. ५७. नैऋत्य-पक्ष=राक्षसांची बाजू

अगानरती दुपेटा । गारद्यांनीं वाटा । धरल्या त्या चहुंकडे ॥८८॥ जिकडे तिकडे होते स्वस्थ । काहीं नव्हता बदोबस्त । खरगसिंगानें समस्त । कवाडें तीं कां लाविलीं ॥ ८९ ॥ रावें म्हणे कोठे राव । नाहीं दुसरा उपाय । आतां दादा शिवाय । आश्रा नाहीं कोणाचा ॥ ९० ॥ पुरतें चित्तीं विचारून । बरोबर शिप्या घेऊन । मग देवघरांतून । दादाकडे निघाले ते ॥ ९१ ॥ करिती गारदी वेफंद । जिकडे तिकडे कवाडें बंद । कैसें साधिलें हें द्वंद । त्या हो खरगसिंगाने ॥ ९२ ॥ मग एकया दारातून । तेथें कवाडें मोडून । बरोबर शिप्या घेऊन । आले माडी वरते ते ॥ ९३ ॥ लागला दादाचा निजध्यास । चुकावून गारद्यांस । लक्ष्मणभट्ट उपाध्यास । घेऊन ते कां चालिले ॥ ९४ ॥ गारद्यांनीं दाणादाण । मारामारी हाणाहाण । राव कोठीच्या जिन्यानें । दादाकडे चालिले ॥ ९५ ॥ जाऊन दादाचे महालांत । धरिला रायानें हात । गारद्यांनीं वाल्यांत । मोठा आकांत मांडिला ॥ ९६ ॥ तुम्ही केला हा फितूर । गारदी मारती निष्ठुर । याजकरितां जरूर ॥ तुम्हापाशीं आलों कीं ॥ ९७ ॥ राव बोलवी दादास ॥ दादा उठले शोध करावयास ॥ ही बातमी गारद्यांस ॥ मागो माग आली ती ॥ ९८ ॥ मारामारी करीत ॥ जवळ आले त्वरित ॥ जैसा वाघ गुरगुरत ॥ ती हो गाय देखोन ॥ ९९ ॥ गारदी आल्यानंतर ॥ दादा न बोले उत्तर ॥ कैसे पडलें हें अंतर ॥ तेव्हां मनीं खोंचले ॥ १०० ॥ नागव्या तरवारी घेऊन ॥ गारदी आले चढून ॥ मग दादाशीं जाऊन ॥ मिठी घातली रायांनीं ॥१०१॥ राव विनवी दादास ॥ तुम्ही समजावा गारद्यांस ॥ जें मागतील तें त्यांस ॥ देऊन वाटे लावावें ॥ १०२ ॥ आम्ही गरीब ज्वान ॥ द्यावें मनला जीवदान ॥ मजला कैदेंत घालोन ॥ तुम्हीं सुखें करावें राज्य ॥ १०३ ॥ करा राज्याचा कळस ॥ केला दादानीं आळस ॥ सुमेरसिंग ते वेळेस ॥ जाहला निष्ठूर मारावया ॥ १०४ ॥ देखोन गारद्यांचा भाव ॥ न सोडी दादाशीं राव ॥ घाली तरवारीचा घाव ॥ सुमेरसिंग नेधर्वा ॥ १०५ ॥ काय पाहतोस म्हणून ॥ तुळाजीनें जाऊन ॥ आणिलें रायास ओढून ॥ तेव्हां गेली शुद्धि ती ॥ १०६ ॥ सकट देखोन अनिवार ॥ बोले चापाजी खिसमतगार ॥ लहान लेकरू सुकुमार ॥ कोणी यऊ द्या काहा हा ॥ १०७ ॥ न एकं सुमेरसिंग ॥ मारू लागला निःसंग ॥ जवळ होता खरगसिंग ॥ त्याणें घर घेतलें ॥ १०८ ॥ होऊन सुमेरसिंग उदास ॥ जाहला निष्ठूर मारावयास ॥ मग धरिलें रायास ॥ चापाजीनें जाऊन ॥ १०९ ॥ धन्य चापाजी खिसमतगार ॥ जाहला जिवावर उदार ॥ तेथें पडिला तो ठार ॥ जो का रायापाशीं तो ॥ ११० ॥ जन्मा येऊन सार्थक ॥ दुसरा नारोबा फाटक ॥ एका वारानें मस्तक ॥ उडवून तेथें पा-

दिला ।। १११ ।। मग न धरी कोणी धीर ।। पडला रायावरता मार ।। हाणले वारावर ते वार ।। त्या हो खरगसिंगानें ।। ११२ ।। पृथ्वी समुद्र वलयांकित ।। ज्याचे असोन अंकित ।। नाहीं मारावयाची क्षीत ।। हा धर्म कलियुगींचा ।।११३।। मारून नारायण रायास ।। कैसा घातला हा फांस ।। हा हो त्याणें केला नाश ।। कैसा केला कुलक्षय तो ।।११४।। माता कापी बाळकास ।। कोण रक्षील हो त्यास ।। तैसी गती रायास ।। तेव्हां केली दादानें ।। ११५ ।। युद्धाठायीं अभिमन्यूस ।। करून वेगळें पांडवास ।। चक्रविभूमध्यें त्यास ।। कपटें करोन मारिलें ।। ११६ ।। तैसें केलें यथार्थ ।। तेथें न चाले पुरुषार्थ ।। केला दादानीं हा स्वार्थ ।। त्या कां राजपदाचा ।। ११७ ।। बाळ सुकुमार केवळ ।। नव्हती जागा निर्मळ ।। शव मोरीच्या जवळ ।। पडले होते तेव्हा ते ।। ११८ ।। करून रायाचें काम ।। असें पाहिलें आराम ।। करून दादास सलाम ।। सदरे वरते आणिलें ।। ११९ ।। लूट गारदी यांनीं केली फार ।। नाहीं सोंवळ्याचा विचार ।। कशाचा ही नाहीं सुमार ।। जोड्यासहित फिरले ते ।। १२० ।। गारदी याणीं अकस्मात ।। ताब्ये सोंवळें घेत्र पात्र ।। नाहीं ठेविलें तिळमात्र ।। नेलें त्यांनीं सर्व हीं ।। १२१ ।। केले गारद्यांनीं वेडेचार ।। त्यांचा न वर्णवे विस्तार ।। नाहीं ठेविला आचार ।। केली त्यांणीं शिवाशिव ।। १२२ ।। सर्व जागा विटाळून ।। लुटालुटी हो करून ।। नाहीं पाहिलें विचारुन ।। हौदामध्यें थुंकले ।। १२३ ।। आतां मी वर्णू कोठवर ।। दादा होते सदरेवर ।। सुमेरसिंग जमादार ।। आणखी होते गारदी ।। १२४ ।। नाहीं मनामध्यें खेद ।। वाजविती नौबद ।। करिती गारदी आनंद ।। द्वाही फिरवून दादांची ।। १२५ ।। कळली बातमी तहकीक ।। जांसूद नारोजी नाईक ।। येऊन दादाशीं ठीक ।। त्याणें केला जाबसाल ।। १२६ ।। काय कीर्ति हे लोकांत ।। केला कुळाचा घात ।। टाकिला गारद्यांनीं हात ।। इशारत होतां ती ।। १२७ ।। नाहीं गारद्याला धीर ।। उडविलें नारोजीचे शीर ।। नाहीं लागला उशीर ।। गेला त्याचा प्राण तो ।। १२८ ।। जाहली वाड्यामध्यें धूम ।। बाहेर केली साभसुम ।। एकाएकींच धूम ।। लोक पळू लागले ।। १२९ ।। विचारती एकमेकास ।। नाहीं कळलें कोणास ।। वाड्यापाशीं आसपास ।। माणूस तेथें ठरेना ।। १३० ।। गारदी मोठे अनिवार ।। करिती बंदुकीचे बार ।। होऊन घोड्यावर ते स्वार ।। हरिपंत आले ते ।। १३१ ।। गारदी बोलती निष्ठूर ।। हरिपंत जाले चकित चतुर ।। समजला वाड्यांतील मजकूर ।। तेव्हां मनीं सोचले ।।१३२।। केला सभोंवतीं बंदोबस्त ।। बोलाविले समस्त ।। नाहीं चित्त स्वस्थ । उपाय न चाले म्हणूनी ।। १३३ ।। बातमी पोहचता जाऊन ।। आले सरदार धांऊन ।।

---

४. समुद्रवलयांकित=समुद्र हेंच वळय म्हणजे कडें त्यानें वेष्टित ५. अंकित=स्वाधीन

वाड्यापाशीं येऊन ॥ पुढें सरसावती ते ॥ १३४ ॥ मोठे मोठे उमराव ॥ तुम्ही ऐका त्यांचीं नांवें ॥ पाटणकर आप्पाजीराव ॥ जो का मोठा रणशूर ॥ १३५ ॥ बरगे खंडोजी जगताप ॥ त्याला देखतां सुटे कांप ॥ पराक्रमी त्याचा प्रताप ॥ वीर ते कां मिळाले ॥ १३६ ॥ रास्ते यांचा समुदाय ॥ गणपतराव आनंदराव ॥ दुसरे मामा त्रींबकराव ॥ ज्याची दहशत कर्नाटकीं ॥ १३७ ॥ आप्पाजी बळवंतराव ॥ गायकवाड गोविंदराव ॥ प्रतिनिधि भवानराव ॥ ताबडतोब आले ते ॥ १३८ ॥ मालोजी घोरपडे सत्वर ॥ आले ऐकतांच खबर ॥ मालोजी राजे निंबाळकर ॥ आणखी पागा हुजूरती ॥ १३९ ॥ खंडेराव दरेकर ॥ गेले होते भोंसल्यावर ॥ बाळाजीपंताकडे अगोदर ॥ आधीं गेले होते ते ॥ १४० ॥ आले बापू हे दिवाण ॥ ऐका त्यांचें वर्तमान ॥ बजाबा पुरंदरे जाण ॥ आले होते धांवून ॥ १४१ ॥ त्रिंबाजी कृष्ण सरदार ॥ हिंदुस्थानचा विचार ॥ नाव राहिले हजारावर ॥ इतके शहाणे आणिले ॥ १४२ ॥ असे मिळून अपार ॥ तोफखान्याचे सरदार ॥ भीवराव पानसेकर ॥ आणखी आले कृष्णराव ॥ १४३ ॥ द्रामले बाळाजीपंत जाण ॥ गारद्यांचें आख्यान ॥ हें कळतां च वर्तमान ॥ गेली शुद्धि त्यांची ती ॥ १४४ ॥ असे सांगूं मी कोठवर ॥ बाळाजीपंत दादा दोसर ॥ आनंदराव बळवंतराव ॥ सविस्तर जिवाजी लौकर आले ते ॥ १४५ ॥ राघोजी आंग्रे कुलाब्याहून ॥ आले बोलाविले म्हणून ॥ तेही तयार होऊन ॥ आले होते लवकर ॥ १४६ मोरोबा दादा फडणीस ॥ आले हो का चिटणीस ॥ किती धरावे गणतीस ॥ होईल तो कां विस्तार ॥ १४७ ॥ सर्व मुत्सद्दी आणि सरदार ॥ असे मिळोन अपार ॥ मिळोन करिती विचार ॥ एका जागीं बसोन ॥ १४८ ॥ खेद करिती चित्तांत ॥ राव गुंतले माहालांत ॥ हत्ती घोडे बुधवारांत ॥ दाटी जाहली मोठी ती ॥ १४९ ॥ जाहला वाड्यांत कहर ॥ बाहेर नये कोणासी खबर ॥ बुधवारचे चावडीवर ॥ सखाराम बापू बैसले ॥ १५० ॥ मोठे मोठे सरदार ॥ मिळोन करिती विचार ॥ करा एकदां च मार ॥ गारदी देऊ उडवून ॥ १५१ ॥ गुंतले वाड्यांत राव ॥ करितां नये उपाय ॥ आम्हा पुढें गारदी काय ॥ करिती हीं बापुडीं ॥ १५२ ॥ नाना फडणीस हरिपंतास ॥ काळजी दोघांचे चित्तास ॥ मोरोबादादा त्या समयास ॥ बसून करिती खलबत ॥ १५३ ॥ बाळाजीपंत हौदावर ॥ बसून आणविती खबर ॥ गारदी यांच्या बरोबर ॥ कांहीं नव्हतें राहिले ॥ १५४ ॥ मिळोन सरदार अटोकाट ॥ बुधवारांत एक ची थाट ॥ नाहीं माणसांसी वाट ॥ तेथें ती कां जावया ॥ १५५ ॥ दाटी पाहून बुधवारांत ॥ हूल पडली शहरांत ॥ जिकडे तिकडे शहरात ॥ गडबड मोठी जाहली ती ॥ १५६ ॥ दुकानें ला-

विर्ता हालोहाल ।। पळतां लोकांचे हाल ।। पुण्याचे जे कां कोतवाल ।। धोंडोपंत आले ते ।। १५७ ।। न चाले कोणाचा उपाय ।। अवघे करिती हाय हाय ।। लोक म्हणती पुसावें काय ।। त्या हो गारद्यांला ।। १५८ ।। एक म्हणती करा हल्लयास ।। दुजे थर्मिती त्यास ।। खवळिता त्या गारद्यांस ।। वाडयांत करिती आकांत ।। १५९ ।। गारदी जात उन्मत्त ।। न चाले कोणाचें मत ।। बापूचें हें मत ।। हल्ला करूं नये तो ।। १६० ।। तुम्ही त्याला मारूं जाल ।। वाडयात करितील कल्होळ ।। काढा दुसरा निकाल ।। त्या का हल्लया वेगळा ।। १६१ ।। ऐकून बापूंचे वचनास ।। मानलें सर्वांचे चित्तास ।। नाहीं केला सायास ।। त्या हो मग हल्लयाचा ।। १६२ ।। मनसुबे नानापरी ।। करिती आपले घरोघरीं ।। मग इतक्या उपरी ।। चोपदार आला वाडयांतून ।। १६३ ।। मुत्सद्दी आणि सरदार ।। असे मिळोन अपार ।। आला तेथें चोपदार ।। म्हणे दादानें पाठविलें ।। १६४ ।। पाठविलें कोणत्या कामास ।। अवघे पुसती हो त्यास ।। बजाबा मालोजी या दोघांस ।। बोलावू आलों मी ।। १६५ ।। मग हो त्या दोघां जणास ।। चोपदार घेऊन गेला त्यास ।। नाहीं येऊ दिलें माणसास ।। बाहेर ते कीं ठेविले ।। १६६ ।। नाहीं बरोबर खिसमतगार ।। नव्हती एक ही तरवार ।। मग दादास नमस्कार ।। केला बजाबानें तो ।। १६७ ।। मालोजीनें रामराम ।। केला दादासी आराम ।। जाहले रायाचें वर्तमान ।। सर्व त्याणें सांगितलें ।।१६८।। तो ऐकता च वृत्तांत ।। तों च खोंचले मनात ।। तुम्ही कीर्ति हे लोकांत ।। बरी केली चांगली ।। १६९ ।। गेली गोष्ट नाहीं येत ।। असें दादा बोलत ।। करा पुण्याचा बंदोबस्त ।। द्वाही फिरवून आमची ।। १७० ।। आबा शिरीं वंदोन ।। आले बाहेर निघोन ।। अवघ्यांस येऊन ।। खबर सर्व सांगितली ।। १७१ ।। नाहले नाहीं बरें आतां ।। अवघे चकले चित्तात ।। म्हणती दादानें पुरता ।। तो कां दावा साधिला ।। १७२ ।। गारदी निष्ठूर हो जाण ।। घेतला रायाचा तो प्राण ।। चापाजी तो निदान ।। नाहला रायाचा सोबती ।। १७३ ।। केली वाडयामध्यें धूम ।। कितीकांचें केलें काम ।। हुजूर पागे इच्छाराम ।। आणखी नारोजी नाईक ।। १७४ ।। आणखी तोडिले वाडयांत ।। नाहीं जाऊन पाहिले आंत ।। ऐसा ऐकून वृत्तांत ।। शक्ति गेल्या अवघ्यांच्या ।। १७५ ।। केलें दादानें अघटीत ।। आतां नाहीं बरी गत ।। केलें कर्म अनुचीत ।। त्या कां गारद्यांनीं ।। १७६ ।। आला कठीण वक्त ।। सरदार मुत्सद्दी समस्त ।। गेली अवघ्याची शक्त ।। गेले आपले घरोघरीं ।। १७७ ।। प्रतिनिधि भवान रायास ।। बोलावून नेलें हो त्यास ।। त्याणे जाऊन दादांस ।। उत्तर केलें चांगलें ।। १७८ ।। तुम्ही साधूनियां परमार्थ ।। राजपदाचा केला स्वार्थ ।। मोठा केला पुरुषार्थ ।।

कीर्ति केली जगीं ही ॥ १७९ ॥ क्षण न लागतां गारद्यांस ॥ मी एकटा पुरेन त्यास ॥ तुम्हीं केला हा नाश ॥ कर्म केलें अघटीत ॥ १८० ॥ बरें जाहलें अझून काय ॥ गारदी म्हणजे पदार्थ काय ॥ असें बोलता भवानराय ॥ गारदी भ्याले बापुडे ॥ १८१ ॥ समस्तांशीं हालेहाल ॥ जाहला रायाचा तो काळ ॥ आनंदीबाई राया जवळ ॥ जाऊन ती कां बैसली ॥ १८२ ॥ कपट असे चित्तांत ॥ म्हणे केला मुलाचा घात ॥ दांभिक भक्ति जनांत ॥ दावी राक्षसीण ते ॥ १८३ ॥ चरित्र हें स्त्रियांचें जाण ॥ नकळे पोटातील कर्म ॥ दादाना ही शिकवून ॥ घात केला रायाचा ॥ १८४ ॥ पार्वती बाईस दुःख फार ॥ रुदन करी अनिवार ॥ मारिला बाळ सुकुमार ॥ नाहीं करुणा आली ती ॥ १८५ ॥ कर्म केले करूनि भेद ॥ नाहीं चित्ता मध्यें खेद ॥ करी माझा शिरच्छेद ॥ दादानें म्हणे बुडविलें ॥ १८६ ॥ आपलें आपटोनी मस्तक ॥ म्हणे कुळाचा दीपक ॥ पेशव्याचे वंशीं एक ॥ होता तो का मारिला ॥१८७॥ याचा पुसिला हो ठाय ॥ लेंकरू अज्ञान राय ॥ त्यासी वधोनि पुढें काय ॥ मोक्ष पद जाहलें ॥ १८८ ॥ तुमचे हातीं देऊनि रायास ॥ माधवराव गेले कैलासास ॥ नाहीं होऊ दिले नव मास ॥ तेही लाविले ठिकाणीं ॥ १८९ ॥ जाहलें दुःख द्विगुण ॥ आठवून रायाचे गुण ॥ आपले हातें हृदय आपटून ॥ शरीराचे केंस तोडिले ॥ १९० ॥ सगुणा बाई आकांतून ॥ कळवळा आला पोटांतून ॥ गेले राव दुजे ठेवून ॥ पाहूं आता कोठें मी ॥ १९१ ॥ फुटला सर्वांशीं गहींवर ॥ गहजब गंगा बाईवर ॥ कैसा रुक्मिणीचा वर ॥ देव तो कां क्षोभला ॥ १९२ ॥ निष्ठूर जाहला सीताकांत ॥ कैसा करविला आकांत ॥ पाडिले राव एकांत ॥ दादाच्या त्या महालांत ॥ १९३ ॥ रात्र झाली एक प्रहर ॥ तेव्हां मिळाले समग्र ॥ पुण्यासारखें नगर ॥ आज रायानें त्यागिले ॥ १९४ ॥ साहित्य करावयासी ॥ सांगितलें त्रिंबकराव मामासी ॥ फुटलें जें त्या आकाशासी ॥ लाविता नये ठिगळ ॥ १९५ ॥ जाहला निश्चय गंगाबाईचा ॥ बरोबर जावयाचा ॥ मोडिला ध्यास सतीचा ॥ अवघ्या बापानी मिळोन ॥१९६॥ परंतु म्हणे मी न राहें ॥ आनंदी बाईनें केलें काय ॥ लोटून खोलींत लवलाहें ॥ बाहेरून कडी घातली ॥ १९७ ॥ मग उपाय चालेना ॥ न ये देवासी करुणा ॥ ऋणानुबंध हो जाणा ॥ दोघांचा तितका च ॥ १९८ ॥ आकांत केला कोमळ ॥ पडला मोठा तो घोळ ॥ हृदय जाहलें जळून कोळ ॥ अहो सुटला गहींवर ॥ १९९ ॥ रात्र दोन प्रहरास ॥ राव नेले नदी-तीरास ॥ अग्नि देऊन त्यास ॥ कर्म केलें यथाविधि ॥ २०० ॥ विजय संवत्सराचें नांव ॥ शके सोळाशें पचाण्णव ॥ भाद्रपदाचे वैभव ॥ शुक्ल पक्ष होता तो ॥ २०१ ॥ तो

जगन्निवास ॥ सोमवारचे दिवसास ॥ अनंत चतुर्दशीस ॥ वास केला स्वर्गींचा ॥ २०२ ॥ जहालें ऐका वर्तमान ॥ आलें रायासी विमान ॥ राया बरोबर दिल्हे प्राण ॥ ते ही गेले बसून ॥ २०३ ॥ केला रायाचा घात ॥ त्याचा होईल निःपात ॥ बेचाळीस सहीत ॥ नरकात पूर्वज पडतील ॥ २०४ ॥ विश्वासे राव बापूवर प्रमाण ॥ कैसा केला अभिमान ॥ कळलें होतें वर्तमान ॥ नाहीं रायासीं कळविले ॥ २०५ ॥ मोठ मोठाले आंत ॥ जे कां होते फितुरांत ॥ त्यांचा होईल निःपात ॥ आणि होईल नाचणी ॥ २०६ ॥ नाहीं पापासी अत पार ॥ नये नर जन्म वारवार ॥ याजकरितां सारासार ॥ विचार नाहीं पाहिला ॥२०७॥ असे दुष्ट हे साचार ॥ त्यांचा न करावा उच्चार ॥ जाहला पृथ्वी वरता भार ॥ त्या हो कां दुष्टांचा ॥ २०८ ॥ राव गेले स्वर्गास ॥ काळजी लागली सर्वांस ॥ देवाचे नाहीं चित्तास ॥ कसे आलें म्हणती हो ॥ २०९ ॥ त्याचें स्वरूप सगुण ॥ गह्रींवर येतो आठवून ॥ जाहलें वाईट म्हणून ॥ कष्टी होती लोक ते ॥ २१० ॥ जसें सिंहाचे घर ॥ जाऊन जंबुक भिलर ॥ ईश्वर मायेचे कौतुक ॥ कोणाला ही न कळे ॥ २११ ॥ केला राज्याचा कळस ॥ केला दादांनीं आळस ॥ नाहीं पाहिलें पापाचे भयास ॥ अनुचित केलें तें ॥ २१२ ॥ आपुलें नासिक कापून ॥ केले वैऱ्यांसी अपशकून ॥ आपली कामधेनू विकून ॥ लोका घरीं ताक मागे ॥ २१३ ॥ देखोन पुरूष सुंदर ॥ आवडे चित्ता बरोबर ॥ म्हणोनिया भ्रतार ॥ त्यागून जाहली असती ॥ २१४ ॥ चिंतन होई चिंतामणी ॥ तोही घालून गोफणी ॥ दिल्हा तो हा झोंकूनी ॥ म्हणे गेला किती लांब ॥ २१५ ॥ राज्य आणि श्री सुख ॥ नाहीं कधीं भोगिलें दुःख ॥ आणि परमार्थ वर्तणूक ॥ स्नान संध्या केली ती ॥ २१६ ॥ देव-पूजा नाहीं शरिरा ॥ भोगुनियां राज्य करा ॥ वया योग्य नैसा बरा ॥ गंगेचा ओघ तो ॥ २१७ ॥ फार जाणे फार विचार ॥ बुद्धिवान धार्मिक विचार ॥ याजकरितां वारवार ॥ कीर्ति रायाची वर्णिली ॥ २१८ ॥ कुफराणे दुष्ट जाण ॥ काय त्यांचे व्यर्थ जिणें ॥ कलियुगींचें महिमान ॥ आली सृष्टि उफराठी ॥ २१९ ॥ जे करिती दानधर्म ॥ त्याचे पाठीमागे कर्म ॥ जे करिती स्वधर्म ॥ अधर्म चाले तेथींचा ॥ २२० ॥ कलियुगीं गुण ॥ होईल विस्तार म्हणून ॥ किती वर्णावे अवगुण ॥ थोडक्यांत आटोपिले ॥ २२१ ॥ नारायण रायाचें चरित्र ॥ तुम्ही ऐकावें पवित्र ॥ तेणें-करून होईल मित्र ॥ देव तुम्हा लागीं तो ॥ २२२ ॥ आपलें दिसूं न देई अंग ॥ कौतुक करितो श्रीरंग ॥ कविता करितो पांडुरंग ॥ वर्णी चरित्र रायाचें ॥ २२३ ॥

---

श्री

## अमृतरायकृत

# शुक-चरित्र.

गर्भी असतां ज्ञान जहालें । श्री शुकानें जिवें तें धरिलें । जन्म जरामय-मरण वारिलें । भव-भयातें सहारिलें । तप सामर्थ्यें ताप हारिले । विवेक-मंत्रे मन आंवरिलें । विषय-पसारे दूर सारिले । असें वेदांतींचें वरिले । अशेष जेजे भोग भोगिले । शुक-अर्भका गर्भ जाचणी । द्वादश वर्षें । अति प्रकर्षें । अवयव उदरीं आकर्षुनिया । निकर्ष करुनी वर्षे बारा । गर्भदरीचा अती उबारा । क्षुधा नेळाचा ताप दुबारा । अधोवदनीं क्लेश-सदनीं । जार बंधनीं । मूत्र-आधणीं । दाथर इष्टा पिष्टफळा सम । उकडत होता जठराग्नीनें । त्वचा हि कोमळ । नाकीं तोंडीं जतू बुळबुळ । वळवळताती । तळतळ होता । कळकळ जिवास । पूयपकीं कारागृहवास । कुश्चळ दुर्गधीचा त्रास । सर्व रोधिले श्वासोच्छ्वास । सोहं सोहं हा निजध्यास । वैराग्याचा जिवें हव्यास । बाहेर पडतां मीं अभ्यास । करीन साधन बहु सायास । ताप हि साहिन शीत ही न । क्षुधेशि खाइन । मनासि घेउन वनासि जाइन । तृषेसि लाविन आले वाटे । हरि-नामाचे घेइन पेटे । उतरुनि भव-नदि जाइन वाटे । फोडिन कर्माचीं हि कपाटें । सांडिन वासनेचे फाटें । उपाडिन अभिमानाचीं बेटे । उत्पाटिन मी मोक्ष कँपाटें । ऐसा गर्भी ध्यास लागला । मातेचा जिव बहू भागला । व्यास म्हणे इस रोग लागला । उग्र औषधीं रेच योजिला । मन्त्र-प्रयोगे जाळिन याला । समर्थ ऐसा कोण जन्मला । ऐसें जाणवि श्रीकृष्णाला । श्रीहरि बोले त्या गर्भाला । शुकापरी पढवीता जाला । म्हणवुनि शुक हें नाम तयाला । कर्मे कथिता जाला श्री हरिला । श्री शुक-योगींद्रानें रंभेचा गर्व हरिला । धृ ॥ १ ॥

पुससी कोण तो मी ऐसा । अनादि जिव तो नामें कैसा । पाप पुण्य मिश्रीत सरीसा । अंगुष्ठा सम-लहान उर्लीसा । तो मी सूक्ष्म स्थूळीं भरलों । लक्ष चौऱ्याशी भरुनि-पेणें[12] । दुरोनि जालें येथें येणे । दडी दीधली पाप-भयानें । माझी

---

१ जरामय=जरा + आमय=म्हातारपण व रोग २ भव=संसार ३ वेदांत=वेद-ग्रंथातील शेवटचे ग्रंथ म्हणजे उपनिषदें. ४ अर्भक=मूल ५ क्षुधानळ=भूक हाच अग्नि ६ जार=गर्भाच्या सभोंवतीं असणारें वेष्टण (वार). तीन प्रकारच्या जीवकोटी आहेत –जारज, अंडज, उद्भिज ७ दाथर=मोदक उकडते वेळीं गवताचा थर भांड्यांत घालतात तो. ८ पूयपक=पू हाच चिखल ९ पेटे=नदींतून तरण्याकरितां भोंपळे इत्यादि साधन घेतात तें १० कपाट=दार. ११ शुकापरी=पोपटासारखा १२ पेणें=मार्ग चालतांना विश्रांतीकरितां केलेला मुक्काम.

ऐका अपूर्व कथनें । स्वधर्म सांडुनि अधर्म वाटे । कुकर्म नीवा गोड वाटे । अनर्थ तेथें कर्मचपेटे । मर्म तयाचें कर्म फळे मग । कृमी होऊनि भ्रमणी चक्रीं । भ्रम दुखानें काळ क्रमीं मी । मी मी म्हणता मेंढा झालों । चंडी[13] पॉशीं मुंढे खुटलो । काळचक्रामाजि भरडलों । बुरुड होउनि दुरड्या[14] केल्या । कोष्टी होउनि पांष्टा[15] विणिल्या । परस्त्रियेतें पहातां दृष्टी । अंध होय त्या पापे कष्टी । विषय-प्रयोगें अंग कुष्टी । अन्न-दानें स्वदेहपुष्टी । द्रव्य-दानें नित्य तुष्टी । अदत्त-योगें पात्रें उष्टीं । चाटीं श्वान होउनि इष्टी[16] । भिक्षा तांदूळ न घालि मुष्टी । तरी च कीटक कोरड काष्टीं । हरि-नामाची न करी गोष्टी । दर्दुर[17] होउनि ओरडे सृष्टी । ब्रह्म-कुळींचा आचार भ्रष्टी । तरीच गर्दभ भार पृष्टीं । अतिथी उपवाशी ठेवुनि आपुल्या काया पोशी । धनी असोनी विपत्ति सोशी । पुरुन ठेवणे ऐसा दोषी । घुशी होउनि घुसे बिळात चि । बिडाल[18] काळा मुषक म्हणे मी । सूकर[19] नामा डुकर होउनि । उकिर उकरडा उकरला । श्री शुक० ॥ २ ॥

सुदर काया तीर्थ स्नानें । पोट शूळ हा [20]भूतद्रोहानें । गजादि वहनें कृपा-द्रवानें । दुष्ट जन्म घे उपद्रवानें । परद्रव्याचें करितां हरणें । दरिद्रतापें तापुनि मरणें । रक्तपिती चोरितां चि सोनें । क्षय-रोगी हा वृत्ति[21]क्षपानें । अनेक दु:खें अनृत भाषणें । व्याघ्रादिक हे गळा बंधनें । अस्वल होती रीण गिळोन । नेत्र झाकुनि जुंपिति घाणीं । वनीं वाघुळा अधोवदनी । पंक्ति-भेद जिहीं केला त्यांनीं । धर्म करी त्या मोडा केला । गर्भ-खोडा प्राप्त जाला । प्रसूति समयीं अडवा आला । शस्त्रें छेदुनि लुंडक[22] केला । लक्ष चौऱ्याशीं हा बाजार । करी बेजार । बहू जोजार । हजार वर्षे कारागार । देह सर्पाचे । काक बकाचे[23] । गृध्र घूकाचे[24] । स्थावराचे । फिरत फिरत मग ईशदयेनें । कर्मभुमी नरदेहीं येथें । स्मरणी[25] लागीं मेरू[26] जैसा शतायूष तें अमोल्य थोडें । जन्मलों मी गर्भी स्मरतां । सोहं सोहं बाहेर पडता । विसरें हे मी । देहें गेहें । मीया मोहे । मामा मामी । काका काकी । ताई माई । आई-बाहिणी । विहिणि-मेहुणी । इत्यादिक हे कर्म-कहाणी । या नात्याच्या गुंडाळ्यानें । गुंडाळुनि वडाळ चि झालों । चांडाळ चि मी । मोहें याचा । आचावाचा नर-स्तूतीचा । काम वस्तूचा आर्जवाचा । हरीहराच्या

१३ चंडी=देवी १४ दुरड्या=पाट्या. १५ पाष्टा=सुताच्या गुंड्या. १६ इष्टी=यज्ञ. १७ दर्दुर=बेडूक. १८ बिडाल=मांजर. १९ सूकर=डुकर २० जेथें अक्षर दीर्घ असून र्‍हस्व वाचलें पाहिजे तेथें त्या दीर्घ अक्षरावर ⌣ अशी अर्ध चंद्रकार खूण केली आहे व जेथें अक्षर र्‍हस्व असून दीर्घ वाचलें पाहिजे तेथें त्या र्‍हस्व अक्षरावर ‸ अशी कुंकवाच्या चिरीसारखी खूण केली आहे. २१ वृत्ति=उपजीविकासाधन. २२ लुंडक=हस्तपाद रहित. २३ बक=बगळा. २४ घूक=घुबड २५ स्मरणी=मण्याची माळ. २६ मेरु=माळेच्या मध्य भागचा मोठा मणी.

कारागृह[31]स्यास्य च नो विशेषः प्रदृश्यते साधु[32] विचार्यमाणे ॥
मुक्तेः प्रतीप[33]त्वमिहास्ति पुंसः कान्तासुखादुत्थितमोहपाशैः ॥ २२ ॥
गृहस्पृहा पादनिबद्धशृंखला कान्तासुखाशा पटुकण्ठपाशः ॥
शीर्षे पतद्भूर्यशनिर्हि साक्षात्प्राणान्तहेतुः प्रबला धनाशा ॥ २३ ॥
आशापाशशतेन पाशि[34]तपदो नोत्थातुमेव क्षमः
कामक्रोधमदादिभिः प्रतिभटैः[35] † संरक्ष्यमाणोऽनिशम् ॥
संमोहावरणेन गोपनवतः संसारकारागृहा-
न्निर्गन्तु त्रिविधै[36]षणापरिवृतः कः शक्नुयाद्रागि[37]षु ॥ २४ ॥
कामान्धकारेण निरुद्धदृष्टिर्मुह्यत्यसत्यप्यबलास्वरूपे ॥
न ह्यन्धदृष्टेरसतः सतो वा सुष्ठुत्वदुष्टत्वविचारणास्ति ॥ २५ ॥
श्लेष्मो[38]द्गारि मुखं स्रवन्मलवती नासाऽश्रुमल्लोचनं
स्वेदस्रावि मलाभिपूर्णमभितो दुर्गन्धिदुष्टं § वपुः ॥
अन्यद्वक्तुमशक्यमेव मनसा मन्तुं क्वचिन्नार्हति
स्त्रीरूपं कथमीदृशं सुमनसां पात्री[39]भवेन्नेत्रयोः ॥ २६ ॥
दूरादवेक्ष्याग्निशिखां पतंगो रम्यत्वबुद्ध्या विनिपत्य नश्यति ॥
कामेन कान्तां परिगृह्य तद्वज्जनोऽप्ययं नश्यति नष्टदृष्टिः ॥ २७ ॥
मांसास्थिमज्जामलमूत्रपात्रं स्त्रियं स्वयं रम्यतयैव पश्यति ॥
यतस्ततो नष्टदृगेष सूक्ष्मं कथं निरीक्षेत विमुक्तिमार्गम् ॥ २८ ॥
काम एव यमः साक्षात्कान्ता वैतरणी[40] नदी ॥
विवेकिना मुमुक्षूणां निलय[41]स्तु यमालयः ॥ २९ ॥
यमालये वापि गृहेऽपि नो नृणां *तापत्रयक्लेशनिवृत्तिरस्ति ॥
किंचित्समालोक्य तु तद्विरामं सुखात्मना पश्यति मूढलोकः ॥ ३० ॥
यमस्य कामस्य च तारतम्यं विचार्यमाणे महदस्ति लोके ॥
हितं करोत्यस्य यमोऽप्रियः सन् कामस्त्वनर्थं कुरुते प्रियः सन् ॥ ३१ ॥
यमोऽसतामेव करोत्यनर्थं सतां तु सौख्यं कुरुते हितः सन् ॥
कामः सतामेव गतिं निरुन्धन् करोत्यनर्थं ह्यसतां तु का कथा ॥ ३२ ॥

---

३१. कारागृहम्=बन्धनालयम्. ३२. साधु=सम्यक्. ३३. प्रतीपत्वम्=प्रतिकूलत्वम्. ३४. पाशित=बद्ध. ३५. प्रतिभटैः=वैरिभिः. † संरक्ष्यमाण=रक्षितयमाण. ३६. त्रिविधैषणा=वित्तैषणादि इच्छात्रयम्. ३७. रागिन्=विषयान्ध. ३८. श्लेष्मन्=कफ. § दुष्टम्=दूषितम्. ३९. नेत्रयोः पात्रीभूः=दर्शनार्हम्. ४०. वैतरणी=यमलोकप्रसिद्धा विगततरणीका मांसपूयपुरीषप्रचुरा नदी. ४१. निलय=गृहम्. * तापत्रयम्=आधिभौतिकाधिदैविकाध्यात्मिकरूपम्.

विश्वस्य वृद्धिं स्वत एव कांक्षन् प्रवर्धकं काममजः ससर्ज ॥
तेनैव लोकः परिमुह्यमाणः प्रवर्द्धते चन्द्रमसेव वार्धिः ॥ ३३ ॥
कामो नाम महान् जगद्भ्रमयिता स्थित्वांतरंगे स्वयं
स्त्रीपुंसोरितरेतरांगकगुणैर्हावैश्च भावैः स्फुटम् ॥
अन्योन्यं परिमोह्य नैजतमसा प्रेमानुबंधेन तौ
बध्वा भ्रामयति प्रपंचरचनां संवर्धयन् ब्रह्मणः ॥ ३४ ॥
अतोंतरंगस्थितकामवेगाद्भोग्ये प्रवृत्तिः स्वत एव सिद्धा ॥
सर्वस्य जंतोर्भुवमन्यथा चेदबोधितार्थेषु[42] कथं प्रवृत्तिः ॥ ३५ ॥
तेनैव सर्वजंतूनां कामना बलवत्तरा ॥
जीर्यत्यपि च देहेऽस्मिन् कामना नैव जीर्यति ॥ ३६ ॥
कामस्य विजयोपायं सूक्ष्मं वक्ष्याम्यहं सताम् ॥
संकल्पस्य परित्याग उपायः सुलभो मतः ॥ ३७ ॥
श्रुते दृष्टेऽपि वा भोग्ये यस्मिन्कस्मिंश्च वस्तुनि ॥
समीचीनत्वधी[43]त्यागात्कामो नोदेति कर्हिचित् ॥ ३८ ॥
कामस्य बीजं संकल्पः संकल्पादेव जायते ॥
बीजे नष्टेऽकुर इव तस्मिन्नष्टे विनश्यति ॥ ३९ ॥
न कोपि सम्यक्त्वधियं विनैव भोग्यं नरः कामयितुं समर्थः ॥
यतस्ततः कामजयेच्छुरेतां सम्यक्त्वबुद्धिं विषये निहन्यात् ॥ ४० ॥
संकल्पानुदये हेतुर्यथाभूतार्थदर्शनम् ॥
अनर्थचिंतनं चाभ्यां नावकाशोऽस्य विद्यते ॥ ४१ ॥
रत्ने यदि शिलाबुद्धिर्जायते वा भयं ततः ॥
समीचीनत्वधीर्नेति नोपादेय[44]त्वधीरपि ॥ ४२ ॥
यथार्थदर्शनं वस्तुन्यनर्थस्यापि चिंतनम् ॥
संकल्पस्यापि कामस्यानुदयोऽपाययिष्यते[45] ॥ ४३ ॥
धनं भयनिबंधनं सततदुःखसंवर्धनं
प्रचंडतरगर्धनं[46] घटितबंधुसंस्पर्शनम्[47] ॥
विशिष्टगुणबाधनं[48] कृपणधीसमाराधनं[49]
न मुक्तिगतिसाधनं भवति नापि हृच्छोधनम्[50] ॥ ४४ ॥

---

४२ अबोधितार्थ=अज्ञातार्थ. ४३ समीचीनत्वधीः=सम्यक्त्वबुद्धि ४४. उपादेयत्वम्=ग्राह्यत्वम् ४५. अपाययिष्यते=अकल्याणं करोति. ४६. गर्धनम्=लोभनम्. ४७ संस्पर्शनम्=संमेलकम्. ४८ बाधनम्=प्रतिबंधकारि. ४९. समाराधनम्=आनंदयितृ ५० हृच्छोधनम्=मनःशुद्धिकरम्

राज्ञो भयं चोरभयं प्रमादाद्भयं तथा ज्ञातिभयं च वस्तुनः ॥
धनं भयग्रस्तमनर्थमूलं यतः सतां तन्न सुखाय कल्पते ॥ ४५ ॥
सतामपि पदार्थस्य लाभाल्लोभः प्रवर्तते ॥
विवेको लुप्यते लोभात्तस्मिँल्लुप्ते विनश्यति ॥ ४६ ॥
दहत्यलाभे निःस्वत्वं लाभे लोभो दहत्यमुम् ॥
तस्मात्संतापकं वित्तं कस्य सौख्यं प्रयच्छति ॥ ४७ ॥
भोगेन ममता जंतोर्दानेन पुनरुद्भवः ॥
वृथैवोभयथा वित्तं नास्त्येव गतिरन्यथा ॥ ४८ ॥
धनेन मदवृद्धिः स्यान्मदने स्मृतिनाशनम् ॥
स्मृतिनाशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ४९ ॥
सुखयति धनमित्येवांतराशापिशाची दृढतरमुपगूढो मूढलोको जडात्मा ॥
निवसति तदुपांते संततं प्रेक्षमाणो व्रजति तदपि पश्चात्प्राणमेतस्य हत्वा ॥ ५० ॥
सपन्नोऽधवदेव किंचिदपरं नो वीक्षते चक्षुषा
सद्भिर्वर्जितमार्ग एव चरति प्रोत्सारितस्तादृशैः ॥
तस्मिन्नेव मुहुस्स्वलन्प्रतिपदं गत्वांधकूपे पत-
त्यस्यांधत्वनिवर्तकौषधमिदं दारिद्र्यमेवांजनम् ॥ ५१ ॥
लोभः क्रोधश्च दंभश्च मदो मत्सरएव च
वर्द्धंते वित्तसंप्राप्त्या कथं तच्चित्तशोधनम् ॥ ५२ ॥
नित्यार्तिदेन वित्तेन भयचिंतानपायिना
चित्तस्वास्थ्यं कुतो जंतोर्गृहस्थेनाहिना यथा ॥ ५३ ॥
कांतारे विजने वने जनपदे सेतौ विरीतौ* च वा
चोरैर्वापि तथेतरैरपि नरैर्युक्तो वियुक्तोपि वा ॥
निःस्वः स्वस्थतया सुखेन वसति ह्याद्रीयमाणो जनैः
क्लिश्नात्येव धनी सदाकुलमतिर्भीतः स्वपुत्रादपि ॥ ५४ ॥
तस्मादनर्थस्य निदानमर्थः पुमर्थसिद्धिर्न भवत्यनेन ॥
अतो वनांते निवसंति संतः संन्यस्य सर्वं प्रतिकूलमर्थम् ॥ ५५ ॥
श्रद्धाभक्तिमतीं ‡ सतीं गुणवतीं पुत्रान् सतां समता-
नक्षय्यं वसु दानभोगविभवैः श्रीसुंदरं मंदिरम् ॥

---

५१. निःस्वत्वम्=द्रव्यरहितत्वम् ५२. पुनरुद्भव=वृद्धि.. ५३ उभयथा=उभयप्रकारेण. ५४ उपगूढ=नियन्त्रित ५५. प्रोत्सारित=तिरस्कृत. ५६ अनपायि=अविनाशकारि, वर्धकम् * विरीति=निर्जनप्रदेशभवा नदी ५७ निःस्व.=निर्धन.. ५८. क्लिश्नाति=क्लेश प्राप्नोति. ५९. संन्यस्य=त्यक्त्वा ‡ सती=स्त्रिय.

सर्वं नैश्वरमित्यवेत्य कवयः श्रुत्युक्तिभिर्युक्तिभिः
सन्यस्यत्यपरे तु तत्सुखमिति भ्राम्यंति दुःखार्णवे ॥ ५६ ॥
सत्कर्म[60]क्षतपाप्मनां श्रुतिमतां श्रद्धात्मनां धीमतां
नित्यानित्यपदार्थशोधनमिदं युक्त्या मुहुः कुर्वताम् ॥
तस्मादुत्थमहाविरक्त्यसि[61]मतां मोक्षैककाङ्क्षावतां
धन्यानां सुलभं समस्तविषयेष्वाशालताच्छेदनम् ॥ ५७ ॥
संसारमृत्योर्बलिनः प्रवेशद्वाराणि तु त्रीणि महांति लोके ॥
कांता च जिव्हा कनकं च तानि रुणद्धि यस्तस्य भयं न मृत्योः ॥ ५८ ॥
मुक्तिश्रीनगरस्य दुर्जयतरं द्वारं यदस्त्या[62]दिमं
तस्य द्वे अ[63]ररे धनं च युवती ताभ्यां पि[64]नद्धं दृढम् ॥
कामाख्या[65]र्गलदारुणा बलवता चांतस्तदेतत्त्रयं
धीरो य[66]स्तु भिनत्ति सोऽर्हति सुखं भोक्तुं विमुक्तिश्रियः ॥ ५९ ॥
आरूढस्य विवेकाश्वं तीव्रवैराग्यखड्गिनः ॥
तितिक्षो[67]रुपशांतस्य प्रतियोगी न दृश्यते ॥ ६० ॥
विवेकजां तीव्रविरक्तिमेव मुक्तेर्नि[68]दानं निगदंति संतः ॥
तस्माद्विवेकी पुरुषो मुमुक्षुः संपादयेत्तामतुलप्रयत्नैः ॥ ६१ ॥
मनः प्रसादस्य निदानमेतन्निरोधनं यत्सकलेंद्रियाणाम् ॥
बाह्येंद्रिये साधु निरुध्यमाने बाह्यार्थभोगो मनसो वियुज्यते ॥ ६२ ॥
तेन स्वदौष्ट्य[69] परिमुच्य चित्तं शनैः शनैः शांतिमुपाददाति ॥
चित्तस्य बाह्यार्थविमोक्षमेव मोक्षं विदुर्मोक्षणलक्षणज्ञाः ॥ ६३ ॥
दमं[70] विना साधु मनःप्रसादहेतुं न विद्मः सुखदं मुमुक्षोः ॥
दमेन चित्तं निजदोषजातं विसृज्य शांतिं समुपैति शीघ्रम् ॥ ६४ ॥
प्राणायामाद्भवति मनसो निश्चलत्वं प्रसादो
यद्यप्यस्य प्रति नियतदिग्देशकालाद्यपेक्षा ॥
सम्यग्दृष्ट्या क्वचिदपि तथा नेदमस्यास्ति तस्मात्
कुर्याद्धीमान् दममनलसश्चित्तशांत्यै प्रयत्नात् ॥ ६५ ॥
सर्वेंद्रियाणां गतिनिग्रहेण भोग्येषु दोषाद्यव[71]मर्शनेन ॥
ईशप्रसादाच्च गुरुप्रसादाच्छांतिं समायात्यचिरेण चित्तम् ॥ ६६ ॥

---

६० क्षत=नाशित ६१. असिमान्=खड्गवान्. ६२ आदिमम्=प्रथमम् ६३ अररम्=कपाटम् 'कवाड' इति म० भा० ६४ पिनद्धम्=नियन्त्रितम्, बद्धम्. ६५ कामाख्यार्गलदारुणा=कामरूपि यद्अर्गलद्वारावष्टंभक काष्ठ तेन ६६ धीर=ज्ञानवान् ६७ तितिक्षु=प्रशान्त ६८. निदानम्=आदिकारणम् ६९ दौष्ट्यम्=दुष्टता ७०. दमः=इन्द्रियनिग्रह. ७१ अवमर्शनम्=आरोपणम्

ब्रह्मचर्यमहिंसा च साधूनामप्यगर्हणम् ॥
पराक्षेपादि[७२]सहन तितिक्षोरेव सिध्यति ॥ ६७ ॥
उपरमयति[७३] कर्माणीत्युपरति[७४]शब्देन कथ्यते न्यासः[७५] ॥
न्यासेन हि सर्वेषां प्रोक्तः श्रुत्यापि कर्मणां न्यासः ॥ ६८ ॥
प्रत्यग्ब्रह्म[७६]विचारपूर्वमुभयोरेकत्वबोधाद्विना
कैवल्यं[७७] पुरुषस्य सिध्यति परब्रह्मा[७८]त्मतालक्षणम् ॥
न स्नानैरपि कीर्तनैरपि जपैर्नो कृच्छ्रचान्द्रायणै[७९]-
र्नैवाप्यध्वरयज्ञदानैर्निगमै[८०]र्नो मंत्रतंत्रैरपि ॥ ६९ ॥
नित्यानित्यपदार्थबोधरहितो यश्चोभयत्र स्रगा[८१]-
द्यर्थानामनुभूतिलग्नहृदयोऽनिर्विण्णबुद्धि[८२]र्जनः ॥
तस्यैवास्य जडस्य कर्म विहितं श्रुत्या विरज्या[८३]भितो
मोक्षेच्छोर्न विधीयते तु परमानंदा[८४]र्थिनो धीमतः ॥ ७० ॥
मोक्षेच्छया यदहरेव[८५] विरज्यते[८६]ऽसौ
न्यासस्तदैव विहितो विदुषो मुमुक्षोः ॥
श्रुत्या तथैव परया[८७] च ततः सुधीभिः
प्रामाणिको[८८]ऽयमिति चेतसि निश्चितव्यम् ॥ ७१ ॥
अत्यंततीव्रवैराग्य फललिप्सा[८९] महत्तरा ॥
तदेतदुभयं विदुः[९०] समाधानस्य कारणम् ॥ ७२ ॥
अंतरंगविहीनस्य[९१] कृताः श्रवणकोटयः ॥
निष्फलंति यथा योद्धुरधीरस्यास्त्रसंपदः ॥ ७३ ॥
तीव्रमध्यममंदातिमंदभेदैश्चतुर्विधा ॥
मुमुक्षा तत्प्रकारोऽपि कथ्यते श्रूयतां बुधैः ॥ ७४ ॥
तापैस्त्रिभिर्नित्यमनेकरूपैः संतप्यमानः क्षुभितांतरात्मा ॥
परिग्रहं[९२] सर्वमनर्थबुद्ध्या[९३] जहाति सा तीव्रगतिर्मुमुक्षा ॥ ७५ ॥

---

७२ आक्षेप =निंदा. ७३ उपरमयति=समापयति ७४. उपरति =विषयेभ्योनिवृत्ति. ७५ न्यास =त्याग. ७६. प्रत्यग्ब्रह्म=सर्वसाक्षि ब्रह्म. ७७. कैवल्यम्=मोक्ष. ७८. परब्रह्म=अक्षय्यब्रह्म. ७९. कृच्छ्रचान्द्रायणम्=प्रायश्चित्तविशेष ८० निगम.=वेद. ८१. स्रग्=माला. ८२ अनिर्विण्णबुद्धि=अनुद्विग्नमति. ८३ विरज्य=औदासीन्येन दृष्ट्वा ८४. परमानंद =निर्विकल्पानंद ८५ अहः (अहरहः) प्रतिदिन ८६ विरज्यते=औदासीन्य प्रतिगम्यते. ८७ परा=उत्कृष्टा. ८८. प्रामाणिक =प्रमाणीभूत.. ८९. फललिप्सा=फलप्राप्तीच्छा. ९०. विदु =जानीयु. ९१ अन्तरंगम्=सारासारविचारक्षम हृदयम् ९२. परिग्रहः=धनम् ९३. अनर्थबुद्ध्या=अनर्थमूलक मिति मत्वा.

तापत्रयं तीव्रमवेक्ष्य वस्तुदृष्ट्या कलत्रं तनयादि हातुम् ॥
मध्ये द्वयोर्दोलनमात्मनो यत्सैषा भवेन्माध्यमिकी मुमुक्षा ॥ ७६ ॥
मोक्षस्य कालोऽस्ति किमद्य मे त्वरा भुक्त्वैव भोगान् कृतसर्वकार्यः ॥
मुक्त्यै यतिष्येऽहमथेति बुद्धिरेषैव मन्दा कथिता मुमुक्षा ॥ ७७ ॥
मार्गे प्रयातुर्मणिलाभवन्मे लभ्येत मोक्षो यदि तर्हि धन्यः ॥
इत्याशिना[94] मूढधिया मतिर्या सैषातिमन्दाभिमता मुमुक्षा ॥ ७८ ॥
यस्तु तीव्रमुमुक्षुः स्यात्सञ्जीवन्नेव मुच्यते ॥
जन्मान्तरे मध्यमस्तु तदन्यस्तु युगान्तरे ॥ ७९ ॥
चतुर्थः कल्पकोट्या वा नैव बन्धाद्विमुच्यते ॥
तस्मान्मुख्यमुमुक्षुत्वं यत्नात्साध्यात्मविद्भवेत् ॥ ८० ॥
लब्ध्वा सुदुर्लभतरं नरजन्म जन्तुस्तत्रापि पौरुषमतः सदसद्विवेकम् ॥
संप्राप्य चैहिकसुखाभिरतो यदि स्याद्धिक्तस्य जन्म कुमतेः पुरुषाधमस्य ॥ ८१ ॥
खादते मोदते नित्यं शुनकः सूकरः खरः ॥
तेषामेषां विशेषः को वृत्तिर्येषां तु तैः समा ॥ ८२ ॥
सम्प्रीतिर्[95]मैत्रेणोर्वेदनप्रसादमानन्दमन्तःकरणस्य सद्यः ॥
विलोकनं ब्रह्मविदस्तनोति छिनत्ति मोहं सुगतिं व्यनक्ति[96] ॥ ८३ ॥
शिवप्रसादेन विना न सिद्धिः शिवप्रसादेन विना न बुद्धिः ॥
शिवप्रसादेन विना न युक्तिः[97] शिवप्रसादेन विना न मुक्तिः ॥ ८४ ॥
मनोऽप्रसादः[98] पुरुषस्य बन्धो मनःप्रसादो भवबन्धमुक्तिः ॥
मनःप्रसादाधिगमाय तस्मान्मनोनिरोधं विदधीत विद्वान् ॥ ८५ ॥
द्रष्टा श्रोता वक्ता कर्ता भोक्ता भवत्यहंकारः ॥
स्वयमेव सर्वकृतिना साक्षी निर्लेप एवात्मा ॥ ८६ ॥
आत्मस्वरूपमनवेक्ष्य विमूढबुद्धिरारोपयत्[99]यखिलमेतदनात्मकार्यम् ॥
स्वात्मन्यसङ्गचितिनिश्चल एव चन्द्रे दूरस्थमेघकृतधावनवद्भ्रमेण ॥ ८७ ॥
भ्रान्त्या मनुष्योऽहमहं द्विजोऽहं तज्ज्ञोऽ[100]हमज्ञोऽहमतीव पापी ॥
भ्रष्टोऽस्मि शिष्टोऽस्मि[1] सुखी च दुःखीत्येवं विमुह्या[2]त्मनि कल्पयन्ति[3] ॥ ८८ ॥
विवेकवानप्यतियौक्तिकोऽ[4]पि श्रुतात्मतत्त्वोऽपि च पण्डितोऽपि ॥
शक्त्या यथा संवृतबोधदृष्टिरात्मानमात्मस्थमिमं न वेत्ति ॥ ८९ ॥

---

९४ इत्याशिनाम्=एवंप्रकारा आशा येषां तेषाम्. ९५ सम्प्रीतिः=परस्परानुरागः. ९६ व्यनक्ति=स्पष्टीकरोति. ९७. युक्तिः=उपायः. ९८ अप्रसादः=कलुषत्वम्. ९९. आरोपयति=अवमृशति. १००. तज्ज्ञः=तत्त्वज्ञः. १. शिष्टोस्मि=निष्पापोस्मि. २. विमुह्य=मोहमवलम्ब्य. ३ कल्पयन्ति=आरोपयन्ति. ४. यौक्तिकः=युक्तिज्ञः.

सम्यक्समाधिनिरतैर्विमलांतरंगैः साक्षादवेक्ष्य निजतत्वमपारसौख्यम् ॥
संतुष्यते परमहंसकुलैरजस्रं यद्ब्रह्म तत्त्वमसि केवलबोधमात्रम् ॥ ९० ॥
श्रुत्युक्तमव्ययमपारमनंतमाद्यमानंदचिद्घनमनामयमद्वितीयम् ॥
अव्यक्तमक्षरमनाश्रयमप्रमेयं यद्ब्रह्मतत्त्वमसि केवलबोधमात्रम् ॥ ९१ ॥
श्रद्धाभक्तिपुरःसरेण विहितेनैवेश्वरं कर्मणा
सतोष्यार्जिततत्प्रसादमहिमा जन्मांतरेणैव यः ॥
नित्यानित्यविवेकतीव्रविरतिन्यासादिभिः साधनै-
र्युक्तः सन् श्रवणे सतामभिमतो मुख्याधिकारी द्विजः ॥ ९२ ॥
अध्यारोपापवादक्रममनुसरता देशिकेनात्मवेत्त्रा
वाक्यार्थे बोध्यमाने सति सपदि सतः शुद्धबुद्धेरमुष्य ॥
नित्यानंदाद्वितीयं निरुपममलं यत्पदं तत्त्वमेकं
तद्ब्रह्मैवाहमस्मीत्युदयति तु परा खंडिताकारवृत्तिः ॥ ९३ ॥
नाहं देहो नाप्यसुर्नाक्षवर्गो नाहंकारो नो मनो नापि बुद्धिः ॥
अंतस्त्वेषां चापि तद्विक्रियाणां साक्षी नित्यः प्रत्यगेवाहमस्मि ॥ ९४ ॥
वाचः साक्षी प्राणवृत्तेश्च साक्षी बुद्धेः साक्षी बुद्धिवृत्तेश्च साक्षी ॥
चक्षुःश्रोत्रादींद्रियाणां क्रियाणां साक्षी नित्यः प्रत्यगेवाहमस्मि ॥ ९५ ॥
नाहं स्थूलो नापि सूक्ष्मो न दीर्घो नाहं बालो नो युवा नापि वृद्धः ॥
नाहं काणो नापि मूको न खंजः साक्षी नित्यः प्रत्यगेवाहमस्मि ॥ ९६ ॥
नास्म्यागंता नापि गंता न हंता नाहं कर्ता न प्रयोक्ता न वक्ता ॥
नाहं भोक्ता नो सुखी नैव दुःखी साक्षी नित्यः प्रत्यगेवाहमस्मि ॥ ९७ ॥
नाहं योगी नो वियोगी न रागी नाहं क्रोधी नैव कामी न लोभी ॥
नाहं बद्धो नापि युक्तो न मुक्तः साक्षी नित्यः प्रत्यगेवाहमस्मि ॥ ९८ ॥
नांतःप्रज्ञो नो बहिः प्रज्ञको वा नैव प्रज्ञो नापि चाप्रज्ञ एषः ॥
नाहं श्रोता नापि मंता न बोद्धा साक्षी नित्यः प्रत्यगेवाहमस्मि ॥ ९९ ॥
ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः ॥
इत्येवैषा वैदिकी वाग्ब्रवीति क्लेशैःक्षत्या जन्म एव प्रहाणिः ॥ १०० ॥

---

५ परमहंसः=यतिविशेष ६ अजस्रम्=नित्यम् ७. तत्त्वमसि=त्वं ब्रह्मासि. ८. चिद्घनम्=ज्ञानमयम्. ९. अनामयम्=निर्विकारम्. १० अव्यक्तम्=अतिसूक्ष्मरूपम्. ११. अक्षरम्=अक्षय्यम. १२ अप्रमेयम्=अपरिच्छेद्यम् १३. अध्यारोप=मिथ्यारोपणम् १४. देशिक=गुरु. १५ आत्मवेत्रा=आत्मज्ञानवता १६. अक्षवर्गः=इंद्रियसमूह. १७ विक्रिया=विकृति १८ प्रत्यक्=व्यक्तिमात्रव्यापिन् १९. वियोगिन्=योगरहित २०. रागी=विषयान्ध २१ युक्त=संसारसमुद्रमग्न २२. प्रहाणि=विशेषाहानि. २३. क्षति=नाश..

भूयोजन्माद्यप्रसक्ति[२४]र्विमुक्तिः क्लेशक्षत्या भाति जन्माद्यभावः ॥
क्लेशक्षत्या हेतुरात्मैकनिष्ठा तस्मात्कार्या स्वात्मनिष्ठा[२५] मुमुक्षोः ॥ १ ॥
यमनियम[२६]विनिष्ठैः[२७] साधुसिद्धासनस्थः सततमसुनियामी रुद्धधीर्धारणाद्यः ॥
रहसि परमतत्त्वं निष्कलं चिंतयानः प्रदहति भवबंधं निर्विकल्पे[२८] निरूढः[२९] ॥ २ ॥

मायाध्वांते त्वहमिदमितिभ्रांतिबीजे विनष्टे
श्रुत्याचार्यप्रकटवचनोद्भूतबोधारुणेन[३०] ॥
ब्रह्मात्मैक्ये द्वय[३१]विरहिते केवलानंदरूपे
किं कर्तव्यं किमुतकरणम् किं फलं कोनु कर्ता ॥ ३ ॥

यत्राशेषं जगदिदमभून्नाममात्रावशेषं
सर्पस्फूर्ते[३२] गुणवदसतः कल्पनाधार[३३]मात्रे ॥
ज्ञाते तस्मिन्निरवधि[३४]सदानंदपीयूषसिंधौ
किं कर्तव्यं किमुत करणं किं फलं कोनु कर्ता ॥ ४ ॥

भ्रांत्या कर्ता करणपटली[३५]कर्मकाम्यं विकॢप्त[३६]
सत्येकस्मिन्नभसिपुरवद्वस्तुतो द्वैतशून्ये ॥
तद्विध्वंसे किमिह निवसेत्केवले बोधमात्रे
किं कर्तव्यं किमुत करणं किं फलं कोनु कर्ता ॥ ५ ॥

कालांभोधौ[३७]विदमिदमितिग्राह्यशून्यार्थजाते
क्व स्याद्वापिप्रहि[३८]नंदनदीभेदकल्पावकाशः ॥
तद्वद्ब्रह्मण्यपगतभिदे[३९] सुप्तिवन्निर्विशेषे
किं कर्तव्यं किमुत करणं किं फलं कोनु कर्ता ॥ ६ ॥

यत्रत्वस्येत्युपनिषदि सत्केवलत्वं ब्रुवत्याम्
सुप्तौ[४०] सर्वानुभवविषये वाच्यभेदं[४१] वदेत्कः ॥
तस्मान्नित्ये निरवधिसुखे निर्गुणे निर्विकल्पे
किं कर्तव्यं किमुत करणं किं फलं कोनु कर्ता ॥ ७ ॥

---

२४. अप्रसक्ति =अनासक्ति २५. स्वात्मनिष्ठा=आत्मनि दृढभक्ति . २६. यमनियमौ=शरीरसाधनापेक्ष नित्य कर्म यम (अहिंसादिकम्)। बाह्यसाधनेन साध्य कर्म नियम (शौचादिकम्) २७ विनिष्ठ =विशेषभक्तियुक्त . २८ निर्विकल्प =निर्विकार'. २९. निरूढ =निमग्न ३०. अरुण =सूर्य. ३१ द्वयविरहितम्=अद्वैतब्रह्म ३२. सर्पस्फूर्ति.= सर्पभास ३३. कल्पनाधारमात्रम्=कल्पनाएव आधारो यस्य तत् ३४ निरवधि =अपार . ३५. पटली=आच्छादनम् ३६. विकॢप्तम्=कल्पितम् ३७ अंभोधि =समुद्र ३८. प्रहि =कूप ३९ भिद्=भेद. ४०. सुप्ति =निद्रा. ४१ वाच्यभेद =स्पष्टार्थभेद (विशेषार्थभेद ).

यं यमेष विषयं ययौ युतः सेनयैनमपि नीतवान्समम् ॥
छत्रचामरमुखाखिलर्द्धिभिर्भूषितं विविधभूषणैरपि ॥ ९ ॥
मत्तदंतितुरगव्रजः पुरः सूतमागधरवोऽपि चाभवत् ॥
पृष्ठतो विविधवीरसंहृतिस्तस्य शंभुसुतशाहुभूपतेः ॥ १० ॥
केचिदाहुरयमस्य चात्मजः कन्यकातनय इत्यपि क्वचित् ॥
शंभुनामनृपतेः सुतोऽह्ययं नान्य इत्थमपरे विवेकिनः ॥ ११ ॥
यद्यदेष नगरं ययौ प्रभुस्तत्र तत्र विशिखोऽरुणन्नृपान् ॥
देवता अपि पुरे पुरे स्थिताः स्फोटयन्नथ ययौ स पंढरीम् ॥ १२ ॥
विठ्ठलस्य परिचारकास्तदा देवतागलगतां सुमालिकाम् ॥
नारिकेलमपि तस्य ते पुरः स्थापयंत इदमूचिरे द्विजाः ॥ १३ ॥

यंयमिति । एषः यवनाधिपः सेनया युतः सन् य य विषय देशं ययौ तं तमि तिशेषः । छत्र च चामर च छत्रचामरे ते मुख मुख्ये यासा ताः अखिलर्द्धयः सकलसपदस्ताभिः विविधभूषणैरपि भूषित एनमपि शाहुमपि साक साधं। साक साधं समं सहेत्यमर. । नीतवान् ॥ ९ ॥

मत्तेति । मत्ताः दतिनो गजा तुरगाश्च तेषां व्रजः सूताः मागधाश्च तेषां रवोऽपि तस्य शाभुसुतशाहुभूपतेः पुरः अभवत् । पृष्ठतः पृष्ठभागे विविधवीराणां संहृतिः अभवत् ॥ १० ॥

केचिदिति । केचित्पुरुषाः अयं बालः अस्य यवनाधिपस्य आत्मजः पुत्रः इत्याहु । किंच केचित् कन्यकातनय इत्यप्याहुः । अपरे अन्ये विवेकिनः शाभुनामनृपतेः अय सुत हि निश्चयेन नान्य इत्थं आहु ॥ ११ ॥

यद्यदिति । प्रभुः निग्रहानुग्रहसमर्थः एषः विशिखः यवनेश. यद्यन्नगर ययौ तत्र तत्र नगरे नृपान् राज्ञ प्रतिकूलानित्यर्थः । अरुणत् रुरोध । अथ सः पुरे पुरे स्थिता देवता. प्रतिमाः स्फोटयन् विदारयन् सन् पढरीं दक्षिणदेशे प्रसिद्धा नगरीं ययौ ॥ १२ ॥

विठ्ठलस्येति । तदा यवनाधिपागमनसमये ते प्रसिद्धा द्विजाः ब्राह्मणाः विठ्ठलस्य देवस्य परिचारकाः सेवकाः देवतायाः विठ्ठलसंज्ञायाः गलः कठस्तत्र गतां विद्यमानां शोभना माला सुमाला सुमालेव सुमालिका ना । स्वार्थेकप्रत्ययेकृतेटापिप्रत्ययस्थात्कात्पूर्वस्येति इत्वं । यद्वा सुमाना पुष्पाणां आलिकां पंक्ति मालामित्यर्थः । कुसुम सुममित्यमर । सममित्यपपाठः । नारिकेलस्य फलमपि तस्य यवनाधिपस्य पुरः अग्रे प्रसादार्थं स्थापयन्त. सत इदं वक्ष्यमाण ऊचिरे बभाषिरे ॥ १३ ॥

---

• 'यत्रयत्रसनगामसयुत ' १०. 'यत्रयत्रसजगामराजराट् ' पा० भे० ।

विष्णुरत्र भगवान् घनप्रभो रक्ष्य एष भवता दयावता ॥
माल्यगं कुटिलकुंतलं स वै संविलोक्य समुवाच तान्द्विजान् ॥ १४ ॥
विठ्ठलस्य शिरसीह कुंतलाः संति किं वदत भो द्विजास्तदा ॥
कश्चन स्मृतहरिं नमन् जगौ संति विठ्ठलशिरस्यहो कचाः ॥ १५ ॥

इत्युक्तवंतं विप्रं तं यवनः प्रत्यभाषत
एवं चेत्तर्हि तं देवं मां प्रदर्शय सत्वरम् ॥ १६ ॥
ओमित्युक्त्वा ततः शीघ्रं देवालयमगाद्द्विजः
साष्टांगं प्रणिपत्याह सत्यं कुरु वचो मम ॥ १७ ॥
प्रासादं समुपेत्यासौ देवदेवस्य मस्तके ॥
तुतोष कुंतलान्दृष्ट्वा लंबमानान्घनान्बहून् ॥ १८ ॥
यवनः सत्वरं प्रागाद्देवालयमतंद्रितः ॥
ददर्श देवदेवस्य मस्तके कुन्तलान्बहून् ॥ १ ॥
द्विपालवद्धान्कुटिलान्नीलान्दीर्घान्घनांस्तथा ॥
उष्णीषं शिरसस्तस्य समुद्धृत्य प्रदर्शितान् ॥ २ ॥ *
अतितुष्टः स यवनः साष्टांगं प्रणनाम तम् ॥
भूषणानि च वासांसि विठ्ठलाय ददौ मुदा ॥ १९ ॥
ब्राह्मणेभ्यो धनं भूरि वस्त्राणि च तथा ददौ ॥
दीनांधकृपणेभ्योऽपि ददौ वासोधनानिच ॥ २० ॥

विष्णुरिति । दयास्यास्तीति दयावान् तेन दयावता भवता अत्र शिलामये देहे घन इव मेघ इव प्रभा अस्यास्तीति घनप्रभः भगवान् षड्गुणैश्वर्यसंपन्न. अस्ति इति शेषः । अत एषः शिलादेहः रक्ष्यः रक्षणीयः । शिलादेहस्य भंगे एनं त्यक्त्वा भगवान् गमिष्यतीति प्रार्थयामासुरितिभावः । सः यवनाधिपः माल्यगं मालागतं । माला माल्यं सौमनस्यं कंठे गुणं अधीरणं इत्यमरः । कुटिलः वक्रः कुंतलः केशः तं विलोक्य तान् द्विजान् इत्युवाच ॥ १४ ॥

विठ्ठलस्येति । भो द्विजाः इह अस्मिन् काले विठ्ठलस्य शिरसि कुंतलाः संति किं वदत । तदा कश्चन द्विजः स्मृतस्तत्काले संकटपरिहारार्थं मनसि चिंतितः तं हरिं नमन् सन् मद्वाक्यं सत्यं कुर्विति प्रार्थयन्नित्यर्थः । विठ्ठलस्य शिरसि अहो इत्याश्चर्ये कचाः सन्तीति जगौ ॥ १५ ॥

इत्युक्तवतमितिस्पष्टम् ॥ १६ ॥ ओमिति ॥ १७ ॥ प्रासादमिति ॥ १८ ॥ अतितुष्टइति ॥ १९ ॥ ब्राह्मणेभ्यइति ॥ २० ॥

११. '०भवनुम. । माल्यमाह हरिमस्तके कचा' पा० भे० । * इद श्लोकद्वयं कचिदधिकं दृश्यते ।

विप्रानपृच्छदेवस्य कट्यां हस्तौ कुतो द्विजाः ॥
लिंगं च मस्तके कस्मादत्र चोत्तरमुच्यताम् ॥ २१ ॥
तत्रोत्तरं तदा प्रोचुः स्वस्वबुद्ध्यनुसारतः ॥
उत्प्रेक्षया स्वपद्यानि भूषयंतो द्विजोत्तमाः ॥ २२ ॥
मत्पादपंकजपरागरसातिलुब्ध-
चेता नरः सकलभूतसुहृत्तमो यः ॥
देवो भवांबुधिरयं जघनप्रमाण-
स्तस्येति वेदयति किं स नितंबपाणिः ॥ २३ ॥
यद्वा कलिंदतनयाधिकरम्यभीमा-
तीरं विलोक्य समगाद्भगवान् पुरस्तात् ॥
गोपेष्वपि प्रतिगतेषु जलप्रमाण-
माख्यापयन्निव हरिर्हि नितंबपाणिः ॥ २४ ॥

विप्रानिति । द्विजाः देवस्य विठ्ठलस्य कट्यां कटिप्रदेशे हस्तौ कुतः मस्तकेच लिंग कुत इत्यपृच्छत् । अन्यस्य कस्यापि देवस्य कटिप्रदेशे हस्तौ न दृष्टौ किं च विष्णुप्रतिकृतेरेतस्याः शीर्षिण शिवलिंगं कुतइत्यपृच्छदित्यर्थः । तेषु तूष्णीं भूतले स्थितेषु पुनराह । अत्र मत्प्रश्ने उत्तरं उच्यतां वक्तव्य तूष्णींभावः न युक्त इत्यर्थः ॥ २१ ॥

तत्रेति । द्विजोत्तमाः तदा स्वस्वपद्यानि उत्प्रेक्षया उत्प्रेक्षालंकारेण । उत्प्रेक्षा-लक्षणं कुवलयानंदे । संभावना स्यादुत्प्रेक्षा वस्तुहेतुफलात्मना । उक्तानुक्तास्पदाद्यात्र सिद्धासिद्धास्पदे परे इति । अलंकारलक्षण तु शब्दार्थवृत्तिमनोहरसंनिवेशत्वं अलं-कारत्वं । स्वस्वबुद्धेः अनुसारो अनुसरण तेन भूषयन्तः सन्तः तत्र प्रश्ने उत्तर प्रोचुः ॥ २२ ॥

मदिति । सः प्रसिद्धः देवः विठ्ठलः । मम यत्पादपंकजं तस्य यः परागः मक-रन्दः तस्य यः रसः तस्मिन् लुब्ध सक्त चेतश्चित्त यस्य तथोक्तः । सकलस्य भू-तस्य प्राणिमात्रस्य सुहृत्तमः यः नरः तस्य अयं भवांबुधिः । जघनं प्रमाणं यस्येति जघनप्रमाणः कटिप्रमाणः सुतर इत्यर्थः । इति नितंबपाणिः सन् वेदयति किं इत्युत्प्रेक्षा । मन्ये शंके ध्रुवं प्रायो नूनमित्येवमादिभिः । उत्प्रेक्षा व्यज्यते शब्दैरिव-शब्दोपि तादृशः इति । एवं अग्रेऽपि ज्ञेयम् ॥ २३ ॥

यद्वेति । यद्वा पक्षान्तरे भगवान् विठ्ठलः कलिन्दस्य पर्वतस्य या तनया कन्या यमुना तदपेक्षया अधिक रम्या या भीमा तस्याः तीर विलोक्य यमुनापेक्षया भीमायाः रम्यत्वात्तत्तीरस्याप्यतिरम्यत्वं ज्ञात्वेत्यर्थः । पुरस्तात् पूर्वं समगात् । गोपेष्वपि पश्चात्

यद्वा जरासुतजये मथुरां विहाय
यातः प्रवर्षणगिरिं सहितो बलेन ॥
दीप्तात्ततो झटिति यत्प्रससार भैमं
श्रांतस्तटं तत इदं नु नितंबपाणिः ॥ २५ ॥
यद्वा विहाय तनयान् विनयोपपन्नान्
रम्या अपि प्रियतमाः सुजना भजंतः ॥
तिष्ठंत्यनुक्रममिमे बहवोऽयमेकः
श्रांतोऽपि तिष्ठति ततो नु नितंबपाणि ॥ २६ ॥
यद्वा विधाय[12] सकला अपि तोकलीलाः
संभ्रामणाख्यकुतुकं च विधातुमीशः ॥
गोपान्स्वकूर्परविलग्नकरान्विधाय
देवो विहर्तुमिव सैष नितंबपाणिः ॥ २७ ॥

प्रतिगतेषु अनुगतेषु विठ्ठलस्य परतीरे स्थितत्वात् मध्ये जलं कियदिति गोपालानां संशये जलप्रमाणं आख्यापयन्निव । हरिः नितंबपाणिः । अस्तीतिशेषः ॥ २४ ॥

यद्वेति । यद्वा हरिः बलेन संकर्षणेन सहितः सन् जरासुतस्य जरासंधस्य जये सति स्वस्य पराजये सति स्वपराजयस्तु लीला मात्रं । मथुरां विहाय प्रवर्षणगिरिं प्रवर्षणाख्यं पर्वतं यातः गतः । जरासंधेन पर्वतारूढयोस्तयोः प्राप्तिदौर्लभ्यात् पर्वते प्रदीपिते दीप्तात्ततस्तस्मात्पर्वतात् झटिति शीघ्रं भीमायाः इदं भैमं । तस्येदमित्यण् इदं । तटं प्रससार ततस्तस्मात् श्रान्तत्वात् नितंबपाणिः । अस्तीतिशेषः । लोके हि दूरदेशगमनेन श्रान्तत्वात् कट्यां करं निधाय गच्छन्तीति प्रसिद्धं । अत्र श्रीमद्भागवतस्था कथानुसंधेया ॥ २५ ॥

यद्वेति । बहवः इमे सुजनाः साधवः विनयेन नीत्या उपपन्नान् तनयान् रम्याः रमणीयाः प्रियतमा अपि विहाय अनादृत्य भजन्तः सन्तः अनुक्रमं तिष्ठन्ति । एतस्य भजने प्रहरपर्यंतं जाते अनेन कर्तव्यं मध्ये व्यवधानेन न भाव्यं इति नियमं कृत्वा देवालये तिष्ठन्ति । अयं तु विठ्ठलः एकः असहायः अतः श्रांतोपि तिष्ठति । अन्यथा स्त्रीपुत्राननादृत्य तिष्ठतां भजकानामनादरः स्यादितिभावः । ततस्तस्मान्नितंबपाणिर्नु नु वितर्के । नु पृच्छायां वितर्केचेत्यमरः ॥ २६ ॥

यद्वेति । स एषः ईशः सकला अपि तोकलीलाः बालक्रीडाः विधाय कृत्वा संभ्रामणाख्यकुतुकं बालेषु प्रसिद्धां लीलां विधातुं कर्तुं गोपान् स्वकूर्परविलग्नकरान् विधाय विहर्तुमिव क्रीडितुमिव नितंबपाणिरस्ति ॥ २७ ॥ [ सोचिलोपे सेदिति सस्यसोर्लोपः ]

१२. ' विहाय ' पा० भे० ।

यद्वा वृकासुरभयाद्गिरिशे स्वधाम
प्राप्ते प्रतारणवशादिति तं बभाषे ॥
दत्तो वरः कटिकराग्रनिवेशरूपो
मह्यं तथेति किमु सैष नितंबपाणिः ॥ २८ ॥
यद्वा विहृत्य यमुनापुलिनेऽतिरम्ये
गोपीष्वहंकृतिमलासु तिरोहितः सन् ॥
स्कंधं यया सह ययावधिरोहणार्थ-
मस्याः सुखेन किमु सैष नितंबपाणिः ॥ २९ ॥
यद्वा चिरं जनकरूपनिजातिसेवा
भक्त्या समेत्य भगवान्परितुष्ट ईशः ॥
तं पुंडरीकमवदद्वृणु सर्वकामा-
नित्याग्रहे श्रमवशान्नु नितंबपाणिः ॥ ३० ॥
अन्यांगनाकुचतटीगतकुंकुमार्कं
वक्षो विलोक्य सरुषि प्रियराधिकायाम् ॥

यद्वेति । सः एष. । [ सोचिलोपेचेदिति सस्यसोर्लोपः ] विष्णुः वृकासुरभयात् गिरिशे सांबे स्वधाम वैकुंठ प्राप्ते सति तथा तेन प्रकारेण त्वदीयवरप्रदानप्रकारेणेत्यर्थः । कट्या कराग्रयोर्निवेशः कटिकराग्रनिवेशः स एव रूपं लक्षणं यस्य स कटिकराग्रनिवेशरूप. वरः मह्य दत्तः इति प्रतारणवशात् त वृकासुर बभाषे । कट्यां करौ स्थापयित्वा बभाषे इति हेतोः नितबपाणिरस्ति । त्वया यथा अनुष्ठान कृत तथा मयाप्येतस्यानुष्ठानं कृत मह्य वरो दत्तः यस्य कट्या करौ निधाय पश्यामि अह न मृतः तथा त्वमपि प्रत्ययार्थं स्वस्यैव शिरसि पूर्वं करौ निधेहि न मरिष्यसि एतस्य पिशाचपतेर्मिथ्यावादित्वात् इति प्रतारणार्थं नितबपाणिरित्यर्थः ॥ २८ ॥

यद्वेति । स एषः विष्णुः कृष्णावतारे अतिरम्ये यमुनापुलिने विहृत्य गोपीषु अहंकृतिः अहंकारः स एव मलो यासां तास्तथा भूतासु सतीषु । यया सह ययौ यां गृहीत्वा ययावित्यर्थः । अस्याः सुखेन स्कंधं अभिरोहणार्थं नितबपाणिः किं । इयमपि भागवतीया कथानुसंधेया ॥ २९ ॥

यद्वेति । भगवान् ईशः चिर चिरकाल जनकरूपस्य निजस्य स्वस्य अतिसेवा तद्रूपा या भक्तिस्तया परितुष्टः सन् । ईश्वरस्य जनकहृदये स्थितत्वे प्रमाण गीतासु अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः । अहमादिश्च मध्य च भूतानामत एव चेति । तं पुण्डरीक सर्वकामान् वृणु इत्यवदत् । तस्य न वृणोमीत्याग्रहे श्रमवशात् नितबपाणिः । एव कटिपाणित्वमुत्प्रेक्ष्य मस्तके लिंगमुत्प्रेक्षते ॥ ३० ॥

तप्तो वियोगदहनेन नु चंद्रचूडं
गंगाधरं हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३१ ॥
यद्वा स्मरोद्भटपिशाचनिपीडितात्मा
गोपांगना अपि सतीः कुलटां च भुक्त्वा ॥
पत्नीश्चकार बहुशो न तथापि मुक्तः
कामांतकं हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३२ ॥
यद्वा स्वदर्शनसमागतमीश्वरं तं
गंतुं पुनर्निजगृहं त्वरयंतमीशम् ॥
भैमाज्जलात्स्वयमयं प्रणयेन शीघ्र-
मुत्तारयन्निव हरं शिरसा बिभर्ति ॥ ३३ ॥
यद्वाशुतोषगिरिजापतिभीमलिंग-
पूजां विधाय महतीमतिभक्तियुक्तः ॥
उत्सर्जनार्थमिव भैमजलेऽतिरम्ये
लिंगं स्वयं हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३४ ॥

अन्येति । अय हरिः अन्या या अगना युवती तस्याः कुचतटीगत यत्कुंकुमं तेन आक्त चिन्हित यद्वक्षः उरःस्थल तद्विलोक्य प्रिया चासौ राधिका च प्रियराधिका तस्यां प्रियराधिकायां रुषा रोषेण सहिता सरुट् तस्यां सरुषि सत्यां वियोगः विरहः राधासबधीत्यर्थ. स एव दहन· अग्निः तेन तप्तः सन् तापशात्यर्थं गंगाधर चद्रचूडं शिरसा बिभर्ति । अधिकरणस्य करणत्वविवक्षया तृतीया । उत्प्रेक्षापरिकरयोः ससृष्टि· । अलंकारः परिकरः साभिप्राये विशेषणे । सुधांशुकलितोत्तसस्ताप हरतु वः शिव इति लक्षणात् ॥ ३१ ॥

यद्वेति । अय हरिः विठ्ठलः । स्मरः कामः । कामः पञ्चशरः स्मरः इत्यमरः । स एव उद्भटः क्रूरः पिशाच तेन निपीडितः आत्मा मनो यस्य तथा भूतः सन् । सतीः पतिव्रता· गोपाना अगना· भुक्त्वा कुलटा कुब्जां च भुक्त्वा कामशांत्यभावे बहुशः शताधिकषोडशसहस्रसख्याः पत्नीः चकार । तथापि तेनेतिशेषः । न मुक्तः न त्यक्तः । अतः कामस्य अतकं साब शिरसा बिभर्ति । अत्रापि उत्प्रेक्षापरिकरयोः ससृष्टिः ॥ ३२ ॥

यद्वेति । अयं हरिः स्वदर्शनाय समागत· स्वदर्शनसमागतः तं प्रसिद्धं पुनर्निज-गृह गन्तु त्वरयत त्वरा कुर्वत ईश ऐश्वर्यसपन्न हर साब भैमात् भीमायाः इद भैम तस्मात् अतिभयकरादित्यर्थ· । जलात् स्वयमेव ननु अन्येन प्रणयेन प्रीत्या शीघ्र सत्वर उत्तारयन्निवेत्युत्प्रेक्षा । शिरसा बिभर्ति ॥ ३३ ॥

यद्वेति । अय हरिः अतिभक्तियुक्त. सन् महतीं श्रेष्ठां । आशु शीघ्रं तोषो यस्येति

यद्वा शिवं शिवरतं च सदा द्विषंति
ये वैष्णवाः स्मृतिशतैरपि बोध्यमानाः ॥
भेदो ममास्य च नहीति विबोधनार्थं
मन्ये हरं हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३५ ॥

यद्वा मदीयभजनादपरं न किंचिद्
विन्दंति ये भवजलं कटिदघ्नमेषाम् ॥
आवेदयन् शपथपूर्वमयं नु देवो
गंगाधरं हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३६ ॥

यद्वा निजेक्षणसमागतभक्तसंघै-
रापूरितेऽखिलगृहे सकलत्रपुत्रे ॥
शंभौ समागतवति स्थितिभूम्यभावात्
प्रीत्या हरं हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३७ ॥

यद्वा विवाहविहिते निखिलेऽपि वृत्ते
वध्वाः प्रवेशसमये स्वकुलप्रचारम् ॥

आशुतोषः स चासौ गिरिजापतिश्च आशुतोषगिरिजापतिः । तस्य यद्वाम पार्थिव लिंग तस्य पूजां विधाय कृत्वा । अतिरम्ये भैमजले उत्सर्जनार्थमिव स्वय लिंग शिरसा बिभर्ति ॥ ३४ ॥

यद्वेति । स्मृतिशतैः अपि शब्दात् श्रुतिभिः बोध्यमानाः ये केचन वैष्णवाः शिव सांब शिवरत शिवभक्त सदा द्विषन्ति । मम अस्य शिवस्य* भेदः न नास्ति इति हीति निश्चयेन तेषा विबोधनार्थं हर शिरसा बिभर्ति इति अहं मन्ये । इत्युत्प्रेक्षा ॥ ३५ ॥

यद्वेति । अय देव. मदीयभजनात् अपर किंचिदपि ये न विंदंति तेषा भवजल कटिप्रमाणं कटिदघ्न । प्रमाणे द्वयसच् दघ्नञ् मात्रच इति दघ्नञ् प्रत्ययः । इति शपथपूर्वं आवेदयन् कथयन् सन् इम गंगाधर शिरसा बिभर्ति नु । अत्रापि उत्प्रेक्षा परिकरयोः संसृष्टिः ॥ ३६ ॥

यद्वेति । अय हरिः आषाढ्यां निजेक्षणाय निजावलोकनाय समागताः ये भक्त-संघास्तैः अखिलगृहे अखिलदेवालये आवृते व्याप्ते सति । कलत्रपुत्राभ्यां पार्वतीगणे-शाभ्यां सहितः सकलत्रपुत्रः तस्मिन् शंभौ समागतवति सति । स्थितेः अवस्थानस्य या भूमिः तस्याः अभावात् प्रीत्या हर शिरसा बिभर्ति ॥ ३७ ॥

यद्वेति । अयं हरिः निखिले संपूर्णे विवाहे पार्वतीपाणिग्रहणे विहित अवश्यं कर्त-

११ 'केचन' पा० भे० । * 'विष्णोश्च' इति मूलग्रंथे वर्तते तद् प्रामादिकम् ।

संवर्तनाख्यमपि कर्तुमिमं शिवाद्यं
पौत्रं ध्रुवं[14] हरिरयं शिरसा बिभर्ति ॥ ३८ ॥
ब्राह्मणोक्तं वचः श्रुत्वा संतुष्टतरमानसः
ययावग्रे स यवनो नृसिंहपुरमुत्तमम् ॥ ३९ ॥
ततोऽसौ यवनाधीशो नीराभीमरथीगतम् ॥
नृसिंहादिपुरं यातः प्रतिमास्फोटनोद्यतः ॥ ४० ॥
वृश्चिकोरगसंकाशान् कीटान् प्राणापहारकान् ॥
देवालयाद्विनिर्यातान् दृष्ट्वाग्रे प्रययौ बहून् ॥ ४१ ॥
साबादीनां[15] यत्र यत्र सान्निध्यं प्रतिमासु हि ॥
देवतानां स तास्तास्तु प्रणम्याग्रे ययौ खलः[16] ॥ ४२ ॥
शंभौ दिवमिते शाहौ यवनेन समं गते
राजारामो भूमिमिमामपालयदधीश्वरः ॥ ४३ ॥
ततस्तस्य सुतो नाम्ना शिवो राजाभवत्किल
सोऽपि भूमिमिमां सर्वां पूर्ववत्समपालयत् ॥ ४४ ॥
यवनाधिपवारिदागतप्रियताराविधोक्षितश्चिरम् ॥
नरनाथतनूद्भवस्तरुर्ववृधे तत्तनयांकभूगतः ॥ ४५ ॥
सविवाहमकारयच्छिशोस्तनुजायाः किल तस्य बंधुभिः ॥
अतुलांबररत्नभूषणं गजवाजिप्रभृति प्रदाय च ॥ ४६ ॥

व्यं तस्मिन् वृत्ते जाते । वध्वा पार्वत्या प्रवेशो गृहप्रवेशस्तस्य यः समयः तस्मिन् स्वकुलस्य यः प्रचारः आचारः तं सवर्तनाख्यमपि कर्तुं इमं शिवया पार्वत्या आद्यं पौत्रं साबं शिरसा बिभर्ति ध्रुवं । दाक्षिणात्यास्तु विवाहे वृत्ते वधूप्रवेशकाले वधूवरौ कट्योर्गृहीत्वा स्वकुलदेवतानामग्रहणपूर्वकं नृत्यंतीति प्रसिद्धं । तदत्रानुसंधेयं । विष्णोः साबः पौत्रस्तु भागवते । विष्णोः पुत्रो ब्रह्मा तस्य पुत्रः साब इति तृतीयस्कंधे स्पष्टम् ॥ ३८ ॥ ब्राह्मणोक्तमिति ॥ ३९ ॥ ततोसाविति ॥ ४० ॥ वृश्चिकेति स्पष्टम् ॥ ४१ ॥ साबादीनामिति ॥ ४२ ॥ ननु शंभौ दिवं गते शाहौ च यवनाधीशेन नीते दक्षिणदिग्राज्यं केनाकारीत्यत्राह द्वाभ्याम् । शंभाविति । राजाराम इत्येकं पदं सज्ञात्वात् सुपोधातुप्रातिपदिकयोरितिसुब्लुक् न ॥ ४३ ॥ ततस्तस्येति ॥ ४४ ॥ पुनश्च प्रासंगिकं समाप्य शाहोरेव चारित्रमाह तत्रादौ रूपकेण वर्णयति । यवनेति ॥ ४५ ॥ स इति । सः यवनाधीशः अंबराणि वस्त्राणि रत्नानि माणिक्यादीनि भूषणानि सुवर्णनिर्मितानि तेषां समाहारः अंबररत्नभूषणं अतुलं अनुपमं

---

१४ 'हरं' पा० भे० । १५ 'बौध्यादि' पा० भे० । १६ 'खलु' पा० भे० । १७ 'जगामैव' पा० भे०

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषा निषेव्य महौजसा
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक ६. मार्च १८८३. अंक ३.

हें मासिक पुस्तक
पुणें येथें
ज्ञानप्रकाश छापखान्यांत
छापिलें.

किंमत ८ आणे.

## पोंच.

### सन १८७८ ते १८८२ पैकीं

| | रु. | आ |
|---|---|---|
| श्री० रा० ग० ये० मैराळ... | १ | ६ |
| मे० श्री० बा० ठाकूर ... | ८ | १२ |
| रा० सा० रा० वि० पुणेंकर ... | १ | ६ |
| ,, ,, मा० स० पागेदार .. | १ | ६ |
| रा० रा० गो० के० पिटके .... | १ | ६ |
| ,, ,, वि० र० नात ... | १ | ० |
| ,, ,, वामन रावजी लेले ... | १ | ० |
| ,, ,, वि० गो० चिपळूणकर .. | १ | ६ |
| रा० रा० वि० ना० केळकर... | १ | ६ |
| ,, ,, ग० मा० कराडेकर | १ | ६ |
| ,, ,, धों० दा० वेहरे . | १ | ६ |
| ,, ,, भा० र० ठाकूर ... | १३ | २ |
| ,, ,, वि० ल० सोमण ... | ० | [illegible] |
| ,, ,, धों० वि० दांडेकर | ५ | ८ |
| ,, ,, रा० दि० फडके... | १ | ० |

### सन १८८३ पैकीं

| | रु. | आ. |
|---|---|---|
| श्री० रा० मा० ग० चिटणीस ... | १ | ६ |
| ,, ,, ज० आ० घाडगे . | १ | ६ |
| मे० श्री० बा० ठाकूर ... | १ | ६ |
| रा० सा० र० राव महाडीक ... | १ | ६ |
| रा० रा० ब० गो० वकील... | १ | ६ |
| ,, ,, ह० म० कडेगावकर ... | १ | ६ |
| ,, ,, बा० ना० जोशी... | १ | ६ |
| ,, ,, ग० ना० खरे ... | १ | ६ |
| ,, ,, पु० गो० रोडे ... | १ | ६ |
| रा० रा० से० ट्रेनिंग कालेज पुणें. | १ | ० |
| ,, ,, से० ने० ला० हर्दे .. | १ | ६ |
| ,, ,, पां० चा० हेडमास्तर कवठे | १ | ६ |
| ,, ,, कृ० ह० चिटणीस... | २ | ८ |
| ,, ,, ज० कृ० कान्हेरे... | १ | ६ |
| ,, ,, अ० रा० हरडीकर ... | १ | ६ |
| ,, ,, से० ने० ला० मालवण .. | १ | ६ |
| ,, ,, से० ने० ला० मिरज ... | १ | ६ |
| ,, ,, रा० वि० फडके ... | १ | ० |

---

## पोंच.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें—मल्हार रामराव चिटणीसकृत **श्रीशिव छत्रपति महाराज** यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र नामक पुस्तक हें, विविधज्ञान विस्तार मासिक पुस्तकाचे कर्ते यांजकडून आम्हाकडे नजर आलें आहे, त्याचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों. याची किंमत रु० २ खेरीज डाकहशील.

काव्येतिहास-संग्रहाचे व्यवस्थापक.

# सूचना.

मराठी कवितेच्या पोटांत 'अनेककवि' असें सदर घालून जीं प्रकरणें छापिलीं जात आहेत त्यांच्या पृष्ठांचा अनुक्रम निरनिराळा न ठेवितां एक सारखाच ठेविला आहे. येणें करून हीं सर्व किरकोळ प्रकरणें एका ठिकाणी बांधितां येतील, यांचा आरंभ **आनंदतनयकृत ताटकावध** या प्रकरणापासून झाला आहे व पुढें **देवनाथकृत श्रावणाख्यान, चतुर्मंत्ररामायण, उद्धवचिद्धनकृत** भगवद्गीता वगैरे प्रकरणें आलीं आहेत—याचप्रमाणें संस्कृत काव्यांचे पोटांत '**अनेके**' या सदराखालीं **सादाशिवी** वगैरे लहान लहान काव्यें येत असतात, त्याच्याही पृष्ठांचा अनुक्रम एक सारखाच ठेविला आहे असें केल्यानें हीं हीं एका ठिकाणीं बांधितां येतील.

**का० सं० व्यवस्थापक.**

---

## विषयक्रम.

**बखरी.**


नागपूरकर भोंसल्याची बखर ........ ९–२४


**मराठी कविता.**


श्रीरामदासस्वामिकृत युद्धकांड ........ ४१–४८

**अनेक कवि**—अमृतरायकृत शुक-चरित्र ........ १६७–१७१


**संस्कृत काव्यें.**


**अनेके**—श्रीशंकराचार्यकृत वेदांतसार व स्वात्मानंदप्रकाश. ६१–६८

श्रीशिवकाव्यम्– ........ १०९–११६

ठेवून, आपण जातीनें काशीचे मार्गे निघून, भागानगरांसें जाऊन, तेथून आपल्या देशास महत् प्रयासानें महाराज दाखल झाले. वर्षानंतर चिरंजीव संभाजी राजे यांजला ब्राम्हण घेऊन येत असतां मार्गांत गलबला झाला जे, संभाजी राजे यांजला ब्राम्हण आपला पुत्र म्हणून घेऊन जातो. तर ते काळीं समुदाय ब्राम्हणांचा यास अटकाव झाला. याजकरितां ब्राम्हणास चौकीदार बोलले कीं " तुम्ही पितापुत्र जेव्हां अहात तेव्हां एक जागीं भोजन करावें." यांनीं उत्तर केलें कीं, " हा आमचा धर्म नाहीं, दूध पोहे म्हणाल तर असो." असा प्रकार होऊन निभावून संभाजी महाराजांस ब्राम्हणानीं आणिलें, पितापुत्राच्या भेटी झाल्या, फार संतोष झाला. राजश्रींनीं आपले पाठीमागें कुटुंबाचा व प्रांताचा बंदोबस्त चांगला राहिला हें पाहून, आपले जागीं फार खुष झाले. मागती राजश्रींनीं फौजेचा घाट घालून पातशाही फौजेशीं लढाई घेऊन २७ किल्ले[53] मिरजा राजे जयसिंग यांनीं घेतले होते ते पुन: राजश्रींनीं मोठा पराक्रम करून घेऊन जैयामर्दानि ठाणें ठाणीं जागा जागीं बसविलीं.

नंतर कोणे एके दिवशीं स्वारी शिकारीस अरण्यांत गेले असतां तेथें, रामदास

( मागील पृष्ठावरून )

केले होते. तसेंच बैराग्याचे मेळ्यांत मिळून तेथून कुरुक्षेत्रास गेले. तेथून उत्तर मानस, हरिद्वार करून गडकी अयोध्या दर्शन करून श्रीकाशी व प्रयाग यात्रा करून गयेस आले तेथें गयावर्जन केलें. त्रिस्थळी यात्रा, कार्तिक स्नानें माघस्नानें साग करून बरावरचे सर्व याजपासून यात्रा वगैरे करून देवगड, चांदे येथें येऊन श्री गंगातीरची क्षेत्रें करीत करीत वीस बावीस महिन्यानीं महाराज निभावून आले." वि ज्ञा वि पु १० पृ० २०२ पहा

५१. हैदराबाद=भागानगर असें नाव पडण्याचें कारण, भाग या नावाची कोणी रूपवती वेश्येला राहण्यासाठीं गोंवळकोंडें येथील एका बादशहानें बंगला बांधून दिला होता, त्याजसभोंवतीं हें शहर वसलें होतें

५२ " मथुरेस पत्र पाठविलें जे, देशीं सुखरूप पावलो या उपरि सावधपणें संभाजी राजे यांस घेऊन येणें, असें काशीपंतास लिहिलें त्यांनीं संभाजी राजे यास घेऊन येता वाटेनें त्यांचें स्वरूप सुंदर व सतेज तेव्हा हा कोणी मातबर आहे अशी चौकशी पडली. ते समयीं आम्ही ब्राह्मण हा आमचा मुलगा असें सांगून एक जागा बसून काशीपंतानीं फराळ केला; असे प्रकारें सर्व करून निभावून आल्यावर महाराज फार संतोषी होऊन विश्वासू खरे म्हणून विश्वासराव असा काशिनाथपंतास किताब देऊन वाढविलें." ( विविधज्ञानविस्तार पुस्तक १० पृष्ठ २०२ पहा. ) कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित संभाजी राजे यास जानवें घोतरें नेसवून आपला भाचा म्हणवून राजगडास आले. आणि राजियासि भेटले मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर जाहला. मोठा दानधर्म केला आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूस " विश्वासराव " म्हणवून नाव किताब दिला ( क० अ० वि० शिव छ० चें च० पृष्ठ ८७ पहा. )

५३ सत्तावीस गड मोंगलांस दिले होते ते मागती घ्यावे अशी शिवाजीनें तजवीज केली मोरोपंत पेशवे वगैरे मंडळीनें हे सत्तावीस किल्ले परत घेतले

५४ शौर्यानें

स्वामींचे दर्शन झालें. सत्पुरुष पाहून सेवा करावी हे चित्तांत येऊन कांहीं दिवस सेवाही केली. त्याजवरून स्वामी प्रसन्न होऊन अनुग्रह दिला. याजवरून राजश्रींची मर्जी बहुत संतोषास पावली. नंतर गागाभँट आदीकरून ब्राह्मणाची संमती घेऊन सिंहासनारूढ झाले. शके १५९६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्टमासी शुद्ध १३ स तख्तनशीन होऊन अष्टप्रधानादिक स्थापित केले. या विषयींचा दाखला सातारापास राजमंडळांत बहुत टिकाणीं आहेच.

त्या प्रसंगीं भोंसले त्रिवर्गबंधू यांची सेवा पेशजी जागजागीं झाली ती लक्षात होती असें असता साबाजी भोंसले यानीं विशालगडाचे मुक्कामीं विनती केली याजवरून मुला लेंकरास राहावयास जागा सनद १ नेमून दिली.

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके पंधराशें शहाण्णव आनंदनाम संवत्सरे आश्विन बहुल दशमी मदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानीं राजेश्री साबाजी बिन सुबोजी भोंसले यासि दिलें. इनामपत्र ऐसीजे.–तुम्ही स्वामींचे पुरातन सेवक, एकनिष्ठपणे सेवा करून स्वामींस संतुष्ट केले. तुमचे चालीवेंग स्वामींस अवश्यमेव तुम्ही विशालगडाचे मुक्कामी दर्शनास आले ते वेळेस प्रसंगीं तुम्ही विनति केली कीं, आपणास इनाम लेकरानलेकरी चालेल असा दिला पाहिजे, म्हणोन, त्याजवरून स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन, तुम्हास भूतन इनाम देई, कुलबाब, कुलकाम, खेरीज हक्कदार व इनामदार करून पूर्वमर्यादेप्रमाणे गांव बितपशील:–

१. मौजे राक्षसवाडी तर्फ रासिन देह १.

२. मौजे पिंपरी कोल्हेर तर्फ कडेवली देह १.

एकूण देहे २ रास अजरामरात करून दिल्हे असे, तरी सदहू गांव तुम्ही आपले मुला लेकरीं, घेऊन इनाम तुम्ही वडिलाचे वंशपरपरेनें अनुभवून स्वामींचे सेवन मनोभावें करून सुखरूप राहणे जाणिजे. लेखनालंकार:

याप्रमाणें सनद एक करून दिली व पुढें कांहीं एक दिवस राज्य करून शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवासरीं दोन प्रहरी रायगडीं राजश्रींचे देहावसान होऊन, परलोक साधन केला. देहावसानाचे पूर्वी महाराजांचे चित्तां-

---

५५. काशीकर विद्वान ब्राम्हण हा महाशास्त्रज्ञ पंडित होता यास शिवाजीनें केशव पंडित, भालचन्द्रभट्ट आणि सोमनाथ भट्ट कात्रे यास पाठवून पैठणाहून रायगडास राज्याभिषेकाचे वेळीं आणविलें.

५६. सिंहासनारूढ.

५७ अष्टप्रधानाचीं नांवें संस्कृत आहेत. प्रत्येकाच्या कामाची फोड चिटणीसाकडील शिवाजीच्या बखरींत केली आहे. (वि० ज्ञा० वि० पु० १३ पृष्ठ २३८ पहा )

५८ ही बखर लिहिणारानें मल्हाररामरावकृत छत्रपतिची बखर पाहिली असावी असें अनुमान होतें.

तील संकल्प जे, संभाजी महाराज अल्पबुद्धि, उग्र फार याजकरितां कैद ठेवून राजाराम राजे संभाजीचे सापत्नबंधु वय लहान, सौम्यरूप व राजेश्रींची दया हीं त्याजवर बहुत, याजकरितां त्याजला मालकी देण्याचा सिद्धांत देहावसान होण्याचे पूर्वींच केला होता.

आणि शिवाजी महाराजांचे देहावसान झाल्यावर प्रतिनिधि व बाळाजी आवजी प्रभू चिटणवीस यांनीं राज्यकारभार राजाराम साहेब राजानीं करावा, असा नेम करून पन्हाळगडास, सोमाजी नाईक हुकिम व बहिरजी फरजंद व जनार्दनपंत होते त्यांस पत्र लिहून खंडोजी दासूराचे नाईकाचे हातीं पाठविलें कीं, "संभाजीराजे यांस कैद करून ठेविणें, आणि राजाराम साहेब यांस, सोईराबाई

५९ संभाजी कोणत्या प्रकारचा मनुष्य निपजेल हें भाकीत शिवाजीने केलें होतें. (ख० अ० वि० शि० च० पृष्ठ ८८ पहा.)

६० प्रल्हाद निराजी.

६१ बाळाजी आवजी–हे शिवाजी महाराजांचे प्रसिद्ध चिटणीस, उपनांव चित्रे यांचे वाडवडील हबसाणात दिवाणगिरीवर होते. त्यानी घोलवाडी नावाचा गाव इनाम मिळविला म्हणून हे आपणास 'घोलकर' असें म्हणवूं लागले. बाळाजी आवजीचे वडील आवजी हरि यास विषाचा पेला पिऊन मरावें लागलें बाळाजी आवजी शामजी आवजी व चिमणाजी आवजी यांस समुद्रात बुडवून टाकावें असा राजाचा हुकूम झाला परंतु ते आपल्या आइसह राजापूर बंदरास गेले. तेथें ते आपल्या मामाजवळ लिहिण्यास होते शिवाजी महाराजांनी बाळाजी आवजीचें सुरेख अक्षर पाहून त्यास चिटणीसीचीं वस्त्रें सन १६४८ त दिलीं. यानीं महाराजाची सेवा एकनिष्ठपणें केली व अनेक कामीं हे फार उपयोगी पडले तेव्हां महाराजानीं त्यांजकडे चिटणिशी वंशपरंपरें कायम केली, पुढें संभाजीनें सोनगांवाजवळ बाळाजी आवजी यांस शके १६०३ मध्यें हत्तीचे पायी मारिलें. (कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें नामक मासिक पुस्तक–पहा )

६२. संभाजीच्या दुर्वर्तनाबद्दल शिवाजीनें त्यास पन्हाळे किल्यावर अटकेंत ठेविलें होतें. संभाजी हा एका ब्राम्हणाच्या बायकोच्या पातिव्रत्याचा भंग करण्याच्या आरोपावरून अटकेंत होता तो पळून दिलेलखानास जाऊन मिळाला व परत आल्यावर पन्हाळे किल्यावर पुन नजरकैदेंत होता.

६३ प्रस्तुत प्रकरणास अनुसरून संभाजीराजे ह्यांच्या चरित्रांत पुढील उल्लेख आहे. "पन्हाळ्यास हवालदार बहिरजी नाईक इगळे होते व सोमाजी नाईक बकी व हिरोजी फरजंद यास खंडोजी जासुदाचा नाईक व गणोजी कानडा यांजबरोबर पत्रें पाठविलीं, व जनार्दन पंत सुमंत कारकिर्दी होते यासही पाठविलीं कीं "येथील प्रसंग एक प्रकारचा आहे. संभाजी महाराज यास कैद करून बहुत सावधपणें असावें. महाराजांचे वर्तमान फुटूं देऊं नये" संभाजी महाराज यासही पत्र त्याजपाशींच दिलें परंतु बंदोबस्त झाल्यावर द्यावें असें सांगितलें. त्यांनीं जाऊन त्या अन्वयें पत्र देऊन कांहीं बंदोबस्त जाहला."

६४. ही शिवाजीची दुसरी बायको, ही शिरके याची कन्या हिचा पुत्र राजाराम याचा जन्म चैत्र शुद्ध नवमीस झाला म्हणून त्याचें नांव राजाराम ठेविलें हा पालथा उपजला तेव्हा शिवाजी म्हणाला कीं, दिल्लीची पातशाही पालथी घालील. ज्योतिष्यांनींही असेंच भाकित केलें होतें (शि० छ० च० पृष्ठ ५९।६० पहा. )

आइ साहेब यांचे आज्ञेवरून मंचकारूढ करून कारभार चालविला." हा मजकूर खंडोजीनी जासूद यांजबरोबर पत्रें पाठविलीं होतीं तीं पत्रें घेऊन पन्हाळगडास गेला. तो संभाजी महाराज दरवाज्यांत बसले होते. त्यांनीं वर्तमान पुशिलें जे, "महाराज क्षेमकुशल आहेत.?" यांणीं उत्तर केलें कीं, "सुरक्षित आहेत." खलबतास संभाजीराजे यांस नेऊन सर्व वर्तमान सांगितलें. "महाराजांस देवआज्ञा झाली. राजाराम साहेब मंचकारूढ झाले, आणि पत्रें घेऊन आलों. तुम्हांस कैद करावें, आपण सोमाजी नाईकास आणून पुसावें." याजवरून सोमाजी नाईक किल्ल्यावरील हाकीम याजला आणून पुसू लागले. तुम्हास महाराजाचे व तेथील कारभारी यांचे कागद आले ते दाखवावे. त्यांनीं कृत्रिम कागद होते ते दाखविले. याजवर खंडू जासूद आणून रुजुवात केली; सकल वर्तमान सांगितलें, तसेंच क्रोधें करून सोमाजी नाईकास व हवालदारास कोंडून ठेविलें. आणि लष्करचे सुभेदारांस व किल्लेदारास जागजागीं पत्रें लिहून पाठविलीं. आणि बंदोबस्त करूं लागले. त्या सहित शेदोनशें लोकानिशीं संभाजी महाराज निघाले. मार्गीतही अवांतर लोक मिळविले आणि एकाएकीं रायगडास आले. दरवाजे किल्ल्याचे मोकळेच होते. तव महालात जाऊन वाड्यात सोयराबाईराणीवर राग केला आणि बाहेर आले. याजवरून तिणें गळफास लावून मृत्यु पावली. नंतर बाळाजी अवजी चिटणवीस याजला बोलावून पुसिलें कीं "अशीं पत्रें काय म्हणून लिहिलीं.?" त्यानीं विनंती केली कीं, "राणी साहेब व महाराजाची

६५ राजाराम शके १६०२ वैशाख वद्य ३स सिंहासनारूढ झाला.

६६. सोमाजी नाईक बंकी व सूर्याजीपंत कावळा या दोघांस मारून टाकिलें असें अन्यत्र ठिकाणीं आढळतें.

६७. बहिरजी नाईक इंगळे.

६८. या समयी संभाजीनें जी धुमाळी उडविली तिचें वर्णन संभाजी राजे यांचें चरित्र पृष्ठ [illegible] यांत सविस्तर दिलें आहे.

६९ सोयराबाई साहेब हिजवर शिवाजी महाराजास विषप्रयोग केल्याचा आरोप संभाजीनें करून, तीस पुष्कळ जांच केला. एका भिंतीच्या कोनाड्यात तिला चिणून घालून दूध ठेऊन ठेविली होती. तेथें ती तीन दिवस होती. तिसरे दिवशीं तिचा प्राण गेला.

७०. या पत्राविषयीं संभाजी राजे यांच्या चरित्रांत पुढील मजकूर आढळतो. "बाळाजी आवजी यास बोलावणें करविलें जे. सरदार व पन्हाळा येथें बंदोबस्ताचीं पत्रें लिहावीं म्हणून सांगितलें त्यानीं उत्तर केलें कीं "आम्ही दरकदार राजाचे. खावंद वडील संभाजी महाराज असतां अशीं पत्रें आम्ही लिहिणार नाहीं तेव्हां तुम्हास हा आग्रह करण्याचें कारण नाहीं. तुमचे हातचें पत्र नसल्यास लोकास पत्रा[illegible]स विश्वास पडणार नाहीं यास्तव तुम्हांकडे दरक त्या अर्थीं बरीं वाईट पत्रें तुम्ही लिहावीं हें तुम्हांस पात्र, लिहून द्यावीं." ते समयीं निरुपाय व साहेबाची इतराजी दिसून आली त्यावरून "मी लिहीत नाहीं मूळ आवजी काहे त्यास स्वाधीन करितों–पाहिजे तसें करवा" म्हणोन उठोन गेले. आवजी बोशपासून पत्रें लिहून रवाना केलीं.

आज्ञा होती म्हणोन लिहिली." तेव्हां आज्ञा जाहली कीं, आह्मी मालक नाहीं. पूर्वोत्तार विश्वासुक असतां तुमची लेखणी कशी वाहली? असा शब्द लावून हत्तीचे पायीं देऊन जिवे मारिले.[७१] पुरुष एक ठेविला नाहीं. त्यांतून मूल [७२]लेंहान त्याच आजोळ, मातेचें माहेर, तेथें जाऊन माय समागमें हापसाणांत, नामें खंडो बल्लाल वांचला.

इकडेस परसोजी भोंसले हेही काहीं जमावानिशीं तेथें होते त्याजला बलावून विचारिलें कीं, तुम्ही प्रबुद्ध वडिलोपार्जित सेवक आहात असे असतां तुमचे समक्ष असें व्हावें हें तुम्हास योग्य नव्हे. असो तुम्ही आतां येथें न राहतां कूच करून जावें. याजवरून परसोजी भोंसले आपले जमावानिशीं गेले. ते खानदेशांत पुडवाले लूट करीत होते तेथें त्यांत मिळून राहिले व बापूजी भोंसले व साबाजी भोंसले हे वृत्तीवर गेले.

मग संभाजी महाराज यांनीं राज्याचा बंदोबस्त करून अम्मलें[७३] करूं लागले. तों चिटणवीसाचा मूल[७४] मोठा जाहला. हुशार होऊन सर्वत्र मनाई करीत असतां राजेश्रीं जवळ आला, सरकारांत प्रवेश होईना. इतक्यांत कोंकणांत एक किल्ला बदलून होता. तेथें हपशी आले होते हे वर्तमान ऐकून त्याचे पारिपत्यास कांहीं लोक पाठविले. लौकर शरण[न] होय या करिता महाराज जातीनें चालले. मार्गांत विचारिले कीं, कोणी लिहिणार कारकून समागमें आहे कीं काय! एक चिट्ठी आपले फौजेंत पुढें पाठविली पाहिजे. त्यावेळेस चिटणविसाचें मूल कलमदान घेऊन धांवत होता. ते हुजुरास सांगितलें जे, चिटणविसाचा मूल हजर आहे त्यावरून आज्ञा झाली जे चिट्ठी लिहिणें कीं, स्वारी येऊन पोहोचली तुम्ही घाबरे होऊं नये, असें लिहिण्याचा हुकूम झाला. तव सरकार स्वारी पावकोस निघोन गेली. मार्गातून चिटणविसाचे मुलानें धांवत जाऊन स्वारी आटोपून, चिट्ठी पालखींत टाकली. महाराजानीं [ चिठी ] पाहून [ पुढें ] पाठविली. ती जलद स्वारीचे आधीं पोहोचली, हें पाहून, लोकास धैर्य जाहलें,

---

७१. संभाजीची बायको येसूबाई ही बाळाजी आवजी यास मारल्याचें वर्तमान ऐकून फार रागावली व तिनें संभाजीची फार निर्भत्सना केली संभाजीसही ही गोष्ट वाईट वाटली व स्वकृतीचा पश्चात्ताप झाला.

७२. खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ असे बाळाजी आवजीचे दोन मुलगे होते. खंडो बल्लाळ यांचें वय १०।१२ वर्षांचें होतें. येसूबाई ही आपले कागदपत्र खंडो बल्लाळ याजकडून लिहवीत असे. व त्याजवर लोभ करी

७३ शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे माघ शुद्ध १० गुरुवारीं संभाजीस राज्याभिषेक झाला.

७४ खंडो बल्लाळ हा गोंव्याचें राजकारण निघालें तेव्हा संभाजी बरोबर गेला होता, त्या वेळेस तो संभाजीच्या उपयोगी पडला म्हणून संभाजीनें त्यास चिटणिशीची वस्त्रें संतुष्ट होऊन दिलीं

आणि हल्ला केला त्यांत किल्ला फत्ते जाहला. तव स्वारीही सरकारची पोहोंचली. सर्वांनीं विनती केली जे, आज चिठ्ठी समयास आली. त्याजमुळें कार्य सिद्ध झालें, हें ऐकून फार संतोष झाला. तेच दिवशीं स्वारी माघारी फिरली. चिटणिसाचा मूल[७५] रक्त ओकून मार्गांत पडला होता, तो महाराजानीं पाहून मुलास सावध करून पुढें घेऊन स्थळास आले. त्याचें काम पूर्ववत् त्यास देऊन ताम्रपत्रही करून दिलें. कारभारातही घेऊन काहीं दिवस चालत असतां, कनोजी ब्राम्हण कबजी[७६] दिल्लीहून पातशहाकडून सरकारांत आला. त्यानें राजाची मर्जी बहुत प्रसन्न करून घेतली. राजास वश केलें. जसें सांगत जावें तसेंच महाराज राजश्रीनीं ऐकत जावें. असें झालें असतां दिल्लीहून पातशहा अलमगीर फौजसहित शके १६१४ व हिजरी सन १०९३ चे सालीं दक्षिणेंत आले. त्यांनी मुलूख जेर केला. हें [मुलुख जेर केल्याचें] वर्तमान जागजागचे आलें, म्हणजे कबजीनीं म्हणावें की, हें वर्तमान मिथ्या आहे. कारण कबजी याजला कारभार सोंपिला व वशीकरणामुळें राजा वश जाहला होता. त्याजवरून कबजीचें बोलणें थरंवार पडत असावें कीं, आपले जवळ फार फौज इतका खर्च कशास पाहिजे याप्रमाणें म्हणत असावें. बातमी पातशाही फौजेची आली. नंतर त्यास मारावें असें होतें. तों एकाएकीं संगमेश्वरचे[७७] मुक्कामीं पातशाही फौजा आल्या. त्यांत संचार कबजीचा होताच. त्यावरून संभाजी महाराज व त्याचे

---

७५. या संबधानें संभाजीचे चरित्रात पुढील उल्लेख आहे "खंडो बल्लाळ चिटणीस धावत येत आहेत ते समयी हाक मारविली तो धावून येऊन पावले त्यांस जाब लिहून देणें असें सांगितलें तो बसून लिहून दिला स्वारी पुढें गेली पन धावून निशाण करून दिलें तो रक्त ओकले ते पाहून अस्ताव्यातून पाणी देववून खासा घोडा जिलबोस होता तो देऊन बसा म्हणून सांगितले."

७६. हा कलुषा प्रधान-हा कवि होता म्हणून त्याचें नांव कबजी किंवा कविजी असें पडलें. कलुषा हा औरंगजेबाकडून संभाजीराजास धरून नेण्याच्या इरायानें विडा उचलून आला होता. याजविषयीं संभाजीचे चरित्रात पुढचा उल्लेख आहे — "कवी कलुषा कबजी म्हणोन कनोजी ब्राह्मण बहुत विद्वान मंत्रशास्त्रविद्या आगम त्यास बहुत गम्य असे होते. त्याची स्त्री ही चतुर होती. त्यानीं महाराज वश्य करावे म्हणून कर्णमंत्र प्रयोग करून महाराजाची बहुत जवळीक व कृपा संपादून अगोदर समीप राज्याभिषेक पूर्वीं होतेच. वाममार्गविशीं अनुष्ठानें प्रयोग, सपत्नी करणें व राज्यवृद्धि होणें यश येणें असें समजावून प्रयोग अनुष्ठान करविलें पुढें दिवसेंदिवस बुद्धीस भ्रंश पडून त्या मार्गांत अनसरावें असें केलें. रेड मारून त्याचे ओले कातड्यावर अनुष्ठानें व मद्यमांस पशुवधाची बहुत करू लागले"

७७ इखलासखान नामक सरदार संभाजीस पकडण्याकरतां संगमेश्वराम आला होता तेव्हा येसूबाई साहेब व शिवाजी राजे हे रायगडीं होते. त्यानें संभाजीस कबजीबावास व इतर मंडळीस कैद करून तुळापुरास आणिलें.

पुत्र शिवाजी सानाबाईचे पोटचा धरून, आलमगिराबरोबर तुळापूरचे मुक्कामास गेले. नंतर संभाजीस पातशहा आलमगीर यांचे समक्ष नेऊन म्हणाले की, "तू आमचे समागमें भोजनास ये." त्याजवरून यांणीं उत्तर केलें कीं, "तुमची लेंक मजला लग्न करून द्याल तर मी जेवितों." याजमुळें आलमगीर पातशहा खपा होऊन संभाजीस जिवें मारण्याची परवानगी दिली. याजवर संभाजीस तुळापूरचे मुक्कामीं सेवकानीं नेऊन जिवें मारिलें. नंतर शिवाजी वय लहान हे वर्तमान पातशहाचे कन्येस समजलें. त्याजवरून मुलास पातशहाजादीनीं पाहण्यास बोलाविलें, पाहून बहुत दया आली व पातशहास विनंती केली कीं, "तुमचे समक्ष या मुलाचे बापानीं माझें नाव घेतलें. तेव्हां हा पुत्र माझा आहे याजवर आपण कृपा करीत असावी व मुलास जनानियात येण्याची परवानगी द्यावी." याजवरून "उत्तम आहे" म्हणून हुकूम जाहला. असें असतां कोणे एके दिवशीं पातशहा खवासात बसले तेथून दुसरे स्थलीं जाऊ लागले तेव्हां जोडा पायांतील टाकिला. ते समयीं पातशहाजादीनीं मुलाचे हातून जोडा उचलविला व इषारा केला कीं, मस्तकीं घेणें, यांणी तसेंच केलें. हें पातशहानीं पाहून विचारिलें "कीं हें काय! तुझे बाप, आजे मुफसद होते. त्यांची वर्तणूक अंगीकारितांची असता तुझा विचार असा" तेव्हां मुलानीं विनंती केली कीं, "त्याची त्यासात गेली. मी सरकारातून आहे. स्वामींचे पायातील जोड्याचें स्थान माझें

---

७८. हा संभाजीचा पुत्र. याचा जन्म शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध १०स येसूबाईचे पोटीं झाला हाच शाहू महाराज.

७९. पातशहानें संभाजीस विचारावयास पाठविलें कीं, तुम्ही बाटावें म्हणजे जीव वाचवून तुमची दौलत तुमचे स्वाधीन करितों. त्याजवरून राजे यांनीं उत्तर केलें की, बाटा म्हणता तर ही गोष्ट घडावयाची नाहीं ज्या अर्थीं कैदेंत आलों तेव्हा वाचणें तें काय? तुमचे विचारास येईल तें करावें. तथापि तुमची बेटी द्यावी म्हणजे बाटतो, हे उत्तर एकून औरंगजेबास राग आला व संभाजीचा शिरच्छेद करावयास त्यानें सांगितलें. संभाजी राजे यांचें चरित्र पृष्ठ २० पहा

८०. शके १६१० विभवनाम संवत्सरे फाल्गुन वद्य अमावास्येस संभाजी व कलुषा यांस मारिलें

८१. या समयीं शिवाजी राजे यांचें वय ६ ७ वर्षांचें होतें.

८२ संभाजीचें ह्मणणें औरंगजेबाची मुलगी बेगम होस समजलें तेव्हां ती ह्मणाली "त्याचा प्राण माझे नांवें करून गेला या उपरि आपण दुसरा भ्रतार करणार नाहीं." संभाजी राजे यांचें चरित्र पृष्ठ २१ पहा

८३. थोरले शाहू महाराज यांचे चरित्रांत शाहूनें पादशहाचा जोडा उचलला ही गोष्ट आढळत नाही. पातशहा सिंहासनावरून उठत असतां त्याचे मखमाली पायमोचे शाहूनें हात लावून पुढें केले तेव्हा त्यानें संतुष्ट होऊन हातांतील रुमाल त्यास बक्षिस दिला. असा उल्लेख थोरले शाहू महाराजांचे चरित्रात आहे

मस्तक आहे. तेव्हा मी मस्तकीं धरिलें आतां मला उणें काय आहे. ?" हें ऐकून बहुत संतोष होऊन विचारिलें कीं, "तुझें नाव काय? त्यांनीं विनंती केली जे, माझें नांव शिवाजी आहे." यावर हुकूम जहाला कीं, "चोर शिवाजी होता तू शाहू आहेस." त्या दिवसापासून त्याचें नांव "शाहू" झालें असें होऊन त्या समयीं पातशहाचे कन्येनें विनंती केली कीं, याचें लग्न करावें, सोयरीक शिरक्याची कन्या आणून लग्न लाविलें पाहिजे." पातशहानीं मुलगी पाहण्यास बलाविली. तेव्हां मराठे यांणीं विचार केला कीं, "या समयीं यवनाचे येथें आपली कन्या पाठवावी हें नीट नाहीं. काय करावें! न पाठवितां गति नाहीं" हे जाणोन दासीची कन्या तिजवर वस्त्रं भारी घालून पाठविली. ती व महाराज [ शाहू ] बादशहाजवळ आले. बादशहानीं जवळ घेऊन आशीर्वाद दिल्हा. बादशहा अवलिया होता. त्यानें कृत्रिम जाणोन हीच मागे राज्य करील ही आज्ञा जाहली.

बादशहाची स्वारी कांहींएक दिवस राहून दौलताबाद वगैरे गोवळकोंडे

---

८४. मल्हाररामरावकृत "थोरले शाहू महाराज यांचे चरित्रात" पुढील उल्लेख आहे:—"हे आले. आमचे बेगमेनें पुत्र म्हणविलें, ते मातु जहाले यांचें नांव शाहू असें म्हणावें असे शाहू राजे ह्मणों लागले" पृष्ठ ३ पहा.

८५ औरंगजेब याच्या मुलीचें शाहूवर फार प्रेम होतें "शाहू महाराज वयस्क जहाले (तेव्हा) यांचें लग्न करावें असा बेगमेनीं अर्ज केला. तेव्हा पातशहानी उद्धव योगदेव राजाज्ञा व मोरोपंत सबनीस व जोत्याजी केसरकर यास आज्ञा केली कीं,—"आमचे पदरीं मातबर उमराव, सरदार आहेत त्यात राजाचे शरीर संबंधी पूर्वी पासून होत असतील, त्याच्या कन्या पाहून उत्तम ऐश्या योजाव्या, आणि लग्न करावें म्हणून समारंभास खर्चास लाख रुपये देवविले" म० रा० कृ० थो० शा० चरित्र पृष्ठ ४ पहा

८६. शाहूचें एक लग्न रुस्तुमराव जाधव यांच्या कन्येशीं व दुसरें शिंदे कण्हेर खेडकर याच्या कन्येशीं झालें, अंबिकाबाई व सावित्री बाई अशीं अनुक्रमानें त्यांचीं नांवें ठेविलीं, असें शाहूच्या चरित्रात लिहिलें आहे. (पृष्ठ ५) शिर्के व मोहिते याच्या कन्या योजिल्या असेंही कोठें आढळतें. जाधवराव याच्या कन्येचें नाव कोठें कोठें सकरबाई व सगुणाबाई असें लिहिलेलें आहे.

८७. "येसूबाई साहेब यानीं बेगमेचे विचारें शिंदे याजकडील आंदणी दासीची कन्या होती .. तिजला वस्त्रें जवाहीर अलंकार देऊन महाराज व तिजला पाठविलीं" (शा० च० पृष्ठ ५ पहा.)

८८. विरूबाई हें दासीपुत्रीचें नांव

८९. तुमचें राज्य तुम्ही बहुत दिवस उभयता कराल असें आशीर्वादात्मक बोलले" शा० च० पृष्ठ ५ पहा.

९०. दवलताबाद महमद तघलखानें देवगडच्या मुसलमान सरदारास मारून त्या शहरास दिल्लीहून राजधानी नेण्याचा विचार केला व त्यासच दवलताबाद हें नाव सन १३४०त दिलें.

९१ सन १६८८ सालीं गोवळकोंडे घेऊन तेथील राज्याची समाप्त औरंगजेबानें केली व तंजावर पर्यंत मुलूख घेतला

हैदराबाद[१२] घेतली. तानाशा[१३] वगैरे धरले असा मोठा प्रताप करून औरंगाबादेची छावणी मुकरर केली सातान्यास आले, तों पेशजी संभाजी व शाहू राजास धरून नेलियावरि राजाराम[१४] साहेब मालक जाहले. आईसाहेब[१५] कारभार करीत होत्या. तेव्हां कोणी पुरुष कारभारी चांगला पाहिजे याजकरितां खंडेराव बल्लाळ चिटणविस यास सांगितलें "तुम्ही कारभार करावा." यानीं विनती केली आणि आपले चित्तांत आणिलें कीं, राजानीं मागें जसा सलूक केला असा पुढें आमचे पारिपत्य करतील. त्यास दूरच असावें हें जाणोन आई साहेबास विनती केली कीं, "आम्ही पदरचेच पूर्वापार खरे, परतु या समयास मनुष्य चांगला पाहिजे. एक मनुष्य थोर परशुरामपंत यांस प्रतिनिधि करावे, आणि कारभार चालवावा. वरकड अष्टप्रधान आहेतच." यावरून परशुरामपत कारभारी केले. त्यांनीं राज्याचा बदोबस्त करून कारभार चालविला होता. तों बादशहाची स्वारी आली. फौजा सातान्यास[१६] लागल्या. किल्याचे बुरुज मंगळाईचा[१७] तेथें सुरंग लावून उडविला. ते समयीं प्रयागजी प्रभू[१८] त्या बुरूजांत सुभेदार होते ते उडाले. येयपर्यंत केलें परतु किल्ला स्वाधीन

१२ हें शहर घेतल्याचा उल्लेख इग्रजो इतिहासात नाहीं

१३ तानशाहा—हा गोंवळकोंडयाचा शेवटचा राजा. याचे नांव अबुहुसेन असें होतें.

१४ हा संभाजीचा सावत्र बधु

१५. सोयराबाई साहेब, ही शिर्के याची कन्या व राजारामाची आई

१६ मल्हारराभरावकृत 'थोरले राजाराम याचे चरित्रातील पुढील उल्लेख "खासा स्वारो सातान्यास आली" इत्यादि प्रस्तुत प्रसगासच अनुलक्षून आहे. रा० च० पृष्ठ ४८ पहा

१७ "किलेचे पूर्वभागीं ईशान्य कोनेस मगळाईच्या बुरुजाखालीं बादशहानीं सुरुग करविला पाटीभर माती काढून आणतील त्यांस एक मोहोर द्यावी असें लक्षावधी रुपये खर्च करून सुरुग करविला उडवावा ते वरच्यास बातमी न समजावी, असा बेत राखून, बुरुजाखालीं दारूचे बुधले पुरून, मोर्चे हुषार राखून, आपण खासा तक्तराव्यावर बसून स्वारी बाहेर आली... ..किल्यावरील लोक पादशहाची स्वारी पहाणेस मगळाईचे बुरुजावर-उत्तरेकडील तटावर उभे राहिले त्या समयी मगळाईचे बुरुजाची सोंड शें दोनशें हात वरती उडोन जेथील तेथें कायम झाली. त्या काळीं वरील लोक शें दोनशें तटाखालीं पडून मेले खालील लोक मोर्चेबदीचे बहुत मेले व जाया झाले" राजारामाचें चरित्र पृष्ठ ३५ पहा

१८ "सुरुग उडाला ते समयीं प्रयागजी प्रभू सुभेदार बुरुजानजीक झाडा खालें बसले होते तेथे दगड येऊन पडले त्यांचें आयुष्य बलोत्तर तोन धोंडे तिहींकडे, मोठा धोंडा वरता एक, आत घराप्रमाणें झालें आणि वर मातीचा ढीग पडला... , ते समयों लोकानीं चोहोंकडे पाहतां हरकी झाली जे सुभेदार दिसत नाहींत तेव्हा सर्व दरकदार व लोक मिळून ज्या स्थळीं बसले होते त्या स्थळीं येऊन पाहता मातीचा ढीग बुरजाप्रमाणे पडलेला. उकरून पाहतात तों झग्याचा पदर दृष्टीस पडला त्याजवरून येथें आहेत असें ओळखून माती काढू लागले तों दगडाच्या आतून

(पुढें चालू.)

न जहाला. बहुत दिवस खटपट करीत राहिले. किल्ला औंध्या नंतर दुसऱ्या किल्ल्यांस लागले. तेथें किल्ला भाडू लागला. बादशाहास बातमी लागली कीं, या किल्ल्यांत परशुरामपंतच आहेत. ज्यांनीं सातान्याचा किल्ला भांडविला तेच येथें आहेत. तेव्हा बादशहा लाचार होऊन अहमदनगरास येऊन अहमदनगर घेतलें.

[ याप्रमाणें ] यश घेऊन औरंगाबादेस आले. तोफेच्या नजरा सर्वत्रांनीं केल्या. व बादशहाजादीनीं नजर केली नाहीं सबब बादशहानीं "विचारिलें कीं, बादशाहाजादी नजर कां करीत नाहीं." यावरून उत्तर केलें कीं, "औरंगजेब बादशहा कायम होता. म्हणून तुम्ही सहलशाहा होता, आतां नागजागींचे बादशहा बुडवून तुम्ही घातशहाच राहिले. तेव्हां सहलशाही उडाली. याज-करितां आतां तरी आपला नवसा शाहू म्हणविला आहे. याजला स्थापित करावा म्हणजे त्याजपासून नजर तुम्हांस करवीन." याप्रमाणें बोलणें होऊन कांहींएक दिवसांनीं बादशाहाजादी शांत होते समयीं बादशहाचें वचन तिनें घेतलें कीं, याजला स्थापित करून मग दिल्लीस जावें. असें वचन घेऊन बाद-शाहाजादी शांत झाली.

यानवर तीन वर्षांनीं सरदेशमुखीच्या सनदा व वस्त्रें शाहूस दिलीं. फौज देऊन रवाना करावें तों अकस्मात बादशहाचें देहावसान शके १६२८ व्ययनाम संवत्सरीं न-गरास झालें. पातशहाजादे नवळ होते. ते दिल्लीवर स्वार होऊन चालले. हे पंजाबांत बाहदुरशहा अलमगीर दक्षिणेंत आल्यावर, गेले होते. ते तिकडून दिल्लीस येतात हें ऐकून, मोजमशा पातशहाजादा याजपाशीं वजीर झुल्फिकारखान होता. त्याचे व बादशहाजादीचे पूर्वीचे संकेत ठरले होते कीं, शाहूराजे यांजला दक्षिणेंत आपला म्हणवून स्थापित करावा. त्या अन्वयें यवन बादशहाजादाशीं वजीरानें अर्ज केला जे, "आप-

---

( मागील पृ० वरून )
ते बोलले कीं मी जिवंत आहें असें म्ह-टल्यावरून लोकांनीं माती दगड युक्तीनें काढून आंतून बाहेर काढिले ते खैर होऊन निघाले पुनर्जन्म झाला." राजारामाचें चरित्र पृष्ठ ४५।४६ पहा.

९९ सातारा किल्ला कसा घेतला या गोष्टीचें वर्णन 'थोरले राजाराम यांचे चरित्रांत ३६-३७पृष्ठीं आहे या कि-ल्याचें नाव 'अजिमतारा' असें औरंग-जेबानें ठेविलें

१०० हा परळीचा किल्ला. यासच 'सज्जनगड' असें म्हणतात थोरले रा-जाराम याच्या चरित्राचीं ३७-३८पृष्ठें पहा

१. परशुराम त्रिंबक-हा किन्हईचा कुळकर्णी हा रामचंद्रपंत अमात्य याजपाशीं कारकून होता. हा स्वपराक्रमानें वाढला. राजारामाची बायको ताराबाई हिनें परशुराम पंतांस प्रतिनिधि पदाची वस्त्रे दिलीं.

२ इ० स० १७०७, फेब्रुवारी ता० २१ रोजीं औरंगजेब मरण पावला.

३. शाहाजादा बहादूरशहा हा पंजाबांत होता व अझमशहा हा दक्षिणेंत होता 'थोरले शाहू महाराज यांचें चरित्र' पृ० ६ टीप २७ पहा. शाहजादा मोअज्जिम यानें बहादूरशहा असें नाव धारण केलें होतें

त्यास पुढें दिल्लीस कारण असे, आणि इकडे समदान खालीं टाकणें सल्ला नाहीं. शाहू याजला पूर्वी अलमगीर पातशहा कृपावंत होऊन इकडेस स्थापित करण्या विषयीं सनदा व वस्त्रें दिलींच होतीं तेच आपण आपलेसे करून ठेवावे." या-जवरून शाहू याजला खिलत व सरदेशमुखीच्या सनदा दक्षिणेंत चौथें घेण्या विषयीं दिल्या, त्या कायम करून देऊन सातान्यास फौज देऊन रवाना केले ते पांच सात हजार फौजेनिशीं आपले मुलुखांत खानदेशच्या मार्गे चालले, हें परसोजी भोंसले यांजला समजलें, यावरून हेही आपल्या जमावानिशीं जाऊन महाराजांस अनुकूळ जहाले. दरकुच महाराज राजश्री सातान्यास चालले, ते गंगातीरास आले. मुक्काम केला; हें वर्तमान मातोश्री ताराबाई आई साहेब व परशुरामपंत प्रतिनिधि यांस कळल्यावरून तोतिया आहे म्हणून ठरविलें. नर खरा असला तरी लबाड होय, असे मनुष्य योजून पाठवावे, यानकरितां, खंडे-राव बल्लाळ चिटणविस ठीक आहेत. आमचे स्नेही आणि राजांनीं यांचे वडील मारले त्याचा सूड हे घेतील हें आपले मनांतील म्हणून, बरोबर पांचशे लोक देऊन रवाना केले. यांसि व राजाशीं भेटी झाल्या. राजा रांगडी बोली व हिंदु-स्थानी चाल अशी वर्तणूक तेव्हां खरा खोटा कशावरून ओळखावा. तव के-सरकरें खिजमतगाराचा नाईक, याजला ओळखिलें. आणीक ही खिजमतगार बरोबर होते ते ओळखीचे पाहून चौकशी केली. केसरकरांनीं वर्तमान सांगितलें. बहुत दिवस कैदेंत, संबध अष्टोप्रहर हिंदुस्थानी लोकांपाशीं, तेव्हां सहज बोल-ण्यास व चालीस फेर. वरकड विचार पाहतांना प्रत्यक्ष शिर्क्यांची कन्या यांस दिली, ते शिर्के इकडचे आहेत, ते पक्केपणें ध्यानास आणून राजा खरा जाहला. चिटणविसांनीं आईसाहेबांस पत्र लिहिलें व परशुरामपंतास व तसेंच अष्टप्रधानास व जाधवरांव आदिकरून सर्वत्रास पत्रें लिहिलीं जे, राजा खरा आहे असें झालें. राजाची कृपा खंडेरावें बल्लाळ चिटणवीस याजवर फारच झाली.

मग परशुराम पंतास संकट झालें. फौजेवर हुकूम करावा तरि फौज कोणी जाईना. राजा खरा असल्यास वाईट. चिटणविसांनीं खरा केला तेव्हां खराच आहे यामुळें

---

४. थोरले शाहू महाराज यांचें चरित्र पृष्ठ ७ पहा

५ मालाच्या एकंदर वसुलाचा चतुर्थांश

६. परसोजीपाशीं १५००० फौज होती. थो० शा० च० पृ० १० पहा.

७. गोदावरी

८ राजारामाची वडील बायको. हिचें लग्नांतील नाव 'सीताबाई' होतें तथापि ही माहेरच्या 'ताराऊ' या नावानेंच प्रसिद्ध आहे.

९ 'थो० शा० च०' पृ० ११ पहा

१० समाजी राजे.

११. जोत्याजी केसरकर

१२. धनाजी जाधवराव, हा ताराबाईचा सेनापति याच्या धाकाविषयीं एक आख्यायिका प्रसिद्ध आहे

१३. 'थोरले शाहू महाराज यांचें चरित्र' पृष्ठें १–१६ पहा

सरकारचे सरदार कोणी अघाडी घेईनात. तेव्हां पुढें हा तोतिया खरा कसा होय. यांसि माणूस चांगले पाठविलें पाहिजे. सारे फदांत मिळाले. आई साहेबांस विनतीं पंतांनीं केली याजवरून आज्ञा दिली कीं, हिंगणीकर भोंसले बापुजीबुवा हे पहिले पासून वडिलोपार्जित इतबारी प्रबुद्ध आपले जवळ आहेत याजला पाठवावे. शिवाजी महाराजांसमागमें कामाकाजास आलेले हे खरे म्हणतील तर राजा खरा. यांजला पाठवावें. म्हणजे आपले भावांस सूचना करतील, असे होऊन त्याजबरोबर हजार बाराशे लोक देऊन रवाना करण्याचा निश्चय झाला, आणि आई साहेबानीं समक्ष बोलावून आज्ञा केली जे "तुम्ही वडिलापासून [ आ-हा ] तुमचे वडील पूर्वापार सेवा करीत, विश्वासुक प्रबुद्ध याजकरितां पाठवितों. तोतिया मनुष्य पाहून यावें म्हणजे सर्वांची खातरजमा होईल. मग पारपत्य केलें जाईल. तुम्ही आपले कुळास बट्टा लाऊ नये, रागडा कोण आहे, चिट-णविसांनीं शाहू केला आहे याजवरून जाणें. तुम्ही सांगाल तसेंच होईल" असे सागून हजार लोक बरोबर देऊन रवानगी केली. भेटी झाल्या. राजा रागडा, [ ह्याविषयीं ] ठिकाण नाहीं. अदेशांत पडले. चिटणविसांनीं एकांतीं नेऊन केसरकर खिजमतगारांचा नाईक, याचें बोलणें सांगितलें. हेही बोलले कीं, तुम्ही या प्रसंगीं अनुकूल झाल्यास तुमचा सन्मान होऊन पद मातबर देण्यात येईल. प्रसग हाच आहे एका ताटांत जेवावें व तुमचे बधु परसोजी भोंसले याची भेट घ्यावी. याजवरून उभयता बधु भेटून विचार केला आणि सर्वां देखत उभयतांनीं ताटात जेवले" हे सर्वत्रानीं पाहिलें. तेव्हा राजा खरा झाला. तोतया नाहीं. याजवरून धनाजी जाधवराव यांजकडून बाळाजी विश्वनाथ पहावयाकरितां आले. राजाशीं भेटून चिटणवीस खंडेराव बल्लाळ होते त्यांणीं बाळाजी विश्वनाथ यास सांगितलें कीं, "तुम्ही अनमान कोणताही एक करूं नये. जाध-वराव याजला फौजेसुद्धां आणावें व तुम्ही आपले पतकासहित येऊन महाराजास अनुकूळ झाल्यास तुमचे जातीस पद मातबरीचें सेनापतीचे बरोबरीचें देण्यांत येईल. परशुरामपंत आजवर दौलत आपण करीत आले, तशीच करावी यास्तव हे खोटे म्हणताल याजकरिता तुम्ही त्याचे म्हणण्यावर न जावें. हिंगणीकर भोंसले उभयता बधु याचे ताटांत जेवले तेव्हा खोटे कसें म्हणाल? जाधवराव सेनापति हेही सोयरेच आहेत. आता पक्ष तुम्ही घ्यावे" यानवरून बाळाजी विश्व-नाथ जाऊन धनाजी जाधवराव यांजला फौजेसुद्धां घेऊन आले. भेटी झाल्या.

तेथून पुढे दरकूच जाऊन सातान्यास लागलेच गेले. शनवारचे दिवशीं

१. परसोजीस
१५ ही गोष्ट शाहूच चरित्रात आढ-ळत नाहीं

प्रातःकाळीं राजा शाहू व धनाजी जाधवराव हे महाराजांचे मामा एकत्र बसले होते तव यांना बोलिला कीं, "आजचे आठवे दिवशीं याच वेळेस किल्ला घेऊं." हें ऐकून जाधवराव हंसले. पातशाहा अलमगीर अवरंगजेब बहुत दिवस खटपट करित असतां साध्य झाला नाहीं. तोच परशुराम पंत आहे. कसा किल्ला साध्य होईल? याजवर महाराजांनीं हास्यवदन जाधवराव यांचे पाहून, उत्तर केले कीं, "मामा साहेब आजचे आठवे दिवशीं किल्ला या वेळेस आला हे जाणावें." उगीच राहिले. दुसरे दिवशीं वाईकर शेखमिरा किल्लेदार वगैरे किल्लयावरचे माणसाचीं मुलें लेकरें होतीं, बातमी लागताच धरून तेथून आणिलीं, आणि किल्लयाखालीं उभीं करून मोर्चास पुढें देतो असा एकच हाहाकार केला. हें पाहून शेखमिराभाई परशुरामपंताशीं बोलले, जे, "मुलें माणसांची ही गति तेव्हा जिंदगी कशास करावी? आम्हांस निरोप द्यावा." याजवरून पंत बोलले जे, "दुसरें लग्न करावें, रुपये देतों." अशीं नाना प्रकारें बोलणीं झालीं. शेखमिरांनीं तेव्हां त्यां सारखेंच बोलून कबूल केलें, तेव्हां पंतास भरवसा वाटला कीं, हे माझे झाले. तों आठवे दिवशीं शनवारीं प्रातःकाळींच शेखमिरा जाऊन बोलले कीं, काहीं बोलावयाचें आहे. तेव्हां खलबतास जाऊन तेथें शेखमिरांनीं आपली शिवबंदी बोलाऊन पंतांस गफलतीनें? आणि किल्लयावर दरवाज्याजवळ पटका फिरविला. तों सहा घटका दिवस आला. राजांनीं लष्करांतून पाहिले तेच वेळीं पांच हजार फौज तयार होती, त्या फौजेनिशीं जौतीनें किल्लयावर गेले. शेखमिरा दरवाज्यात होता, त्यांचा हात धरून बोलले जे, "तुम्ही आमचे भाऊ आहांत ब्राह्मण फंदी, त्याचा अन्याय तुम्हाकडेस काय आहे. आमचे तुम्ही आहांत." असें म्हणून सर्वत्र मंडळी सुद्धा किल्लयांत आले. तों पहिला प्रहर दिवस आला. फत्तेची नौबत तेथेंच वाजविली. त्या दिवसापासून मराठे यांचे राज्यांत शनवारची नौबत वाजत आहे. व नजरा होऊन सारे आपआपले स्थळास गेले.

नतर महाराज राजेश्री क्रोधयुक्त होऊन परशुरामपंतास बोलाऊन नीवें मारण्याचा हुकूम दिला. हें वर्तमान खंडेराव बल्लाळ चिटणविसास समजलें तेव्हा स्नान करीत असतां तसेच राजेश्रींकडे जाऊन विनती केली कीं, परशरामपंत होता म्हणून किल्ला भांडविला. आलमगीरास साध्य झाला नाहीं, व याचा पुत्र श्रीपतराव फौजेनिशीं हैद्रा-

१६. प्रतिनिधीस गफलतीने धरल्याची गोष्ट शाहूच्या चरित्रांत नाहीं

१७. 'थोरले शाहू महाराज यांचें चरित्रांत हें प्रकरण सविस्तर आहे

बादेस मोहिमेस आहे, यानवर कृपा करावी. सक्त रदबदली पाहून वांच-विले. नंतर चिटणवीस घरास जाऊन स्नान संध्या भोजन करून, दरबारास गेले. बोलणीं बहुतां प्रकारें राजेश्रीशीं झालीं. दुसरे दिवशीं मातोश्री आई साहेबांच्या भेटी झाल्या. राज्याचा बंदोबस्त करूं लागले. तेव्हां पासून सातारा येथील वस्ती होऊन किल्याखालीं मातबर शहर बसविलें. तेथेंच राजधानी झाली. राजकारणी बंदोबस्त करण्यास आरंभ केला. शके १६२९ सर्वजितनाम संवत्सरे माघ शुद्ध पक्षीं सातारेस येऊन राज्याभिषेक सिंहासन करून समारंभ विधि पूर्वक केला. पट्टाभिषेक जाहला.

नतर खंडेराव बल्लाळ चिटणवीस यांनीं विनंती केली कीं, "बाळाजी विश्वनाथ व परसोजी भोंसले या उभयतास सरफराज करावे" या उभयतांचे लक्ष सरकाराकडेस हें जाणून, व चाकरीही तशीच केली याजवरून धनाजी जाधव सेनापति यांजकडून बाळाजी विश्वनाथ यानला मागून घेतलें असतां, कोंकणांत समुद्रतीरीं आंग्रे नांवाचे सरदार हापसाणाचे बंदोबस्तास पेशनी होते त्यांचें लक्ष आई साहेबाकडेस फार असून जागजागीं पुंडावे करावे. यास्तव जुने पेशवे पिंगळे यांजला त्याची मोहीम सांगितली. त्यानवर गेले. आंग्रे यांणीं लढून याजला धरून अटकेंत ठेविले. तेव्हां पिंगळे याजवर मर्जी गेली. एक तो अपयशी दुसरें राजश्री आले ते समयीं गैरहजर होते, याजमुळे अनास्था होती. सबब पिंगळ्याची पेशवाई काढून बाळाजी विश्वनाथ यांजला देऊन

---

१८ या समयीं प्रतिनिधीचा जीव वाचविला, हा चिटणिसांचा उपकार प्रतिनिधीचें घर भवानरावाचे कारकीर्दीपर्यंत स्मरत होतें चिटणिसास मांजगाव इनाम दिला व श्राद्धाचे दिवशीं चिटणिसांकडील एक खासा नेऊन त्यास श्राद्धाचे ब्राह्मणाबरोबरच भोजनास बसवीत असत. हा क्रम बरेच दिवस चालला होता असा लेख आहे परंतु विद्यमान काळीं हा प्रकार चालू नाहीं असें खाजगी पत्रावरून समजतें. परशुरामपंताच्या बचावाविषयीं मल्हाररामरावकृत शाहू महाराजांचे चरित्र पृष्ठ २५—२६ पहा.

१९ परसोजी विषयीं मल्हाररामरावकृत राजारामाचे चरित्रांत पुढील उल्लेख आहेत

(१) "परसोजी भोंसले यांस सेनासाहेब सुभा दिला. सन्मान सेनापति प्रमाणें, वस्त्रें, जरीपटका दिला" पृष्ठ ३६.

(२) "परसोजी भोंसले बहुत कर्ते मर्द म्हणोन सेनासाहेब सुभा पद देऊन, सन्मान सेनापति प्रमाणें, वस्त्रें, अलंकार, जरीपटका, चौघडा देऊन, गोंडवण, देवगड, चांदे, वराड वगैरे येथें अमल (त्यानीं) बसविला तो सुभा त्यास दिला" पृष्ठ ३८.

२०. कान्होजी आंग्रे ताराबाईच्या वतीनें लढत होता यानें बहिरोपंत पिंगळे पेशवे यास कैद करून साताऱ्यावर चालून येण्याचा घांट घातला होता.

२१ बहिरोपंत पिंगळे. थोरले शाहू महाराज यांचें चरित्र पृष्ठ २९ पहा

२२. पिंगळे व निळो बल्लाळ यांस कान्होजी आंग्रे यानें कैद केलें

याजवर रवानगी केली. आंग्रे यांशीं व बाळाजीपंताशीं पूर्वींचा स्नेहभाव फार होता. त्याजमुळें त्याजकडे निरोप पाठविला कीं, तुमच्या भेटी घडाव्या आणि हा पेशवाई तुमचीच जाणावी, असें स्नेहभावाचे बोलणें ऐकून आंग्रे भेटीस आले. ते समयीं बाळाजीपंत बोलले जे, "तुम्ही राजश्रींशीं भेटावें, तुमचा अधिकार व पद यांचीं वस्त्रें राजश्रीं पासून तुम्हांस देववितों राजाज्ञेंत असावें मातोश्री आई साहेब व राजश्री एकाचे एकच आहेत. एक विचार होईल, यास्तव आपण आपली सफाई करून घ्यावी." आंग्रे यांच्या मनास येऊन किल्ले दिले. ते घेऊन पिंगळे अटकेंत होते ते सोडून आणिले हें वर्तमान समग्र राजश्रींस बाळाजीपंत यांनी लिहिलें. राजश्री संतोषित होऊन सेवेंत असावें, अशीं आज्ञापत्रें पाठविलीं. याजवरून आंग्रे याजला समागमें घेऊन आले. याजवरून राजश्रींस बहुत संतोष झाला. पेशवाई वस्त्रें बहुमान बाळाजी विश्वनाथ याजला दिलीं. आणि परसोजी भोंसले यांजवर कृपावंत पेशजीचे दयेवरून होऊन "सेना साहेब सुभा" असें पद व वस्त्रें बहुमान देऊन पूर्वेकडेस रवाना केले, ते काळीं सनद परसोजी भोंसले सेना साहेब सुभा यांचे नावें शके १६२९ सालीं अखेरः—

१. प्रांत रितपूर व सरकार गाविल प्रांत वराड प्रांत देवगड, चांदगोंडवण.

१. आनागोंदी वगैरे वराड प्रांतीचे माहाल बितपशील.

| | | |
|---|---|---|
| १. | सरकार गाविल माहाल | ४६. |
| १. | सरकार नरनाला माहाल | ३७. |
| १. | सरकार माहूर माहाल | १९. |
| १. | ,, खडले माहाल | २१. |
| १. | ,, पवनार ,, | ५. |
| १. | ,, कळब ,, | १९. |
| ६ | | १४७ |

एकूण सहा सरकार दर शेंकडा नऊ रुपये आका आणे मोकाशाचे आकारास असे.

२

२३. शाहू महाराज यास.

२४ या गोष्टींचें सविस्तर वर्णन शाहूच्या चरित्रांत आहे पृ० २८—३१ पहा.

२५ शके १६३५ सन १७११—१२ यांत बाळाजीस 'पेशवे' पद मिळालें.

२६. परसोजीची ही हकीकत शाहूच्या चरित्रात नाहीं तरी पुढील उल्लेख आहे — "तसेच भोंसले सेनासाहेब सुभा याजकडे वराड, गोंडवण, कटक, व हिंदुस्थान पैकीं कांहीं महाल, ऐसा सुभा नेमून दिला. त्याची नेमणूक वगैरे त्याचप्रमाणें बदोबस्त जाबते करून दरकदार हुजूरचे सर्वांस नेमून दिल्हे" पृष्ठ १७ पहा

सदर्हू प्रमाणें सनद एक करून देऊन रवाना केलें ते फौजेसहित गंगे पलीकडेस मृत्यु पावले.

समागमें पुत्र कान्होजी भोंसले होते त्यांनीं तसाच फौजेस ग्रह घालून गंगथडीस घासदाणा वगैरे खडण्या घेत वऱ्हाडांत आले. आज्ञेप्रमाणें बरोबर बंदोबस्त राखून रितपूर वगैरे प्रांत वऱ्हाड येथें ठाणें बसविलें. नंतर गांव दारव्हे येथेंही अमल करूं लागले. हें वर्तमान राजेश्रींस साताऱ्यास कळून बहुत संतोष झाला.

तव तिकडेस बाळाजीपंत राजश्रींचे जवळ होते, तों दिल्लीस शाहजादा अझाम व मोइझीम बाहदूरशा यांशीं लढाई होऊन बाहदूरशा फत्ते पावले. अझिमशाहा शिकस्त होऊन ठार झाले. नंतर पुन्हा एक पातशाहाचा खिसा आपसांत होऊन फरोकाशिर शाहाजादे झाल. बंगाल्यांत पटण्याचा मुलुख यांचेकडे होता. कारभारी फरोकशिराजवळ सैय्यद होते; त्यानीं शाहाजाद्यास फौज देऊन जमा करून दिली. दिल्ली तक्तनशीन बादशाहा फरूकशीर झाले. कारभारी वजीर सय्यद झाले; यांनीं जुने कारभारी वजीर अमीर व मुलखी सुभेदार हे सारे स्थापित आपले केले. बादशाहा पुरातन काढले. त्यांत दक्षिणेंत दाऊदखान पन्हीं पन्नास साठ हजार फौजेनिशीं जबरदस्त होते. याजवर सय्यद जातीनें हुसेन अल्लीखा व हुसनरंजाखानाचा पुत्र आलमआल्लीखां असे मिळून फौज घेऊन आले. तव दाउदखानाकडेस बादशाहाचें लक्ष आतून कीं,

---

२७ परसोजी शके १६३२ साली म्हणजे सन १११० फसली साली मरण पावला असें १ ले लेखावरून समजतें या शकामध्यें कांहीं भानगड दिसते

२८ औरंगजेब यास मोअज्जीम, अजीम आणि कामबक्ष असे तीन पुत्र होते मोअझीम आणि अझीम यांची मोठी निकराची लढाइ आग्र्याच्या दक्षिणेस झाली, तींत अझीम यास व त्याच्या दोन मुलास मारलें आणि मोअझीम बहादुरशाहा हा किताब घेऊन गादीवर बसला

२९ बाहादूरशाहा सन १७१२ मध्यें मरण पावल्यावर त्याचा मुलगा जहांदर गादीवर बसला. फरूकशीर हा जहांदराचा पुतण्या

३० सय्यद हुसेन अल्ली आणि सय्यद अबदुल्ला हे मोठे पराक्रमी भाऊ होते. हे दोघे बंधु फरूकशिराचे पुरस्कर्ते होते. या दोघाभावांपैकीं वडील हुसेनअल्ली हा बहादरचा सुभेदार व धाकटा अबदुल्ला हा प्रयागचा सुभेदार होता याच्या सहाय्यानें फरूकशीर यानें-आग्र्याजवळ पराभव केला व सन १७१२ मध्यें सिंहासनाधिरूढ झाला.

३१. धाकटा सय्यद वजीर झाला, व वडील सय्यद सेनापति झाला

३२ जहांदरशाहा.

३३. दाऊतखान पन्हीं—हा दक्षिणचा सुभेदार झुलफिकारखाना याचा मुतालिक होता. हा दक्षिणेंत असे परंतु त्या समयीं याची नेमणूक गुजराथेचे सरसुभ्यावर झाली होती. हा हुसेनअल्लीशीं लढत असतां गोळी लागून मरण पावला

३४ हा सय्यदाचा हस्तक.

उभारे उभा फीर मैंदा द्विविदा । रणा माजि जाशी कुठे रे अंगदा ॥ ६० ॥
बहू विक्रमें पाडिलें राक्षसाशी । रणीं ऊसनें शीघ्र घेतों तुम्हांशीं ॥
क्षणीं तेचि कोदंडें घेऊनि हातीं । कपी मैंद तो भेदिला बाण घातीं ॥ ६१ ॥
नवा बाण-घातीं कपी भग्न केला । रणामाजि तो प्रेत होऊनि ठेला ॥
द्विविदासि दाही शेरीं तेचि काळीं । विरें राक्षसें पाडिलें बाण-जाळीं ॥ ६२ ॥
पुढें पाहता देखिलें अंगदाला । कपी वीर तो वृक्ष घेऊनि आला ॥
बळें हाणितां खीळिले हस्त बाणीं । चळेना कपी वीर तो वज्रठाणी ॥ ६३ ॥
उभा राहिला बाण झेलीत कैसा । कुंठारा तळीं छेदिजे वृक्ष जैसा ॥
तया अंगदा शीघ्र प्राणांत आलें । रघूनायका वानरीं जाणवीलें ॥ ६४ ॥
मुखें बोलती अंगदू वीर गेला । कपीनाथ सुग्रीव तैसा उडाला ॥
रथारूढ होऊनि कोदंडें हातें । बळें मोडिलें तोडिलें kवृक्ष घातें ॥ ६५ ॥
रणीं कुंभ तो मल्ल-युद्धासि आला । बळें ताडिता जाहला सुग्रिवाला ॥
तया सुग्रिवें दीधली वज्र-मुष्टी । रणीं पाडिला कुंभ तो प्रेत सृष्टी ॥ ६६ ॥
महा वीर तो धाडिला मृत्यु-पंथें । निकुंभें रणीं हाकिलें सुग्रिवातें ॥
कपीनाथ सुग्रीव घालूनि मागें । पुढें धावला मारुती लागवेगें ॥ ६७ ॥
तया राक्षसें भेदिलें मारुताला । कपीवीर किंचीत मूर्छीत जाला ॥
पुढें ऊठला तो कपी काळ जैसा । मना माजि आवेश अद्भूत तैसा ॥ ६८ ॥
महा पर्वतू घेतला मारुतानें । निकुंभावरी टाकिला घोर त्राणें ॥
गिरी टाकितां शांति जाली तयाची । फळी फूटली सर्वही राक्षसांची ॥ ६९ ॥
त्रिकूटाचळा माजि घायाळ गेले । रिपू प्राण घेऊनि तैसे पळाले ।
भयातूर ते सांगती रावणाला । बळी तो विरेंवीर सर्वे निमाला ॥ ७० ॥
बहू दुःख जालें तया रावणाशी । पुढें धाडिलें शीघ्र तीघां सुतांशी ॥
विशालाक्ष मकराक्ष आणि खरातें । रणा पाठवीलें तिघां कूमरांतें ॥ ७१ ॥
तिघे ही दळेशीं बळें सिद्ध जाले । असंभाव्य ते भार मागें मिळाले ॥
महा विक्रमें झेलिती वीर खेगें । समारंगणीं पावले लागवेगें ॥ ७२ ॥
बडगे लोहो मूसळें शूळपाणी । कटाऱ्या सुऱ्या तोमरें[६७] चापपाणी ॥
बहू खेटकें मुद्गलें आणि भाले । महा वीर राक्षेस युद्धा निघाले ॥ ७३ ॥

५८. कोदंड=तिरकमठा. ५९. शर=बाण. ६० वज्रठाण=दृढासन. ६१. कुठार=कुऱ्हाड. ६२. कोदंड=तिरकमठा k राक्षसानें ६३ मल्लयुद्ध=कुस्ती ६४. त्राण=जोर. ६५. खर्ग=तरवार. ६६. शूळपाणी=त्रिशूळ आहे हातीं ज्याच्या असा ६७ तोमर=एक प्रकारचें शस्त्र ६८ चापपाणी=तिरकमठा आहे हातीं ज्याच्या असा ६९. खेटक=ढाल

कपी-वाहिनीचा असंभाव्य धावा । प्रतापें बळें शीघ्र केला उठावा ॥
शिळा शीखरें हाणिती राक्षसांतें । रिपू मारिती वानरां बाण-घातें ॥ ७४ ॥
महा युद्ध आरंभिलें एकमेकां । तया भीडतां तो धरी काळ शंका ॥
रणीं राक्षसां पाडिलें घोर मारें । कपी वीर ते गर्जती भूभुकारें ॥ ७५ ॥
रणा माजि मकाक्ष तो शीघ्र कोपे । पुढें चालिला चापपाणी प्रतापें ॥
स्वयें आपुलें सैन्य घालूनि मागें । कपी भेदिता जाहला लागवेगें ॥ ७६ ॥
बळें सोडिलीं राक्षसें बाण-जाळें । तुटों लागती वानराचीं शिसाळें ।
पटाटां रणीं तूटती पादपाणी । शरीरें बहूसाल विक्राळ वाणी ॥ ७७ ॥
देहे खोचले थोर महा विरांचे । झरे लागले वाहती शोणितांचे ॥
रिपू झुंझतां राक्षसें भग्न केले । कितीएक ते भार मागें पळाले ॥ ७८ ॥
बळें धांवती बाण ते लागवेगें । पळाले बळाचे कपी सर्व मागें ॥
कपींचीं दळें भंगिलीं राक्षसानें । तया मस्तकू तूकिला राघवानें ॥ ७९ ॥
रणीं मांडिला थोर कल्पांत सृष्टी । बहुनां विरीं देखिली त्यासि दृष्टी ॥
रणामाजि कोणास ही राहवेना । करी घोर संधान तें साहवेना ॥ ८० ॥
म्हणे राम हो कोण सामर्थ्य याचें । रणीं भंगिलें सैन्य गोळांगुळाचें ॥
वरी अंतराळीं बहू बाण-जाळें । क्षणा माजि तें तोडिलें शीघ्र काळें ॥ ८१ ॥
उभा राहिला राम वज्रांग ठाणें । गुणीं लाविलें चाप चंद्रार्द्ध बाणें ॥
टणत्कारिलें सीत बोटीं थरारी । महाचंड ब्रह्मांड घोषें गरारी ॥ ८२ ॥
बळें राक्षसें व्योम संपूर्ण केलें । रणीं राघवें m शीघ्र छेदूनि नेलें ॥
पुढें घेतला दूसरा बाण रामें । गुणीं लाविला थोर शत्रू विरामें ॥ ८३ ॥
विरें मागुतें थोर संधान केलें । रिपूचें रणीं शीर छेदूनि नेलें ॥
महा वीर मकाक्ष तो बाण-घातें । निमाला रणीं चालिला मृत्यु-पंथें ॥ ८४ ॥
पुढें राम पाचारिला त्या खरानें । विशालाक्ष ऊठावला थोर त्राणें ॥
म्हणे राज-पुत्रा बरें युद्ध केलें । रणीं विक्रमें शीर छेदूनि नेलें ॥ ८५ ॥
असे सर्वदा तो जयो प्राप्त कैंचा । करी ग्रास राहू रवी मंडळाचा ॥
प्रती उत्तरें बोलिला राम वाणी । बळें n बूजिलें भूमि आकाश बाणीं ॥ ८६ ॥
तिहीं राक्षसीं घोर संधान केलें । विरा वाटलें थोर कल्पांत जालें ॥
पुढें तोडिले सर्व ही बाण रामें । प्रतापें रणामाजि त्या पूर्ण-कामें ॥ ८७ ॥
प्रतापें रणीं राघवें बाण-घातें । रिपू दोघ हि धाडिले मृत्यु पंथें ॥

७०. शिसाळें=डोकीं. ७१. शोणित=रक्त. ७२. तूकिला=डोलविला. ७३. गोळांगुळ=वानर l ने घोर ७४ सीत=तिरकमठयाची दोरी m सर्व n बुजती सब आकाश-बाणी

रणीं राक्षसा घोर संहार जाला । समाचार गेला तया रावणाला ॥ ८८ ॥
पुढें रावणानें बहू दुःख केलें । नसे अंतरीं सौख्य टाकून गेलें ॥
दशग्रीव बोले विरा इंद्रजीता । प्रतापें रणा माजि तूं जाय आतां ॥ ८९ ॥
रिसां वानरांची असंभाव्य सेना । तुजे वेगळी सर्व संहारवेना ॥
उभा राहिला शीघ्र ऊदीत जाला । म्हणे० शीघ्र संहारितों वैरियांला ॥ ९० ॥
दळें चालिलीं राक्षसांची अचाट । पुढें वानिती भाट वेताळ थाट ॥
बळी *रावणी तो रथारूढ जाला । बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाला ९१ ॥
रणा माजि येवोनियां होम केला । महा भीम कृत्या रथ प्राप्त जाला ॥
रथारूढ होऊनि वेगीं उडाला । नभोमंडळा माजि तो गुप्त जाला ॥ ९२ ॥
असंभाव्य तीं मोकलीं बाण-जाळें । बळें धांवती प्रेरिले दूत काळें ॥
कपींचीं तुटों लागलीं कंठ-नाळें । रणीं लोटती वीर प्रेतें सुकाळें ॥ ९३ ॥
असंभाव्य सामर्थ्य त्या रावणीचें । कळेना कळा कोण कापट्य याचें ॥
कदा नेणती बापुडे देव कांहीं । रणीं पाडितो वीर सन्मूख नाहीं ॥ ९४ ॥
बहू खोचली ते असंभाव्य सेना । दिशा दाटल्या बाण-जाळीं दिसेना ॥
कपी-वाहिनी माजि आकांत जाला । पुढें मारुतीचा पिता शीघ्र आला ॥ ९५ ॥
निरूपी अती आदरें राघवाशीं । म्हणे अंगिराअस्त्र योजीं त्वरेशीं ॥
पुढें राम तात्काळ तें अस्त्र घाली । तेणें तूटलें शीर कृत्या निमाली ॥ ९६ ॥
पुढें रावणी भूतळा माजि आला । रणामंडळीं मृत्यु जैसा उदेला ॥
भयासूर तो वीर घोर प्रतापी । शरा सोडिता जाहला काळ-रूपी ॥ ९७ ॥
समस्तीं अकस्मात तो देखियेला । तया एक वेळा बहू मार केला ॥
कपी वीर ऊठावले शीघ्र काळें । शिळा शीखरें टाकिती बाण-जाळें ॥ ९८ ॥
रणीं रावणी येकला वीर जेठी । कपी लोटले लक्ष कोट्यानुकोटी ॥
रिसीं वानरीं थोर कल्लोळ केला । बळें ताडितें जाहलें राक्षसाला ॥ ९९ ॥
बळें फेंकिला शूळ त्या मारुतानें । गदा घेतली शीघ्र बीभीषणानें ॥
परीघांशीं घेऊनियां शीघ्र धांवे । कुमूदू करी वेग नेटें उठावे ॥ १०० ॥
कपी-ऋषभा थोर आवेश आला । शीतघ्नीस घेऊनि सन्मुख जाला ॥
द्विवीदें बळें सोडिलें चक्र कैसें । महा पर्वतीं चालिलें वज्र जैसें ॥ १०१ ॥
सुगधें विरें ताडिला शस्त्र-घातें । गिरी-शृंग तो टाकिला जांबुवंतें ॥
शिळा टाकिली चंड त्या अंगदानें । महा खड्ग तें मोकलीलें नळानें ॥ १०२ ॥

---

० बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाला. ७५ वानिती=वर्णिती. ७६ भाट=स्तुतिपाठक. ७७ वेताळ=भाट * रावणी=इंद्रजित ७८ मोकली=सोडी ७९ परिघ=शस्त्रविशेष ८० ऋषभ=श्रेष्ठ ८१. शतघ्नी=तोफ

बहू गा निळें शेंकिला तो विशाळू । कपी सुग्रिवें टाकिला चंड शैलू ॥
सुमित्रा-सुतें राघवें तेचि काळीं । रिपू रावणी विंधिला बाण-जाळीं ॥ १०३ ॥
बहूतां [p]मधीं एकला इंद्रजीतू । रणीं वोढिला काळ जैसा कृतांतू ॥
बळें वानरांचा बहू मार जाला । रिपू राक्षसें अंतरीं तुच्छ केला ॥ १०४ ॥
बहूतां जणांचा बहू एक मेळा । निमिष्यात तोडूनि नेला खलोळा ॥
पुढें राक्षसें घोर संधान केलें । विरें विक्रमें सर्व [q]सामर्थ्य नेलें ॥ १०५ ॥
रिपूचीं दळें पाडिलीं इंद्रजीतें । रणामाजि [r]आलीं असंभाव्य प्रेतें ॥
रिसें वानरें राम सौमित्र बाणीं । बळें भेदुनि चालिला चापपाणी ॥ १०६ ॥
पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेला । समाचार सांगेल हा रावणाला ॥
महा वैर हें ऐकतां वैर नासे । म्हणे दास निर्वैर सूखें विलासे ॥ १०७ ॥

प्रसंग पांचवा समाप्त.

---

## प्रसंग सहावा.

सभे बैसला राव त्रीकूटवासी । पुढें भेटला इंद्रजीतू तयासी ॥
नमस्कार केला तया रावणाला । म्हणे शत्रुचा सर्व संहार केला ॥ १ ॥
बहू लंकवासी रणीं भग्न केले । कितीएक ते मृत्युपंथें चि गेले ॥
बळें उसणें घेतलें हो तयांचें । प्रभू शोधिले मुख्य त्या वैरियाचे ॥ २ ॥
तया रावणा थोर संतोष जाला । बळें अमृताचे नदी पूर आला ॥
अकस्मात संताप सर्वै उडाला । पुढें बोलता जाहला कूमराला ॥ ३ ॥
म्हणे इंद्रजीता विरा बैस आतां । सुपुत्रा तुवां तोडिली सर्व चिंता ॥
[1]बळी चक्रचूडामणी वीर राजा । [2]असो त्या तुझ्या वज्र कल्याण भूजा ॥ ४ ॥
अगा इंद्रजीता सखे गोत्र बंधू । प्रतापें बळें आगळे वीर [3]सिंधू ॥
निमाले रणीं वैरियांचेनि हातें । बहूसाल वाटे मनीं दुःख मातें ॥ ५ ॥
त्रिकूटाचळीं वानरीं लाग केला । मुळारंभ राक्षस कीती निमाला ॥
पुढें थोर संग्राम दारूण जाला । [4]विरें राक्षसें सर्व ही तो बुडाला ॥ ६ ॥
तया ऊपरी वीर धूम्राक्ष जेठी । [5]तेणें जिंकिले देव तेतीस कोटी ॥
समारंगणीं त्या विरा अंत आला । रणामंडळीं देह त्यागून गेला ॥ ७ ॥
रणीं वज्रदंष्ट्री दिसे यमरूपी । गिरीसारिखा अंकपन्नु प्रतापी ॥
महा वीर ते दोघ युद्धासि गेले । समारंगणीं युद्ध होतां निमाले ॥ ८ ॥

---

p जणीं ८२. कृतांत=यम. q छेदूनि. r जाली. १. बळीचक्रचूडामणी=बळीसमूह-शिरोभूषण २ असो त्या=असाव्या (पाठ) ३ सिंधु=सागर. ४ विरें वीर तो भेतांसिधू बुडाला (पाठ)

बळी दक्ष विपन्न चातुर्य जाणे । तया देखतां अंतरीं सूख बाणे ॥
प्रसंगें चि तो वीर युद्धासि गेला । प्रहस्तू रणीं युद्ध होतां निमाला ॥ ९ ॥
तयाचा बहू क्रोध आम्हांसि आला । रिपू राम जिंकावया वेग केला ॥
तयाचें महा युद्ध तें काय बोलों । समारंगणीं भ्रष्टलों भग्न जालों ॥ १० ॥
तया ऊपरी धीर आम्हां धरेना । पुढें ऊठवीलें बळें कुंभकर्णा ॥
तया सारिखा कोण आहे बळाचा । समारंगणीं धीर काळासि कैंचा ॥ ११ ॥
महा वीर तो घोर युद्धासि गेला । रिसां वानरां थोर संहार केला ॥
रिपूनें तया शेवटीं बाण-घातें । समारंगणीं धाडिला मृत्युपंथें ॥ १२ ॥
प्रतापी सखा बंधु माझा निमाला । बळें आगळा थोर आधार गेला ॥
मला पूसिल्यावीण गंतव्य केलें । नये बोलतां दुःख ब्रह्मांड जालें ॥ १३ ॥
तया ऊपरी चौघ ही सूत माझे । अगा इंद्रजीता सखे बंधु तूझे ॥
तयांच्या प्रतापानळें सूख लोटे । समारंगणीं भीडतां काळ वीटे ॥ १४ ॥
नरा अंतकाला नरा अंतकानें । बळें पीटिलें देवदेवांतकानें ॥
तळीं घातले सर्व त्या त्रीशिरानें । रणीं वानरीं घेतले सर्व प्राणें ॥ १५ ॥
अतीकाय तो वीर मेरू बळाचा । प्रतापें बळें आगळा विक्रमाचा ॥
रथारूढ होऊनि युद्धासि गेला । तयाचा सुमित्रासुतें घात केला ॥ १६ ॥
निमाले सखे दुःख ऊदंड जालें । पुढें पाहतां वीर सामर्थ्य गेलें ॥
महा वीर ते मृत्युपंथें चि जाती । नरें वानरें बापुडीं येश घेती ॥ १७ ॥
निमाले सखे सूत बंधू बळाचे । प्रतापें सुरांहूनि ते विक्रमाचे ॥
रणामंडळीं सर्व सेना निमाली । बहूसाल संहारिली कूळवल्ली ॥ १८ ॥
अगा इंद्रजीता तुवा सूख द्यावें । प्रतापें रणीं सर्व शत्रू बधावे ॥
मला सांगसी लाविले मृत्यु-पंथीं । परी मागुती ते रिपू गर्जताती ॥ १९ ॥
रिपू ऊठती मागुती हें न व्हावें । बळें सर्व निर्मूळ त्यांचें करावें ॥
प्रतापे रणीं सर्व पाडून येसी । परी मागुता जीव येतो तयांसी ॥ २० ॥
बहूवेळ तां युद्ध सामर्थ्य केलें । परी पाहतां सर्व ही व्यर्थ गेले ॥
प्रतापें रणीं पाडिले बाण-घातीं । समारंगणीं मागुते सिद्ध होती ॥ २१ ॥
महीमंडळीं नाम त्याचें नसावें । विरा विक्रमें त्वा मला सौख्य द्यावें ॥
पिता बोलतां धीर पोटीं धरेना । असंभाव्य कोपानळू सांवरेना ॥ २२ ॥
उभा राहिला वाक्य बोले पित्यासीं । म्हणे शीघ्र संहारितों वैरियांसीं ॥
समारंगणा माजि ऐसें न होतां । तरी जाणिजे भेटि ते हे चि आतां ॥ २३ ॥

---

५ युद्ध होतां=घोर मारें (पाठ). ६ बळें आगळा=शुळीहून तो (पाठ). ७ विक्रम=पराक्रम. ८. गर्जताती=ऊठताती (पाठ) * तां=त्वा ° राहिले=मारिसी.

बहू कोपला चालिला वीर जेठी । प्रतापें म्हणे सर्व जाळीन सृष्टी ॥
पुढें बापुडीं वानरें दैन्यवाणी । खिळी तो बळें सर्व ब्रह्मांड वाणीं ॥ २४ ॥
पित्याकारणें वीरभद्रू निघाला । तयां दैत्यजांला धरू सिद्ध झाला ॥
तयाचे परी कोपला काळरूपी । बळें चालिला शक्रशत्रु[10] प्रतापी ॥ २५ ॥
तुरें वाजती नाद गेला भुगोळा । दळेशीं बळें पावला होमशाळा ॥
तया राक्षसें मागुती होम केला । महावीर मेघासनीं गुप्त झाला ॥ २६ ॥
बळें बूजिले सर्व आकाश वाणीं । पडों लागलीं वानरें दैन्य वाणी ॥
कपी-वाहिनी[11] माजि आकांत जाला । पुन्हा मागुता थोर कल्पात आला ॥ २७ ॥
वरी पाहतां युद्ध कर्ता दिसेना । धडाडा पडों लागली सर्व सेना ॥
महावीर ते घोर मार्गे पळाले । पळाले कपी राघवा आड गेले ॥ २८ ॥
म्हणे राम तो सुग्रिवा मारुता हो । नभोमडळी युद्धकर्ता पहा हो ॥
प्रतापें बळें वीर सर्षे उडाले । असभाव्य ते पोकळी माजि गेले ॥ २९ ॥
महा थोर ते युद्धसामर्थ्य गेलें । तया इंद्रजीतें पुढें काय केलें ॥
अकस्मात तो भूतळा माजि आला । रणामंडळीं सैन्यसिंधू मिळाला ॥ ३० ॥
खटाटोपिले ते बहु शस्त्रपाणी । रूपे कर्कशे काळ कर्कोटवाणी ॥
बळें चालिला भार वेष्टीत सेना । रजें मातला व्योम पुढें दिसेना ॥ ३१ ॥
कपी वीर राक्षेस सन्मूख जाले । समारगणा माजि युद्धा निघाले ॥
पुढें राक्षसें रूप केलें सितेचें । महा रम्य लावण्य तें जानकीचें ॥ ३२ ॥
रणीं लोटल्या वीर राक्षेस फौजा । कपीभार ऊठावले स्वामिकाजा ॥
दळीं राक्षसांचे बळी इंद्रजीतू । बळी चालिला काळ जैसा कृतांतू[12] ॥ ३३ ॥
तया देखतां धांवला रुद्र तैसा । करीं घेतला शैल ब्रह्मांड जैसा ॥
बळें इंद्रजीता उजू धाव घाली । तयीं इंद्रजीतें सिता दाखवीली ॥ ३४ ॥
म्हणे रे कपी हे सिता राघवाची । गुणी स्वामिणी हे तुम्हा मर्कटांची ॥
महापापिणी सर्पिणी दुःखदाती त्रिकूटाचळीं राक्षसी कूळहती ॥ ३५ ॥
अशोकावनामाजि हे शोकवल्ली । अकस्मात कोठून निर्माण झाली ॥
तया दीवसापासुनी दुःख झाले । त्रिकूटाचळा थोर दारिद्र्य आलें ॥ ३६ ॥
बळाचे बहू वीर हे पापिणीनें । सखे आमुचे ग्रासिले सर्पिणीनें ॥
कळी[13] माडला त्यास हे मूळ सीता । करीतों इचा शीघ्र सहार आतां ॥ ३७ ॥
तया राक्षसें मारिलें जानकीला ॥ म्हणे रे कपी साग त्या राघवाला ॥
समारंगणीं शीर छेदूनि नेलें । तया राक्षसे शीघ्र गतव्य केलें ॥ ३८ ॥
सिता देखतां मारुती अग घाली । प्रसगीं तिये मूर्छना शीघ्र आली ॥

१० शक्रशत्रु=इंद्रजित ११ वाहिनी=फौज १२. कृतांत=यम, १३ कळी=भांडण.

महाशोक आरंभिला त्या कपीनें । म्हणे काय केलें जगज्जननीनें ॥ ३९ ॥
बहु दुःख मागील तें आठविलें । उदासीन हें चित्त दुश्चीत जालें ॥
म्हणे काय सांगों तया राघवाला । कपी मारुती शोकसिंधू बुडाला ॥ ४० ॥
म्हणे रे कपाळा असें काय केलें । बहू थोर हें पाप माझें उदेलें ॥
न सांगो तरी गोष्टी राहो नये कीं । पुढें सांगतां राघवा दुःख हें कीं ॥ ४१ ॥
प्रवाहो बळें चालिला अश्रुपातीं । विलापें करूं लागला तो रुदती ॥
बळें उठला चालतां चालवेना । रघूनायका भेटला दैन्यवाणा ॥ ४२ ॥
अधोमूख पाहोनि कांहीं वदेना । दुखें दाटला कंठ त्या बोलवेना ॥
म्हणे जानकीसारिखी शस्त्रघातें । रणीं मारिली राक्षसें इंद्रजीतें ॥ ४३ ॥
तयें सांगतां मांडला शोक रामें । मिळालीं दळें दैन्यवाणीं विरामें ॥
कपीवाहिनीमाजि आकांत जाला सुमित्रासुतें राम तो शांत केला ॥ ४४ ॥
भविष्योत्तरें वाल्मिकी सत्य व्हावी । देहेसांगसंपादणी कां करावी ॥
म्हणूनी रघूनायकें शोक केला । तंव वीर बीभीषणू शीघ्र आला ॥ ४५ ॥
म्हणे जी प्रभू शोक वांया करिता । असे सत्य नेमस्त कल्याण सीता ॥
अशोकावना दूत म्यां पाठविले । प्रसंगीं समाचार घेऊनि आले ॥ ४६ ॥
तया इंद्रजीतें रणीं मौव केली । नव्हे सत्य हें मिथ्य होऊनि गेली ॥
पुरी होम आरंभिला मेघनादें । पुरा जालिया कोण घेईल द्वंदें ॥ ४७ ॥
तया इंद्रजीतासी आधीं वधावें । वृथा शोक साडूनियां सिद्ध व्हावें ।
पुरा होम हो जालिया आंवरेना । समारंगणीं मारिता ही मरेना ॥ ४८ ॥
प्रभू जाहली अंत्रिणी व्योमपंथें । वधावा सुमित्रासुताचेनि हातें ॥
तयें सांगतां सर्व आनंद जाला । बहूतांपरी राघवें गौरविला ॥ ४९ ॥
पुढें राघवाची बहू स्तूति केली । विरांची असंभाव्य मादी मिळाली ॥
सभामंडळीं ते कपी रीस राजे । तयामध्यभागीं महावीर साजे ॥ ५० ॥
समस्तांशीं सोडीलसे इंद्र भावी । समर्था तया ऊपमा काय द्यावी ॥
असा राम हा देव ब्रह्मादिकाचा । सुमित्रासुतासी वदे रम्य वाचा ॥ ५१ ॥
म्हणे होम आरंभिला इंद्रजीतें । मुखें बोलिलें सत्य नैर्ऋत्यनाथें ॥
पुरा होम होता कदा आंवरेना । समारंगणीं मारिता ही मरेना ॥ ५२ ॥
प्रतापें समारंगणीं त्या वधावें बळें आजि ब्रह्मादिकां सौख्य द्यावें ॥
पुढें ऊठिला शीघ्र सौमित्र कैसा । नभोमंडळीं तीव्र आदित्य जैसा ॥ ५३ ॥

---

१४ जगज्जननी=जगन्माता=सीता. १५ मौव=कपट. १६ द्वंद=युद्ध. १७. अंत्रिणी=अशरीरिणी=आकाशवाणी. १८. व्योम=आकाश १९. मादी=मेळा. २०. नैर्ऋत्यनाथ=राक्षस ( बिभीषण ) २१ आदित्य=सूर्य

जया देखतां काळ कांपे परारां । सवें दीधले राघवें पचवीरां ॥
हनूमंत बीभिषणू जांबुवंतू । सुगधू कपी ऋषभू वीर्यवंतू ॥ ५४ ॥
महावीर ते पांच ही सिद्ध जाले । कपी रीस आणीक कीती निघाले ॥
सुमित्रासुता लागि राजाधिराजें । मुखें बोलली शक्तिसामर्थ्यबीजें ॥ ५५ ॥
बरू दीधला स्वामिदेवाधिदेवें । म्हणे शत्रु जिंकोनिया शीघ्र यावें ॥
करू मस्तकीं ठेविला रामचंद्रें । नमस्कार तैसा चि केला फणींद्रें ॥ ५६ ॥
समस्तीं विरीं ही नमस्कार केले । पुढें सव्य घालूनि तैसे निघाले ॥
अतीआदरें स्कधभागीं विरानें । सुमित्रासुता घेतलें मारुतीनें ॥ ५७ ॥
निघाले महावीर ते लागवेगें । पिता हिंपुटी मारुती मागमागें ॥
पुढें चालतां पंथ नीकुंबळेचा । विरां थोर आवेश काळासि कैचा ॥ ५८ ॥
महा घोर तो लंघिला मार्ग तींहीं । पुढें पाहतां पाहना वाट नाहीं ॥
तरूचीं बनें लागलीं तीं वितंडें । प्रचंडें उदंडें बहू झाडखंडें ॥ ५९ ॥
१. शके १६८० सैन ११६८. खासा स्वारी निघोन पुण्याचे गणपतीस गेली. भाऊसाहेब पुण्यात आहेत. त्यांनीं सदाशिवपेठेस कौल देऊन नवी वस्ती केली. नाव सदाशिव पेंठ ठेविलें. पुण्यास चिरेबंदी कुसूं घालावयास कारखाना लाविला. शिमग्याचा रंग मोठा केला. श्रीमंत कोंकणातून पर्वतीस आले. भाऊसाहेब भेटीस गेले. भेटी होऊन वाड्यांत आले. रंग सर्वत्रांवर टाकिला. रंगाची चाल वाड्यांत चालू झाली. रघुनाथ बाजीराव हिंदुस्थानांत छावणीस होते ते लाहोर पर्यंत ठाणीं बसवून आश्विनमासीं पुण्यास दाखल जाहले. खंडेराव हत्ती आणिला. या सालीं देकारास पर्वतीवर दरवाज्यास तट बांधून अठरा लक्ष रुपये ब्राह्मणांस देकार दिला. ऐशीहजार ब्राह्मण जाले. कलम.

१. शके १६८१ सैन [६३] ११६९. भाऊसाहेब कारभारी असतां दादासाहेब यांणीं लाहोरपर्यंत मुलूक काबीज केला, परंतु खजिना कांहीं आणिला नाहीं. यामुळें दादाची स्वारी घरीं राहून भाऊसाहेब हिंदुस्थानांत जावयास डेरे दाखल जाले. तेथें मुजाफरजंग, गारदी यांचा सरदार, याणें [ केलेली ] भाऊसाहेबास माराव याची कृति व पुढें हिंदस्थानांत पाणिपतावर भाऊसाहेब बुडाले याचे तपशीलाची कारकीर्द आलाहिदा आहे. पुण्याहून जातांना नगरचा किल्ला घेतल्याची व मोगलाशीं लढाई घेऊन पासष्ट लक्ष रुपयांची जहागीर व दौलताबाद किल्ला घेतला हा सर्व पर्याय सदहू पै ख तीं त आहे. श्रीमंत खासा व रघुनाथ बाजीराव व माधवराव साहेब व नारायणराव व सौभाग्यवती गोपिकाबाई बराबर तोंदुळजेपर्यंत होतीं. पुढें चैत्र शुद्ध १ स शिंदे होळकर याचीं पत्रे आलीं. सबब श्रीमंतांचा निरोप घेऊन, विश्वासराव सुद्धां निघोन हिंदुस्थानात गेले. श्रीमंत पुण्यास आले. पुण्यास चिरेबंदी कुसाचें काम लाविलें. जिवाजीपंत अण्णा खासगीवाले यांजकडील कारखाना चालत होता. भाद्रपदमासीं पाऊस

---

६१ "सु॰ स॰ तिस्सीं खमसैन (म॰ अ॰ ११५० इ॰ स॰ १७५८) दादा साहेब फिरुन देशीं दसरियास आले" दुसरी बखर. वर तर दादा हिंदुस्थानात गेले असें म्हटलें आहे

६२ पेशव्याची बखर, पृ॰ ७१ टी॰ ३० पहा

६३. "सु॰ स॰ सितैन [म॰ अ॰ ११६० इ॰ स॰ १७५९] भाऊ साहेब नगरचा किल्ला घेऊन हिंदुस्थानांत गेले" दुसरी बखर. हिंदुस्थानात पुढील सालीं गेले.

६४. ही हकीगत ह्याच लिहिणारानें लिहिली असल्यास फार तपशीलवार असली पाहिजे पण ही प्राप्त कशी होते? आलीकडे आम्हास एक वर लिहिल्या प्रकारची कैफीयत मिळाली आहे परंतु ही तीच कीं काय हा पक्का निर्णय होत नाहीं हींत मुजफरजंगाचा फितूर वगैरे हकीकत आहे. पुढें पाणिपतचीही आहे. शेवटीं हींतील मजकूर भाऊ साहेबाच्या बखरींतील मजकुरासारखा अक्षरश आहे.

फार झाला. पर्वतीचे ओढ्यास पाणी आलें. श्रीमंतांचे घरीं बाजीराव व चिमाजी आप्पा यांचा पक्ष होता त्याची दक्षणा पर्वतीवर ब्राह्मणांस दिली. त्या वेळेस ओढ्यांत ब्राह्मण बुडाले. कलम.

१. शके १६८२ सनं ११७०. श्रावणमासीं तेरा दिवसांचा पंधरवडा पडला. पौषमासीं पाणिपतावर भाऊसाहेब फौजे सुद्धां बुडाले. खांसा स्वारी पुण्यास होती. चिंचवडचे देव धरणीधर महाराजांस रुप्याचा देव्हारा व हत्ती व खर्चीस मौजे बाणेरें इनाम करून दिलें. महादाजी आबाजी पुरंदरे यांचा काळ कार्तीकमासीं जाहला. खांसा स्वारि भाऊसाहेबाचे मदतीस फौज सुद्धां निघाली. जानोजी भोंसले नागपूरकर बरोबर घेतले. रघुनाथ बाजीराव यास नबाबावर रवाना केलें. खांसा स्वारी व पुत्र माधवराव व नारायणराव व सौभाग्यवती गोपिकाबाई फौजे सुद्धां नगरावरून पैठणास गेले. तेथें देशस्थ सावकार यांची कंन्या नवरी पाहून लग्न मार्गशीर्षमासीं केलें. पुढें दरकूच नर्मदातीरास गेले. तेथें पौषशुद्ध त्रयोदशीस पाणिपतचें वर्तमान ऐकिलें. नतर नर्मदा उत्तर तीरास जाऊन दरकूच खेचीवाड्यांत राघोगड किल्ल्यानजीक दाखल झाले. बरावर भोंसले नागपूरकर व हुजुरात मिळून पस्तीस हजार फौज होती. तेथें वर्तमान ऐकिलें कीं, भाऊ साहेब यांची फत्ते जाहली. दुसऱ्यानें ऐकिलें कीं, विश्वासराव ठार झाले [व] भाऊसाहेब यांचा ठिकाण नाहीं. हें ऐकून खाशांनीं निळकंठ महादेव पुरंदरे यांबरोबर महादजी शितोळे व जगतापवगैरे हुजुरात देऊन कटक किल्ल्यावर पाठविलें. किल्ला कौलास आला. तों आबद अल्ली [?] कडील वकील आला. त्याची भेट घेऊन श्रीमत निघोन बऱ्हाणपुरावर आले. तों नाना पुरंदरे व बाळाजी जनार्दन फडणीस व त्यांची स्त्री व श्रीमंताची स्त्री सौभाग्यवती पार्वतीबाई व लोक तमाम पळ आला तो येऊन भेटला. श्रीमत निघोन वैशाखमासीं पुण्यास आले. पूल बांधावयास काम लाविलें. नित्य पुला-

---

६५. हा आंबीलओढा. "मी गेलों ! रे गेलों !!" असें ओरडत कोकणांतील कांहीं ब्राह्मण एका पाठीमागून एक आंबील ओढ्यांत बुडाले म्हणून एक विनोदपर आख्यायिका आहे ती वरील गोष्टीस अनुलक्षूनच काय ?

६६. सु० स० इहिदे सितैन [म० अ० ११६१ इ० स० १७६०] "पैठणास लग्न करून हिंदुस्थानांत खेचीवाड्यापर्यंत गेले. तेथें पाणिपताचें वर्तमान आलें. दादासाहेब ग ड म ठ क ल [?] पावेतों गेले" दुसरी बखर.

६७. पौष शुद्ध ८ बुधवार.

६८ ब्राह्मण लोकांतील देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे [करहाठे] या तीन जातींचें सर्व प्रकारें ऐक्य व्हावें म्हणून नानासाहेबांनीं तिन्ही जातींच्या ब्राम्हणाच्या मुलींशीं स्वतां लग्न केलें असें ऐकिवात आहे. प्रस्तुत मुलगी वाखरे यांची होती कऱ्हाडे यांची मुलगी केल्याचा दाखला अद्यापि कोठें सांपडत नाहीं

चे कामावर स्वारी जात होती. सेंहा दिवसांत काम तयार झालें. भाऊसाहेबांचे शोधास कागद देऊन जासूद पाठविले होते. विश्वासराव मृत्यु पावले हा शोक मोठा झाला. तेणेंकरून शरीर अस्वस्थ झालें. वाड्यांतच स्वारी होती. रघुनाथ बाजीराव बेदरचे स्वारीहून आले त्यास व माधवराव साहेब, सखाराम भगवंत, निळकंठ महादेव पुरंदरे यांचे परस्परें एकमेकांचे हातांत हात घालून, राज्य राखावें म्हणून आज्ञा सांगून आपण पर्वतीस राहिले. ज्येष्ठ वद्य प्रतिपदेस— कलम.

१. शके १६८३ सन ११७१. खाशे यांणीं राज्याचा बंदोबस्त सांगून पर्वतीस राहिले होते तेथें त्याचा काळ ज्येष्ठ वद्य षष्ठीस झाला. जवळ कृष्णराव पारसनीस व कोन्हेर त्रिंबक होते. गोपिकाबाई व नाटकशाळा पलीकडे खोलींत होत्या. काळ जाहला तेव्हां रघुनाथ बाजीराव जवळ आले त्यांणीं मांडी दिल्ही. माधवराव साहेबही होते. सायंकाळीं सर्वत्र मिळोन लाकडी पुलाजवळ नेऊन सार्थक केलें. अवतार समाप्त झाला.

---

## कारकीर्द माधवराव बल्लाळ.

---

१. शके १६८३ सन ११७१. श्रावणमासीं श्रीमंत व चुलते रघुनाथ बाजीराव कारभारी निळकंठ महादेव पुरंधरे व सखाराम भगवंत फौजेसुद्धां सातान्यास जाऊन रामराजे व ताराऊ साहेब यांचीं वस्त्रें जड जवाहीर शिक्के कटार घेतली. रघुनाथ बाजीराव यास व दरकदार व अष्टप्रधान यास व मुतसद्दी यांस व निळकंठ महादेव यास दिवाणगिरी व हुजूर मुतालकीचीं वस्त्रें दिलीं. निरोप घेऊन पंत प्रधान पुण्यास आले. कार्तिकमासीं नबाब निजाम अल्ली चालून येतात सबब स्वारी निघोन मुकाबल्यास गेली. तो मोगल उरळीवर आला. श्रीमंताचा व नबाबाचा तह होऊन नबाब भागानगरास गेले. श्रीमंत करनाटकांत स्वारीस गेले. महाराज ताराऊ साहेब यांचा काळ झाला*

---

६९ 'साठ' असेंही होईल. पण साष्ठ असेंच असावेंसें वाटतें. हा पूल कोणता? लकडी पूलच काय?

७०. ओंकारेश्वराजवळ ब्राम्हण जातींचे लोक शेवटील संस्कार करतात हा आलीकडचा प्रचार असें यावरून होतें नाना साहेबांची समाधी लकडीपुलाजवळ आहे म्हणून सांगतात

७१ हे पुरंदरे अंबाजीपंताचे नातु व महादाजी पंताचे पुत्र

७२ मुकाबला=सामना, लढाई.

७३ उरळी कांचन, ता० हवेली

*नाना व भाऊ हे निवर्तल्याचें कधीं ऐकेन अशी जी ताराबाईची अत्युत्कट इच्छा ती तृप्त होऊन नंतर बाई परलोकीं गेली!

प्रधान यांजकडील कारकून होते त्यांनीं सार्थक केलें. नारायणराव बल्लाळ यांचा व्रतबंध रघुनाथ बाजीराव यांनीं केला. कलम.

१. शके १६८४ सन ११७२. श्रीमंत रघुनाथ बाजीराव व माधवराव बल्लाळ, व नारायणराव बल्लाळ, कारभारी निळकंठ महादेव, व सखाराम भगवंत पुण्यास असता श्रावणमासचा देकार ब्राम्हणास पर्वतीस जाहला. रघुनाथ बाजीराव याची स्त्री आनंदी बाई [ई]स पुत्र वडगावचे बागेंत वाड्यांत भास्कराव झाले. नंतर भाद्रपदमासीं श्रीमंत निघोन गंगातीरास गेले. बरोबर निळकंठ महादेव व सखाराम भगवंत. पुण्याचे मुक्कामीं पंत प्रधानाजवळ त्रिंबकरावमामा कारभार करूं लागले. हरिपंत फडके, गोपाळराव गोविंद पटवर्धन व बाबुराव नाईक व पिराजी नाईक निंबाळकर व हुजुरात पागा डेरेदाखल जहाले. रघुनाथ बाजीराव यांनीं नबाबाकडील मुरादखान फौजेनिशीं बराबर घेऊन, कारभारीसुद्धां फौज चालून आली. श्रीमंत पंत प्रधान, त्रिंबकरावमामा फौजेसुद्धां चालून गेले. मुकाबला व्हावा तों खासाच्या शरीरीं अस्वस्थ होतें. लढाई झाल्यावर दुतर्फा दौलत सरकारची खराबी होईल हा विचार करून पंत प्रधान जाऊन भेटले. उभयतां एक अंबारींत बसून डेऱ्यांत दाखल झाले. बापजी नाईक व गोपाळराव गोविंद व पिराजी नाईक व हरीपंत फडके निघोन गेले. श्रीमंताचे डेरे [ सभोंवतीं ] रघुनाथ बाजीराव यांचे लोक तीन दिवस बसले. नंतर सखाराम भगवंत व निळकंठ महादेव यांनीं श्रीमंताचे डेऱ्याचे थाटीवर रघुनाथ बाजीराव यांची रुजू करीत जावें ऐसा तह होऊन डेऱ्याजवळ लोक होते ते उठविले. कारभारी व पंतप्रधान याचा कारभार चालला. चिंतो विठ्ठल यांस फडणिसीचें काम सांगितलें होतें. निळकंठ महादेव यास पुरंदर किल्याच्या सनदा देऊन तेरा लक्ष रुपयाचा सरदारीस सरंजाम दिला

३ सु० स० सल्लास [ तिसेन म० अ० ११६३ इ० स० १७६२ ] घोडनदीवर दादा साहेब यांशीं लढाई होऊन उपरांत दादा साहेब सुद्धा मिरज घेऊन भागा नगरास गेले मोंगलांनीं पुणें जाळलें" इ० य०

७५ वडगाव कोणतें ?

७६ दादासाहेब

७७ त्रिंबक विश्वनाथ पेठे-हे सदाशिव राव भाऊचे मातुल भाऊचें प्रेम जसें नाना साहेबाच्या मुलावर होतें तसेंच त्रिंबक रावाचेंही होतें याजकडे पुण्यांतील पागा असून त्या निमित्त गाव व कुरणें हीं बहुत होतीं बहुळ ता० खेड नजीक भीमानदीच्या कांठीं यांचीं कुरणें व जमीनी बऱ्याच असून नदीचे तीरीं उत्तम घाट याचा एक बगला आहे तसेंच वायगाव ता० खेड हें त्यांजकडे जाहगिरीत होतें पुण्यांतील याच्या वाड्यांत हल्लीं बोर्डिंग आहे।

७८ या बद्दल माधवरावाची फार वाखाणणी करितात अल्पवय व हातीं सत्ता असून इतका दूरवर विचार करणारे राजपुरुष आपणांमध्यें फारच विरळा।

व सखाराम भगवंत यांस नऊ लक्ष रुपयांचा सरंजाम दिलें व महिमत राव चिटणीस यास हजार राऊतांची सरदारी सांगून तीन लक्ष रुपयांचा सरंजाम दिला. नबाबाकडील मुरादखान आले होते त्याचा सन्मान करून निरोप दिला. रघुनाथ बाजीराव व पंतप्रधान व कारभारी फौजेसुद्धां सातान्यास गेले व रघुनाथपंत यांचे पुत्र भास्करराव यांच्या नांवे प्रतिनिधींचीं वस्त्रें घेऊन मुतालीक नारो शंकर ठेविले. यामुळें भवानराव प्रतिनिधी मोंगलाकडे गेले व मोरो बाबूराव फडणीस व गोपाळराव गोविंद हेही गेले. नागपूरकर भोंसले मोंगलांस जाऊन भेटले. श्रीमंतांची स्वारी निघोन मिरजेस गेली. मोर्चे बसवून सत्ताविसावे दिवशीं मिरज घेतली. तों मोंगल लाखनवाड्याचा घांट चढून आले, व भोंसलेही उबरीचा घांट चढून येतात, गोपाळराव वगैरे प्रतिनिधी सुद्धां फौजेचे समावानिशीं येतात अशी खबर आली. तेव्हां श्रीमंत कूच करोन मल्हारजी होळकर बरोबर घेऊन गंगा उतरून औरंगाबाजेवरून कासारबारीनें मलकापुरास गेले. तेथील खंडणी साठ हजार रुपये घेतली. तों मोंगल गनीम सुद्धां घांट चढोन औरंगाबादेशीं येऊन पैठणावरून नागतळ्यावर मुक्काम केला. श्रीमंतांचे स्वारीमागें मोंगलानें यावें तों फितुरामुळें मागे न येतां पुण्याकडे आला. श्रीमंतांनीं मागें यावें तरि मुलें लेकरें साभाळावयास फौजेचे लोक जातील, फौज फुटेल, यास्तव पुण्याकडे न येतां उभयता श्रीमंत ऐशीं हजार फौजेनिशीं तोफखाना मागें ठेऊन दरकूच भागानगरास गेले. कलम.

शके १६८५ सॅन ११७३ खासे उभयतां भागानगरीं वैशाखमासीं दाखल जाहले. तेथें शहरास कुसू लगत मुसानदी आहे. यामुळें शहरास हात न लागला. कारवानपुन्यापाशीं एक लक्ष ऐशीं हजार रुपये खंडणी घेऊन कृष्णा व तुंगभद्रा संगमाकडे गेले. पुण्यांत मुतालकीवर नारो आपाजी होते त्याचीं पत्रें आलीं कीं, मोंगल वगैरे पुण्याकडे आले, पुणें पळून गेलें, मातोश्री गोपिकाबाई व नारायणराव साहेब सिंहगडास गेले, रुमाल वगैरे संपत्ती गडास पाठविली. भोंसल्याकडील करांडा वगैरे सरदार फौज घेऊन माची लुटली. पुण्यास आग दिली. सरकार [ वाडा ? ] खंडणी देऊन राखिला. कांहीं घरें शहरचीं जळालीं. कांहीं राहिलीं त्याची याद पाठविली आहे. सिंह-

७९ हिवरें येथें जें एक टोलेजंग शिवालय सखाराम बापूनीं बांधिलें तें याच सुमारास बांधिलें असावें. हल्लीं या देवालयाची झाडलोटही नीट होत नाहीं! देवळाच्या पोंवळीवरून भोंवतालचा देखावा फार रम्य दिसतो. गांवांतून देवळांत जाण्याकरितां मधील ओढ्याला दगडी धरण बांधिलें आहे.

८० "सु० स० अर्बा तिस्सेन [म० अ० ११६२ इ० स० १७६३ ] खासास्वारी भारवाड घ्यावयास गेली" दुसरी बखर

गडावर मातोश्रींनीं कृष्णाजी हरि साठे यांची कन्या नोवरी निश्चय करून नारायण [ राव ] साहेब यांचें लग्न केलें. ही बातमी आली तेव्हा फौज सुद्धां देशीं येतात तों मोंगल व भोंसले यांणीं पुरंदरची खडणी घेऊन राक्षसभुवन गंगातीरीं गेले. श्रीमंत आषाढ वद्य पक्षीं मादल [ ? ] मुगी घांटावर येऊन पोहोंचले. दुसरे दिवशीं श्रावण शुद्ध सप्तमीस प्रतिनिधी व मोरो बाबुराव यांचें राज्यकारण येऊन निराळे राहिले. मोंगल गंगापार गेला. दिवाण विठ्ठल सुंदर आईरतिरीं असता सदाशिव रामचंद्र त्याजकडे होते. सरकार फौजेनिशीं श्रीमंत उभयता चालून गेले. आघाडीस निळकंठ माहादेव व महिपतराव चिटणीस व महादजी शितोळे, माधवराव नरसिंह [ व ] हुजूर पागा व मोरो कोन्हेर व रंगो कोन्हेर व दादा पोतनीस होते. तों नबाबाचे दारूस व बाणास आग लागून दारूखाना उडाला. त्या सधींत निळकठ माहादेव याजकडील फौजेनें तोंड लाविलें. श्रीमंत येऊन पोंचले. रघुनाथ बाजीराव यांचा हवदा येत होता. दरम्यान विठ्ठल सुंदर व विनायकदास व इस्मालखान पठाण पांच हजार फौजेनिशीं हौद्यावर उठोन हौदा माघारा फिरविला. मागें पुढें पठाणांची फौज चालली. सरकार फौजेचा मोड जाहला. ईश्वरी कौतुक! त्यांचेच लोकांत बार सुटून गोळी विठ्ठल सुंदर यास लागली. लोक उभे राहिले. पुढें मल्हारजी होळकर होते त्याची शिलिक[८१] जाहली. यामुळें विठ्ठल सुंदर सात अबाऱ्या फौज सुद्धा उभा राहिला. श्रीमत माधवराव बल्लाळ प्रधान घोड्यावर होते ते एकीकडे उभे राहून विठ्ठल सुंदर यांचे अबाऱ्यावर आपले लोक पाठविले. तटाचें[८२] युद्ध जाहलें. बाबूजी नाईक व दमाजी गाईकवाड श्रीमतांस पाहत आले. तेव्हा श्रीमताजवळ महादजी शितोळे वगैरे लोक होते. तेव्हां शितोळे अबारीवर जाऊन मारितो म्हणून बोलिले. वाचून आल्यास मांजरी गांव[८३] द्यावा ऐसें बोलून झुजावर गेले. शितोळे यांनीं अबारी घेतली. ते समयीं माधवराव नरसिंह[८४] यास वीस जखमा लागल्या. नबाबानीं गंगेपलीकडून तोफांचा मार केला. तीन प्रहर दिवस आला. अकरा कोस मजल चालून येऊन लढाई केली. त्यांत अभ्र येऊन पर्जन्य पडून अंधकार पडला. पठाणानीं घोड्याच्या कुच्या मारोन भिजोन राहिले [ ? ] श्रीमत खासे चालून

८१ शिलक=सरबत्ती

८२ तटाचें=हटाचें, नेटाचें.

८३ मांजरीगांव सातारा जिल्ह्यांत आहे शितोळे यांजकडे भोरथडीची देशमुखी होती यांचे वंशज ग्वालेरीस शिंद्याचे पदरी आहेत

८४ माधवराव नरसिंह हे विंचूरकर असावे.

८५ ही लढाई मोठ्या शर्थीची झाली हिचें वर्णन इतकें सविस्तर दुसरे कोठें आढळत नाहीं पेशव्यांची बखर पृ० ८४ ते ९ पहा

येऊन पठाण लुटून घेतले. विनायकदास ठार पडून तीन कोस मुर्दे पडून रण जाहले. विठ्ठल सुंदर यांस गोळी लागली होती. त्यांस अंबारींतून लोटून दिले. तों गिलचे लोक यांणीं डोकीं कापून भाल्यावर घातले. सदाशिव रामचंद्र व शाबाजी सुपेकर गंगापार गेले. कितीएक बुडाले. सरकारची फत्ते झाली. विठ्ठल सुंदर यांचे अंबारींत बसून उभयतां श्रीमंत गौराई धोंडराईवर मुक्काम केला. पर्जन्य वाढला. गंगेस पूर आला. बावीस उमराव अंबारी सुद्धां पाडाव आले. पठाण वगैरे मराठी फौज तीस हजार बुडाली. नबाब यांनीं तोफा जाग्यावर टाकून निघोन गेले. दुसरे दिवशीं श्रीमंत गंगापार होऊन औरंगाबादेवर हल्ला केला. शहरांतून मार जाहला. शहरची खंडणी घेऊन मुक्कामास आले. महादजी शितोळे यांस रामबाण हत्ती व मांजरीगांव दहा हजार रुपयांचा दिल्हा. व दोनशें स्वारांची सरदारी दिल्ही. गोपाळराव गोविंद मोंगलाईंत गेले होते त्यांची मिरज त्यांस देऊन समजावी केली. श्रीमंत दादा साहेबांचे पुत्र भास्करराव यांचा काल जाहला. भवानराव प्रतिनिधी मोंगलाईंत गेले होते त्यांची समजूत करून प्रतिनिधी त्यांचे हवाली केली. फडणीशी चिंतो विठ्ठल करीत होते. मोरो बाबूराव फडणीस मोंगलाईंत गेले होते, त्यांची समजाविशी करून फडणीशीचीं वस्त्रें बाळाजी जनार्दन यांस दिलीं. भोंसले नागपूरकर यांचीं कामें कानें करून देऊन त्यांस निरोप दिला. मोरो विठ्ठल रायरीकर यांस शिंद्यांची फडणिशी सांगितली चिंतो विठ्ठल रायरीकर यांस पालखी दिली. सदाशिव रामचंद्र गंगापार गेले. ते तिकडेसच असत. मोंगलाकडील बावीस उमराव पाडाव होते त्यांस वस्त्रें देऊन निरोप दिल्हा. मोंगल तोफा टाकून गेला होता त्या तोफा सरकारांत आणिल्या. श्रीमंत पुण्यांत वाड्यांत असतां रघुनाथ बाजीराव निघोन आनंदवल्लीस गंगातीरीं राहिले. पुरंदर किल्यास अम्मल निळकंठ महादेव यांचा होता, तेथें विसाजीपंत सोहनी यांनीं फितुर करून किल्ला घेऊन सरकारांत दिल्हा. ते समयीं कोळियांचा दंगा होऊन जेजुरीस कोन्हेर त्रिंबक यांचा वाडा लुटून निळकंठ महादेव यांचा काळ सासवडीं जाहला. त्यांस दत्तपुत्र नाना पुरंदरे यांचे पुत्र माधवराव जाहले. स्वारी पंतप्रधान स्वारीस कर्नाटकांत गेले. पौषमासीं. कारभारी सखाराम भगवत. श्रीमंतांचे वाड्याचे पूर्वेचे दरवाज्याजवळ

---

८६ हा नाना फडणीस याचा उदयकाल. येथपासून ते राजकारभारांत पडले ते यावज्जीव [ १८०० पर्यंत ] तसेच होते

८७ हे रायरीकर शनवारांतील ओंकारेश्वराजवळचे ?

८८. सदाशिव रामचंद्र हे रामचंद्रबाबा शेणवी यांचे पुत्र असावे पण हे मोंगलाकडे कां व कधीं गेले तें स्पष्ट होत नाहीं.

बाबूराव फडणीस व ज्ञानभट शालग्राम [ यांचे ] वाडे जाहले होते ते जळाले. तेव्हाच रामचंद्र बावाचा वाडा सात मजली होता तो जळाला. कलम.

शके १६८६ सैन ११७४. श्रीमंत स्वारीस कर्नाटकांत गेले होते त्यांनी धारवाडास मोर्चे बसवून धमधमा बांधोन किल्ला जेर केला. रघुनाथ बाजीराव आनंदवल्लीस होते ते फौजे सुद्धां निघोन अनंतपुरास गेले. कारभारी चिंतो विठ्ठल. कलम.

शके १६८७ सैन ११७५. श्रीमंतांनी धारवाड घेऊन पुढें हैदर नाईक याजवर स्वारीस गेले. रघुनाथ बाजीराव आनंदवल्लीस गेले. कलम.

शके १६८८ सैन ११७६. श्रीमंत यांनी धारवाड घेतले. तेव्हा नारो कोन्हेर यांस पालखी दिली. हैदरनाईकाकडील स्वारी करून सिंहस्थाचें साल यामकरितां गंगातीरीं जाऊन अखेरीस ज्येष्ठमासीं शके १६९० पुण्यांत दाखल जाहले. फाल्गुन मासीं कोन्हेर त्रिंबक मृत्यु पावले. रघुनाथ बाजीराव आनंदवल्लीहून स्वारी निघोन गुढागर पर्यंत जाऊन अखेरीस आनंदवल्लीस आले. कलम.

शके १६८९ सैन ११७७. श्रीमंत पंतप्रधान श्रावणमासीं निघोन आनंदवल्लीस दादासाहेबांकडे जाऊन त्यांची समजी करून, जाहागीर देऊन, किल्ले सातारा वगैरे किल्ल्या घेतल्या. विजया दशमीस रंगो कोन्हेर यांस तैनात करून देऊन पालखीची वस्त्रे दिलीं. कार्तिकमासीं निघोन पुण्यास आले. रघुनाथ बाजीराव यांनी फौज मिळवून मल्हारजी होळकर यांचे कारभारी सामील करून धोडप किल्याजवळ पंचवीस हजार फौज जमा केली. वैशाख मासीं शके १६९० दत्तपुत्र अमृतराव भुसकुटे यांचे पुत्र घेतले. श्रीमंत

८९. "सु० स० खमस [ तिस्सेन म० अ० ११६५ इ० स० १७६४ ] खासा स्वारी धारवाड घेऊन पुढें कर्नाटकात गेली. दादा साहेब आनंदवल्लीहून कर्नाटकात गेले." द० ब०.

९०. "सु० स० सीत तिस्सैन [ म० अ० ११६६ इ० स० १७६५ ] खासा स्वारी कर्नाटकांतून येऊन वऱ्हाड प्रांतीं भोसले यांजवर गेले. अखेरीस पुण्यास आले. दादा पुण्यास येऊन आनंदवल्लीस जाऊन तेथून हिंदुस्थानात जाता खासा स्वारीस मिळोन गोदेस गेले सन मजकुरीं खासा स्वारीतून भवानराव याजवर रामचंद्र गणेश गेले." द० ब०.

९१ "सु० स० सब्बा तिस्सैन [ म० अ० ११६७ इ० स० १७६६ ] खासा स्वारी कर्नाटकात गेली. सिरे वगैरे ठाणीं घेऊन आले. दादा गोदेस होते." द० ब०

९२. "सु० स० समानतिस्सैन [ म० अ० ११६८ इ० स० १७६७ ] गोपाळराव कर्नाटकात पाठविले ते अखेरीस आले. दादा अम्बडीस गोदेहून आले ते आनंदवल्लीस होते. वैशाखमासीं फौज धरून धोडपेहून आणिले." द० ब०

९३ 'भुसकुटे' यांचे पूर्वज पापडी ऊर्फ चिमणपुरा वसई नजीक येथें होते. त्याचे वंशज तेथें अद्यापि आहेत.

परंतु कालवशें करून जालें त्यास उपाय काय! आपण महाराजांचे सेवेशीं यावें याच उद्देशें लवलीया [ ? ] पर्यंत आलों. त्यास राजमाचीकराकडील काहीं वृत्त आढळलें. यास्तव तिकडे गेलों. राजमाचीचा बंदोबस्त केला. व या उपरि कुलाबा जाऊन बंदोबस्त करितों. लोकांस विना दिल्या घेतल्या खेरीज समाधान होतें ऐसें नाहीं. तमाम लोक बेदिल, निराश्रित, धनी नाहीं, ऐसें त्यांचे चित्तांत जालें. साहित्य तों जालें पाहिजे. या जिल्हा या मु त शी लें[30] जिल्हा राजश्री प्रधान पताचा आहे. सर्व प्रकारें हशमांनीं व फौजेनें व कित्येक गोष्टीनें सजुंदे[31] आहेत. महाराजांनीं कृपाळु होऊन राजश्री प्रधानपतांस आमच्या साहित्याविशी आज्ञा करावी. महाराजांचे आज्ञेप्रमाणें ते साहित्य करतील. व लोकांस समाधान पूर्वक डौलें तीस पसतीस पाठवावीं. तें त्यास देऊन मनोधारण करून या जिल्हियाचा बंदोबस्त करून महाराजांचे पायांसंनिध येतों. आम्हांस महाराजाचे पायाखेरीज दुसरा अवलंब आश्रा आहे ऐसें नाहीं. जरी डौलें येत नाहीं तरी लोक तजा वजा[32] नाहाले. संभाजी आंगरियानीं तो या जिल्हियाची उपेक्षा केली आहे. महाराजांस एक एक स्थळ निर्माण करितां काय श्रम लागले आहेत? ते स्थळें अनियासें शत्रूचे हातांत जाऊ सकते. लोकांचा इतबार पुरत नाहीं. लोक कष्टी आहेत. कोणे समयीं त्यांस काय बुद्ध सुचेल व कोणाकडे डौलें[33] देतील तें नकळे. शत्रु तरी उंशापायेतरास[34] सकळ सामुग्रीनें सिद्धच आहेत. तरी महाराजांनीं कृपाळू होऊन डौलें अगत्य पाठवावीं. सारांश महाराजांनी सध्या दोन गोष्टी कराव्या. एक प्रधान पतास साहित्याची आज्ञा करावी, दुसरे डौलें पाठवावीं. म्हणजे बंदोबस्त महाराजांचे प्रतापें करून होतो. आम्हांस महाराजांचे पायां खेरीज दुसरा आश्रा आहे ऐसें नाहीं. देवधर्म मायबाप सर्व महाराजांचे पाय आहेत. सदर्हू प्रमाणे साहित्याची आज्ञा करणार महाराज धनी आहेत.

चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे याणीं राजकोट, चऊल आपले हातीं घेतले. हजार पांचशें माणूसही जमा केले आहेत व फिरंगी व इंग्रज ही ⁓उरूळ फाडून घेतले.

[ १२० ]

॥ श्री ॥

राजश्री पंतप्रधान साहेबांचे सेवेशीं——

(चिन्ह) सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ गोविं-

---

३०. 'या जे ला ही तु या मु त शी ले' असेंही होईल.

३१. सजुंदे—सजुदा=पूर्ण, तयार, "परिपूर्णस्तु सजुदा" राजव्यवहारकोश

३२. तजावजा=पागलेले

३३. डौल=नमुना, सही किंवा शिक्का केलेला कोरा कागद

३४ उंशापायेतरास=उंशागतीं पायगतीं.

दराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर दंडवत विनंती ऐशीजे. येथील कुशळ जाणून स्वकुशललेखनाज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष साहेबांची आज्ञा घेऊन निघालों. तुळजापुरच्या मुक्कामास पोहोचलों. तेथून फौज नगरच्या मार्गानें रवाना करून आम्ही श्री जेजोरीनाथाचें दर्शन घेऊन दावडीस* एक दिवस राहून दुसरे दिवशीं कूच करून दरमजल गंगातीरास पोंचलों. मार्गी शिवराम अनंत व हैबतराव बाणराव व कृष्णाजी चव्हाण पागादार पागांसुद्धां गुजराथेहून आले ते भेटले. बरोबर आहेत फौज गंगेच्या मुक्कामीं येऊन मिळाली. नंतर दरकूच चांदवडच्या मार्गे जात असतां अंताजी नागेश कुटुंब सुद्धा पळत फिरत होते. त्यांस भेटीस बोलाविलें होतें. ते येईनात, घटाई करू लागले. नंतर दहा वीस स्वार पाठवून आणून ठेविले. तेथून पुढें § साल्हेरच्या नजीक आलों. किल्ल्याचा बदोबस्त करून दोन मुक्काम राजश्री दौलतराव यांजकरितां करून त्यास मिळवून घेतलें. नंतर कूच करून सोनगडच्या मुक्कामास आलों. किल्ले मजकूरची बदोबस्ती होतीच. परंतु साहेबाचे पुण्यप्रतापें करून किल्ला खालीं जाला. निशाण चढऊन आपले लोक ठेऊन बदोबस्त करून व्योरच्या [ ? ] मुक्कामास आलों. व्योरवर त्याजकडील पागेदार अण्णाजी अनंत वगैरे पांचशें होते त्यास आमचे पांच सातशें पुढें आगाऊ गेले होते त्यानीं चार घोडीं पाडून व चार भले माणूस पाडून घेतलीं. व्योरांत ठाणें घालून पुढें दरमजल सुरत अठ्ठाविशींत आलों. मांडवीकर दोनशें स्वार व चारशें माणूस सुद्धा भेटीस आले तिकडून राजश्री त्रिंबकराव गायकवाड आणखी एक दोघे येऊन भेटले, साहेबाचे पुण्यप्रतापेंकरून दरमजल जात आहो. राजश्री फत्तेसिंग गायकवाड याचा रेवा तीरीं मुक्काम आहे. तीन हजार स्वार पायदळ मिळोन आहे. अशी बातमी बरचेवर येती. साहेब कृपें सर्व यथास्थित होईल. साहेबीं कृपाळू होऊन राजश्री दौलतराव यांसमवेत फौज घोडीं माणूस सामान यथास्थित पाठविलें. परम समाधान जालें. आम्हाजवळही फौज पागा व हल्लीं देशी आणखी जमा जाली आहे. माणूस उत्तम आहे. काम काज पडल्यास

---

* दावडी ता० खेड हा गाव गायकवाडांस इनाम होता तो आलीकडे त्याणीं आपले पदरचे 'हवळे' नावाच्या सरदारास देऊन टाकिला. येथें चवक, गावकूस, गढी व वाडा आहे. सदरेच्या पुढें कारंजें आहे. जवळच एका डोंगरीवर खंडोबाचें स्थान आहे तें प्रसिद्ध आहे गोविंदराव गायकवाड येथें देवाचे सेवे करितां बरेच दिवस राहिले होते देवाकडे गायकवाडाकडून चौघडा, पोषाख व खेरीज सुमारें ३०० दरमहा नेमणूक चालू आहे. येथें डाकी नेहमी सुरू असते.

§ साल्हेर व मल्हेर हे दोन किल्ले बागलाण जिल्हा नासिक येथें आहेत

उपयोगी पडतील. दिनचर्या बातमी येत असते त्यांत अंतर नाहीं. एका दों दिवसां त्याची आमची गाठ पडेल. त्याच्या मनांत भेटावें असें आल्यास आम्हांकडून अंतर होणार नाहीं. विरुद्धास प्रवर्तल्यास तसेंच प्राप्त. कोणताही प्रकार मांडल्यास साहेबांचे कृपें यथास्थित होईल. कोणत्याही गोष्टीस प्रारंभ करते समयीं साहेबाचे चरणाचें चिंतन अंतःकरणीं करून पुढें उद्योग करितों. तेव्हां त्या चरणास आमच्या करण्याचा साभिमान आहे. आमची निष्ठा चरणापाशीं. ते सर्व पार पाडून यथास्थित होऊ. ऐवज माल व ज्याचा [ ? ] मा॥ व अवातर कित्येक अर्थ राजश्री सखाराम *हरि व रावजी अप्पाजी यांसि लिहिले आहेत. ते विनंती करितां ध्यानास येईल. सर्व प्रकारें आधार आश्रय एक साहेबाचे चरणाचा. साहेबीं साभिमानें कृपा केली त्या मार्गे येथपर्यंत निभावीत आलों. एक दोन स्थळें मजबुदीचीं होतीं. तीं हस्तगत जालीं. पुढें त्यांची भेट होऊन त्यांचा बंदोबस्त करणें तोही अर्थ साहेबाचे कृपें घडेल त्यांची आमची गांठ लौकर पडेल. होईल मजकूर तो वरचेवर सेवेशीं लिहून पाठऊ. परंतु साहेबाचे पुण्यें करून सर्वही उलगडा पडेल. साहेबीं चिंता सेवकाची न करावी. आणि माझा अभिमान साहेबांच्या चरणीं आहे तर साहेब माझे मायबाप आहे, तर हे ब्रीदाची लज्जा मातापित्यास आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. रा॥ छ २४ माहे जिलकाद कृपा कीजे हे विज्ञापना.

[ १२१ ] ॥ श्री ॥

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसि

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर दंडवत विनंती येथील कुशळ जाणून स्वकीये कुशळ लिहीत असलें पाहिजे. विशेष–कानोजीराव गायकवाड यांणीं बदमामली करून बखेडा बहुत केला. यास्तव समस्त सरदार यांचा एकदील करून कानोजीराव यांस कैदेंत ठेऊन दौलतीचा बंदोबस्त यथास्थित केला. हें वर्तमान आपणास कळावें म्हणोन लिहिलें आहे. मागाहून सविस्तर लिहून पाठवू. स्वामीचे प्रतापें बखेडखोरांचे पारपत्य करून बंदोबस्त केला. आज छ मारींच बंदोबस्त झाला. मागाहून सविस्तर विनंती लिहितों. रा॥ छ ११ रमजान यैंज उपरि मी चाकरानें व्हाहावें आ. [ ? ] इष्ट नाहीं. वडिलानीं चाकरी करितां हा काळ काढिले याच अन्वयें माझी हीच न वे रा आहे.

---

* हे दोन परभु गृहस्थ होत सखाराम हरी हे रघुनाथराव दादा यांचे परम स्नेही होते रावजी आपाजी हे पुढें गायकवाडीन दिवाण झाले.

३५ येथपासून पुढें सुदवाशाचें अक्षर आहे तें दुर्बोध आहे.

एकदां खावंदाचे पाये व रि न पाहावे तो सुदीन बरकड आणिक नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती

(शिक्का)

[ १२२ ]          ॥ श्री ॥

पो। छ १ जमादिलोवल सन इहिदे समानीन वैशाख शुद्ध २ गुरुवासर

श्रीमंत महाराज राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेशीं--विनंती सेवक हरी बल्लाळें[३६] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ २९ रबिलावर पावेतों स्वामींचे कृपावलोकनें यथास्थित असे विशेष—स्वामींनीं छ २५ रा।लावरचें आज्ञापत्र स्वहस्ताक्षरें कृपा करून सादर केलें तें छ २७ मिनहूस पावोन परम संतोष जाला. इंग्रज घाट उतरोन गेला. तुम्हीही त्यांचे पिछावर गेलां. उभयतां सरदार आहेत. चहूंकडून येकदाच एलगार करून इंग्रज बुडवून टाकणें म्हणून आज्ञा. ऐशास इंग्रज घाटमाथा खंडाळ्यावर होता. त्यास राजश्री परशरामपंत व तुकोजी होळकर यास फौज सुद्धां घाटाखालीं अगोदर रवाना केले होते. यांणीं त्याची रस्त मना केली होती. यामुळें त्याचे लष्करांत महागाई जाली. व आम्ही खडकाळ्याचे मुक्कामींहून एका दो रोजांत ला [क?] व पास येऊन तोफा सुरू करून मारगिरी करीत होतों. महागाईमुळें त्यानीं घाटमाथाहून कूच करून खालीं उतरून खालापुरास इंग्रज आला. आम्ही छ २५ रा।लावरीं घाटाखालीं उतरून रात्रीचे त्याचे लष्कराचे पाऊण कोसाचे तफावतीनें उभे होतों. त्यास त्यांणीं ते दिवशीं प्रहररात्र रहातां कूच करून चालिला. तेव्हां आम्हीं फौज सुद्धां निकड करून झुजाचें तोंड लाविलें. सरकारचे सरदार व लोक व गारदी व हशमी लोकानीं स्वामिसेवा एक निश्चता महाराजाचे चरणाचें चिंतन करून इंग्रेजांचा जगी मार होत असतां खातरेस न आणितां लढाई सुरू करून मोठ्या तारफेने बेन्याहत [ बेनिहायत ! ] मर्दुमी करून युद्ध केलें. इंग्रेजास जरब चांगली दिल्ही. त्याजवर छ २८ रा।लावरी खालापुरापुढें चौक आहे त्या मुक्कामींहून त्यांणीं कूच केलें. त्यास आम्ही प्रहर रात्रीस पहाटेचे तयार होऊन त्याचे पिछावर आलों. व उभयता सरदारही आले. तोफाची मारगिरी त्याजवर केली व लोकानीं व सरदारांनीं काल निकड करून झुझाचें तोंड लाविलें. सर्वांनीं स्वामिसेवा जीवाभ्य असे करितात. इंग्रजांचें माणूस फार नाश जाहलें. गारदर इंग्रेज यांणीं हिंदु-

३६ हरिपंत फडके पेशव्यांचे बक्षी.
३७ जीवापलीकडे ?
३८. होळकर व पटवर्धन.

स्थानांत जागा जागा लढाया केल्या त्याच [39]तौरानें इकडे मर्दुमी दाखवावयास आला. त्यास स्वामी प्रतापवान्, सरकारांत सरदार व लोक वीर भारथी आहेत, यांणीं मोठे मोठे मनसुबे करून शत्रु पादाक्रांत केले असतां या [40]टोपिक-राचा मजकुर काय? स्वामींच्या तेजप्रतापें याचा गर्व परिहार जाहला. याचें पुरतें पारपत्य स्वामींच्या आज्ञेप्रमाणें करावें हाच आमचा सर्वांचा सेवाधर्म, तदनुरूपच [41]घावदाव पाहून लगट करीतच आहों. दारूचें बळ फार, लढवई चांगला, म्हणूनच मर्दुमी करून मुक्कामास जातो. इंग्रज पनवेलीस जाऊन पोहोंचला. आम्ही दो तिहीं कोसांचे अंतऱ्यानें आहों. कालचे लढाईंत एक तोफ इंग्रजाची पाडाव जाली व बंदुखा आल्या. दारू मार्गानें लोकास फार सांपडली. पेंढाऱ्यांनीं बैल आणिले. त्यांचें माणूस फार जायां जालें. सर्व गोष्टी स्वामींचे पुण्यप्रतापाच्या आहेत. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

[ १२३ ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत तात्या स्वामीचे सेवेशीं—

पोष्य बाळाजी कृष्ण व हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनती उप. रीं येथील कुशळ ता॥ छ १४ जिलकाद मु॥ पुणतांबें जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष—फार दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. लिहून पाठवावें. आपली लढाई फत्ते जाली म्हणोन ऐकिलें. सविस्तर ल्याहावें. श्रीमंत राजश्री [43]राँऊसाहेब ढोक्याचे मुक्कामास आले. तेथून सडे होऊन पुढें गंगापुरास गेले. आम्हां उभयतांस मागें ठेविलें. बुनगे सांभाळून घेऊन येणें म्हणोन आज्ञा केली. त्यावरून एक मुक्काम केला. छ १२ रोजीं राजश्री [44]भँवानराव चहू राउतानिशीं लष्करांत आले. आम्हांस वर्तमान कळतांच गेलों. भेट जाली. त्यांचे मानस श्रीमंताकडे जावयाचे असेंच ओना [?] म्हणोन बोलिले. आम्ही सांगितलें कीं, "तुम्हीं येथें आलां. आम्हास वर्तमान कळलें. आता तुम्हांस एकटें जाऊं देणार नाहीं. पालखींत बसवून आम्ही जातो [ तेव्हा ] तुम्हास समागमेंच नेऊं." त्यावरून आढे वेढे घेतले. शेवटीं पालखींत घालून घेऊन जात असों. कांहीं खात नाहीं. श्रीमंताचें दर्शन जाल्या खेरीज अन्न उदक देखील घेत नाहीं. आम्हीं चौकी पहाऱ्याचा बंदोबस्त केला असे. भवानराऊ आता निखालसतेच्या गोष्टी फार सांगतात

३९ तौरानें=तोऱ्यानें, डौलानें.
४० टोपकर=टोपीवाला, ताम्र.
४१ घावदाव=संधि.
४२ पेशव्यांची बखर पृष्ठ १२५–१३० पहा.
४३ थोरले माधवराव असावे.
४४ हे प्रतिनिधी.

कीं, "श्रीमतांजवळ जाईन, ने करतील ते करूं." सारांश गोष्ट, भगवंतें आपल्यास यश दिल्हें. भवानराव अनायासें करून सांपडले. मोठी गोष्ट जाली. तिकडील वर्तमान लिहीत जावें. सांप्रत आपला मुक्काम कोठें आहे? पुढें कोणीकडे जावयाचा विचार आहे? तें सविस्तर ल्याहावें. युद्धाचें वृत्त तपशिलें लिहावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती–

राजश्री बगाजीपंत स्वामींस सा। नमस्कार. तिकडील वृत्त तपशिलें लिहून पाठवणे हे विनंती.

[ १२४ ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना स्वामींचे सेवेशीं–

पोष्य हरी बल्लाळ सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता। छ २१ जमादिलोवर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष–आपणाकडून बहुत [दिवस] पत्र येऊन कांहींच वर्तमान कळत नाहीं. तरि ऐसें नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. इकडील वर्तमान तरि श्रीमंत राजश्री दादासाहेब धुळकोटापलीकडे सहा कोसांवर मुक्काम करून राहिले आहेत. श्रावण मासचे खर्चास दोन लाख रुपये द्यावे लागतात तेव्हां कूच होऊन पुढे येतील. त्यास ऐवजाविशीं राजश्री विष्णुपंत बाबा यांस लिहिलें आहे, ते तरतूद करतील. परंतु त्यास ऐवज लौकर द्यावा लागेल. राजश्री नारो गणेश होळकराकडील व राजश्री बाळाराव शिंदे याजकडील व विष्णुपंत बाबा सरदारापासून रोख घेऊन बराणपुरास आले. पुरंदरास जाव * * त्यास महंमद इसफ वगैरे गारदी यांस तेथून निरोप दिल्हा. ते येऊन बराणपुराजवळ राहिले आहेत. त्यास पुढें चालून तापी उतरोन अलीकडे आणावे, नाहीं तरि मागती श्रीमत बराणपूरच्या मार्गे येतात. तेव्हां त्यांस [?] मिळतील याजकरितां कारभारी यांस चार दिवस अधिक लागले. परंतु आतां लवकर निघोन येतील. आमची भेट घेऊन पुढें जावें असें त्यांचे मानस आहे. मग पहावें. स्वारी बरोबर समया नाहींत. येथें द्याव्या तरि लष्करात मिळत नाहींत * * * तां आता समया वगैरेची यादी अलाहिदा लेहून पाठविली आहे त्याप्रमाणे सांडणी स्वारा बरोबर पाठऊन द्याव्या. श्रीमतास वर्तमान दीनचर्येचें लिहितों आपणास कळतच असेल. अधिकोत्तर लिहिणेस नाहीं. श्रीमंताचे येण्याचाच मजकूर पडला आहे. पैका पुष्कळ पावला. सेवट काय करितात कळत नाहीं. श्रावण-मासचे खर्चाचा पैका द्यावा, पुढें चादवड पर्यंत देऊं नये, असें बोलण्यांत आहे. परिणाम लागेल तो खरा. खर्चास नाहीं पावलें तर तापीवर आल्यावर पोटास नाहीं, म्हणोन मुलुकास तसदी देतील. एकूण दोन्हीकडून नुकसानी जाणून

राजश्री त्रिंबकपंत यांस बहुत प्रकारें लेहून तर्तुद करविली आहे. त्याचे पहिले तीन लक्ष गुरुजीजवळ भरणा जाला. आम्ही दोन लक्ष श्रावणमासाचे श्रीमंताचे खर्चास मागतों. हा ऐवज त्यास प्रविष्ट होयसें करावें. पैक्याचें मोठें संकट पडलें. सरदारांनीं मसलत लाबवली असो. एक वेळ चांदवड दाखल जाले म्हणजे सारे गोष्टींची भ्रांति फिटेल. होईल तें लिहून पाठऊं. दोन चार पत्रें आपणांस पाठविलीं परंतु उत्तर येत नाहीं तस्मात् आम्ही मसलत लांबविली, मेहनत करीत नाहीं, असें ध्यानांत आलें असेल तर येथें काय करितों तें काय ल्याहावें? दर्शनार्ती विदित करूं. आपले ममतेंत अंतर नसावें. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

[ १२५ ] ॥ श्री ॥ पै॥ छ २७ रमजान.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेशीं—

पो॥ परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष—तुम्ही दु कि ता[ ? ] पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर आपले व राजश्री गोविंदराव बापु यांचे पत्रावरून सविस्तर कळला. याचप्रमाणें बरचेवर तिकडील व इंग्रजाकडील व टिपूकडील वर्तमान लिहून कळवीत जावें. इकडील मजकूर तरि आम्ही धारवाडचा बंदोबस्त करून तुंगभद्रा पार होऊन दक्षणतीरास आल्यानंतर मायेकांडा व होंदेगिरे व संतीबेनुर व चेनगीरी हीं ठाणीं घेऊन नजीक रामगीरी येथील मुक्कामास गेल्याचें वगैरे वर्तमान तपशीलवार राजश्री गोविंदराव बापू यांचे पत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून सर्व मजकूर कळेल. छ १० रमजान बहुत काय लिहिणें लोभ असो द्यावा हे विनंती.[१५]

[ १२६ ] ॥ श्री ॥

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री गणेश विश्वनाथ गोसावी यांसि—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ सबांसबैन मयावअलफ—तुम्ही विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. राजश्री फत्तेसिंगराव गाईकवाड आमदाबादेस मोर्चे लाऊन शहरावर गोळे टाकितात. व सरकारचे महालांत उपद्रव करितात. त्यास येविशीं त्यांस सांगोन पाठविलें असतां ऐकत नाहीं. तेव्हां आम्ही आमदाबादेस येऊन मग तुमचे आमचे विचारें करणें तें करूं, म्हणून त्यास लेहून पाठऊन फौज सुद्धां बडोद्यानजीक गेलो. तों त्यांणीं उत्तर पाठविलें कीं, मही उतरून आलीकडे आल्यास तुमची आमची कटकट होईल. म्हणून लिहिलें व आमदा-

---

१५ गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे हे वरील गृहस्थ असावे

जादेस जाण्याविशीं आज्ञा आली यावरून त्याणीं दोन तीन घाटाची बंदोबस्ती केली. परंतु मार्ग फुटल तिकडून आज्ञेप्रमाणें जातच आहों. तेथें गेल्यावर आपाजी गणेश व आम्ही मिळोन त्यास दोन गोष्टी विचाराच्या सांगूं. आय-किलियास उत्तम, न आयकत तरि बनेल तसें करूं. परंतु त्यांची नजर आमदाबाद घ्यावी अशी आहे. त्याजकरितां धारेकडील फौज पंवार वगैरे यासि आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा व्हावी व सुरत अठ्ठाविशीचे महाल नष्ट करावे लागतील. तिकडे सोनगडास दीड हजार फौज आहे. आणखी राजश्री भिवराव[१६] येशवत याणीं फौज सुद्धां घेऊन त्याणीं व याणीं एकत्र होऊन काम करावें म्हणजे फत्तेसिंग ताळ्यावर येतील. फार भरीं भरले आहेत. याजकरिता तरतूद लौकर जाल्यानें बंदोबस्त होईल. म्हणून तुम्हीं लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशियासि तुम्हांस आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा जाली आहे. त्याप्रमाणें जाऊन दाखल होणें. त्याणीं दोन तीन घाट बंद केले तरी जाण्यास वाटा बहुत आहेत. चिंता नाहीं. तुम्ही अमदाबादेस पोंहोचल्यावर फत्तेसिंग आयकतील. न च आयकत तरि तुम्ही व अप्पाजी गणेश व राजश्री गोविंदराव खंडेराव सर्व एकत्र जाल्यावर दुसरी फौज नलगे. इतके येकत्र असता आमदाबादेचें त्याच्यानें काय व्हावयाचें कळतच आहे. दुसरा मजकूर सुरत अठ्ठा-विशींत फौज या दिवशीं पाठवावयाची सोय नाहीं. लावणीचे दिवस. पुढें श्रावण-मासापासून पाठवावयाची तजवीज केल्यानें पोटास मिळेल व शहही बसेल. या करिता तूर्त तिकडे फौज जाण्याचा उपयोग नाहीं. राजश्री अंताजी नागेश येथें आले आहेत. जाबसालात येईल तसें तुम्हास लिहिलें जाईल. तुम्ही लिहिल्याप्रमाणें आमदाबादेस जाऊन दाखल होणें. राजश्री रघुपतराव नारायण याजकडील फौज तुम्हाकडे आहे. त्यांचे खर्चाची बेगमी त्याजकडून होत नाहीं म्हणून तुम्हीं लिहिलें त्याजवरून येविशीं त्यांस आलाहिदा पत्र सादर केलें आहे. ते आपले फौजेचे खर्चाची बेगमी वरचेवर करीत जातील ___ आणि आमदाबादेहून खर्चास द्यावयाविशीं रा। आपाजी गणेश यास ल्याहावें म्हणोन लि॥ त्याजवरून खर्चास फौजेस द्यावयाविशीं मा॥रनिलेस लिहिले आहे, त्या प्र॥ खर्चास देतील व सस्थान मांडवी येथील भगवंतसिंग दिवंगत[१७] जाहाले याजकरिता राणीनें सस्थानावर गुमानसिंग दत्त पुत्र घेऊन बसविलें. त्याप्रमाणें त्याची स्थापना सरकारांतून करार करून त्याजकडे नजरेचा ऐवज करार केला. त्याप्र-

---

१६ हे सोनोरीचे पानशे-यांजकडे तो-फखान्याचे काम होतें

१७ दिवंगत=स्वर्गवासी, मृत

धडाडा नद्या लोटल्या व्योमपथें । भुमी तूटल्या घोर घातें विघातें ॥ ६८ ॥
महारण्य तें घोर नीकुंबळेचें । पुढें जावयालागिं सामर्थ्य कैचें ॥
समुद्रा तिरीं दाटलें वीस [31]गांवें । पुढें जावया वाट नाहीं स्वभावें ॥ ६९ ॥
भुमीपथ नाहीं पुढें जावयातें । उडाले महावीर आकाशपंथें ॥
समुद्रासि साडूनि वेगें निघाले । बळें शीघ्र नीकुंबळेमाजि गेले ॥ ७० ॥
पुढें काळविक्राळ ते वीर गाढे । बळें राक्षसीं घातले सप्त वेढे ॥
तयामध्यभागीं विरें इंद्रजीतें । त्वरें आणलीं होमद्रव्यें बहूतें ॥ ७१ ॥
घटीं मद्यआज्यादिकें मांस नेलें । विरें राक्षसें शोणितें[32] स्नान केलें ॥
पुढें [33]वेदिकेमाजि हूताशनू[34] तो । महा वीर प्रेतासनीं बैसला तो ॥ ७२ ॥
सहस्रैक आहूतिचा नेम केला । म्हणे म्यां वधावें नरां वानरांला ॥
शतें भक्ति सख्या हुती लागवेगें । विरें घातल्या अग्निमूखीं प्रसंगें ॥ ७३ ॥
रथू नीघतां हिंसती दिव्य घोडे । उदेले मुखीं आगळे घोष गाढे ॥
तया धूतें बीभीषणा श्रूत जालें । सुमित्रासुतालागिं तें जाणवीलें ॥ ७४ ॥
म्हणे होम पूर्णाहुती लागि आला । प्रतापें बळें पाहिजे यत्न केला ॥
म्हणे शेष गा धन्य बीभीषणा तू । सवें धाडिलें राघवें या चि हेतू ॥ ७५ ॥
वधू शीघ्र राक्षेस हे बाणघातें । तंव वारिलें त्यासि नैऋत्यनाथें ॥
म्हणे वो प्रभू झुंजता पूरवेना । पुरा होम होतां रिपू आवरेना ॥ ७६ ॥
तंव बोलिला [35]ऋक्ष तो जांबुवंतू । म्हणे वीर हो आइका एक मातू ॥
तुम्हीं होम विध्वसिजे लागवेगें । रणामाजि मी पाडितों दैत्यदुर्गें ॥ ७७ ॥
मुखें बोलिला वीर मेरू बळाचा । सुमित्रासुतू गौरवी रम्य वाचा ॥
कपी ऋषभू आणि त्या वायुसूतें । बळें घातली धाव आकाशपंथें ॥ ७८ ॥
नभीं मुख्य हे वीर दोघे उडाले । कपी रीस ऊदंड धांवूनि गेले ॥
धनावां शिळा टाकिती व्योमपंथें । बळें होम विध्वंसिला घोर घातें ॥ ७९ ॥
रथू मोडिला फोडिलीं सर्व पात्रें । विरें मोडिलें कुंड संकेतमात्रें ॥
पुढें वन्हि वीदारिला वेग केला । कितीएक राक्षेस तेथें निमाला[36] ॥ ८० ॥
रिपू रावणी ध्यान भगून पाहे । तंव भंगिला होम तो दीसताहे ॥
त्वरें इंद्रजीतू नभीं दृष्टि घाली । तंव ऋषभानें दिशा[37] शीघ्र केली ॥ ८१ ॥
बळें होम विध्वंसिला मारुतानें । देहेधर्म[38] संपादिला ऋषभानें ॥
पुढें पाहतां होम भगून गेला । महा वीर राक्षेस युद्धा निघाला ॥ ८२ ॥

---

३१. गांवें=योजनें. ३२. शोणित=रक्त. ३३. वेदिका=होमकुंड. ३४ हुताशन=विस्तव ३५. ऋक्ष=आस्वल. ३६. तेथें निमाला–भगोनि गेला (पाठ). ३७. दिशा केली=विष्टा केली ३८ देहधर्म संपादिला=विष्टा केली.

बळें कोपला काळ कृतांत जैसा । महावीर ऊठावला शीघ्र तैसा ॥
कपी वीर दोघे त्वरेशीं निघाले । बळें आपुल्या ते दळामाजि आले ॥ ८३ ॥
सुमित्रासुतें वाहिला चंड मेढा । पुढें चालिला तो बळें वीर गाढा ॥
कपी लोळ कल्लोळ कोटयानुकोटी । दळेंशीं बळें चालिला वीर जेठी ॥ ८४ ॥
महावीर ते थोर राक्षेस होते । कपीवीर ते धावले शीघ्र तेथें ॥
समारंगणीं भार भारी मिळाले । कितीएक ते भीडतां भग्न जाले ॥ ८५ ॥
दळें लोटलीं राक्षसाचीं अचाटें । समारगणीं चाललीं दाट थाटें ॥
बळें हाणिती शस्त्रघातें खणाणां । महीमंडळीं घोष ऊठे दणाणा ॥ ८६ ॥
असभाव्य राक्षेस मारीत आले । कपी वीर ते भगले भग्न केले ॥
तया देखतां मारुता कोप कैसा । बळें चालिला काळकृत्तांत जैसा ॥ ८७ ॥
गदा घेतली शीघ्र नैऋत्यनाथें । उडाला कपी ऋषभू व्योमपंथें ॥
सुगंधू कपी लोटला वर्यवत् । बळें आगळा चालिला जांबुवत् ॥ ८८ ॥
कपी काळ कल्पांतिचे मेघ जैसे । रणीं लोटले गर्जती वीर तैसे ॥
बळें घालिती पालथें या भुगोळा । तिहीं मांडिला आट राक्षेस कूळा ॥ ८९ ॥
रणीं हाणिती येकमेकां फडाडा । तुटों लागले पादपाणी तडाडां ॥
नद्या लोटल्या शोणिताच्या भडाडां । समारगणीं घोष ऊठे धडाडां ॥ ९० ॥
रणीं पाडिले दैत्य कोट्यानुकोटी । बहूतां विरीं दीधली त्यासि पृष्टी ॥
पुढें देखतां कोपला काळ जैसा । रणीं लोटला रावणी वीर तैसा ॥ ९१ ॥
तया राक्षसें घोर सधान केलें । कपीवाहिनीमाजि कल्पात आलें ॥
मयूरासि पिंजारिलें पुच्छ जैसें । रणीं पाडिले ते कपी वीर तैसे ॥ ९२ ॥
कपी मारुती सारिखे भग्न केले । कितीएक ते वीर धाकें पळाले ॥
पुढें पाहतां वीर सौमित्र कैसा । गजा देखतां ऊठला सिंह जैसा ॥ ९३ ॥
टणत्कारिलें चाप काळाग्नि रोषें । थरारी धरा सप्त पाताळ घोषें ॥
भुमी वर्षती मेघ ऊदंड गारा । चळों लागल्या त्या असभाव्य तारा ॥ ९४ ॥
भिडाया रणीं ऊठले वीर कोपें । बळें सृष्टि जाळील नेणों प्रतापें ॥
तवं शीघ्र बीभीषणें वेग केला । गदा घेउनी वीर सन्मूख जाला ॥ ९५ ॥
सुमित्रासुतालागि सांडूनि मागें । पुढें धांवला वीर तो लागवेगें ॥
रणीं देखिला वीर बीभीषणू तो । तया बोलता जाहला रावणी तो ॥ ९६ ॥
म्हणे रे बहूतां दिसां देखिलासी । वृथा पुष्ट तूं राक्षसांमाजि होशी ॥
नरें वानरें दास जालासि त्यांचा । मनू भंगिला रे तुवां पूर्वजांचा ॥ ९७ ॥
तुला ठाउका कोप माझा कृतांतू । मज इंद्रजीता पुढें मशकू तूं ॥
करू पाहशी थोर सामर्थ्य येथें । समारगणीं धाडिता मृत्युपंथें ॥ ९८ ॥

म्हणे इंद्रजीतास नैऋत्यनाथू । बळें वीण तू बोलशी व्यर्थ मातू ॥
मजलागिं तो काळ मारू शकेना । वरू दीधला तोषला रामराणा ॥ ९९ ॥
बहू शीकवीलें तुम्हां दुर्जनासी । परी नायका रे तुम्ही पापराशी ॥
मज सागता होत अव्हेर केला । समस्तांसि येणें गुणें मृत्यु आला ॥ १०० ॥
मला ताडिलें वैभवाचेनि तोषें । बुडालेत रे सर्व तेणें चि दोषें ॥
समस्तांसि मारील हा रामराजा । समारंगणीं मी च पाहीन वोजा ॥ १०१ ॥
सभामडपीं फार त्वां गर्व केला । कळेना तुला मृत्यु संनीध आला ॥
तुला आजि मारील सौमित्र बाणीं । मुढा राक्षसा जाण हे सत्य वाणी ॥ १०२ ॥
बहूसाल धिःकार केला तयातें । प्रतापें सिमा सांडिली इंद्रजीतें ॥
पदें ताडिता तो महा सर्प जैसा । रणीं कोपला वीर राक्षेस तैसा ॥ १०३ ॥
म्हणे रे उभा फीर[a] सन्मूख राहे । समारंगणीं [b]धीर सधान साहे ॥
बळें सोडिले बाण दारूण आले । सुमित्रासुतें सर्व छेदून नेले ॥ १०४ ॥
रणीं घातला रावणानूज पाठी । प्रतापें पुढें चालिला वीर जेठी ॥
समारंगणीं अंतकातुल्य[39] भासे । महावीर तो देखतां जीव त्रासे ॥ १०५ ॥
महा युद्ध होईल दोघाजणाशीं । पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेसी ॥
म्हणे दास ऊदास श्रोतीं न व्हावें । ऋषी[40] बोलिला तें चि हे सार घ्यावें ॥ १०६ ॥

---

## प्रसंग सातवा.

फणी[41] रावणी[42] वीर सन्मूख जाले । बळाचे महाकाळ जैसे उदेले ॥
करायास निर्वाण ते एकमेकां । विरश्रीबळें सोडिली सर्व शक्‍ती[43] ॥ १ ॥
पुढें बोलिता जाहला इंद्रजीतू । कृतांतापुढें[44] निर्बळी मानवा तू ॥
मरायासि का व्यर्थ आलासि येथें । निमिष्यांत[45] मारीन रे बाणघातें[46] ॥ २ ॥
रणामाजि सन्मूख होता बळेंशीं । समस्तां तुम्हा पाडिलें नागपाशीं[47] ॥
पुन्हा मागुती सर्व ही बाणजाळीं । निमालेत माझ्या करें युद्धकाळीं ॥ ३ ॥
अरे काय झाली तुझी शक्ति तेथें । पुनः शीघ्र आलासि युद्धास येथें ॥
तुवां आगिले काय सामर्थ्य जाया । बळें दावितां निर्बळें व्यर्थ वांया ॥ ४ ॥
वृथा पुष्ट रे हा बहू राजभ्राता[48] । नृपें ताडिला रे सभेमाजि लाथा ॥

---

a. फीर=धीर. b धीर=धोर ३९. अतकातुल्य=यमासारखा. ४० ऋषि=वाल्मीकि ऋषि (आद्य कवि रामायणकर्ता) ४१ फणी=शेषाचा अवतार लक्ष्मण ४२ रावणी=रावण पुत्र इंद्रजित. ४३ शक्ती=भीति ४४ कृतांत=यम ४५. निमिष=अत्यल्पकाळ ४६. बाणघात=बाणाचा तडाखा ४७. नागपाश- सापांचीं बधनें ४८ राजभ्राता=रावणराजाचा भाऊ बिभीषण

समस्तांमध्यें रावणें भ्रष्टवीला । तुम्हा मर्कटां माजि तो श्रेष्ठ केला ॥ ५ ॥
बळें आपुल्या रे तुझे पींदपाणी । नभामाजि खंडून घाडीन बाणीं ॥
समस्तां तुम्हां ठाउकी शक्ति माजी । रहाया पुढें काय रे प्राप्ति तूझी ॥ ६ ॥
बहू बोलिला वांजटू घोर शत्रू । प्रती उत्तरें बोलिला तो सुमित्रू ॥
मि हा कोण तूं नेणशी काय मूढा । वृथा विक्रमू बोलशी वाढ पूढां ॥ ७ ॥
मही रुंद विस्तीर्ण छप्पन्न कोटी । गिरी दिग्गजांची असंभाव्य दाटी ॥
तटाकें नद्या मातले भव्यसिंधू । वरी दाटली जीवसृष्टी अगाधू ॥ ८ ॥
असंभाव्य हा भार कोणा धरेना । न घेतां पुढें जीव सृष्टी उरेना ॥
सहस्रांफणींचा असंभाव्य व्याळू । तयामाजि येके फणीं हा भुगोळू ॥ ९ ॥
स्वभावें शिरीं ठेविजे पुष्प जैसें । तयाचे परी घेतलें विश्व तैसें ॥
तयाहून तो कोण आहे विशेषू । मुढा नेणशी कां स्वयें मी च शेषू ॥ १० ॥
भविष्योत्तरें सर्व ही सत्य व्हावीं । बळें वैभवें राक्षसांचीं दिसावीं ॥
म्हणूनी तुवा घेतलें येश युद्धीं । नभामाजि जाऊनि कापट्य बुद्धी ॥ ११ ॥
जनीं हीन त्याला बरी वेळ आली । अकस्मात ते कीर्ति होऊनि गेली ॥
बळें आगळा राम आत्मा जगाचा । तयाहूनि रे विक्रमू कोण कैंचा ॥ १२ ॥
तुम्हां पापरूपांमध्यें भक्त एकू । महावीर बीभीषणू पुण्यश्लोकू ॥
तयाशीं सभामंडपीं गर्व केला । दिसेंदिस राक्षस सर्व बुडाला ॥ १३ ॥
रिपू बोलतो जाण रे सत्य वाणी । प्रतापें तुझें शीर छेदीन बाणीं ॥
तया बोलितां ताविली भीमें दृष्टी । उभा काळ जाळावया जीवसृष्टी ॥ १४ ॥
बळें छेदितां जाहला वोष्ठ दंती । सिमा फाकली वैभवाची दिगंतीं ॥
करारा रणीं खादल्या वज्रदाढा । शतें सोडिलीं बाण वोढूनि मेढीं ॥ १५ ॥
बळें धाविलीं बाणजाळें उफाळें । लखाखीत सौदामिनीचेनि मेळें ॥
तडाडीत घोषें कडाडीत आले । सुमित्रासुते सर्व छेदून नेले ॥ १६ ॥

---

४९. पादपाणी=हातपाय c. प्राप्ति=शक्ती. ५०. वांजट=बडबड्या. ५१. सुमित्र=सुमित्रेचा मुलगा लक्ष्मण ५२. विक्रम=पराक्रम ५३. वाढ=पुष्कळ. d. पुढां=गाढा. ५४ छपन्नकोटी ( योजनें )=हा पृथ्वीचा विस्तार प्राचीन समजुतीप्रमाणें आहे. अर्वाचीन काळीं भूगोलव्यासमान ८००० मैल म्ह० ८०० योजनें, परिघ २५००० मैल म्ह० २५०० योजनें, आणि पृष्ठफल २०००००००० वीस कोट मैल म्हणजे २ कोट योजनें आहे तसेंच पृथ्वीचें घन २७०००००००००० दोन निखर्व सात खर्व मैल म्ह० २ खर्व ७ सात अब्ज योजनें आहे ५५. गिरी=डोंगर. ५६ सिंधु=समुद्र. ५७ फणी=फडा ५८ व्याल=साप ५९. स्वभावें=सहज. e. 'तूज' पा० भे०. ६०. पुण्यश्लोक=पवित्र आहे कीर्ति ज्याची असा ६१. भीम=भयकर. ६२. मेढा=तीरकमठा. ६३ सौदामिनी=वीज f 'लपेटिले धूम काळें' पा० भे०.

पुनः कोपला तो रिपू कोटिगूणें । शतांचीं शतें सोडिले बाण तेणें ॥
नभामाजि ते बाण बाणीं सणाणा । कितीएक स्फुलिंग भाळीं फणाणा ॥ १७ ॥
असभाव्य ते जाहली बाणवृष्टी । जळों लागली पावकें सर्व सृष्टी ॥
अती चंड ते दंड अद्भूत कैसे । महाकाळ कल्पांतिचे मेघ जैसे ॥ १८ ॥
कडाडां खडाडां गडाडां घडाडां । तडाडां थडाडां दडाडां धडाडा ॥
बहूतां परीचे बहू घोष झाले । ग्रहीं चंद्रसूर्यादिकां कप आले ॥ १९ ॥
कितीयेक सिंधूदकें तप्त जालीं । कितीएक g सिंधूदकें तीं उडालीं ॥
असभाव्य त्या दाटल्या बाणकोटी । बळें सोडिती पाडिती वीर जेठी ॥ २० ॥
नभामाजि कल्पांत ते बाणजाळीं । महायुद्ध तें होतसे अंतराळीं ॥
रिपू पेटले दोघ ही घोर मारा । भुमी वृष्टि गारा परी सर्व तारा ॥ २१ ॥
वरी पाहतां बाणबाणीं खणाणा । रिपू येकमेकासि तो भेदवेना ॥
रथारूढ तो रावणी धांवताहे । पदीं चालतां शेष ऐसा न साहे ॥ २२ ॥
पुढें चालिला वीर तो जांबुवतू । शिळा घेतली धांवला काळकेतू ॥
बळें हाक देऊनियां चक्रचाली । उफाळें शिळा तो रथामाजि घाली ॥ २३ ॥
रथा मोडिलें पाडिलें भग्न केले । सुमित्रासुता रावणी साम्य जालें ॥
सुगधें विरें वैभवे लागवेगें । महा अश्व ते चूर्ण केले प्रसगें ॥ २४ ॥
कपीनाथ बीभीषणें मारुतीनें । विरां लागिं सन्मानिलें थोर मानें ॥
भले हो भले थोर आश्चर्य केलें । रिपूच्या रथा विक्रमें भंगवीलें ॥ २५ ॥
नभीं सर्व आनदली देवसृष्टी । बहूसाल सपादिली पुष्पवृष्टी ॥
समस्ता मनी थोर आनद जाला । रिसी वानरीं घोष अद्भूत केला ॥ २६ ॥
म्हणे रावणी हा रिपू आवरेना । बहूसाल सामर्थ्य याचे सरेना ॥
शरा मारितां सर्व तोडीत आहे । पुढें अग्निअस्त्रासि तो सोडिताहे ॥ २७ ॥
तये सोडिता अस्त्र नैसे निघालें । धडाडीत तें तेज पुजाळ आले ॥
नभीं धूम्र दाटे असभाव्य ज्वाळा । करू पाहती भस्म नक्षत्रमाळा ॥ २८ ॥
असभाव्य ते चालिली वन्हिधाडी । मही सर्व आकाश तेणें कडाडी ॥
बहू hवर्ण ज्वाला शिखा धावताती । कडाडीत नेटें कपीमाजि येती ॥ २९ ॥
कपी ऋक्ष तेणें भयातूर जाले । कितीएक ते वीर पोटीं गळाले ॥
बहू सोडिला धीर नैऋत्यनाथें । म्हणे गा विरां सर्व गेलो अनर्थें ॥ ३० ॥

---

६४. स्फुलिंग=ठिणग्या. ६५. पावक=विस्तव ६६ ग्रह=मगळ, बुध, गुरु, शुक्र, व शनि हे पच तारा ग्रह g सिंधूदकें तीं उडालीं=सों स्वापें ही जळालीं. ६७. ऋक्ष=रीस, आस्वल ६८. वन्हि=विस्तव h वर्ण=धूम्र ६९. शिखा=ज्वाला ७० नैऋत्यनाथ=राक्षसस्वामी इंद्रजित.

सुमित्रासुतें देखिले अग्निअस्त्रा । पुढे सोडिता जाहला मेघअस्त्रा ॥
तया सोडिता मेघ तैसे उदेले । गिरीचे परी [७१]अंबरीं भार आले ॥ ३१ ॥
नभीं दीसती ते [७२]हुडे कोट झाडें । महा मेघ गर्जोनि गंभीर वाडें ॥
नभा व्यापिलें घोर अंधार जाला । दिसेना रणामाजि दोहीं दळांला ॥ ३२ ॥
नभीं चालिले ते बहू कीट काळे । झकाकीत सौदामिनीचेनि मेळें ॥
बळें मेघधारा असंभाव्य गारा । सुटे कंपु सुसाट घोषें थरारां ॥ ३३ ॥
प्रसंगीं तये पाणजंजाळ जालें । रणामडळीं तोयँ[७३] अद्भूत आलें ॥
कितीएक झाडें भुमी चूर्ण होती । पुरें पट्टणें सर्व वाहून जाती ॥ ३४ ॥
सुमित्रासुतें घोर अद्भूत केलें । जनाला गमे आजि [७४]कल्पांत आलें ॥
बुडों लागले भार त्या राक्षसांचे । बहूसाल त्या धीर गेले विरांचे ॥ ३५ ॥
रणीं सोडिलें अस्त्र नेटें विझालें । बहू राक्षसां थोर कल्पांत आलें ।
त्वरें रावणी वायुअस्त्रास सोडी । असंभाव्य तो वात नेटें झडाडी ॥ ३६ ॥
कडाडीत पाडें असंभाव्य झाडें । बळें पाडिलीं वाड झुंजाड झाडें ॥
फुटों लागलीं [७५]शैलशृंगें खडाडां । कडे चालिले पर्वतांचे भडाडा ॥ ३७ ॥
भ्रमों लागलीं [७६]खेचरें प्रेत जालीं । गृहें गोपुरें एक वेळे उडालीं ॥
बहूसाल तो वात [७७]आवर्त जाला । तया देखता मेघ नेटें उडाला ॥ ३८ ॥
सुमित्रासुतें देखिला चंड वारा । गिरीअस्त्र सोडूनि केला निवारा ॥
असंभाव्य तीं चाललीं शैलशृंगे । बहू वात निर्वात केला प्रसंगें ॥ ३९ ॥
गिरी चालिले ते असंभाव्य कैसे । नभीं धावती मातले मेघ जैसे ॥
महावीर तो वज्रअस्त्रासि सोडी । रणीं रावणी शैल तात्काळ तोडी ॥ ४० ॥
रिपू राक्षसें शैल ते पिष्ट केले । बळें आपुल्या दिग्गजा आड नेले ॥
पुढें जाहलीं ते बहू वज्रदाटी । तया देखता जाहला वीर जेठी ॥ ४१ ॥
पुढें वीर सौमित्र ब्रह्मास्त्र सोडी । तया पासुनि वन्हि नेटें भडाडी ॥
गमे कोटी विद्युल्लता एक वेळा[1] । महा लोळ कल्लोळ भासे भुगोळा ॥ ४२ ॥
रणा मडळी पावकें त्या अचाटें । [J]जळों लागलीं सर्व ही वज्रथाटें ॥
पुढें चालिल्या त्या असंभाव्य ज्वाळा । रणा मडळीं जाहली एक वेळा ॥ ४३ ॥
तया देखतां रावणी तें वि सोडी । रणामडळीं एकमेकांसि तोडी ॥
रणामाजि तात्काळ सन्मूख आले । महा ज्वाळ ते एक होऊनि [k] गेले ॥ ४४ ॥

---

७१ अंबर=आकाश ७२. हुडे=बुरूज. ७३. तोय-पाणी. ७४. कल्पांत=जलप्रलय होण्याचा काळ ७५. शैलशृंगें=डोंगरांची शिखरें. ७६. खेचरें=आकाशांत उडणारे पक्षी 1 एक वेळा=एक मेळा J जळों लागली=बळे जळिलीं ७७ आवर्त=भोंवरा k 'एक होता विजालेपा०.

पुढें घोर रुद्रास्त्र त्या रावणीनें । बळें सोडिलें शीघ्र माहाविरानें ॥
रणामाजि तें चालिलें एकवेळे । भुमी पाय आकाश पर्यी शिसाळें ॥ ४५ ॥
बळें धाविले ते रणामाजि कैसे । गिळाया भुगोळा महाविघ्न जैसे ॥
तया देखतां कंप माहाविरांसी । भयें मूर्छना पावली वानरांसी ॥ ४६ ॥
तया देखता तो फणी सिद्ध जाला । पुढें सोडिले शीघ्र माहेश्वराला ॥
उठे मातला काळ कल्पांत काळीं । दिशा दाटल्या सर्व आकाश ज्वाळीं ॥ ४७ ॥
रवी कोटि विद्युल्लता एक वेळां । रणीं धावती कंप जाला भुगोळा ॥
महातेज हेलावले ते चि काळीं । असभाव्य तें चालिलें ब्रह्मगोळीं ॥ ४८ ॥
तया देखतां अस्त्र मागें पळालें । बहू कूळ तें खेचरांचें जळालें ॥
पुढें देखतां रावणी भ्रांत जाला । भयें भूलला वारवेना तयाला ॥ ४९ ॥
मनीं भावितो कोण रावेल गेलों । कळेना मला व्यर्थ येथे जळालों ॥
तयीं शीघ्र रामानुजें काय केलें । प्रतिज्ञापणाला मनीं आठवीलें ॥ ५० ॥
म्हणे हो मनीं शीर छेदूनि न्यावें । म्हणोनी बळें अस्त्र मागें वळावें ॥
रणामंडळामाजि वीरें सुमित्रें । बळें वारिलें अस्त्र तें बीजमंत्रें ॥ ५१ ॥
म्हणे मेघनादू मला विघ्न आलें । परी थोर आश्चर्य कां वाचवीलें ॥
भला वीर सौमित्र हा वीर्यवंतू । मना सारिखें युद्ध मोठें करीतू ॥ ५२ ॥
असेना पुढें वीर होणार नाहीं । बहू देखिलें पाहिले झुजता ही ॥
महावीर हे सूर्यवंशी बळाचे । रिपूलागि रक्षावया कोण कैचे ॥ ५३ ॥
महावीर दोघे रणीं ते चि काळें । पुन्हा सोडिते जाहले बाणजाळें ॥
रणामाजि ते भेदिती एकमेकां । नभीं सोडिल्या बाणभाळी अनेका ॥ ५४ ॥
रिपूचीं रिपू तोडिती बाणजाळें । पुन्हा मागुती सोडिती ते उफाळें ॥
विरें वीर तो भेदितां ही ढळेना । विरश्रीबळें काय होतें कळेना ॥ ५५ ॥
पुढें काय केलें तया मेघनादें । रणीं हाक देऊनि धांवोनि क्रोधें ॥
महातेज पुंजाळ त्या शीघ्र काळीं । बळें भेदिल्या तीन भाळी कपाळीं ॥ ५६ ॥
महावीर तो रावणी काळरूपी । पुराणा बहू काळ कापट्य रूपी ॥
सुमित्रासुतू तो दिसे बाळलीला । बळें भेदिला रक्त वाहे कपाळा ॥ ५७ ॥
तया देखतां कोप नैऋत्यनाया । पुढें चालिला पावावयासि वेथीं ॥
रणीं हाक देऊनि बीभीषणानें । गदा घेतली चालिला थोर त्रीगें ॥ ५८ ॥
तया देखतां त्या दशग्रीवसूतें । रणीं भेदिला पाडिला बाणघातें ॥

---

७८. शिसाळें=मस्तक ७९ माहेश्वर=रुद्रास्त्र ८० भाळी=समूह ८१ वेथा=व्यथा, दुःख. ८२ त्राण=नेट

पुढें देखिला कोपला वीर गाढा । सुमित्रासुतें वेढिला[l] चंद्र मेढा ॥ ५९ ॥
रणीं रावणी लक्षिला ते चि काळीं । बळें भेदिल्या बाणभाळी कपाळीं ॥
नवा बाणघातें रिपू [m]स्वस्थ केला । तया मेघनादा बहू खेद जाला ॥ ६० ॥
कपाळीं बळें भेदिले बाण वीरें । प्रवाहो बळें चालिला तो रुधीरें ॥
महामस्तकामाजि सर्वे बुडाले । कपाळावरी पिंच्छ वाशिंग जालें ॥ ६१ ॥
म्हणे वीर बीभीषणू वीरछात्रा । बरें ऊसणें घेतलें गा सुमित्रा ॥
रिपू रावणी तापला वीर कैसा । शुळें टोंचिता ऊठला सर्प जैसा ॥ ६२ ॥
महावीर निर्वाणिचे बाण सोडी । लघू लाघवें शेष तात्काळ तोडी ॥
असंभाव्य कोपानळें तीव्र ज्वाळा । मुखें सांडितां काळकांपे चळाळां ॥ ६३ ॥
सिमा सांडिली थोर कल्पांत काळीं । महावीर ते खीळिले बाणजाळीं ॥
बहू खोंचले देह दोघाजणांचे । झरे लागले वाहती शोणितांचे ॥ ६४ ॥
विरश्रीबळें दुःख नाहीं प्रतापें । रणीं भेदिती एकमेकांस कोपें ॥
बहू माजलें युद्ध ते ओसरेना । बळें भीडती येकमेकां सरेना ॥ ६५ ॥
पुढें काय केलें सुमित्रासुतानें । गुणीं सज्जिलें त्या रवीचक्रबाणें ॥
मुखीं धांवती त्या शिखी पावकाच्या । बहू चचका कोटि विद्युल्लतेच्या ॥ ६६ ॥
कडाडीत कोपानळें बाणभाळी । बळें सोडितां शीघ्र तैशी निघाली ॥
भयातूर दोहीं दळीं कंप जाले । ऋषी, देव, गंधर्व धाकें पळाले ॥ ६७ ॥
ग्रहादीक आकाशपंथीं जळाले । बहू खेचरें भार भूमी गळाले ॥
ध्वनी ऊठला घोर घोषें तडाखा । बळी कांपती ईतरां कोण लेखा ॥ ६८ ॥
सुमित्रासुतें शीघ्र संधान केलें । रणीं रावणी शीर छेदून नेलें ॥
समस्तां सुरांलागिं आनंदवीलें । सुरेशांमनींचें महा शल्य गेलें ॥ ६९ ॥
रणामाजि तो इंद्रजीतू निमाला । समस्तां सुरांलागिं आनंद जाला ॥
महाकंटकू घोर संहार केला । त्रिलोकीं बहू कीर्तिचा घोष गेला ॥ ७० ॥
पुढें शेष सूगंध बीभीषणानें । दळें सर्व ही सिद्ध केलीं विरानें ॥
कपीशीं सुवेळाचळा राम जेथें । महावीर ते चालिले सर्व तेथें ॥ ७१ ॥
प्रभू राम तो बंधुची वाट पाहे । उतावीळ पोटीं वियोगा न साहे ॥
बहूसाल चिंता करी बांधवाची । म्हणे कोण वेळा सुमित्रासुताची ॥
तया बोलतां भार तैसे उदेले । दळेशीं बळें येश घेऊनि आले ॥
समर्थी प्रभूला नमस्कार केले । रघूनायका भेटले स्वस्थ जाले ॥ ७२ ॥

l. वेढिला चंद्रमेढा=वाढिला चंडमेढा. m. 'सुस्त' पा० ८३. रुधिर=रक्त. ८४. पिंच्छ=बाणाचा पिसारा ८५. छात्र=शिष्य ८६. निर्वाण=निकर. ८७. शोणित=रगत ८८. शिखा=ज्वाला ८९ लेखा=हिशेब ९० सुरेश=इंद्र

बधु मीर बहादरशा याजला बालीशाहांनीं जिवें मारिलें. याजवरून रतनकुंवर राणी उभयतांची मातोश्री इजला बहुत दुःख होऊन पत्रें सेनासाहेबांकडे पाठविलीं. संवत १७९३ चे सालीं सके १६५८ वशिष्ठा उतरून फौजेसहित जमावानिशीं रघूजी भोंसले सेनासाहेब सुभा केलझरचे सुमारें राणीचे पत्राअन्वयें येऊन परस्पर पंवनी येथें जाऊन लढाई करून ठाणे घेऊन तेथें तुळजोरामपंत याजला फौज थोडकीशी देऊन ठेविलें.

[ पुढें ] सेनासाहेब फौजेसहित आपण भंडाऱ्यास येऊन देवबाबा संत यांचें दर्शन घेऊन पायावर डोई ठेऊन रामदास स्वामींचे सांप्रदायी शिवाजी महाराजास अनुग्रह त्यांचा, या अर्थें जाणोन नतर प्रसाद मागितला, आणि संतबाबाचे खाद्यावरील घोकटी होती ती आपले खांद्यावर घेऊन त्यांतील अन्न घेऊन प्रसाद भक्षिला. आणि पुढे गोंडावर कमरबाही करून नंतर पिराशा बोबाचें दर्शन घेऊन दुवा घेऊन भानोरें येथें मोरचे बसविले.

हें वर्तमान देवगडास बालीशा राजे याजला समजलें. तेव्हां त्यांनी आपला दिवाण रघुनाथसिंग नामें होता त्याजला समागमें फौज देऊन सेनासाहेबाचे मोकाबल्यास पाठविले. तो दर मजल येऊन पोहोंचले, ते समयीं रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे फौजेचा मुक्काम, मौजे शिरस घांट प्रगणे भानार गंगापार तेथें होता; तशांत दिवाण मजकूर जमावानिशी आले. लढाईचा नक्षा उभा राहिला. ते समयीं सेनासाहेबानीं करांडे याशीं सल्ला करून कांहीं जमाव सोनबरडीचे सुमारें ठेवून, व कांहीं जमाव गिरोली परगणे भानार येथें ठेविले. व दोहीं बाजूस आपली फौज करून मध्यंतरी रघुनाथसिंग दिवाणाचा जमा घेरून सेनासाहेबांनीं पळ काढिला. गोंड हौंवभरी होऊन मागें लागले ते समयीं डोह नदीचा आडवा होता त्या ठिकाणीं मिरनगर सोनबरडी पावेतों एकच डोह होता त्या जागेवर लढाई उभयता फौजेशीं चांगली झाली. त्या काळीं रघुनाथशिंगाची शिकिस्ती होऊन दिवाणा कडील बहुत लोक मारले गेले. त्या प्रसगीं रघुनाथसिंग जखमी होऊन खेतास राहिले. बरकड त्याची जमात, त्या ठिकाणीं डोहांत बुडाली आणि सेनासाहेबांनीं दिवाणास उचलून आणून त्याच्या जखमाच्या मरामती करविल्या आणि त्याजला फितुरांत घेऊन त्याशीं स्नेहभाव केला. आणि सांगितलें कीं "बालिशास हस्तगत करून दिल्यास तुझे चालवू." याप्रमाणें त्याणें ही कबूल केलें.

६८ लेखांक २ टीप २१ पहा

६९ या साधुपुरुषाविषयीं कांहीं माहीती मिळत नाहीं. आमच्या भंडारा येथील मित्रांनीं या गोष्टीकडे लक्ष पुरवावें

७० भानार=भानोरें=भंडारा

७१ आशायुक्त, अति सारा.

७२ पराभव.

यावर त्याजला देवगडास रवाना केलें व आपण भानार येथें मोरचे बसवून लढाई सुरू केली. त्या काळीं किल्यांत भानाऱ्याचे हरी पाटील किल्लेदार होता यानें बावीस दिवस किल्ला लढविला. शेवटीं फितुरांनीं सेनासाहेबा कडील सरदार रघूजी कराडे यांणीं त्या पाटलास धरून आणिलें. त्या वेळेस सेनासाहेबांनीं आज्ञा केली कीं "यांजला जिवें मारावें." त्यावरून कराडे मजकूर यानीं त्याज विषयीं विनंती करून पाटलाचा प्राण वांचविला. आणि भानार येथील किल्ला हस्तगत करून ठाणें बसविलें.

तेथून कूच करून रामक्षेत्रास[७३] फौजे सुद्धां गेले. तेथें आंब कुंडावर स्नान करून नवस केला जे " आमची कार्य सिद्धी झाल्यास गडावर रामचंद्रजीची स्थापना करून जागा ब्राम्हणास अग्रहार[७४] धर्मादाय देऊं ". असा निश्चय करून निघाले.

तसेच फौजे सहित देवगडास गेले तेथें किल्यांत वालीशा होता. ते प्रसगीं दिवाणांनी वालीशास सांगून पाठविलें कीं "आपण किल्या बाहेर यावें, बंदोबस्त आम्हीं चांगला केला आहे." याजवरून ते बाहेर आले तसेच सेनासाहेबांनीं आपले फौजेचा वेढा त्याचे जमावासि घालून वालीशास धरून कैद केलें. तसेच तेथून रतनकुवर राणीची भेट घेतली. अकबरशा व बुराणशा राजे यांच्या ही भेटी झाल्या. बोलणीं करारामदाराचीं झालीं. त्यासुद्धां रघोजी भोंसले सेनासाहेब यांणीं राणी सुद्धां उभयतां बंधु राजे यांजला घेऊन नागपुरास आले.

तशांत वर्तमान समजलें कीं ब्रम्हपुरीवाले[७५] यांनीं काहीं जमाव पवनीचे सुमारास पाठवून वाटा मारितात. ही बातमी कळतांच रघूजी कराडे याजला पुढें फौज देऊन ब्रम्हपुरीस पाठविलें. मागाहून आपण ही कांहीं फौज नागपुरीं ठेवून ब्रम्हपुरीस गेले. तेथें किल्यात खमेनसिंग जमादार व आभीराय[७६] नामें दोघे भाऊ जमयतीनिशीं होते. त्यांनी बारा दिवस किल्ला भांडविला. शेवटीं हल्ला लढाई करून सेनासाहेबांनीं व त्याचे सरदारांनीं किल्ला हस्तगत केला. जे वेळेस कराडें खमेनसिंगास धरून आणिलें ते वेळेस सेनासाहेबां-

---

७३. रामटेंक या क्षेत्राची फार ख्याति आहे. याच्या आसपास उत्तम विड्याचीं पानें होतात येथें पहाडाचे माथ्यावर रामाचें प्रख्यात देवालय आहे कार्तिकी पौर्णिमेस येथें मोठी यात्रा भरते देवस्थानाचें उत्पन्न भोंसले राजानीं दिलेलें मोठें आहे व देवस्थानाचा कारभार पाहण्यास तीं एक मंडळी नेमली आहे.

७४. अग्रहार=अग्राहार " ब्राह्मणाचें कुटुंबपोषणद्वारा ईश्वरप्रीत्यर्थ राजादिक जमीन, ग्राम, इत्यादि दान देतात तो "

७५. ब्रह्मपुरी हे शहर चन्द्रापुराच्या ईशान्येस १० कोसावर आहे.

७६. ' आणीराय '=असही होईल.

नीं आज्ञा केली कीं "याजला जिवें मारावें." ते वेळेस कराडे यांणीं विनंति केली की "ऐसा जवामर्द मनुष्य मारणें सल्ला नाहीं. त्याचे हातून पुढें ७७लांझीचा उद्योग करणें जरूर आहे. यास्तव याजवर सर्फराजी करावी. व भानेरे येथील किल्लेदारी याजकडे द्यावी." याजप्रमाणें बोलून माफ करविलें.

सेनासाहेबानीं तेथील ठाणें बसवून फौजेसुद्धां कूच करून भानाऱ्यास आले. त्या प्रसगीं भानारे येथील विचार पाहिला तर हरी पाटील याचा डौल बैदलीचा दिसूं लागला. हें चांगलें नाहीं याजकरिता खेमनसिंग जमादार याजला किल्लेदारी भानार येथील देऊन सेनासाहेब नागपुरास गेले. तेव्हा त्या सधींत अकबरशाहा पळून एलिचपुरास असफजाहाकडेस जाऊन राहिले होते. रतनकुवर राणीचें बोलणें रघोजी भोंसले यासी पडलें कीं "दोघे पुत्र माझे आहेत. तिसरे तुम्ही आहात. तीन हिस्से आमचे राज्याचे करावेत." याप्रमाणें नेम ठरवून एक हिस्सा गोंडवण प्रांतांचा, त्यांत किल्ले पवनी व मारूड व मूळतापी बरघाट हे खांसाहेबांस त्यांनीं आपले सतोषानें दिले. संवत १७९४ शके १६५९ फसली सन ११४५ चे सालीं करार मदार लिहून खेरिज खडणी दहा लक्ष रुपये नगदी स्वारीखर्च दिला. रघुजीबोवा शिपाई दोस्त एक पैसा जवळ न ठेवितां तमाम फौजेस खर्चास देऊन फौजेस रजावतीनें ठेवित होते. व अडचणीचे प्रसंगास कोणासही शब्द टाकिल्यास माघारे घेत नव्हता. व कूचमुक्काम कोणासच कळवूं नये. हरवक्त म्हणत असावे. "जें राम करील तें खरें." जवामर्दी जातीनीं करावी. ऐष आराम बिलकूल नाहीं. घोड्यावरच भाकर खावी. याप्रमाणे चाल धरणा सेनासाहेब ठेवून होते. वाटणीचा बदोबस्त होऊन आपणास जागा छावणीस नागपुर नेमस्त करून पुढें ७८छत्तीसगड बंगाला येथें तुळजो राम याजला फौजेसुद्धां रवाना करावें हा बेत होता. तो राहून तुळजोपतास गोंडवाण प्रांतीं ठेविलें. आणि आपण वऱ्हाडप्रांतीं जाऊन, तसेंच साताऱ्यास जाऊन राजदर्शन घेतलें. ७९राजश्रीस बहुत सतोष झाला. महाराज कृपावत होऊन शके १६६० अरबी सन ११३९ चे सालीं सनदा दिल्या:—

१. सनद एक खास दस्तुर फौजेचे बेगमीबद्दल दिले. सुभे आठ बितपसील.

| | |
|---|---|
| १ सुभा लखनौ. | १ सुभा बेदर. |
| १ सुभा मकसुदाबाद. | १ सुभा ढाका बंगाला. |

---

७७. लांजी हा गाव बालाघाट जिल्ह्यात भंडाऱ्यापासून ५० कोसावर आहे. हें शहर गोंड लोकांचें वसतिस्थान होतें

७८ फितुरीचा

७९. शाहू महाराज.

| | |
|---|---|
| १ सुभा बितीयाचा. | १ सुभा इलहाबाद. |
| १ सुभा बुंदेलखंड. | १ सुभा हजीपुर पटणे. |
| ४ | ४ |

८

येणेंप्रमाणें करून दिलें. सुरूसनतिसा सिलासेन मयातैन अल्लफ.
१ चौथ मोकाशाच्या सनदा करून दिल्या.

| | |
|---|---|
| १ प्रांत देवगड. | १ प्रांत बर्गड. |
| १ प्रांत गढ. | १ प्रांत चांद दरोबस्त. |
| २ | २ |

४

सदर्हूप्रमाणें लिहिलें.

येणेंप्रमाणे देऊन सरकारचा हुकूम झाला कीं " चंदीचंदावरास फत्तेसिंग राजे भोसले याची रवानगी आहे त्या समागमें हमराह होऊन फौजेसुद्धां जाऊन सरकारचे भाऊबंद आहेत त्यांजला चंदा साहेबांचा उपद्रव होऊन परागंदा झाले. याजकरितां शत्रूचें पारिपत्य घडावें." सरकार आज्ञा शिरसावंद्य करून चंदावरास जाण्याकरितां वऱ्हाडास आले ते वेळेस देवगड प्रांतीं येऊन फौजेचा बदोबस्त तुळजो राम याजकडेस नेमिला. महाली मुलकी देवगडची फडनवीसीचे काम गोपाळ रघुनाथ याजकडे सांगितलें. व छत्रवाले बिश्वनाथ कोन्हेर व कारभारी बगूजी बाबूजी जोशी पवनीकर असे नेमस्त करून आपण नांदेडास वसती करून हैदराबादचे जिल्ह्यांतून चालले. समागमें फौजे पावेतों सरदार रघूजी करांडे व कृष्णाजी आठोले व नऱ्होजी जाचक व शिवाजी केशव टाळकुटे यासहित सन ११५१ फसलीचे सालीं चंदावरास फतेसिंग राजे भोंसले याजला सामील झाले. जागजागीं खडण्या घेऊन चंदासाहेबाचे फौजेशीं लढाया मारावर घेण्यांत आल्या. तिकडील फौजेची शिकस्त आपलेकडील फत्ते होऊन चंदासाहेबास धरून कैद केलें. फौजेंत लूट ही मनस्वी आली. चांगली जागा हस्तगत करून राजश्रीचे भाऊबंद परागंदा झाले होते ते आपले स्वस्थळास स्थापित केले आणि जागजागी खडण्या घेऊन चंदावरच्या नौबती दोन पाडाव आणिल्या. एक सरकारांत आली ती साम्प्रत सरकारात सेनासाहेबाचे

———

•. लेखांक १ ला पृ० ३ ओळ ३-२ मद्दा

८१. दोस्त अलीचा जांवई
८२ तंजावर

वाजत आहे व दुसरी कृष्णाजी आठोले समशेर बाहदराकडील त्याचे येथें आहे. दोन वर्षे स्वारीस लागलीं.

बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीहून साताऱ्यास आले, नतर कौल जाहला. यानवर पेशवाइचीं वस्त्रे मशारनिल्हेचे चिरंजीव बाजीराव बल्लाळ याजला देऊन हिंदुस्थानांत रवाना केलें. गुजराथेचे मार्गे फौजेसहित हिंदुस्थानांत माघारे येतांना, बडोदे प्रांतीं जागजागीं बंदोबस्त करून येत असतां त्र्यंबकराव दाभाडे सेनापति यांचे पदरीं पिलाजी गायकवाड त्याचे पुत्र दमाजी गायकवाड होते. तेव्हां दाभाडे वाट देईनात. त्या प्रसगीं लढाईत दाभाडे मेले व गायकवाड पंत प्रधानाशीं भेटले त्यास्तव गुजराथचा सुभा त्यांजला दिला व दाभाडे याचीं मुलें माणसे धरून कैद केलीं व पुढे दरकूच जाऊन हिंदुस्थानांत चालले. तंव महंमदखान बंगश व झरणेपरणेवाले बुंदेले याशीं लढाई होत होती. तेव्हा बुंदेले झरणेपरणेवाले यानीं बाजीराव बल्लाळ पेशवे याजला पत्र पाठवून आणविलें. बंगशाचें पारिपत्य करून बुंदेले यांणीं बाजीराव बल्लाळ पेशवे यांजपाशीं सख्यत्व करून झांशी, सागर, देवगाही, कालपी वगैरे प्रांत, गड तिसां लक्षांचा सरकारात पंत प्रधानाचे विद्यमानें दिला. करार करून बाजीराव पेशवे याजला मस्तानी कंचनी त्यांनीं दिली. बहुतसें द्रव्यही देऊन रवाना केले ते साताऱ्यास जाऊं लागले. पुढे नर्मदा नदीच्या किनाऱ्यास बाजीरावाचा कौळ ओंकार मांनधात्यावर झाला. त्याचे पुत्र बाळाजी बाजीराव फौज समेटून साताऱ्यास गेले. कच्चें वर्तमान झाडून अवग्र निवेदन केलें. राजश्रीनीं संतोष पावून बाळाजी बाजीराव यांजला पंत प्रधानाचीं वस्त्रे देऊन मागती हिंदुस्थानांत रवाना केलें.

नतर रघोजी भोंसले चंदासाहेबासह साताऱ्यास राजदर्शनास गेले. चंदासाहेब याजला हुजूर पोहचवून झालें वर्तमान राजश्रीस निवेदन केले. चंदासाहेबास धरून आणिलें आणि भाउबंद स्थळास कायम केले हे ऐकून राजश्रींनीं बहुत खुषी मानून सेनासाहेबास बहुमान वस्त्रे देऊन गौरव केला त्या प्रसगीं सरकारात विनती केली कीं, " राणोजी भोसले संताजी भोसले यांचे भाऊ व कान्होजी भोसले येथें आहेत यांजविषयीं परवानगी दिल्यास घेऊन जाईन. आणिकही भाऊबंद आहेत याजवर कृपावंत होऊन परवानगी व्हावी. " याजवरून आज्ञा झाली. त्यावरून

---

८३. शके १६६१ त आश्वीन मासीं काळझाला

८४ खंडेराव दाभाड्याचा पुत्र पेशव्यांची बखर पृ० ४० शेव ५० पहा

८५ पेशव्यांची बखर पृ० ७-१८ पहा

८६ हा अलाहाबादेचा सुभेदार पेशव्यांची बखर पृ० ३५।३६ पहा.

८७ पेशव्याची बखर पृ० ५४ पहा.

८८ थोरले शाहू महाराज यांचें चरित्र पृ० ८१ पहा

पंतप्रधान यांस दादा साहेबांकडील फौजेची व दत्तपुत्र घेतल्याची [ खबर ] कळली तेव्हां श्रीमंत ज्येष्ठमासीं स्वारी तयार करून घोडपेस गेले. मोकबला दोन्ही फौजेचा होतां कारभारी चिंतो विठ्ठल पाडव केले. त्याचे बंधू मोरो विठ्ठल जखमा लागून खालीं आले. दादासाहेब घोडप किल्यावर गेले. फौज निघोन गेली. किल्ला वेढिला. तेव्हा दादासाहेब खालीं आले. त्यांस घेऊन सत्ताविसावे दिवशीं मोरो बाबूराव कारभारी यास घेऊन सखाराम भगवंत यासुद्धां पुण्यास आले. रामचंद्रबाबा याचा वाडा सात मजली होता तो जळाला त्या जाग्यांत साठे व बामनभट शालिग्राम व देशपाडे यांस जागा दिल्या. त्यांनीं घरें बांधिलीं. कलम.

शके १६९० सनें ११७८. दादासाहेब यांसि वाड्यांत बंदोबस्तानें ठेऊन श्रीमंत स्वारीस निघाले. बराबर रामचंद्र गणेश व गोपाळ गोविंद व शिंदे होळकर सुद्धां वराडात स्वारी केली. जानोजी भोंसले मोठे फौजेनें चालून आले. सरकारफौजेचा दाब घेऊन पळ काढिला. मागें रामचद्र गणेश व गोपाळराव गोविंद. त्याचे मागे खासे श्रीमंत पंचवीस कोसांचे मजली करून नागपूर लुटले. देवगड चांद पावेतों मुलुकांत रांजीक केले. खंडणी घेऊन तह जाहला. रामचद्र गणेश व शिंदे होळकर हिंदुस्थानांत रवाना केले. श्रीमंत व विसाजी कृष्ण निघोन पुण्यास आले. कलम.

शके १६९१ सैन ११७९. खासा स्वारी करनाटक प्रांतीं कारभारी मोरोबाबूरावबराबर नारायणरावसाहेब. जिजगल[?] किल्यावर हल्ला झाला, तेथें नारायणराव साहेब यांचे हातास गोळी लागली. किल्ला फते झाला. नतर त्रिंबकराव मामा करनाटकांत छावणीस ठेऊन श्रीमत पुण्यास आले. दादासाहेब वाड्यात होते. कारभारी मोरो बाबुराव व सखाराम भगवत. विसाजी कृष्ण व रामचद्र गणेश व शिंदे होळकर हिंदुस्थानात फत्तरगडावर आहेत. कलम.

शके १६९२ सैन ११८०. खासा स्वारी निघोन तांदुळवाडी पावेतों गेली, शरीर अस्वस्थ झाले यामुळे आप्पा बळवत याजबरोबर फौज देऊन मामा क-

---

१४ "सु० स० तिस्सां तिस्सैन (म० अ० ११६९ इ० स० १७६८) रामचद्र गणेश व विसाजी कृष्ण त्रिंबक वगैरे किलयाचे बदोबस्तास होते तेथुन आल्यावर हिंदुस्थानची रवानगी झाली ते मागती खासा स्वारींत येऊन वर्ष प्रतिपदेस हिंदुस्थानांत गेले"

१५ पटवधन

१६. राजीक—नासाडी, धुळधाणी

१७ "सु० स० सब्बैन (म० अ० ११७० इ० स० १७६९) त्रिंबकराव विश्वनाथ कर्नाटकांत" इ० व०

१८ "सु० स० इहिदे सब्बैन कृष्णराव बळवत यास मामाकडे रवाना करून पुण्यास आले" इ० व० कृष्णराव बळवत हेच आपा बळवत. हे बळवतराव गणपत मेहेंदळे पाणिपतच्या लढाईत पडले त्यांचे चिरंजीव भाऊ साहेबाची बखर, शेवट पहा

हे करनाटकांत रवाना केले. खासे पुण्यास आले–कारभारी मोरो बाबूराव, सखाराम भगवंत घरीं. दादासाहेब वाड्यांत. शिंदे होळकर त्रिसाजी कृष्ण रामचंद्र गणेश हिंदुस्थानांत. त्रिंबकरावमामा करनाटकांत. कलम.

१ शके १६९३ सनें[९९] ११८१. खासे स्वारीस निघोन शरीरास विकृती झाली सबब घरास आले. नारायणराव पुण्याहून श्रीमंता कडे गेले. रामचंद्र गणेश हिंदुस्थानातून त्रिसाजीकृष्ण यांचें न बने म्हणोन निघोन आले. भेटी झाल्यावर सारे पुण्यास आले. अमृतराव याचें लग्न होंवयास जाहलें. शिंदे होळकर त्रिसाजी कृष्ण फत्तरगडास. त्रिंबकराव मामा कर्नाटकांत. कलम.

शके १६९४ सनें[१००] ११८२. खांशांचें शरीर अशक्त जाहलें सबब थेवरास श्रीगणपती जवळ राहिले. दादा साहेब पुण्यात वाड्यांत. करनाटकातून त्रिंबकरावमामा स्वारी करून भाद्रपद मासीं आले. दादा साहेब वाड्यांत होते. त्यांस राम शास्त्री बावां सहित थेऊरास आणून स्नेहाच्या गोष्टी सांगून कार्तीक वद्य अष्टमी रोजीं श्रीमंतीं अवतार समाप्त केला. मोरो बाबूराव कारभारी घरीं ठेऊन सखाराम भगवंत कारभारास लाविले. नारायणराव साहेब सार्थक करावयास. संपूर्ण राजमंडळ सुद्धां थेऊरीं जमा झाले. नारायणराव बल्लाळ कारभारी सखाराम भगवंत. श्रीमंत कैलासवासी झाल्या नंतर स्वारी मार्गशीर्ष मासी सातान्यास निघोन गेली. राजदर्शन झाल्यावर राजे यांणीं पेशवाईचीं वस्त्रें श्रीमंतास व अष्टप्रधानांस चाली प्रमाणें वस्त्रें देऊन दिवाणगिरी व मुतालिकी वस्त्रें पुरंदरे यास जाहलीं. नंतर सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन फडणीस व हरी बल्लाळ फडके व हुजूरचे दरकदार व रंगो कोन्हेर एकबोटे यांस वस्त्रें दिलीं. महाराजांचा निरोप घेऊन पंतप्रधान पुण्यास आले. दादासाहेब वाड्यात असतां त्यांची कन्या सौभाग्यवती दुर्गाबाई पांडुरंगराव बारामतीकर यास देऊन लग्न केलें. खासे श्रीमंत, कारभारी सखारामपंत, स्वारीस निघोन गंगापुरी गोपिकाबाई होतीं त्यांस भेटून पुण्यास आले. दादासाहेब यांचा बंदोबस्त केला. कलम १

---

९९ "सु० स० इसन्ने सब्बैन (म० अ० ११७२ इ० स० १७७१) खासा स्वारी कढारे [कवरे ?] यास गेली. नगर वगैरे येथें जाऊन पुण्यास आली नारायणराव याची स्वारी निघोन कढारे यास गेली पुढें खासा स्वारी बराबर आली." दु० ब०.

१००. "सु० स० सल्लास (सब्बैन म० अ० ११७३ इ० स० १७७२) नारायणराव पुण्यास कारभारास" दु० ब०.

*अष्टसिद्धि विनायकांपैकीं थेऊर येथील एक

## कारकीर्द नारायणराव बल्लाळ.

१ शके १६९५ सनं ११८३. कारकीर्द रघुनाथ बाजीराव व मातोश्री गंगाबाई सुद्धां.

१ पंतप्रधान नारायणरावबल्लाळ कारकीर्द, कारभारी सखाराम भगवंत, शके १६९४ मार्गशीर्ष मासीं वस्त्रे झालीं तागाईत फाल्गून अखेर शके अखेर. इस्तकबिल चैत्र शुद्ध १ शके १६९५ तागाईत भाद्रपद शुद्ध १४. खांसे वाड्यात असतां पूर्वेचे खिडकी लहान असे ती मोठी करावया करितां भिंत पाडिली होती. दरवाजा लावावा तो मिति मजकुरीं स्वारी पर्वतीस जाऊन राघोजी आंग्रे सरखेल त्यांस भेटून वाड्यांत आले. तितक्यात लिमयाबावाचे पुत्र बाबा गोसांवी संस्थान सहित वाड्यात आले होते, त्याचे पंक्तीस भोजन होणें आणि वर्तमान कळलें कीं गारदी दगा मात करणार त्याचा बंदोबस्त हरी बल्लाळ यांस सांगितला. खांसे जेऊन महालांत गेले. तों सुमेरसिंग व महमदइसफ सरदार तलबेचा हंगामा वाड्याजवळ येऊन पडकी भिंतीकडून वाड्यावर चढले. खरकसिंग वाड्यात होता. तो त्यांस मिळाला. गारदी महालात शिरले. दिल्ली दरवाजा लावून घेतला. गोळ्या चालल्या. श्रीमत महालातून निघान दादासाहेब होते त्यांजकडे गेले. सुमेरशिंग मागोमाग आला. तुळाजी पवार खिसमतगार त्याने मागे ओढिला तों चाफाजी टिळेकर खिसमतगार येऊन पोहोंचला. त्याचे गळ्यास श्रीमंतानीं मिठी घातली. सुमेरशिंग व तुळ्या पवार याने तरवारीचे वार टाकून दोघेही ठार केले. दादासाहेब यांस खालीं आणून चौकेखणांत बसविलें. नारोजी नाईक जासूद आला त्यास ठार मारिलें. इच्छाराम पंत ढेरे वाड्यात गेले त्यास दरवाज्या जवळ ठार मारिले. गाई ठार मारिल्या. हरी बल्लाळ फडके वाड्यात जावयास गेले तों दरवाजे बंद. तेव्हां फडके व सखारामपत बुधवारचे चावडीस जाऊन बसले. लोक व फौजा तयार होऊन शहरातील रस्ते धरिले. दादासाहेब याचे चोबदार लोकांस बोलावयास आले. तेव्हां सखारामपंत यांस पुसावयास आले. त्याणीं चिठी वाड्यात पाठविली. तिचे उत्तर आले. ती चिठी घेऊन हरीपंत बारामतीस निघून गेले. सखारामपत आपले घरास गेले. संध्याकाळ झाला. बजाबा पुरंदरे व मालोजी राजे घोरपडे वाड्यात जाऊन आले. श्रीमताचा काळ झाला हें वर्तमान सर्वांस

---

१ "सु० स० अर्बा (सब्बैन म० अ० ११७४ इ० स० १७७३) सन सल्लास मार्गशीर्ष मासीं वस्त्रें झालीं सन अर्बा भाद्रपद मासीं दगा होऊन काळ झाला

आश्विन मासीं विसाजी कृष्ण हिंदुस्थानातून आले.

आश्विन मासीं वस्त्रें आणविलीं व खाशी स्वारी दसऱ्यास बेदराहून म ( मु ? ) ल्हेर पावेतों गेली " हु० ब०

२ हंगामा=आरडा ओरड. गर्दी.

३. ही चिठी व तिचें उत्तर यांत काय मजकूर होता ते कळत नाहीं.

समजले. नंतर त्रिंबकराव मामा व सर्वत्र मिळोन श्रीमंतांचे शव पुलापाशीं* नेऊन दहन केलें. भाद्रपद शुद्ध १४. दादासाहेब दुसरे दिवशीं पोशाक करून कचेरीस असतां सुमेरशिंग व महमद इसफ यांनीं तलबेचा दगा करून तीन दिवस बसविले. तेव्हां सखारामपंत यांनीं तलबेचा निकाल करून श्रीमंतांस मोकळे केले. कारभार चालला. नंतर चिंतो विठ्ठल व आबाजी माहादेव, सदाशिव रामचंद्र मिळोन स्वारीस बाहेर निघोन, कार्तीक मासीं बजाबा पुरंदरे यांस सातान्यास पाठवून रामराजे यांची वस्त्रे आणिलीं. रघुनाथ बाजीराव शिक्का झाला. स्वारी बेदरास चालली. बराबर सखारामपंत व बाळाजी जनार्दन आहेत. विसाजी कृष्ण हिंदुस्थानांत होते ते फत्तरगड लुटून संपत्ती नेली होती ती जडजवाहीर वगैरे घेऊन लोकाचे फडशे करून जामदारखाना व हत्ती सुद्धां दादासाहेब यांस येऊन भेटले. बावीस लक्ष रुपये जवाहीर व जामदारखाना दादासाहेब यांणीं वाड्यांत ठेवून विसाजीपंत यांस बराबर घेऊन बेदरास गेले. नबाबाची भेट घेतली. ६५,००,००० पासष्ट लक्षांचा मुलुक माघारा देऊन पुढें गेले. सखारामपंत व बाळाजी जनार्दन निरोप घेऊन घरास आले. हरी बल्लाळ घरींच होते. पुण्यास मुतालकीवर नारो आप्पाजी होते. कर्नाटकांत स्वारी चालली. तेव्हां त्रिंबकरावमामा यांबराबर बारा हजार फौज देऊन साबाजी भोंसले याजवर पाठविले. श्रीमंत बल्लारी पर्यंत गेले. पौष अखेर पुण्यांत नारायणराव साहेब यांची स्त्री गंगाबाई गरोदर होती ती निघोन पुरंदरास गेली. सखारामपंत व बाळाजी जनार्दन पुरंदरास गेले. नारायण आप्पाजी मुतालकीस होते त्यांनीं बाईंचे हुकुमावर केशवराव कोतवाल त्यास धरिले. पुण्यांत द्वाही फिरवून हुकूम मानोश्रींचा झाला. दादासाहेब याजबरोबर लोक गेले होते त्यांच्या घरीं चौक्या बसविल्या. त्रिंबकरावमामा भोंसल्या कडे पाठविले होते त्यांनीं साबाजी भोंसले यास अनुकूळ करून कुमकेस आणिलें. हरी बल्लाळ यांस सखारामपंत व नाना फडणवीस यांनीं त्रिंबकरावमामा यांजकडे रवाना केलें. दक्षिणेस बंदा जाहला हें समजून दादासाहेब करनाटकांतून माघारे पंढरपुरास आले. तों त्रिंबकरावमामा चालोन कासेगांव गोपाळपुरावर आले. लढाई होऊन मामा चैत्रमासीं पाडाव गेले. हरी बल्लाळ फौजे सुद्धां निघोन निजामअल्लीस भेटले. कृष्णराव बल्लाळ यांचे विद्यमानें पासष्ट लक्षाची जहागिरी भाऊसाहेब यांनीं घेतली होती ती देऊन नबाबा सुद्धां चालून आले. दादासाहेब यांनीं दोन मुक्काम करून, कूच करून [illegible] पुरास गेले.

---

* पूल लकडी-मार्गे पु० १ टी० ७० पहा।

५ जो उदगीरच्या लढाईंत भाऊ साहेबानीं मिळविला होता तो.

६. नारो अप्पाजी तुळशीबागवाले.

७. गंगाबाई

८ पाडाव गेले=धरले गेले.

मामा नखमीं होते त्यांचा काल चैत्रमासीं खडकतचे मुक्कामीं जाहला. हरी बल्लाळ नबाबाची फौज सुद्धां होती. तों अधिक वैशाख शुद्ध७ शके १६९६ गंगाबाई प्रसूत झाली. पुत्र माधवराव झाले. दादासाहेब सातपुड्याचे डोंगर पार गेले. फौज माघारी येऊन हरी बल्लाळ यास भेटले. बजाबा पुरंदरे व मुजुमदार व चिटणीस वगैरे निघोन पुरंदरीं श्रीमंता जवळ आले. सखाराम भगवत व नाना फडणीस यांस भेटले. कारकीर्द रघुनाथ बाजीराव महिने.—

८५ स्वारींत व मुक्कामीं शिक्का भाद्रपद तागाईत चैत्र अखेर शके १६९५ आठ महिने मुतालकी शिक्का चालला.

८४ पुरंदराहून मातोश्रीचा हुकूम माघ शुद्ध५ तागायत अधीक वैशाख शुद्ध१४ शके १६९६.

---

## कारकीर्द माधवराव नारायण प्रधान.

१ शके १६९६. श्रीमंत व मातोश्री गंगाबाई व कारभारी सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन. किल्यावर राहून हुकूम चालवितात. त्रिंबकरावमामा व हरी बल्लाळ नबाबास घेऊन दादासाहेब यांचे मागें लाविले. दादासाहेब बऱ्हाणपुरावरून सातपुडा पार गेले. नबाबाची छावणी औरंगाबादेस झाली हरी बल्लाळ खानदेश प्रांतींहून आले व श्रीमंतांस किल्यावर ठेवून सखाराम भगवत व बाळाजी जनार्दन हे फौजे सुद्धां दादासाहेब यांची समजूत करावी म्हणून गेले. थांलनेर घेतलें. नबाब येऊन भेटले. श्रीमंतांची समजी झाली नाहीं. तेव्हां त्यांस निरोप देऊन किल्यास दाखल झाले. थालनेर बऱ्हाणपूरची स्वारी खमस सबैनांत झाली. नारो आप्पाजी पुण्यात कामावर त्यांस किल्यावरून आज्ञा येताच गेले. दादासाहेब यांचे बराबर लोक गेले होते त्यांचेघरीं चौक्या बसविल्या. लोक घरास आल्यावर हुकुमा प्रमाणे चौक्या उठवीत होते. मार्गशीर्ष मासीं इंग्रज कोंकणांत येऊन साष्टी किल्ला घेतला. त्याजवर विसाजी कृष्ण पाठविले. त्याजवर दादासाहेब सातपुड्याच्या डोंगरातून जातां जातां सौभाग्यवती आनंदीबाई गरोदर होतीं त्यांस मार्गीचे श्रम न सोसत सबब पवाराकडे धारेचे किल्यात ठेवून आपण पुढें गेले. सौभाग्यवती आनंदीबाई पौष शुद्ध६स सक्रांतीचे पूर्वीं प्रसूत होऊन पुत्र बाजीराव झाले. ती खबर किल्ले पुरंदरास आली. श्रीमंतीं वस्त्रे व इनाम दिल्हें. नारो आप्पाजी पुण्यांत होते त्यांचा काळ फाल्गुन शुद्ध ५ झाला.

---

९. "सु० स० खमससबैन (म० अ० ११७५ स० इ० १७७४.) खानदेशातून हरी बल्लाळ गुजराथप्रांतीं. साष्टी मार्गशीर्ष मासीं गेली" डु० ब०

१०. हें थालनेर 'तालनेर' असावे

त्याचे भाचे जनार्दन आप्पाजी कारभार करू लागले, व त्याचा पुत्र तात्या किल्याचा कारभार करू लागले. कलम.

१. शके १६९७ सन ११८५. खासे व कारभारी किल्यावर. कोणास येणा जाणारास परवानगी लागत होती. होळकर व महादाजी शिंदे हिंदुस्थानांतून देशीं आले. हरी बल्लाळ फौजे सुद्धा दादासाहेब ज्या मार्गे गेले तेही तिकडेच गुजरात प्रांतीं आहेत. दादासाहेब सुरतेकडे आहेत. रामचंद्र गणेश फौजे सुद्धां तळेगांवावर होते तेथून करवीरास पाठविले. कोन्हेरराव पटवर्धन यास करनाटकांत रवाना केले. पुण्यांत जनार्दन आप्पाजी. कलम.

१ शके १६९८ [१२]सन ११८७. खासा श्रीमंत व कारभारी किल्ले पुरंदरीं होते. भाऊसाहेबाच्या नावें पूर्वी तोतया आला होता. त्याची चौकशी करून, बेडी घालून, किल्ले रत्नागिरीचे सुभेदार रामचंद्र नाईक पराजपे, त्यांचे स्वाधीन केले. त्याणीं त्यास काढून, लोक जमा करून, भाऊसाहेब म्हणून किल्ले घेतले. ही खबर किल्ले पुरंदरीं आली तेव्हा महादजी शिंदे यासि हुकूम देऊन पाठविलें त्यानीं जुन्नर किल्यास वेढा घातला. तो तेथून पळून कुलाब्यास गेला. तेथें राघोजी आंग्रे सरखेल यानीं धरून शिंद्याचे हवाली केला. शिंदे पुण्यास घेऊन आले. बाबूजी नाईक वगैरे लोकांस दाखवून खोटासा निश्चय करून, उटावर बसवून, शहरात फिरवून कुभारवेशीबाहेर मेकसू घालून मारला. मार्गशीर्ष शुद्ध ७ मगळवारीं. हरी बल्लाळ गुजरात प्रांतीहून किल्ले पुरदरीं आले. कर्जपट्टी लोकांवर [१३]घेतली. बाजीपंत आण्णा फौज देऊन कोंकणात पाठविले होते ते शिंद्यानीं धरले. ते निघून करवीराकडे शिरोळ कवठ्यावर रामचंद्र गणेश होते त्यांस मिळाले. कोन्हेरराव पटवर्धन करनाटकात होते त्याची आणि हैदरनाईकाची लढाई झाली. पांडुरगराव पटवर्धन पाडाव गेले. फौज कर्नाटकांत आहे. भिवराव यशवत पानसे याबरावर तोफखाना व फौज कोंकणात किल्ले घेतले होते त्याचे बदोबस्तास पाठविलें. कलम.

---

११. या गृहकलहाच्या वेळीं पेशव्याच्या राज्यावर जे अनेक हल्ले करणारे उत्पन्न झाले त्यापैकीं कोल्हापुरकर एक होत दुसरे इग्रज, हैदर, निजाम वगैरे

१२. सु० स० सब्बासबैन ( म० अ० ११७७ इ० स० १७७६ ) हरी बल्लाळ गुजराथेंतन आले बाजी गोविंद तोतया भीमराव पानसे कोंकणात बदोबस्तास पांडुरगराव स्वारीस कर्नाटकात धरिले गेले मोरो बाबूराव फाल्गुन अखेर कारभार करू लागले रामचंद्र गणेश कोरेगांवपर्यंत होते." दु० व० पाडुरगराव पटवर्धन यास हैदरानें पिंजऱ्यात घातलें होतें ! ! तेथेंच त्याचा काळ झाला मोरो बाबूराव हे मोरोपंत दादा फडणीस

१३ ही कर्जपट्टी मोहिमेच्या खर्चाबद्दल असावी. मागें पृ १३ टी. " पहा

१ शके १६९९ सनं ११८७. श्रीमंत व कारभारी पुरंदरी व जनार्दन आप्पाजी पुण्यात. हरी बल्लाळ फौज घेऊन कर्नाटकात गेले. महादजी शिंदे करवीरावर रामचंद्र गणेश त्यास मिळाले तुकोजी होळकर देशीं असता मोरो बाबूराव यांणी मसलत करून बजाबा पुरंदरे व माधवराव निळकंठ होळकरा बरोबर पुण्यास येऊन मातोश्री पार्वतीबाई यांजला घेऊन येरवड्यावर राहिले. तेथून थेऊरावर गेले तेथें पुरंदराहून सखाराम भगवत आले. फाल्गुन मासीं मोरो बाबूराव फौजे सुद्धा व होळकर सासवडास गेले. सखाराम भगवत व नाना फडणीस नारायणा जवळ व मान्चीखालीं मोरोबानीं कारभार करावा म्हणों लागले. असे काहीं दिवस गेल्यावर श्रीमंतांचा बंदोबस्त नाना व सखारामपंताचा होता. हरी बल्लाळ कर्नाटकांत होते त्यासि बातमी कळली त्यावरून ते कर्नाटकांतून निघून माहादजी शिंदे ह्यास करवीरीं भेटून बराबर घेऊन ज्येष्ठ अखेरीस दाखल जाहाले. सखाराम भगवत व बाळाजी जनार्दन याच्या भेटी झाल्या. फौज मोठी जमली. तेव्हा होळकर लुटावा तर सरदार मोठा यास्तव शिंद्यानी आपल्याकडे घेतलें. मोरो बाबूराव व बजाबा पुरंदरे कैद करून नगरास आषाढमासीं नेले. बजाबास किल्यावर ठेविले. शिंदे निरोप घेऊन जामगावास गेले. रामचंद्र गणेश कोरेगाव पर्यंत जाऊन माघारे आले. पुण्यास कारभारी जनार्दन आप्पाजी. माहदजी शिंदे यांणीं बऱ्हाणपूर शहर व असेर किल्ला व जहागीर श्रीमंता जवळून घेतली. कारभारी बाळाजी जनार्दन आणि सखाराम भगवत कैद[१६] करून आपण शिंदे हिंदुस्थानात गेले. कलम.

१ शके १७०० सन ११८८. श्रीमंत[व] कारभारी पुरंदरीं होते. दादासाहेब यांनीं इंग्रज बरोबर घेऊन बोरघाटास आले. तेव्हा महादजी शिंदे जामगांवीहून घाटतोडीं आले. नाना फडणवीस व सखारामपंत हे फौजेसुद्धा आले. इंग्रजाचे विद्यमाने दादासाहेब शिंद्याकडे आले. हरीबाबा त्याजबरोबर देऊन हिंदुस्थानात लाविले. इंग्रेज निघून गेले. शिंदे रहिमतपुरास गेले. तेथें शिंद्याची कन्या बाळाबाई लाडोजी नरशिंगराव देशमूख यास देऊन लग्न केलें. सखाराम भगवत फाल्गुन मासीं वांईस गेले. त्यानीं आपली कन्या सचीवाचे पुत्रास देऊन लग्न केलें. नाना फडणवीस किल्यावर होते. शिंदे लग्न करून किल्यास आले. सखाराम भगवतही आले. श्रीमतांची स्वारी

१४ “सु० स० तिस्सा सब्बैन (म० अ० ११७८ इ० स० १७७७) वैशाखमासीं स्वारी पुरंदराहून पुण्यास मुजीकरिता आली ” दु० ब०.

१५ नारायण कोण ? सवाई माधवरावास असें म्हटले काय ?

१६. ‘कैद’ बाबद्दल ‘कायम’ असें असावें.

किल्याखालीं डेऱ्यास आली. कचेरी केली. तेथें सखोराम भगवंत कैद करून सिंहगडास पाठविले. तेथून प्रतापगडास गेले. नतर शिंदे निघोन जामगावास गेले. शके मजकूरीं रामराजे यांनीं दत्तपुत्र वावीकर भोंसले यांचा घेऊन अवतार समाप्त केला. त्याचें नांव शाहू राजे ठेविलें. चैत्रमासापासून नवी मुद्रा झाली. कलम.

१ शके १७०१ श्रीमंत पुरदरींहून उतरून पुण्यास यावयाकरितां जेजुरीस आले. इंग्रेजांचा वकील पुण्यास आला. त्यास राहण्यास जागा मुळामुठा संगमीं दिली. श्रीमंत फौजसुद्धां चैत्र शुद्ध १ प्रतिपदेस पुण्यास वाड्यांत दाखल झाले. शिंदेही पुण्यांत आले. सरकारचे डेरे गारपिरावर उभे केले. श्रीमतांची मुज पर्वतीवर झाली. समारंभ मोठा केला. शिंदे वगैरे मुंजीस होते. मुंज झाल्यावर खासे वाड्यात दाखल. शिंदे हिंदुस्थानांत रवाना केले. डेरे अखेर सालीं वाड्यात आणिले. चिंतो विठ्ठल शिंद्यानीं बरोबर नेले व बाजी गोविंद जोशी स्वारीस कोंकणांत. कलम.

१ शके १७०२ सन ११९० श्रीमंत पुण्यांत वाड्यांत होते. इंग्रज आला म्हणून स्वारी पुरदरास किल्यावर गेली. हरी बल्लाळ फौजेसुद्धां इंग्रजावर कोंकणांत गेले. नाना फडणवीस फौज घेऊन पुनवल्यावर जाऊन राहिले. घाटाचे तोडीं बदोबस्त केला. पुणें पळालें. इंग्रेज पुढें आल्यावर पुण्यास आग द्यावी ही ताकीद भास्करपंत कार्नाटकर यांजबरोबर जनार्दन आप्पाजीस पाठविली. परतु आगीचा प्रसग पडला नाहीं. इंग्रज गेले. हरी बल्लाळ खालीं कोंकणांत. बाळाजी जनार्दन वरघाटीं. इंग्रेज शिकस्त होऊन गेले. श्रीमत पुरदरींहून पुण्यास आले. बाळाजी जनार्दन व हरी बल्लाळ येऊन भेटले. गणेशपत [18]भोरे [ ? ] कोंकणांत ठेविले होते ते गुजरात प्रांतींहून आले. रामचद्र गणेश कोंकणात शात झाले. त्यांचे पुत्र माधवराव रामचद्र व बाजी गोविंद गुजरात प्रांतीं गेले. ते अखेरीस आले. कर्जपट्टी लोकावर घातली. शिंद्यानी चिंतो विठ्ठल यांस नेले होतें ते आणून किल्यावर कैद केले. ते मेले. सखाराम भगवत शायरीकिल्यावर शांत झाले. नारायणराव साहेब याजवर ज्यांणीं हात टाकिला त्यांचीं पारपत्यें होत आली. महमद इसफ व सुमेरशिंग व खरकशिंग व तुळाजी पवार वगैरे जे सांपडले ते मारिले. बजाबा पुरदरे द्रव्य घेऊन सोडिले. मुजुमदारीवर आबा मुजुमदार केले. त्याचे घर जप्त केलें होतें.

---

१७ सखाराम बापूंचें स्वदस्तुरचें कितुरी पत्र नानांच्या हातीं लागलें होत पेशव्याची बखर पृ० १११ पहा

१८ "गणेश विश्वनाथ बेहरे पुढें गणेशपत खानदेशात गेले" दु० व० १० वर पृ० ३ - टी० १३ पहा

समस्तां मनीं लागली थोर चिंता । कपी बोलती नासलें कार्य आतां ॥ ८० ॥
पुढे राघवा शोक तो आवरेना । धरीतां बळें धीर पोटीं धरेना ॥
मिळालीं दळें भोंवतीं दैन्यवाणी । विलापे वदे राम कारुण्यवाणी ॥ ८१ ॥
पुढें बोलता जाहला वैद्य तेथें । प्रभू शोक केल्या पुढें काय होतें ॥
म्हणे औषधी शीघ्र अतां आणाव्या । न जातां निशी सर्व देहीं पिळाव्या ॥ ८२ ॥
बहूसाल तो पंथ दूरस्त आहे । करा वेग हा काळ जातो न राहे ॥
समस्तांकडे पाहिले राघवानें । कपी बोलते जहाले सर्व मानें ॥ ८३ ॥
बळासारिखी बोलिली सर्व सेना । निशीमाजि तो आचळू आणवेना ॥
रघूनायकें पाहिलें मारुतीला । कपीराज तो शीघ्र ऊदीत जाला ॥ ८४ ॥
म्हणे राम गा मारुता ये प्रसंगीं । विरांसारखी शक्ति तूं बोल वेगीं
वदे मारुती स्वामि देवाधिदेवा । गिरी आणितों शीघ्र सांगाल तेव्हां ॥ ८५ ॥
तयें बोलतां राघवा सूख जालें । प्रतीउत्तरीं कपीतें गौरवीलें
म्हणे मारुती जाय गा हे प्रसंगीं । गिरी आणिला पाहिजे रात्रभागीं ॥ ८६ ॥
म्हणोनी तुवां शीघ्र आताचि जावें । विरा लक्ष्मणालागि त्वां ऊठवावें ॥
कपी मारुती वीर तैसा उडाला । अकस्मात तो आश्रमामाजि गेला ॥ ८७ ॥
स्थळें निर्मिलीं रम्य नानापरीचीं । बहूसाल तीं भूवनें कूसरीचीं ॥
मुनी बोलती हो दयाळा[W] बसावें । फळें तोय सेऊनि सूखें रहावें ॥ ८८ ॥
म्हणे मारुती राहतां पूरवेना । तृषा लागली धीर पोटीं धरेना ॥
मुनीनें तडागा जळा दाखवीलें । जळा सेवितां थोर आश्चर्य जालें ॥ ८९ ॥
जळातूनि धाविन्नली जी विशाळा । विरें मारुतें देखिलें तीस डोळां ॥
मिठी घातली मारुतें चूर्ण केली । तिच्या मेदमांसें भुमी तृप्त जाली ॥ ९० ॥
निघाली तियेतूनि ते दिव्य कांता । निरूपी मुखें सर्व साकल्य वार्ता ॥
म्हणे राक्षसू बैसला कूडभावें । समर्था प्रभो त्यासि आधीं वधावें ॥ ९१ ॥
नव्हे मिथ्य साचार हें सांगतें मीं । प्रभो धाडिला रावणें काळनेमी ॥
तयें बोलतां मारुती वाँड जाला । ऋषी ऊठला शीघ्र युद्धासि आला ॥ ९२ ॥
महावीर राक्षेस कैसा कुकर्मी । बहूसाल ते जाहले काळनेमी ॥
प्रसंगीं तये थोर संग्राम जाला । कपीच्या करें काळनेमी निमाला ॥ ९३ ॥
विरें सुंदरीलागिं उद्धार केला । उडाला बळें तो नभामाजि गेला ॥
गिरीचंद्र टाकूनियां लागवेगीं । कपी वीर द्रोणाचळीं ते प्रसंगीं ॥ ९४ ॥
वटा वेढिता जाहला शेष जैसा । गिरी बांधुनी छेदिला शीघ्र तैसा ॥

५५ कूसरी=कौशल्य. W. दयळा—हो पुढें शीघ्र यावें. ५६. मेद=चरबी ५७. कूडभाव=कपटभाव. ५८. वाड=मोठा.

उडाला नभामाजि तो लागवेगें । बळें जातसे मारुती व्योममार्गे ॥ ९५ ॥
कपी लागवेगें बळें जात आहे । मही मंडळीं तेज हेलावताहे ॥
अयोध्यापुरीमाजि रामानुजानें । कपी भेदिला पाडिला एक बाणें ॥ ९६ ॥
मुखीं रामनामावळी बोलताहे । महावीर तो त्यास येऊन पाहे ॥
ह्मणे कोण तूं सांग आम्हा कपी रे । बहूसाल तूं दीससी साक्षपी रे ॥ ९७ ॥
मुखीं रामनामें सखा वाटतोसी । विरा कोण तूं कोठपर्यंत जाशी ॥
ह्मणे मारुती वोखटें थोर जालें । सुमित्रासुतालागिं देहांत आलें ॥ ९८ ॥
समाचार सांगीतला मारुतानें । मुखें बोलिलें शीघ्र रामानुजानें ॥
कपी कष्टलासी बहू दूर जातां । सुखें बाणमूखावरी बैस आता ॥ ९९ ॥
त्वरें पाठवीतों विरा शीघ्र जावें । पुढें राहिलें कार्य ×वेगीं करावें ॥
ह्मणे मारुती हे कदांहि घडेना । उडाला नभीं लंघितो देशनाना ॥ १०० ॥
त्रिकूटाचळीं राम तो वाट पाहे । विरेंवीर तो सर्व ही बैसला हे ॥
अवस्था बहू लागली आवरेना । बहू रात्र जाली कपी का दिसेना ॥ १०१ ॥
बहू राम तेथें उतावेळ जाला । अकस्मात तो मारुती शीघ्र आला ॥
कपी सर्व आनंदले गर्जताती । प्रभूलागिं सांगावया शीघ्र जाती ॥ १०२ ॥
मनीं चिंतिलें शीघ्र हातासि आलें । तयासारिखें ते समस्तांसि जालें ॥
सुषेणें रसू काढिला औषधींचा । क्षतामाजि तो वोतिला अमृताचा ॥ १०३ ॥
सुमित्रासुतालागिं आरोग्य जालें । समस्तीं चिरीं मारुता गौरवीलें ॥
त्वरें ऊठिला वीर सौमित्रबाहो । रघूनायकें देखिला दिव्य देहो ॥ १०४ ॥
कपी राम सौमित्र मेळा मिळाला । गिरी मारुती शीघ्र ठेवून आला ॥
पुन्हा मागुती भेटती एकमेकां । तया देखतां सूख जालें अनेकां ॥ १०५ ॥
कथा ऐकतां नासतें कार्य होतें । महा विघ्न ते भग्न होऊनि जातें ॥
सुखानंद आनंद नानाविलासी । अखंडीत हे प्रचिती रामदासीं ॥ १०६ ॥

## प्रसंग नववा.

ह्मणे वीर सौमित्र स्वामी समर्था । बळें तोडिजे थोर चत्वारि चिंता ॥
सुरेशासि ह्या मुक्त आधीं करावें । अरिभ्रातया राज्य हे शीघ्र द्यावें ॥ १ ॥
कपीराज हा राज्य त्यागूनि आला । कपीशीं पुन्हा पाहिजे शीघ्र गेला ॥
प्रभो नीजबंधूस त्या भेट द्यावी । अयोध्यापुरी सर्व सूखी करावी ॥ २ ॥

५९. रामानुज=रामाचा धाकटा भाऊ भरत. ×. वेगीं करावें–सिद्धीस न्यावें ६०. सुषेण=रामाच्या वैद्याचें नाव ६१. सुरेश=इंद्र. ६२. अरिभ्राता=बिभीषण ६३ कपीराज=सुग्रीव ६४. निजबंधु=आपला भाऊ भरत.

पुढें शीघ्र त्या रावणाच्या वधार्ती । समाधान तें पाविजे ते समस्ती ॥
म्हणोनी त्वरें हेंचि आतां करावें । बळें सर्व लोकत्रया सूख द्यावें ॥ ३ ॥
वदे रावणानूज वाक्य प्रमाणें । प्रभो कल्पवृक्षातळीं काय ऊणें ॥
परी होम आरंभिला रावणानें । पुरा जालिया भीडिजे त्यासि कोणें ॥ ४ ॥
कपी वीर ते पाठवावे भुपाळें । महा होमविध्वंसिजे शीघ्र काळें ॥
अरी रावणू तो रणामाजि येतां । पुढें पाठवावे तया मोक्ष पंथा ॥ ५ ॥
प्रभू हेर ते गुप्त लंकेसि गेले । समाचार साकल्य घेऊनि आले ॥
कपींद्राकडे पाहिलें राघवानें । विरां जाणवीलें तया सुग्रिवानें ॥ ६ ॥
पुढे ग्रयसख्यीं[1] कपी सिद्ध जाले । सहस्त्रें दहा वीर मार्गे मिळाले ॥
हनूमत तारासुतू[2] जांबुवंतू । गवाय्‌ सुषेणू बळी वीर्यवंतू ॥ ७ ॥
सुंगधू कपी नीळ तो शर्भ नामें । महा मैंद तो द्वीविदू वीर धर्में ॥
सहस्त्रें दहार्शी बळें सिद्ध झाले । महा वीर ते व्योमपथें[3] निघाले ॥ ८ ॥
किती एक राक्षस ते रक्षणेशीं । कपींनीं बळें युद्ध केलें तयाशीं ॥
मुखें हाकिती हाकिती थोर नेटें । तया पूसती रे दशग्रीव[4] कोटें ॥ ९ ॥
गुहेचे मुखीं लाविली चंड शीळा । तये भोंवते जाहले वीर गोळा ॥
शिळेनें शिळा फोडिली थोर घातें । कपी चालिले ते गुहेचे नि पथें ॥ १० ॥
पुढें मारुती चालिला लागवेगें । कपी चालिले सर्व ही मागमागें ॥
महायोगियाचे परी बैसला तो । नभीं पावकू[5] तो भडाडीत जातो ॥ ११ ॥
तया हाणते जाहले द्रूमपाणी[6] । मुखीं हाकिती टाकिती घोर वाणी ॥
शिळा शीखरें हाणती तो उठेना । कपी लोटती ध्यान त्याचें सुटेना ॥ १२
कितीएक ते गर्जती कर्णबीळीं । मुखामाजि ते टाकिती एक धूळी ॥
विरीं वानरीं मांडिलीसे धुमाळी । बहूतांपरी तांडिला होमकाळीं ॥ १३ ॥
बहूतांपरी मांडिले प्रेत्न नाना । परी रावणू काहि केल्या उठेना ॥
विरें अंगदें थोर वीचार केला । बळें शीघ्र अंतःपुरामाजि[7] गेला ॥ १४ ॥
बहूसाल अंतःपुरीं त्या सुनारी । तयांमाजि मंदोदरी मुख्य नारी ॥
तियेलागिं घेऊनि वेगी उडाला । महावीर तेथें अकस्मात आला ॥ १५ ॥
अलंकार चीरें[8] करें चूर्ण जालीं । बहू कंकणें भूषणें भग्न केलीं ॥
कपी कंचुकी[9] केश वोढूनि घेती । विटबूनि लोटूनिया शीघ्र देती ॥ १६ ॥

---

१ ग्रथसख्या=चोवीस हजार ( वाल्मीकि रामायणाची ग्रथसख्या चोवीस हजार आहे ) २. तारासुत=अंगद ३ व्योमपथें=आकाश मार्गानें. ४. दशग्रीव=दहा आहेत ग्रीवा (मस्तकें ) ज्याला ५ पावक=अग्नि. ६ द्रुमपाणि=द्रुम ( वृक्ष ) आहेत हातांत ज्याच्या ते. ७ अंत पुर=जनानखाना ८. चीरें=वस्त्र ९ कंचुकी=चोळी

अरे रावणा घे तुझी नीज कांता । जगज्जननी आणिली व्यर्थ सीता ॥
तिथे ऊसने काढिती द्रूमपाणी । वदे मुख्य मंदोदरी दैन्यवाणी ॥ १७ ॥
अहो प्राणनाथा असें काय केलें । तुम्हा देखता कीं मला कष्टवीलें ॥
महा रम्य नेत्रीं महा बोध जाती । विलापें करू लागली ते रूदती ॥ १८ ॥
करूणास्वरें रावणालागिं बाहे । प्रभू धाव रे वानरू नेत आहे ॥
प्रसगीं तये घोर आकांत जाला । भुमीकंप होता चि पाहों निघाला ॥ १९ ॥
पुढे अंगदा लात हाणोनि पाडी । तया जांबुवंतासि वेगें लथाडी ॥
कितीएक ते ताडिले मुष्टिघातें । किती वोढिले पाडिले व्योमपथें ॥ २० ॥
नभीं ऊर्ध्व पाहोनि वेगीं उडाला । बळें झोडिलें पाडिलें मारुतीला ॥
धरी ह्रदयीं शीघ्र मंदोदरीला । विवेके चि सबोखिलें[10] त्या वधूला[11] ॥ २१ ॥
अहल्या सती ते शिळारूप होती । विचारूनि पाहे नळाची दमंती ॥
बहू कष्टली मुख्य वृंदा पुलोमा । सिता सुंदरी सांगणें काय तुम्हां ॥ २२ ॥
बहूतां परी ते सती तोषवीली । पती धाडिता भूवनामाजी[12] गेली ॥
दळें सिद्ध केलीं रथारूढ जाला । रणीं शूर संग्राम सैरा निघाला ॥ २३ ॥
प्रतापें बळें वाहिनी[13] घोर चाले । कपी वीर ते सर्व पूर्वींच गेले ॥
पुढे सोडिता जाहला बाणजाळें । बळें धावती प्रेरिले दूत काळे ॥ २४ ॥
कपीभार ऊठावले लागवेगें । करीं घेतलीं वृक्ष पाषाण शृंगें ॥
बळें टोकित जाहले द्रूमपाणी । रणीं रावणें भेदिले सर्व बाणीं ॥ २५ ॥
गळाले महा वीर धाकें पळाले । चळीं कांपती राघवा आड गेले ॥
उभा राहिला राम तो वीर गाढा । करीं घेतला चंड वोढूनि मेढा[14] ॥ २६ ॥
बहू बाण सोडी महा वीर कैसा । रणीं क्षोभला काळ कृत्तांत जैसा ॥
महा वीर ते दोघ सन्मूख आले । बळें सोडिती बाण बाणीं मिळाले ॥ २७ ॥
रणामाजि ते तोडिती बाण बाणीं । बहू मातली ते क्रिरश्री कुराणी ॥
पुन्हा रावणें सोडिल्या बाण कोडी[15] । लिलाविग्रही[16] राम तात्काळ तोडी ॥२८॥
बहू क्षोभले व्योम संपूर्ण केलें । शरीं दाटलेसे नभो थाट जाले ॥
बळें तोडिती एकमेका शिरांचे । पुन्हा मागुती भार येती शरांचे ॥ २९ ॥
रणीं झुंजली ते महा वीर बाहो । मोहो पावले ते भयें केतु राहो[17] ॥

---

१०. सबोखिलें=समजाविलें ११. वधू=स्त्री १२. भुवनामाजि=घरांत १३. वाहिनी=फौज. १४. मेढा=तिरकमठा. १५ बाणकोडी=कोट्यावधि बाण १६ लीलाविग्रही=क्रीडे करितां धारण केलें आहे शरीर ज्यानें असा ( राम ) १७. राहूकेतु राक्षस, व नवग्रहात या दोघाची गणना आहे. ज्योतिष दृष्टीनें पाहिल असता पृथ्वीची कक्षा व चंद्रकक्षा याचे जे दोन संपात म्हणजे छेदनबिंदु तेच हे होत

बुधा मंगळा थोर आकांत आला । शनी सोम तो आपधाकें पळाला ॥ ३० ॥
ग्रहानेंग्रह भूतलाप्रत आले । विमानाहुनी देव धाके पळाले ॥
दिशा दिग्गजा व्यापिलें अंतकाळे । चळी द्विचळी कांपती ते चळाळें ॥ ३१ ॥
महावीर ते मातले घोर मारें । दिशा दाटल्या व्यापिलें अंधकारें ॥
पुढें पाहता येकमेका दिसेना । ध्वनी मानली ऊठले घोष नाना ॥ ३२ ॥
महावीर दोघे रणीं स्तब्ध जाले । पुढे पाहतां बाण बाणी गळाले ॥
पुन्हा मागुती हाणिती एकमेका । भरे नीकुरें टाकुनि थोर शंका ॥ ३३ ॥
पुढे रावणू पंन्नगास्त्रास सोडी । तयें चालिल्या त्या नभीं सर्पकोडी ॥
उभ्या वानरामाजि आकांत जाले । मुखें बोलती सर्प रे सर्प आले ॥ ३४ ॥
गरूडास्त्र तें राम सोडी भडाडा । नभीं चालिलीं पक्षिकूळें झडाडा ॥
तिहीं तोडिलीं सर्प कूळें तडाडां । कपी गर्जती नामघोषें घडाडा ॥ ३५ ॥
पुढें रावणें सोडिली तीं अचाटे । नभीं चाललीं थोर गंधर्वथाटें ॥
भुमी पाय आकाशपर्यंी शिशोळे । बहू भार ते धावले येकवेळे ॥ ३६ ॥
निवारावया राम तो तें चि सोडी । नभामाजि तें अस्त्र अस्त्रासि तोडी ॥
रणीं रावणू थोर क्रोधाग्नि ज्वाळा । रूपे जाहला थोर कर्कोट काळा ॥ ३७ ॥
शरा अस्त्र ते सोडिलें लंकनाथें । बहूसाल वर्षाव केला अनर्थें ॥
महासिंह नानापरी सर्प जैसे । महामत्त व्याघ्रापरी बाण तैसे ॥ ३८ ॥
वज्राअस्त्र सोडूनि राजीवनेत्रें । असभाव्य तीं चालिलीं वज्रअस्त्रें ॥
तिहीं सर्व ही बाण छेदून नेले । कपी वीर ते थोर आनंदवीले ॥ ३९ ॥
तया रावणा कोप पोटीं भडाडी । कडाडीत कोपें रणीं बाण सोडी ॥
अकस्मात तो त्यावरी स्पर्श जाला । गडाडीत मेघापरी शब्द केला ॥ ४० ॥
रथारूढ जाला रणीं लंकनाथू । पदीं चालतो रामराजा समर्थू ॥
नभीं देव ते देखवेना तयांला । रथू मातली शीघ्र तो पाठवीला ॥ ४१ ॥
बहू शस्त्र मंडीत रत्नीं विराजे । परी अंतकातुल्य तो राम साजे ॥
नभीं दुंदुभी घोष आकाश गाजे । तया रावणा अतरीं क्रोध माजे ॥ ४२ ॥
पुढें बोलता जाहला घोर वाणी । तुला साह्य जाला रणीं वज्रपाणी ॥
उभा रे रिपू खोळितो आजि बाणीं । तुझीं झुजता थोर वाटे शिराणी ॥ ४३ ॥
तुझा बधु म्यां पाडिला एकवेळां । रणामाजि त्या देखिले त्वा चि डोळा ॥
तयासारिखें तूज मारीन आतां । पतंगापरी जाळितों जातजातां ॥ ४४ ॥

---

१८. पन्नगास्त्र=सर्पास्त्र १९ शिसाळे=मस्तकें. २० कर्कोट= सर्प. २१. राजीव नेत्र= कमलनयन २२. मातली=इंद्राचा सारथी २३. अतक=यम २४. दुदुभी=नगारा. २५ वज्रपाणी=इंद्र २६ शिराणी=आवड.

पुढे ऐकता राम बोले तयासी । म्हणे ऐकरे रावणा गर्वराशी ॥
असंभाव्य रे वैभवें मातलासी । मराया रणीं आजि तू पातलाशी ॥ ४५ ॥
म्हणे राम रे रावणा वीरधर्मे । रणामाजि मीं तूज मारीन नेमें ॥
पळालासि कोठें तरी हें सुटेना । तुझी मृत्युवेळा कदा पालटेना ॥ ४६ ॥
रिपू जाणरे तूजला मृत्यु आला । दिल्हें अक्षयी राज्य बीभीषणाला ।
सिते कारणें थोर कापट्य केलें । अभाग्या तुझें सर्व ही राज्य गेलें ॥ ४७ ॥
तयें बोलता कोपला वीर गाढा । रणामाजि त्या घर्डिल्या वज्रदाढा ॥
पुढें शूळपाणी करी सज्ज मेढा । बळें बोढितां चूकला राम बोढा ॥ ४८ ॥
कडाडीत घोषें रणीं तेचि काळीं । रघूनायका बैसला बाण भाळीं ॥
असंभाव्य तो कोपला चापपाणी । दशग्रीव तो छेदिला शीघ्र बाणीं ॥ ४९ ॥
बळें मारिती वारिती बाणजाळें । पुन्हा क्षोभले धावती ते उफाळें ॥
रिपू कोपला थोर काळाग्नि जाला । तया रावणा थोर आवेश आला ॥ ५० ॥
प्रतापें रणीं राघवें एकवेळें । बळें फोडिलीं बाणघातें कपाळें ॥
रथी सारथी पाडिले अश्व जे का । विरें नीकुरें भेदिले एकमेका ॥ ५१ ॥
बळें छेदिता जाहला बोछू दतीं । बहू बाण ते सोडिले व्योमपथीं ॥
कितीएक ते राघवें चूर्ण केले । कितीएक ते बाण अंगीं बुडाले ॥ ५२ ॥
तया देखना रावणू हाक फोडी । असंभाव्य ते मागुते बाण सोडी ॥
बळें अश्व ते मातली भग्न केला । ध्वजस्तंभ तो शीघ्र छेदून नेला ॥ ५३ ॥
भयातूर ते भार गोळांगुळांचे । ऋषी देव गंधर्व इत्यादिकांचे ॥
रणीं आगळें दाखवी लंकनाथू । भयें बोलती माडिला कीं अनर्थू ॥ ५४ ॥
पडे मातली अश्व ते पळवीले । ऋषी देव गंधर्व साशंक जाले ॥
कपी बोलती माडलें विघ्न हें कीं । रणामाजि त्या रावणें जिंकिलें कीं ॥ ५५ ॥
अगस्ती ऋषी तो रणामाजि आला । रणीं मंत्र सांगे तया राघवाला ॥
जपे आदरें राम तो मूळ मंत्रें । रवी शीघ्र येऊनि दे सारशास्त्रें ॥ ५६ ॥
म्हणे राघवा जिंकिशी रावणाला । अती काळ हा वेळ नाहीं तयाला ॥
पुढें राघवें विंधिले पंच बाणीं । तुरंगू रणीं पाडिले दैन्यवाणी ॥ ५७ ॥
रणीं राघवें चूर्ण केले रथाचे । बळें ऊसने घेतलें मातलीचे ॥
विरें सारथी धाडिला मृत्युपंथें । ध्वजस्तंभ तो पाडिला बाणघातें ॥ ५८ ॥
पुन्हा राघवें मागुती तेचि काळीं । रिपू भेदिला बाणजाळीं कपाळीं ॥
सुरां देखतां थोर आनंद जाला । महद्भूत तो वानरीं घोष केला ॥ ५९ ॥

---

२७ शूळपाणी=शळ आहे हाती ज्याच्या असा २८ गोळांगुळ=वानर २९ साशंक=भयभीत

असभाव्य त्या राक्षसा कोप आला । बळें टाकिले शीघ्र तेणें शुळाला ॥
रणीं फोडिली हाक नैऋत्यनाथें । म्हणे शूळ आला प्रभो व्योमपंथें ॥ ६० ॥
बहू बाणसंभार जाता जळाला । पुढे शूळ पाशूपतें भग्न केला ॥
पुन्हा रावणें थोर संधान केलें । असभाव्य ते पोकळीमाजि नेलें ॥ ६१ ॥
सुरेशें गिरी फोडिला वज्रघातें । तयाचे परी भेदिलें रावणातें ॥
देहे खीळिला बाण पैलाड गेला । महीमंडळामाजि जातां निघाला ॥ ६२ ॥
पुन्हा सोडिलीं राघवें बाणजाळें । बहूसाल सूसाटती अंतराळें ॥
रथीं खीळिला प्राण व्याकूळ जाला । बहु मूर्छना सांवरेना तयाला ॥ ६३ ॥
रिपू भेदिला थोर लक्षून वर्मे । उभा राहिला राम तो वीरधर्मे ॥
रथू सारथी शीघ्र घेऊनि गेला । पुढे शुद्धि जाली तया रावणाला॥ ६४ ॥
बहू कोप आला तया रावणासी । म्हणे सारथ्या तू भयातूर होसी ॥
रथू काढिला कां तुवां लागवेगीं । न येता उणें दीसतें या प्रसंगीं ॥ ६५ ॥
म्हणे सारथी स्वामिया हो उदारा । रिपू पेटला तो रणीं घोर भारा ॥
रथारूढ राया तुम्ही वीकळांगें । म्हणोनी रथू काढिला लागवेगें ॥ ६६ ॥
तये बोलतां राव संतुष्ट जाला । समर्पीतसे हातिच्या कंकणाला ॥
बहू वेग केला तया लंकनाथें । रथू फीरवीला रणाचेनि पंथें ॥ ६७ ॥
रणीं माजल्या त्या बहू प्रेतराशी । पुढे जावया वाट नाहीं रथासी ॥
भुमी दाटली मेदमांसें अचाटें । रथांगें बळें वाजती चर्चराटें ॥ ६८ ॥
समारंगणीं रावणू शीघ्र आला । वदे घोरवाणी तया राघवाला ॥
उलंघी सिमा शीघ्र मृत्यू जयाला । रणीं कोण लेखीं तुला मानवाला ॥ ६९ ॥
असभाव्य तो रावणू बाण सोडी । नभीं वाकडीचे परी ते झडाडी ॥
उफाळें बळें धावती दिव्य घोडे । रथामाजि संघट्टणीं घोष गाढे ॥ ७० ॥
धुरा ऊलथो पाहती शीघ्र मागें । बिरीं चोढिले बाण ते लागवेगें ॥
रथामाजि तो पैस ऊदंड जाला । विरां मागुता थोर आवेश आला ॥ ७१ ॥
रणी राघवा रावणा युद्ध काळू । रिपूभारसंहार भूलां सुकाळू ॥
करीं चंड कोदंडें मंडीत बाणीं । उभे राहिले वीर ते वज्रठाणी ॥ ७२ ॥
रणीं येकमेकांसि ते घोर शब्दें । बहू भाषणे त्रासती वीर द्वंद्वें ॥
बळें धावती क्षोभले वीर क्रोधें ॥ पुढें मारितां शस्त्र क्रोधें विरोधें ॥ ७३ ॥
रणीं लोटला राम हा सूर्यवंशी । महायुद्ध आरंभिलें रावणाशीं ॥
उभे राहिले काळकृत्तांत जैसे । महावीर त्यां घोर आकांत भासे ॥ ७४ ॥

३० नैऋत्यनाथ=राक्षस. ३१. पाशुपत=यानावाचें अस्त्र ३२ सुरेश=इंद्र. ३३ मेद=चरबी. ३४. रथांगें=चाकें ३५. लेखा=हिशेब ३६ कोदंड=धनुष्य.

बळें सोडितां शक्ति नेटें सरारी । महा वात प्रख्यात पिच्छीं भरारी ॥
मही सप्तपाताळ घोषें गरारी । पळाली भुतें काळ पोटीं थरारी ॥ ७५ ॥
फणी[37] कूर्म वाराह चक्कीत जाले । विमानाहुनी देव ऋषी पळाले ॥
ग्रहो सोम सूर्यादि पोटीं गळाले । कपी खेचरां[38] दिग्गजा कंप जाले ॥ ७६ ॥
प्रसंगीं तथे थोर उत्पात जाला । नभीं शोणितांचा[39] बळें मेघ * आला ॥
धुमारा बहू दाटलासे दिगंतीं । असंभाव्य ते ऊलकापात होती ॥ ७७ ॥
बळें कोपले रुद्र काळाग्नि जैसे । अरीराय ते मातले भीम तैसे ॥
तयां झुजतां कोण कोणा निवारी । रणीं भीडती काळ कोदंडधारी ॥ ७८ ॥
रिपू सोडिती घोर शस्त्रे झणाणा । बळें वाजती बाणभाळी[40] खणाणा ॥
बहूसाल स्फुलिंग[41] जाती फणाणा । महीमंडळीं घोष ऊठे दणाणा ॥ ७९ ॥
महाशक्ति ते काळरूपें कडाडी । असंभाव्य ते ज्वाळवन्ही भडाडी ॥
मही मेरु मंदार घोषें गडाडी । बळें शोषला सिंधु[42] पोटीं तडाडी ॥ ८० ॥
पुढें राघवें लक्षिलें रावणातें । बळें मस्तकें तोडिलीं बाणघातें ॥
गिरीशीखराचे परी तीं विशाळें । पुन्हा नीघती कंठनाळे दिसाळें ॥ ८१ ॥
शिरें देखतां राम चक्कीत जाला । ह्मणे मृत्यु नाहीं गमे रावणाला ॥
वदे मातली स्वामि देवाधिदेवा । सुधावक्ष[43] भेदून शत्रू वधावा ॥ ८२ ॥
कुपी फोडिली बाणघातें निघातें । तयें रावणू चालिला मृत्युपंथे ॥
ऋषी देव गंधर्व ते सर्व तोषें । विमानीं सुखें गर्जती नामघोषें ॥ ८३ ॥
नभीं दुंदुभी वाजती एकनादें । बहूतापरींचीं बहूसाल वाद्यें ॥
ध्वनी दाटले पूर्ण ब्रह्मांड घोषें । कपी गर्जती नामघोषें विशेषें ॥ ८४ ॥
सुखानंद आनंदली सर्व सृष्टी । विमानाहुनी जाहली पुष्पवृष्टी ॥
ऋषी देव गंधर्व सर्वै मिळाले । विणे लाउनी नारदादीक आले ॥ ८५ ॥
मिळाल्या सुखें नायिका[44] अष्ट भावें । करीं ताळ मृदंग वीणे स्वभावें ॥
कळा कौतुकें दाविती ते प्रसंगीं । गुणी नाचणी[45] नाचती रागरंगीं ॥ ८६ ॥
बहू गायनें थोर गंधर्व गाती । कळा ऐकतां देव थक्कीत होती ॥
जयाच्या अलापें देहभाव जाती । मृगें श्वापदें लाभल्या त्या द्विजाती[46] ॥ ८७ ॥
रूपें सुंदरी किंनरी दिव्य यंत्रें । बहूसाल विद्याधरी गूणपात्रें ॥
उठे रागकल्लोळ सप्त स्वरांचा । गमे वोळला मेघ हा अमृताचा ॥ ८८ ॥

---

३७. फणी=शेष ३८. खेचर=आकाशांत फिरणारे गंधर्वादि ३९ शोणित=रक्त. * नभीं शोणिताचा बळें मेघ जाला—नदी शोणिताचा बळें पूर आला ४० बाणभाळी=बाणांचा समूह ४१ स्फुलिंग=ठिणग्या. ४२ सिंधु=समुद्र. ४३ सुधा=अमृत. ४४ नायिका=अप्सरा. ४५. नाचणी=नाचणाऱ्या कळवांतिणी ४६. द्विजातीं=पांखरें.

तुरें वाजती अबरीं[४७] शख भेरी । जयो पावला राम लीलावतारी ॥
सुरां मानसीं थोर आनंद जाला । महा घातकी रावणू तो निमाला ॥ ८९ ॥
समस्ता सुरा मानसीं सौख्य जालें । परी दुःख बीभीषणा प्राप्त जालें ॥
रणीं रावणू श्रेष्ठ बंधू निमाला । झळंबे मनीं शोक उत्पन्न जाला ॥ ९० ॥
रूदती प्रसगीं ध्वनी घोष जाला । झळंबे मनीं दुःख बीभीषणाला ॥
अहा हो अहा हो मुखीं बोलताहे । विलापे चि तो श्वास टाकीत आहे ॥ ९१ ॥
बहू लोटले वोघ नेत्रोदकाचे । दिनासारिखे शब्द कारूण्यवाचे ॥
घडीनें घडी तो भुमी अंग घाली । अरे भ्रातया शुद्धि सर्वे उडाली ॥ ९२ ॥
देहेभाव सांडून तो रूदताहे । मोहोजाळ होता चि आक्रंदताहे ॥
बहूतां परींचें बहू सौख्य दीलें । मनामाजि तें सर्वही आठवीलें ॥ ९३ ॥
मुखें श्वास सोडूनि पाँणी चुरीतो । भुमी मस्तकू आपटीतो पिटीतो ॥
म्हणे वीर तो वोखटा काळ आला । त्रिकूटाचळाचा अळंकार गेला ॥ ९४ ॥
नव्हे रावणासारिखा सपतीचा । नव्हे रावणा सारिखा विपत्तीचा ॥
बहू सागतां वैभवालागिं काहीं । प्रतापी तया सारिखा वीर नाहीं ॥ ९५ ॥
मनाचा उदारू धनाचा कुबेरू । बहूसा विचारू जगीं दानशूरू ॥
गळाला बहू धीर त्या राक्षसाचा । महीमडळीं धाक गेला सुरांचा ॥ ९६ ॥
बहूतां जनाचें बहू भाग्य गेलें । गमे सर्व ब्रह्मांड हे वोस जालें ॥
जया कारणें देव लीलावतारी । तयाच्या गुणा तूळणा कोण सारी ॥ ९७ ॥
उदासीन वाटे जनीं पाहवेना । मनीं स्वस्थ नाहीं तया राहवेना ॥
गनाचे गुणें वीर तो मग्न जाला । तयालागिं वारावया राम आला ॥ ९८ ॥
उभा चापपाणी वदे रम्य वाणी । सदां सर्वदा गाइजे जो पुराणीं ॥
म्हणे गा विरा थोर आश्चर्य जाले । मोहोसागरीं ज्ञानताहे बुडाले ॥ ९९ ॥
तयासारिखें आजि हें दीसताहे । प्रभू बोलतां वीर तात्काळ राहे ॥
करीं घेतलें शीघ्र बीभीषणाला । कृपाळू दिनांचा दळामाजि आला ॥ १०० ॥
म्हणे राम बीभीषणा बुद्धिवंता । रणीं रावणालागिं देहांतवेथा ॥
तुम्ही शीघ्र आतां पुरामाजि जावें । समस्तांसि पाहावया आणवावें ॥ १०१ ॥
समर्था मनीं लागली सर्व चिंता । परी अतरा जाणतो सौख्यदाता ॥
तयाची कथा ऐकतां दुःख नासे । चरित्रें बरीं अंतरीं दास तोषे ॥ १०२ ॥

---

४७ अबरीं=आकाशात. ४८. पाणी=हात. ४९ मोखटा=वाईट. ५० विपत्तीचा=शहाणा

## प्रसंग दहावा.

तया रावणालागिं देहांत आलें । प्रधानासि बीभीषणें पाठविलें ॥
तुम्हीं शीघ्र अंतःपुरामाजि जावें । समस्तांसि तात्काळ घेऊन यावें ॥ १ ॥
प्रभू बोलता वीर तैसे निघाले । पुढें शीघ्र अंतःपुरा माजि गेले ॥
समस्ता वधू मार्ग लक्षीत होत्या । उदासीन उद्विग्न चिंतातुरा त्या ॥ २ ॥
तवं देखिले ते अकस्मात डोळा । भयातुर त्या कप सूटे चळाळा ॥
तयांमाजि मंदोदरी मुख्य नारी । तये सांगती हो निमाला सुरारी ॥ ३ ॥
प्रसंगीं तये थेर कल्लोळ जाला । दुखामाजि तो सौख्यसिंधू बुडाला ॥
भुमी लोळती रूदती एक वेळा । देहे व्यस्त हाणोनि घेती कपाळा ॥ ४ ॥
समस्तांजणींचे महा शब्द जाले । दुखाचे तया योग सर्वे मिळाले ॥
मुखें बोलती थोर कल्लोळ जाला । समस्तां सुखांचा अळंकार गेला ॥ ५ ॥
धुळी टाकिती ऊर हाणून घेती । धरेना असंभाव्य जाली रूदती ॥
चिरें फाडिती ते अळंकार गेले । भुमी लोळती मोकळे केश जाले ॥ ६ ॥
पुढें सर्व राजांगना त्या निघाल्या । दशग्रीव जेथें रणामाजि आल्या ॥
रणीं कांत देखून आकांत केला । बहू पाप हो मोखटा काळ आला ॥ ७ ॥
अकस्मात तें सर्व सौभाग्य गेलें । समर्था प्रभू कां उदासीन केलें ॥
समस्तांसि शोकार्णवीं बूडवीलें । असंभाव्य हें दुःख टाकूनि आलें ॥ ८ ॥
म्हणे राम बीभीषणा जाय आतां । बहूतां परी तोषवावें समस्तां ॥
निमाल्यावरी वैर कां हो करावें । विवेकें चि मंदोदरी नीववावें ॥ ९ ॥
कृपासागरें वीर तो पाठवीला । अकस्मात राजांगनामाजि आला ॥
प्रबोधें चि नानापरी तोष केला । समस्तीजणीं भूषना पाठवील्या ॥ १० ॥
पुन्हा मागुती वीर तात्काळ आला । म्हणे हो प्रभू पाठवीलें तयाला ॥
वदे मागुता राम बीभीषणाला । रणीं रावणू अग्नि द्या जा तयाला ॥ ११ ॥
पुढें ऊठला तो रणामाजि आला । हुताशीं तया रावणा वीधि केला ॥
समुद्रीं शुचिश्मत होऊनि आला । नमस्कार केला तया राघवाला ॥ १२ ॥
वदे राम तैसा चि त्या बाधवातें । कपीनाथ सुग्रीव राजा तयातें ॥
तुम्हीं शीघ्र नैऋत्यनाथासि न्यावें । विधीयुक्त भद्रासनीं बैसवावें ॥ १३ ॥
महा वीर तींहीं नमस्कार केले । पुढें सव्य घालूनि तैसे निघाले ॥
सर्व चालली ते असंभाव्य सेना । ऋषी देव ते रूढ जाले विमाना ॥ १४ ॥
बहूसाल वाद्यध्वनीघोष जाला । बळी गर्जती नाद गेला भुगोळा ॥
कपीनाथ सौमित्र ते राजभारें । दळें चालिलीं वानराचीं अपारें ॥ १५ ॥

---

५१. भद्रासनीं—सिंहासनावर.

महादूत वेगीं पुढें पाठवीले । बळें शीघ लंकापुरीमाजि गेले ॥
त्वरें लाविलें काम पूर्वींच तीहीं । बहू वेग त्या राक्षसां वानरां ही ॥ १६ ॥
बहूसाल कामार[52] ते लक्ष कोटी । स्थळें सिद्ध होता असंभाव्य दाटी ॥
प्रसंगीं तया तातडी फार जाली । पहाया सुखें लोकमांदी[53] मिळाली ॥ १७ ॥
शिड्या पायिंच्या उच आकाशपंथें । असंभाव्य तें लागलें काम तेथें ॥
बहू जाणते वेग मोठ्या बळाचा । पुरीमाजि तो एक मेळा तयांचा ॥ १८ ॥
कपीच्या करें अल्पशी भग्न जाली । पुरी मागुती सर्व ही सिद्ध केली ॥
त्रिकूटाचळीं भव्य चत्वार द्वारें । विशाळें नभा सारिखीं थोर थोरें ॥ १९ ॥
दिसे रम्य लंकापुरी कांचनांची[54] । बरी पाहता हावें[55] पूर मनाची ॥
हुडे[56] कोट गेले नभामाजि उंची । जगीं धन्य निर्माण केली विरंची[57] ॥ २० ॥
पहाया गवांक्षे लघू दीर्घ द्वारें । बहूसाल जाळेंधरें[58] थोर थोरें ॥
असंभाव्य चर्या गिरी तो विलासे । वरी सर्व रेखाटिलें व्योम[59] भासे ॥ २१ ॥
हुडे कोट दामोदरें थोर थोरें । सजे [b] बाहुड्या चौक नाना प्रकारें ॥
महा मंदिरें सुंदरें थोर थोरें । भुयेरें बरीं वीवरें तीं अपारें ॥ २२ ॥
बहू चित्रशाळा बहू होमशाळा । बहू सुंदरा धर्मशाळा विशाळा ॥
तके थोर वृंदावनें पारें[60] ओटे । सभामंडपी देखतां सौख्य वाटे ॥ २३ ॥
बिदी[61] हाट बाजार माड्या[c] दुकानें । मठ्या पर्णशाळा महा यागस्थानें ॥
वनें वाटिका जीवनें बोध जाती । झरे कालवे वाहती पाटजाती ॥ २४ ॥
ध्वजा गोपुरें शीखरें तीं अपारें । बहू देव देवालयें थोर थोरें ॥
तळीं कूप बावी जळें पूर्ण जालीं । बहूता परींचीं स्थळें सिद्ध केलीं ॥ २५ ॥
बळी झाडिती लोटती सर्व शाळा । सडे शिंपिती घालिती रंगमाळा[62] ॥
सुगंधी बहू गुंफिल्या पुष्पमाळा । जळें निर्मळें बैसका त्या सुढाळा ॥ २६ ॥
सुवर्णाचिया रत्नमंडीत भिंती । हिरे पाच गोमेद ते ढाळ देती ॥
सडे शिंपिले कस्तुरी केशरानें । बहूसाल तीं रम्य यानें विमानें ॥ २७ ॥
ध्वजा त्या गुढ्या तोरणें ऊभवीलीं । पुरी सर्व शृंगारमंडीत केली ॥
पताका निशाणें वरी दिव्य छत्रें । बहू चामरें दिव्य मार्तंडपत्रें[63] ॥ २८ ॥
तया राजद्वारीं बहू दाटि जाली । सभामंडपीं मंडळी ते मिळाली ॥

---

५२ कामार=मजूरदार ५३ लोकमांदी=लोकसमूह ५४. कांचनाची=सोन्याची. ५५ हाव=इच्छा ५६ हुडे=बुरुज ५७ विरंची=ब्रह्मा. ५८. गवाक्षें=खिडक्या ५९. जाळंधरें=जाळ्या. b बाहुड्या–चावड्या. ६० पार=पिंपळ वड इत्यादिकांस सभोंवती जो वर्तुलाकार किंवा अष्टपैलू ओटा बांधतात तो. ६१. बिदी=गल्ल्या c माड्या–मड्या ६२ रंगमाळा=रांगोळी ६३ मार्तंड पत्रें=छत्र्या

पुढें रावणानूज शृंगारवीला । विधियुक्त भद्रासनीं बैसवीला ॥ २९ ॥
धमामा नभीं दुदुभीनाद जाला । सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला ॥
रघूनायकें सेवका राज्य दीलें । सुरा सोडिलें थोर आनदवीलें ॥ ३० ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोल जाला । निशाणावरी तो विरीं घाव केला ॥
महावीर संतोषले राज्य तोषें । बहूसाल ते गर्जती नामघोषें ॥ ३१ ॥
समस्तां जणांचें बहू पाप गेलें । सुरांचे महा शल्य निर्मूळ केलें ॥
यथासांग लंकापुरीते प्रसंगीं । विरीं वानरीं पाहिली लाग वेगीं ॥ ३२ ॥
पुढें सर्व ही वीर तैसे निघाले । रघूनायका भेटले स्वस्थ जाले ॥
समाचार ते सर्व ही सांगताती । जगन्नायका थोर आनेद चित्तीं ॥ ३३ ॥
म्हणे राम गा मारुती ये प्रसंगीं । अशोकावना जाय तूं लागवेगीं ॥
समाचार सांगे तये सुंदरीला । कपी वीर तो शीघ्र तैसा निघाला ॥ ३४ ॥
अशोकीं वसे जानकी शोक भारी । अकस्मात तेथें चि आला वनारी ॥
नमस्कार घालूनि तो बोलताहे । सुवेळे समस्तास कल्याण आहे ॥ ३५ ॥
दशग्रीव सहारिला लंकवासी । प्रतापें दिलें राज्य बीभीषणासी ॥
प्रभूनें समाचार हा सांगवीला । तेणे जानकी थोर आनंद जाला ॥ ३६ ॥
स्तुती उत्तरें बोलली एकमेकां । सिता तोषली दूरी टाकून शाका ॥
म्हणे मारुती हा समाचार नेतों । पुढें जावया शीघ्र जाऊनि येतों ॥ ३७ ॥
नमस्कार केला तये जानकीसी । म्हणे रे कपी तूं चिरंजीव होसी ॥
त्वरें चालिला भेटला राघवाला । पुन्हा मागुती पाठवीलें तयाला ॥ ३८ ॥
म्हणे गा विरा सांग बीभीषणाते । वना जाऊनी आणिजे जानकीतें ॥
दिजे मगळस्नान नाना प्रकारें । सुगधें फुलेंले अळकार चीरें ॥ ३९ ॥
महा वीर ते शीघ्र तैसे निघाले । पहाया सिता सर्व ही सिद्ध जाले ॥
बहूसाल वाद्यें दळेंशी निघाले । कपी लागवेगीं त्रिकूटासि गेले ॥ ४० ॥
सुवेळाचळामाजि तो रामराजा । पहाया तया चालिल्या देव फौजा ॥
मदोन्मत्त ऐरावतारूढ जाला । सुराशी सुरेशू पुढें शीघ्र आला ॥ ४१ ॥
दा हिंदुस्थानांतून मोठे फौजेनिशीं तोफखाना व कपू फिरंगी घेऊन तीस हजारा- निशीं शिंद्यास येऊन भेटले. लढाईची कमाईत श्रीमंतांस दाखविली. तो फाल्गुन शुद्ध ६ स नबाव निजाम अल्लीखां तोफखाना फौज सुद्धा मोहोरीचा घाट उतरून आला. श्रीमंतांच्या फौजा होळकर, शिंदे व हुजुरात खांशी पुढे होती. गांठ पडली. तो निजाम अल्लीखां शिकस्त करून खरड्यावर घालविला. बुणगे बहुत लुटले. खरड्यांत कोंडल्यावर सरकारच्या फौजा त्या भोवत्या राहिल्या. जिउबादादा शिंद्यांकडील त्यांनीं तोफांचे कडे घालून वेढा घातला. शेरभर पाणी रुपयाचे जाहलें. तेव्हां मशारील मुलखास पाठवून भाऊसाहेबीं जहागीर घेतली हो- ती त्यापैकीं पुन्हां माघारी दौलताबाद किल्यांसुद्धां देऊन, मशारील मुलुक श्री- मंतांच्या हवालीं करून, सल्ला करून आपण कूच करून भागानगरास गेले. श्रीमंत स्वारीस गेले त्या वेळेस दादासाहेबांची मंडळी आनंदवल्लीस होती ती जुन्नरास आणून ठेविली. अली बहादर हिंदुस्थानांत. कलम.

१ शके १७१७ सन १२०५. श्रीमंत यांनीं निजाम अल्लीखां शिकस्त झा ल्यावर दौलतराव शिंदे यांस जामगांवास जावयास निरोप दिला. शिंद्यां कडील जिऊबादादा व बाळोबा पागनीस वगैरे पुण्यास आले. मशारील मुलुक आणिला त्यास बगल्याचे बागेंत ठेविलें. होळकर आले. वैशाखमा सीं वाड्यांत स्वारी दाखल जाली. कारभारी नानाफडणीस. वैशाख वद्य ३० सेस आप्पा शास्त्री समर्थ ब्राम्हण होते त्यांनीं कोणास न सांगतां नदीपलीकडे जाऊन सिद्धेश्वराचे देवालयास सन्यासग्रहण घेतलें. आणि गेले. अली बा- हादर हिंदुस्थानात आहेत. श्रीमंत वाड्यांत. जुन्नरास अमृतराव व बाबा सा- हेब व आप्पासाहेबाजवळ कारभारी गोविंदपंत गडबोले श्रीमंत माधवराव नारायण पंत प्रधान जैसें या हून स्वारीहून आल्यावर रमण्यांत जाऊन घोडीं फेरू लागले व हत्तींच्या वगैरे लढाया लावू लागले व भाले बोथाट्या खेळून हरणामागें शिका रीस जात होते. स्वस्तिक्षेम राज्य चाललें. कारभारी नाना यांनीं नवी पेंठ बसवून तिचे नांव हनुमंत पेंठ ठेविलें. विजयादशमीस मोठा उत्साह करून आल्यानंतर आश्विन शुद्ध १२ स नाचीं दिवाणखान्यांत असतां अकस्मात मेघडंबरी बगल्याचे पायरीवरून कारंज्याचे नळीवरून खालीं पडले. मांडीस जखम लागून मांडी मोडली. तेव्हा बाळाजी जनार्दन धांवून आले. तबीबदार बलावून जखमा बांधिल्या. परंतु जखम मोठी. हैराण बहुत जहाले. कोजागरीच्या दिवशीं प्रकृत सावध अ-

१० नारायणरावाचा काळ झाल्यावर हा मुलुख निजामाकडे परत गेला होता. मागें पृ० २८ पहा

११ बाबा साहब=बाजाराव.

१२ हिचें 'हणमत पेंठ' हें नांव न चालता हल्लीं 'नानाचो पेंठ' असेंच हिला म्हणतात

सर्व कारभारी यांस बोलावून म्हणों लागले कीं आपले शरीराचा भरंवसा नाहीं. दादासाहेबाचे पुत्र जुन्नरीं आहेत त्यांस आणावें. तो सायकाळीं आश्विन शुद्ध १४ स अनंतार समाप्त झाला. नानाफडणीस यांणीं सर्व वाड्यांतील बंदोबस्त करून, शहराची नाकेबंदी करून, संपूर्ण मुत्सद्दी व सरदार सुद्धा ओंकारेश्वराजवळ गेले तेथें सार्थक झालें.[३३] श्रीमताचा काळ आरसेमहालांत झाला. आश्विन वद्य १२ शी पासून विद्यमान बाळाजी जनार्दन लागून कारभार चालला. शिक्का श्रीमताचा चालत होता. दत्तपुत्र घ्यावयाकरितां मूल पाहूं लागले तो दौलतराव शिंदे यांजकडील बाळोबा पागनीस व जिऊबा दादा यांचें बोलणें पडलें कीं, दत्त न करितां दादासाहेब यांचे पुत्र जुन्नरीं आहेत त्यांतील एक आणावा. नंतर बाळोबा व जिऊबादादा निघोन जामगावास गेले. दौलतराव शिंदे फौज सुद्धां निघोन हिंदुस्थानांत चालले. जिऊबा दादांची भेट-जामगांवीं झाली. नंतर त्यांस ताप येऊन एका दिवसांत जामगांवीं काळ झाला. शिंदे गंगातीरास गेले. मोठी फौज जमा करून जुन्नरास जाणार ही बातमी आली. नंतर बाळाजी जनार्दन यांणीं परशराम रामचंद्र पटवर्धन यांस माघ शुद्ध ९ सीस जुन्नरास पाठविले कीं तिघांतून एकास घेऊन यावें. त्यावरून अमृतराव यास तेथें ठेवून बाजीराव व चिमाजी आप्पा यास छ. १५ साबानीं जुन्नराहून घेऊन दापोडीजवळ माघ वद्यपक्षीं आले तेथें बाळाजी जनार्दन यांची भेट झाली. १८ दिवस नित्य जात होते. तो फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस पुणतांबें येथून कूच करून मोठे फौजेनिशीं पुण्यास शिंदे येतात म्हणोन ऐकिलें. त्यावरून बाळाजी जनार्दन यांणीं श्रीमताचा निरोप मागून फाल्गुनी १९ मेस निघोन किल्ले पुरंदरीं गेले. तेथून दुसरे दिवशीं निघोन गेले. दौलतराव शिंदे व बाळोबा पागनीस कारभारी येऊन श्रीमतांस फाल्गुन शुद्ध १२ स भेटले. श्रीमतांजवळ परशराम रामचंद्र होते. भेटी जहाल्या. त्या वेळेस दवलतराव शिंदे यास श्रीमतांनीं आपले गळ्यांतील मोत्यांची कंठी दिली. भेटी झाल्यावर उभयतां श्रीमंत व परशराम रामचंद्र यास फाल्गुन वद्य पंचमीस शिंद्यांनीं वाड्यांत नेलें. श्रीमंत बाजीराव साहेब मसनदीचे गादीस वंदन करून वर बसले. लोकांस आपले हातानें विडे दिले. नजरा करावयास लोक लागले, त्यांस मना केलें. दोन दिवस वाड्यांत राहून निशाण व श्रीमंत माधवराव साहेब यांची शिक्केकटार घेऊन फाल्गुन वद्य ७स गारपिरावर डेऱ्यास दाखल झाले. नंतर कूच करून परशराम

३३ नारायणराव यांचें सार्थक लकडी पुलापाशी झालें असें वर गेलें आहे त्या कालापासून तों माधवरावांचे मरणापर्यंत जो काल गेला त्यांत ' ओंकारेश्वरा ' जवळच्या जागेंत हा संस्कार होऊ लागला. किंवा माधवरावाचाच हा संस्कार येथील प्रथमचा होय ?

रामचंद्र व शिंदे व होळकर व हुजुरात व बाबा फडके घेऊन थेऊरावर जाऊन मुक्काम केला. बाळाजी जनार्दन सातान्यास राहिले. सातान्याहून कामकाज त्यांचे विद्यमानें चालत आहे. अश्विन शुद्ध १५ तागाईत फाल्गुन १५ पावेतों पांच महिने कारभार केला. नंतर परशराम रामचंद्र कारभार करूं लागले. माधवराव नारायण प्रधान यांची स्त्री यशोदाबाई वाड्यात आहे. त्यांस रजोदर्शन झालें नाहीं. पहिली थत्ते याची कन्या त्यास रजोदर्शन होऊन पेशजींच काळ जाहाला होता. कलम.

येणे प्रमाणें इस्तकबील बाळाजी विश्वनाथ तागाईत श्रीमंत माधवराव नारायण पंत प्रधान पावेतों पेशवाई केली[३४] त्यात शाहूराजे शुक्ल संवत्सरीं शांत झाले. तेथपर्यंत बाळाजी बाजीराव प्रधान यानीं सेवकत्वें करून चालून पराक्रमाने मुलुक काबीज करून पुण्याची वस्ती वाढविली. नतर श्रीमंत माधवराव नारायण यांज पावेतों[३५] * * *

[ दुसऱ्या बखरींत आणखी कांहीं वर्षांची हकीकत आहे ती. ]

१ सन सीत तिसैन[३६]. श्रीमंत खासा पुण्यात असतां आश्वीन मासीं पौर्णिमेस काळ झाला. बाजीराव व चिमाजी आप्पा आनंदवल्लीहून जुन्नरास आणिले होते ते माघमासीं परशुराम रामचंद्र यांनीं जाऊन उभयतास पुण्यास आणिलें. वैशाख मासीं वद्य पंचमीस आप्पास वस्त्रें झालीं. शिंदे होळकर पुण्यात.

१ सन सीततिसैन छ ८ जिलकाद. आप्पास वस्त्रे झालीं. बाजीराव थेवरास होते, ते पुण्यास शिंदे याचे फौजेत भाद्रपद मास पर्यंत होते. नतर गंगेस स्वारी गेली.

१ सन सबा तिसैन[३७]. आश्वीनमासीं वद्य १२ द्वादशी परशराम रामचंद्र आप्पासाहेब यास घेऊन जुन्नरास गेले; मागाहून हुजरातीच्या फौजा जाऊन पुण्यास आणिले, उपरांत बाजीराव यांच्या भेटी झाल्या.

१ बाजीराव रघुनाथ.

१ सन सब्बा तिसैन. गु॥ जुन्नराहून माघमासीं पुण्यास आणिले. उपरात स्वारी बाहेर निघून थेऊरीचे मुक्कामीं होती. वैशाखमासीं शिंदे याच्या फौजेत जाऊन पुण्यास आले. भाद्रपदमासीं हिंदुस्थानात जावया करिता गंगे पर्यंत स्वारी गेली. नतर पुण्यात परशुराम रामचंद्र कारभार करीत होते ते आप्पास

---

३४ या लिहिण्यावरून सवाई माधवराव निवर्तल्यावर लागलीच ही हकीगत लिहिली गेली असें होतें.

३५. पुढील अक्षरें फाटून गेलीं आहेत तथापि पेशव्याच्या बखरींत शेवटील परिच्छेदात लिहिल्याप्रमाणेंच येथेंही लिहिलेलें असावें असें अनुमान होतें.

३६ सन १६ ( + मया व अलफ= ११०० ).

३७. सन १७.

घेऊन पळाले ह्मणून स्वारी गंगेहून परतली. पुण्यानजीक येऊन आप्पासाहेब याच्या भेटी झाल्या. मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस वस्त्रें झालीं. लग्न तिसरें झालें. बाळाजी जनार्दन महाडाहून आले. ते व श्रीमंत पुण्यास आले.

१ सन सम्मान तिसैन[38]. खासा *** पट्टी केली. पौषमासीं शुद्ध त्रयोदशीस बाळाजी जनार्दन यास शिंदे यानीं अटक केली; दोन महिन्या नंतर नगरास पाठविले. फाल्गुन मासीं अमृतराव स्वारीस ह्मणून निघाले. मागें आप्पासाहेब याचें व दौलतराव यांचें लग्न झालें. सर्जेराव घाडगे यांची सोयरीक केली व उपरांत शिंदे याच्या बायकौ बाहेर काढिल्या. त्यांस नारायणराव बक्षी व पठाण मिळाले.

१ सन तिस्सैा[?]. अमृतराव पुण्यांत आले. बाळाजी जनार्दन नगराहून शिंदे यानीं आणिले. व आबाजी चिटणीस. शिंद्याच्या बायकांनीं फार उपद्रव केला. चैत्रमासीं वाड्यात अमृतरायाच्या मुलाची मुंज झाली. शिंदे यांनीं बाळोबास नगराहून आणिलें आणि बायाच्या समजुतीस पाठविलें. परशराम रामचंद्र अव्वलीस मोकळे होऊन फौजे सुद्धां करनाटकात गेले.

सन मय्या तैन[41]. खासा स्वारी व अमृतराव व आप्पासाहेब व बाळाजी जनार्दन सुद्धा पुण्यांत. भाऊ कर्नाटकांत. आबा, बाळोबा बायाच्या समजुतीस पाठविले, शिंदे यांणीं.

१ इंग्रजानीं टिप्पुसुलतान याचें स्थान बुडवून श्रीरंगपट्टण घेतलें. यशवंतराव, होळकर यांचे लेकवळे, यानें हिंदुस्थानात फौज धरून शिंदे यांचीं ठाणीं उठविलीं पठाण व कपू यानीं दक्षिणेंत लोकास फार उपद्रव केला.

१ राजश्री बाळाजी जनार्दन याचा काळ फाल्गुन वद्य ४ गुरुवार शके १७२१ सिद्धार्थिनाम संवत्सरे.

१ सन इहिदे आषर मय्यौ[42] *** बाजीरावसाहेब यास पुत्र वामनराव झाला आश्विन वद्य ५ बुधवारीं दोड घटका रात्रीस, शके १७२२ प्रमोदनाम संवत्सरे. जन्मनाम.

१ सन सब्बा आषर मय्या तैनौ[43] श्रीमंत बाबासाहेब यांस पुत्र भाद्रपद वद्य ४ भोमवारीं एकोणतीस घटका रात्रीस. जन्मनाम. शके १७३८.

समाप्त.

---

३८ सन १८.

३९ महादजी शिंदे याच्या कुटुंबाचें व दौलतरायाचें पडेना तेव्हा बायानीं बाहेर निघून दंगा आरंभिला पे० ब० पृ० २१२ पहा।

४०. सन तिस्सा तिसैन=[illegible]

४१. मयातैन (व अल्फ)=१२००.

४२ स० इहिदे अशर मयातैन व अल्फ=१२११

४३ सबा अशर मयातैन व अल्फ=१२१७

लिहिलीं आहेत तर नरसिंगराव घाटगे यांचा अमल दखल करून घ्यावा. फिरून बोभाट येऊं न द्यावा. याचे भाऊबंद याशीं कटकट करतील तर त्यास ताकीद निक्षून करावी. हें काम सरकार किफायतीचें व मनुष्य बहुत चांगला ऐसें समजून केलें आहे. तर दरम्यान तुम्हांकडून घालमेल न व्हावी. तालुकियास खराज्याचा उपसर्ग बहुत लागून प्रगणा खराब जाहला. याजकरितां खराज्याकडील बंदोबस्त चांगला करून द्यावा. तैसेंच करमळियाकडील ही कांहीं उपद्रव न द्यावा. म्हणून राजश्री शामराव व चंडीदासपंत यास ताकीद करावी. मशारनिलेपासून करारनामा लेहून घेतला त्याची नक्कल पहावयास पाठविली आहे. हें काम जवा म नु द [मर्द ?] बाळा बहादर [ ? ] सोयराजीपंत याच्या आमच्या विचारें जाहालें असे. यांत घालमेल न व्हावी. लिहिल्याप्रमाणें कामाचा बंदोबस्त करून द्यावा. रा। छ १७ सव्वाल हे विनंती. सन ११९४.

[ १३९ ] ॥ श्री ॥

राजश्री सखारामपंत गोसावी यासि—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेो। जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष—आम्हांकडील प्रांत कडेवळीत येथील देशमुखीचे कामावरि पागा पाठविली. त्यास आम्हांकडील ठाणेदार व पागा निंबगावीं वीस गांवांत जागा विच्छिन्न केली. तेथें बसोन आहेत. ऐसें असतां भगवंतराव राम याचे लोक नित्य उठोन हर्षामर्षांनिभिय भोवते उभे राहोन कजिया करितात. आम्हांकडील पागेचें कुरण कापून नेतात. गावकुसाचा गढीचा आसरा नाहीं. ऐसें जाणोन उपद्रव करितात. याजकरितां भगवंतराव राम यासि उपसर्ग न करीत ऐसें ताकीदपत्र देववावें. दुसरें, नगरकर किल्लेदार देशमुखीचे रुसुमास[६५] खलेल करितात. वतनदारीच्या शेर्‍यां[६६] व आब्याचीं झाडें, मौजे मेहकरीस पागेचें कुरण आहे तें चालू देत नाहीं. यास्तव किल्लेदारास ताकीदपत्र आपले सरकारचें दिलें असतां दुसरे पत्राचा उजूर[६७] करितात. त्यास ताकीद देववून वतनबाब गुरळीत चाले तें करावें. राजश्री महारराव निंबाळकर व रामराव निंबाळकर व शिंद्याकडील मामलेदारही रुसुमास खलेल करितात त्यास ही ताकीदपत्रें देववावें कीं, त्यांचेही तालुकियांतील रुसुम अविच्छिन्न पावते करावे. निंबगां-

---

६५ रुसुम=जमिनीच्या उत्पन्नांतील देशमुख देशपांडे यांचा विभाग

६६ शेरी=१ मणों दोन शेर याप्रमाणें एकंदर उत्पन्नावर कमावीसदाराचा हक्क २ शेरी जमीन ह्मणजे गावशिवेच्या बाहेर असणारी बागाईत जमीन

६७ उजूर=सबब, बयाद

वचे गांवकुसूं व गढी विच्छिन्न केली आहे त्याचे मरामतीची परवानगी नगर-च्या किल्लेदारास द्यावी कीं, भगवत गोपाळ गुमस्ते देशमुख गढी घालतील ते घालू देणें. ऐसें पत्र द्यावें. रा। छ २४ माहे जमादिलावल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद

[ १४० ]  ॥ श्री ॥

पै॥ छ ३ रविलोवल सब्बा श्रावण गोहदचा मुक्काम--

तीर्थरूप राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं. अपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनती येथील कुशळ ता। छ १७ मोहरम पर्यंत वडिलाचे अशिर्वादें करून यथास्थित असे विशेष. वडिलाचें पत्र आले त्यांत आज्ञा कीं, बराणपूरची मामलत रा। नारो कृष्ण याजकडेच करार राखणे. इजारियानीं दुसरियास न देणें. दुसऱ्यास दिल्यानी शहर खराब करतील. नारो कृष्ण बरा आहे. याचें चालवणें. ह्मणोन आज्ञा. त्यास नारो कृष्णाचें वर्तमान राजश्री चिंतो विठ्ठल व आबाजी महादेव यास ठावकें आहे. नारो कृष्णाची मामलत दूर न करितां त्याचाच कारकून त्रिंबक नारायण यास कमाविस सांगितली. सरसुभेदारी त्याची त्याजकडेसच करार राखिली. त्यांस हुजूर यावयाविशीं पत्र पाठविलें असतां न आले. मनस्वी भाषण केलें. जासूद उठोन आले. तदोत्तर खिजमतगार पाठविले पत्र सादर केलें त्याजशीं मनमाने तें बोलले. खिजमतगारांनीं पांघरूणें जाळिलीं तथापि हुजूर न आले. त्यावर गाडदी दाहा पांच पाठविले. येणे म्हणोन लिहिलें असतां त्यांस शहरांत न घेतले. बदलोन गोष्ट सांगितली. यास्तव रा। मलवा पानसी याजबराबर स्वार हशम देऊन आणावयास पाठविले. कैद वडिलाची. अमर्यादा नसावी. सेवकलोकीं मर्यादेनें वर्तावें हे शिक्षा. पण आज्ञा वडिलांचीच आहे. व प्रस्तुत काळीं राजश्री गोपाळराव गणेश याणीं बदलोन गोष्ट सांगितली. तोच अन्वय नारो कृष्ण याणीं चित्तांत आणून बेबदल गोष्ट सांगितली आणि आटीनें भाट सदर्हूप्रमाणें पडत पडत आली. येरवी नारो कृष्ण याजवर आणिक सारखा प्रकार व्हावा ऐसा अर्थ नाहीं. जाले वर्तमान दोन तीन पत्रीं सेवेशीं लिहून पाठविलेंच आहे. व हल्लींही जाला प्रकार विनती पत्रीं लिहिला असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १४१ ]  ॥ श्री ॥

राजश्री त्रिंबकराव मामा स्वामीचे सेवेशी--

विनंति उपरि आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट जहालें. आह्मी येथें येऊन

---

६८. पांघरुणे जाळणें—पत्राचा जबाब मिळण्या करितां धरणें देण्याचा हा एक प्रकार होता असें दिसतें

पिरेपट्टणास चौफेर मोर्चे बसविले. तेव्हां दुसरे दिवशीं किल्लेकरी कौलास येऊन कौल मागू लागले. त्याजवरून त्यास कौल देऊन बाहेर काढिले. आणि छ. २५ जिल्हेजीं किल्यावर सरकारचें निशाण चढलें. ठाण्यातील पांच हत्ती व पधरा घोडीं पाडाव आलीं व कोडग [ ? ] वाल्याकडे रा। आप्पाजी गोविंद रवाना केले आहेत. त्याचाही मजकूर कसा तो एका दो रोजांत कळेल ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास आपण जाऊन किल्यास मोर्चे देऊन किल्ला जोरबजोर घेतला. व ठाण्यातील पाच हत्ती व पधरा घोडीं पाडाव आलीं. हे मोठी गोष्ट जाहाली. या दर्दें करून दुसरीं ठाणी अवसान धरणार नाहींत. राजश्री आप्पाजी राम छ २५ जिल्हेजीं मंगळवारीं येथें येऊन दाखल जाहाले. त्याचे बोलण्याचा अर्थ सविस्तर दुसरे दिवशीं हैदरखानाकडील सांणडीस्वार व राजश्री राव § सेनापती याजकडील दोघे स्वार यांबराबर लेहून पाठविले आहे. त्याजवरून सविस्तर कळेल. रा। तुळाजी पवार व कुडचीकर व बांडे पा। गी र पा डी र येथें होते त्यास शत्रूचा जोरा तिकडे फार जाहाला. याची पाळथ राखोन दगा करावा असें त्याचे चितांत होतें. परतु तुळाजी पवार व व कुडचीकर व बांडे मोठे निकडीनें शत्रूवर आपला दाब राखून सांभाळून आले. बांडे तो होसकोट्यास राहिले. तुळाजी पवार व कुडचीकर लष्करात येऊन दाखल जहाले. रात्रंदिवस मेहनत फार. याजकरितां त्याचे घोड्यांत काहीं ताकत राहिली नाहीं. रवाना छ. २७ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनती.

[ १४२ ] ॥ श्री ॥

पै॥ छ. १७ मोहरम ज्येष्ठ सन सबा मु॥ ग्वालेर.

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलाचे सेवेशीं—

अपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनती येथील कुशळ ता॥ छ. २५ जिल्हेज पर्यंत वडिलाचे आशीर्वादे करून यथास्थित असें विशेष–शहर बरानपूर येथील अमलात मामलेदारानीं कमपेश केली याचा अर्थ अवगत जाला ते वृत्त वडिलाचे सेवेशीं विनती केली. स्वामीनीं आज्ञा केली कीं, शहरास कमावीसदार पाठऊन तहकिकात करावी. म्हणोन रा। त्रिंबक नारायण यास कमावीस सांगितली. सरसुभेदारी राजश्री नारो कृष्ण याजकडे आहे तैशी त्यांजकडे करार ठेविली. ऐसें असता नारो कृष्ण यांस पत्र सादर केलें कीं, त्रिंबक नारायण याजकडे अम्मल सुरळीत देणें. तें त्यांनीं न मानितां जाबसाल केले. त्याजवरि खिजमतगाराबराबर पत्र सादर केले. त्यासींही मनस्वी भाषण केले. तदोत्तर-

§ सेनापति–मुराराव घोरपडे असावे.

ही पत्रें माणसें पाठविलीं त्यांस शहरांत घेतलें नाही. बेबदल गोष्टी अमर्यादेच्या सांगितल्या. माणसें फिरोन आलीं. रा। गोपाळराव गणेश यानीं बदमामलेची गोष्ट सांगितली, त्याचप्रमाणें नारो कृष्णासही उमेद जाली. एवच हाच मार्ग पडतो. यांत खावदगिरीचा बोज काय ? यास्तव अशा गोष्टीस पारपत्य असावेंच. काम थोडे. दरगुदर* करावी तर शहर बेबदल जहालें हें लौकिकांत. तेव्हा खावदगिरीस उचीत तें जालेंच पाहिजे. हें सविस्तर वर्तमान वडिलांस कळावें यास्तव लिहिलें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

[ १४३ ] ॥ श्री ] पै॥ छ ३० जिलकाद.

सेवेशीं महादाजी बल्लाळ व हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २६ जिलकाद मु॥ नजीक कपिला संगम कृष्णा उत्तर तीर स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं सांडणीस्वाराबरोबर व जासुदा बो। पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सरकारचे कागदपत्र प्रविष्ट केले. उत्तरें घेऊन पाठवितो. इकडील वर्तमान तर राजश्री मुरारराव सावनूरकर यांस निरोप जाला. छावणीस राजश्री गोपाळराव रहाणार त्यास निश्चय नाहीं. श्रीमंत कृष्णा उतरोन उत्तर तीरास आले. फौजेचे नालबंदीचें काम चालीस लागलें. दोनी स्वाऱ्या मिळोन नालबंदीचा ऐवज ठरेल त्यांपैकीं निमे तूर्त द्यावा. त्याचे भरतीस सात आठ लक्ष पाहिजेत. याजकरितां ऐवजाचे तरतुदीविशी श्रीमतांनीं आपणास पत्र लिहिलें आहे. आता इकडे कांहीं गुंता नाहीं. दरमजल येणार. आज आठ कोसाचें कूच आहे. रामतीर्थावरून, म्हसवडावरून येणार. पाऊस पडो लागला. एक मुहूर्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, दुसरा वद्य चतुर्दशी पर्यंत इतकियात येऊन पोंचणार. वरकड नवल विशेष वर्तमान तर बंकापुरचा किल्ला खालीं करून घ्यावयास राजश्री राजेबहादर गेले होते. छ १९ जिलकादीं किल्ला हस्तगत जाला. आंत कांहीं जकीरा दारूगोळी तोफ नाहीं. दाणा मात्र होता तो विकत घेतला. किल्यांत शंकराजी राम ठेविले आहेत. याउपरी गोपाळराव यांस देतील अथवा सरकारांतून बंदोबस्त करितील. दोनी प्रकार घाटतात. कळलें पाहिजे. स्वामींचे चरण दृष्टीस पडत तो सुदिन असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

[ १४४ ] ॥ श्री ॥

राजेश्री पंत प्रधान गोसावी यांसि—

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्ने॥ उदा-

---

* दरगुदर=कानाडोळा, क्षमा ह्या अर्थी वर पत्र १२६ पहा हें पत्र स० इ० | १७६८ सालीं लिहिलें.

जी चव्हाण हिम्मत बहादर ममलकत मदार दंडवत विनती येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळलेखन करीत असलें पाहिजे. विशेष—आपण पत्र पाठविलें पावलें. लेखनाभिप्राय कळोन समाधान जालें. सातारियाकडील वर्तमान लिहिलें त्याजवरून साकल्य कळलें. सांप्रत आपण कोठें आहां? विचार मनसुबा काय? आपण चित्तांत काय आणिलें आहे तें ल्याहावें. पुढेंही कितेक विचार करणें आहेत. तर राजश्री लिंगो आमाजी यास पाठऊन द्यावें. विचार सुचेल तो मशारनिले समागमें सांगोन पाठवावा. जाणोन लिहिलें. ऐशास आपण आह्मास निरोप दिल्हा ते वेळेस सांगितलें कीं, श्रावणमासीं मनसुब्याची रीत व फौज ठेवावयाचा विचार तुम्हांस सांगों तों पावेतों दोन दिवस मनसुबा राखून राहणें. असें बोलोन निरोप देऊन लावून दिल्हें. त्याजवरून आम्ही आथणीस आलों. ज्येष्ठ मासीं चिरंजीवांचें लग्न केलें. बरकड या मुलकांतील जागां जागा कागदीं पत्रीं व नानाप्रकारचे फितूर पत्रीं काय ल्याहावे. सर्व अर्थ आपणास विदीत. मसलतीचा विचार, आपणा शिवाय आमची मसलत नाहीं.

ᗜ O
श्री राजाराम छत्रपती स्वामी
चरणीं तत्पर उदाजी चव्हाण
हिंमत बहादर ममलकतम-
दार निरंतर

या फितुरांत आजपावेतों आह्मी मनसुब्याचा जीव मात्र रक्षून आहों. इकडील कितेक अर्थ सांगणें तो सांगोन राजश्री लिंगोपंत रवाना केले आहेत, ते आपणा सन्निध येऊन सविस्तर विनंती करतील. तो अर्थ चित्तारूढ करून प्रत्युत्तर समर्पक पाठविलें पाहिजे. प्रस्तुत या श्रावणमासीं आम्हा कूच करून झेंडे डेरे बाहेर देऊन निघालों आहों. सर्वभार आपणावर आहे. आपणाखेरीज दुसरा विचार जाणत नाहीं. हें मनोमन साक्ष असे. पुनरुक्त पत्रीं विशदें ल्याहावें हा अर्थ नाहीं. तपशील अर्थ मशारनिले निवेदन करतील त्याजवरून श्रुत होईल. आपलें उत्तर येईल तदनुरूप वर्तणूक होईल. विशेष काय लिहिणें, कृपा वर्धमानकरावी हे विनंती.

मोतब
सुद

[ १४६ ] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेशीं—

पो। भवानी शंकर हैबतराव कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लेखन करित असले पाहिजे. विशेष— आपण पत्र पा। तें पावलें. प्रांत वांई येथें ब्राम्हण ज्ञातींत कोणी कन्येचे रु।। घेऊन विवाह करू नये, जो कन्येचा ऐवज घेईल त्याजपासून दुप्पट व जो देईल त्यानें कन्येचे

ब्राह्मणास रु॥ दिल्हे असतील तितके, व मध्यस्ती करून पैका घेईल तो ऐवज त्याजपासून सरकारात घेतला जाईल. या प्रमाणें ब्राह्मण ज्ञातीस व जमीदार व धर्माधिकारी व उपाध्ये व जोशी व पा॥ कुळकर्णी यास निक्षूण ताकीद करावी. ताकीद केली असतां आज्ञे प्रमाणें वर्तणूक न करीत त्याजपासोन सदर्हू प्रमाणें ऐवज घेऊन कांहीं खर्चाची बाब न लावितां हिशेबी जमा करावा, म्हणोन लिहिलें. ऐशास प्रांत वांई येथील गांव बहुत करून दुमाले आहेत. तेथें आमचा रोखा पत्र चालत नाही. वसुली गांव व वांई क्षेत्र व देशमुख व देशपांड्ये वगैरे सरकारचे पत्राअन्वयें आणवून ताकीद करवितों. कळलें पाहिजे. बहुतकाय लिहिणें लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

[ १४६ ]　　॥ श्री ॥　　पै॥ छ ५ मोहरम.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना ऐसिजे गोंवेकर फिरंगी याकडे राजपुरींतून पेगाम लागल्याचा मजकूर निराळे विनंतीपत्रीं लिहिला आहे याजवरून सेवेशीं निवेदन होईल. फिरंगी यदा पूर्तकालींहून जाहाजे आल्यानंतर चळवळ करितां राहात नाही. या गोष्टीस स्वामींच्या प्रतापाचा दबाव असिल्यानें उत्तम आहे. दबाव हाच कीं, वरकड टोपीकर वगैरे यांस राजपुरीचे मसलतीमुळें पत्रें सादर जालीं असतील त्या प्रमाणें गोंवेकरांसही पत्र सादर व्हावें कीं, जंजिरे दंडा राजपुरी याजवर सरकारची मसलत आहे, तरि तुम्हीं आपलीं जाहाजें सजुता करून सामान सरंजाम सुद्धा तयार होऊन जलमार्गें येऊन सामील होणें. कदाचित राजपुरीवाले तुम्हास लाभ लोभ दाखवून आपले कुमकेस बोलावतील व तुम्ही ममतेस गुंतोन त्याचें साहित्य कराल तरि आधीं तुमचे पारपत्य होईल. राजपुरीवाल्यास तबी करून जंजीरा सरकारांत घेणें हें तों जरूर आहे. त्या प्रों थोडक्याच दिवसात सिद्धीस जाईल, परतु तुम्ही तु र द रा ज पाहोन वर्तणूक करणें. म्हणोन पत्र व त्यातच मजकूर ल्याहावयाचा सेवकास सुचला लिहिला जातो जे. तुळाजी आंगरे याजवर सरकारची मसलत पेशजी जाहाली होती तेसमयीं तुम्हीं त्याची कुमक उपराळा करावयाची कबुलात करून आडीच लक्ष रुपये आंगऱ्याकडून तुम्हीं नेले आहेत. त्यास आंगऱ्याचा मुलुख व कोट किल्ले दरोबस्त सरकारात घेतले. मालीयत व खजाना जेथें जेथें त्यांचा सांपडला तो सरकारात आणिला. तुम्हीं त्याजकडून रुपये नेले आहेत ते सरकारचे आहेत. तरि सदरहू ऐवज पाठऊन देणें म्हणोन पेशजीं तुम्हांस लि-

६१ पूर्तकाल=पोर्तुगाल पूर्तकाली कागद पोथी लिहिण्यास घेत असत ते पोर्तुगालाहून इकडे येत असत अद्यापीही त्या कागदावर पोथी लिहिण्याचा प्रघात आहे.

हिलें असतां अद्यापवर पाठवीत नाहीं. हे गोष्ट कार्यास येणार नाहीं. हल्लीं देखत पत्र सदरहू रुपये सेवकाचे पदरीं घालून हुजूर पाठविणें. तैसेंच सोंधेकराचा मुलुख आहे तो सरकारचे स्वराज्य आहे ऐसें असतां कूर्मगड व सदाशिवगड हे दोन्ही किल्ले तुम्ही घेऊन ठाणीं ठेविलीं आहेत म्हणोन कळलें. तरि हरदू किल्यावरील तुम्हीं आपलीं ठाणी उठऊन, किल्ले खालीं करून, सेवकांचे स्वाधीन करणें व यांची पावती घेऊन हुजूर पाठवणें. आणि तुम्ही भाद्रपद शुद्ध चतुर्थी होता आपले सामान सुद्धां येऊन राजपुरी जवळ सरकारच्या फौजास सामील होणें. येणें प्रो। तुम्हीं केल्यास तुमचे सस्थानचें व तुमचे कल्याण आहे न केल्यास तुम्हास नतीजा[७०] पोंचेल. स्पष्ट समजोन वर्तणूक करणें म्हणोन पत्र व गोवर्नदोर[७१] राजा व सकटतार दिवाण यांस वस्त्रें साबाक [ ला ? ] दस्तुर येऊन सेवकास आज्ञा जालिया गोमातकास जाईन. हे गोष्ट जालियानें फिरगी दबाव खाऊन आपले ठिकाणीं रहातील. वळवळ करू शकणार नाहीं. महाराजाचे ध्यानास आलिया येणें प्रो। पत्रें वस्त्रें पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत व येथून सेवकाची रवानगी उत्तम प्रकारें करून द्यावयाविशीं जिवुबा सबनीस यांस आज्ञा असावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १४७ ] ॥ श्री ॥ पै॥ छ ९ मोहरम.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना. गोंवेकर फिरंगी याकडील बातमीचा मजकुर तरि राजपुरीहून ज्येष्ठ अखेर माशीं गलबतावरून वकील येऊन नेहमी गोंव्यास येऊन राहिला आहे. त्याजकडून गलबत राजपुरीस जाऊन मागती साम्प्रत आलें. जंजिऱ्यावर मसलत श्रीमंतांची जाली आहे, जंजीरा घेणार, त्यास या समयास तुम्हीं आपली कुमक उपराळा जळमार्गे करावा, सामान सरजाम आपणास पोहोंचवावा, आपली शरम या वख्तीं तुम्हीं राखावी. तैसेंच मर्दनगडास तुमचा मुख्य राजा मारला गेला असता तुह्मी आजि पर्वेतों काहीं प्रतिकार करून दाखविले नाहीं, तरि मर्दनगडचा सूड घ्यावा, येविषयीं द् मु त व जे कारितात. परतु आजवर फिरगी याजवळ जमात किंवा लढाईचा पोख्ता सरजाम नाहीं. दरसाल जहाज एक येतें, व तीन वर्षांनी चार पाच गैल्या[७२] व मोठी जाहाजें तीरकर्ता सु ब रा चीं यावीं त्यास हें तिसरे साल आहे. यंदा भाद्रपदमाशीं गणेश चतुर्थी माजी पाच जहाजें घेऊन नवा राजा येणार. तीं जाहाजें पूर्तकालाहून आल्या उपरातीक आर्धी मर्दनगड-

---

७० नतीजा ? शिक्षा, उपद्रव ?

७१. गोवरनदोर=गवरनर

७२ गल्या=गाली म्हणून इग्रजी नांव आहे ज्यास असें पोर्तुगीज लोकाचे तारू.

चे गळीं पडावें, हा त्यांचा मनसबा आहे. बादनें[७३] शामलाचा याचा करार मदार होऊन वर्तमान आढळेल तें सेवेशीं लेहून पाठवीन. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना. *

[ १४८ ] ॥ श्री ॥ पै॥ छ ५ मोहरम.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना. सांवतांचा व गोंवेकर फिरंगी यांचा हर्षामर्ष गतवर्षा पासून लागला आहे. त्यास गोमांतकचे खाडी आलीकडील मुलुक यांणीं घेऊन सारे मुलकाची जप्ती केली. रहाता तीन ठाणीं राहिलीं. येक हळर्ण, दुसरी डिचोली, तिसरें तेरेखोल या तीन ठाण्यात फिरंगी यांचे लोक आहेत. ठाण्या बाहेर नाक्या नाक्यावर चौक्या याच्या बसल्या आहेत. सामान बाहेरून जाऊं पावत नाहीं. दोन तीन जुंजें यांचीं त्याचीं जालीं. त्यात फिरंगी याचें सामान बहुत, बराच[७४] दारू गोळीचीं मोठीं मार. तथापी एक दोन वेळां याचा जोरा होऊन फिरंगी मोडून माघारे घातले. वीस बावीस फिरंगी याजकडे सांपडला. त्यास आणून कैदेंत ठेविले आहेत. सांप्रत फिरंगी याजकडून बोली चाली लागली आहे. त्याजकरिता चाडीस फिरंगी होते त्यापैकीं एक दोघे गोंव्यास गेले आहेत. परस्पर यांचा त्याचा तहरह व्हावा, ठाणीं याचे स्वाधीन करावीं, पुढें यांणीं बारदेशांत न उतरावें, फिरंगी यांणीं खाडी आलीकडे उपसर्ग न द्यावा, असा कारभार त्याचा घाटत आहे. होतां होईल तें सेवेशीं लेहून पाठवीन. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

[ १४९ ] ॥ श्री ॥

साहेबाचे सेवेशी आज्ञांकित बयाजी नाईक, विज्ञापना, मेस्तर एलफिनइष्टेन वकील दिम्मत इंग्रज कलकत्तेकर याजकडील दिनचर्येची बातमी.

१. छ १० मोहरमचे वर्तमान. मशारनिले प्रातःकाळीं दापोडी पावेतों जाऊन सहल करून आले. अनुमिया हैदराबादकर नारायणजी डाकवाले यांशीं बोलून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपुरचीं पत्रें डाके बरोबर आलीं. जाब रा। जाले. रिकार्ड कोशलदार व कर्नेल ग्राट मुंबईहून बंगल्यास आले. सात मुक्काम केले होते. बेहेरास[७५] येऊन, देऊळ

७३ 'बादन' हे कोण?

* हा लिहिणारा नारायण भास्कर कोण?

७४. 'बराच'=ह्मणजे काय? मोडींत 'बेरोच' असेही होईल

७५ बेहेरगांवामध्यें एक कोरींव लेणें आहे हें बौद्धांच्या वेळचें आहे मध्यें दोलेजंग दिवाणखाना आहे त्याचे शिरोभागीं मोठा स्तूप असून त्यावर एक मोठें छत्र आहे. यास धर्म राजाचा डेरा असें ह्मणतात दिवाणखान्याचे खांब मोठे उंच असून समोरासमोरील प्रत्येक दोन खांबांवर एक अशा अर्धलंब वर्तुलाकार मोठ्या लाकडी कमानी शोभे करिता दिल्या आहेत.

( पु० चा० )

पुढें जानकी रामअंकीं विराजे । रमा आदिनारायणा जेंवि साजे ॥
असभाव्य तो वाद्यकल्लोळ गाजे । कपीवाहिनी माजि आनद माजे ॥ १०५ ॥
जनाच्या मना कारणें धीर केला कृपेचा कृपासागरा पूर आला ॥
कृपादृष्टिनें पाहिले जानकीला । पुढें शीघ्र आलिंगिके त्या सितेला ॥ १०६ ॥
म्हणे दास हे श्लोक रामायणाचे । जरी अल्प सोपे चि नाना गुणांचे ॥
कितीएक पाल्हाळ टाकोनि मागें । कथा चालिली ते पुढें लागवेगें ॥ १०७ ॥

## अकरावा प्रसंग प्रारंभ.

प्रतापें दिनेशू तपाचा हुताशू । विरांमाजि ईशू सुरांचा सुरेशू ॥
मुनींचा महेशू महादेव धीशू । सदांचा उदासू वनारण्यवासू ॥ १ ॥
पिनाकी शुळी बोलिजे रुद्रवाणी । जटाभार पंचानन शूळपाणी ॥
हरु शैलजावल्लभू भक्तपाळू । धराधार मृत्युंजयो तो कृपाळू ॥ २ ॥
महादेव शंभू गिरिजाविलासी । सुवर्णाचळामाजि कैलासवासी ॥
विराजे रुपें गौर कर्पूर जैसा । दिसे धाम ढौळा सदाशीव तैसा ॥ ३ ॥
विषें कठ काळा दिसे चंद्र मौळीं । फणीधारकू वन्हि साजे कपाळीं ॥
असभाव्य भोळा गळां रुंडमाळा । पहा मस्तकीं वोघ जातो खळाळा ॥ ४ ॥
बसे भस्म अंगीं प्रभू वीतरागी । उदासीन तो सर्व सामर्थ्य त्यागी ॥
विधी शक्र हे सर्व ध्याती जयाला । महादेव तो वर्णितो राघवाला ॥ ५ ॥
म्हणे धन्य रामा विरा पूर्णकामा । असभाव्य सीमा कळेना महीमा ।
महा थोर अद्भूत सामर्थ्य केले । प्रतापें चि ब्रह्मादिकां सोडवीलें ॥ ६ ॥
तया रावणालागिं प्रसन्न आम्हीं । विरचीवरें मातला पापकर्मी ॥
ऋषी देव माझे बहू कष्टवीले । समर्था तुवा सर्व ही सोडवीले ॥ ७ ॥
अखंडीत घेतो तुझें नाम वाणी । पुजा अतरामाजि कोदंडपाणी ॥
बहू काळ होतें बहू आर्त पोटीं । प्रसगें चि ये जाहली थोर भेटी ॥ ८ ॥
अकस्मात हा भेटिचा लाभ जाला । मनामाजि अद्भूत आनद जाला ॥
सुराकारणे संकटीं पावलासी । मनोभावना राहिली तूजपाशीं ॥ ९ ॥
भविष्योत्तरें बोलिलीं वाल्मिकानें । पहातों चरित्रे तुझीं आवडीनें ॥
विषें पोळला प्राण माझा निवाला । निजध्यास तो लागला पार्वतीला ॥ १० ॥

---

८५. दिनेश=सूर्य ८६. हुताश=अग्नि ८७. सुरेश= इंद्र ८८. धीश=बुद्धीचा स्वामी. ८९ पचानन=पंचमुखी ९० शैलजावल्लभ=पार्वतीपति शिव. ९१. फणीधारकू=सर्प धारण करणारा. ९२. रुंडमाळा=मुंडक्यांच्या माळा. ९३. वीतरागी=वैराग्ययुक्त

समस्ता मनीं लागला ध्यास रामा । तुझें रूप ध्यातों सदां योगधामा ॥
बहूसाल हें बोलणें काय देवा । अखंडीत हा लोभ आतां असावा ॥ ११ ॥
प्रती उत्तरें राम बोले महेशा । उदाराधिशा सुंदरा देवधीशा ॥
समर्था प्रभू लोकपाळा नृपाळा । लिळे जाळिशीं पाळिशी या भुगोळा ॥ १२ ॥
तुझा योग होतां चि आनंद जाला । पुढें देखतां प्राण माझा निवाला ॥
दयासागरा सर्व सांभाळ केला । सुखानंद हेलावला तृप्त जाला ॥ १३ ॥
पुढे बोलता जाहाला तो विरंची । म्हणे आजि हे धन्य वेळा सुखाची ॥
तुझा योग होता घडी अमृताची । बहू स्तूति केली रघूनायकाची ॥ १४ ॥
किती वर्धनें पावलो पूर्व पापें । बहू दीस ओसडिलें[e] मायबापें ॥
बहू कष्ट केलेसि देवाधिदेवा । कृपाळूपणें शीघ्र केला कुडावा ॥ १५ ॥
तुम्हां वेगळे सर्व ही दीन झाले । त्रिकूटाचळीं बंदि शाळे मिळाले ॥
दिनामारिखे जाहले दैन्यवाणे । प्रभू आमुचें दुःख तें कोण जाणे ॥ १६ ॥
बहू कष्टविलें तया रावणानें । घडीनेंघडी त्रासिलें दुर्जनानें ॥
गमे हानि येतां मनामाजि चिंता । समस्तांस कोणी नसे सोडवीता ॥ १७ ॥
बहू वोखटी वेळ येऊन गेली । कृपासागरा धावणी शीघ्र केली ॥
सुतालागिं झेंपावला व्याघ्र जैसा । जगज्जनका तू समस्तांस तैसा ॥ १८ ॥
स्तुती उत्तरें बाळकू काय जाणे । बरें वोखटें सर्व कांहीं च नेणें ॥
मुलें खेळतां मायबापास चिंता । तयाचे परी बोलताहे विधाता ॥ १९ ॥
बहू स्तूति केली तया ब्रह्मयानें । कृपाळूपणें वारिलें राघवानें ॥
प्रसंगें विधीचें समाधान केलें । मनीं दुःख मागील तें सर्व गेलें ॥ २० ॥
पुढें बोलता जाहला वज्रपाणी । सदा सर्वदा गाइजे जो[f] पुराणीं ॥
तया सूकृताचा बरा काळ आला । प्रभू रामचंद्रा तुझा योग झाला ॥ २१ ॥
बहूतां परी राघवा ऐकलासी । पुरी पूरली लोचनाची असोसी ॥
पुढें पाहतां देखतां रूप तुझें । जगन्नायका धन्य हें भाग्य माझें ॥ २२ ॥
उणे कोटि कंदर्प[१४] हें रूप साजे । सदा सर्वदा योगि ध्यानीं विराजे ॥
मुनी शोधिती भक्त कोट्यानुकोटी । बहू साधनें ही नव्हे शीघ्र भेटी ॥ २३ ॥
कितीएक योगी उदासीन जाले । गिरी कंदरीं तूज शोधीत गेले ॥
तयां अंतरीं भेटसी अल्प कांहीं । जनीं आमुच्या सूकृता पार नाहीं ॥ २४ ॥
म्हणे इंद्र तो स्वामि देवाधिदेवा । जनीं सेवका आपुलासा म्हणावा ॥
घडेना मला भक्तिभावार्थ नाहीं । प्रभू सांगिजे जी मुखें कार्य कांहीं ॥ २५ ॥
म्हणे राम गा वज्रपाणी प्रसंगें । रथू मातळी धाडिला लागवेगें ॥

e बहूदीस ओसडिलें माय बापें–बहुदीस हो शीणलों मायबापें f गाइजे जो–देव ऐकों.
१४. कंदर्प=मदन.

तुवां कार्य ते सर्व पूर्वी च केलें । रथारूढ होऊनियां येश आलें ॥ २६ ॥
पुन्हा मागुतें एक आता करावें । निमाले कपी ऋक्ष त्या ऊठवावें ॥
सुधामेघ पाडूनिया लागवेगीं । महा वीर ते ऊठवीं ये प्रसगी ॥ २७ ॥
मुखें बोलता जाहला चक्रपाणी । तेणें थोर संतोषला वज्रपाणी ॥
प्रसगीं तये थोर आनद जाला । नमस्कार केला रघूनायकाला ॥ ॥ २८ ॥
जेंळेशास आज्ञापिलें ते चि काळीं । महा मेघ ते चालिले अंतराळीं ॥
असभाव्य ते जाहली मेघवृष्टी । तिणें भीजली सर्व ते प्रेतसृष्टी ॥ २९ ॥
कपी रीस ते सर्व आले निमाले । नमस्कारिला राम सैन्यीं मिळाले ॥
कळेना कळा कोण या राघवाची । मनीं कल्पिता हाव पूरे मनाची ॥ ३० ॥
निमाले कपी पावले दिव्य देहो । मिळाला रिसा वानरांचा समूहो ॥
सुवेळाचळामाजि ते भार आले । क्षमारूप तैसे चि सर्वे मिळाले ॥ ३१ ॥
मिळाले बहू देव कोटयानुकोटी । असभाव्य दोहीं दळामाजि दाटी ॥
मुखें बोलती देव त्या राघवाला । स्तुती उत्तरी तोषवीती दयाळा ॥ ३२ ॥
प्रसगें चि आज्ञा समस्तास द्यावी । पुन्हा मागुती सर्व चिंता असावी ॥
तुम्हीं हो अयोध्यापुरीमाजि जावें । विलासें बहू राज्य सूखें करावें ॥ ३३ ॥
प्रती उत्तरीं राम बोले समस्तां । म्हणे हो बरें जाइजे शीघ्र आतां ॥
समस्तीं तुम्हीं भूवनामाजि जावें । विलासें बहू राज्य सूखें करावें ॥ ३४ ॥
मुखें बोलता राम ते देव तोषें । करीं पीटती टाळिका नामघोषें ॥
नमस्कार केला रघूनायकाला । समस्ता मनी थोर आनंद जाला ॥ ३५ ॥
रवी पावके येम नैऋत्यनाथे । जेंळाढ्ये धेनाढ्यें रघूनायकाते ॥
गुरू अंगिरा देव गंधर्व ते ही । बहू बोलते जाहले सर्व काहीं ॥ ३६ ॥
ऋषी देव गंधर्व सर्वे मिळाले । स्तुतीउत्तरीं बोलते शीघ्र जाले ॥
समस्तासि सन्मानिलें राघवानें । गुणा किन्नरादीक गाती पुराणें ॥ ३७ ॥
निरोपें चि त्या चालिल्या देवकोडी । पुढें शीघ्र बीभीषणू हात जोडी ॥
समर्था मला थोर आता करावें । घडी एक लंकापुरीमाजि जावें ॥ ३८ ॥
धरावें मनामाजि देवाधिदेवें । जनीं सेवकालागिं काहीं घडावें ॥
करावें समर्थें जिणें श्लाघ्य माझें । घडावें महद्भाग्य हें दास्य तूझें ॥ ३९ ॥
प्रती उत्तरीं राम बोले तयासी । म्हणे धन्य बीभीषणा गूणराशी ॥
प्रसगे सखा बधु तू जोडलासी । पुरेना तुझे संगतीची असोसी ॥ ४० ॥
प्रितीच्या सुखा लागिं कैसें वदावें । गुणाच्या गुणाला किती आठवावें ॥

१५ सुधामेघ=अमृताचे ढग १६ जळेश=वरुण ‡ मनीं कल्पितां हांव पूरे मनाची—न चाले पुढें बुद्धि ब्रम्हादिकांची १७ जळाढ्य=वरुण. १८ धनाढ्य=कुबेर. १९ श्लाघ्य=धन्य.

बहूसाल तूं राखिला स्नेहवाद । जनामाजि तू धन्य साधू अगाधू ॥ ४१ ॥
स्नेहाळा तुवा आजि ऐसें करावें । पुरीमाजि त्वां सुग्रिवालागिं न्यावें ॥
विलासें बहूतां परी सूख द्यावें । कपी ऋक्ष घेऊनि वेगें उठावें ॥ ४२ ॥
सखा सुग्रिवा सारिखा कोण आहे । मनामाजि बीभीषणा तू च पाहें ॥
जिवेशीं सखा आमुचा साह्य जाला । असंभाव्य हा वीरमेळा मिळाला ॥ ४३ ॥
जनीं मैत्रिकी राखिली सुग्रिवाने । बहूसाल हा कष्टला जीव प्राणें ॥
स्वयें देखिलें सांगणे काय तुम्हा । कपी पूजितां पावलें सर्व आम्हां ॥ ४४ ॥
पुढें शीघ्र बीभीषणें ते चि काळीं । अती आदरे ठेविलें वाक्य भाळीं ॥
करीं घेतलें प्रीतिनें सुग्रिवाला । म्हणे आजिचा काळ हा धन्य जाला ॥ ४५ ॥
समर्था गुणें तूं सखा जोडलासी । तुझा योग हा पार नाहीं सुखासी ॥
कपी ऋक्ष घेऊनि तैसा निघाला । पुढें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥ ४६ ॥
जळें निर्मळें सर्व अभ्यंग केलें । अळंकार चीरें कपी तोषवीले ॥
बहूतां परीचीं सुगधें फुलेलें । समस्तांसि नाना रसें तृप्त केले ॥ ४७ ॥
रिसा वानरांला पुजा साग जाली । बहूसाल बीभीषणें स्तुति केली ॥
महावीर विश्रांति पावून तेथें । निघाले पुढें सर्व ही राम जेथें ॥ ४८ ॥
सुगधी बहू घातल्या पुष्पमाळा । [100]अनीळें सुखे वास नेला भुगोळा ॥
प्रभूला नमस्कार साष्टांग केले । मिळाले कपी ऋक्ष सूखें निवाले ॥ ४९ ॥
सभेमाजि आली बहूसाल शोभा । पुढें राहिला हात जोडोनि ऊभा ॥
प्रसंगीं तयें राम बीभीषणाला । [1]सुधाउत्तरीं बोलता शीघ्र जाला ॥ ५० ॥
म्हणे गा विरा त्वां पुरीमाजि जावें । ध्रुवाचे परी राज्य तेथें करावें ॥
शशी सूर्य तारागणे अंतराळीं । असावें सुखें भोगिजे सर्व काळीं ॥ ५१ ॥
पुढें बोलिजे शीघ्र नैऋत्यनाथें । म्हणे वासना पूरवावी समर्थे ॥
प्रभू बोलतां चित्त माझें न राहे । पहावी अयोध्यापुरी वासना हे ॥ ५२ ॥
पुरीमाजि भद्रासनीं तूं नृपाळा । महोत्साह उत्साह पाहेन डोळा ॥
उदारा प्रभू सौख्य पाहेन सगे । निरोपें चि मी शीघ्र येईन मागें ॥ ५३ ॥
सवें घेतलें वीर बीभीषणाला । रघूराज तो वानरेंशीं निघाला ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला । पुढें सिद्ध केलें महा [2]पुष्पकाला ॥ ५४ ॥
नसे तूळणा रत्नमंडीत [3]याना । महीतुल्य त्या आणवीलें विमाना ॥
तयारूढ तो जाहला राम वेगीं । कपी वीर ते आपुलाल्या विभागीं ॥ ५५ ॥
विमानावरी रामराजा विराजे । वरी बैसले ते कपी रीस राजे ॥

---

१००. अनीळ=वारा १ सुधाउत्तरीं=गोड शब्दांनीं २. पुष्पक=रावणाचें विमान. ३. यान=वाहन

सुमित्रासुतू बैसला सैंव्य भागीं । जगन्मात सीता तया वामभागीं ॥ ५६ ॥
विमानावरी वाजती घटमाळा । खडे घोष हेलावती मुक्तमाळा ॥
समुद्रोदकीं पूर्ण तारू च जैसें । नभामाजि ते चालिले भव्य तैसें ॥ ५७ ॥
पुढें चालतां चालता लागवेगीं । सितेलागिं ते राम सांगे प्रसंगीं ॥
रणामडळीं आट राक्षसकूळा । त्रिकूटाचळू दाखवीली सुवेळा ॥ ॥ ५८ ॥
असभाव्य पौलाणिला सेतु जेथें । स्वये वास दर्भासनी योग तेथें ॥
स्त्रिया रत्नमर्दीत नानाविलासी । समुद्रातिरीं भेटला तोयराशी ॥ ५९ ॥
बळें आगळा वीर वाळी निमाला । दिलें राज्य तेथें कपी सुग्रिवाला ॥
अकस्मात जाली हनूमंत भेटी । तटाकें नद्या दाखवी वीर जेठा ॥ ६० ॥
जटायू पुढें पावला स्वर्गलोकीं । जनस्थान हें रम्य गोदातटाकीं ॥
पुढें चालतां राम राजाधिराजे । तया राहवीलें ऋषी भारद्वाजें ॥ ६१ ॥
कपींचीं दळें भूतळीं दाटि जाली । तया भारद्वाजें बहू स्तुति केली ॥
पुढें धाडिले मारुतीलागिं देवें । म्हणे गा विरा भ्रातया भेटवावें ॥ ६२ ॥
प्रभू बोलता वीर तैसा निघाला । तया गूहकानें नमस्कार केला ॥
स्तुती बोलतां तो समाचार सांगे । नंदीग्राम तो पावला लागवेगें ॥ ६३ ॥
कपी देखिला भव्य रामानुजानें । नमस्कार केला तया बांधवानें ॥
कपी भेटला बैसला स्वस्थ जाला । समाचार साकल्य सांगे तयाला ॥ ६४ ॥
म्हणे मारुती बांधवाच्या वियोगें । पळें भासती तीं किती काळयुगें ॥
महद्भाग्य आलासि येणें प्रसगीं । रघूनाथ तो भेटवीं लागवेगीं ॥ ६५ ॥
उदासीन तो बंधु त्या राघवाचा । वदे मारुतीलागिं कारुण्यवाचा ॥
बहू कष्टलों काळ गेला दुखाचा । कधीं राम भेटेल सिंधू सुखाचा ॥ ६६ ॥
वृथा सपदा राज्य हे काय कीजे । उदासीन या राघवाला नमीजे ॥
पदें भोगिजे ते मदें बाधिजे ते । दिसेंदीस आयुष्य हें व्यर्थ जातें ॥ ६७ ॥
कितीएक ते भाग्य भोगून गेले । पुन्हा मागुती मृत्युपथें निमाले ॥
कितीएक साधू उदासीन जाले । महीमंडळीं लोक सुखें निवाले ॥ ६८ ॥
भले जाणती सपदा दुःखदाती । स्वहीतापरा त्रास होतो नियंती ॥
हरादीक ते तापसी या च लागीं । सदा सर्वदा फीरती वीतरागी ॥ ६९ ॥
म्हणोनी मला राघवें वीण काहीं । सदा सर्वदां वैभवें चाड नाहीं ॥

---

१ सव्य=या शब्दाचा अर्थ "डावा" असा मूळचा आहे परतु लोक "उजवा" असा चुकीन समजतात यासप्रमाणेंच परोक्ष व अपरोक्ष याचाही अर्थ लोक विपरीत समजतात ५. वामभागीं=डावेकडे ६. मुक्तमाळा=मोत्याचे हार ७. पाळाणीला=स्त्रोगिरासारखा घातला ८. तोयराशी=समुद्र ९ जनस्थान=नाशिक शहर.

मला भेटवीं राम आत्मा जगाचा । वदे मारुतीलागिं तो दीन वाचा ॥ ७० ॥
म्हणे मारुती धन्य गा धन्य साधू । महाशक्ति वीरक्ति बोधें अगाधू ॥
नव्हे साधनें भेटि ब्रह्मादिकाला । तुम्हालागिं भेटीस तो राम आला ॥ ७१ ॥
नमस्कार केला तया मारुतीनें । रजें डोरलें भाळ माहा विरानें ॥
पिती लागली अंतरीं ते ढळेना । म्हणे धन्य गा धन्य लीळा कळेना ॥ ७२ ॥
तया देखतां चित्त सूखें निवालें । मनामाजि तें थोर आश्चर्य केले ॥
म्हणे वीर अद्भूत वैराग्य कैसें । महद्भाग्य हें मानिलें तॄण जैसें ॥ ७३ ॥
पुढें वीर रामानुजें काय केलें । पुरीमाजि शत्रूघना पाठविलें ॥
समस्तां वसिष्ठादिकां जाणविलें । असभाव्य तें सैन्य पालाणवीलें ॥ ७४ ॥
म्हणे वीर तो राम येईल आतां । सुखी जाहली मुख्य माता समस्ता ॥
प्रसंगें तये थोर आनंद जाला । पुरीमाजि तो लोक सर्वै मिळाला ॥ ७५ ॥
पुढें शीघ्र पालाणिले दिव्य घोडे । महामंडळीं त्यांस नाहींत जोडे ॥
असभाव्य तीं हींसती दिव्य घोडी । उफाळें तयां धावतां भूमि थोडी ॥ ७६ ॥
मुठाळी झुली पाखरा मुक्तमाळा । बहू रत्नमंडीत भासे उफाळा ॥
अळंकार भांगार मंडीत केले । बहूभार शृंगारिले सिद्ध जाले ॥ ७७ ॥
गिरीसारिखीं चंड बाडें अपारें । बहू मातलीं कुंजरें थोरथोरें ॥
पताका झुली रम्य दिव्यांबराच्या । बहू रंग लावण्य नाना परीच्या ॥ ७८ ॥
महा मस्त ते हस्ति भारें निघाले । त्वरें चालता भव्य सर्वांग डोले ॥
भुमी हाणिता अंदु वाजे खणाणा । बळें वाजती चंड घंटा घणाणा ॥ ८० ॥
तयारूढ ते वीर कीतीक जाले । धडाडीत सेना असभाव्य चाले ॥
शिबीका बहूमाळ सूखासनातें । पताका निशाणें फडाडीत वातें ॥ ८० ॥
महावीर शत्रूघनू लागवेगीं । सुमंतू प्रधानू तया पृष्ठभागीं ॥
बहू वाद्य तो घोष गेला दिगंता । ऋषीराज वासिष्ठ त्या मुख्य माता ॥ ८१ ॥
पदीं चालिला मुख्य तो योगि बंधू । सवें घेतला मारुती वीर्यसिंधू ॥
महा वीर दोघे पुढें शीघ्र आले । असभाव्य ते भार मागें उदेले ॥ ८२ ॥
पुढें राम तेथूनि वेगीं निघाला । महा पुष्पकारूढ होऊनि आला ॥
त्वरें पावता पावता नंदिग्रामा । कपी वीर तो दाखवी शीघ्र व्योमा ॥ ८३ ॥
असभाव्य ते तेज हेलावताहे । म्हणे गा कपी काय हें येत आहे ॥
तया सांगतो मारुती राम आला । नभामाजि तो पुष्पकारूढ जाला ॥ ८४ ॥

---

१०. पालाणवीलें=बोलविलें ११. पालाणिले=खोगीर चढविले ( स. पल्याण=खोगीर ).
१२ मुठाळी=बैल इत्यादिकांवर जे हलक्या प्रतीचें खोगिर घालतात त्याला मूठ किंवा मुठाळी म्हणतात १३ अंदु=हत्तीच्या पायातली बेडी.

पुढें रामभ्राता नमस्कार घाली । सुखाची असंभाव्य ते वेळ आली ॥
तया देखतां सौख्य अद्भूत जालें । वरी पाहतां यान सन्निद्ध आलें ॥ ८५ ॥
पुढें देखिला भव्य तो रामयोगी । असंभाव्य सेना तया पृष्ठभागीं ॥
त्वरें चालतां धांवतो रामभ्राता । नव्हे धीर त्या भेटिचा काळ येतां ॥ ८६ ॥
बहू रम्य लावण्य कामावतारी[14] । महा वीर दोघे रूपें योगधारी ॥
तया देखतां रोमें[15] अंगीं थरारी । सुखें पाहतां सर्व सेना थरारी ॥ ८७ ॥
रूपें सारिखे वीर दोघे मिळाले । सुखाचे बहू कंप रोमांच आले ॥
पदीं ठेविला मस्तकू बाधवानें । तया ऊठवीलें त्वरें राघवानें ॥ ८८ ॥
स्वरूप आलिंगनीं वीर गात्रीं । जळें लोटलीं रम्य राजीवनेत्रीं[16] ॥
तयां रामरामानुजां भेटि जाली । प्रसंगीं तये सृष्टि सूखें निवाली ॥ ८९ ॥
सुमित्रासुता भेटला वीतरागी[17] । नमस्कारिली जानकी ते प्रसंगीं ॥
खुणा दाविता रामराजाधिराजें । कपीनाथ आलिंगिला योगिराजें ॥ ९० ॥
पुढें भेटिचा लाभ नैऋत्यनाथा । पदीं ठेविला शीघ्र येऊनि माथा ॥
तयालागिं रामानुजें ऊठविलें । समस्तां विरां राघवें भेटवीलें ॥ ९१ ॥
प्रिती भेटला अंगदा जांबुवंतां । प्रसंगें कपी थोर थोरां समस्तां ॥
स्तुतीउत्तरीं बोलती एकमेकां । स्नेहें लागला सौख्य जालें अनेकां ॥ ९२ ॥
प्रितीनें तया गूहका भक्तराजा । कृपाळूपणें भेटला रामराजा ॥
नमस्कार केला समस्तां विरांला । तयां अंतरीं थोर आनंद जाला ॥ ९३ ॥
पुढें सर्व ही पुष्पकारूढ जाले । दळेंशीं महा वीर तैसे निघाले ॥
अयोध्यापुरी देखतां सौख्य जालें । प्रसंगें रघूनायकें दाखवीलें ॥ ९४ ॥
रूढींच्या[18] मनासारिखें वर्ततांहे[19] । महीमंडळीं यान येऊनि राहे ॥
भुमी ऊतरे रामबंधू सितेशीं । कपीनाथ सुग्रीव बीभीषणेंशीं ॥ ९५ ॥
कपी रीस ते भार कोट्यानुकोटी । दिसेना भुमी जाहली थोर दाटी ॥
समर्थें विमानासि त्या पाठवीलें । कुबेरासि भेटावया शीघ्र गेलें ॥ ९६ ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला ॥ कपी पाहतीं भार अद्भूत आला ॥
रजें व्योम आच्छादिलें सर्व कांहीं । विरां कुंजरां घोडियां मीति[20] नाहीं ॥ ९७ ॥
कपी सर्व चाकाटले[21] पाहताती ॥ गिरीचे परी भार अद्भूत येती ॥
कपी भार ते देखिले राजभारें । पाहाया दळें लोटलीं तीं अपारें ॥ ९८ ॥

---

१४. कामावतारी=इच्छामात्रें करून अवतार घेणारा १५ रोम=लोम=केश=आंगावरील रोमांच ( काटा ). १६ राजीवनेत्रीं=कमळा सारख्या डोळ्यांत. १७. वीतरागी=भरत. १८ रूढीच्या=बसणाऱ्याच्या. १९. वर्ततांहे=चालताहे. २०. मीति=गणती २१. चाकाटले=चकीत झाले.

खुणा दाविती एकमेकांस तेथें । मुखें बोलती राहिला राम येथें ॥
महा वीर ते मुख्य धावोनि गेले । कपीभार त्यामाजि वेगीं मिळाले ॥ ९९ ॥
रघूनायकालागि शत्रूघनानें । नमस्कार केला तया मंत्रियानें ॥
उभा वर्ग ते भेटले राघवाला । तया मानसीं थोर आनंद जाला ॥ १०० ॥
सुमित्रासुता आणि त्या जानकीला । महा वीर तीहीं नमस्कार केला ॥
प्रसंगीं समस्ता सिते भेटि जाली । सुखाची नदी अंतरामाजि आली ॥ १०१ ॥
सुमंतू समर्था म्हणे पैल पाहे । ऋषी जननी मंडळी येत आहे ॥
तयें सांगतां राम तो सिद्ध जाला । पदीं चालतां तो पुढें शीघ्र गेला ॥ १०२ ॥
पुढें देखिला तो ऋषी ब्रह्मनिष्ठ । कुळा रक्षिता तो कुळामाजि श्रेष्ठ ॥
रघूनाथ तेथें नमस्कार घाली । स्तुती उत्तरें आदरें भेटि जाली ॥ १०३ ॥
प्रसंगें नमस्कारिली मुख्य माता । बहू सौख्य जालें तयां भेटि होतां ॥
समस्ता जनींला नमस्कार केले । तया देखतां प्राण त्याचे निवाले ॥ १०४ ॥
समस्तांस तो भेटला राम जैसा । यथासांग तो वीर सौमित्र तैसा ॥
नमस्कार घाली बहू स्तुति केली । तया देखतां मंडळी ते निवाली ॥ १०५ ॥
सितासुंदरीनें नमस्कार केले । असंभाव्य ते लोक तेथें मिळाले ॥
स्तुती उत्तरें एकमेकांस जाली । प्रसंगीं तये अंतरें तीं निवालीं ॥ १०६ ॥
समस्तां समस्ता जना भेटि जाली । पहाया सुखें लोकमांदी मिळाली ॥
पुरीमाजि तो थोर आनंद जाला । मुखें बोलती हो सुखें राम आला ॥ १०७ ॥
सुखें पाहतां मुख्यमाता मिळाल्या । सर्व सुंदरा त्या असंभाव्य आल्या ॥
वधूची बहू दाटणी थोर जाली । सिता सुंदरी शीघ्र तेथें मिळाली ॥ १०८ ॥
नमस्कारिलें नम्र होऊनि श्रेष्ठां । प्रसंगें चि भेटी वरिष्ठां वरिष्ठां ॥
धडाडा नभीं वाजती चंड भेरी । बहू वारिता जाहली दाटि थोरी ॥ १०९ ॥
महा वैभवाची कथा राघवाची । जुनी सौख्यदाती च ब्रह्मादिकाची ॥
पुढें राम ऊपासकें रामदासें । पुरी वर्णिली रम्य नाना विलासें ॥ ११० ॥

---

## बारावा प्रसंग प्रारंभ.

पुढें चालिली ते असंभाव्य सेना । रजें मातलें व्योम पुढें दिसेना ॥
कितीएक ते भार सन्मूख आले । समर्थास तीहीं नमस्कार केले ॥ १ ॥
दळें राहिलीं दूरि वेष्टीत पाळा । कपीचक्र येकीकडे चंड मेळा ॥
तया मध्यभागीं ऋषी वधु माता । महा वीर ते मुख्य चत्वारि कांता ॥ २ ॥
उभा राहिला राम तो राजभारें । गृहें निर्मिलीं अंबरांचीं[२१] अपारें ॥

२१ अंबराचीं गृहें=तंबू

सभामंडपीं धर्मशाळा विशाळा । गृहें रम्य अंतर्गृहें चित्रशाळा ॥ ३ ॥
बहूसाल दिव्यांबरें थोरथोरें । सुचित्रें विचित्रें अमोल्यें अपारें ॥
कितीएक त्या लाविल्या स्तंभवोळी । प्रभा रत्नमंडीत तेजें झळाळी ॥ ४ ॥
बहू रत्नमाळा बहू मुक्तमाळा । बहू लागले घोंस नक्षत्रमाळा ॥
कितीएक जाळीवरी अंतराळीं । कितीएक मुक्तें निराळीं निराळीं ॥ ५ ॥
सुढाळा किळा मंडपीं ढाळ देती । विशाळा स्थळामाजि त्या दिव्य ज्योती ॥
सुवर्णासनें दिव्य नाना परीचीं । कितीएक सिंहासनें कूसरीचीं ॥ ६ ॥
बहू ते फुलारे बहूतां परीचे । वरी घोस हेलावती माणकांचे ॥
निळे पाच गोमेद इत्यादिकांचे । बहू रंग नाना परी कांचनाचे ॥ ७ ॥
नभामाजि त्या दिव्य नक्षत्रमाळा । तयाचे परी शोभती मुक्तमाळा ॥
विराजे तया मंडपा मध्यभागीं । ऋषी राम माता सखे बंधुवर्गीं ॥ ८ ॥
असंभाव्य ते संपदा वैभवाची । मुखें सर्व बोलावया शक्ति कैंची ॥
वरी पाहतां उंच आकाशपर्यें । असंभाव्य तें भव्य लावण्य तेथें ॥ ९ ॥
समूदाय तो बैसला स्वस्थ जाला । वधूमेळ अंतर्गृहामाजि गेला ॥
ऋषी राम माता सखे बंधुवर्गीं । स्नेहें उत्तरें बोलिजे ते प्रसंगीं ॥ १० ॥
कितीएक तो काळ गेला वियोगें । असंभाव्य तें सौख्य संयोगयोगें ॥
सरेना मुखें बोलतां मोह माया । निवाली मुखें पाहतां सर्व काया ॥ ११ ॥
कपीनाथ बीभीषणाला भुपाळें । रहाया गृहें दीधलीं तीं विशाळें ॥
तयामाजी ते सर्व ही स्वस्थ जाले । समर्थें बहू सोहळे दाखवीले ॥ १२ ॥
पुढे मंगलस्नान तेणें चि काळें । बहूसाल[h] ते चालिले एक वेळे ॥
कितीएक ते हाटकाचे तटाकीं । जळें ठेविलीं सेवकें ग्रामलोकीं ॥ १३ ॥
असंभाव्य ती सिद्ध केलीं फुलेलें । बहूता परींचीं सुगंधेल तेलें ॥
किती चौकिया चौक गंगाळ पात्रें । विशाळें पवित्रें सुचित्रें विचित्रें ॥ १४ ॥
सुगंधें रसें चोखण्या कालवील्या । यथासांग सामग्रिया सिद्ध केल्या ॥
बहू आर्त पोटीं उभा भर्त बंधू । करी प्रार्थना राम कारुण्यसिंधू ॥ १५ ॥
प्रभू बोलता जाहला शीघ्र काळें । किजे मंगळस्नान या लोकपाळें ॥
अयोध्यापुरीमाजि त्या सर्व लोकां । विरें सर्व संकेत केला अनेकां ॥ १६ ॥
समस्तांसि तात्काळ अभ्यंग जालें । महा लोक ते सर्व सूखें निवाले ॥
कितीएक सामग्रिया सिद्ध केल्या । कपीनाथ बीभीषणा पाठवील्या ॥ १७ ॥
पुन्हा राम बोले वरिष्ठा वरिष्ठां । किजे मंगळस्नान हो सर्व श्रेष्ठा ॥

---

२३. अंतर्गृहें=जनानखाने २४ किळा=चुका, खिळे. २५ कुसरीचीं=कारागिरीचीं
२६. कपीनाथ=सुग्रीव h बहूसाल=बहुदास २७ हाटक=सोने

पुढें जननी लागीं देवाधिदेवे । म्हणे मंगळस्नान तुम्हीं करावें ॥ १८ ॥
समस्तीं यथासांग अभ्यंग केलें । पुन्हा देव तो भ्रातयालागीं बोले ॥
सखे बोलती स्वामि देवाधिदेवा । तुम्हीं सांग अभ्यंग आधीं करावा ॥ १९ ॥
बहूतां परी प्रार्थिले बांधवासी । कितीएक ते सिद्ध जाले विलासी ॥
उभी मंडळी कूशळा २८नापिताची । तिहीं मांडिली सांग सेवा प्रभूची ॥ २० ॥
२९समश्रू क्रमें जाहली त्या प्रसंगीं । नखें काढिलीं नीळरंगी तरंगी ॥
जटाजूट ते मोकळे केश केले । ३०स्नेहे घालिता दिव्य चक्षू निवाले ॥ २१ ॥
पुढें ३१दर्पणीं पाहिलें रूप रामें । प्रसंगीं तये कोटि ३२कंपर्दधामे ॥
कळा बाणली भव्य लावण्य गात्रीं । असंभाव्य सौंदर्य राजीव नेत्रीं ॥ २२ ॥
जळें पादप्रक्षाळना सिद्ध जालीं । पदीं लागतां स्वर्गगंगा निवाली ॥
पदांगुष्ठ भागीरथी ओघ आला । जनें मज्जनें लोक निर्दोष केला ॥ २३ ॥
पुढें तीर्थ वंदूनि बंधूजनानें । निवाले पवित्रोदकें तीर्थपानें ॥
बहू लाविलें लोचना आवडीनें । मनीं मानिलें सौख्य या बांधवानें ॥ २४ ॥
बहूसाल आयुष्य हो कल्पकोडी । घडावी सदां सर्वदां भक्तिजोडी ॥
सुगंधें फुलेलें चबाबीत माथा । महा मस्तकीं मर्दिती लोकनाथा ॥ २५ ॥
बहू मर्दना सांग नाना परीची । लिळे काढिली ते मळी निर्मळाची ॥
जळें निर्मळें घालिती उष्ण धारा । मुखें बोलती तोय आणीक सारा ॥ २६ ॥
शिरीं घालिती तोय नेटें घळाळां । नद्या वाहती उष्ण वोघे खळाळा ॥
सुगंधें चि दोहीं तिरीं पंक जाला । असंभाव्य तो भृंग तेथें मिळाला ॥ २७ ॥
यथासांग अभ्यंग केलें भुपाळें । पुढें रम्य दिव्यांबरें शीघ्र काळें ॥
महा तेज पुंजाळ तें लागवेगीं । चिरें वल्कलें त्यागिलीं ते प्रसंगीं ॥ २८ ॥
प्रसंगी तये रत्नमंडीत मानें । पुढें पादुका ठेविल्या बांधवानें ॥
वसिष्ठासि रामें नमस्कार केला । महा वीर तो बैसला स्वस्थ जाला ॥ २९ ॥
बहू कस्तुरी केशरें ते चि काळीं । ऋपी राम वीलेपवी गंध भाळीं ॥
बहू भूषणें रत्नमंडीत रामें । अमूल्यें सुखें घेतलीं पूर्णकामें ॥ ३० ॥
उटी घेतली घातल्या पुष्पमाळा । बहूतां परीच्या बहू रत्नमाळा ॥
महा मस्तकीं हेम मुगूट साजे । असंभाव्य तो तेज कल्लोळ माजे ॥ ३१ ॥
वरी कीरटी कुंडलें वैजयंती । अलंकार नाना परी ढाळ देती ॥
चिरें सुंदरें घातला भव्य *धाँटा । कटीं किंकिणी नागरा क्षुद्र घंटा ॥ ३२ ॥

---

२८. नापित=न्हावी. २९ समश्रु=श्मश्रु=हजामत ३० स्नेह=तेल ३१ दर्पण=आरसा ३२ कंदर्पधाम=मदनतेज. * वीतभर रुंद व पांच हात लांब असा जाळ्यासारखा वस्त्राचा पट्टा. हा कमरपट्ट्यासारखा हनवटीखालून कान झांकत अशा रीतीने पागोट्यावर बांधितात.

वरीं कंकणें मुद्रिका चापपाणी । ब्रिदें घातलीं अंदु[33] वांकी झणाणी ॥
महीमंडळीं सर्व ही एक जालें । रघुनायका भव्य लावण्य आलें ॥ ३३ ॥
पहातां नसे तूळणा ही तुळाया । विराजे बहू भूषणें दिव्य काया ॥
ऋषीराज बंधू सखे आणि माता । सुखें पाहती राम हा सौख्यदाता ॥ ३४ ॥
मितीनें मुखें बोलता राम जाला । म्हणे स्नान कीजे तया बांधवाला ॥
स्नेहें उत्तरें बोलतां शीघ्र तैसें । किजे मंगळस्नान नाना विलासें ॥ ३५ ॥
जटाजूट ते मोकळे सर्व केले । मळें त्यागिले भव्य सुस्नात जाले ॥
सुगंधें उटी घेतली पुष्पमाळा । अलंकार दिव्यांबरें रत्नमाळा ॥ ३६ ॥
प्रसंगे समस्तांसि अभ्यंग जालें । सभोंते सखे आप्त सर्वै मिळाले ॥
अळंकार दिव्यांबरें दिव्य माता । सुखें राघवा पाहती त्या समस्ता ॥ ३७ ॥
फळें खाद्य नैवेद्य नाना परीचे । फळाहार ते आणिले कूसरीचे ॥
बहूता परीचे बहू उंच मेवे[34] । म्हणे राम सर्वांस ते पाठवावे ॥ ३८ ॥
समस्तांसि ऊदंड ते पाठवीले । फळें सेवितां लोक संतुष्ट जाले ॥
स्वइच्छा स्वयें सेविलें अल्प कांहीं । जनीं सेवितां तूळणा त्यासि नाहीं ॥ ३९ ॥
जळें निर्मळें आच्मनें शुद्ध केलीं । समस्तांसि पानें बहू पाठवीलीं ॥
विडे घेतले सर्व ही स्वस्थ जाले । असंभाव्य ते पाक ही सिद्ध जाले ॥ ४० ॥
पुढें मंडळी सेवकाची मिळाली । विशाळें स्थळें सर्व ही सिद्ध केलीं ॥
बहू चित्रशाळा बहू होमशाळा । सडे शिंपिले घातल्या रंगमाळा ॥ ४१ ॥
बहू रत्नमंडीत मोठीं अचाटें । दुकाठीं बहू मांडिलीं दिव्य ताटें ॥
कितीएक तीं बत्तिसां वाटियांचीं । कितीएक विस्तीर्ण नाना परींचीं ॥ ४२ ॥
असंभाव्य तीं रम्य चित्रें विचित्रें । बहूतां परींचीं बहू तोयपात्रें ॥
बहू आसनें दिव्य नाना परींचीं । असंभाव्य तीं घातलीं कूसरीचीं ॥ ४३ ॥
बहूवर्ण दिव्यांबरें पट्टकूळें । बहूरंग नाना परींचीं दुकूळें[35] ॥
असंभाव्य तीं सोवळीं सिद्ध केलीं । कितीएक दिव्यांबरें आणवीलीं ॥ ४४ ॥
पुढें भोजना सर्व ही सिद्ध जाले । कितीएक ते लक्षकोटी मिळाले ॥
मिळाली ऋषीमंडळी ब्राह्मणाची । बहू भव्य मार्तंड जैसे विरिंची ॥ ४५ ॥
वयें धाकुटे थोर कोट्यानुकोटी । स्थळें रुधिलीं जाहली थोर दाटी ॥
बहूसाल संतोषले थोर तोषें । असंभाव्य ते गर्जती नामघोषें ॥ ४६ ॥
बहूसाल गंधाक्षता पुष्पमाळा । बरीं धोत्रपात्रें दिल्या रत्नमाळा ॥
चिरें सुंदरें रम्य यज्ञोपवीतें । धनें चंदनें दीधलीं ब्राह्मणांतें ॥ ४७ ॥

---

३३. अंदु=तोडे. ३४ मेवे=फळफळावळ. ३५. दुकुलें=वस्त्रें.

पुढे वाढिते जाहले शीघ्र काळीं । बहू दाटल्या त्या असभाव्य बोळी ॥
महा मडपीं बैसला रामराजा । ऋषी मुख्य बधू सखे आप्त वोजा ॥ ४८
पुढें रत्न झाऱ्या बहू साल चंबू । सुवासी तयांमाजि संपूर्ण अंबू ॥
स्थळें सर्व ही सिद्ध पूर्वींच केलीं । असंभाव्य अन्नें बहू आणवीलीं ॥ ४९
कपीनाथ सुग्रीव बीभीषणाला । बहू धाडिलीं दिव्य अन्नें तयाला ॥
रसें पूर्ण त्या कावडी लक्ष कोटी । पथामाजि नेतां असभाव्य दाटी ॥ ५०
पुढें वाढिते जाहले पात्रधारी । असभाव्य ते चालिले एकहारी ॥
रूची रायतीं लोणचीं रम्य बोळी । बहू स्वाद शाखावळी शीघ्र काळीं ॥ ५१
बहू वाढिला ओदँनू तो सुवासें । वैरान्नें क्षिरी शर्करा पच भक्षें ॥
कितीएक आणीक नानापरीचीं । बहू वाढिलीं भिन्नभिन्नां रूचींचीं ॥ ५२
सुगंधें तुपें वाढिती ते खळाळां । पयें घालिती थोर नेटें घळाळां ॥
पुढें दिव्य नाना रसें पूर्ण पात्रें । सभा शोभली भव्य राजीवनेत्रें ॥ ५३ ॥
बहूसाल संतोष नाना सुवासें । ऋषी मडळी गर्जती नामघोषें ॥
पुढें सर्व ओगीरिती सावकाशें । सुखे जेविती सर्व नाना विलासें ॥ ५४ ॥
गिरीसारिखा ओदनू शुभ्र वर्णे । बहू भक्षिलीं भक्ष सपूर्ण पूर्णे ॥
कथा मागुती सांगती एकमेकां । असभाव्य ते तृप्ति जाली अनेकां ॥ ५५ ॥
कदी वर्पिती आवडीनें फरारा । ऋषी जेविती ढेकरीती डरारां ॥
पुरे हो पुरे अन्न ऊदंड झालें । बहू भोजनें कंठमर्याद आलें ॥ ५६ ॥
पुढें शीघ्र दँध्योदनें लागवेगीं । पुन्हा वाढिते जाहले ते प्रसगीं ॥
ऋषी राम बंधू सखे सर्व मात्ता । मुखें बोलती सर्व ही तृप्ति आतां ॥ ५७
सुवासें रूचीचीं असंभाव्य तर्कें । कदां ही कधीं नेणिजे स्वाद शर्के ॥
सुखें सेविती जेविती लोक इच्छा । यथासांग सपूर्ण जाले स्वइच्छा ॥ ५८ ।
यथासाग तीं भोजनें सर्व जालीं । खळाळें बरीं आच्मनें शुद्ध केलीं ॥
सुपारी विडे दीधले कर्पुराचे । बहू चूँर्ण ते शुद्ध मुक्ताफळाचे ॥ ५९ ॥
सुवासी चैंतुर्भाग मागून घेती । सुखी जाहल्या सर्व ही वेदमूर्ती ॥
बहूसाल मंत्राक्षता मंत्रघोषें । मुखे बोलती सर्व ही विप्र तोषें ॥ ६० ॥
कपी रीस ते सर्वही तृप्त जाले । बहू भक्षिले अन्न सुखें निवाले ॥
गिरीसारिखीं राहिलीं सर्व भक्षें । विडे घ्यावया धाडिलीं त्यांसि पानें ॥ ६१ ॥
यथासांग सर्वस्व संतृप्ति झाली । सभामडपीं मंडळी ते मिळाली ॥

३६. अबू=पाणी. ३७. ओदन=भात ३८. वराश्न=वरण. ३९ ओग[illegible]
[illegible]ओदन=दहीभात. ४१ [illegible]
[illegible] ४१ सुवासी चतुर्भाग=सुवा-

पढें ब्राह्मणीं मांडिली धर्मचर्चा । सर्वे बोलती धन्य दीन महाराजा ॥ ६२ ॥
पुढें दीन तो चालिला अस्तमाना । नमायासि आली असंभाव्य सेना ॥
कितीएक तीं दीवट्यांचीं भपाटें । सभामंडपीं चाललीं दाट थाटें ॥ ६३ ॥
प्रसंगीं तये वाद्यकल्लोळ जाला । दुरस्ता बहू लोक सूखें मिळाला ॥
विराजे सभेमाजि तो रामराजा । पुढें चालिल्या त्या कळावंत-फौजा ॥ ६४ ॥
झणाणीत वीणे मनोरम्य नादें । दणाणीत मृदंग गंभीर शब्दें ॥
अलापें कळा दाविती रागमाळा । सुरें सुस्वरें माजली रंगवेळा ॥ ६५ ॥
बहू ताळ कल्लोळ वाजे खणाणां । जिणे वाजती ततुनादें झणाणा ॥
बहू गीत संगीत तें कूसरीचीं । भले जाणती ते घडी अमृताची ॥ ६६ ॥
असंभाव्य तो नृत्यकल्लोळ जाला । सुखें पाहतां शुद्धि नाहीं जनांला ॥
गुणी रातले मातले गायनानें । तदाकार ते वृत्ति केली मनानें ॥ ६७ ॥
अळंकार चीरें पुढें टीग केले । कळावंत ते सर्व संतुष्ट जाले ॥
विसर्जी सभा तो पुढें रामराजा । निरोपें चि गेल्या बहू लोकफौजा ॥ ६८ ॥
समस्तीं घडी एक विश्रांति केली । अकस्मात प्रभात ते प्राप्त जाली ॥
पुढें सारिते जाहले नित्य नेमें । महा वीर ते आपुलाल्या स्वधर्में ॥ ६९ ॥
सभे बैसिजे स्वामि देवाधिदेवें । म्हणे आजि वेगीं अयोध्येसि जावें ॥
पुरी सर्व शृंगारमंडीत केली । असंभाव्य ते सर्व सेना निघाली ॥ ७० ॥
महीमंडळीं मुख्य आधीं पुराणीं । मुखें बोलिजे ते श्रीवशास्त्राणी ॥
अयोध्यापुरी धन्य हा पुण्यराशी । किती राहिले तापसी तीर्थवासी ॥ ७१ ॥
मुनी संत योगी सदा वीतरागी । उदासीन साधू पराचे विभागीं ॥
ऋषीमंडळी सात्विकां सज्जनांची । महा योगि व्युत्पन्न विद्वज्जनांची ॥ ७२ ॥
कितीएक ते मंडळी प्रेमळांची । कितीएक ते ब्राह्मणां सुशिळांची ॥
मनस्वी किती ते यती ब्रह्मचारी । बहूतां परींचे बहू वेषधारी ॥ ७३ ॥
सदां सर्वदां योग ध्यानस्थ जाले । कितीएक ते काळ घेऊनि गेले ॥
भुयारें मठ्या त्या बहूतां परींच्या । नदीचे तिरीं पर्णशाला मठाच्या ॥ ७४ ॥
प्रभू देव हा सर्व ब्रह्मादिकांचा । जया वर्णितां शीणल्या वेदवाचा ॥
स्वयें वास जेथें जगन्नायकाचा । महीमा वदे कोण त्या हो स्थळाचा ॥ ७५ ॥
कितीएक ते राहिले भक्त ज्ञानी । कृपाळू बहू मुख्य नामाभिधानी ॥
बहू सूकृती सूर्य जैसे तपाचे । सदा धर्मचर्चा अखंडीत वाचे ॥ ७६ ॥
नदी चालिली भव्य ते पूर्णतोया । जनालागिं आधार आली उपाया ॥
शिवालयें बहू बांधिलीं थोरथोरें । ध्वजा देउळें शीखरें तीं अपारें ॥ ७७ ॥

६४. कळावंत फौजा=कळावंतणीचे ताफे.

तडागें जळें निर्मळें कूप वावी । सदां सर्वदा राहिजे मानुभावीं* ॥
स्थळें निर्मळें निर्मिलीं पावनानें । कितीएक कल्पत्तरूंचीं उद्यानें ॥ ७८ ॥
कितीएक त्या लागल्या वृक्षजाती । वनें वाटिका जीवनें पुष्पजाती ॥
अयोध्यापुरी रम्य लावण्य नांवें । महा रम्य विस्तीर्ण ते वीस गांवें[४४] ॥ ७९ ॥
गृहें बांधिलीं तीं असंभाव्य उंचीं । कितीएक तीं पंच सप्ता खणांचीं[४५] ॥
सजे चौक दामोदरें थोरथोरें । विशाळें विचित्रें गवाक्षें अपारें ॥ ८० ॥
विदी हाट बाजार चौवार कुचे । असंभाव्य ते भव्य नाना परीचे ॥
कितीएक तीं सारखीं दीसतानीं । महा धूर्त ते ही बळें भ्रांत होती ॥ ८१ ॥
गृहें गोपुरांचा बहू दाट खेटा । हुडे माडिया ऊपरा त्या अचाटा ॥
महद्भाग्य श्रीमंत ते लोक तेथें । सदा सर्वदा दाटणी थोर पंथे ॥ ८२ ॥
पुरीमाजिचे लोक आरोग्य भारी । मुलें लेकरें थोरलें आणि नारी ॥
करंटें तयामाजि कोणीच नाहीं । नसे द्वेष ना मत्सरू सर्व काहीं ॥ ८३ ॥
सदानंद उद्वेग नाहीं जनाला । नव्हे वृद्ध ना मृत्यु नाहीं तयांला ॥
कुरूपी महामूर्ख तेथें असेना । सुखाचे जिणें दैन्यवाणे दिसेना ॥ ८४ ॥
पुरीमाजि ते सर्व ही लोक कैसे । सुवर्णाचळीं नांदती देव जैसे ॥
प्रतापी बळाचे सदां सत्य वाचे । पुरीमाजि लावण्य देहें जनाचे ॥ ८५ ॥
बहू नीतिन्यायें विवेकें उपायें । कदा ही तया बाधिजे ना अपायें ॥
बहूता धनांचे उदारा मनाचे । विशेषा गुणांचे गुणी सज्जनांचे ॥ ८६ ॥
पुरीमाजि त्या सर्व चातुर्य मोठे । कदा ही मनीं नावडे त्यासि खोटें ॥
विलासें वसे राम आणीक विद्या । कळा सर्व साधारणा सर्व साध्या ॥ ८७ ॥
अळंकार दिव्यांबरें सर्व लोका । सदा प्रीतिनें बोलती एकमेकां ॥
महा वैभवाचे बहू सूकृताचे । पुरीमाजि ते लोक नानागुणाचे ॥ ८८ ॥
पुरीमाजि ते दाटणी मंदिराची । रिकामी भुमी ते रहायासि कैंची ॥
तया मध्यभागीं असंभाव्य तेथें । महा भूवनें उंच आकाश पंथें ॥ ८९ ॥
गृहें गोपुरें निर्मिलीं कांचनाचीं । बहूसाल विश्रांतिदातीं मनाचीं ॥
महारत्नमंडीत तीं थोरथोरें । किती धाकटीं भव्य मोटीं अपारें ॥ ९० ॥
भुमी बांधल्या पांच बंदी विशाळा । मनोरम्य त्या रेखिल्या चित्रशाळा ॥
कितीएक दारें लघू थोरथोरें । स्थळें दिव्य तीं पाहता सौख्यकारें ॥ ९१ ॥
किती अन्न शाळा किती वस्त्रशाळा । कितीएक विस्तीर्ण त्या होमशाळा ॥
किती नाट्यशाळा बहू रत्नशाळा । कितीएक त्या धर्मशाळा विशाळा ॥ ९२ ॥

* मानुभावीं=महानुभावीं=थोर मनाच्या पुरुषानीं ४४. वीस गावें=वीस योजनें. ४५. सप्ता खणाचीं=सात मजली

गृहें रम्य अंतर्गृहें हाटकाचीं । बहू हासल्या पूतळ्या नाटकांची ॥
भुयारें घरें वीवरें गुप्त द्वारे । स्थळें भव्य बैसावया थोरथोरें ॥ ९३ ॥
सभामंडपीं ते असंभाव्य शोभा । बहू शोभतो हेमकल्लोळ गाभा ॥
फुलारे बहू लाविले माणिकाचे । कितीएक ते घोंस मुक्ताफळांचे ॥ ९४ ॥
महीं मंडळीं तेज पुंजाळ जाले । असंभाव्य तें सर्व लावण्य आलें ॥
विशाळा स्थळा निर्मिल्या भव्य भिंती । निळे पाच गोमेद ते ढाळ देती ॥ ९५ ॥
बहू रत्न पुंजाळले ज्वाळ जैसे । असंभाव्य हारी उभे स्तंभ जैसे ॥
विशाळें स्थळें निर्मिलीं झाड कैशीं । सुवर्णाचळामाजि विस्तीर्ण जैशीं ॥ ९६ ॥
विचित्रा कळा कूसरी लेखनाच्या । बहू रत्नमंडीत त्या कांचनाच्या ॥
सभामंडपीं फांकल्या रत्नकीळा । दिसे रंग तेथें निराळा निराळा ॥ ९७ ॥
कितीएक तीं फाकलीं दिव्य किर्णे । बहूतां परींचीं बहू रंग वर्णे ॥
कितीएक हेलावती हेमपर्णे । कितीएक घंटावळी त्या सुवर्णे ॥ ९८ ॥
स्थळें शोभती रम्य बैसावयाचीं । बहूसाल तीं भिन्नभिन्ना परींचीं ॥
कितीएक तीं रत्नमंडीत यानें । कितीएक सिंहासनें तीं विमानें ॥ ९९ ॥
बहू बैसका दिव्य रम्यांबराच्या । विचित्रा बहूरंग नाना परींच्या ॥
वरी लोंबती घोंस मुक्ताफळांचे । कितीएक मुक्तावळी जाळियाचे ॥ १०० ॥
कितीएक रत्नावळी रम्य कैशा । कितीएक मुक्तावळी शुभ्र जैशा ॥
प्रभेचे बहू घोंस हेलावताती । बहूतां परींच्या बहू रत्नजाती ॥ १०१ ॥
स्थळें निर्मिलीं रम्य विस्तीर्ण नाना । कितीएक बैसावया सर्व सेना ॥
कितीएक विस्तीर्ण रांजांगणें तें । भुमी पाचबंदी महा रम्य तेथें ॥ १०२ ॥
हुडे कोठ माड्या सजे मोठमोठे । उभे राहिले भव्य ब्रह्मांड वाटे ॥
असंभाव्य चर्या लघु पंथ हारी । नभा भासवी रूप नाना विकारी ॥ १०३ ॥
झरोके कितीयेक त्या गुप्त वाटा । किती ऊपऱ्या अंतराळीं अचाटा ॥
कितीएक त्या भक्ति सख्यारसाच्या । कितीएक त्या उंच तेरा खणाच्या ॥ १०४ ॥
वरी रत्नकळसाचिया रम्य वोळी । रवीकीर्ण तैशा कळा अंतराळीं ॥
वरी लागल्या सर्व नक्षत्रमाळा । मनीं भासती फाकती दिव्य कीळा ॥ १०५ ॥
रवीवंशिचे स्वर्ग विख्यात राजे । तयांच्या प्रतापें विधीगोळ गाजे ॥
करी कोण संख्या तया वैभवाची । उणी वर्णिता बुद्धि ब्रह्मादिकाची ॥ १०६ ॥
किती कोण लेखा मला मानवाला । मतीमंद मी काय वर्णू तयाला ॥
म्हणे दास त्या अल्पशा भक्तिभावें । प्रभू बोबड्या उत्तरीं तोषवावें ॥ १०७ ॥

९६. राजांगणा=मुख्य अंगण, दुसरीं उदाहरणें, राजविद्या, राजगुरु, रायआवळी १०३ झरोके=खिडक्या १०४. ऊपऱ्या=माड्या.

## तेरावा प्रसंग प्रारंभ.

पुरी वर्णिली हो यथासांग येथें । परी पाहतां दीसतें अल्प तेथें ॥
मनीं संशयो श्रोतयां प्राप्त जाला । प्रतीउत्तरें काय दिल्हीं तयांला ॥ १ ॥
अयोध्यापुरी स्वर्गलोकासि गेली । पुढें वोस होतां चि ते भग्न जाली ॥
असेना जना राहणें वस्ति जेथें । खडे माणिकें कोण ठेवील तेथें ॥ २ ॥
पुरें पट्टणें वोस होतीं कितेकें । पुढें पाहतां दीसती सर्व टेकें ॥
युगें लोटतां ही वसे अल्प कांहीं । असभाव्य हें तूं विचारूनि पाहीं ॥ ३ ॥
असो तूटला संशयो श्रोतयांचा । पुढें राहिला बोध जातां कथेचा ॥
अयोध्यापुरा चालिले वीर जेठी । निघाले स्वयें भार कोट्यानुकोटी ॥ ४ ॥
ऋषी राम ते चालिले नीज भारें । दळें चालिलीं पृष्ठभागीं अपारें ॥
शिबीका पुढें चालती दिव्य हारी । सखे लोक बंधू मधें रांवणारी ॥ ५ ॥
पुढें दाटले भार महारथांचे । दळीं घोष जाले गजां घोडियांचे ॥
गिरीतुल्य सेना रिसांवानरांची । बहू दाटि राक्षेस लंकापतीची ॥ ६ ॥
पुरी पावतां रूंधल्या सर्व वाटा । असभाव्य तो माहला दाट खेटा ॥
शतांचीं शतें धांवती वेत्रधारी । दळें मानलीं कोण कोणास वारी ॥ ७ ॥
कितीएक ग्रामस्थ मध्यें चि गेले । कितीएक ते चूकले भ्रांत जाले ॥
अयोध्यापुरीमाजि ऊभीं अचाटें । गृहें गोपुरें पाहती दाट थाटें ॥ ८ ॥
करीं रत्नताटें कितीएक हारी । असभाव्य त्या चालिल्या दिव्य नारी ॥
बहूसाल नीराजनें लक्ष कोटी । पुरींतूनि येतां पुढें थोर दाटी ॥ ९ ॥
रूपें राजसा सुंदरा त्या प्रितीनें । रघूनाथ ओंवाळिती आवडीनें ॥
मनामाजि ते लागलीसे अवस्था । सुखें पाहती येकपत्नीव्रतस्था ॥ १० ॥
करीती बहू सुंदरा अक्षवाणें । कितीएक ओंवाळिती निंबलोणें ॥
असभाव्य थोवे तया नायकांचे । मुखें गर्जती भाट वेतोळ वाचे ॥ ११ ॥
पताका निशाणें बहूरंग वर्णें । महातेजपुंजाळ मार्तंडपर्णें ॥
वरी दाटलीं तीं असभाव्य छत्रें । भ्रमों लागलीं दिव्य छत्रें विचित्रें ॥ १२ ॥
पहा हो पहा पैल तो राम आला । असंभाव्य हा वीर मेळा मिळाला ॥
दिसेना पुढें पाहतां गर्द जाला । समस्तीं करें ताळिकाघोष केला ॥ १३ ॥
पुढें सर्व ही भूवनामाजि गेले । महावीर ते बैसले स्वस्थ जाले ॥
पुरीमाजि आनंद सर्वांस जाला । उभें राहिलें भाग्य हें राम आला ॥ १४ ॥

---

४९ रावणारी=राम ५०. वेत्रधारी=छडीदार, चोपदार ५१. थोवे=थवे. ५२. वेताळ=स्तुतिपाठक ( सं. वैतालिक ) ५३ मार्तंड पर्णें=छत्र्या

द्वाभिर्युते पंक्तिमिताभिरीशः परीक्षकैर्दातृवरैर्युताभिः ॥
शिष्टद्विजेभ्यो रमणप्रदेशे ददौ धनं वीक्ष्य गुणान्स तेषाम् ॥२१॥
परीक्षकान्वैदिकशास्त्रिणश्च विद्यानुरूपं प्रददौ द्विजेभ्यः ॥
स्वयं च दाता दमितारिसंघो धनं द्विजाग्र्योपभुवि व्यवाप्सीत् ॥
यामाष्टकत्रिकमखण्डमथ द्विजाग्र्य-
भूमावुवाप धनधान्यमसौ स्वधुर्यैः ॥
एतद् व्रतं नरवरः प्रतिहायनं य-
च्चक्रे तदेव तनुजा अपि चक्रिरे ते ॥ २२ ॥
एवं स लक्षप्रमितद्विजेभ्यो धनं ददौ दीनजनप्रपालः ॥
युधिष्ठिरो वाजिमखेष्वदात्तत्त्रिष्वेव दातास्य तु पुत्रपौत्राः ॥ २३ ॥
ये सूत्रमात्रधरविप्रजनास्तु तेभ्यः
पञ्च स्ववेदनिरताश्च पुराणविज्ञाः ॥

द्वाभिरिति । ईशः सः शिष्टाः अवशिष्टा ये द्विजास्तेभ्यः तेषां गुणान् परीक्ष्य पंक्त्या दशाभिर्मिताभिः परीक्षकैः पंडितैः दातृवरैश्च युताभिः द्वाभिर्युते रमणाख्यप्रदेशे धनं वित्तं ददौ ॥ २१ ॥

यामेति । असौ द्विजाग्र्या एव भूमिस्तस्यां । यद्वा द्विजा एव अग्रभूमिः श्रेष्ठभूमिस्तस्यां धनं वित्तं तदेव धान्यं बीजं यामानां प्रहराणां यत् अष्टकं तस्य यत्त्रिकं चतुर्विंशतिप्रहरान् त्रीनहोरात्रानिति यावत् । अखंडं अविच्छिन्नं स्वस्य धुरं वहति ते धुर्याः मन्त्रिणस्तैः करणीभूतैः अन्यत्र धुर्यैर्बलीवर्दैः उवाप वपति स्म । नरवरः सः यत् एतत् व्रतं प्रतिहायनं प्रत्यब्दं । हायनोऽस्त्री शरत्समा इत्यमरः । चक्रे तदेव तनुजाः बल्लालादयः पुत्राः पौत्रा अपि चक्रिरे कृतवंतः ॥ २२ ॥

एवमिति । दीनजनप्रपालः सः एव लक्षमितद्विजेभ्यः धनं ददौ । इदं दानं युधिष्ठिरापेक्षयातिरिक्तमित्याह । दाता युधिष्ठिरः त्रिष्वेव वाजिमखेषु तत् धनं अदात् अस्य तु पुत्रपौत्राः अपि अदुः अतः युधिष्ठिरापेक्षयाप्याधिक्यमस्य दानस्येति भावः ॥ २३ ॥

अथ दानव्यवस्थामाह । ये सूत्रमात्रेति । ये सूत्रमात्रं यज्ञोपवीतमात्रं तस्य धराः

---

१० 'अथावशिष्टा बहवो द्विजेंद्राः सहस्रशस्तान्रमणाख्यभूमिम् । नीत्वा स तत्रापि च दिक्प्रसंख्यद्वारेषु दातॄन्विनियोज्यमित्रान् ॥ ' पा० भे० १८. अधिकोऽयं श्लोकः क्वचित् ।

११ 'यामाष्टकत्रिकमखंडमयं द्विजेभ्यो द्वारेष्वहोदशसुमंत्रिगणैः सुशिष्टैः । मुद्राः परीक्ष्य-चपरीक्षितविप्रसंघेप्रत्यब्दमेवमवितताननतसमोन्य. ' ॥ पा० भे०, २०, ' एवं ददौलक्षमितद्वि-जेभ्यः किंचिद्विहीनेभ्यउदारधी स प्रत्यब्दमेव व्रतमाचचार स्वर्गेऽपिकीर्तिं व्यतनोद्द्विजेन्द्र ' ॥ पा० भे०

आयुर्विदो गणिततत्त्वविदोऽपि ये ये
दिक्पञ्चकं रमणके प्रददौ प्रधानः ॥ २४ ॥
नार्यो नराः सुवसनाः सकला नगर्या
निर्गत्य रत्नमयभूषणभूषिताश्च ॥
त्वष्टाः प्रपुष्टवरवाहनरूढदेहा
द्रष्टुं ययुः प्रतिदिनं रमणप्रदेशम् ॥ २५ ॥
या पर्वती नगरवासिजनैरुपेता
मण्युत्तमामलविभूषणभूषिताभिः ॥
ताभिः स्तनंधयसुतासुतसेविताभि-
र्नारीभिरेणशिशुदृग्भिरुशत्तमाभिः ॥ २६ ॥
मातङ्गकुम्भविगलन्मदवारिगन्ध-
लुब्धालिगुञ्जितयुतायुतवाजिशब्दैः ॥
पर्यन्तभूभवविशालरसालताल-
शालालिकोकिलकलध्वनिभासुरा या ॥ २७ ॥

ब्राह्मणचिह्नधरा न तु विद्वांस इत्यर्थः तेभ्यः पञ्चमुद्राः । ये स्ववेदनिरताः शाखापाठकाः ये पुराणविज्ञाः पौराणिकाः ये आयुर्विदो वैद्याः ये गणिततत्त्वविदः दैवज्ञाः तेभ्यः रमणके देशे दिशा पचक पञ्चाशन्मुद्रा ददौ ॥ २४ ॥

अथ पर्वतीं वर्णयन् रमणप्रदेशमेकेनवर्णयति । नार्य इति । प्रपुष्टानि अत एव वराणि वाहनानि आश्वादीनि तानि रूढाः देहा एषां ते तथोक्ता हृष्टाः सुवसनाः सुवस्त्राः रत्नमयानि यानि भूषणानि तैः भूषिताः सकलाः संपूर्णाः नराः नार्यश्च नगर्याः निर्गत्य प्रतिदिनं रमणप्रदेशं द्रष्टुं ययुः ॥ २५ ॥

अथ नवभिः श्लोकैः पर्वतीं वर्णयति । येति । नगरवासिजनैः उपेता युक्ता । मणिभिः हीरकादिभिः उत्तमानि श्रेष्ठानि अत एव अमलानि यानि भूषणानि तैः भूषिताभिः । स्तनंधयाः स्तनपानाः याः सुताः कन्यकाः सुताः पुत्राश्चैतैः सेविताभिः । आत्मजस्तनयः सूनुः सुतः पुत्रः स्त्रियांत्वमी । आहुर्दुहितरं सर्वेऽपत्यं तोकं तयोः सममित्यमरः । यद्वा स्तनधयाः ये सुतासुताः कन्यापुत्राः तैः सेविताभिः । यद्वा स्तनधया सुताः यासां ताः स्तनधयसुताः कन्यकाः स्नुषा वा ताभिः सुतैश्च सेविताभिः । यद्वा स्तनधयसुतानां कन्यकानां स्नुषाणां वा सुतैः पुत्रैः सेविताभिः । नारीभिः प्रौढाभिरित्यर्थः उपेता युक्ता । उशत्तमाभिः कमनीयाभिः एणशिशुदृग्भिः मुग्धाभिरित्यर्थः उपेता या सा निखिलां हरिविश्वमूर्तिं जिगायेति नवमश्लोकेनान्वयः ॥ २६ ॥

मातंगेति । मातंगानां गजानां कुंभाः गंडस्थलानि तेभ्यः विगलत् यत् मदवारि

या सर्वतः परिसरित्तटिनीजलौघ-
वीचीशतोद्धतसमीरणसेव्यमाना ॥
अभ्रंलिहैरुपरि देवगृहैरुपेता
मूर्धस्फुरत्कनककुम्भरुचा विचित्रैः ॥ २८ ॥
वामीरथद्विरदमानवयानजुष्टा
तुष्टान्तरद्विजसमूहविघोषघुष्टा ॥
योषापदाधिगतनूपुरशब्दरम्या
नम्याखिलैः स्थविरबालकसंघगम्या ॥ २९ ॥
पीनोन्नतातुलकुचस्थलरत्नमुक्ता-
मालावलिप्रचुरभाभिरुदारवाग्भिः ॥
वाराङ्गनाभिरभितोऽभिविराजमाना
हैमांबराभिरुपयाततडित्प्रभाभिः ॥ ३० ॥

तस्य यो गधस्तस्मिन् लुब्धाः ये अलयः तेषा यद्गुंजितं तेन युता युताः एकत्र-स्थिता ये वाजिनः अश्वास्तेषा शब्दैः उपलक्षितेतिशेष. । यद्वा अयुतसख्यानां वाजिनां शब्दै. उपलक्षितेतिशेष । पर्यंतभूः प्रातभू' तस्या भवाः विशाला. विस्तीर्णाः ये आम्रा. तालाः शालाश्च तेषा या आलिः पंक्तिः तत्र ये कोकिलाः तेषां कलध्वनिः तेन भासुरा शोभमाना । यद्वा पर्यंतभूभवविशालरसालतालशालेषु ये अलयः भ्रमराः कोकिलाश्च तेषां कलध्वनिः तेन भासुरा । यद्वा अलीनां भ्रमराणा कोकिल इव ध्वनिः अलिकोकिलध्वनिः तेन भासुरा या ॥ २७ ॥

येति । सर्वतः आसमतात् परिसरती या तटिनी नदी तस्याः यज्जल तस्य य ओघ. पूरः तस्य या वीचयस्तरगाः । भगस्तरगऊर्मिर्वा स्त्रियां वीचिरथोर्मिषु इत्यमरः । तेषा शतानि तेभ्य. उद्धतो यः समीरणः वायु तेन सेव्यमाना उपरि ऊर्ध्वप्रदेशे अभ्रलिहैः मूर्ध्नि स्फुरत्कनककुभानां सुवर्णकलशाना रुचा कात्या विचित्रैः देवगृहैः प्रासादैः उपेता या युक्ता ॥ २८ ॥

वामीति । वाम्यः वडवाः । वालः किशोरो वाम्यश्वा वाडवा वाडवं गणे इत्यमरः । रथा' प्रसिद्धा' द्विरदाः गजाः मानवयानानि शिबिकाः तैः जुष्टा सेविता । तुष्टातराः तुष्टचित्ताः । यथेष्टधनलाभादितिभावः । ये द्विजास्तेषा समूहाः तेषा विशिष्टो यो घोष. वेदघोषः तेन घुष्टा घोषयुक्ता । योषाणां स्त्रीणां यानि पदानि चरणाः तेषु अधिगतानि यानि नूपुराणि तेषा शब्देन रम्या रमणीया । अखिलैः जनैः नम्या देवालययुक्तत्वादितिभावः । स्थविरा. वृद्धाः बालकास्तेषा सघेन गम्या एतेन सुप्रवेशत्व सूचित ॥ २९ ॥

पीनेति । पीनौ पुष्टौ उन्नतौ उच्चौ अत एव अतुलौ अनुपमौ यौ कुचौ तयोः स्थल

या मण्डलाधिपतिराजनियुक्तविप्र-
संघैः समाश्रिततमा नटनर्तकैश्च ॥
सूतैश्च मागधजनैरपि बन्दिसंघै-
र्व्यापारनिष्ठवणिजां पटवेश्मभिश्च ॥ ३१ ॥
मालूरपूगचयदाडिमजांबवाद्यै
रंभाफलैः पनसचूतभवैः फलैश्च ॥
वैडूर्यमारकतहीरमुखैश्च रत्नै-
र्मुक्ताफलैरपि च हट्टनिवेशितैर्या ॥ ३२ ॥
देवा उपर्यपि तदा सुरयानसंस्था
यद्विप्रसंघकुतुकं प्रविलोकयन्तः ॥
तस्थुर्बलाहकसमूहतिरोहितास्ते
नेदं महेन्द्रवसताविति भाषमाणाः ॥ ३३ ॥

उरःस्थल तत्र याः रत्नानां हीरकादीनां मुक्तानां च मालाः माल्यानि तासां आवलिः पंक्तिः तया प्रचुरा भा कांतिर्यासां ताभिः उदारा वाक् यासां ताभिः हैमानि हेममयानि अंबराणि वस्त्राणि यासां ताभिः अत एव उपयाताः प्राप्ताः यास्तडितस्ता इव प्रभा प्रकृष्टभायुक्ताः ताभिः वारांगनाभिः वेश्याभिः अभितः परितः विराजमाना शोभमाना ॥ ३० ॥

येति । मण्डलाना ये अधिपतयो राजानः तैः नियुक्ता ये विप्रा उभयवेतनास्तेषां संघैः समाश्रिततमा । एतेन सार्वभौमपदावाप्तिः सूचिता । नटैः नर्तकैश्च समाश्रिततमा । सूतैः पौराणिकैः मागधजनैः बंदिसंघैश्च समाश्रिततमा व्यापारनिष्ठवणिजां पटवेश्मभिश्च समाश्रिततमा या ॥ ३१ ॥

मालूरेति । मालूराणि नारिकेलानि बिल्वानि वा । मालूरः श्रीफले बिल्वे इति विश्वः । पूगानि क्रमुकाणि तेषां चयः दाडिमानि प्रसिद्धानि जांबवानि जंबुफलानि आद्यानि येषां तानि तैः फलैः पनसाः चूताश्च तेभ्यः भवैः फलैश्च युक्तेति शेषः । वैडूर्याणि विदूरात्पर्वताद्भवंति तानि वैडूर्याणि । विदूराञ्ञ्य इति ञ्यप्रत्ययः । मारकतानि हीराश्च मुखं मुख्या येषां तैः रत्नैः हट्टे आपणे निवेशितैः मुक्ताफलैश्च युक्ता या ॥ ३२ ॥

देवा इति । तदा दक्षिणाप्रदानसमये सुरयानेषु विमानेषु संतिष्ठंति ते सुरयानसंस्थाः । बलाहकानां समूहे तिरोहिताः अंतर्हिताः इदं कृत्यं महेंद्रवसतौ अमरावत्यां न इति भाषमाणाः देवा अपि यत् विप्रसंघकुतुकं यस्याः पर्वत्याः विप्रास्तेषां संघस्य कुतुकं कौतुकं विलोकयंतः संतः उपरि ऊर्ध्वप्रदेशे तस्थुः स्थितवंतः ३३ ॥

[stamp]

नागा नगेन्द्रपदभूविवरोपयाताः
पातालतो मधुरगानविलुब्धचित्ताः ॥
यद्रम्यकौतुकविलोकनजातहर्षाः
शीर्षाणि रत्नविमलान्यधुवन्नितान्तम् ॥ ३४ ॥
सा पर्वतो द्रुहिणनिर्मितवस्तुजात-
युक्ता जिगाय निखिलां हरिविश्वमूर्तिम् ॥
या कौरवेशभवने निखिलैर्नृपालै-
र्दृष्टार्जुनेन च तथा समराङ्गणे ताम् ॥ ३५ ॥
यन्त्रेषु गर्जत्सु च दीपिकासु सहस्रशो दीप्ततरासु मार्गे ॥
श्रितेषु चान्नेषु नरेषु मार्गं पश्यत्सु विप्रा नगरीं ययुस्ते ॥ ३६ ॥
राजा तु वृत्तमखिलं द्विजवक्त्रतस्त-
च्छ्रुत्वातिहर्षभरनिर्वृतमानसोऽभूत् ॥
तस्मिन्नुपागतवति प्रशशंस तं च
प्रत्यब्दमस्य कुरु वृद्धिमिति ह्यवादीत् ॥ ३७ ॥

नागा इति । पातालादिति पातालतः नगेंद्रः पर्वतो तस्य पदं चरणः तस्य संबंधिनी भूः । यद्वा नगेंद्रस्य पदं स्थानं तस्य संबंधिनी भूः भूमिः तस्याः विवराणि तेभ्यः उपयाताः आगताः मधुरगाने विलुब्ध चित्तं येषां ते तथोक्ताः यस्याः पर्वत्याः रम्य यत्कौतुकं तस्य विलोकनेन जातः हर्षो येषा ते तथोक्ताः । रत्नैः मणिभिः विमलानि शीर्षाणि नितांत अधुवन् अकंपयन् ॥ ३४ ॥

सेति । द्रुहिण' ब्रह्मा । ब्रह्मात्मभूः सुरज्येष्ठ इत्यमरः । तेन निर्मितं यद्वस्तुजातं वस्तुजातिः । जात जात्यौघजन्मसु इत्यमरः । तेन युक्ता सा पर्वती या कौरवेशभवने धृतराष्ट्रगृहे निखिलैः नृपालैः तथा तेन प्रकारेण अर्जुनेन समरागणे दृष्टां तां हरे' विष्णोः या विश्वमूर्तिः विश्वरूप ता जिगाय ॥ ३५ ॥

अथ सभ्यायां ब्राह्मणानां नगरप्रवेशप्रकारमाह यन्त्रेष्विति । विप्राः ब्राह्मणाः यंत्रेषु तोफासु दारुससर्गादिति भावः । गर्जत्सु । दारुलक्षणं । तोफालक्षण च मूले एव स्फुटीभविष्यति । सहस्रश' दीपिकासु मार्गे नगरप्रवेशमार्गे दीप्ततरासु सतीषु । अन्नेषु श्रितेषु पाचितेषु मार्गभोजनार्थं विप्राणामितिभावः पश्यत्सु सत्सु तां नगरीं ययौ ॥ ३६ ॥

राजेति । राजा शाहु. । तत् वृत्तं दक्षिणाप्रदानरूप तस्मिन् बाजिराजे उपागत वति सभार प्राप्ते सति शेष स्पष्ट ॥ ३७ ॥

धनिकस्य गृहे समर्पितं धनमन्यत्र यथा प्रलभ्यते ॥
द्विजपाणितले तथार्पितं धनमन्यत्र नरैरवाप्यते ॥ ३८ ॥
नानाविधानि वसनानि महाधनानि
हैमानि भूषणवराणि च मौक्तिकानि ॥
रत्नानि ताम्रमयपात्रसमूहमेके
याता निजान् जनपदान्मुदिताः प्रगृह्य ॥ ३९ ॥
कोंकणस्था द्विजाः केचित्समागत्येति तं जगुः ॥
त्वयि नाथे ब्राह्मणानां पीडायुक्ता द्विजप्रभो ॥ ४० ॥
अनूपदुर्गं यन्नाम्ना वसयीत्यभिविश्रुतम् ॥
तत्संस्था म्लेच्छसंघाता बाधन्तेऽस्मान्प्रधानप ॥ ४१ ॥
द्विजातीनां वचः श्रुत्वा कनीयांसं सहोदरम् ॥
चिमाजिसंज्ञं प्रोवाच गच्छ म्लेच्छान्निवारय ॥ ४२ ॥
स बाढमिति तद्वाक्यमादद्दे शिरसा नमन् ॥
विप्रा अपि निजान्गेहानाययुः स्वस्थमानसाः॥ ४३ ॥
अयुते द्वे पदातीनां गृहीत्वा युद्धदुर्मदः ॥
पञ्चाशच्चापि यन्त्राणि पाश्चात्यजलधिं ययौ ॥ ४४ ॥
स सागरस्य तीरे हि समाश्रितयमास्थितः ॥
म्लेच्छानां नाशने युक्तिं नैवापश्यद् द्विजाधिपः ॥ ४५ ॥
अत्र युद्धं कथं कार्यं ते समुद्रे वयं भुवि ॥
मद्वीर्यस्य परीक्षार्थं ज्यायसेदं नियोजितम् ॥ ४६ ॥

वृद्धेर्हेतुमाह धनिकस्येति । अन्यत्र ग्रामांतरे अन्यत्र अन्यजन्मनि ॥ ३८ ॥

अथ विप्राणां स्वस्वदेशप्रयाणमाह नानेति । एके मुदिताः हृष्टाः सतः निजान् जनपदान् देशान् याताः गताः ॥ ३९ ॥

अथ बाजिराजस्य भ्रातुः कनीयसः चिमाजीतिप्रसिद्धस्य प्रतापं वर्णयति कोकणस्था इत्यादिभिः षोडशैः । कोकणस्था इति । तं बाजिराजं इति जगुः ऊचुः । इति किं त्वयि नाथे पालके सति ब्राह्मणानां पीडा युक्ता किं इति काकुः । अथवा अयुक्तेति च्छेदः ॥ ४० ॥

अनूपेति । अनूपदुर्गं । जलप्रायमनूपंस्यादित्यमरः ॥ ४१ ॥ ४२-४७ ॥

एवं मनसि विचार्य समुद्रं स्तौति त्रिभिः । हे समुद्रेति । हे समुद्र हे भगवन् हे दयानिधे हे विप्रभक्त । यद्वा विप्रभक्तो यो हरिः विष्णुः तस्य कामिनी पत्नी लक्ष्मी तस्याः पिता जनकः । हे नदीपते । ब्राह्मणानां योर्थः प्रयोजनं । अर्थोभिदेय

२१ '०त्येदमुचिरे' पा० भे०. २२ '०नापश्यतकाचन' पा० भे०.

कृतकार्यो भवेयं चेत्प्रवेक्ष्यामि निजां पुरीम् ॥
नो चेत्प्राणान्प्रधक्ष्यामि समराग्नौ निजानहम् ॥ ४७ ॥
हे समुद्र भगवन्दयानिधे विप्रभक्तहरिकामिनीपितः ॥
ब्राह्मणार्थकरणोद्यताय मे देहि मार्गमधुना नदीपते ॥ ४८ ॥
कामिनीजनकवत्समं निजं स्वान्तमद्य कुरु मा पयोनिधे ॥
शीतपर्वतसुतप्रगूहनात्त्वां शरण्यमिति मन्महे वयम् ॥ ४९ ॥
शीतपर्वतसुतप्रगोपनं शालकत्वमनुसृत्य तत्कृतम् ॥
रक्षितासि यदि मामकीर्तितस्त्वं शरण्य इति तर्हि वक्ष्यसे॥ ५० ॥
एवमस्य वचनं निशम्य सद्वारिधिः शरणयातकामदः ॥
स्वप्न एत्य निजगाद हे द्विज भस्त्वयाऽिषसातिः प्रगृह्यताम् ॥ ५१ ॥
ततः समागत्य चिमाजिनामा सैन्येन सार्धं प्रणनाम वार्धिम् ॥
मार्गं ददौ तस्य विकृष्य वारि प्रमादिषु म्लेच्छगणेषु तूर्णम् ॥ ५२ ॥
युद्धं महत्तत्र बभूव सार्द्धं यामद्वयं तस्य च तैः प्रवीरैः ॥
हत्वा स तान्म्लेच्छगणान्समस्तान्पुरं विवेशापभयो द्विजेन्द्रः ॥ ५३ ॥
संस्थाप्य तत्र द्विजवर्यमेकं सुरक्षकं वीरवरैः समेतम् ॥
नौकाभिरुत्तीर्य स विप्रवर्यः पुण्याभिधां स्वां नगरीं जगाम ॥ ५४ ॥

रैवस्तुप्रयोजननिवृत्तिषु इत्यमरः । तस्य करणं आचरणं तत्र उद्यताय मे नह्यं अन्नेनात्यतावश्य मत्कार्यं कर्तव्यमिति सूचितं । अधुना मार्गं देहि ॥ ४८ ॥

कामिनीति । हे पयोनिधे कामिनीनां पत्नीना नदीना ये जनका. पर्वतास्तैस्तुल्य तद्वत् पाषाणतुल्य कठोरमित्यर्थः । स्वांत हृदय मा कुरु न कर्तव्यमित्यर्थः । यद्यपि माङि लुङिति सर्वलकारापवादेन लुङा भाव्य तथापि निषेधार्थो माशब्दोप्यस्तीति न दोष· । शीतेति । वयं शीतपर्वतो हिमालयः तस्य सुत· मैनाकस्तस्य प्रगूहनात् गोपनात् त्वा शरणे साधु· शरण्यः त शरण्य मन्महे जानीमः ॥ ४९ ॥

शरण्यत्व प्रतिपादितं तत्तावन्न संभवतीत्याह शीतेति । शीतपर्वतो हिमालयः तस्य सुतस्य प्रगोपन रक्षण शालकत्व श्वशुरत्व अनुसृत्य कृत यदि मा अकीर्तित. सकाशात् रक्षितासि तर्हि मयेति शेष· । शरण्य इति वक्ष्यसे । वचपरिभाषणे इत्यस्मात् कर्मणिलृट् ॥ ५० ॥

एवमिति स्पष्टार्थमेतत् ॥ ५१–५४ ॥

कुप्यमिति । कुप्य ताम्रादि अकुप्य हेमरूप्यादि । स्यात् कोशश्च हिरण्य च

२३. '०णा परित्यक्ष्याहमितिनिश्चित्यतस्थिवान्' पा० भे०.

कुप्यं तथाकुप्यमपि प्रभूतं धनं ततस्त्यं यदत्रापि तेन ॥
सर्वं स राज्ञे गजवाजिना च निवेदयामास[24] शृणालयाय ॥ ५५ ॥
बाजिराजस्य पुत्रौ द्वौ बभूवतुररिंदमौ ॥
ज्येष्ठो बल्लाळनामाभूत् कनीयान्राघवाभिधः ॥ ५६ ॥
कनीयसस्तु तनयः[25] सदाशिव इति स्मृतः ॥
स तु वीरः कलावस्मिन् जामदग्न्य इवाभवत् ॥ ५७ ॥
एवं प्रजाः पालयति बाजिराजे समाययौ ॥
कलिना प्रेरिता काचिद्यवनी वारकामिनी ॥ ५८ ॥
मस्तानीति समाख्याता तरुणी कोकिलस्वरा ॥
बाजिराजं समभ्येत्य ननर्त च तथा जगौ ॥ ५९ ॥
तस्या गीतेन नृत्येन रूपेण च विमोहितः ॥
कंचित्कालं तया साकं रेमे वीरवराग्रणीः[26] ॥
तस्याः पुत्रः समजनि प्रतापनयशीलभाक् ॥
नाम्ना समशरः ख्यातस्तस्माद्दल्ली तथाभवत् ॥ ६० ॥
यवनीसंगमात्तस्य तपः सुस्राव संचितम् ॥
कलिस्त्वतीव हृष्टः सन्ननर्त च तथा जगौ[27] ॥
राज्ञाज्ञप्तो बाजिराजः कौबेरीं हरितं ययौ ॥
मल्लारिणारिणा युक्तः सेनाधीशेन दुर्हृदाम्[28] ॥ ६१ ॥

हेमरूप्ये कृताकृते । ताभ्यां यदन्यत्तत्कुप्यमित्यमरः । ततः आगत ततस्त्यं । अव्ययात् त्यप् । अत्रापि प्राप्त । कर्मणि लुङि चिणः परस्य लुक् ॥ ५५ ॥

अथ तयोः संततिवर्णनपूर्वक इतिहासांतरमाह । बाजिराजस्येति ॥ ५६ ॥
अथ वेश्याया जात वशमाहत्रिभिः । एवमित्यादिभिः ॥ ५८ ॥

राज्ञेति । राज्ञा शाहुना आज्ञप्तः बाजिराजः दुर्हृदां दुर्जनानां अरिणा मल्लारिणा मल्लारिनाम्ना सेनाधीशेनयुक्तः सन् कुबेरस्य इय कौबेरी तां कौबेरीं उत्तरा । तस्ये दमित्यणिङीप् । हरितं दिश । दिशस्तु ककुभः काष्ठा आशाश्च हरितश्चताइत्यमरः । ययौ जगाम ॥ ६१ ॥

---

२४ '०वाजिनीभि संप्रेषयामास' पा० भे०. २५. 'चिमाजि सज्ञस्यसुत' पा० भे० २६ 'अधिकोय श्लोक क्वचित' २७. 'अधिकोय श्लोक क्वचित्' २८. 'समाययौ बाजिराज प्रस्थितोऽप्युत्तरांदिशाम्' । मल्लारिरितिविख्यात सेनान्य सेनयान्वितम् ॥' पा० भे०.

संसाररोगो यदि बाधते त्वां गदारिहस्तः करुणार्द्रचित्तः ॥
सौकर्यतो यस्य रसोद्धृतिस्तं याह्योषधीशान्वयरत्नमेकम् ॥ ७५ ॥
सुवर्णमालिनीं कृष्णामधुना भज चेद्भवः ॥
जीर्णज्वरो बाधते त्वां पिंडिकोद्वेष्टनादिभिः ॥ ७६ ॥
उन्मत्तेऽतिविशृंखलं विहरति ब्रह्मांडभांडोदरे ।
नृणां धैर्यविलोपके कलियुगे स्वच्छंदसंचारिणि ॥
विध्वस्ता हि महागमा द्विजकुलं शुन्याकुलं संकुलं ।
प्रायेणैव रजस्तमोऽप्युपगतं पंथा इतो नैगमः ॥ ७७ ॥
दूरेणापगतो वृषो बहुमदामोदः पुनः पुष्कलं ।
संक्रांता मधुपा भ्रमंति निभृतं दृष्टाश्च पुष्टविषः ॥
रूढाश्चंचलदृष्टयोऽधिविटपं नानादरैर्भीरवो ।
नूनं को नु हरिं विनाऽस्य जगतः स्याद्रक्षणे दक्षिणः ॥ ७८ ॥
कलिमलिनमतेर्नरस्य नैव स्वपदप्राप्तिपरोऽपरोऽस्त्युपायः ॥
हरिगुणपरिशीलनात्तदेतन्निषधेंद्रो निपुणं विचारणीयः ॥ ७९ ॥

पनाय सुखकरः उदर्कः उत्तरफल यस्य अनेकवारकृतसुरसमूहरक्षणैः प्रख्याताय अनेके ये सुरसाः ओषधिरसास्तेषां भावनैर्भावनाभिः प्रसिद्धाय । संपन्नाय दत्तसहस्रपुटायेत्यर्थः ॥ ७४ ॥

संसारेति । गदा अरि चक्र हस्ते यस्य त गदारि· औषध च यस्य यत्कर्तृकं रसोद्धरण भूम्युद्धरण सौकर्येण सूकरभावेन तद्रूपावतारेण पारदोद्धरण च सुकरत्वेन ओषधीशश्चद्र· वैद्यश्च ॥ ७५ ॥

सुवर्णेति । सुवर्णमालाभूषितां रसायनविशेष च कृष्णां कृष्णवर्णां अधुना कृष्णामधुना पिप्पली क्षौद्रेण च पिंडिकाजानुपिंडः उद्वेष्टन वस्त्रं पिंडिकयोः जघापश्चाद्भागयोः उद्वेष्टन उद्वेलन तच्च जीर्णज्वर द्योतयति ॥ ७६ ॥

उन्मत्तेति । धैर्यं ज्ञान धीरता च कलियुग प्रसिद्ध करिद्वद्वं च रलयोरैक्यात् महागमाः महाशास्त्राणि महावृक्षाश्च द्विजकुल विप्रकुल पक्षिकुल च रजः गुणः धूलिश्च तम. गुण अधकारश्च नैगमः वैदिकः वणिग्जनसबधी च ॥ ७७ ॥

दूरेणेति वृषः धर्मः बलीवर्दश्च मदो गर्व. आमोदस्तोष· मदस्य दानोदकस्य गधश्च मधुपा भृगा मद्यपाश्च विटपे वृक्षशाखाया जारश्रेष्ठे च नाना आदरैः भयैश्च भीरव स्त्रियो भयशीलाश्च हरिं भगवत सिंह च ॥ ७८ ॥

कलीति नरस्य नलस्य च स्वपदं स्वरूपं स्वराज्य च हरिगुणपरिशीलनं भगवद्गुणचर्चा अश्वरज्जुधारण च नलस्य राज्ञा हि ऋतुपर्णराजस्य सारथ्यांगीकारेण स्वराज्यप्राप्तिरभूदिति ॥ ७९ ॥

कलिप्रदुष्टोऽक्षवशंगतश्चेद्भ्रष्टात्मसाम्राज्यपदो नरः स्यात् ॥
स्वकं पदं प्रापयितुं पुनस्तं मन्येऽनवद्या हरिहृद्यविद्या ॥ ८० ॥
द्विजेंद्रत्रासाढ्यः किल बहलदोषोपचयकृत् ।
स्फुरज्जाड्योल्लासो गुरुसुदिनचर्याक्षयकरः ॥
कलिः शीतर्तुश्च व्यथयति भृशं चेत्स्वनयने ।
निमील्य स्वच्छंदं हृदयधृतरामः स्वपिहि रे ॥ ८१ ॥
उर्यत्र सिद्धः सततं गुणोदयो सिद्धो रलोपः स्वरगौरवप्रदः ॥
तत्रैव नूनं रघुनाथमंदिरे मनोरथः सिद्धिमियादसंशयम् ॥ ८२ ॥

कलिप्रदुष्ट इति कलिनाप्रदुष्ट इति समानमुभयत्र अक्षवश इंद्रियवश पाशवश च स्वरूपानदच्युतिः साम्राज्यच्युतिश्च नर. नलश्च पद स्वरूप राज्यं च हरेर्भगवतः हृद्या प्रिया या विद्या अध्यात्माख्या अश्वहृदयविद्या च । नलः किल कलिना ग्रस्तः पुष्करेण भ्रात्रा द्यूतार्थमाहूतः सन् तेन सह द्यूत कृतवान् तत्र तेन राज्यादि सर्व जित्वा विवासितः स ऋतुपर्णराजगृहउवास तेन चाश्वहृदयविद्याहेतुना सारथ्ये नियोजितस्तेन कारणेन पुनःस्वपदप्राप्तिरिति भारतकथासूचन ॥ ८० ॥

द्विजेंद्रेति द्विजेंद्राणां त्रासो येषां तादृशाआढ्याः धनिका यस्मिन् चंद्रादयस्त्रासस्तेनाढ्यो युक्तोऽतिशीतकरत्वात् बहलदोषाणां वृद्धिकृत् बहलो दोषोपचयः रात्रिवृद्धिरतां करोति जाड्य मौर्ख्यमालस्य च गुर्वी या सुदिनचर्या पुण्याचरण दिवसचर्या च हेमंते हि रात्रिमान वर्धते दिनमान हीयते हृदये धृतः रामो येन रामा स्त्री च ॥ ८१ ॥

ऐहिकामुष्मिक सर्वमपि भगवदाश्रयेणैव सिध्यतीत्यतउत्तर वर्णयति उरिति उः रुद्र तदवतारत्वाद्धनुमान् हशिचेत्युत्व च सि[illegible] कार्यकरणे उद्यतः रोरीति लोपदृष्ट्या सिद्धश्च सच गुणोदयः गुणैरुत्कृष्ट गुणत्वेनोदयो यस्य ओकारो भवितेति यावत् असिद्धोऽविद्यमानः हशिचेति दृष्ट्या च रलोपोऽभिलोप रामंदिरे सतिावियोगेऽपि अश्वमेधादेर्जातत्वात् अभिसद्भावः रोरीति लोपश्च सच स्वर्गे अगौरवप्रदस्तुच्छत्वापादकः स्वरस्याचो गौरव दीर्घत्व ददाति । मनोरथशब्द प्रक्रियायां तु मनसूरथ इति स्थिते ससजुषोरुरिति सकारस्य रेफो मनर्रथ इति तत्र रोरीतिरेफलोपो हशिचेत्युत्व च प्राप्त विप्रतिषेधे पर कार्यमिति परत्वाल्लोपे प्राप्तेऽपि पूर्वत्रासिद्धमिति तस्यासिद्धत्वात् हशिचेत्युत्वे मनउरथ इति ततआद्गुणइति गुणे मनोरथइत्यस्य सिद्धिर्जायते एवं च मनोरथसिद्धौ उः सिद्धो रलोपोऽसिद्धश्चापेक्षित तदत्रोभयमस्तीति राममंदिरएव मनोरथसिद्धिर्नान्यत्रेति ॥ ८२ ॥

कस्माद्दुर्गतिविह्वलो भवसि रे श्रीरामचंद्रप्रभुः ।
सर्वोदारगुरुस्तदीयजनतासंगेन संगम्यताम् ॥
भूत्वा प्रह्वतनुः स्तवैरभिनवैः स्तुत्वा निबद्धांजलि-
र्भक्त्याचारफलं निवेदय ततः पूर्णः स्वलाभो भवेत् ॥ ८३ ॥
अजरामरता यस्य पुंसो वृत्तिर्निरंतरम् ॥
अजराऽमरता तस्यावश्यं पाणितले स्थिता ॥ ८४ ॥
भुक्तिर्द्रव्यनिबंधनाऽस्य जगतो बोधैकलभ्या पुन-
र्मुक्तिस्तद्द्वयसिद्धयेऽत्र शरणं को नाम लोकत्रये ॥
एवं वेदपुराणशास्त्रनिचयानालोड्य संपश्यतां ।
दृष्टिं गच्छति राम एव भगवान्नान्यो वदान्यः क्वचित् ॥ ८५ ॥
सूर्यश्शंकरः स्वयं हि जगतां संतापको नंदन-
स्तस्यैको जगदंतकस्तदनुजो मंदो जगत्पीडकः ॥
एवं सत्यपि मित्रतामुपगतः सर्वत्र यद्भास्करः ।
सोऽयं तस्य कुलेऽवतारमहिमा श्रीरामचंद्रप्रभोः ॥ ८६ ॥
सूर्यः स्थावरजंगमात्मजगतामात्मेत्यृषिः संजगौ ।
मंत्राणां च स एव दैवतमिति प्राह प्रसिद्धं स्मृतिः ॥
ध्यायत्यर्चति यन्नमस्यति यजत्येनं द्विजानां गणः ।
सोऽयं तस्य कुलेऽवतारमहिमा श्रीरामचंद्रप्रभोः ॥ ८७ ॥
भास्वानेष जडस्वरूपमपि मां तेजोमयं यो व्यधात् ।
तत्तस्मै प्रतिदेयमेवमनिशं युक्तोऽप्यशक्तः स्वयम् ॥

कस्मादिति दुर्गतिरधोगतिर्दारिद्र्यं च उदार. सरलः दाता च तदीयजनता साधव राजपुरुषाश्च आचारस्य कर्मण. फल चारफल राजादनफलानि च स्वलाभ. आत्मलाभो द्रव्यलाभश्च ॥ ८३ ॥

अजरामरेति पूर्वार्धे अजश्चासौ रामश्च तत्र रता उत्तरार्धे अजरामरता जरामरणशून्यता ॥ ८४ ॥

भुक्तिरिति रामः राः द्रव्यं मः बोधः मनअवबोधन इत्यस्मादन्येभ्योऽपि दृश्यत इति डः एवं च रामइत्यत्र भुक्तिमुक्तिसाधनमुभयमपि लभ्यते ॥ ८५ ॥

श्रीरामसबधवत सर्वे जनाः सत्कुर्वंतीत्याह सूर्यइति मित्रतां सूर्यता सख्यं च॥८६॥

सूर्यइति 'सूर्यआत्मा जगतस्तस्थुषश्च' त्यृषिश्रुति· 'एकैव वा महानात्मा देवता ससूर्य' इत्याचक्षत इति स्मृतिरूपा सर्वानुक्रमणी यतः सर्वमन्त्राणां सूर्यो देवता तस्मात्तन्मंत्रै. क्रियमाण कर्म सूर्यविषयकमेवेति ॥ ८७ ॥

भास्वानेष इति जडस्वरूपमुदकमय मडल डलयोरैक्यात् जडस्वरूपे चोदकमय-

लग्नो भिक्षुकशेखरः समभवद्रामस्य पृष्ठं ततो-
ब्रह्मण्यः स चकार भास्करकुलं सर्वप्रकाशोज्वलम् ॥ ८८ ॥
वृत्तिं पुनः काममपि कल्पयेथाः श्रीमानुदारस्त्वमतः श्रितोऽसि ॥
मयार्जितं वृत्तिशतं हरंतं भवंतमेतं किमिव ब्रवीमि ॥ ८९ ॥
विस्मयं वितनोत्येतद्विषमाक्षविचेष्टितम् ॥
अप्यंधकारिणा येन नृणां चक्षुः प्रकाशते ॥ ९० ॥
नीलांगो मकराभकुंडलधरः खर्वश्च यः कच्छपो ।
दंताः कुंदविलासिनः करयुगे यस्याब्जशंखौ पुनः ॥
आस्ते यस्य विशालवक्षसि महापद्माधिवासोऽनिशं ।
लोका आशु मुकुंदमाश्रयत तं चेत्पूर्णवित्तेच्छवः ॥ ९१ ॥
यो वै धृतः श्रीहरिणा निजे करे स्पर्शः स एवेति विनिश्चयो मम ॥
स्वस्पर्शमात्रेण हि लोहलं ध्रुवं चकार शंखोऽपि सुवर्णसंभृतम् ॥ ९२ ॥
अहो धनार्थं प्रधनं विधाय सुखेन वीरा निधनं भजंते ॥
तत्ताहगप्यत्र धनं विहाय धीराः सुखं श्रीपतिमाश्रयन्ते ॥ ९३ ॥

मंडले सञ्जाता. किल सूर्यरश्मयश्चद्रइत्याचक्षते प्रतिदेय प्रत्युपकर्तव्य द्विजशेखरश्चद्र· पाठांतरे भिक्षुकः शिवस्तस्य शेखरोऽवतसः भिक्षुकश्रेष्ठश्च ब्राह्मणश्च रामचद्रइत्यत्र रामस्य पृष्ठ सर्वदाक्रमश्चद्रो दृश्यते ॥ ८८ ॥

वृत्तिं पुनरिति वृत्तिं जीवनोपाय क्षेत्रारामादि मनोवृत्तयश्च व्याजनिंदेय ॥ ८९ ॥

विस्मयमिति विषमाक्ष. शिवः चक्षुर्नेत्र ज्ञान च अधकस्य दैत्यविशेषस्य अरिणा अधकरोत्येव शीलेन च ॥ ९० ॥

नीलांग इति महापद्मश्च पद्मश्च शखो मकरकच्छपौ । मुकुद कुद नीलाश्च खर्वश्च निधयो नवेति भगवतो नवनिध्यात्मकत्वात् तमेव आश्रयत हेपूर्णवित्तेच्छवः पूर्णज्ञानेच्छवश्च खर्वो वामनः विदः भावो वित्ता ॥ ९१ ॥

यो वै धृत इति स्पर्शाख्यो मणिः यत्स्पर्शेन लोह स्वर्णं सपद्यते लोहल अ-स्फुटवाच बालत्वात् ध्रुव उत्तानपादपुत्र लोहसंग्राहक च लोह लातीति व्युत्पत्तेः सुवर्णाः शोभनाक्षराणि सुवर्णं कांचन च ध्रुवः किल सपत्नमात्रावहेलितः स्वजननीकथनाद्भगवत प्रसादयितु वन निर्जगाम तत्र च श्रीनारदेन सबोधितः सन् मधुवने तपोऽध्यातिष्ठत् । अथानुग्रहीतुमग्रत श्रीभगवतमालोक्याद्वितीयोऽय पुरुष-इति कृत्वा त स्तोतुमियेष पर वाक्पाटवाभावान्नाशक्नोत् । तद्भगवता विज्ञाय श्रुतिमयपांचजन्येन गल्लदेशे स्पृष्टस्तत्प्रभावादधिगतवाक्शक्तिर्भगवतं रमणीयैः स्तवैस्तुष्टावेति दिक् ॥ ९२ ॥

अहो इति प्रधन युद्ध निधन मरणं धीरा विवेकिनः ॥ ९३ ॥

यं सद्योऽनुजिघृक्षुरस्य हरति द्रव्यं तदेतत्प्रभोः ।
किं श्लाघ्यं ननु मादृकं तदिति चेत्स्याद्दुर्बलोऽनुग्रहः ॥
मैवं युक्ततमेव तस्य तदसद्वित्तापहारक्रिया ॥
सद्वित्तार्पणमेष वत्सलतया कर्ता यतः श्रीपतिः ॥ ९४ ॥
नापुत्रस्य गतिर्मतेति ससुतः स्यादित्थमुक्तश्रुतेः ॥
को नामात्र जनो न सत्यमिति तद् ब्रूयात्परं वच्म्यहम् ॥
यो गोविंदपरः ससद्गतिधरः सोऽयं सुताढ्यश्च य-
ल्लोके सद्गतिभाक् सनंदन इति ब्रह्मात्मजो गीयते ॥ ९५ ॥
तेजोनिधिर्यद्यपि कर्मसाक्षी तथापि सूर्यान्वयकांतयोगम् ॥
विना कथंस्वित्प्रभवेद्वदस्व सत्पाकतासिद्धिममुष्य कर्तुम् ॥ ९६ ॥
यद्यप्यपकारधियं कुरुते परमेश्वरे तथाप्येषः ॥
सत्वं नैव विमुंचति केवललयभुक् स हि श्रीशः ॥ ९७ ॥
मानरहितः स्वकार्ये पटुश्चतुर्दशजगत्प्रथितगोत्रः ॥
मकरालयांतवासी प्रियभक्ताश्चित्तपावनो भगवान् ॥ ९८ ॥

यं सद्य इति सद्वित्तार्पण उत्तमद्रव्यार्पण ब्रह्मविद्यादार्पण च ॥ ९४ ॥

नापुत्रस्येति सनंदनः एतन्नाम नंदनेन पुत्रेण सहितश्च यो हि जातमात्रएव प्रव्राजितः यस्योपनयनमपि नास्ति ॥ ९५ ॥

सर्वगस्य सर्वात्मनोऽपि ब्रह्मणो भक्तकार्यकारित्वं सगुणद्वारेवेत्याह तेज इति तेजसांनिधिः प्रकाशोयमश्च कर्मसाक्षी ब्रह्म सूर्यश्च सूर्यान्वयकात· सूर्यवंशकमनीयो राम· सूर्यसबद्धकांत· सूर्यकातश्च सत्पाकता पाक· पवित्रः 'तं पाकेन मनसे' त्यादौ दर्शनात् उत्तमपवित्रता साधुः पाक· पचन यस्य तस्य भावस्तत्ता उत्तमपाकइत्यर्थ· वदस्वेत्यात्मनेपद भासनार्थे भासमानो वदेत्यर्थः ॥ ९६ ॥

तादृशस्य परमकृपालोर्भगवतः प्रातिकूल्येन चिंतनमपि न स्वार्थविहतीत्याह यद्यपीति अ·कारो विरोधस्तद्युक्ताबुद्धि· पकाररहितोऽयमिति धीश्च परमेश्वरे अपकारबुद्धौ प्रयुक्तायामपि रमेश्वरोऽवतिष्ठते यश्च रमेश्वरः स परमेश्वरादपरो नेति ॥ ९७ ॥

भगवतो हि भक्ताः प्रियाभवंतीत्याह मानेति मान प्रमाण तेन रहितोऽप्रमेयइत्यर्थः यद्वा मा च नरश्च पार्थश्च ताभ्या हितः अभिमानरहितश्च स्वेषा स्वीयाना भक्तानां कार्यसंपादने पटु· स्वस्यात्मनः कार्यसपादने पटुश्च चतुर्दशसु जगत्सु भुवनेषु प्रसिद्ध गोत्रं नाम यस्य चतुर्दशसंख्याकानि जगत्प्रख्यातानि गोत्राणि यस्य समुद्रस्य अंते मध्ये वास्तव्य 'विख्याते गुरुमर्येने' त्यत्रातशब्दस्य मध्यपरत्वदर्शी-

यः पुष्पवद्दृग्भृतपांडुबालो बल्यंचितांगो नवनीरदश्रीः ॥
हरिः पुराणोऽयमिह श्रुतिश्च भक्तप्रियस्तत्कथिकाप्रियोऽपि ॥ ९९ ॥
हर्यप्रियः सर्वजनाप्रियः स्याद्धरिप्रियः सर्वजनप्रियः स्यात् ॥
इति स्म जाने हयमारमेकं पश्यन् पदार्थं चणकं द्वितीयम् ॥ १०० ॥
सद्वंशजातः सगुणस्तु नम्रो यश्चापि शक्तौ बहुमार्गणेभ्यः ॥
ददाति लक्षं तमहं न मुंचे कोदंडमित्थं कथयन् बिभर्ति ॥१०१॥
जलजं जलस्थमपि जलसंबंधविहीनमधिगतामोदम् ॥
भ्रमरहितं वस्तु करे कलय इति निदर्शयन्बिभर्त्यब्जम् ॥ १०२ ॥
चरंति रथवत् क्षितौ ननु हरीच्छया ये जना
निधाय निखिलं चिरं तदुपरि स्वभारं परम् ॥
करेण कलयामि तच्चरणमेतमर्थं जनान्
प्रदर्शयितुमच्युतः कलयतीव चक्रं करे ॥ १०३ ॥

नात् समुद्रस्याते प्रांते च प्रियाः भक्ताः अस्य प्रियं भक्तं ओदन यस्य चित्तं पावयति शोधयतीति चित्तपावन इति ब्राह्मणजातिविशेषश्च ॥ ९८ ॥

यः पुष्यति पुष्पवंतौ सूर्याचंद्रमसौ दृशौ यस्य एकयोक्त्या पुष्पवंतौ दिवाकर-निशाकरावित्यमरः पुष्प नेत्ररोगविशेषः तद्युक्तदृक् भृताः पोषिताः पाडुबालाः पांडवा येन भृतपाडुरकेशश्च बलिना तन्नामकदैत्येश्वरेणाचित पूजित अग यस्य बलिभिः शिथिलचर्मभिरंचित अंग यस्य च नवनीरदवत् श्रीः शरीरकांतिर्यस्य नव निर्गता रवश्रीर्दंतशोभा यस्य निरिति रेफस्य रोरीति लोपे ढ्रलोपइति दीर्घः भक्तप्रियः ओदनप्रियस्य कथैव कथिका गुणकीर्तन प्रिय यस्य कथिका तक्रकृतव्यजनविशेषः प्रिया यस्य च अतिवृद्धस्य हि कथिकाभक्तमतरेण निर्वाहायोगात् तत्तत्प्रियत्वं योग्यमिति ॥ ९९ ॥

हरीति हयमारः करवीरमूल सर्वाप्रिय उपविषत्वात् यश्च हयमारः सहर्यप्रिय एव हरिरश्वश्चणको हि हरेरश्वस्य प्रिय. यश्च हरिप्रिय. सहरिप्रियएव अत सर्वप्रियः ॥१००॥

धर्मनिष्ठं ब्रह्मनिष्ठं सन्निष्ठ च नाहमुपेक्षइत्याह त्रिभिः सद्वशइति सद्वशः उत्तम-कुलं वेणुश्च सगुणः मैत्र्यादिगुणयुक्तः समौर्वीकश्च नम्रोऽनुद्धतः कुडलितश्च यश्चा-पि शक्तौ सत्यां मार्गणेभ्यो याचकेभ्यो लक्ष तत्सख्याकं धन ददाति यश्चापि धानु-ष्करतस्य शक्तौ पाटवे सति मार्गणेभ्यो लक्ष शरव्य ददाति च ॥ १०१ ॥

जलजमिति डलयोरैक्यात् जड मायोदक च अधिगतामोद आमोदोहर्षो गधो यस्य च भ्रमेण रहितं भ्रमरेभ्यो हितं च ॥ १०२ ॥

चरतीति हरिर्भगवान् अश्वश्च निज भार स्वहितादिविषय स्वोपस्कररूप च

विष्णुपदं बहुतारकमित्युच्चैर्यद्वदति सर्वजनाः ॥
तदिदं न मृषामन्ये परं त्वपेक्षा स्थिता प्रदोषस्य ॥ १०४ ॥
बहुतारकता विष्णुपदेऽस्त्येव न संशयः ॥
किंत्वंजसा सा बहुलदोषोद्रेके हि दृश्यते ॥ १०५ ॥
दोषाकरो भवतु विष्णुपदानुगामी
सद्वृत्ततां स कलयेत्किल पंचदश्या ॥
पाश्चात्यषोडशकलाक्षयतो विदेह-
भावं व्रजेदिह निदर्शनमेष चंद्रः ॥ १०६ ॥
भवचरणे चेतश्चेत् क्रियेत जायेत तर्हि भवतरणम् ॥
कामरणमकाकारं यर्हि भजेत्तर्हि रे भजेन्मरणम् ॥ १०७ ॥

तच्चरणं पादं रथचरण चक्रं च ये मदेकपरास्तेषां दास्यमपि करोमि किमुतान्यदितिभाव' ॥ १०३ ॥

ननु भगवानुक्तगुणकानामेवांगीकारं करोति नास्माकं पापाशयानामिति नाश क्यमित्याह विष्णुपदमिति विष्णुपदं भगवच्चरणमाकाशं च बहु यथा तथा तारकं बहुतारकाविशिष्टं च प्रदोषस्य रजनीमुखस्य प्रकृष्टदोषस्य च पातक्यपेक्षया हि तस्य तारकत्वं नान्यथेति तदंगीकारेणैव स्वमाहात्म्याभिवृद्धिरिति ॥ १०४ ॥

बहुतारकतेति पदद्वयं व्याख्यातं बहुला ये दोषास्तेषामुद्रेकः बहुलः कृष्ण-पक्षस्तस्य दोषारात्रिस्तस्याउद्रेकश्च यथा हि कृष्णपक्षे बह्व्यो दृश्यते तारकास्तथा न शुद्धे तद्वदिति ॥ १०५ ॥

दोषाकर इति दोषाकरः पातकी चंद्रश्च विष्णुपदं हरिचरणमाकाशं च सद्वृत्ततां पूर्णज्ञानतां पूर्णमंडलतां च पंचदश्या तन्नामकाध्यात्मविद्याग्रंथेन पूर्णिमया च षोडशकला. इंद्रियदशकं प्राणपंचकं मनश्चेति लिंगशरीरं अन्यत्र प्रसिद्धाः विदेहभावो देहमुक्तिरदर्शनं च पातकिन्यपि हरिभक्तौ प्रवृत्ते तत्प्रसादेन कंचनगुरु-मुपलभ्य तत्सकाशाद्वेदांतश्रवणेन ज्ञातब्रह्मात्मैक्यो निश्चयेन लिंगदेहभंगपूर्वकं मुक्तो भवतीति तात्पर्यं 'न तस्य प्राणाउत्क्रामंति अत्रैव समवलीयंते विमुक्तश्च विमुच्यत' इत्यादि श्रुतेः ॥ १०६ ॥

भवचरण इति अकं पापे च दुःखेति विश्वः अकः पापः आकारो यस्य [त] पापरूपमित्यर्थः कामरणं वेश्यासुरतोत्सवं मरणं संसारः मृत्युश्च भवचरण इति शब्दे चे चकारे तस्तकार. कृतश्चेद्भवतरणं भवति तथा कामरणशब्दः अकाकारः काकारेण रहितश्चेत् मरणमिति जायत इति ॥ १०७ ॥

स्याल्लिंगभंगो बहुवाररामासंगेन कामाभिहतस्य पुंसः ॥
लिंगस्य भंगे हि विदेहभावो भवेदिति स्पष्टतरं ब्रवीमि ॥ १०८ ॥
सुखस्य लिंगं वदनोज्ज्वलत्वं तत्सर्वदा सौम्य समीहसे चेत् ॥
निःसंगमंगीकुरु शर्वदास्योज्ज्वलत्वमेकं किल निर्व्यलीकम् ॥ १०९ ॥
तत्रश्रवणं ॥ भो भक्तिमार्गनिरताः श्रवणं कुरुतानिशम् ॥
भजनस्य हि संपूर्तिः श्रवणेन विना कुतः ॥ ११० ॥
स्पृहयते यदि माधवलब्धये भवतु तच्छ्रवणप्रवणो जनः ॥
श्रवणधिष्ण्यगतो भगवानिति प्रथयति श्रुतिरेव सनातनी ॥ १११ ॥
श्रवणानुसरणमेव श्रीरामं स्पृहयतां सतामेकम् ॥
श्रवणाभावं रचयन् रामविरहमन्वभूद्दशरथोऽपि ॥ ११२ ॥
यो नवीनोपनीतानां विना श्रवणकर्मणा ॥
श्रुतिग्रहः सविफलः शिष्टैश्चापि विगर्हितः ॥ ११३ ॥

स्याल्लिंग इति कामोऽभिहतो यस्य निष्कामस्येत्यर्थः बहुवार बहुकाल रामेण आसगः आसक्तिस्तेन लिंगदेहस्य सप्तदशकलात्मकस्य भंगो नाशः तस्मिन् सति विदेहकैवल्य मोक्षः स्यात् कामेनाभिहतस्य ताडितस्य बह्वयो या वाररामा वेश्यास्तत्संगेन लिंगभंगः उपदंशेन तस्मिन् सति विदेहभावो मरण जायेतेति ॥ १०८ ॥

सुखस्येति शर्वस्य शिवस्य दास्ये उज्ज्वलत्व निष्कपटत्वं यच्छर्वदास्योज्ज्वलत्वं तच्छसयोरभेदात्सर्वदास्योज्ज्वलत्व सर्वदाऽऽस्यस्य मुखस्योज्ज्वलत्व ॥ १०९ ॥

अथ सामान्येनोक्ता भक्ति श्रवणकीर्तनादिविशेषाकारेण वर्णयति तत्र तावदादौ श्रवणमाह भो इति श्रवणेन तन्नामकभक्त्या नक्षत्रविशेषेण च भजनस्य कीर्तनादेः नक्षत्रलक्षणजनस्य अश्विन्यादिसप्तविंशतिराशिरूपस्य च ॥ ११० ॥

स्पृहयत इति श्रवणाधिष्ण्य श्रवणभक्ते पद तन्नक्षत्र च श्रवणस्य हि विष्णुदेवकत्व तथा च श्रुतिः 'त्रेधा विष्णुरुरुगाय' इत्यादि ॥ १११ ॥

श्रवणेति श्रवण तन्नामभक्तिः श्रवणाख्यो वैश्यमुनिश्च यत्र हते तत्पित्रा दशरथ प्रति शापो दत्तः किमिति त्वमप्येव पुत्रविरहवान् भवति 'श्रवणमुनिपितुः प्राय शापकाल' मिति हनुमन्नाटके ॥ ११२ ॥

यइति यथा नूतनब्रह्मचारिणां श्रवणनक्षत्रे कर्तव्येनोपाकरणाख्यसंस्कारेण विनाकृत वेदग्रहण विफलं शिष्टासमत च तथा विगरुडस्तस्येनो विष्णुस्तेनोपसमीपं नीतास्ते न भवति ते नवीनोपनीताः ससारिणस्तेषा सच्छास्त्रश्रवणं विना कृतं कर्णग्रहण विफल शिष्टासमत च 'बिलेबतोरुक्रमविक्रमान्ये न शृण्वतः कर्णपुटे नरस्ये'ति भागवतोक्ते. ॥ ११३ ॥

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छाया येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक ६. • आगस्ट १८८३. अंक ८.

हें मासिक पुस्तक

पुणें येथें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत

छापिलें.

किंमत ८ आणे.

महाड—तारीख २४ जून सन १८८३.

रा० वि०. * * संभाजीराजे यांचे चरित्र या पुस्तकाचें पृष्ठ ४ याजवर सोमाजी नाईक याजला 'येकनाकी' वरून लोटून दिला असें असून त्या ठिकाणाचा शोध लावण्याबद्दल आपण टीप २३ यांत सूचना केली आहे. त्याप्रमाणें सर्व रायगडभर आम्हीं या नांवाचे ठिकाणाचा तलास केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. गडावर कडेलोट करण्याची एक जागा आहे तिला 'टकमक' असें म्हणतात. हें ठिकाण असें विलक्षण आहे कीं, पर्वताचें एक टोंक नीट समोर पुढें गेलें असून त्या खालीं अपरपार कडा तुटलेला आहे. या टोंकावर वारा फार असतो व नुसतें त्या जागीं जाणें सुद्धां फार दुर्घट आहे. या जागेशिवाय कडेलोटाची दुसरी जागा नाहीं. तेव्हां आपण लिहिलेली 'येकनाकी' कोणती या विचारात आम्ही बरेच दिवस होतों. तों आज एक कल्पना आमचे मनांत आली आहे ती ही कीं, आपण ज्या पुस्तकावरून बखर छापिली तें पुस्तक मोडी लिपींत लिहिलेलें असेल हें उघड आहे. तेव्हा मोडींत 'येकनाकीवरून' अशीं अक्षरें असतील. या ठिकाणीं. 'टकमकीवरून' असें जें वाचावयाचें, ते आपण वर्णसादृश्यावरून 'येकनाकीवरून' असें वाचलें द्' ...सेल. मोडी लिपींत अशी चूक होण्याचा पुष्कळ संभव आहे. * * * कळावें ले' ...भाची वृद्धि असावी हे विज्ञापना.

त्वं

आपला अनोळखी मित्र.

**अंताजी रामचंद्र हरडीकर.** दी

*** वरील कल्पना अगदीं बरोबर आहे. आम्हीं मूळ मोडी प्रत पाहिली, त्यात 'टकमकी' वरून असेंच आतां स्पष्ट दिसतें. टकमक आम्हांस पूर्वी परिचित असतें तर छापण्यांत चूक झाली नसती. मित्रानीं शोध करून आम्हांस खरी गोष्ट कळविण्याची तसदी घेतली त्याचे आभार आहेत. बखरी मोडींत असल्यामुळें व त्यांतील सर्व स्थ... आम्हांस माहिती नसल्यामुळें अशा चुकया होण्याचा फार संभव आहे हें जाण... प्रथम अकीं (१८७८) आम्हीं आमच्या वाचकांस त्या दुरुस्त करण्या... प्रार्थना केली. रा० हरडीकर याजप्रमाणें जर इतर वाचक थोडीशी तसदी घेण... मेहेरबानी करतील तर अशा सर्व चुकया व संशयस्थलें दूर होतील.

**का० सं० प्रकाशक.**

## सन १८७८ ते १८८२ पैकीं

श्री० बाळासाहेब भुसकुटे ... २७/३/३
रा० ब० ना० भा० दांडेकर .. १३/२
रा० रा० जो० दा० उद्धवजी ... १०
रा० रा० ल० वि० जोशी .. ... ३/३
रा० ब० मा० गो० रानडे ... ४

## सन १८८३ व १८८४ पैकीं

श्री० बाळासाहेब भुसकुटे ... ... ४/६
श्री० रा० गो० वि० कारभारी धार. ४/६
श्री० रा० पंत प्र० साहेब औंध .. ५/६
रा० ब० ना० भा० दांडेकर ... ४/६
रा० सा० ब० रा० सहस्रबुद्धे ... ३/६
,, ,, के० बा० बाळ ... ... ४/६
,, ,, आर रघुनाथराव . ५/८
,, ,, वि० ना० फाटक .. ८/१२
रा० रा० चै० आ० [illegible]डेकर... ४/६
,, , [illegible]यंनरी . ४/६
[illegible] पां० वासुदेव ५/८
[illegible] ,, वा० वि० लेले ... ... ४
रा० रा० से० ने० ला० जळगांव ४/६
,, ,, मडोवाळा मल्लापा ... ३/६
,, ,, से० नै० ला० शेवगांव ४/६
,, ,, वि० बा० आडबे . ३/६
,, ,, ह० मा० पंडित . .. ४/६
,, ,, ना० बा० मराठे .. . ४/६
,, ,, ना० वि० जोशी ... /६
,, ,, ज० वि० म्हाडदळकर. ४/६
,, ,, से० वाचनालय महाड. ३/६
,, ,, ना० वि० अभ्यंकर ... ४/६
,, ,, चिं० ना० थिटे ... ४/६
,, ,, ग० वा० पारखी . ४/६

---

# विषयक्रम.


**बखरी.**

पत्रें, यादि वगैरे ..................................... १२५-१३६

थोरले शाहू महाराजाच्या चरित्राचें मुखपत्र.

पंत प्रधान यांच्या शकावलीचें मुखपत्र.

**मराठी कविता.**

श्रीरामदासस्वामिकृत युद्धकांड—किष्किंधाकांड ...... ९७-११२

**संस्कृत काव्यें.**

श्रीशिवकाव्यम्- ........................................ १४१-१४८

पंतविठ्ठलकृत—सुश्लोकलाघवम् ............................ २५ ३२

वगैरे जागा पाहून, कारल्यास मुक्काम करून, मागती मुंबईस गेले. सरकारचा जासूद व मारनिले कडील खिजमतगार तरतुदी करिता मारनिलेनीं पाठविले हात ते माघार आले.

१. छ ११ मोहरमचें वर्तमान. बापूजी गणेश गोखले यास मारनिलेनीं पत्र लिहून, थैली तयार करून रवाना करावयास त्याजकडील सखोपत टेंभे यास बोलावून आणोन त्यांचे हवालीं केली. सखोपतांनीं एक घटका बोलणें करून गेले. बापूजी गोपाळ साने येऊन कप्तान फलोस याशीं बोलून गेले. करवीरकरां कडील कारकून मेस्त्र रसल याशीं बोलून गेले. प्रभाकरपंत जोशी मोधीशीं[७६] बोलून गेले. आंगरे यांजकडील बापूभट सोमण मेस्त्र रसेल याशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री याणीं जासुदा बरावर लखोटा पाठविला तो मुंबईचे डाकेवर रवाना करावयास मारनिले जवळ पावता करून गेला. मुंबईचे डाकेवर व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें आलीं. जाब रा। जाले.

---

( मागील पृष्ठावरून )

खांबावरील पुतळे—व इतर ठिकाणचेही–जोडपीं जोडपीं आहेत. दिवाणखान्याच्या बाहेरील भागास दोहींकडे दोन जोडपीं नृत्य करीत आहेत असें दिसतें. हीं इंग्रजी बाल मध्यें जोडपीं नाचतात त्या प्रमाणें दिसतात. एकंदर सर्व पुतळ्यांचा पेहराव बैरागी बैरागिणी या सारिखा दिसतो—पुतळे नग्न नाहीत. या दिवाणखान्याच्या दोन्ही बाजूस दोन मजली कोरलेल्या गुहा आहेत त्यांत विद्यार्थी राहात असत असें अनुमान होतें. प्रत्येक खोलींत एक माणूस निजण्या पुरता ओटा व तितकीच रिकामी जागा अशी सोय आहे. या स्थलास हल्लीं आन्ध्राडे ह्मणतात. कारण या खोल्यांच्या तोंडीं सर्व साधारण अशी जागा आहे तींत आळीकडील लोक तालिम करतात. दिवाणखान्याच्या तोंडीं एकवीरा भवानीचे स्थान आहे व पाण्याचीं टाकीं आहेत.

७६. मोधी—हा जातीचा पारशी असून इंग्रजांच्या पदरीं असे. कर्नल क्लोज् पुण्यास रेसिडेंट असता राजे रजवाड्यांच्या भेटी तो खुसरुजी मोदी याच्या मार्फत घेत असे. तेव्हांच सदाशिवराव भाऊ माणकेश्वर हे बाजीरावाकडून रेसिडेंटाकडे वकील होते व बयाजी नाईक हुजऱ्या हा बाजीरावाचा हेर होता. या तिघांचा एक विचार होऊन, त्यानीं मोठमोठालीं कामें करून, पुष्कळ पैसा मिळविला. मोदीच्या हातीं इंग्रजी सूत्र आहे अशी बाजीरावाची समजूत पडल्यावरून तो त्याशीं फार स्नेहानें वागू लागला व रेसिडेंटाच्या अनुमतानें त्याजकडे धारवाडची सरसुभेदारी सांगितली. हा सर्व कारभार एल्फिन्स्टन साहेब रेसिडेंटाचे कामावर येईपर्यंत नीट चालला होता. परंतु तो रेसिडेंट झाल्यावर त्याची ओळख मराठे सरकाराशीं असल्यामुळें मोदी फिका पडू लागला व वरील त्रिकुटांत भाडाभांडी सुरू झाली. पुढें एल्फिन्स्टन साहेबास संशय येऊन त्यानें मोदीस इंग्रज व पेशवे यातून एकाची नौकरी सोडण्यास सांगितलें. त्यावरून त्यानें सरसुभेदारी सोडिली. नंतर विशेष वहिम आल्यावरून त्यास पेनशन देऊन घरीं बसविण्याचा प्रसंग आला, तेव्हां मोदी अकस्मात् विषप्रयोगानें मरण पावला. (१८१४) मोदीची बाग पुण्यास प्रसिद्ध आहे. मराठ्यांच्या सर्व इतिहासांत पारशी एवढाच आढळतो.

७७ मिस्तर रसेल—हा कर्नल क्लोज् गेल्यापासून तों एल्फिन्स्टन येई पर्यंत रेसिडेंटाचें काम पाहात होता.

दोन रोजा वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १५० ] ॥ श्री ॥

साहेब साहेबाचे सेवेशीं आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना, मेस्तर इलफिनइस्टोन वकील हिम्मत इंग्रज कलकत्तेकर यानकडील दिनचर्येची बातमी--

१. छ ७ मोहरमचें वर्तमान. मशारनिले प्रातःकाळीं दापोडी पावेतों जाऊन सहल करून आले. गोपाळराव खंडेराव रास्ते यांजकडील कारकून व बापूजी गोपाळ साने मा।र निलेशीं वेगळाले बोलून गेले. करवीरकर यांजकडील कारकून मेस्तर रसल याशीं बोलून गेले. प्रभाकर पंत जोशी मोधीशीं बोलून गेले. मुबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें डाके बरोबर आलीं. जाब रा। जाले.

१. छ ८ मोहरमचे वर्तमान. करवीरकरांकडील वासुदेवभट गुरुजी व तीन असामी कारकून ऐसे येऊन मा।निलेशीं बोलणें करून गेले. गंगाधर शास्त्री व बापू मैराळ मा। निलेशीं दोन घटका बोलणें करून सायंकाळीं गेले. चिंतामणराव पटवर्धन व मिरजकर व तासगांवकर व कुरुंदवाडकर यांस मा।निलेनीं पत्र लिहून चार थैल्या तयार करून त्यांजकडील कारकून बोलावून आणोन चौघांचे हवालीं चार थैल्या रवाना करावयास केल्या. त्या घेऊन चौघांनी कपतान कलोस याशीं बोलणें करून गेले. बापूजी गोपाळ साने मशार निलेशीं व मोधी याशीं बोलून गेले. मुबई, हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें डाके बरोबर आलीं. जाब रवाना केले. गारपीरचे लष्करांतील शिपाई व गंगाधर शास्त्री यांजकडील माणसें मोहरमची फकीरी मागावयास आले. सबब मशारनिलेनीं लष्करवाले यांस रुपये दहा व शास्त्री यांजकडील माणसांस पांच एकूण पंधरा रुपये दिल्हे.

१. छ ९ मोहरमचे वर्तमान. निपाणीकर यांस मारनिलेनीं पत्र लिहून थैली करून रवाना करावयास बापूजी गोपाळ साने याचे हवालीं केली. ती घेऊन साने गेले. मशारनिले व कप्तान कलोस व मेस्तर रसल व कप्तान

---

७८ बयाजी नाईक--हा एक हुजऱ्या असून हेराचें काम त्याजकडे होतें.

७९. बापू साने--मोदीच्या वतीनें धारवाड सरसुभ्याचें काम पहात असे. मोदी मरण पावल्यानंतर त्यानें केलेल्या दुर्वर्तना बद्दल बापूस जाब विचारूं लागले व कैदही त्यास केलें. पुढें त्रिंबकजीच्या विलक्षण शिक्षेच्या धाकानें तो कैदेंतच मरण पावला.

८०. गंगाधरशास्त्री पटवर्धन व बापू मैराळ हे बडोद्याहून पेशवे व गायकवाड याचा मागील बाकीचा लढा पडला होता तो तोडण्याकरितां इग्रजांच्या बाहेदारीवर पुण्यास आले होते. पैकीं गंगाधरशास्त्री हे पूर्वी फडके याच्या पदरीं होते. मैराळ हे हल्लींच्या बडोदकर मैराळांचे पूर्वज असावे

पाटेजर व दुसरे व जी [ खुसरूजी ? ] मोधी ऐसे चार घटका दिवस राहतां राजश्री सदाशिवपंत भाऊ याजकडे नाना फडणीसांचे वाड्यांत येऊन भाऊशीं बोलणें केले. श्रीमंत महाराज साहेबाचे सेवेशीं मशारनिलेनीं पत्र बापू साने याचे हातें लिहून थैली करून बराबर आणली ती भाऊंचे हवालीं करून दोन घटका रात्रीं गेले. मोधी मागें राहून एक घटका बोलून गेले. आनंदराव मल्हार व धोंडो मल्हार बोलण्यांत होते. कप्तान फोर्ट दोन वेळां येऊन मशारनिलेशीं बोलणें करून, खाना खाऊन, दोन प्रहर रात्रीं गेले. आंगरे यांजकडील कारकून प्रातःकाळीं मशारनिलेशीं बोलून गेले. मुंबई, हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्मणपूरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाम रा॥ जाले. भिकाऱ्यास चार रुपयाचा खुर्दा मशारनिलेनीं खैरात केला–

३

तीन रोजा वर्तमान निवेदन जालें पाहिजे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १५१ ] ॥ श्री ॥

सेवेशीं धोंडो गोविंद गोडबोले कृतानेक साष्टांगनमस्कार विज्ञापना ता॥ माघ वद्य ५ तृतीयप्रहर पावेतों सुखरूप असो विशेष–राजश्री पंतप्रतिनिधी व चंदन-वंदनकर व सातारकर यास लिहून ताकीद झाली पा॥. वारंवार तेंच लिहितोस हें काय! असें कदाचित म [ ना ] त येईल. त्यास स्वामींची स्वारी त्या प्रांतीं जाऊन माझा अम्मल सुरळीत चालण्याविशीं ताकीद होणें यांत मला भूषण बहुत आहे. स्वामींचे साहाजिक भाषण परंतु सेवकास महाभूषण याजकरितां वारंवार विनंती लिहितों. हेंही स्वामींचे ध्यानांत आहेच. रास्ते यांस आरव दूर करण्याविशीं ताकीद जाहली म्हणोन कळलें. फार संतोष जाहला. क्षेत्राचा उपद्रव गेला. राघोपंत सफरे म्हणून कोणी कऱ्हाडे गृहस्थ पूर्वीं बाबूराव केशव यांचे पदरचे त्यांनीं सालगुदस्त बडांत पुण्यास येऊन सातहजार रुपये भरून कऱ्हाडची मामलत केली. तेव्हां ते दोघी याजकरितां मशारनिलेस धरून वैराटगडास आटकेंत ठेविले आहेत याविशीं रा॥ चिंतोपंत देशमुखांस माहीत

८१ सदाशिवपंत भाऊ–माणकेश्वर–टेंभुर्णीचे कुळकर्णी पूर्वी हरदासाचा धंदा करीत. पुढें गोविंदराव पिंगळे यांचे मार्फत हैदराबादेस होते. पे० द० पृ० २११ टी० २८ व पृष्ठ २२१ टी० ५० पहा.

८२. कॉप्तन् फोर्ड–हा मराठी फौज मोडून इंग्रजी पलटण बाजीराव साहेबानीं तयार केली होतीं त्याजवरील मुख्य. यालाच पेशव्याचे बखरींत 'पोड' साहेब म्हटलें आहे. पे० द० पृष्ठ २११ पहा.

८३. वरील दोन पत्रावरून इंग्रजांची व्यापकता व महत्त्व हीं या वेळीं कितीं होतीं हें समजेल

८४. बाजीरावींत मामलती मक्त्यानें देत असत.

पुर्तेपणें आहे व सेवेशीं विनंतीही केली आहे त्यास त्यांचा चार रुपये खड ठरावयाचा तो दरम्यान वे॥ रा॥ वैजनाथ भेंट मामांचे बोलणे पडेल व पडते त्यात भाव यांस उगेच कैद केलें, दोष नाहीं, याजकरितां त्यांस सोडून द्यावे याप्रमाणें झाले. त्यास मी आक्षेप घेतला. सरकारचे अपराधी अटकाविले आहेत. त्यास परवानगी सरकारची. ते पक्षीं परवानगी शिवाय सोडतां येत नाहींत. तेव्हा इकडे निरूपाय जाणोन वेदमूर्ती रा॥ मामा सरकारात विनंती करून महारनिलेस सोडवावयाचा उद्योग करतील व चालला आहे. सरकारांतून ते गृहस्थ सुटल्यास सरकारचे चार रुपये मात्र येणार नाहींत. परतु बोलणें बोलतील ते मात्र मध्येच रुपये खातील. आणि अपराध पक्का याजकरितां त्यास मुक्ततेची परमाणगी नच व्हावी. कदाचित सरकारचा खड देऊन सुटत असिल्यास मग नीटच आहे. माझा ज्वर परिहारला. पधरा दिवशीं पूर्ववत शक्ति येईल सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १५२ ] ॥ श्री ॥

पुरा॥ राजश्री बाबा स्वामींचे सेवेशीं. विनंती ऐसीजे. इकडील राजक्रांतीचें वर्तमान तरि जलचरांचीं पळटणें बंगाल्यातील व चिनापट्टन लगायेत गुजराथ वगैरे या प्रांतीचे दरोबस्त जमाव पलटनें सुमारि पाऊणशें केला. क स र याचा कौसल ठहरून बादबरसाद आधीन अखेर तयारी करून हिंदुस्थान प्रातीं आपल्या मुकाबिल्यास येतात यात संदेह नाहीं. जंगी सरजाम तयार करण्याकरितां या प्रांतींचे महालानिहाय मिळोन येथें साहुकारापासून पन्नास लक्ष रुपये घेतले. वराता सावकार म॥रास कलकत्याकडे लाऊन दिल्या. पोख्त सरंजाम लेश करविला आहे. याप्रमाणे तांब्रींचे अधिकारी यांनीं मसलतीचे घाट बांधून स्वार सरजाम सुद्धां येत आहेत. तरि आपण श्रीमंत महाराजास राज्यक्रांतीचे भाव सुचवून तयारींत असावें. दुसरें येथून हो डि यानें मा व र घाट येथील मुक्कामा पावेतों माणसांची डाक रवाना जाहली आहे. हालकरे चारशें व कारकून इंग्रेजांनीं नेमून पाठविला आहे. आज पंधरा रोज जाहाले. बेटात आपल्याकडील गृहस्थ आहे त्यांनीं तथ्य वृत्त सांगितलें त्यावरून सुचना लिहिण्यांत आली आहे. कारण कीं, सर्वांस आधार तेथील. येथील उमेद तिळमात्र नाहीं. आतां छद्म [ छनद? ] करितां परंतु सिद्धीस जाणार नाहीं.

[ १५३ ] ॥ श्री ॥

श्रीमत राजश्री आबासाहेब साहेबाचे सेवेशीं—विनंती सेवक मल्हार चिंता-

---

८५. पे० ब० पृष्ठ २१४ पहा.
८६. जलचर=इंग्रज.
८७. तांब्र=इंग्रज
८८ हे आबासाहेब कोण ?

मण बोधनी अकबरनीस कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना छ २५ माहे रमजान पावेतों आपले कृपें करून सरकार कामावर हजर असों विशेष. ता। वांफगांव येथील आकबार येणेंप्रमाणे श्रुत व्हावी. कलमें.

१ हुजुरांहून नारायणराव हालकारे सरकार आज्ञेवरून श्रीजेजुरीलिंगाचे * नवस फेडावयाकरिता आश्वीन शुद्ध ७ पुणे मुक्कामीं येऊन राजश्री बाबाजी बाजीराव मामलेदार तालुके म॥ हे नारायण राव बरोबर जेजोरीस जाऊन तेथे श्रीचा गोंधळ व कुळधर्म व ब्राह्मग भोजन उत्तम प्रकारचें करून देवाची पूजा अर्चा वस्त्रप्रावर्णासह उत्तम प्रकारें केली. व सर्व आश्रित व पाध्ये वाघे मुरळी यांचा सन्मान करून बहुत चांगला समारंभ केला. आसमतान जेजुरीचे मोठा लौकीक जाहला. या कत्यास बारा चौदा दिवस कमावीसदार तेथें होते. नतर नारायणराव श्रीपंढरपुरास गेले व बाबाजी पुण्यास सरकार कामावर हजर आहेत.

१. ता। वाफगांव देहे नव येथील इकडील रिवाजाप्रमाणें गांवकरी यानीं कमावीसदार याजकडे पीक पाणीचे आर्ज्या केल्या आहेत कीं आमची पहाणी पिकाची करून नजरेस आणावें, त्यावरून का॥दार यानीं कोठे कोठें कारकून पाठविले आहेत व आणखी पाठविण्याची योजना आहे. कलम.

१. नवगावीं शेंकून पोत्याच्या चिठ्या केल्या आहेत. नवगांव मिळोन शें सवाशें रुपयांचा आकार होईलसा दिसतो. कलम.

१. कै॥ आले. येथील पाटील कुळकर्णी यांचा व रयतेचा तटा त्रिंबकराव रामचद्र याचे अमलापासून वाढला दिसतो. रयतीस फूस देणार का॥ मा॥रच्या दोन तीन असाम्या येक गोपाळराव बारेकर व एक आनदराव शेटे

---

१ वाफगांव ता० खेड-हा गाव पूर्वी होळकर याचा. परतु त्याचा मोबदला होऊन हलीं खालसा आहे. येथें होळकरांचा तटबदी वाडा गावकुस वगैरे आहे. गांव नदी व ओढा यांच्या चिमट्यात आहे होळकराचा वाडा मोडला आहे तथापि एक दिवाणखाना दुमजली शाबूत आहे व त्यांत खालीं विष्णूची गरुडारूढ मूर्ती स्थापिली आहे. दुसरी एक गडकी शिळेची लक्ष्मीनारायणाची मूर्ती आहे ती सवालाख रुपये खडणी बद्दल होळकरांनीं राजस्थानांतून आणिली असें सांगतात.

* मल्हारी व म्हाळसा यांचीं दोन लिंगें असून खेरीज मूर्तीही असतात. मल्हारी हा महादेवाचा अवतार

१०. जेजुरीस पेशव्यांचें जुनें तळें व तेथील पाणी बागेस नेण्याकरिता केलेला खजिना व मळ, होळकराचें तळें, जेजुरीनाथाचें तटबदी देऊळ, आतील सुवर्णाच्या व रुप्याच्या मूर्ती, व मल्हारराव होळकर याचें देऊळ व आतील त्याची व त्याच्या स्त्रियांच्या संगमरवरी पाषाणाच्या मूर्ती या गोष्टी पहाण्या जोगत्या आहेत. येथें मार्गशीर्ष, माघ व चैत्र या महिन्यांत यात्रा भरते.

११ शकुन पोतें ( याच्या चिठ्या )—'शकुन पोतें' ही एकाप्रकारची पट्टी असावी.

१२. कमाविसदार.

व एक नारायण पा। भुजबळ हे त्रिवर्ग आणीक एक दोन असे मिळोन असे रयतेस बिछडून कुभाड गावांत मोठें मांडलें आहे. रात्रदिवस कचेरी दरबार साहेब लोकापर्यंत अर्ज्या रयतीकडून देऊन पुढें बोलण्यास आपण होऊन तकरार कुभाड करीत आहेत. पाटील कुळकर्णी याजकडे विशेष दोष आहे असें नाहीं. परतु कुळकर्णी याने लिहू नये, गांवात पाटलानीं कामात येऊं नये, असे नाना प्रकारचे तकरारी करून मोठा बखेडा माडला आहे. अशा खट-ल्यानें का।दार यास रात्रदिवस मोठी दगदग पडून वसुलाशींही हरकत गु।। ही अखेरसालपर्यंत केली असें दिसोन आलें. यदाही तसाच प्रकार दिसण्यांत येतो. याविशीं साहेबांकडे यादबिद देऊन बंदोबस्त करण्याचे तजविजीत असयी आहेत. परतु बारेकर वगैरे तीन असाम्या याचा बंदोबस्त इग्रज सरकारातून अगर आपले सरकारातून जाल्या वांचून गांवचा बखेडा मोडत नाहीं असें दिसतें ही मोठी जिकीर आहे. कलम.

सदर्हू कलमे लिहिल्याप्रमाणें मनन होऊन उत्तरास आज्ञा जाहली पाहिजे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १५४ ]          ॥ श्री ॥

श्रीमत राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक लक्ष्मण बल्लाळ सा।ग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता।। छ २६ रा।। वल मुक्काम वीरगाव पे।। आकोले यथास्थित असे. विज्ञापना पे।। दिंडोरीकडे बातमीस स्वार पाठविले होते व रा।। फत्तेसिंग काळे याजकडे जासूद पाठविले होते. दोहोकडून तहकीक वर्तमान आले कीं, जयराम मोरेश्वर सुटले. खासा कामास आला. येविशीं फत्तेसिंग काळे यानीं मजला पत्र लिहिलें त्याची नक्कल सेवेशीं पाठविली असे. त्याजवरून सेवेशीं विदित होईल. मातुश्री उमाबाईकडील वर्तमान तरि नाशिकावरि आहेत. परतु गंगा-तीरीं मौजे निफाड पे।। चांदवड येथें मीर महमद बाकर नाशिकचा अमीन हजार बाराशे फौज सुद्धां अकस्मात सेनापतीचे कूच होऊन पुढें जाणार. येका दो दिवशीं जातील. सेवेशीं कळावें म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

[ १५५ ]          ॥ श्री ॥

रा। बिसाजी देवराव गो। याशीं—

सुहूसन सलास आशार मयातैन व अलफ शेखचाद शिलेदार यास सरका-रातून बक्षीस रुपये ५०० पाचशें पाठविले असत. तरि त्यास देऊन पावती घेऊन हुजूर पाठवून देणें. जाणिजे. छ २१ जा।वल असलपत्र बाळाजीपत

कारकून नि॥ त्रिंबकजी डेंगळे याजकडे देऊन डाकेबरोबर लष्करांत रवाना केले. छ २३ जा॥वल सु॥ सलास अशर मयातैन मु॥ नाशिक.

[ १५६ ] ॥ श्री ॥ पे॥ छ २० जा॥वल सीत.

राजश्री अमृतराव स्वामींचे सेवेशीं—

विनंती उपरि तुम्ही छ ६ जा॥वलचें पत्र पाठविलें तें पावलें. मालीट इंग्रज आज श्रीमंताचे दर्शनास आला होता. अगोदर त्यांनीं कचेरीस यावे. नंतर श्रीमंतांनीं यावें असा बेत करून भेट जाली. मालिटास मात्र भेटले. नजराणा केला. त्याची याद पाठविली आहे. मालीट पर्वतीचे रमण्यांतच राहिला आहे. बायका वगैरे वाड्यांत राहिले म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास बेत अगोदर त्यांनीं यावे, नंतर श्रीमंतांनीं यावें, असा करून भेट करविली. उत्तम केलें. नजराण्याची यादी पाहिली. पुण्यांतील नेमणुकेचे फौजेस रोजमरा वाटावयाचें लिहिलें त्यास एक दुमाही व दोन आठवडे द्यावे रा॥ छ १४ जा॥वल हे विनंती.

[ १५७ ] ॥ श्री ॥

पे॥ छ १८ मोहरम सन खम्मस अशर

साहेब साहेबाचे सेवेशीं. आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मेस्त्र इलफिस्टन वकील दिम्मत इंग्रज कलकत्तेकर याजकडील दिनचर्येची बातमी—

१. छ १ मोहरमचें वर्तमान—मशारनिले प्रातःकाळीं गणेशखिंडी पावेतो जाऊन सहल करून आले. गोपाळ खंडेराव रास्ते याजकडील कारकून प्रातःकाळीं मशारनिलेशीं बोलून गेले. जिऊबाई भानूकडील कारकून मेस्त्र रसल याशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांजकडील जासूद एक लखोटा घेऊन आला. तो मुंबईचे डाकेवर रवाना करावयास मशारनिले जवळ पावता करून गेला. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्माणपूरचीं पत्रें डाके बरोबर आलीं. जाब रा॥ जाले.

१. छ २ मोहरमचें वर्तमान—मशारनिले व कपतान कलोस वगैरे पाच असामी प्रातःकाळीं गारपीरचे लष्करांत जाऊन तेथून घोरपडी पावेतों सहल करून आले. खुसरवजी मोदी येऊन मशारनिलशीं दोन घटका बोलणें केलें. कप्तान कलोस व मेस्त्र रसल व बापूजी गोपाळ साने बोलण्यांत होते. नंतर निघोन आदितराम साहुकार याचे येथें जाऊन घरास गेले. करवीरकाराकडील कारकून मशारनिलेशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री याजकडील आगशीकीरस्ताई मेस्त्र रसल याशीं बोलून गेला. पांडोबा नाईक पिपडी करवीरकराकडील पत्र घेऊन आले. ती थैली मशारनिलेस पावती करून दोन घटका

बोलून गेले. जीऊबाई भानू कडील कारकून व प्रभाकरपंत जोशी मोघीशीं बोलून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व ब्रह्मणपूरचीं पत्रे डाके बरोबर आलीं जाब र॥ जाले. श्रीरूनजीक लष्करचे छावणीचे गीर्दनवाईस पेंढारी येऊन उपद्रव केला. म्हणोन छावणींतील टोपकारांकडून डांके बरोबर बारा घटका रात्रीं मशारनिलेस पत्र आलें. एक टोपकर व दहा शिपाई छावणीनजीक जखमी जाले. अशी बातमी आहे. हैदराबादचे डांकेस इंग्रजाकडील जासूद आहेत त्यास मौजे चिंचोली येथील टप्यावरील जासूद डांकेचीं पत्रें घेऊन येत होता, त्याची पेंढाऱ्यांची गांठ पडून पेंढाऱ्यांनीं भाला मारिला. जासूद जखमी झाला. ह्मणोन मशारनिले कडे बातमी आली. कप्तान फोट मुंबईस गेले होते ते बोर घाटावर खंडाळ्याचे मुक्कामीं आले, म्हणोन दापोडीचे छावणींत बातमी आली. त्याजवरून छावणींतील टोपकारांनीं लौकर येण्याविशीं पत्र पाठवून डाक बसावयास घोडे रवाना केले.

२

दोन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[ १५८ ] ॥ श्री ॥

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी—

विनंती उपरि सालमजकुरीं स्वारी पुण्यात असतां कोण कोणते महालाच्या रसदा करार जाहाल्या, व स्वारी निघाल्यावर कोणते महाल विल्हेस लागले, त्या पैकीं तूर्त यावयाचा ऐवज कीती व मुदतीचा ऐवज कीती त्यापैकीं पोता ऐवज जमा कीती जाहला व बाकी काय तें लिहून पाठवणें व पोत्यास ऐवज येऊन बाकी ऐवज तूर्तचा व मुदतीचा राहिला तो झाडून पोत्यास जमा करणें व ज्या महालाच्या रसदा घेणें असतील तेही महाल विल्हेस लाऊन ऐवज घेणें. लिहिले प्रमाणे आर्धी करणें. र॥ छ ५ रावर. साराश ऐवज रसदेचा पोत्यास जमा करणें. मुदतीचा ऐवज रसदेपैकीं किती त्यास या ऐवजापैकीं पोत्यास आणिल्यास व्याज किती पडतें हें सविस्तर लिहून पै॥. र॥ छ ४. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[ १५९ ] ॥ श्री ॥

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री जिवाजी रघुनाथ गोसावी यांसि—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व अलफ. राजश्री बाबूराव केशव मजमदार पै॥ सिंदखेड यांणी हुजूर विदित केलें कीं, र॥ मल्हारराव रामकृष्ण याजकडे पै॥ मा॥ची मामलत सन खमसांत होती. त्या वेळच्या आमच्या वेतनाचे बगैर व्याज सुद्धां रुपये ४५० साडेचारशे येणें आहेत

ते मागतो. परंतु देत नाहीं. त्यास हल्ली सरकारांतून मल्हारराव रामकृष्ण यांस रद्द कर्जाच्या ऐवजीं वरात बाबती नांदेड येथें दिल्ही आहे. त्यांपैकीं देवावे म्हणून त्याजवरून हें पत्र तुम्हास सादर केलें असे. तरि मशारनिलेचा वेतनाबाबत वगैरे बाकी असेल तो याजशीचे रुईनें वजा करून सदहू ऐवज पै।। घेणें. ऐवज मशारनिलेस देणें. जाणिजे. छ १ जिलकाद आज्ञाप्रमाण. लेखनसीमा.

[ १६० ] ॥ श्री ॥

पै।। छ १७ माहे रमजान सन १२००

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री गोविंदरावजी स्वामींचे सेवेशीं—

पोष्य बळवतराव भवानीशंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ तागाईत छ १ माहे रमजान मुक्काम हुमनाबाद जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें विशेष. श्रीमंत महाराज यजमान साहेबीं राजश्री तात्या यांजकडे फौज सुद्धां रवाना केले तेव्हां आज्ञा हेच कीं, तात्याची व हजरतीची भेट होणार त्या पूर्वीं तात्याजवळ जाऊन पोंहचावें. त्याचे विचारें नवाब बंदेगान अलीची भेट व्हावी. त्यास लोकाचे स म जो त्या स [ समजुतीस ? ] चार दिवस अधीक शाशीमाबर लागले. यांत तात्याची व हजरतीची भेट होऊन मसलहत प्रकरणीं बोलणें होऊन तात्या याची स्वारी पुढें कृष्णा उतरून गेली. त्यास त्वरेनें तात्याजवळ जाऊन पोंहचण्यास मार्ग हुमनाबादेचा नीट जाणून येथपर्यंत येणें जाहाले. त्यास नीट मार्गें येतां हजरतीची स्वारी मध्यतरीं आहे. पृथक भेटीचें तो प्रयोजन नाहींच. इकडील वाजेकरी [ ? ] व या दौलतीची कळकळ तात्यास व आपणास आहेच. तात्या यांचे व हजरतीचे भेटीचे प्रसंगीं इकडील मतलब उगविलेच असतील. प्रत्येक आम्हास काय बोलावयाचें आहे. त्यास मार्ग जवळून तेव्हां परस्पर जाणे हें चांगलें. किंवा वीस पचवीस कोशीं असतांना एक दिवस राहून सरासरी भेट घेऊन जावें. जैशी येविशीं करीन [ ? ] सल्लाह असेल त्याप्रमाणें सूचना व्हावी. हा मार्ग सोडून जावें तरि दिवसगत लागेल. वासना तो तात्याजवळ सत्वर जावें हेच. व यजमानाची आज्ञा याचप्रमाणें. सर्वात्मना यजमानाचा विश्वास आपले ठायीं तेव्हा उचित प्रकार जो असेल तोच आपण लिहीतील. येविशींची विनंती तात्या यास लिहिली आहे. या उपरि जाण्यास दिवस बहुत थोडके राहिले. पत्राचीं उत्तरें सत्वर यावींत. त्याप्रमाणें येथून घडण्यात येईल. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि कीजे हे विनंती[२३].

२३. पत्रें अंक ५० ते ५२ तीन व ६० पासून तों या पत्रापर्यंत सर्व पत्रें रा० रा० दत्तो विनायक खाडिलकर यांजकडून आ- (पु० चा.)

[ १६१ ]    ॥ श्री ॥

पु॥ राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि—

आशीरवाद उपरि. नासरजगास हिदायत[९४]मोहीदीखानाकडे पठाणांनीं भेदून नासरजगास मारलें. हिदायतमोहीदीखान औरंगाबादेकडे येऊ लागला. तेव्हां आम्हीं जमी केली औरंगाबादेजवळून रुपये घेतले. याजमुळें मोंगलानें विषम मानिलें. तेव्हा तुम्हीं जयनगरापाशी होतेस[९५]. तेव्हां वारवार पत्रें पाठविलीं कीं, गाजुदीखान इकडे येतील तर उत्तम. तुम्हीही यावें. सा सुभे दक्षिण सोडवावी. अथवा गाजुदीखानास आणावें. त्यास स्थापावें. त्यापासून एखादा तरी निदान सुभा ध्यावा. कर्ज वारून ध्या [ वें. ] येणेप्रमाणें करावें. तेव्हा तुम्ही न आलेस[९६]. वजीराचे कामीं[९७]वर गुनत चाललस[९६] आम्ही खामखा[९८] आणावें तर तुम्ही कामास चाललेस. श्री इच्छेनें हिदायतमोहिदीखान व पठाण भांडून हिदायत-मोहिदीखान मेला. आम्ही जवळ गेलों. परतु मार्गीं बापू * भिंवराव मोडले. याजमुळें शह पडला. व आम्हाजवळ फौज थोडी. सोबत्याचा भरवसा नाहीं. उन्हाळा दिवस. जानोजी निंबाळकर तेव्हां केवळ रामदासपताचे लेकें[९९]! त्यानीं थोडबा बहुतावर आम्हांस समजाऊन त्याजवर उपकार करून मजकूर विल्हे लाविला. आम्हांस गाईकवाडास जरब देणें जरूर यास्तव आम्हीं दरमजल सातारियाकडे आलों. तुम्हीं वजिराचे कामावर मोठी मेहनत, मोठें जोखींव, केलें. पातही सुटला. परतु मनसब्याचा जवा[१००] बसवून काहीं पठाणास देऊन, काहीं आपण घेऊन, रग भरून माळव्यात यावें, ते गोष्ट तेथील मुरवतीमुळें न जाहाली. एकदेशी मनसबा जहाला. आम्हीं गायकवाडाचें पारपत्य केलें. तुम्हास नाना

( मागील पृ० )

म्हास मिळालीं हीं बहुतेक अस्सल होतीं खाडिलकर यानीं पाठविलेल्या पत्रांपैकी आणखी काहींच्या नकला आह्मापाशीं आहेत, पण ती इतिहासाच्या कामास विशेष उपयोगी पडतील असें वाटत नाही छापिलेल्या पत्रांपैकीं बहुतेक शिक्के मोर्तब झालेलीं अशीं होतीं. काहींवर तर खुद्द बाजीरावाचीं हस्ताक्षरें होतीं. एकदर ह्या पत्रांपासून इतिहासजिज्ञासूस पुष्कळ माहिती होईल यात सशय नाहीं सबब रा० खाडिलकर याचे आह्मा महाराष्ट्र जनांवर मोठे उपकार झाले हें सांगणें रास्त आहे. अस्सल पत्रें त्यांजकडे परत केलीं

९४ हिदायत मोहिदिन=मुजफरजग

९५ ‘होतेस’ असाच द्वितीयपुरुषीं अनेक वचनी प्रयोग ह्या पत्रात बरेच जागीं केलेला आहे

९६ वर टीप ९५ पहा.

९७. वजीराच काम—अयोध्येचा सफदरजग याजला रोहिले लोकाचा सूड उगवावयाचा होता ते काम

९८. खामखा=जरूरीन, कसेही करून.

* हे बापूजी भींवराव कोण ?

९९. निंबाळकर फितूर झाल्याबद्दल त्यास असें म्हटल आहे

१००. जवा बसवून=टाकठीक करून.

प्रकारें लोकांनीं दर्शविलें कीं, यांनीं बेइमानी, दगाबाजी केली. परतु ईश्वर साक्ष आहे. मोठे मोठे मराठे, मोठे कारभारी, यानीं त्याचें घर बुडविलें. नाहक चढीं लाविलें. आम्हांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरावें यामुळें बदीखाने, गड सर्वही प्राप्त त्याचे कर्मानुरूप प्राप्त झालें. असो, एतद्विषयीं विस्तार कशास? परतु आईसाहेबाशीं विरुद्ध वाढलें. आईसाहेबाचे मतें सर्व प्रकारें आम्हांस मोडावें, रामदासपताचे पुतण्यास पेशवाई द्यावी, त्यांनीं आम्हांस बुडवावें, दाभाडे यांणीं त्यास मिळावें, प्रतिनिधीनीं त्यास मिळावें, रघोजीबावांनीं त्यांस मिळावें, ऐसा पूर्ण भाव. पावसाळां हीं राजकारणें परस्परें शफथपूर्वक घाटलीं. परंतु आईसाहेबांस गडावर एके दिवसाचें खावयास नाहींसें जाहलें, याजमुळें बाह्यात्कारें मात्र आम्हांशीं सलूख करून खालीं उतरलीं. आम्हीं विचार केला कीं, केवळ विरुद्धाचा लौकिक आहे तो वारावा. मनांत काहीं तरी त्यांचे असो. जशी आमची क्रिया असेल तसें फळ आम्हांस होईल. जशीं तीं चालतील तसे आम्ही चालू. ऐसा सिद्धांत करून सलूख केला. प्रतिनिधीस प्रतिनिधी करार केली. परतु आंत सर्वांचे मनसबे घांटून तयार जाले. आम्ही पचवीस लक्ष कर्ज मात्र नवें करून फौज नवी पंधरा व जुनी चाळीसैं येणेंप्रमाणें ठेविली. त्या उपर रामदासपंत आले. प्रथम आमची फौज जमा झाली नव्हती. छापी घातला. दुसरें जुंझ उत्तम झालें. त्याजवर

---

१. ताराबाईच्या कारस्थानात गायकवाड सामील झाले म्हणून त्यांस पेशव्यानीं विश्वासघात करून कैद केलें, हा जो आरोप पेशव्यावर आहे त्याचें निराकरण येथें त्यानीं केलें आहे

२ नाहक चढीं लाविलें=( आमच्या विरुद्ध आचरणाची ) फुकट भर दिली

३ कबल काय केलें होतें व फिरले कसे हें येथें स्पष्ट लिहिलें नाहीं दुसरे कोठेही ही गोष्ट लिहिलेली आढळत नाहीं. तथापि गायकवाडाने कांहीं धरसोड केल्यावरून त्यास कैद करणें प्राप्त झालें असा ह्या पत्राचा आशय स्पष्ट दिसतो ग्रां० ड० ह्याजबद्दल कांहीं लिहीत नाहीत तेव्हा त्यास ही गोष्ट माहीत नव्हती असें दिसतें.

४. आई साहेब=ताराबाई.

५. ह्या वरून ताराबाई व दुसरी मडळी मिळून बाळाजी बाजीरावास पदच्युत करण्याचें कारस्थान उभें केलें व त्यांत हैदराबादकरांचा दिवाण जो रामदासपत यासही सामील केलें होतें असें दिसतें. रामदास पत ( राजा रघुनाथराव ) ह्यानीं ताराबाईकडे बोलणें लाविलें होतें व त्याचें पत्र गोविंदराव चिटणीस यांचे हातीं पडलें यावरून ही गुप्त मसलत पेशव्यास कळली, इतकेंच ग्रां० ड० लिहितात. पत्रांत आशय काय तें लिहीत नाहींत पंताच्या पुतण्यास पेशवाई देण्याच्या बेताबद्दलही ते कांहीं बोलत नाहींत

६ दाभाडे, गायकवाड, भोसले, प्रतिनिधी हे सर्व पेशव्यांच्या घराण्याचें वाईट पहाणारेच होते.

७ येथें ' हजार ' ह्या शब्दाचा अध्याहार समजावयाचा.

८ या वेळीं बुसी फराशीस याची पलटणे रामदासपताबरोबर होतीं

सलाबतं बसली. इत्यादिक [ मजकूर ] जगविख्यात व इकडील पत्रावरून तुम्हांस अवगत होत गेले. वारंवार लिहिलें कीं, "लक्षा प्रकारें यावें. वजिराची अब्रू राखिली व आमची गमावली हें कामाचें नाहीं. तुम्ही दौलतेचे स्तंभ, राज्यांत खेळ फार झाले आहेत, खामखा यावें. जे मेहनत तुम्ही वजिराचे कामासाठीं केली ते मेहनत येथें येऊन जलदीनें करतेस तर बहुत लाभ होता. परतु तेथें कामामुळें वै इरेमुळें शह पडला. तुमचें येणें, दोन महिने वाट पाहिली, न जहालें. शेवटीं जानबा, सैद लष्करखान केवळ बजीद जहाले कीं, खामखा सलूख करावा. तेव्हां सलूख केला. त्रिंबक एका महिन्यानें द्यावा ऐसे कबूल केलें. कां कीं, तुम्हास पत्रें गेलीं आहेत, तुम्ही यालच, तुम्ही आलियावर जे तुमचे विचारें होईल तें करावें. व गुजराथचें काम अगदीं बुडतें, खर्चास अगदीं नाहीं, मोंगलांची आग भारी, सरदार कोणी मनापासून अगदी मेहनत न करीत, एक चिरंजीव उभयंतांनीं मात्र खटपट करावी. ऐसे अनेक प्रकार घरांवू जाणून सलूख केला. परतु अतर शुद्ध नाहीं. आम्हाजवळून रघोजी बाबा मोंगलाकडे गेले. मोंगलांनीं त्यांस जाहागीर करार करून क्रिया घेऊन आपलेसे केलें. बापूजी नाईक यांचे कर्नाटक काढून आम्हीं घेतलें. [ ते ] याजमुळें दु:खी. लटकें फटके बोलून आशेस लावून दोन वर्षें आम्हीं वोढिलें. परतु ते या उपर जाणार. आईसाहेबांजवळून कर्नाटक करून घेणार. रामदास पताजवळून नाल बंदीस रुपये घेऊन तिकडे जाणार. ते हे एकत्र होणार. प्रतिनिधी

९. सलावत=जरब, पगडा.

१०. रोहिल्यांस मोडून सफदरजग याचे हेतु सिद्धीस नेले व त्याचा आब राखिला त्यास उद्देशून हें लिहिणें आहे

११. शिंदे होळकर पेशव्यांच्या उपयोगी कसे पडत व पेशवे त्यास कसें जाणत हें यावरून स्पष्ट होईल. "दौलतेचे स्तभ" हा गौरव योग्य असून सेवकाचे बाहु स्फुरविणारा होता यात सशय नाहीं.

१२ 'करतेत' असावें. वरटीप १५ पहा.

१३. ईर=ईर्ष्या, काम करून देऊ असें वचन.

१४. जानबा निंबाळकर सरलष्करखान हा औरंगाबादचा सुभा हा बाळाजी रावास व गाजुदीखानास प्रथम पासून अनुकूळ होता

१५. बजिद होणें=आग्रह करणें, गळीं पडणें.

१६ त्रिबक येथील किल्लापेशव्यानी घेतला होता तो परत नवाबास द्यावा.

१७. बुसी मोंगलाकडे होता त्याचा तोफखाना फार जबर असल्यामुळें थोडया फौजेनें टिकाव लागेना हें एक कारण हीं तह करण्याचीं कारणें लक्षात ठेवण्या जोगीं आहेत.

१८. उभयता चिरजीव म्हणजे दादा व भाऊ हे असावे

१९ घराऊ=घरगुती, स्वपक्षाकडील, आपल्या राज्यातील.

२०. बापूजी नाईक बारामतीकर याजकडे कर्नाटकचा सुभा होता तो त्याजकडून शाहूनें काढून सदाशिवराव भाऊ यास दिला होता यावरून नाईक हे पेशव्याचे नातेवाईक असूनही त्याच्या वाइटावरच होते.

[ काव्येतिहास-संग्रह- ]

१

मल्हार रामराव चिटणीस विरचित

# थोरले शाहू महाराज यांचें चरित्र.

हें

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व अवांतर

माहितीच्या विपुल टीपांसह

काशिनाथ नारायण साने, बी. ए. (डेक्कन कॉलेज)

यांणीं

प्रकाशित केलें.

उद्धृता यवनाः सर्वे राज्यं च ब्रह्मसात्कृतम्.।

चित्तं सुनिहितं साम्बे किं कर्तव्यमतःपरम्.॥

शके १८०९.

श्री.

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परमप्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

[ काव्येतिहास-संग्रह. ]

१०

# श्रीमंत पंत प्रधान यांची शकावली.

ही

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या विपुल टीपांसह

**काशिनाथ नारायण साने, बी. ए. ( डेक्कन कॉलेज )**

यांणीं

**प्रकाशित केली.**

श्रीरामासि भजावें भक्तें ज्यां जेवि तेंवि संतातें ।
राजासि उपासावें तैसेंचि जनें **प्रधान पंतातें** ॥

**मोरोपंत.**

शाके १८०५.

श्री.

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परमप्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

ऋषी सांगती हे बरी शुद्ध वेळा । त्वरें बैस भद्रासनीं तूं नृपाळा ॥
समस्तांसि आनंद राज्याभिषेकें । ऋषी अक्षता टाकिती मंत्रघोषें ॥ १५ ॥
विधीयुक्त भद्रासनीं रामराजा । यथायोग्य संपादिली सांग पूजा ॥
कितीएक पुष्पांजळी वाहताती । सानंद आनंद सूखें पहाती ॥ १६ ॥
असंभाव्य नाना परी दान केलें । बहूतां परी याचकां तोषवीलें ॥
गिरीचे परी शर्करा ढीग-केले । कितेकीं समस्तांसि ते पाठवीले ॥ १७ ॥
नभीं दाटलीं मेघडंब्रें अपारें । कितीएक तीं चामरें थोरथोरें ॥
असंभाव्य हेलावती jरत्नपुच्छें । बहू डोलती उन्मतें शक्र[k] तुच्छें ॥ १८ ॥
सुचित्रें विचित्रें रवीतेजपत्रें । असंभाव्य तीं दाटलीं भव्य छत्रें ॥
विशाळा पताका सतेजें निशाणें । वरी सर्व आच्छादिलें व्योम तेणें ॥ १९ ॥
असंभाव्य ते दाटली भीमसेना । प्रसंगीं विरीं घाव केला निशाणा ॥
महादिव्य सिंहासनीं रामराजा । पहाया भ्रमों लागल्या वीर फौजा ॥ २० ॥
वरी रामराजें गुढी ऊभवीली । गजेबे* सुखें लोकमांदी मिळाली ॥
झडा घालिती राम पाहावयाला । समस्तां मनीं थोर आनंद जाला ॥ २१ ॥
पुरीमाजि तीं वैभवाचीं अचाटें । दुतीळीं तितीळीं उभीं लोक-थाटें ॥
खुणा दाविती सांगती येकमेकां । बहूवीध तो राम वेधी अनेकां ॥ २२ ॥
दमामे धमामे दडाडां धडाडां । बहू वाजती चंड भेरी भडाडां ॥
तुतारे नगारे बहू शंख शृंगें । किती चौघडे ढोल कर्णे मुरंगें ॥ २३ ॥
तुरें गंभिरे ती बहू गर्जताती । कितीएक पांवे मुखीं घोष वाती ॥
नफेऱ्या बहू दुंदुभी घोष जाला । असंभाव्य तो वाद्यमेळा मिळाला ॥ २४ ॥
कितीएक ते चौघडे वाजताती । कितीएक ते बागडे नाचताती ॥
कितीएक ते मागुते मेळ आले । कितीएक ते वेषधारी मिळाले ॥ २५ ॥
कितीएक येके कळावंत गाती । हरीदास ते कीर्तनीं गर्जताती ॥
कितेकी गुणी नाचणी नृत्यरंगें । अलापें कळा रागरंगें तरंगें ॥ २६ ॥
कितीएक वाखाणिती भाट ब्रीदें । कितीयेक ते छंद नाना विनोदें ॥
दिंडीगान ते मांडिले वासुदेवीं । बहू कीर्तन्या लाधले लोक जीवीं ॥ २७ ॥
कितीएक ते भेरवाचे मिळाले । कमाचे कितीयक घेऊनि आले ॥
कितीएक ते नाचताती थबाबां । सुखें डोलती वाजवीती खबाबा ॥ २८ ॥
कितीएक ते गारुडी नाचताती । गळे फूगले धागऱ्या लोळ घेती ॥
कितीएक ते लोक नाना गुणांचे । ब्रिदें अंकुशें लाविले भार कुंचे ॥ २९ ॥

---

५४. भद्रासन=सिंहासन j रत्नपुच्छें-मत्स्य पुच्छें k शक्र-शुक्र ५५. * गजेबे=गजबजे. दुताळी=दुमजल्यावर. ५६. तिताळी=तिमजल्यावर ५७. नाचणी=नाचणाऱ्या स्त्रिया.

कितीएक ते भोंवती भेद नाना । भ्रमों लागले पाय भूमी स्थिरेना ॥
कितीएक ते टीपऱ्या खेळताती । मिळाले समेळे बहू वाजताती ॥ ३० ॥
घनें सुस्वरे नाद कल्होळ जाला । बहूता परीचा बहू लोक आला ॥
महद्भूत ते मांजली रंग-वेळा । दणाणी मही नाद गेला भुगोळा ॥ ३१ ॥
निशी प्राप्त जाली असंभाव्य दाटी । बहू दीवट्या लक्ष कोट्यानुकोटी ॥
कितीएक ते उंच नेले उमाळे । नळे जाळिता घोष तैसे उफाळे ॥ ३२ ॥
सरारा फुलें धांवती अंतराळीं । कडाडीत घोषें निराळीं निराळीं ॥
भुरारा हवाया कितीएक वेळां । बळें पाहती उर्ध्व नक्षत्रमाळा ॥ ३३ ॥
बहू औषधे दिव्य नाना परीचीं । कितीएक तेजाळ तीं कूसरीचीं ॥
घडीनें घडी तेजपुंजाळ होती । उजेडें च्चि ते लोक लोकां पहाती ॥ ३४ ॥
पुढें ऊठिला राम तो ते प्रसंगीं । प्रभू चालिला भूवनामाजि वेगीं ॥
समस्तांसि आरोगणा सांग केली । विडे कर्पुरें घेतले तृप्ति जाली ॥ ३५ ॥
गृहें दीधली रम्य दिव्यावरांचीं । दळें स्वस्थ जालीं रिसांवांनरांचीं ॥
कपी वीर राक्षेस सूखे निघाले । सुषुप्तीचियो भूवनामाजि गेले ॥ ३६ ॥
सुवर्णाच्चिया मंचकीं मृदु शय्या । वरी सूमनें सेज त्या देवराया ॥
सभामंडपीं ते निशी अर्ध गेली । प्रभूनें यथासांग विश्रांति केली ॥ ३७ ॥
निजेले ऋषी राव तो बंधु माता । यथायोग्य विश्रांति जाली समस्तां ॥
कितीएक त्या वीरफौजा समस्ती । असंभाव्य तो वाद्यकल्लोळ वस्ती ॥ ३८ ॥
प्रभातींचि ऊठोनिया नित्य नेमे । किजे स्नानसंध्यादिकें सांग कर्मे ॥
किती एक दानें कितीकां परीचीं । धनें कांचनें भव्य नाना परीचीं ॥ ३९ ॥
अळंकार मुक्ताफळें मुक्तमाळा । कितीएक दिव्यांबरें रत्नमाळा ॥
कितीएक धोत्रें कितीएक पात्रे । दिलीं ब्राह्मणा दान राजीवनेत्रें ॥ ४० ॥
कितीएक कोट्यावधी गोधनाचीं । कितीएक लक्षावधी कुंजरांचीं ॥
बळाचे बहू अश्व ते पारखीले । धनेंशी द्विजां ब्राह्मणां दान केले ॥ ४१ ॥
ऋषी बांधवीं सारिलीं स्नानदानें । यथायोग्य उंचासनें स्थान मानें ॥
सभेमाजि तो बैसला राम राजा । निघाल्या कपी रीस राक्षेस फौजा ॥ ४२ ॥
कपीनाथ तो अंगदु जांबुवंतू । कुमूदू गजू वीनतू वीर्यवंतू ॥
महावीर लंकापती मारुती तो । सुभूखू द्विवीदू कपी केसरी तो ॥ ४३ ॥
प्रमाथी गवायू निळू हेमकूटू । सुषेणू नळू मैंद मोठा अचाटू ॥
कपी क्रोधनू ऋषभू आणि शर्भू । गवाक्षू दधीमूख स्वेदू शराभू ॥ ४४ ॥
कपी रीस राक्षेस कोट्यानुकोटी । असंभाव्य ते चालिले रामभेटी ॥

५८ हवाया=चंद्रजोती. ५९. सुषुप्ति-झोंप.

समस्तीं प्रभूला नमस्कार केले । पुढें सर्व ही हात जोडूनि ठेले ॥ ४५ ॥
समस्ती शिरीं रामगूणागराला । बहू प्रार्थिले त्या दयासागराला ॥
समस्तासि देवें निरोपासि द्यावें । म्हणे राम तो शीघ्र जेऊनि जावें ॥ ४६ ॥
नमस्कार केले तया विश्ववद्या । पुढे शीघ्र संपादिली स्नानसंध्या ॥
असंभाव्य तीं दिव्य अन्ने सुवासें । बहू पंगती घातल्या सावकाशें ॥ ४७ ॥
ऋषी राम ते सर्व ही बंधुवर्गीं । कितीयेक ते बैसले आप्तवर्गीं ॥
प्रभा फांकली दिव्य रत्नीं अनर्घी । कपी रीस ते बैसले जेवि स्वर्गीं ॥ ४८ ॥
हरी[60] ऋक्ष[61] राक्षेस सर्वे मिळाले । असंभाव्य ते भोजना लागि आले ॥
बहू पाकनिष्पत्ति नानापरीची । पक्वान्नें रसाळें कळाकूसरीचीं ॥ ४९ ॥
जगज्जननी जानकी वाढिताहे । सुवासें महासौख्य तें होत आहे ॥
यथासाग संपूर्ण तें अन्न जालें । पुढे शीघ्र तें शर्करा आज्य आलें ॥ ५० ॥
पयादीक नाना रसें पूर्ण पात्रें । त्वरें घेतले ग्रास राजीवनेत्रें ॥
समस्तासि आज्ञापिलें देवधीशें । कपी सर्व ही गर्जती नामघोषें ॥ ५१ ॥
तयां जेविता जेविता भक्ष्य जालें । पुन्हा मागुती खाद्य ऊदंड आलें ॥
घृतें वाढितां वाढितां वोघ गेले । असंभाव्य नाना परी तृप्त केले ॥ ५२ ॥
अपेक्षी तया मागती सर्व शाका । कितीएक ते आणवीती कथीका[62] ॥
क्षिरी लोणचीं रायतीं भात भक्षे । खुणा दाविती मागती एक लक्षें ॥ ५३ ॥
जळें शीतळें सर्व ही सेविताती । पुन्हा मागुते वार ते जेविताती ॥
समस्तासि तीं साग संपूर्ण जाली । पुढें शीघ्र दध्योदनें आणवीलीं ॥ ५४ ॥
बहू जेविता जेवितां येक मध्ये । प्रतापें मुखें बोलती श्लोक गद्यें ॥
मनीं भासती अर्थ नाना परीचे । मुखें रामनामें महद् घोष वाचे ॥ ५५ ॥
समस्तांसि तें सर्व संपूर्ण जालें । महातृप्तिनें लोक सूखें निवाले ॥
वरी आचमनें शुद्ध केलीं खळाळां । कितीएक ते तोय घेती घळाळां ॥ ५६ ॥
सभामंडपीं सर्व ही स्वस्थ जाले । सुगंधी विडे शीघ्र ते आणवीले ॥
समस्तांसि संपूर्ण गंधे सुवासे । कपी पूजिले सर्व नाना विलासें ॥ ५७ ॥
समस्ती विडे घेतले पीत पर्णे[63] । सुपारी बरी कर्पुरू मुक्तचूर्णे[64] ॥
बहू वेळे[65] लौंगा सुवासे खैरीरें[66] । किती जाति[67] कंकोळ नाना प्रकारें ॥ ५८ ॥
अळंकार चीरें बहू सिद्ध केली । असंभाव्य दिव्यांबरें आणवीलीं ॥
बहू भूषणाचे बहू ढीग केले । जगज्जनके ते कपी गौरवीले ॥ ५९ ॥

---

६०. हरी=वानर ६१ ऋक्ष=अस्वल ६२. कथिका=कढी ६३ पीत पर्णें=पिकलेली विड्याची पानें ६४ मुक्त चूर्ण=मोत्याचा चुना ६५. वेळ=वेलदोडे (स०. एला०.). ६६. खदीर=कात. ६७. जाति=जायफळ

तुरे लाविले घातल्या पुष्पमाळा । कितीएक त्या रत्नमाळा सुढाळा ॥
करीं कंकणें मुद्रिका लेववील्या । यथासांग सर्वांस संपूर्ण केल्या ॥ ६० ॥
सभामंडपीं फांकल्या रत्नकीळा । समस्तांसि ते जाह्ली सौख्यवेळा ॥
कितीयेक सांगीतल्या गुप्त गोष्टी । माहावीर आनंदले सर्व पोटीं ॥ ६१ ॥
स्तुतीउत्तरीं सर्व लावण्यखाणी । मुखें बोलिला राम कारुण्यवाणी ॥
तुम्हीं कष्ट केले जिवीं सर्व भावें । तुम्हालागिं म्या काय उत्तीर्ण व्हावें ॥ ६२ ॥
कपी सुग्रिवा अंगदा जांबुवंता । गजा मारुता आणि नैऋत्यनाथा ॥
समस्तांसि सन्मानिलें रामचंद्रें । सुधाउत्तरीं तोषवीलें नरेंद्रें ॥ ६३ ॥
मुखें बोलिले वैद्यराजासि देवें । कपी तूज उचीत म्यां काय द्यावें ॥
वरू दीधला रामचंद्रें उचीती । तुझ्या दर्शनें लोक आरोग्य होती ॥ ६४ ॥
समस्तां कडे पाहिलें राघवानें । तयां सर्व रोमांच आले फुराणें ॥
नमस्कारिलें स्वामि देवाधिदेवा । ह्मणे राम तो लोभ आतां असावा ॥ ६५ ॥
असभाव्य केली स्तुती राघवाची । वदों लागली मंडळी प्रेमळाची ॥
कपी बोलती सर्व कारुण्य वाचा । स्तुती ऐकतो राम सिंधू सुखाचा ॥ ६६ ॥
गिरी कंदरा माजि आह्मीं असावें । नरा देखतां वानरीं शीघ्र जावें ॥
समर्थें सवे लाविली मर्कटांला । महा सुकृतें पार नाहीं सुखाला ॥ ६७ ॥
प्रभू बोलणें चालणें काय जाणें । बरें वोखटें सर्व कांहींच नेणें ॥
बहूतां परी चालवीलें दयाळें । तुम्हां योग्य हें आमुचें तोंड काळें ॥ ६८ ॥
कृपाळूपणें राघवें थोर केलें । बरें वोखटें सर्व साहून नेलें ॥
बहू देखिलें सौख्य नाना परीचें । प्रभूच्या पदालागिं हें प्राप्त कैचें ॥ ६९ ॥
सभाग्याचिया संगतीनें असावें । बहूता परीचें बहू सौख्य द्यावें ॥
तया सारिखें सर्व आम्हांसि जालें । महा वैभवें चित्त सूखें निवालें ॥ ७० ॥
नव्हे भेटि नाना परी योगयागें । नव्हे भेटि नाना परी भोग त्यागें ॥
नव्हे भेटि ब्रह्मादिकां शीघ्र काळें । त्रिकूटाचळीं दाखवीलें भुपाळें ॥ ७१ ॥
कपी रीस ते बोलती दैन्यवाणें । कृपासागरू जीविंचा भाव जाणें ॥
तयांच्या शिरीं देव तो शींणताहे । बहूतां परी राम सबोखिताहे ॥ ७२ ॥
सवे लागली राघवाची सुटेना । प्रिती गुतली तोडितां ही तुटेना ॥
बहू दीस गेले सुखाचेनि योगें । अकस्मात तें दुःख जालें वियोगें ॥ ७३ ॥
प्रभू संगतीची सवे दृढ केली । अकस्मात कां सर्व छेदूनि नेली ॥
तया बोलता जाह्ला रावणारी । तुम्हा भेटि देईन कृष्णावतारीं ॥ ७४ ॥

---

६८ मुद्रिका=आंगठ्या ६१. उत्तीर्ण=उतराई ७० वैद्यराज=सुषेण नामक वैद्य ७१ सवे=सवय.

दयाळासि तींहीं नमस्कार केले । प्रभू सख्य घालूनि तैसे निघाले ॥
समर्थी समस्तासि वदूनि वेगीं । पुढें नीघते जहाले ते प्रसंगीं ॥ ७५ ॥
मने बीकले भक्तपाळें भुपाळें । मनामाजि ते खंति केली दयाळें ॥
जनीं सेवकांलागिं देखोनि ऊणें । बहू कष्ट घेऊनियां सौख्य देणें ॥ ७६ ॥
मनीं भावना भक्तलोकासि जैशी । तया सारिखी देवरायासि तैशी ॥
जनीं सेवका कारणें जन्म घेणे । महद्भाग्य साडोनिया नीच होणें ॥ ७७ ॥
पडे सांकडें सर्वदा सेवकाचें । दिनानाथ हें ब्रीद विख्यात साचे ॥
मनामाजि ते जैशिजैशी अपेक्षा । करीना कदा राम त्याची उपेक्षा ॥ ७८ ॥
असभाव्य अन्याय तो आठवीना । बहू चूकतां देव कांहीं शिणेना ॥
तया मानसीं लागली प्रेम माया । करी सेवकांलागिं नाना उपाया ॥ ७९ ॥
सदा सर्वदा देव हा साभिमानी । कृपा भाकितां शीघ्र पावे निदानीं ॥
तया अंतरीं थोर लाहान नाहीं । परी पाविजे दृढ भावार्थ कांहीं ॥ ८० ॥
तया अंतरीं भाव होईल जैसा । तयालागिं तो देव पावेल तैसा ॥
यदर्थी कदा संशयो ही असेना । अभावें तरी देव तो पालटेना ॥ ८१ ॥
किती एक अन्याय कोटयानुकोटी । श्रमे दोष नानापरी बुद्धि खोटी ॥
परी पहातां लोभ त्याचा सरेना । कृपासागरू तो कदा वोसरेना ॥ ८२ ॥
कृपाळूपणें देव राजादि राजे । शिरीं वाहिजे सर्व ही भक्तवोझें ॥
जनीं दास देखोनियां दैन्यवाणा । मनामाजि वोसावतो देवराणा ॥ ८३ ॥
बहूसाल हें बोलणें काय कीती । स्वयें जाणिजे ज्या असे स्वप्रचीती ॥
अयोध्यापुरीमाजि तो रामराजा । कृपाळू सुखें राहिला भक्तकाजा ॥ ८४ ॥
कपी रीस गेले स्थळे जेथजेथें । प्रितीं मारुती राहिला राम तेथें ॥
रघूनाथ सीता तया बंधुवर्गी । उभे राहिजे सेवकें पूर्वभागीं ॥ ८५ ॥
समस्तासि पूजूनि नाना विलासें । नमस्कारिले सर्व दासानुदासें ॥
उदासीन श्रोतीं कदा ही न कीजे । बहू भेद भाषा क्षमा सर्व कीजे ॥ ८६ ॥
मनामाजि ऊपासना रामध्यानीं । जनीं दासतो नीववी ब्रह्मज्ञानी ॥
अखंडीत त्या राघवाच्या प्रतापें । विवेकें विचारें समाधान सोपें ॥ ८७ ॥
पदीं लागता निर्गुणी भक्त जाले । बहू सगनीसंग होऊनि गेले ॥
विवेकें बरें पहाता ध्येय ध्याता । विचारें बरें शोधिता ज्ञेय ज्ञाता ॥ ८८ ॥
विवचूनि तो साधकू साध्य जाला । असभाव्य तो ब्रह्मबोधें बुडाला ॥
पुसावें कळेना तरी सज्जनाला । धरूनी त्यजावें विदेही पणाला ॥ ८९ ॥
असे हे जनीं प्राप्त तेणे धरावें । अनिर्वाच्य तें वाच्य कैसे वदावें ॥
सदा नित्य नीरूपणीं वीवरावें । नुरावें परी कीर्तिरूपे उरावें ॥ ९० ॥

असो जाणत्याला कळे सर्व कांहीं । जनीं नेणता त्यासि कांहींच नाहीं ॥
नसे ज्ञान त्या सर्व ही व्यर्थ गेलें । जळो पंच मौक्तीक हे काय जालें ॥ ९१ ॥
असो ही कथा बोलिली राघवाची । जनीं सर्वदा ऐकती धन्य त्याची ॥
सुखे ऐकतां ते महा दोष जाती । दुखें नाशती लोक ते धन्य होती ॥ ९२ ॥
चरित्रें बरीं उत्तमें राघवाचीं । असंभाव्य विस्तारलीं पावनाचीं ॥
कितीएक ते पाहती कोटि होती । जनीं एक एकाक्षरें दोष जाती ॥ ९३ ॥
शताचीं शतें पूर्ण आरंभ संधीं । कळाया कथा हेतु संकेत सिद्धि ॥
पुढें बोलिले तें बरे वीवरावें । बुजायास हें गद्य पोटीं धरावें ॥ ९४ ॥
मुळारंभ ते स्तूति नाना परीची । गिरी वर्णिला जाहली सागराची ॥
पहीले शतीं भेटि बीभीषणाची । पुढें शेवटीं शेज दर्भासनाची ॥ ९५ ॥
द्वितीयीं शतीं राम क्रोधासि आला । कथेलागिं तेथूनि आरंभ झाला ॥
बळें सिंधु पालाणिला शूक गेला । अपेक्षा मनी शृंग पहावयाला ॥ ९६ ॥
तृतियीं शतीं शृंग पाहों निघाले । रिपूलागिं तो शिष्ट जावूनि बोले ।
बहू वीर राक्षेस युद्धीं निमाले । कपी सर्वही नागपाशीं निजेले ॥ ९७ ॥
रणें दाखवीलीं तयें जानकीला । तये वीरशीं तो* प्रहस्तू निमाला ॥
प्रसंगें चि मंदोदरी नीति सांगे । निघाला दशग्रीव तो लागवेगें ॥ ९८ ॥
चतुर्थीं शतीं युद्ध त्या रावणानें । रघूनायकें सोडिला जीवदानें ॥
पुढें कुंभकर्णासि संहार केला । समूदाय तो कूमरांचा निमाला ॥ ९९ ॥
कितीएक ते वीर माहोदरेशीं । प्रतापें रणामाजि ते प्रेतराशी ॥
पुढे इंद्रजीतें कपी भग्न केले । महावीर ते बाणजाळीं निमाले ॥ १०० ॥
शता पंचमा लागिं आरंभ जाला । कपी वीर द्रोणाचळालागिं गेला ॥
महावीर ते ऊठले स्वस्थजाले । त्रिकूटाचळू सर्व जाळूं निघाले ॥ १०१ ॥
कपी क्षोभले काळ युद्धा निघाले । कितीएक राक्षेस युद्धीं निमाले ॥
नभींहूनि तो रावंगी७२ वीर आला । समस्तांसि भेदूनिया शीघ्र गेला ॥ १०२ ॥
सहावें शतीं रावणू दुःख सांगे । त्रिकूटाचळीं रावंगी७२ लागवेगें ॥
पुन्हा इंद्रजीतू रणामाजि आला । विरी वानरीं होम तो भग्न केला ॥ १०३ ॥
शतीं सातवे त्या विरें इंद्रजीतें । असंभाव्य केलीं रणामाजि प्रेतें ॥
सुमित्रासुतें मारिला बाणघातें । यथासांग तो वन्हि सूलोचनेतें ॥ १०४ ॥
शतीं आठवे वीर घायाळ जाले । कितीएक राक्षेस युद्धीं निमाले ॥
सुमित्रासुता रावणें घात केला । गिरी द्रोण आणूनियां स्वस्थ जाला ॥ १०५ ॥
नवामाजि रामासि सौमित्र सांगे । बळें भंगिला होम तो लागवेगें ॥

---

* 'तृतीय विरशीं' पा० भे०, ७२ रावगी—इंद्रजित

रघूनायकें घोर संग्राम केला । रणामाजि तो मुख्य शत्रू निमाला ॥ १०६ ॥
दहावे शतीं शोक अंतःपुराचा । प्रसंगें महोत्साव बीभीषणाचा ॥
रघूनायकें जानकी आणवीली । समस्तां सुरा राघवा भेटि जाली ॥ १०७ ॥
शतीं ऐक एकादशीं राघवाची । असंभाव्य ते स्तूति ब्रह्मादिकाची ॥
महापुष्पकारूढ होऊनि गेले । पुढे भ्रातया भेटले स्वस्थ जाले ॥ १०८ ॥
पुढें द्वादशीं मंदिरें त्या विरांचीं । यथायोग्य मानें समस्तां जणाची ॥
पुजा भोजनें सांग सर्वांसि जालीं । पुरी वर्णितां मानसें तीं निवालीं ॥ १०९ ॥
शती अंष्टपचीं पुरीमाजि गेले । रघूराज भद्रासनीं बैसवीले ॥
महोत्साव उत्साव नाना परीचा । समूदाय तो बोळवीला कपींचा ॥ ११० ॥
करी राज्य तो राम नाना विलासी । जनामाजि ऊपासना रामदासी ॥
यथासांग तेरा शतें श्लोक जाले । गुणी ऐकतां सर्व सूखें निवाले* ॥ १११ ॥

॥ इति श्री रामदासकृत श्लोकबद्ध युद्धकांड संपूर्ण ॥

---

७३. अष्टपचीं शतीं=तेराव्या शतकात.

* १ बालकांड, २ अयोध्याकांड, ३ अरण्यकांड, ४ किष्किंधाकांड, ५ सुंदरकांड, ६ युद्धकांड, ७ व उत्तरकांड ह्या सप्तकांडांतील आम्हांस मिळालेल्या तीन कांडांपैकीं दोन कांडे आज संपलीं. राहिलेल्या किष्किंधाकांडास प्रारंभ १०५ पृष्ठावर करूं. सर्व रामायण स्वामींनीं रचिलें असावें असें महिपतीच्या पुढील लेखावरून दिसतें--

गुरू-गीता आणि पंचकरण । मनाचे श्लोक संपूर्ण ॥
श्लोकबद्ध रामायण । रायें लिहून घेतले ॥ ९८ ॥
संतविजय-अ० १४वा.

ह्यास्तव आमच्या शोधक मित्रांहीं बाकीचीं चार कांडें मिळवून आमच्याकडे पाठविण्याची तसदी घ्यावी म्हणजे स्वामींची आणखी सेवा आमचे हातून होईल. महिपतीच्या पुढील लेखावरून स्वामींनीं हनुमतरामायणही प्राकृतात केलें होतें असें वाटतें:--

हनुमताचें काव्य जाण । केलें नाटक रामायण ॥
तें सकळ मुखोद्गत पुराण । मारूती आपण गातसे ॥ ९७ ॥
मारूती-मुखीचें चरित्र नित्य । तें रामदास श्रवण करीत ॥
त्याचे श्लोक करूनि प्राकृत । कीर्तनीं गात निज प्रेमें ॥ ९९ ॥
संतविजय-अध्याय २रा

ह्या मतास बळकटी येण्याचें असें कारण आहे कीं, जी कांडें आम्हीं प्रसिद्ध

केलीं आहेत तीं वाल्मिकीमुनीच्या आधारें लिहिलीं आहेत असा उल्लेख आलेला लक्ष्यपूर्वक वाचणाराच्या ध्यानीं असेलच. उदाहरणार्थ युद्धकांडाचा प्रसंग ६ श्लोक १०६ व किष्किंधा कांडाचा पांचवा श्लोक पहा. ह्या खेरीज ज्या रामदासी ग्रथांचीं नांवें आम्हांस कळलीं आहेत व जे अद्याप छापले नाहींत त्यांचीं नांवें एथें देतों म्हणजे शोधकांस शोध करण्यास बरें पडेल:—

१ अंतर्भाव ( ओवीबद्ध ) आत्माराम ( कित्ता ) ३ एकवीस समासी ( कित्ता ) ४ गोसावी. ( कित्ता ) ५ जुनाट पुरुष. ( कित्ता ). ६ पंचसमासी. ७ सगुण-ध्यान. ८ सप्तसमासी. महिपतीसारखे भाविक चरित्रकार चरित्रनायकांच्या कालाचा फारसा निर्देश करीत नाहींत तरी प्रसंगविशेषीं तेही ती माहिती देतात असें पुढील लेखावरून दिसतें:—

शके सोळाशें तीन निश्चिती । संवत्सरासी नाम दुर्मति ॥
समर्थ तनू त्यागूनि प्रीति । समरस होती श्रीरामीं ॥ ९५ ॥
माघवद्य नवमीस । निर्गुण झाले रामदास ॥ ११४ ॥

संतविजय–अध्याय २५वा.

श्रीरामदासकृत

# किष्किंधा*कांड प्रारंभ.

गणेशा ईशा हा परेशा उदारा । सुरेशा नरेशा सदा सौख्यकारा ॥
मनीं चिंतितां कामना पूरताती । असे सत्य नेमस्त माझी प्रचीती ॥ १ ॥
नमो शारदा सर्व संगीत मूर्ति । महा हंस-लीला कळा सर्व कर्ती ॥
जयाला दया देतसे स्फूर्ति फुटे । बहु घोर संसारिचें मूळ तुटे ॥ २ ॥
नमो साधुसंतां महंतां महंतां । सदा निश्चयो वीतरागी पतंता ॥
भवीं बूडतां दीन तात्काळ काढी । तया वर्णवेना मला बुद्धि थोडी ॥ ३
अनिर्वाच्य वाचेसि कैसें वदावें । अतर्क्यासि तर्कें कसें आकळावें ॥
अवीनाश कोंदाटलें सर्व ठायीं । मुढा ज्ञान होतां चि त्या स्वामिपायीं ॥ ४
नमो रामराया कथा रंग राया । बहू वर्णितां स्फूर्ति दे देवराया ॥
मुनी-काव्य हें भव्य-शोकापहारी । हरा मानसीं व्यास हा सौख्यकारी ॥ ५
चरित्रे रघूनाथजीचीं अपारें । मनोरम्य विस्तारलीं सौख्यकारें ॥
तयामाजि तू येक येकाक्षरासी । वदें पार नाहीं तया सुकृतासी ॥ ६ ॥
जगनाथ हा राम कैवल्य-दाता । घडे वीघडे सर्व याचीच सत्ता ॥
जनाचे मनीं हीत तें हेतु जाणें । परी वर्तवीतो भवीं थोर मानें ॥ ७ ॥
रघूनाथ लक्ष्मण आणि सीता । वनीं वास तीघांस निःशेष होता ॥
पुढें जानकी चोरिली रावणानें । बहू शोक केला रघूनायकानें ॥ ८ ॥
वनीं राम-लक्ष्मण हिंडताती । सिता रावणें चोरिली धुंडिताती ॥
अकस्मात तेव्हां सुचे राघवासी । विचार ह्मणे आदरें सुमित्रासी ॥ ९ ॥
ऋषीमूख माहागिरी पैल पाहे । कपीराज नीळांगि तेथें चि आहे ॥
कदाचीत त्या पूस आसेल ठाव । सुमित्रा तयालागिं वार्तू पुसावे ॥ १० ॥
चलावें समर्था ह्मणे ब्रह्मचारी । महावीर जाताति ते पंथहारी ॥
बहू झाड-खंडे प्रचंडे उदंडें । अखंडे अखंडें चि बंडें उदंडें ॥ ११ ॥
बहू घोर झाडी तयामाजि आले । त्वरे सर्व लघूनि पपांसि गेले ॥
तरू सुंदरू रम्य छाया बसाया । ह्मणे शेष याते चि या देवराया ॥ १२ ॥

---

* किष्किंधा जेथें होती तेथें हल्लीं अनागोंदी शहर आहे. हें तुंगभद्रेच्या कांठीं आहे.
१. प्रचीती (सं. प्रतीती)=अनुभव. २. वीतरागी=सोडिला आहे संसार ज्यांनीं असे.
३. अनिर्वाच्य=अवर्णनीय. ४. मुनीकाव्य=वाल्मिकी मुनीनें रचिलेलें रामायण. ५. कैवल्य=मोक्ष. ६. ऋषीमूख=हें एका पर्वताचें नांव. याचें शुद्ध संस्कृत रूप ऋष्यमूक असें आहे. ७. वार्तु=बातमी. ८. पपा=एका सरोवराचें नांव. ९. शेष=शेषाचा अवतार लक्ष्मण.

सुकूमार पायीं कदाही न चाले । बहू हिंडतां हिंडतां कष्ट जाले ॥
अशा कारणे राम पयीं निजेले । अकस्मात ते सुग्रिवें देखियेले ॥ १३ ॥
रूपें योगधारी मना सौख्यकारी । महावीर हा कोण कामा-धिकारी ॥
मनीं वाटतें वाळिनें धाडिले हे । भयाभीत होऊनि चक्कीत पाहे ॥ १४ ॥
हनूमंत बोले तया सुग्रिवासी । नव्हे हो तसे साक्ष येते मनासी ॥
कळेना लिळा दीसती सौख्यवासी । असें वाटतें साह्य आले तुह्मासी ॥ १५ ॥
तैं सुग्रीव बोले तरी जाय आतां । मनातील घेऊनिया बुद्धि आतां ॥
तया धाडिलें राम सौमित्र जेथे । स्वयें चालिला शीघ्र तो दूरि पथें ॥ १६ ॥
हनूमत दूरूनि येऊनि पाहे । सुमित्रासुतू सिद्ध तो बैसला हे ॥
रघूराय माडीवरी सौख्यकारी । पुढें बोलता जाहला तो वनारी ॥ १७ ॥
रूपें योग मूर्ति धनुर्बाण हातीं । वयें बाळलीला फिरा कां दिगतीं ॥
पुढें कोठ पर्यंत जाणे तुह्मांसी । अहा कोण ऐसे वदा निश्चयेशीं ॥ १८ ॥
कपी कोण तू पूससी कासयारे । मला सांग साकल्य तूं सर्व सारें ॥
प्रसंगीं फणी बोलतो तो स्वभावें । प्रितीं मारूती जाणवी सर्व भावें ॥ १९ ॥
प्रभू अंजनी माय या बा कपीची । पिता तत्वता वायु माझा तमाचो ॥
पुसाया तुम्हां सुग्रिवें पाठवीलें । समर्थाप्रती सर्व त्यां जाणवीलें ॥ २० ॥
प्रतीउत्तरें बोलता शेष जाला । कपी ऐक रे सागतों सर्व तूला ॥
जनीं सूर्य-वंशीं नृपाधीक राजे । बहू कीर्तिचा घोष अद्भूत गाजे ॥ २१ ॥
तयावंशिचे दोन हे बधु पाहें । रघूनाथ लक्ष्मूमणू नाव आहे ॥
पिता धाडिता जाहला त्यां वनासी । निघालों जनीं पंथि या सौख्यरासी ॥ २२ ॥
सदा सर्वदा संतसेवा घडावी । अखंडीत वृत्ती पदीं या जडावी ॥
सवें चालिलों आवडी राम जातां । जगन्माय ही जानकी विश्वमाता ॥ २३ ॥
वनीं वास तीघांस कीतेक काळीं । सिता रावणे चोरिली भूमिबाळी ॥
तये कारणें धुडितों लागवेगें । किती फीरतों शुद्धि कोठें न लागे ॥ २४ ॥
महावीर तुम्हीं धनुर्बाणधारी । करूं दीधली रावणा केंवि चोरी ॥
तया लागि तो शेष साकल्य बोले । न चाले चि येऊनि कापट्य केलें ॥ २५ ॥
सुवर्णाचिया त्या मृगालागि तेणें । चरायासि तैं धाडिलें रावणानें ॥
जगन्माय ती बोलली राघवासी । दिजे कंचुकी स्वामिनें आपणांसी ॥ २६ ॥
उठे शीघ्र धांवे मृगाच्याच पाठी । शरें मारि त्या राम कंदर्प-कोटी ॥
अकस्मात जाला ध्वनी घोष तेथें । मला धाडि श्री जानकी त्याच पथें ॥ २७ ॥

---

१० कामा-धिकारी=मदनाला धि कार करणारा म्हणजे अति रूपवान्. ११ वनारी=मारुती. १२. फणी=लक्ष्मण. १३. शुद्धि=शोध.

महाघोर गुंफा तये माजि सीता । त्वरें भोंवतीं घातली रेघ जातां ॥
पुढे रावणें याचकी वेष केला । तिथें भीक मागावया शीघ्र आला ॥ २८ ॥
न चाले चि कांहीं पुढे जाववेना । तया जानकीतें कदा नेववेना ॥
करूणास्वरें उत्तरें फार बोले । दयें घालितां भीक तत्काळ नेलें ॥ २९ ॥
मृगा मारिलें राघवें बाण-घातें । गुहा माजि येतां न देखे सितेतें ॥
जरी भेटता रावणू पापरूपी । नसे प्राप्ति ब्रह्मादिकां गोष्टि सोपी ॥ ३० ॥
महा विक्रमू राघवाचा कळेना । रणामाजि हो ठाण ज्याचें चळेना ॥
पुरूषार्थ सांगीतला सर्व कांहीं । वदे मागुती देखिलें त्यासि नाहीं ॥ ३१ ॥
जयें सर्व क्षेत्रास निर्धूत केलें । धरत्रीवरी नाव तें ही न चाले ॥
तया भार्गवा राघवें जिंकियेलें । कळेना तुला नेणसी तूं कपी रे ॥ ३२ ॥
हनूमत वीचारितो अंतरेंसीं । वयें बाळ लीला वदे विक्रमासी ॥
तरी यावरी वृक्ष घालूनि पाहूं । असे भाउनी झेलिला ऊर्ध्व बाहू ॥ ३३ ॥
बहू थोर झाडें झुबाडें चि खोडें । कपी मोडता जाहला तें कडाडें ॥
अकस्मात टाकी रघूनाथ जेथें । शरें शीघ्र वारी सुमित्रू तयांतें ॥ ३४ ॥
कपी मागुता मागुता थोरथोरें । बळें वृक्ष घेऊनियां भूभुकारें ॥
वरी टाकितां शेष वारी तयांतें । विचारी मनीं काय कीजे अशातें ॥ ३५ ॥
रघूनायकाला बहू झोंप आली । कपी मागुता मागुता वृक्ष घाली ॥
मया हालतां बोलता चालता ही । करी प्रेत्न नाना न चाले चि कांहीं ॥ ३६ ॥
खुणावी दटावी तयातें उठावी । पुढें मागुता वृक्ष पुन्हा उठावी ॥
धबाबां बहूसाल पाषाण टाकी । वरीच्यावरी वीर बाणें चि झोंकी ॥ ३७ ॥
बहू वृक्षपाषाण नाना परीचे । कडे टाकिले मोठमोठे गिरीचे ॥
परी अल्प रामावरी येउ देना । महावीर हा शेष लक्षीं चुकेना ॥ ३८ ॥
बहू वारितां वारितां ढीग जाले । गिरीचेपरी दूर होऊनि ठेले ॥
मनामाजि चक्कीत जाला वनारी । पुरावा करी तीतुका ही निवारी ॥ ३९ ॥
बहू घोष वीशेष कित्येक केले । कडाडा तरू मोडिले चूर केले ॥
न चाले कपीचे नसे वृक्ष माथा । नसे तूळणा तूळितां त्या समर्था ॥ ४० ॥
बहूसाल म्यां मानसीं गर्व केला । भला वीर सौमित्र तो देखियेला ॥
पहा एक तो धाकुटा वीर्य-सिंधू । प्रभू राम निद्रिस्त हा दीन बंधू ॥ ४१ ॥
कपी हीं उगा बैसला स्थीर राहे । महा वीर लक्षूमणू त्यासि पाहे ॥
दिनोद्धारणें सांग विश्रांति केली । प्रसंगीं उठाया तया वेळ आली ॥ ४२ ॥
रघूनायका लागिं जागर्ति जाली । कपी वृक्ष-माथ्यावरी दृष्टि गेली ॥

---

१४. क्षत्रास=क्षत्रियांना १५. लक्ष=निशाण. १६. दिनोद्धारणें=रामानें.

सुवर्णे कसी कांस वीराजताहे । सुमित्रा म्हणे राम आश्चर्य पाहें ॥ ४३ ॥
हनूमत ऐकूनि विस्मीत ठेला । वदे अंजनी तो चि हा स्वामि आला ॥
मनामाजि वीचारिलें आदेंरशीं । नमस्कार साष्टांग केला प्रभूसी ॥ ४४ ॥
पदीं मस्तकू ठेविला शीघ्र भावें । वरू दीधला स्वामि-देवाधिदेवें ॥
कृपाळूपणें राम बोले तयासी । कपी वज्रदेही चिरजीव होसी ॥ ४५ ॥
महा मस्तकीं हस्त सीतापतीचा । जयाच्या वरा यत्न नाहीं विधीचा ॥
शशी सूर्य तारा-गणू सृष्टि आहे । चिरजीव केलें सदा वज्रदेहें ॥ ४६ ॥
कपी-मानसीं सूख ऊदंड जालें । दया-सागरें राघवें थोर केलें ॥
बहूसाल आनंदला राम तोषें । कपी लाधला भाव त्याचा विशेषें ॥ ४७ ॥
पुढें मारुती स्तूति ऊदंड बोले । म्हणे धन्य की भाग्य हें दीन आलें ॥
परी हीन जे दीन त्यां उद्धरीलें । रघूनायका बीद साचार केलें ॥ ४८ ॥
दयाळा तुझीये दयेवीण कांहीं । महायत्न केले तुझी भेट नाहीं ॥
परी स्वप्नसें भासतें या मनाला । नसे पुण्य कीं सौख्य जालें दिनाला ॥ ४९ ॥
प्रभू अंजनीला पुसे लागवेगें । पुढें अंजनी सर्व ही खूण सांगे ॥
तुझी कास जाणेल तो स्वामि तूझा । तयारंभिं ऊतावळा प्राण माझा ॥ ५० ॥
गिरी-शीखरें थोरथोरें अपारें । वनें भूवनें पावनें सौख्यकारें ॥
बहू हिंडलों धुंडिलें बोळखाया । परी दीससी तूं न गा देवराया ॥ ५१ ॥
बहू आवडी तांतडी लोचनाला । वदे कार्य कांहीं कळेना जनाला ॥
अवस्था मनीं आसतां प्राप्ति नाहीं । न वाटे समर्था प्रभू गोड कांहीं ॥ ५२ ॥
अकस्मात ते मात कित्येक काळीं । प्रभू राम आला ऋषी राज-मेळीं ॥
अहल्या पदीं दिव्य होऊनि गेली । समर्था बहू कीर्ति विख्यात जाली ॥ ५३ ॥
अहा सत्य हें वाटलें सौख्य जीवा । उभा राहु पाहे अता पूर्व ठेवा ॥
परी अतरीं धीर केला धरेना । बहूसाल वीयोग पापी सरेना ॥ ५४ ॥
पहाया समर्था बहू यत्न केला । नव्हे साध्यता सर्व ही व्यर्थ गेला ॥
अतां पूर आला कृपेचा दयाळा । तरी प्राण हा सर्व ही तृप्त झाला ॥ ५५ ॥
यथार्थें चि वाक्या वदे तो वनारी । कृपा- उत्तरें सौख्य दे रावणारी ॥
बहू गोड वाणी समाधान केलें । प्रसंगी कपीला सुधा पान* झाले ॥ ५६ ॥
पुढें शेष-पायांवरी शीघ्र माथा । त्वरें ठेवितां ऊठवी राम-भ्राता ॥
बहूता परी उत्तरें गौरवीला । कपी मानसीं हर्ष ऊदंड जाला ॥ ५७ ॥
पुढें राघवालागिं सौमित्र सांगे । कपी सुग्रिवाचा गिरी पैल शृंगें ॥
तयें धाडिलें यासि शुद्धीस आहे । पुसावा तया लागिं तो राम बाहे ॥ ५८ ॥

१७. सुवर्ण=भरजरी पीतांबर * 'स्तवपान' पा० भे०.

कसा गा कपी तो कपीराज कोठें । कसा शीघ्र आम्हांसि येऊनि भेटे ॥
सिता ठाउकी कीं तया लागिं नाहीं । प्रतीउत्तरू बोलतो भीम देही ॥ ५९ ॥
हनूमत बोले पुसावें तयाला । श्रुता ती मला नाहिं वार्ता दयाळा ॥
परी वर्तमानासि तो दीनबंधू । म्हणे काय रे काय रे सौख्यसिंधू ॥ ६० ॥
महाभीम बोले रघूनायकासी । करा सौख्य तें आदरें सुग्रिवासी ॥
करी सर्व ही साह्यता तो स्वभावें । परी साह्य आधीं तयाचें करावें ॥ ६१ ॥
त्वरें जाय घेऊनि ये त्यासि आतां । भयाभीत होऊं नको सोडिं चिंता ॥
म्हणावें तुझें ऊसणे सर्व घेतों । पुढें राज्य कांता तुझी तूज देतों ॥ ६२ ॥
उडाला कपी साक्षपें भीम-रूपी । त्वरें सुग्रिवा सर्व वार्ता समर्पी ॥
बरा काळ आला तुझा भोग गेला । भले सागतो भेट त्या राघवाला ॥ ६३ ॥
महावीर हे धीर मोठे प्रतापी । रणीं भीडतां दीसती काळरूपी ॥
तयाचे पुढें वाळि तो काय कीती । तुला साह्य होती पहावी प्रचीती ॥ ६४ ॥
महा विक्रमू सांगसी थोर त्याचा । नसे अल्प ही लेश तो दूरिताचा ॥
तरी त्यासि येथे चि घेऊनि यावें । मनांतील दीसेल सर्व स्वभावें ॥ ६५ ॥
पुन्हा अंजनी-सूत येऊनि पाहे । रघूनाथ लक्षूमणू बैसलाहे ॥
समर्था दिना लागीं ह्या थोर कीजे । उदासीन त्या सुग्रिवाला न कीजे ॥ ६६ ॥
दयाळू म्हणे गा बरें जाउ आता । त्वरें चालिला त्या गुहाच्यानि पथा ॥
हनूमत जाऊनि साकल्य सांगे । त्वरे बाहिरी येतसे लागवेगें ॥ ६७ ॥
अलंकार भांगार[१८] त्या जानकीचा । बहू रम्य लावण्य नाना परीचा ॥
दशग्रीव लंकेसि नेते प्रसंगीं । जगन्माउली भूषणें सर्व त्यागी ॥ ६८ ॥
अकस्मात ते सुग्रिवा प्राप्त झाले । गुहामाजि पेटींत घालूनि ठेले ॥
प्रसंगीं रघूनाथ-भेटी निघाले । अलंकार घेऊनि सन्मूख आले ॥ ६९ ॥
अती आदरें भेटला राघवासी । नमस्कार साष्टांग केला प्रभूसी ॥
कृपाळूपणें राघवें ऊठवीला । सुमित्रा-सुतेंही बहू गौरवीला ॥ ७० ॥
पुढें बैसले सर्व ही स्वस्थ झाले । अती आदरें राम मजूळ बोले ॥
तुला आणि वाळीस वीरोध जाला । कशा कारणे काय अन्याय केला ॥ ७१ ॥
कृपाळूपणें ऐक तू रामराजा । कपीराज बोले यथार्थेंचि वोजा ॥
बहू राक्षसू थोर मायावि आला । तये वाळिशीं थोर संग्राम केला ॥ ७२ ॥
बहू झुंजता झुंजता तो पळाला । महा एक गूहे मध्यें शीघ्र गेला ॥
तया पाठिशीं धावला शीघ्र वाळी । मला ठेविले रक्षणा तेंचि काळीं ॥ ७३ ॥
पुढे युद्ध दोघासि ऊदंड झालें । बहू रक्त तें मास बाहेर आलें ॥

---

१८. भांगार—सोनें ( हा कानडी भाषेंत शब्द प्रसिद्ध आहे )

प्रसंगीं तये घोष अद्भुत जाला । मला भासले इद्र-सूंतू निमाला ॥ ७४ ॥
तया ऊपरी कर्म म्यां साग केलें । पुरी माजि सर्वांस हें जाणवीलें ॥
प्रधानीं समस्तीं मला राय केला । पुढें येक संवत्सरे वाळि आला ॥ ७५ ॥
तयें देखिलें राज्यधारी प्रसंगे । बहू क्षोभला धांवला लागवेगें ॥
मला शीघ्र ताडिल्लें थोर हातें । पळालो त्वरें चालवेना जिवितें ॥ ७६ ॥
कृपाळूपणें पूसिलें राघवानें । तुला ये स्थळीं सोडिलें का तयानें ॥
रवीसूंत साकल्य सागे प्रभूला । वरी ना च रे तो ऋषी-शाप जाला ॥ ७७ ।
ऋषी कोण तो कां तयें शापियेलें । कपीसुग्रिवातें रघूराज बोले ॥
प्रसंगीं कथा मूळपासूनि सांगे । दिनानाथ साकल्य पूसे प्रसगें ॥ ७८ ॥
महा स्थूळ अद्भूत राक्षेस होता । बहू थोर म्हैसा सदा रूप-धर्ता ॥
तया दुंदुभी नाम ते देव-राया । नसे तूळितां दूसरा त्या तुळाया ॥ ७९ ॥
अती मातला गर्व पोटीं न साहे । समुद्रासि जाऊनि युद्धासि बाहे ॥
भयें भूलला सिंधु बाहेर आला । बहू रत्न देऊनि सतोषवीला ॥ ८० ॥
म्हणों लागला सागरू पैल पाहें । महाचंड युद्धासि तो थोर आहे ॥
तु पाहीं वहू मानसीं गर्व केला । तेयें लौकरी नाथ झुजेल तूला ॥ ८१ ॥
पुढें दुंदुभी पर्वतालागिं सांगे । महा थोर पाषाण लोटीत वेगें ॥
गिरी ही तया लीन होऊनि आला । बहू स्तूति बोलोनि आनदवीला ॥ ८२ ॥
महापर्वतू राक्षसा लागिं सागे । बळी वाळि प्रख्यात हो पैल वागे ॥
समक्षा तुझी तो चि तो पूरवीता । तेथें जाय तू जाय गा शीघ्र आतां ॥ ८३ ।
पुढें वीर किंष्किध-पूरास आला । समाचार शीघ्रीत जाला कपीला ॥
रणा दारूणा माजि दोघे बळाचे । महा प्रौढ युद्धू तये दुंदुभीचें ॥ ८४ ॥
बळें भांडतां भाडता थोर म्हैसा । तया लाथ मारी कपी काळ जैसा ॥
पदें हाणता देह तो चूर जाला । अकस्मात ऊडोनि येथें चि आला ॥ ८५ ।
तपस्वी मुनी बैसला ध्यानकर्ता । तदा येक नेमें चि सामर्थ्य धर्ता ॥
तयें देखिला पर्वतू रक्तमेदा । मैंतगू मनीं पावला थोर खेदा ॥ ८६ ॥
असा तो कसा कोण तो मातलाहे । तया लागिं हा शाप माझा चि आहे ॥
ऋषी पर्वतीं येत वेळे तयाला । क्षयो प्राप्त होईल नेमस्त त्याला ॥ ८७ ॥
म्हणोनी समर्था तया येववेना । किती जाहले ची तरी मारवेना ॥
कृपाळूपणें साह्य माझें करावे । दयासागरा दीन ते उद्धरावे ॥ ८८ ॥
निराधार आधार काही च नाहीं । बहू गांजलों पीडलो थोर काहीं ॥
नये बोलता काय सांगूनि कोणा । वदो काय मूखें अती दैन्यवाणा ॥ ८९ ॥

---

१९. इद्रसुत=वाळी २०. रविसुत=सुग्रीव २१. मतग=मातगऋषि

जया सांगणे तो तया भीत आहे । महा क्रूर कोणी च तो ही न राहे ॥
प्रसंगे मला जोडले पाय तूझे । + + + + + + + ॥ ९०* ॥
तुझा पार आपार कोणा कळेना । कसा मीं स्तवूं बुद्धि माझी वळेना ॥
तरी सर्व जाणूनियां अंतरींचें । मनीं चिंतिले पूरवावें दिनाचे ॥ ९१ ॥
दया-सागरें राघवें धीर दीला । परी सर्वथा धीर येना कपीला ॥
कपीचें महा थोर सामर्थ्य आहे । तयाचे पुढे काळ ऊभा न राहे ॥ ९२ ॥
तया दुंदुभीचें मढें पैल पाहें । समर्था गिरीतुल्य तें दीसताहे ॥
असें झोंकि किष्किंधेहुनी च लाते । दुजा कोण द्याया तया साम्यतेतें ॥ ९३ ॥
दिसे कोटि-कंदर्प-लावण्य साजे । पुढें देखतां सौख्य ऊदंड माजे ॥
जुना घोर कर्कोट तो वाळि आहे । तयालागिं जिंकावया कोण आहे ॥ ९४ ॥
पुढें राघवें दुंदुभीच्या मढयाला । पदें ताडिलें धाडिलें सागराला ॥
तयें जाहले सौख्य ते सुग्रिवासीं । वदे आदरें मागुते या प्रभूसी ॥ ९५ ॥
तधीं रक्त मांसें बहू स्थूळ होतें । अतां सूक्ष्मता प्राप्त झाली तयातें ॥
अशानें कदा वाळि तो जिंकवेना । समर्था प्रभू मानसीं धीर येना ॥ ९६ ॥
प्रभू ताड हे सप्त वीतड आहे । तया येक बाणेंचि भेदूनि पाहें ॥
जरी भेदिले छेदिले ते प्रसंगीं । समर्था तरी वाळिसी जिंकिसी कीं ॥ ९७ ॥
पुढें ते कडी वीकडी ताड आहे । रघूनाथ लक्ष्मणा लागिं बाहे ॥
पदें वाम अंगुष्ट तो रेटियेला । तेणें सप्त मेळा बरा नीट जाला ॥ ९८ ॥
पुढें राघवें शीघ्र चंद्रार्ध-बाणें । बळें छेदिला ताड मांडूनि ठाणें ॥
गिरी-शृंग भेदूनि पृथ्वींत गेला । पुरे धांव पूरूनि भौता निघाला ॥ ९९ ॥
रवी-सूत आनंदला हो मनाला । अती निश्चयो वाटला त्या कपीला ॥
कृपाळूपणें राम बोले तयासी । अतां जायगा झुंज तू त्या कपीशीं ॥ १०० ॥
पुढें वीर सुग्रीव युद्धासि गेला । कडाडीत तो ज्येष्ठ बाहेर आला ॥
तुला काय कोठूनि सामर्थ्य आलें । परी पावसी मृत्यु वाईट केलें ॥ १०१ ॥
अतां साह्य बोलें विरें थाप मारी । तयाकारणें सुग्रीव नेटे धिकारी ॥
गिरी थोरला टाकिला वाळिमाथा । तयें वारिला शीघ्र हाणूनि लाता ॥ १०२ ॥
पुढे पाडिला भूतळीं सुग्रिवासी । कठोरें करें ताडिलें बांधवासी ॥
रवीसूत खालीं वरी वाळि आहे । रघूराज दूरूनि लक्षीत आहे ॥ १०३ ॥
कळेना रिपू कोण त्याला वधावे । दिसे सारिखा सारिखा त्यासि भावे ॥
रघूनंदनें धीर केला प्रसंगीं । विरू सुग्रिवू तो पळे लागवेगीं ॥ १०४ ॥
वदे राघवालागिं हे काय केलें । दयासागरें कां मला मोकलीलें ॥

---

* 'प्रभो पूरवावें तुवां कोड माझें' ? २२. कर्कोट=सर्प.

तुम्हांलागिं सांगीतलें सर्व होतें । तुम्हां देखतां ताडिकें मुष्टिघातें ॥ १०५ ॥
वदे रामराना विरा ऐक बोला । कळेना चि तो कोण शत्रू चि तूझा ॥
अकस्मात तूला चि लागेल जेव्हां । न चाले पुढें सर्वथा यत्न तेव्हा ॥ १०६ ॥
तया कारणें धीर ऊदंड केला । रघूनायकें हार त्या लागिं दीला ॥
गळां हार त्याला कपी खूण जाली । कपी जाय गा मागुता धांव घाली ॥ १०७ ॥
बहूतां परी धाविलें सुग्रिवासी । गिरीशृंग घेऊनि धावे त्वरेशीं ॥
उठे शक्रसूतू तयालागिं तारा । न जावें ह्मणे येत नाहीं विचारा ॥ १०८ ॥
प्रितीपात्र हा अंगदू सांगताहे । कपीलागिं तो जाहला राम साहे ॥
समर्था तरी कासया लागिं जावें । असें जालिया येश नाहीं स्वभावें ॥ १०९ ॥
रघूनाथ हा थोर माहाप्रतापी । अनाथासि देखूनि कृपा समर्पी ॥
तयाशी कदां झुजतां पूरवेना । पुढें देखता धीर पोटीं धरेना ॥ ११० ॥
न माने तया सागतां गर्व केला । बहूसाल वाळीस तो क्रोध आला ॥
म्हणे ऐकतों रे दशग्रीव आला । तयें चोरिलें कीं प्रिये जानकीला ॥ १११ ॥
वधू कारणें सुग्रिवा मेळवीतो । तयाचे शरें आमुचा प्राण जातो ॥
असें हें घडो पाहतें ते चि काळीं । गिरीशृग ते राहती अतराळीं ॥ ११२ ॥
अशी तूं कशी सागसी या भयाला । कसा कोण मी दीसतों वाळि तूला ॥
बळें पालथें या भुगोळास घालीं । करें पोकळीमाजि ब्रह्मांड झेलीं ॥ ११३ ॥
निघाला बळी दीधली हाक मोठी । दिशा दिग्गजां जाहली थोर आटी ॥
महा पुच्छ ऊभारिले सव्य बाहो । बहूसाल कोपिन्नला तप्त देहो ॥ ११४ ॥
अकस्मात तो वाळि सुग्रीव ताडी । बहू कोपला थोर पोटीं कडाडी ॥
गळां हार तो मार वेगीं चुकावी । तया शेष देखोनि माथा तुकावी ॥ ११५ ॥
बहू कोपला तापला थोर तापा । पुन्हा मागुता ताडिला वज्रथापा ॥
तळीं घातलें शीघ्र त्या सुग्रीवासी । रघूराज दूरूनि लक्षी तयासी ॥ ११६ ॥
पुढें सज्जिलें चाप चद्रार्धबाणें । भलें लक्षिलें वक्ष तें वज्रठाणें ॥
तया वाळिला मूर्छना थोर आली । निचेष्टीत भूमीवरी आग घाली ॥ ११७ ॥
बहूसाल त्या सुग्रिवें शोक केला । सुकूमार कूमार तो शीघ्र आला ॥
पुढें शीघ्र वार्ता पुरी माजि गेली । अकस्मात तारा भुमी अग घाली ॥ ११८ ॥
नव्हे धीर डोळा बहू नीर लोटे । पिटी भाल हो आजि कल्पांत वाटे ॥
त्वरें धाव नारायणा मासि पाहें । महावीर तो वाळि मुर्छीत आहे ॥ ११९ ॥
समर्था मला कासया मोकलीलें । बहू सूख मागील ते आठवीलें ॥
अहारे अहा असें काय झालें । कसें पूर्व सचीत टाकूनि आलें ॥ १२० ॥

---

२३. तारा=वाळीच्या स्त्रीचें नांव.

अग्रतः प्रेषितस्तेन शूरो होळकराभिधः ॥
उदग्दिग्राजराजानां राज्ञीरजयदाशु सः[२९] ६२ ॥
प्राप्य तीरं चलन्नीरं रेवाया द्विजराडसौ ॥
ज्वरातुरः सन् शत्रूणां कालः कालवशं ययौ[३०] ॥ ६३ ॥
पाणिवह्निरसनिशाकरोन्मिते शालिवाहनशके प्रधानपः
नर्मदामधिवसन्तनुं जहौ दीनविप्रजनपालनक्षमः ॥ *
राणुः स्थाणुपदाब्जपूजनपरः कश्चित्कुशाग्राग्रधी-
र्बालः पंकजभूपदोद्भवजनुर्धर्मं निजं चिन्तयन् ॥
आगत्य द्विजराजवाजिसचिवं भक्त्या सिषेवे सदा
राजाधीश्वरशाहुबाहुजकृपापात्रं सुगोत्रं प्रभुम्[३१] ॥ ६४ ॥
प्रधानाधिपती रात्रावेकदागात्रृपगृहान् ॥
उपानहौ प्रगृह्यास्य बहिस्तस्थौ स बालकः ॥ ६५ ॥

अग्रतइति तेन बाजिराजेन अग्रतः अग्रे प्रेषितः शूरः होळकराभिधः होळकरोपनामा सः मल्लारिः उदीचा चासौदिक् च उदग्दिक् । पुंवत्कर्मधारयेत्यादिना पुंवद्भावः । उदग्दिशि राजराजाः राजाधीशाः । राजाहः सखिभ्यष्टच् । तेषां राज्ञीः पत्नीः आशु शीघ्रं अजयत् ॥ ६२ ॥

प्राप्येति । शत्रोः कालः सः स्वयं चलत् चंचल नीरं यस्मिन् तच्चलन्नीरं रेवायाः नर्मदायाः तीरं प्राप्य ज्वरेण आतुरः अभिभूतः सन् कंचित् काल वसन् कालवशं मरण ययौ प्राप्त ॥ ६३ ॥

अथ सिंहावलोकनेन तस्यैव सेनाधिपतेश्चरित्र तद्वंशचरित्र चाह यावत्समाप्ति । राणुरिति । स्थाणोः शिवस्य । स्थाणू रुद्र उमापतिरित्यमर । पदाब्ज तस्य पूजन तत्र परः आसक्त । कुशस्य अग्र कुशाग्र अतिसूक्ष्मेत्यर्थः । कुशाग्राग्रमिवधीर्यस्य सः । पंकजभूर्ब्रह्मा तस्य पदं चरणः तदुद्भव शूद्र. । पद्भ्यां शूद्रो अजायतेति श्रुते. । तस्माज्जनुर्जनन यस्य तथोक्त. कश्चिद्राणुर्नाम बालः निज धर्मं विप्रसेवारूपं चिंतयन् सन् । राज्ञां अधीश्वरः शाहुः तत्सज्ञो यः बाहुज. क्षत्रिय तस्य कृपाया. पात्रं । गा पृथ्वीं त्रायतेऽसौ गोत्रः । शोभनश्चासौ गोत्रश्च सुगोत्रः त । यद्वा अपत्य पौत्रप्रभृतिगोत्रमिति पाणिनिसकेतित पौत्रप्रभृति अपत्य शोभन

---

२९ 'अग्रत प्रेषयामासस्वहोळकरसज्ञितम् । उदीच सदिश गत्वातत्रत्यानजयत्परान् ' ॥ पा० भे०. ३०. 'स्वय रेवातट प्राप्य ज्वरेणातीवपीडित । तत्रैवन्यवसत्कचत्काल कालवशगत '। पा० भे० ३१ 'राणोजीतिसुत कश्चिच्छूद्रजातिसमुद्भव , विप्रसेवापरो धर्म शूद्रस्येति द्विजोत्तमान् ॥ शुश्रूषितेवेनत्यागी शुचि चास्माद्विचितयन् नयेनविनयेनापि शमेनच समन्वित. पा० भे० * अधिकोऽयश्लोक क्वचित्

उरोधृतसुपादुकं दृढतरं शयानं चिरं
विलोक्य सचिवाधिपः समुपहर्तुमैते यदा ॥
शशाक न तदा शिशुर्बलवता समुत्थापितो
निधाय पुर एव ते स्वयमपि प्रभोस्तस्थिवान् ॥ ६६ ॥
तदाप्रभृति बालेऽस्मिन्नस्य प्रीतिरवर्धत
गुणिन्येव गुणज्ञानां पक्षपातो न पामरे ॥ ६७ ॥
शौर्यौदार्यसमायुक्तं तं दासं विनयान्वितं
उदीचीं प्रेषयामास ससैन्यं राजकार्यकृत् ॥
सिंदेनामधरो ज्योतिःपादद्वन्द्वनिषेवकः ॥
उदीचीं स दिशं जित्वा सर्वं राज्ञे करं ददौ ॥ ६८ ॥
राणुर्वीरो दारितारातिराशिर्दाता दीनप्राणिरक्षाप्रवीणः ॥
वीणावाद्यारञ्जितस्वान्तवृत्तिर्वृत्त्याहीनं विप्रेष्वकार्षीत् ॥६९॥

गोत्र यस्येति सुगोत्रः त प्रभु निग्रहानुग्रहसमर्थं । द्विजराजो यः बाजिनामा सचिवः प्रधानः त आगत्य सिषेवे सेवितवान् ॥ ६४ ॥

प्रधानेति । प्रधानाना अधिपतिः बाजिराजः एकदा एकस्मिन् दिवसे रात्रौ नृपस्य शाहोः गृहान् प्रासादं अगात् । सः बालकः अस्य बाजिराजस्य उपनह्येते ते उपानहौ पादत्राणे । उपपूर्वात् नहबन्धने अस्मात्क्विप् दीर्घश्च । प्रगृह्य बहिः तस्थौ ॥ ६५ ॥

उरइति । सचिवाना अधिपः बाजिराजः दृढतरं यथा स्यात् तथा उरसि धृते सुपादुके येन त उरोधृतसुपादुकं चिरं शयानं बालं विलोक्य ते पादुके समुपहर्तुं यदा न शशाक तदा बलवता बलिष्ठेन अन्येनेत्यर्थः । समुत्थापितः अतिप्रयासेन मन्याधः करं दत्वा उत्थापित इत्यर्थः । सः शिशुः ते पादुके प्रभोः पुर एव नत्वन्यत्र निधाय स्वयमपि पुरः तस्थिवान् अतिष्ठत् ॥ ६६–६७ ॥

दक्षिणस्या करवीरसमीपे स्थिता कुलदेवता ज्योतिः ॥ ६८ ॥

राणुरिति । दारिताः अरातीनां शत्रूणा राशयो येन स दारितारातिराशिः दाता दीनाः ये प्राणिनः तेषा रक्षाया रक्षणे प्रवीणश्चतुरः वीणारूप यद्वाद्य तेन आसमन्ताद्रञ्जिता स्वान्तस्य मनसः वृत्तिः येन तथोक्तः एतेन गानकलाभिज्ञ इतिदर्शित ।

३२ उरोधृतपदत्राण शिरयेनिद्राविमोहित प्रधानस्तादृश दृष्ट्वा हस्ताते हर्तुमुद्यत । नैवाशक्नोद्यदा तु यत्नेनोत्थापयच्छिशुन् । उत्थित स प्रधानस्य स्थापयामास ते पुर ॥" पा० भे०. ३३ अधिकोय श्लोक कचित् । ३४. शिन्दे इत्यभिधायकः [illegible] पा० भे०. ३५ 'मारिता ' पा० भे०

जित्वा सर्वामुत्तरां तारितस्वः स्वीयाचारैश्चारदृग्दीर्घदर्शी
कीर्तिं भूमौ राजसिंहस्य तस्य तन्वन्नासीदुत्तरस्यां स तस्याम् ॥ ७० ॥
तस्माज्जज्ञे माधवो वीरवर्यो योऽसौ सर्वं भूतलं निर्जिगाय ॥
म्लेच्छान्हूणान्बर्बरान्दुर्विनीतान्हत्वा राज्यं कण्टकोनं चकार ॥ ७१ ॥
कामादीनामान्तराणां रिपूणां शास्ता हन्ता बाह्यशत्रुव्रजस्य ॥
स्वीयैः स्वच्छैर्यः प्रतापैर्विरेजे भूमावस्यां राजकीर्तिं वितन्वन् ॥ ७२ ॥
तस्मिन्वंशे तादृशो नैव जज्ञे कश्चिन्नैवं जायते वा कदापि
स्नानं पानं जान्हवीवारिणो यो नित्यं चक्रे दूरदेशस्थितोऽपि[३६] ॥
यदीयपाणिस्थितखड्गधारां मन्येऽतुलां कल्पलतां यतः सा ॥
मर्त्यानमर्त्यान्विदधाति शत्रून्कुप्येतरच्चापि धनं प्रसूते ॥ ७३ ॥
नारिभिः परनारीभिः पृष्ठं स्पृष्टमुरःस्थलम् ॥
अदर्शि गोपवनिताप्रियभक्तस्य यस्य च ॥ ७४ ॥
यदीयकरगा खड्गधारा भागीरथी ध्रुवम् ॥
पापा अपि परे यस्याः स्पर्शनाद्यान्ति दिव्यताम् ॥ ७५ ॥

राणुर्नाम वीरः वृत्त्या उपजीविकया हीनेषु विप्रेषु वृत्तिं उपजीविकां अकार्षीत् कृतवान् ॥ ६९ ॥

जित्वेति । स्वीयैः स्वकीयैः आचारैः आचरणैः कर्मभिरिति यावत् । तारिताः स्वे स्वकीयाः येन तथोक्तः चारा एव दृक् यस्य । दीर्घं पश्यतीति दीर्घदर्शी सः राणुर्नाम वीरः तस्य शाहोः तस्या उत्तरस्यां कीर्तिं तन्वन् विस्तारयन् सन् आसीत् ॥ ७० ॥

अथ तदीय वंशं तद्वंश्यानां चरितं चासमाप्तेराह । तस्मादिति । तस्मात् राणुनाम्नः माधव जज्ञे । कंटकैः शत्रुभिः ऊनं कंटकोनं चकार कृतवान् ॥ ७१ ॥

कामादीनामिति । अंतरे शरीरे भवा. आंतराः तेषां कामादीनां शास्ता । बहिर्भवा. बाह्याः ये शत्रवः तेषां व्रजस्य हंता । शेषं सुगमं ॥ ७२ ॥

अथ माधवमेववर्णयति यदीयेत्यादिभिः षड्भिः । यदीयेति । अहमितिशेषः अतुलां अनुपमां यदीयपाणिस्थितखड्गधारां कल्पलतां मन्ये यतः सा मर्त्यान् शत्रून् अमर्त्यान् देवान् विदधाति । कुप्येतरच्चापिधनं प्रसूते स. माधवः वीरराट् जयतीति षष्ठेनान्वयः ॥ ७३ ॥

नारिभिरिति । अरिभिः गोपवनिताप्रियः श्रीकृष्णः तस्य भक्तस्य यस्य भूपतेः पृष्ठं नादर्शि न दृष्टं । परेषां अन्येषां नारीभिः उरस्थलं न स्पृष्टं ॥ ७४ ॥

यदीयेति । यस्या य यदीयः यदीयश्चासौ करश्च यदीयकरः यदीयकरं गच्छतीति

---

३६ अधिकोयं श्लोकः क्वचित्

यस्मिंस्तुरङ्गमधिरोहति देवराजः
प्रस्थापयत्यखिलयानवराणि सद्यः ॥
दिव्याङ्गना अपि विभूषणभूषिताश्च
माल्यानि कल्पतरुजानि महाधनानि ॥ ७६ ॥
यस्मिन्खड्गकरे तुरङ्गमगतेऽसंख्याश्ववाहैर्युते
स्वस्थानं प्रविहाय निर्गतवति प्रद्योतनः कंपते ॥
शत्रूणां निचयः स्वमण्डलयुतः शेषोऽपि पातालके
राजाधीश्वरवन्द्यवन्दितपदद्वंद्वे द्विजस्वस्तरौ ॥ ७७ ॥
युद्धे योऽर्जुनवद्रिपौ रविजवद्गाने तु गन्धर्ववद्-
वित्ते यक्षकुलेशवज्जनकवद्दीने नये धर्मवत् ॥
पत्न्यां चापि गिरीशवद्वितरणे यः कर्णवत्काव्यवद्
बुद्धौ भूपवरार्चितो विजयते श्रीमाधवो वीरराट् ॥ ७८ ॥

यदीयकरगा खड्गधारा भागिरथी भुव मन्ये । यतः पापाअपि पापर्वतोपि परे शत्रव यस्याः स्पर्शनात् दिवि भवा दिव्याः दिव्यानां भावः दिव्यता तां देवत्वं यातिं गच्छति ॥ ७५ ॥

यस्मिन्निति । यस्मिन् माधवे तुरगं अधिरोहति सति देवराजः इंद्रः अखिलानि यानि यानवराणि विमानानि तानि विभूषणै. विभूषिता दिव्यागनाः अप्सरसः महाधनानि माल्यानि पुष्पाणि सद्यः तत्काल प्रस्थापयति । अय पलायमानं दीनं शरणागत च न हंति समरे अग्रत. युध्यमानमेव हंति तस्मादिंद्र एतेन हताना वीराणामानयनार्थं विमानादीनि प्रेषयतीत्यर्थ· ॥ ७६ ॥

यस्मिन्निति । राजाधीश्वराणां वद्याः तैः वंदित पादपद्मं यस्य तस्मिन् द्विजानां स्वस्तरौ कल्पवृक्षे असख्याश्ववाहैर्युते खड्गकरे तुरगमगते यस्मिन् स्वस्थान स्वाश्रितदेश प्रविहाय प्रस्थितवति सति प्रद्योतन. सूर्यः । प्रद्योतनो दिनमणिरि त्यमरः । कपते स्वमडलभयादितिभावः । स्वमंडलयुतः शत्रूणां निचयः कंपते । कोशसैन्यादिराहित्यादितिभाव· । पातालमेव पातालक तस्मिन् पातालके । स्वार्थे कः । शेषोपि कंपते । असख्यातसैन्यभारादिति भावः ॥ ७७ ॥

युद्धे इति य युद्धे अर्जुनेन तुल्य अर्जुनवत् । तेन तुल्यं क्रिया चेद्वतिरिति वति प्रत्ययः । एवमग्रेपि । रिपौ रविजेन तुल्य रविजवत् यमवत् गानेतु । गंधर्ववत् वित्ते यक्षकुलेशवत् कुबेरवत् दीने जनकवत् नयेधर्मवत् पत्न्याचापि गिरीशवत् सांबवत् वितरणे दाने कर्णवत् य बुद्धौ काव्यवत् शुक्रवत् भूपवरै अर्चितः सः श्रीमाधव· वीरराट् जयति ॥ ७८-७९ ॥

गुणेषु लुब्धाः सकलाः कलास्तं सिषेविरे दास्यमुपेत्य भूपम्
संपत्तिरेनं युवतीव भेजे रुष्टा विपच्छत्रुगृहे जगाम ॥ ७९ ॥
तत्सूनुर्हरिनन्दनेन सदृशः शीलेन धर्म्येण यो
धर्मं भूपवरं जिगाय यशसा यः पूरयामास गाम् ॥
यः शत्रुव्रजकक्षमक्षतयशा युद्धेऽदहद्भूपराट्
श्रीमान्दौलतनामभाग्विजयते राजाधिराजः सुधीः ॥ ८० ॥
तन्मंत्री शशिवंशभूषणमणिः श्रीकृष्णपादार्चन-
प्राप्तश्रीः श्रितताप्वारणचयप्रध्वंससिंहः सुधीः ॥
विद्वद्वर्यमनोगतार्थरचनासंपूर्तिकल्पद्रुमो
दीनांधादिदयापरो विजयते शिष्टाग्रणीर्धार्मिकः ॥
कीर्त्या येन महीतलं कवलितं भूत्याऽखिलं भूतलं
दानेनाखिलविप्रमंडलमथो शत्रुः प्रतापानलैः ॥
देहः पुण्यचयेन बुद्धिसचिवो ज्ञानेन चालिंगितः
सोयं दौलतराजमंत्रिमहितः शिष्टाग्रणीराजते ॥
वाचं कल्पलतां मन्ये यदीयां यन्मुखोद्गता ॥
स्वर्णराशीन् रूप्यराशीन् रत्नराशीन्फलत्यलम् ॥
सहस्रशो द्विजा यस्य गेहे पायससंयुतान् ॥
लड्डुकान् मण्डकान्नित्यं भुजते तुष्टमानसाः ॥*
सोऽयं यन्त्रवराद्यनिर्जितरिपुव्रातो व्रती घोटकि-
व्राजापूरितभूतलोऽखिलमहीदेवालिकल्पद्रुमः ॥
दीनान्धव्रजपालनोऽहितमहाखड्गोऽवनीपालको-
ष्णीषोद्धर्तिसुमाल्यरञ्जितपदो वर्वर्ति सर्वोपरि ॥ ८१ ॥

तदिति । हरेः इंद्रस्य य नंदनः पुत्रः अर्जुनः तेन सदृशः । यद्वा हरेः सूर्यस्य नंदनेन कर्णेन सदृशः । यद्वा हरेः विष्णोः नंदनेन मदनेन सदृशः । यद्वा हरेः इंद्रस्य नंदनेन जयंतेन सदृशः । यद्वा हरेः वायोः नंदनेन भीमेन हनुमता वा सदृशः । यद्वा हरेः चंद्रस्य नंदनेन बुधेन सदृशः । यद्वा हरेः यमस्य नंदनेन धर्मेण सदृशः । यद्वा हरेः इंद्रस्य नंदनेन वालिना सदृशः । यद्वा हरेः सूर्यस्य नंदनेन सुग्रीवेण सदृशः धर्मादनपेतं धर्म्यं तेन धर्म्येण शीलेन । धर्मपथ्यर्थन्यायादनपेते इति यत्प्रत्ययः । कक्षं तृणं । गा पृथिवीं । गौर्भूमिस्त्वलानलेत्यमरः । अर्कमर्कटमंडूकविष्णुवासववायवः । तुरगसिंहशीतांशुयमाश्च हरयो दश । शेषं स्पष्टं ॥ ८० ॥

सोयमिति । यंत्रवराणि तोफाः घोटकिनो अश्वारोहाः । माल्यानि मालाः । वर्वर्ति ।

* चत्वारः श्लोकाः अधिकाः क्वचित्

कन्या चाप्यखिला कलोत्तमतमा बालाभिधा राजते
विद्वत्कल्पलता सुशीलमहिताऽहल्यां विजिग्ये कृतैः ॥
कार्थ्यां यवनान्‌रिपून्निजमतिप्रौढ्याजयत्साधुना
ह्यास्ते गालवदुर्गमत्र निकषा भ्रातापि तत्रैव सः ॥ ८२ ॥
स्वाहाग्नेर्महिषी यथा सुरपतेः पत्नी शची वा गुरो-
स्तारा वा जनकात्मजा रघुपतेः कृष्णस्य वा रुक्मिणी ॥
शंभोः शैलसुताथवाखिलगुरोर्विष्णोः पयोधेः सुता ॥
श्रीमद्दौलतनामराजमहिषी सा बायजाख्या तथा ॥ ८३ ॥
हिन्दुः सिन्धुसुताप्रियांघ्रिकमलद्वन्द्वार्चनावापित-
श्रीः संपद्धरमानिताखिलमहीदेवो नृपेन्द्राधिपः ॥
उद्यद्दण्डनिपातपातितसुदुर्वृत्तव्रजो वीरपो
भ्रातास्या अपि राजते जनिमतां मान्यो वदान्याग्रणीः ॥ ८४ ॥
कर्णं सवर्णं तरुमप्यनल्पं कल्पं न मन्येऽर्थिजनार्थितं यौ ॥
अयच्छतां यच्छति यद्‌द्विजेभ्यो यो याचितंयाचितमप्यनल्पम्‌॥८५॥
नलरामयुधिष्ठिराः पुरा त्रियुगीवाञ्छकामपूरकाः ॥
इह दानपतेरभावतो द्विजदैन्ये सति यः समुद्गतः ॥ ८६ ॥
अयं कल्पद्रुमः सा हि कल्पवल्ली मता मम ॥
उभावपि सुपुत्राढ्यौ फलतो द्विजहेतवे ॥ ८७ ॥
विश्वं ब्रह्मतया सर्वं पश्यन्तावपि लोकवत्‌ ॥
व्यवहारदशायां यौ क्रीडतां तौ सुतैः सह ॥ ८८ ॥
इति श्री शिवकाव्ये पुरुषोत्तमविरचिते दशमश्चमत्कारः

---

वृत्तं तदीयं स निशम्य राजा बल्लालसंज्ञं सुतमस्य वीरम्‌ ॥
आनीय तातादधिकं गुणौघैश्चक्रे प्रधानं महितं हितं तम्‌ ॥ १ ॥

यङ्लुङन्तमिदलटो रूपं ॥ ८१ ॥

अभितः परितः इत्यादिनानिकषायोगे द्वितीया ॥ ८२-८८ ॥

॥ इति श्रीशिवकाव्यव्याख्याया स्वयकृताया दशमश्चमत्कार. ॥

वृत्तमिति । सः राजा शाहुः तस्य इद तदीय बाजिराज संबधि वृत्त परलोकगमनरूपं निशम्य श्रुत्वा अस्य वाजिराजस्य सुत वीरं गुणौघैः तातात्‌ अधिक अतएव महित पूजित हित हितकर्तार त बल्लालसज्ञ आनीय प्रधानं चक्रे । मुख्यप्रधानाधिकार दत्तवानित्यर्थः ॥ १ ॥

बल्लालनामा ललितैर्वचोभिर्दमेन शांत्या विनयेन भूपम् ॥
अतोषयद्दीनजनप्रपालं भूपालसंघार्चितपादपीठम् ॥ २ ॥
पितृव्यपुत्रेण सदाशिवेन वीराग्रगण्येन समन्वितः सन् ॥
चकार सर्वं नृपकार्यजातं राजापि चिंतारहितो बभूव ॥ ३ ॥
राजाधिराजोऽपि गुणान् समीक्ष्य प्रधानवर्यस्य सतां मतस्य ॥
मेने मनस्येवमयं मदीयं राज्यं स्वतातादधिकं हि रक्षेत् ॥ ४ ॥
प्रधानपोऽसौ निखिलाः प्रजाः स्वा अपालयद्राजनिदेशकारी ॥
वैरी न चासीदिह कश्चनास्य क्षोणीतले राजविवर्धितस्य ॥ ५ ॥
द्विजातयस्तस्य गुणज्ञतां तामाकर्ण्य विद्याभ्यसने प्रवृत्ताः ॥
भटा अपि प्रोद्धतशस्त्रशिक्षाः कलाधराश्चापि कलाः प्रपेदुः ॥ ६ ॥
राजा प्रजारंजनकृत्प्रधाने मुख्ये समाधाय स राज्यभारम् ॥
तस्मिन् गताधिर्हरपादपद्मसमर्चने सादरतां दधार ॥ ७ ॥
सतारतः पुण्यपुरीमुपेत्य प्रासादवर्यं विहिते स्वपित्रा ॥
महेंद्रधिष्ण्ये मघवानिव स्वाः प्रजा अवन् विप्रपतिः स रेमे ॥ ८ ॥
तस्मिन् प्रधाने सति भारतेऽस्मिन् प्रजा अमन्यंत भुवं दिवं ताः ॥
प्रधाननाथं तु बिडौजसं तं भूपं रमावल्लभभागभाजम् ॥ ९ ॥
पुण्याभिधेया नगरी विधेया ऽमरावतीवेति जगाद यत्तत् ॥
कृत्वा गते स्वः पितरि ह्ययं तु ततोधिकां तां विदधे पुरीं स्वाम् ॥ १० ॥

बल्लालेति । दमेन बाह्येंद्रियनिग्रहेण शांत्या अतरिंद्रियनिग्रहेण ललितैः मनोहरैः वचोभिः भूप अतोषयत् ॥ २ ॥

पितृव्येति । पितृव्यस्य चिमाजीनाम्नः पुत्रेण ॥ ३ ॥ राजेति ॥ ४।५।६ ॥

राजेति । गतः आधिर्मानसी व्यथा यस्मात् स गताधिः । पुस्याधिर्मानसी व्यथेत्यमरः ॥ ७ ॥

सतारतइति मघवानिव इंद्रइव रेमे अवन् रक्षन् सन् ॥ ८ ॥

तस्मिन्निति । ताः प्रजाः तद्देशीयाः लोकाः अस्मिन् भारते खडे तस्मिन् बल्लाले प्रधाने सति भुव दिव अमन्यत । प्रधाननाथ तु बिडौजस इंद्र अमन्यत । त शाहु रमावल्लभभागभाज विष्णुवशभाज अमन्यत ॥ ९ ॥

पुण्याभिधेति । इय पुण्याभिधा नगरी अमरावती विधेया कर्तव्या इति यत् जगाद तत् कृत्वा पितरि बाजिराजे स्व. स्वर्गं । स्वरव्ययं स्वर्गनाकत्रिदिवत्रिदशालया इत्यमरः । गते सति अय बल्लालः तां स्वां पुरीं ततः अमरावत्याः अधिकां विदधे चकार ॥ १० ॥

---

१. ॰जानदम॰ ' पा॰ भे॰ ।

त्दृष्टाः पुष्टा रत्नहाराभिमृष्टा दृष्टा लोकैः कौतुकाल्लोकशिष्टाः ॥
यांत्यायांति प्रत्यहं राजगेहाद्यस्यां कार्ये सन्नियुक्ता नृयानैः ॥ ११ ॥
दरिद्रशब्दार्थभवानुभूतिं यस्यां वसन् कोऽपि जनो न लेभे ॥
हेमादिरूपं प्रतिपद्य लक्ष्मीर्गृहे गृहे क्रीडति यन्नितांतम् ॥ १२ ॥
रसालैस्तमालैस्तथा नारिकेलैः सुरंभाकुलैः पूगपोतैश्च युक्ताः ॥
अपश्यन् यदुद्यानमाला विशाला नरा दृष्टिमंतस्त एवेति मन्ये ॥ १३ ॥
निश्येव चंद्रः कुमुदौघमेव विकासयत्येष मुखाब्जजातम् ॥
यदीयनारीवदनेंदवस्तु नक्तं दिवं[२] पश्य विकासयंति ॥ १४ ॥
द्विगुणं त्रिगुणं चतुर्गुणं वा लभते यत्र धनं वणिक् च मूल्यात् ॥
कृतविद्यमहीसुरः सुवर्णं प्रतिवर्षं लभते यथेष्टमेव ॥ १५ ॥

अथ ततोधिका ता विदधे पुरी स्वामिन्युक्त तदेव आधिक्य सप्तदशभिः श्लोकैराह हृष्टा इत्यादिभिः । हृष्टाः नित्य धनलाभादिति भावः । अतएव पुष्टाः । रत्नानां हारैः अभिमृष्टाः युक्ताः । अतएव लोकैः कौतुकाद्दृष्टाः स्वस्य तथाभूतत्वाभावादितिभावः । लोकेषु जनेषु शिष्टाः उत्तमाः राजाश्रितत्वादितिभावः । कार्ये राजकार्ये सन्नियुक्ताः नराः यस्यां नगर्यां राजगेहान् नृयानैः शिबिकाभिः प्रत्यहं दिने दिने यांति गच्छंति आयांति आगच्छंति ॥ ११ ॥

दरिद्रेति । दरिद्रशब्दस्य योर्थः तस्मात् भवा या अनुभूतिः ता दारिद्र्यमित्यर्थः । शेषं स्पष्टं ॥ १२ ॥

रसालैरिति । ये नराः रसालैः आम्रैः तथा तमालैः नारिकेलैः शोभनैः रंभाणां कदलीनां कुलैः पूगानां क्रमुकाणां पोतैः बालैश्च युक्ताः विशालाः विस्तीर्णाः यस्याः उद्यानानि यदुद्यानानि यदुद्यानानां मालाः पंक्तीः अपश्यन् त एव दृष्टिमतः इत्यहं मन्ये । तेषामेव दृष्टेः साफल्यमित्यर्थः ॥ १३ ॥

निश्येवेति । एषः चंद्रः निश्येव न तु दिवेति भावः कुमुदानां कैरवाणां ओघं संघमेव न त्वन्यसरोजसंघमितिभावः । विकासयति । यस्या इमाः यदीयाः । सर्वनाम्नो वृत्तिमात्रे पुंवद्भावः । एवमग्रेपि । यदीयाश्च ता नार्यश्च यदीयनार्यः यदीयनारीणां वदनानि त एव इंदवः वस्तु नक्तं दिवं रात्रिंदिवं । अचतुरेत्यादिना निपातनात् साधुत्वं । मुखाब्जानां जातं जातिस्ता । जातं जात्योघजन्मसु इत्यमरः । विकासयति पश्य ॥ १४ ॥

द्विगुणमिति । किंच यत्र यस्यां नगर्यां वणिक् मूल्यात् धनात् द्वौ गुणौ आवृत्ती यस्येति द्विगुणं वा अथवा त्रिगुणं वा चतुर्गुणं प्रारब्धानुरूपमित्यर्थः । धनं लभते न तु कदाचिदपि मूल्याद्न्यूनमिति भावः । कृतविद्यः महीसुरः ब्राह्मणः वर्षे वर्षे इति

२ 'दिवानिशं' 'रात्रिं दिवं' इति वा पाठः ।

श्रवो मुकुंदस्य सखे दिगंतारूढं तथासि त्वमपि श्रवो मे ॥
सख्यं तवानेन भवेत्तु मुख्यं गुणेन नाम्ना पयसोरिवेह ॥ ११४ ॥
धत्से यत्किल कुण्डलं वससि यच्चांगेषु नेत्रांकतो ।
यच्चैकांततया खलान् समुदितान् संसेवसे कौरवान् ॥
तत्कर्ण प्रतिभासि कर्ण इव मे नाम्ना गुणैः सर्वथा ।
तद्राधाप्रियसाधको भव नरस्तोत्रप्रबंधांस्त्यज ॥ ११५ ॥
या किन्नरोपज्ञमनेकरागा समूर्च्छना या स्वरभावयुक्ता ॥
तां गीतिकां कर्ण विहाय दूरं शृणु त्वमेताः पुरुषोत्तमस्य ॥११६॥
युक्तं विरक्तः खलु विश्वदेवश्रुतोत्तरागर्भभवः परीक्षित् ॥
ददर्श विष्णोः श्रवणं तदादौ प्रत्यग्दृशिस्थो भजनस्य मध्ये ॥११७॥

भगवद्यशः श्रवणमात्र कुरु ततस्तुभ्यं तद्भिनान्यत् किमपि न रोचतेति कविः स्वकर्णमभ्यर्थयते श्रवण इति यथा पयः पयइति नाम्ना माधुर्यादिगुणेन च दुग्ध-जलयोर्मुख्यं सख्य तथा हे श्रव कर्ण तवापि मुकुंदश्रवश्च स्यात् यशोऽपि दिगतारूढं त्वयि दिशः देवतात्वेन अंतः रूढः यस्मिन् तथोक्त रोरीति लोपेढ्रेति दीर्घ ॥ ११४ ॥

धत्स इति कुडल कर्णवेष्टनं तदेव सहज च अंगेषु प्रतीकेषु देशविशेषेषु च नेत्राकतः नयनसमीपे नेत्र नायकस्तस्यांक चिन्हं तेन प्रभुत्वेनेत्यर्थः खमाकाश लाति गृह्णंति तथोक्तास्तद्गुणत्वादुद्धताश्च समुदितानुच्चारितान् उदय गतांश्च कौर-वान् सुयोधनादीन् कौ पृथिव्यां रवान् शब्दान् राधाप्रियः कृष्णो राधायाएतन्नाम्न्याः कैवर्तकुटुंबिन्या इष्ट च तया हि कर्णः पालितोऽभूत् नरो मनुजोऽर्जुनश्च ॥११५॥

कदाचिदापातरमणीयत्वेन प्रवर्तिष्यसे तत्राह येति । किन्नराः देवगायकविशेषास्ते उपज्ञा आद्यज्ञान यस्याः स्त्रीलिंगविशेषणत्वेऽपि उपज्ञोपक्रममिति नपुसकत्वं अनेके रागा. भैरवरामकल्यादयो यस्या मूर्च्छना एकविंशतिः सप्तस्वराणा प्रत्येक ग्रामत्रय स्वराः षड्जादयः सप्त तेषां सत्ता यस्यां भगवद्गीतास्तु पुरुषोत्तमोपज्ञ वैराग्यापादि-काः मोहविध्वंसिन्यश्च स्वर्गप्रापिकाश्च किन्नरो देवगायकः कुत्सितनरश्च रागो विषयप्रीतिः रामकल्यादिश्च मूर्च्छना मोहः एकविंशतिश्च स्वरित्यव्यय स्वर्गवाचि तदभाव षड्जादिसत्ताचेति ॥ ११६ ॥

यत्परीक्षिद्धरिगुणश्रवणमेव चकार तद्युक्तमित्याह युक्तमिति । विश्वस्य देवो नाथो हरिस्तेन श्रितो यः उत्तराया गर्भस्तत्र भवः 'अश्वत्थाम्ना प्रयुक्तं ब्रह्मास्त्र भगवान् गदापाणिर्गर्भस्थः सन् निवार्य परीक्षिद्रक्षण कृतवानिति' भागवते प्रत्यग्द-शि स्वरूपज्ञाने स्थितः भजनस्य मध्ये विष्णो श्रवणमेव ददर्शेति युक्त विश्वै. देवैः श्रिता देवतात्वेन सा उत्तरा उत्तराषाढा तत्रस्थ. प्रत्यक् पराचीना या दृक्

अथकीर्तनं ॥ श्रीचिंतापि मनोभवं वितनुते तत्सन्निधिः किंपुन-
स्तस्मिन् सत्यपि नित्यदा नु जपति श्रीरामरामेति यः ॥
साधोस्तस्य महेश्वरस्य न पुरः स्थातुं समर्थः स्मरो ।
नूनं दर्शयितुं जनानिति भवोऽभूदर्धनारीनटः ॥ ११८ ॥
सत्त्वप्रधानानि जगाद यास्को नामानि गीतासु तु वासुदेवः ॥
सत्त्वं सुखे संजयतीत्यवोचन्नामैव तस्मान्महते सुखाय ॥ ११९ ॥
भो मानवा नाम वदध्वमुच्चैस्ततो भवेज्ज्ञानमतीव शुद्धम् ॥
सुप्रत्ययोस्मादविशेषतः स्यादिति प्रतिज्ञां कुरुते ह्यनंतः ॥ १२० ॥
मंथानं स्वधियं विधाय भगवानाम्नायरत्नाकरं ।
निर्मथ्यासकृदुज्जहार गिरिशो रामेति रत्नोत्तमम् ॥
तद्यस्याधिगलं विराजति महाभागाय दिव्यात्मने ॥
तस्मै धन्यतमाय न स्पृहयतां किं मुक्तिपण्यांगना ॥ १२१ ॥
श्रीरामनाम्नः कथनेन मर्त्यो हृष्टोपि भिन्नात्मकतां विहाय ॥
ऐक्यं समेतीति वितर्कयेऽहं यन्ना कुजन्माऽजनि नाकुजन्मा ॥ १२२ ॥

दृष्टिस्तत्र तिष्ठति तथा भूतश्च विष्णुदेवताकं श्रवणमेव भजनस्य नक्षत्रजनस्य मध्ये पश्यति प्रथमोपनतत्वात् अश्विन्यादिनक्षत्राणि हि शुंशुमारचक्रे स्थितानि प्रागच्छंति ॥ ११७ ॥

अथ कीर्तन । तत्र नाम्नः प्राधान्यात्तदेवस्तुवन्नादौ नाम कामं जयतीत्याह श्रीति साधोः सतो महेश्वरस्य महासमर्थस्य शिवस्य च यथा मम स्त्रियमर्धांगे वहतो-ऽपि नामजपप्रभावात्स्मरोऽग्रतः स्थातु न शक्तोऽभूदेव नाम सकीर्तयितुरपीति दर्शयन् ॥ ११८ ॥

सत्वप्रधानानीति 'भावप्रधानमाख्यातं सत्वप्रधानानि नामानी'ति यास्को नाम ऋषिर्नैरुक्तआह यतो नाम सत्वप्रधान सत्त्व च सुखकारणं तस्मान्नामैव सुखाय कल्पत इति ॥ ११९ ॥

नाम ज्ञानप्रापकमित्याह भोइति वदध्वं भासमाना ब्रूते भासमानोपसभाषेत्यात्मनेपदं सुप्रत्ययः सम्यक् ज्ञानमविशेषतः स्त्रीशूद्राणामपीत्यर्थः न केवल ब्राह्मणानामेवेत्यनतः शेषावतारः पतंजलिरेकवचनमुत्सर्गतः करिष्यामीति नाम्नः प्रातिपदिकमात्रात्सुप्रत्ययैकवचनं विधत्तइति ॥ १२० ॥

नाम्नामुक्तिर्भवतीत्याह मथानमिति मंथान मथनदंड दिव्यात्मने दिव्यदेहाय धन्यतमाय धनहेतुर्धन्यस्तदतिशयवते च ॥ १२१ ॥

श्रीरामेति भिन्नात्मकतां द्वैत भिन्नपदता च ऐक्यमद्वैतमेकपदता च ना नरः

बहिष्कृतः स विज्ञेयो यो हि गोत्रपराङ्मुखः ॥
धर्मोऽप्यस्य न संसिध्येत्कैवल्यं तु कुतस्तराम् ॥ १२३ ॥
बहुदोषभवोपतापशांतिं तनुतेऽतिविकृतिं परामकुर्वत् ॥
कलयेऽहमये जगत्त्रयेऽस्मिन्परमं नामरसायनं तदेकम् ॥ १२४ ॥
यो घातुकोऽप्यघोऽपि स्यात्कृष्णकंठो यदृच्छया ॥
निर्भिद्य मूर्धसीमानं स तत्सायुज्यमाप्नुयात् ॥ १२५ ॥
अंग श्रीराममातः स्रवदमृतरसो नामनामा स्तनोऽयम् ॥
हृद्यस्तेऽस्यानवद्यः क्रम इह परमं विस्मयं नस्तनोति ॥
बालानेवाद्विजान् यो जनयति न सुखं केवलं सेवमानान् ॥
यत्प्रौढान्सद्विजानप्यतितरलयते सद्रसेनातिरसान् ॥ १२६ ॥
श्रीरामनाममाधुर्यस्वादसंभृतचेतसाम् ॥
मृद्वीकारसरूपं तु भाति तुच्छतमं भुवि ॥ १२७ ॥

कुत्सितजन्मा नाकुर्वल्मीकं तस्माज्जन्म यस्य स वाल्मीकिरित्यर्थः ना कुजन्मेति यद्विशात्मतया स्थितं तन्नाकुजन्मेत्येकपदमभूत् ॥ १२२ ॥

नामपराङ्मुख निंदति बहिरिति गोत्र नाम ज्ञातयश्च ॥ १२३ ॥

बहुदोषेति बहुदोषविशिष्टससारजन्यउपताप: संतापो बहवः प्रबला ये दोषावा-तादयस्तेभ्य उत्पन्नो य उपतापो रोगः विकृतिमसद्वृद्वं स्वधर्मत्यागादिक रोगांतरं च नाम रसायनं नामरसायनं न भवति तच्च नाम रसायनं सेवितमुद्दिष्टरोगं वारयेद्वा नवेति संशयएव परं रोगांतरमवश्यमुत्पादयेदिति तादृगिद न भवति ॥ १२४ ॥

योघातुकइति घातुकः हिंस्रः अघः पाप्यपि यदृच्छया कृष्ण कृष्ण कृष्ण इति उद्घोषयेद्ब्रह्मरंध्रभेदपुरःसरं कृष्णसायुज्यमाप्नुयात् यथा कृष्ण जिघांसुरघासुरः कृष्णकंठत्वेन मूर्धानं भित्त्वा तत्सारूप्य गतः 'अघासुरः सर्परूपः कृष्णजिघांसया मुखं व्यादाय वने स्थितः गोपशिशुषु गह्वरधियांतः प्रविष्टेष्वपि कृष्णं प्रतीक्षमाणोऽभूत् भगवता तज्ज्ञात्वा तत्कंठ प्रविश्य शरीर वर्धयित्वा तत्कंठनालरोधः कृतः अथ प्राणरोधे जायमाने मूर्धानं भित्त्वा तत्सायुज्यमापेति' भागवते ॥ १२५ ॥

नामैतश्च सद्य्यातिमधुरमित्याहांगेति अंगेति संबोधने अमृतरसो दुग्धरसो मोक्षरसश्च हृद्यो वक्षसि भवः प्रियश्च क्रमः परिपाटी बालान् शिशूनज्ञानिनश्च अद्विजान् दंतरहितान् शूद्रादींश्च सद्रसोऽन्नरसो ब्रह्मरसश्च । सद्विजान् दंतसहितानुत्तमद्विजान्नारदादींश्च ॥ १२६ ॥

श्रीरामेति मृद्वीका द्राक्षा तस्या यो रसस्तस्य रूप तुच्छं भासते यतस्तत् मृद्वीकारो विकारस्तत्स्वरूप 'उपसर्गस्य घञ्यमनुष्ये बहुलमिति' पाक्षिको दीर्घः परिहारवत् ॥ १२७ ॥

श्रीरामनाममाधुर्यस्वादसंभृतचेतसाम् ॥
शर्करां वा सुधां वापि परार्थत्वेन मन्वते ॥ १२८ ॥
मन्ये वेदरसालजं फलमिदं रामेति नामेशितु-
र्व्यूढं गूढरसं तु तत्प्रथमतस्तत्रानुतापे सति ॥
रागोस्मिञ्छनकैरुदेत्यथ महामोदोद्गमानुद्गिरं-
श्चोक्षे चोषितमात्र एव सहसा श्चोतत्यतः सद्रसः ॥ १२९ ॥
न द्विषंति ग्रहाश्चंद्रमेप दोषाकरोऽपि सन् ॥
माहात्म्यमेतच्छ्रीरामनामसंसर्गसंभवम् ॥ १३० ॥
चंद्रो वै परदारधर्षणरतो नक्षत्रमार्गस्थितो ॥
नित्यं क्षीणतनुः कलंककलुषो दोषाकरोऽतर्जडः ॥
ईदृक् सन्नपि यन्न राजपदवीमारूढवान्सांप्रतम् ॥
सोयंऽरामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३१ ॥

श्रीरामेति शर्करां सितां सुधाममृत परार्थत्वेनान्यवाचकत्वेन मन्यते ननु प्रसिद्ध शर्करामृतवाचकत्वेन शर्कराचूर्णं दषत् सुधा चूर्णं ॥ १२८ ॥

ननु नामैतादृङ् मधुर चेदनुभवारूढ कुतो न जायते नहि माधुर्याभिज्ञः कश्चिद्गुडशर्करादिक परित्यज्य तत्कार्यकारित्वेन नामान्यनुसकीर्तयतीति चेत्तत्राह मन्यइति ईशितु. परमात्मनो रामेति नाम वेदाम्रवृक्षस्य व्यूढ विशाल फलमस्ति तत्प्रथमतस्तु गूढमाधूर्यं तत्रानुतापे वैराग्ये ऊष्मणि च सति रागस्तद्विषयप्रेमा तन्निष्ठो रक्तिमा च महामोदः परमामोदो गधश्च चोक्षे सम्यक् पक्के सद्रसो ब्रह्मरसः श्चोतति क्षरति यथाम्रफलमादावम्लमेव तस्य च पाकसमये ऊष्मापेक्षाऽन्यथादार्ढ्य मावहत् न सम्यक् पचेत ततस्तत्र आमोदमुद्गिरन् रक्तिमोदेति ततो वृक्षादनचित्य चोषितमात्र एव रस मुचति तद्वदिदमपीति एतेन परिपाकपर्यंत वेदोदितकर्मसाहित्येनैव कीर्तन जातेपरिपाके न कर्मण्यासंग इति सूच्यते ‘तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता । सत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायत’ इति शुकोक्तेः ॥ १२९ ॥

नाम्नः साक्षात्संकीर्तन महाफलमिति किं वाच्यं यदेतस्य यत्र क्वापि संसर्गोऽपि महाफलइत्याह नद्विषतीति दुराचारपीडका अपि ग्रहा न चद्र द्विषति ‘विधोर्नो रिपुरिति’ ज्योतिषात् रामचद्रइति पदे चंद्रस्य रामसंसर्गो जातइति ॥ १३० ॥

चद्रइति न सुशीलो न च क्षात्रशाली नापि बलिष्ठः नैव कीर्तिमान् न पुण्यशीलो न च बुद्धिमान् तथाऽपि राजभावमापन्नः परदारास्तारा नक्षत्रमार्गआकाशं क्षत्रमार्गाभावश्च कलकोऽकः गर्हाच अतर्जडो मदोऽतर्जलश्च जलमयमडलत्वात् राजा भूपश्चद्रश्च ॥ १३१ ॥

जातः सन् कुटिलत्वमेव भजते संसेवते वारुणीं ॥
शुभ्रांघ्रिर्गुरुदारधर्षणकरो ब्रह्मघ्नसंसर्गभाक् ॥
ईदृक् सन्नपि यद्द्विजेंद्रपदवीमारूढवान्सांप्रतं ॥
सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३२ ॥
जातः सन्कुटिलत्वमेव भजते संसेवते वारुणीं ॥
शुभ्रांघ्रिर्गुरुदारधर्षणकरो ब्रह्मघ्नसंसर्गभाक् ॥
युक्तं तत्क्षयजर्जरो हिमवपुर्यत्त्वेष जैवातृकः ॥
सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ ३३ ॥
विश्वस्यास्य पृथक् पृथग्ग्रह इह स्यान्निग्रहानुग्रहे-
ष्वेकैकोऽपि समग्रकर्मणि पुनः सर्वानुकूल्ये सति ॥
प्रायेणैव महाजनः स्पृहयते चंद्रानुकूल्याय यत् ॥
सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३४ ॥
चंद्रोऽयं क्षयजर्जरः किल तथाप्यादित्यभौमादयः
प्राणिभ्यः सदसत्फलं स्वगतिभिर्दातुं समग्रग्रहाः ॥
सर्वाधारतया श्रयंति यदमी नूनं तदीयं बलं ॥
सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३५ ॥
द्राक्षादीनि फलानि संति मधुराण्येवेति नैवान्यथा ॥
किन्त्वेको भृशमाम्र एव भवति प्रेयान्नृणां सर्वतः ॥
आप्तस्य त्वमुना कथंचिदपि यद्रामेति सर्वात्मनो ॥
नाम्नो वर्णचतुष्टयस्य महिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १३६ ॥

जातः सन्निति वारुणीं प्रतीचीं दिशं सुरां च शुभ्रांघ्रिः किरणः श्वेतदूषितपादश्च ब्रह्मघ्न. शिव 'तेन हि चतुराननस्य पंचमशिरश्छेदः कृतइति' पुराणादौ चंद्रचूडत्वात् संसर्गः अन्यत्र प्रसिद्ध द्विजेंद्रश्चंद्रः ब्राह्मणश्रेष्ठश्च ॥ १३२ ॥

जातः सन्निति जैवातृक आयुष्मांश्चंद्रश्च हिमकरो यस्य हस्तपादाद्यवयवा. शीतला जाताएतावान् क्षय्यासन्नमरण इत्यर्थः एतच्चोक्तदोषफलं युक्तं तथाऽपि जैवातृकः ॥ १३३ ॥

विश्वस्यास्येति सर्वेऽत्र सर्वेषां ग्रहाणामानुकूल्येऽपि चंद्रानुकूल्यमपेक्षते प्रायेणेति 'शुक्ले चंद्रबलं प्रोक्तं कृष्णे ताराबलं स्मृत'मित्यभिप्रायेण ॥ १३४ ॥

चंद्रोयमिति चंद्रस्य बहुदौर्बल्येऽपि सर्वेग्रहाः प्राणिभ्यः साध्वसाधुफलदानेऽस्यैव बलमपेक्षते तद्रामनामवैभवप्रसंगज 'अमृतकिरणरश्मेर्वीर्यमादाय सर्वे ददाति हि फलमेते प्राणिनां साध्वसाध्विति' श्रीपतिः ॥ १३५ ॥

रामेत्यानुपूर्व्याः संसर्गे महाफलमिति किं वक्तव्यं यदानुपूर्वीभंगेनापि यया कथं-

चापः पुष्पमयो मधुव्रतमयी मौर्वी मिता मार्गणा ॥
हीनांगः स्वयमप्यसौ जयति यन्मारो जगत्सर्वशः ॥
आस्तस्य त्वमुना कथंचिदपि यद्रामेति सर्वात्मनो ॥
नाम्नो वर्णचतुष्टयस्य महिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १३७ ॥
अत्यंतं चपला रमा प्रकृतितोऽन्यथा जलध्यात्मभू-
रेवं सत्यपि यद्धरेर्भगवतो द्वेधापि स्थाऽभवत् ॥
आस्तस्य त्वमुया कथंचिदपि यद्रामेति सर्वात्मनो ॥
नाम्नो वर्णचतुष्टयस्य महिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १३८ ॥
पापा ये तु निरक्षराः परदृढासक्त्यैव रामेत्यदः ॥
संसर्गाद्दधति स्थितिं सुनियतं लेखेषु सर्वोपरि ॥
रेफात्मन्युत नापवर्गभवने वर्णे जघन्ये फलम् ॥
यस्माद्दृश्यत एतदत्र निखिलं रामेति संसर्गजम् ॥ १३९ ॥
परं पदमिदं जगद्गमयति स्वसंकीर्तना-
दनंतखरदूषणप्रतिहतिं विधत्तेतराम् ॥

चिद्वर्णग्रहणे फलमित्याह । द्राक्षेति । राम इत्यत्र रेफ आकारो मकारोऽकार इति वर्णचतुष्टय तदाम्रेण गृहीत यथा वाल्मीकिना मरेति तथा आकारो मकारो रेफोऽकार इति ॥ १३६ ॥

चापइति । मार इत्यत्रापि म् आ र् अ इति वर्णचतुष्टयं ॥ १३७ ॥

अत्यतमिति । रमा इत्यत्रापि र् अ म् आ इति वर्णचतुष्टय द्वेधाऽभ्यतरे बाह्ये च ॥ १३८ ॥

पापाइति । पापा अपि रामेति नामसंसर्गमात्रेण लेखेषु देवेषु सर्वोपरि स्थितिं दधति परमेते निरक्षराअपेक्षिताः यत्तेषां दृढासक्तिर्भवति अधीतवतां तु वितर्काकुलतया दृढासक्त्यभावाद्यद्रेफात्मनि रेफरूपे कुत्सितात्मनि च नापवर्गभवने अपवर्गो भवन यस्य स न भवत्यपवर्गभवनः स न भवति नापवर्गभवनः पवर्गीय इत्यर्थः । जघन्ये चरमे वर्णे मकारे मोक्षयोग्यो न भवति तादृशे नीचवर्णे च रामेति समुदितसंसर्गस्य फल दृश्यते यल्लेखेषु लेखनेषु सर्ववर्णोपरि रेफमकारौ स्थितिं कुरुतः परमेतौ निरक्षरौ स्वररहितौ चेद्यथा भर्गः सत्ता न तु सरस समर इत्यादौ कस्मात्साक्षरत्वात् अक्षर तत्कर्मकत्वादध्ययन अकारादिस्वरजात च परे ब्रह्मणि दृढासक्तिः परवर्णेषु च लेखो देवो लेखनं च रेफो रवर्णः कुत्सितश्च नापवर्गभवनः पवर्गस्थो मोक्षानर्हश्च । जघन्योऽत्यो नीचश्च वर्णोऽक्षर ब्राह्मणादिश्च ॥ १३९ ॥

किंबहुना नामेद रामादप्यधिकमित्याह । परमिति । रामेणलेकाऽयोध्यैव परं पद नीता खरो दूषणश्चैकैक एव हतो विश्वामित्रमखश्चैकएव विदितोऽपघाता-

मखानत्रति सर्वतोऽप्यविदितोपघाताद्तो ॥
निकाममपि रामतो जयति नाम तस्योत्तमम् ॥ १४० ॥
सृजति नाम सुशीलवरं जनं रघुपतिस्तु कुशीलवरंजनम् ॥
अहमतः कथयामि गुणाधिकं रघुपतेरपि नाम तदीयकम् ॥ १४१ ॥
महेशो रामाख्यं परमममृतं वेदजलधेः ॥
समुद्धृत्य प्रेम्णा स्फटिकनिभकंठे निहितवान् ॥
जनः कश्चित्पश्येन्मलिनतरदृष्टय्येति भगवान् ॥
धृताशंकः पंकैर्मृगमदभवैः किं स्थगयति ॥ १४२ ॥
मित्रक्षेत्रकलत्रपुत्रसदनद्रव्याणि दिव्यप्रभं ॥
कूर्चं भव्यशिखोपवीतमपि यत् ब्राह्मण्यसंपादकम् ॥
हृत्वाप्यस्य तदंबरं बत बलादादिश्य भिक्षाटनम् ॥
दंडं चापि पुनः स्मरेदिति महावाक्यं श्रुतेर्गोचरम् ॥ १४३ ॥
रातन्मस्त्वमसि द्वयोर्युतिरिति प्रोक्तं रहस्ये महा-
वाक्यं तत्सुलभं नृणां कथमपि स्याद्भुक्तिमुक्तिप्रदम् ॥
यच्चैतत्स्पृहयन्विभुक्तिमति यत् लोकांचया मारुति-
र्भोगाः संतु तवाखिलाइति बलात्सानंदमुत्त्याहतः ॥ १४४ ॥

द्रक्षितः । नाम्ना तु त्रिभुवनं पर पद नीयते । अनेकानि खरदूषणानि हन्यते । 'यस्यस्मृत्येत्यादिना' विदितादविदिताद्योपघाताद्विदिते प्रतिपदोक्ते प्रायश्चित्ते कृतेऽपि तदीयवैगुण्यापनोदार्थं अविदितेत्वर्थादेतदेवेति मखमात्र रक्ष्यते ॥ १४० ॥

सृजतीति । नाम सुशीलेषु वर श्रेष्ठ जन करोति । रामस्तु कुशीलवयो. पुत्रयो रजन लालन करोतीत्यर्थांतर (रामावतारयोगेन रघुवशस्य सूर्यवशस्य भूषण भवतीति ) ॥ १४१ ॥

अत एव भगवान् महेश्वरः परमोत्कृष्टमिति कृत्वा नाम साधु रक्षतीत्याह । महेश इति स्पष्ट ॥ १४२ ॥

'आद्यो रा तत्पदस्यार्थे मकारस्त्वंपदार्थवान् । तयोः सयोजनमसीत्यर्थे तत्वविदो विदुः' । 'तत्त्वमस्यादिवाक्य तु केवल मुक्तिद मत । भुक्तिमुक्तिप्रद चैतत् तस्मादप्यतिरिच्यत ' इति रहस्योपनिषद मनसि निधायाह मित्रक्षेत्रेति कूर्चं श्मश्रु मित्रादि सर्वं हृत्वा भिक्षाटनमादिश्य त्यक्त पुनः स्मरेदेति दड निर्दिश्य तत्त्वमसिवाक्य श्रुतिगोचरं भवति दडो वैणवोऽपराधशिक्षार्थं क्रियमाणश्च ॥ १४३ ॥

रातन्मेति । राकारस्त्वत्पदार्थो मकारस्त्वपदार्थस्तयोर्योगोऽसिपदार्थः एतन्महावाक्य सर्वेषामाचांडाल सुलभ तत्तु ब्राह्मणानामेव नेतरेषां तत्त्वेकांते गुरुशिष्यैकसमधिगम्यमिद तु वाद्यघोषपुर.सर सर्वत्र विराजते । तत्तु सर्वं त्यक्त्वा श्राव्य इद

अनंताकारमप्येतदनंताकारमेवहि ॥
वैपरीत्यं गतमपि नार्थहानिर्मनागपि ॥ १४५ ॥
अपि ललितसुगुणश्रेणिः सालंकाराऽपि या सुवर्णाऽपि ॥
रघुतिलकविहीना चेद्वाणी रमणीव नैव कल्याणी ॥ १४६ ॥
भावप्रधानमस्याख्यातं यत्प्रत्ययः परः प्रकृतेः ॥
तं भज शेषगिरिस्थितमच्युतमिह शाब्दिकं वचःशुद्ध्यै ॥ १४७ ॥
नो जातः प्रकृतेः पर. क्वचिदपि प्राप्नोति यत्प्रत्ययो ॥
लोपं नैव विकल्पते किल यदादेशः प्रवृत्तः क्वचित् ॥

तु सर्वे त्यक्तवतो बलाद्भक्तिमर्पयति । भगवता रामेण वरं वृणुष्वयुक्ते 'त्वन्नाम स्मरतो राम न तृप्यति मनोमम । अतस्त्वन्नाम सततं स्मरन्स्थास्यामि भूतले ' इति हनुमता सर्वत्र विरज्य नामन्येवार्थिते जगज्जनन्या जानक्या 'तमाह जानकी प्रीता यत्रकुत्रापि मारुते । स्थितं त्वामनुयास्यन्ति भोगा. सर्वे ममाज्ञया' त्यादृतः यश्च सीतादव्याऽऽदृतः स आनंदमुक्त्या जीवन्मुक्त्यैवादृतो विद्यामयत्वात् ॥ १४४ ॥

अनंताकारेति । एतद्रामेतिनाम अंते योऽकारस्तेन रहितमपि राम् इति बीजं भवति तच्चानंताकारं 'यथैव वटबीजस्थः प्राकृतश्च महाद्रुमः । तथैव रामबीजस्थं जगदेतच्चराचरमिति ' श्रुतेः विपरीते कृते मरेति जातं चेदपि व्यतिहारः संपद्यते सोऽहमहंस इतिवद्व्यतिहारोविशिंषतीति ब्रह्मसूत्रात् अतएव वाल्मीके-स्तत्फलदमभूत् ॥ १४५ ॥

मोक्षपदवीं प्रस्थितवतां पुरःस्थिता भगवद्गुणरहिता वाणी न कल्याणी 'नत-द्वचश्चित्रपदं हरेर्यशो जगत्पवित्रं प्रगृणीत कर्हिचित् । तद्वायसतीर्थमुशंति मानसा न यत्र हंसानिरमंत्युशिक्षयेति ' शुकोक्तेरित्याह । अपीति यथा ललितमुक्तदामग्रथि-तवेणिः अलंकृतोत्तमांगकांतिरपि रमणी लघुना तिलकेन विहीना यथा ग्रामांतरं प्रस्थितानां न कल्याणी पुरतः स्थिता तथोत्तमप्रसादादिकाव्यगुणानां प्रवाहो यस्या मुपमाद्यलंकारवती वर्णरचनाऽपि मधुरा यस्यां तादृश्यपि वाणी रघुतिलकेन रामेण हीनाचेन्न कल्याणी ॥ १४६ ॥

ननु वाक्शुद्धिर्व्याकरणोपासनमंतरेण न घटत इति किं हरेरुपासनेनेति चेन्न हरेर्व्याकरणरूपत्वादित्याह । भावप्रधानमिति । यस्य आख्यातं कीर्तनं भावप्रधानं भक्तिप्रधानं आख्यातं तिङंतंच भावप्रधानं देवदत्तोगच्छतीत्यत्र देवदत्तकर्तृकं गमनमिति बोधः । न तु तार्किकवत् गमनानुकूलव्यापारवान् देवदत्तइति यस्य प्रत्ययः प्रतीतिः प्रकृतेर्बुद्ध्यादिभ्यः परो यो बुद्धेः परतस्तुस' इति प्रत्ययः सुप्ति-ङादिः प्रकृतेर्नामधात्वादिभ्यः परः प्रत्ययः परश्चेति सूत्रात् शेषगिरिर्वैंकटाचलः शेषावतारस्यपतंजलर्गिरिर्वाचि उत्तरोत्तरं मुनीनां प्रामाण्यात् ॥ १४७ ॥

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छाया येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक ६. सप्टेंबर १८८३. अंक ९.

हें मासिक पुस्तक

पुणें येथें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत

छापिलें.

किंमत ८ आणे.

**सन १८८२ पैकीं.**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री० रा० गो० ना० रिसबुड ... | ४ | रा० रा० भा० बा० गोडबोले ... | १३८२ |
| रा० ब० नी० ज० कीर्तने ... . . | ४ | ,, ,, स० म० ताटके . . ... | ४ |
| रा० रा० कृ० ब० गोडबोले ... | ३८६ | ,, ,, ज० मो० पिंगळे ... . . | ३८६ |

**सन १८८३ पैकीं.**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री० रा० पंत अमात्य साहेब संस्थान बावडा ... .. ... | ५८८ | रा० रा० ना० बा० गोडबोले ... | ८११ |
| रा० ब० नी० ज० कीर्तने ... ... | ४ | ,, ,, से० ने० ला० मुरुड . . | ३८६ |
| ,, ,, आ० स० बर्वे . . ... | ३८६ | ,, ,, प० बा० गोडबोले ... .. | ३८६ |
| ,, ,, रा० वि० पुणेकर .. ... | ३८६ | ,, ,, स० पा० घोंटसकर ...... | ३८६ |
| ,, ,, ग० कृ० माटवडेकर ... | ३८६ | ,, ,, ज० म० गुर्जर ......... | ३८६ |
| ,, ,, ना० ब० जोगळेकर ... | ५८८ | ,, ,, से० ने० ला० एरंडोल .. | ३८६ |
| रा० सा० ये० मो० केळकर ... | ३८६ | ,, ,, ज० मो० पिंगळे .. . | ३८६ |
| ,, ,, त्रि० ना० मंडलीक... .. | ४ | ,, ,, बा० ना० शिंदे ... .. | ३८६ |
| रा० रा० कृ० ब० गोडबोले... ... | ३८६ | ,, ,, त्रि० ग० सांडेकर .. ... | ३८६ |
| | | ,, ,, से० ने० ला० इंदूर ... | ३८६ |

---

"वि० वि०. आपला सन १८८३ चा आठवा अंक वाचीत असतां 'पत्रें व यादीचे' सदरांत पान १२९ येथें "शकून पोत्याबद्दल" टीप ९१ मध्यें ही एक प्रकारची पट्टी असावी असे लिहिलें आहे. परंतु याचा प्रकार माझे पाहण्यांत असलेला आपणास कळवितों. दसऱ्याचे दिवशीं कमाविसदार (मामलेदार) शमीपूजन करून परतले म्हणजे कचेरींत येऊन सरकारी गादीजवळ बसून जमीदार अथवा ज्यांचेकडे गावची वहिवाट असेल त्यांजकडून एक रुपयापासून अधिक कितीही असोत शकुनार्थ सरकार पोत्यास जमा करून घ्यावे, आणि हे रुपये एकदर गांवचे जमाबंदींत मजुरा द्यावे, अशी वहिवाट अजूनही राजधानीत कोठें कोठें आहे. तेव्हां पुरातन वहिवाटही गावचा वसूल म्हणजे पोतें, याच्या प्रारंभास सदर शकून* हे नाव आहे. लोभ असावा हे विनती.

ग्वाल्हेर, ता० १ आगस्ट सन १८८३."

**लक्ष्मण रघुनाथ महाजन उंडनगांवकर.**

* दसऱ्याचा मुहूर्त

*** वरील माहिती दिल्याबद्दल आम्ही रा० रा० उंडणगांवकर याचे आभारी आहों

**का० सं० प्र०.**

## विषयक्रम.

**बखरी.**


नागपूरकर भोंसल्यांची बखर ........................ ४१–४८

पत्रें, यादि वगैरे ........................................ १३७–१४४


**मराठी कविता.**


श्रीरामदासस्वामिकृत—किष्किंधाकांड–भीमरूपीस्तोत्रें ·· ११३–१२०

मोरोपंतकृत—गंगावकिली–उपसंहार–अनुक्रमणिका ·· २३७–२४२


**संस्कृत काव्यें.**


श्रीशिवकाव्यम्- ........................................ १४९–१५६

पंतविठ्ठलकृत–सुश्लोकलाघवम् ........................ २३–४०

कान्होजी भोसले यांजला समागमें घेतलें व राणोजी भोसले याजला सरकारची सनद संताजी भोसले दिल्लींत कामास आल्यावर त्रेचाळीस माहलांची करून दिली होती व सेनासाहेबाकडून सत्तावीस महाल सेनासुभपैकीं राणोजी भोसले याजकडे ठेविले. त्रेचाळीस महालांपैकीं काली भीत मलाड हे सरकार हंडिया प्रांत खानदेश येथील राणोजी भोंसले यांचे नावे करून दिले होते त्यासहित त्याजला देऊन गोंडवण प्रांतीं येण्याचा निश्चय केला; आणि सरकारची आज्ञा घेऊन निघोन आले.

नंतर रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांनीं फौजेची तयारी करून फसली सन ११५५ सालीं बंगाल्यात जाण्याचा निश्चय केला. सातान्याहून येते वेळेस राजेश्रीनीं प्रसन्न होऊन सरदेशमुखीचे बाबदीची व मोकाशाची गोंडवणझाडी तहत कटक याची माफी करून दिली. तेथून नागपूर व देवगड प्रांतीं येऊन राहिले, तरी बुन्हाणशाह व अकबरशाह यांचा अपसात खिसा होऊन अकबरशाह निघोन वराडांत असफजहाकडे गेले होते तेथें सेनासाहेबानीं त्याचे बबर्चीखानेवाल्यास इषारा करून खाण्यांत जहर घालून दगा करविला, याजमुळें तो दगा होऊन मृत्यु पावला, सबब त्याजपैकीं हिस्सा होता तो रघोजीबोवास संतोषानीं बुन्हाणशा राजे यानीं संवत १७९९चे सालीं दिला.

व बंगाल्यात स्वारी [ करण्यासाठी ] सन ११५३चे सालीं भास्कर राम याची रवानगी करून दिली. समागमें तीस हजार फौज दिली. त्यानीं जाऊन रतनपूर प्रांत छत्तीसगड चालते स्वारींनीं लढाई करून किल्ला घेतला. लोक फार जाया जखमी झाले. रघुनाथसिंग राजे याजला स्थापित केलें. त्यानीं आपले तर्फेनीं कल्याणगीर गोसाई त्या कामीं ठेविले. नंतर बंगाल्यांत भास्करपंत गेले तिकडे उपद्रव भारी देऊन प्रांत लुटून टाकिला. मुलूख ताराण करून माघारे नागपुरास आले त्या उपरी रघोजीबोवा साहेबानीं तयारी करून निघाले. समागमें भास्करराम, व गिरमाजी खंडेराव, नरोजी जाचक, रघोजी कराडे मोहनसिंग सरकारचे लेंकवळे, मीर हबिब नांवें सरदार मकसुदाबाद प्रांताचा आला होता तो, व तमाम मन्हाठे मंडळी आदींकरून बरोबर घेतले. थोडेसे जमावानिशीं तुळजो राम याजला गोंडवणचे बंदोबस्तास ठेविले आणि आपण ही बरोबर चंद्रपुराकडे गेले.

गणेशराव ठाकूर पासवान खिजमतगार कारभारी होते त्यानीं प्राचीन दिवाण

---

८९ अन्न तयार करणारा.

९० लेखांक २ पृ० १ ओळ ३, ४ पहा भास्करपंत कोल्हटकर हे ब्राह्मण वीरमालेतील एक तेजस्वी व प्रतापशाली मणि होत.

तिमाजी सखदेव दूर करून महादेव वैद्य केले. ते कांहीं एक दिवस तेथें कारभार करीत होते. त्यांजवर दगा भारी करून पठान मिळोन त्यांचे घरावर चालून गेले. हे पासवान यांनीं पाहून महादेव वैद्य झरपटींत गेले. तेथें मारले गेले. असा अविवेकी कारभार पाहून तिमाजी सखदेव बाबासाहेबाकडे मिळोन बाबासाहेबानीं त्याजवर प्रेम करून फितुराचे पोटीं किल्ला चंद्रपूरचा घेतला. निळकंठराव राजे, चांद्याचे, बाबासाहेबांस येऊन भेटले. तह करून देवगडवाल्याप्रमाणें घरोबा राहून बालेकिल्ल्यांत महालात ठेविले. लाल दरवाजा बालेकिल्ल्याचा त्याजवर अवरंगाबादकर, नबाब असफजाचे बवरचीखान्यावर दरोगे, त्यांशीं फितुर बाबासाहेबीं करून अकबरशाहा देवगडकर राजे नबाबाकडे गेले होते त्याचे खान्यांत जहर घालून मारले. हे कर्म दरोगे याचें नबाबास समजल्या वरून तेथून दरोग निघून इकडे आले. त्यास बाबासाहेबीं भांदक जाहागीर दिले. चंद्रपुरापासून १२ कोसांवर आहे. बारा हजाराचा परगणा सुटी सनद करून दिली वंशपरंपरेनें चालेल असें करून देऊन चंद्रपूरची किल्लेदारी दिली. लालदरवाज्यावर बालेकिल्ल्यावर ठेविले. शिवाजी केशव दाळकुटे यांस ४ हजार फौजेनिशीं किल्ला शहर पन्ह्यान घुटाळे तळ्यावर छावणी करून होते. असा बंदोबस्त राहून बाबा साहेब निघोन बंगाल्याकडे गेले. रतनपुरीं मोहनसिंग भोंसले याजला स्थापित केलें आणि आपण पुढें जाऊन भास्करपंत याजला बंगाल्याचे सरहद्दींत मेदिनीपुरावर ठेवून आपण मकसुदाबादीं जाऊन मोठा उपद्रव [ करून ] मुलखाची तसनस करून जगतशेटाची कोठी लुटली व अल्लाविर्दीखान मोहबतजंग यांस तीन क्रोड रूपये मागितले. त्या प्रसंगीं नबाब अल्लाबिर्दीखान मोहबतसिंग याजला दुसरेकडील शह होता सबब कार्य होऊन, यांशीं वकिलाचे हातीं जाईकडील दिवस घेतले. पुढें त्याची मुसकिलीची मसलत आटोपली.

यानंतर नबाब अल्लाबर्दीखान मोहबतजंग यांनीं आपले जागीं मसलत केली कीं, " हिंदुस्थानांतून बाळाजी बाजीराव पेशवे, संवत् १८०० सालीं गढे मंडळ्याचे सुमारें येऊन लढाई करून मंडळ्यात ठाणें बसवून पुढें गयेचे सुमारें आले आहेत, त्यांशीं संधान करून आपण पारपत्य यांचें करावें." याचे अगोदरच बाबा साहेबानीं जागोजागी खंडण्या घेत गयेस जाऊन अंमल नऊ दिवस केला. गयावर्जनही केलें. नंतर अल्लाबिर्दिखान मोहबतजंग याचे संधान, पंतप्रधानाकडे गेल्यावरून, पंतप्रधान यांनीं भोसले सेनासाहेब यांस

११. ही गोष्ट शके १६६४ सन ११५२ सालीं झाली असें दिसतें. ' पंतप्रधान यांची शकावली ' पृष्ठ ८ पहा.

खर्चास मागितलें त्याजवरून उभयतांचे चित्तांत विकल्प येऊन लढाई परस्पर फौजेशीं झाली. बगाली फसली सन् ११५७ सालीं सेनासाहेबाची शिकस्ती होऊन, तसेच सारे फौजेसहित सातान्यास गेले आणि मेदिनीपुरावर भास्करपंत होते त्याजला पत्रें पाठविलीं त्यावरून पंतप्रधान [?] नागपुरास आले. मार्गांतून बाळाजीपंत पेशवे काशीकडून बुंदेलखडातून येऊन साताऱ्यास पोंहोचले. तें वर्तमान राजश्रीस समजण्यात आलें कीं, सेनासाहेबाचा यांनीं बहुत खराबा केला. त्याजवरून राजेश्रीची मर्जी यांजवर गेली. आमचे आप्त, थोर माणसाचे मुलखांत जाण्यास लढाई करण्यास कारण काय? ह्मणोन पेशवे यांला नऊ महिने खराब केले. आणि भोंसले सेनासाहेब यांजला बहुमान वस्त्रें देऊन, आज्ञा दिली कीं, "आपल्या मुलखात जाऊन बदोबस्त राखावा." असे आज्ञेप्रमाणें सेनासाहेब आपले मुलखात आले आणि भास्करपंत यांची रवानगी बाबा साहेबानीं पुन्हा बंगाल्यात केली. पटण्या प्रांतीं पोंहचून फार गर्दी यांणीं केली. मुलखांत उपद्रव फार भारी होऊ लागला. हें नबाब अल्लाविर्दीखान मोहबतजंग यांनीं मनास आणून भास्करपंतास भेटीचा पैगाम केला. आणि भेटीचा योग घडविला. दोन्ही फौजचे दरम्यान डेरे देऊन भेट करविली. तेथें भास्करपंत याला थोर थोर सरदारांसहित यावें ह्मणून बोलाविलें, याजवरून हेही गेले. तनावे[१२] कापून डेरे पाडून दिले. दग्याचे पोटीं भास्करपंत सरदारांसहित[१३] बुडविले.[१४]

सन ११५८ फसली. फौज लुटून टाकिली हें वर्तमान सेनासाहेबांस समजल्या वरून नबाब अल्लावर्दीखान यांचें पारपत्य करणें जरूर यास्तव तयारी करून बंगाल्याकडे स्वारी निघाली. ते समयीं बाराभाटीच्या किल्ल्यांत व कटकचे

---

१२ तंबूच्या दोऱ्या

१३ ह्या सरदारांचीं नांवें पाचव्या बखरीन ह्मणजे (ड) बखरींत दिलीं आहेत तीं —

१ भास्करपंत २ आलिकरवाल ३ यशवंतराव गुजर ४ नीलकंठराव मोहिते ५ दाजीबा भोंसले ६ बाबूजी महाडीक ७ शहामहंमदखा ८ मनाजी भोंसले ९ नारायण भोंसले १०. सभाजी भोंसले ११ कृष्णराव निंबाळकर १२ बापूजी कदम १३ श्रीपतराव मेहेकर १४ व्यंकटरावराव भाऊ १५ हाजीबा पाठणकर १६ बळवंतराव शिर्के १७ गोविन्दराव शेलुकर १८. सटवाजी जाधव १९ शिवाजी जामदार २०. सुभानजीराव २१. माना बक्षी. २२ जोतिबा कारभारी या गोष्टीच्या संबधानें (अ) बखरींत पुढील लेख आहे —"फौजेची जबरी पाहून भास्करपंताशीं स्नेहभावाचा सदर्प लावून, इनाम देऊन, भेटीचा पैगाम करून [ जाफरालीचे बहाण्यानें ] फौजेचे दरम्यान डेरे देऊन, त्या डेऱ्यांत दग्यानें लोक बसवून पंतास भेटीस आणिलें. डेऱ्याचे तनावे कापून डेरे खालीं लोटून मारिलें. ते वेळेस पंताकडील मोठमोठीं माणसें कामास आलीं"

१४ लेखांक २ पृष्ठ १०—११ यांत भास्करपंताविषयीं बराच मजकूर आहे

सुभ्याचे काम, याजवर नबाब अल्लावर्दीखान मोहबतजंग याजकडून, दुलुभराम होते. त्याशीं संदर्प करून तह करण्याकरिता बोलावू पाठविले. त्याजवरून दुल्लभराम भेटीस आले. त्यांजला यांनीं कैद केले आणि अबदुल अज्जी किल्लेदार याजवर कोसीसै[१५] फार केली. याजवरून त्यानीं आपले तेलबेचा[१६] ऐवज घेऊन किल्ला खालीं करून स्वाधीन करून दिला. आपण निघोन गेला. दुल्लभराम कैदेंत होता, त्याजला सावकारांनीं तीन लक्ष रुपये देऊन कैदेंतून सोडविले.

सन ११५८ फसलीचे सालीं छावणी बिरभोजे[१७] नामें जागा सहश्रावाचे मकसुदाबादेचे दरम्यान होती, तेथें छावणी केली; तेथून बादबरसात निघोन सहश्रावबाले पठाण सामील करून घेतले. ते कटवा नामें जागा आहे तेथें मिरजाफरखान नामे अल्लावर्दीखानाकडून सरदार होता त्याशीं लढाई होऊन रघोजी भोंसले याची शिकस्ती झाली. तेव्हां मीरहबीब नामें सरदार सेनासा हेबाघाशीं होता. त्यानें सल्ला दिली कीं, पुन्हा सावर धरून मकसुदाबादेवर जाऊन त्याजवर फौजेचा समेट करून दुसरे मार्गानें मकसुदाबादेस गेले. त्याचे पिछ्यावर अल्लाबर्दीखान मोहबतजंग याजकडून फौजा जाऊन लढाई झाली. इतक्यात वर्तमान आलें कीं, रघुनाथसिंग नामें दिवाण गोंडराजाकडील बदलून आहे व गोंडाचा उपद्रव देवगड प्रांतीं ज्यास्त झाला." याजवरून माघारे आले. ते वेळेस कटकेचे सरहद्दीवर जमाव व सरदार येऊन किल्ला नन्होजी जाचक याचे स्वाधीन केला त्या मुलखीं शिव भट साठे ठेवून आले. गोंडाच्या पारिपत्यास फौजा पाठविल्या, आणि आपण जातीनें माघारे येऊन रघुनाथसिंगाचें पारिपत्य करून, पौंटनसावगीचे मुक्कामीं गोंडाचें पारिपत्य करून गोंडास पेवांत घालून जाळून मारले आणि चंद्रपुराकडे गेले. कारण चंद्रपुरीं फंद जाहला. चंद्रपूरकर राजाचे शिपायी गोंड व खडाईत मिळोन बडवाई करामाळे तळे इकडील मजबूद होते व पठाण पुन्याकडील पठाण असा १० हजारांचा जमाव करून किल्याचे लालदरवाज्यावर आले. हे किल्लेदार यांणीं लढाई करून तिरदाजी फार केली. शंभर दीडशें माणसें मारिलीं. जमाव जारी, तेव्हां किल्लेदारास धरून हस्तगत केला. मग शिवाजीपंतावर आले. शिवाजीपंत रामनवमीची कथा करीत होते. तवही [ धांस ] आली तसेंच बिनहाल घोडे मैदानाचे, दरवाज्यानें बाहेर पळाले त्यादिवसापासून

१५ कोशीस=पक्षपात रा० व्य० कोश श्लोक २६५.

१६. तलब=आकर्षपत्र रा० व्य० को० श्लोक २६६.

१७. हें स्थळ बिरभूवन असेल. लेखांक २ पृष्ठ १ पहा

१८ लेखांक १ पृष्ठ १० टीप १० पहा.

शिवाजी टाळकुटे [यांस] "बोडखे" नाव पडलें. गोंडानीं ठाणें घेऊन नीलकंठ-शहा बळकावून होते. मग बाबासाहेब सातान्याहून तसेंच चंद्रपुरावर जाऊन तिमाजी सखदेव बाहेरच होते यांचे विद्यमानें किल्ला घेतला. निलकंठशाहा राजा काढून बल्लाळपुरास पाठविला. बल्लाळपूर राजास दिलें. निळकंठ-शाहा तेथे येऊन खडाईत बडवाईक [ ? ] काहीं नागपुरास चाकर ठेवून आणिले ते उमरेड दरवाज्यावर जागा दिली. बाहेर केशवराव बडवाईक त्याचे भाऊ उमाजी बडवाईक काहीं एक दिवस तेथें राहिले. कृष्णाजी नारायण सुभा चंदपुरीं स्थापिला. कऱ्हाडे ब्राम्हण सातान्याचे राहणार त्याचे स्वाधीनही किल्ल्याचा बंदोबस्त ठेवून सेनासाहेब नागपुरास आले.

जानोजी भोसले यां समागमे सन ११५८चे सालीं तुलजो[९९] राम[१००] देऊन फौजे सुद्धां बंगाल्यांत रवाना केले. तशांत अल्लावर्दीखान मोहबतजंग यानीं मिरजाफरखान याजला बिदा केलें आणि सांगितलें कीं "कटकांत ठाणें रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे आहे. व कटक हें सरहद्दीवर त्याज-कडील जमीयत आहे त्यास जमीयतीचें पारिपत्य करावें. ठाणें घ्यावें." त्याजवरून त्यानीं येऊन लढाई फौजेशीं घेतली. इतक्यांत मिरजाफरखान याजला समजलें कीं, रघोजी भोंसले यांचे चिरंजीव जानोजी भोंसले व मीरहबीब नामें सरदार याशिवाय ब्राह्मण कऱ्हाडे सरदार जमीयतीनिशीं भारी जमाव आला आहे. असें ऐकून मीरजाफरखान टाळा देऊन, बरद्वानाचे मार्गानें निघून गेला; ते समयीं जानोजी भोंसले जमावासहित जाऊन पोंहोचले. त्यानीं पहिलीं ठाणीं कायम होतीं त्यांचा बंदोबस्त करून, पुढें मकसुदाबाद प्रांतीं उपद्रव केला. तिकडील लोक बहुत बेजार झाले. हमेषा उपद्रव बारगीर लोकांचा होऊं लागला, म्हणून अल्लावर्दीखान मोहबतजंग याजकडे रयत लोकांची फिर्याद बहुत गेली. याजवरून अल्लावर्दीखान यानीं ऐकून रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांकडे वकील पाठविला. त्यानीं बाबा साहेबास नागपुरात भेटून खंडणीचा वगैरे विचार बोलण्यांत आणिला. तेव्हा सेनासाहेबांनीं उत्तर केले जे, "जेव्हा कोट रुपये खर्चास देऊन बहुत फौजा पाठविल्या तेव्हा तुम्ही खंडणीचा ऐवज देणार, त्यांतही दगाबाजी करणार, तुमचा विश्वास काय? भास्करपंताचा तुमचा मोबदला घेणें जरूर आहे." वकीलानें उत्तर केलें कीं, "झालें तें समर्थ. भास्करपंताचा निराळा मुलूख तोडून देतों तेथें तुमचे स्वस्थान आहे त्या मोबदला मुलखाशीं आमचाही मुलुख लागून आहे. अशी मातबर जागा पातशाही आहे." असें

---

९९ हे रघोजी बरोबर आले पृष्ठ ३१ पहा.

१००. रघोजी बरोबर आलेल्या सरदा-रांपैकीं एक. पृष्ठ ३४ पहा.

नाना प्रकारें समजावून कटक प्रांत वेढासा देऊन तह ठरविला. शिवाय दोन वर्षांची खंडणी राहिली ती २५ लक्ष नगदी द्यावे याप्रमाणें सिद्धांत झाला. तेव्हां नबाब अलावर्दीखान मोहबतजंग याचे पत्रांचें उत्तर लिहिण्यास, फारशी-नवीस बाबासाहेबाचा मुनशी चिटकोपंत खुपमत लिहिणार यास बोलावून, नाव तयार करविले.

ते वकीलाचे विचारास मसुदा न आला तेव्हां भाऊसिंगलाला बुऱ्हाणशाहाचे बक्षी बहुत हुशार मातबर त्याजला बाबासाहेबानीं बोलाविले. आज्ञा केली, कीं "तुमच्या येथें कोणी फारशीनवीस असल्यास आणवावे;" त्यानीं विनंती केली, कीं, "आमचे ज्ञातींत कोणी नाहीं. परंतु राजेसाहेबाचे पदरीं एक ब्राह्मण अळजपुराकडील कोणी एक दिवस आम्हाजवळ होता तो आमचे पाहण्यांत आहे. लिहिण्यांत चांगला आहे आम्हापासोन राजेसाहेबानीं फारशी पढविण्यास नेला आहे. त्याचा १० रुपये दरमहा करारानें ठेविला आहे." त्याजवरून बाबासाहेबानीं राजाकडेस निरोप सांगून पाठविला कीं, "तुम्हाजवळ फारशीनवीस ब्राह्मण आहे त्याजला इकडेस पाठवून द्यावे" तेव्हा भवानीपंत मुनशी यास पाठविलें. त्यानें बाबासाहेबांचे मर्जीनुरूप मसुदे लिहिले. तेव्हा वकीलाकडे तसेच मसुदे देऊन पाठविले. ते पाहून वकील खूष झाला. दोन हजार रुपये बक्षीस पसमशारनिल्हे यास दिले. तेथून सेनासाहेबानीं सुद्धा आपले तर्फेनें २०० रुपये बक्षीस दिले. तसेच पंत निघून राजे बुऱ्हाणशहापाशीं आले यांणींही शभर रुपये यांस इनाम दिले. बाबासाहेबास राजे यांणीं सांगून पाठविलें "पसंत असल्यास ठेवून घ्यावे." असा मजकूर समजण्यात आला तेव्हा साहेबीं सांगून पाठविलें कीं, "माणूस काबील आहे, तुमचे मर्जीस असल्यास बहुत चांगलें आहे." आपले जेव्हापासून ठेविले ते दिवसापासून राजाकडील निरोप बाबासाहेबाकडे आणीत जावा, व उत्तरें नेत जावीं, असें काहीं एक दिवस जानोजीबावापर्यंत चालले.

तिकडेस बंगाल्यात पत्रें अलावर्दी मोहबतजंग याजकडे गेलीं. तह पक्का ठरला. जानोजी भोंसले यांजला लिहून पाठविलें कीं, नबाब अलावर्दीखान मोहबतजंग याजला पत्रें लिहिलीं आहेत. त्याप्रमाणे बंदोबस्त करावा. त्याप्रमाणें जानोजीबावानीं तिकडील बंदोबस्त ठेविला. हे ऐकून बावासाहेब फार संतोषी झाले, आणि साताऱ्यास राजदर्शनास गेले. राजश्रींची कृपा बाबासाहेबांवर फार विशेष झाली.

यांचे जाण्याचे पूर्वी बाबासाहेबाचे चिरंजीव मुधोजी भोंसले देउरात होते. तेथून साताऱ्यास राजश्रींकडे येणें झाले. गोविंदराव चिटणवीस यांजकडेस

ही तसेच राजे फत्तेसिंग भोंसले यांजपाशीं वहिवाट व राजश्रींचे धाकटे राणीचे चुलत बहिणीचे लेंक त्याजला त्यांणीं राजश्रीही लोभ विशेष करून होते. त्या प्रसंगीं गोविंदराव चिटणवीस याचे विद्यमानें विचार ठरला व गांवांतही झालें कीं, राजश्री दत्तक साळीचे* लेकास घेतात. ते समयीं आईसाहेबांनीं ऐकून राजश्रीस आज्ञा केली कीं, तुम्हीं मूल दत्तक हा घेना. त्यांणीं विनंती केली जे, वशांत कोणी नाहीं. आपले आश्राचा मूल चांगला आहे म्हणोन हा विचार ठरविला आहे. राजश्रींचे उत्तर असें ऐकून आईसाहेबांस राग आला आणि बोलल्या, जे तुम्हास भवानीचा वर आहे तो लटका कसा होईल? तुमचा प्रत्यक्ष वंश असतां हा दत्तक कशास पाहिजे." राजश्रींनीं ऐकिलें होतें कीं, आई साहेबांनीं नातु लपवून ठेविला खोटा नाहीं तो खरा आहे.—मग राजश्रींनीं दत्तक घेणें राहविलें. तेव्हां मुधोजी भोंसले वय लहान, परंतु शाहणे फार, जिवास खिन्नता फार केली. बोवासाहेबांची अनास्था, त्यांत सर्व मुत्सद्दी याचे येथे जाणें येणें, त्याचा रस ठेविला असतां बंदोबस्त प्रतिनिधी याणीं, मुधोजी बोवांचें समाधान करून कांहीं स्वारांनिशीं पालखी वगैरे बहुमानानीं ठेविले. नंतर कांहींएक दिवस होते. तेथें धाकटे राणीपाशीं काशीराम लक्ष्मण प्रभु फडणविशीचे कामावर खास देवडीवर होते राणीसाहेब मुधोजीबोवाची मावशी, यामुळें काशीबाचा स्नेह फार, वोळखही फार होती. पेशजी त्यांचे चुलत बंधु नरसिंगराव भवानी प्रभु याजला रघोजी बोवानीं सेनासाहेबांचें पद प्राप्त झाल्यावर घरपागा स्वार शंभर व एकांडे स्वार दोनशें त्याप्रमाणें घेऊन आले होते. तशांत बाबासाहेब राजश्रींचे दर्शनास गेले. मर्जीचा संतोष होऊन माघारे आज्ञा घेऊन येते समयीं मल्हारजी होळकर यांनीं बाबासाहेबास निषेध केला कीं, तुमचा पुत्र ब्राह्मणाचे घरीं राहणें हा काय शाहणपणा? मूल वय किती, सर्व गोष्टींची तुम्हीं अडचण केली असता, येथेंही योग्यतेनें आहे. परंतु तुम्हास उचित नव्हे दैवानीं राजश्री वोटींत घेणार होते. आईसाहेबाचे मर्जीस्तव राहिलें. आतां आपले लौकिकाकडे पाहून जें करणे तें करावें. असे नानाप्रकारचे बोध करून याचे रवानगीचे समयीं मुधोजी भोंसले यांजला समागमे घेऊन निरोपाचे वेळेस विनंती राजश्रीस केली कीं, बाकाबाई नामें कन्या आहे तिचें लग्न व

---

१. ताराबाई

२ शाहूचे.

३ या दत्तक प्रकरणाची हकीकत 'थोरले शाहू महाराज यांचे चरित्रांत' पृष्ठें ९६–९७ पाहिली असता समजेल

४. काशीराव याचे दोन मुलगे त्र्यंबकराव काशी आणि लक्ष्मणराव काशी हे पुढें इतिहासांत प्रसिद्ध आहेत 'श्रीमंत नारायणराव पेशवे' या नाटकांत यांच्या कृतींचें आविष्करण कसें केलें आहे ते वाचकांनीं पहावें

* साळी=मेहुणी

मुधोजी भोंसले यांचें लग्न करणें आहे. त्याचे सोयरीकीचा बंदोबस्त पाहणें आहे. असें बोलून निरोपास घेऊन देउरास आले. मागाहून राजश्रींनीं केदारजी मोहिते याचा पुत्र मानसिंग मोहिते घर चांगलें आहे. याजकरितां सेनासाहेबाकडे त्रिंबकराव कान्होजी प्रभू भालेराव, पेशजी भालेराईत त्याकाळीं त्याचे वडील, सरकारच्या उपयोगी पडले होते यावरून याजवर लोभ करून त्यांची रवानगी केली. ते बाबासाहेबांजवळ येऊन राजश्रींचे आज्ञेप्रमाणें बोलून सोयरीकीचा निश्चय करून सेनासाहेबानीं राजश्रीकडे रवाना केले. ते पोहचून तेथून केदारजी मोहिते व पुत्र मानसिंग मोहिते आज्ञेप्रमाणे घेऊन आले. सेनासाहेबाची भेट होऊन बाकाबाईचे लग्न देउरास झालें. पुढे त्याचा बंदोबस्त सरदारीचा त्रिंबकराव यांचे हातें घेऊन, चार स्वाऱ्याचा कारभार त्रिंबकराव यांस सांगितला. व त्रिंबकराव यांचें जातीचा बंदोबस्त राजश्रींचे आज्ञे प्रमाणे करून दिला. आणि बरोबर कुटुंबासुद्धा व मानसिंग मोहिते यांजला घेऊन नागपुरास आले. त्रिंबकराव कान्होजी यांचें कुटुंब बोरगावीं वराडांत ठेविलें. सेनासाहेब मुधोजीबोवा यांजला समागमें आणिले होते त्याजसमागमें दहा हजार होन देऊन शिवाजी केशव यांचे जिमे कारभार, व दिनकर विनायक व शिवाजी विनायक व नरसिंगराव भवानी परभु यांचे पथक तैनात दिले. ते सिकाकोल, राजमद्रि, विज्यानगर, बस्तरचे मुलकातून रवाना केले. बारा वर्षांचें वय मुधोजीबोवाचें, ते समयीं [ होतें. ] महिपतराव दिनकर आपले तीर्थरूपासमागमें बरोबर चाकरीस होते. वाटेंत स्वारी शिकार करीत मुधोजी बावाचा लोभ घोडे फेरण्याचा शोक मुधोजीबोवास लोभ फार होता. महिपतराव यास भालेबोथाटी खेळणें असा प्रकार. त्या प्रांती जाऊन खंडणी विज्यानगर येथपर्यंत घेऊन द्रव्यही मिळविले. तिकडील हवा घोड्यास वाईट याजकरितां फौजेतील घोडीं फार जाया झाली. म्हणोन लवकर फिरले. ते नागपुरास आले. बाबासाहेबाची मर्जी फार खुष झाली. भरवसा नोहता. परंतु चांगली केली. नंतर छत्तीसगडास रवानगी मुधोजीबाबाची केली. सन ११६०चे अव्वल सालीं वर्षभर तिकडे राहून बंदोबस्त करून माघारे आले.

जानोजी बोवाही बंगाल्यांतून साल मजकूरी आले. भेटी झाल्या. संभाजी सिर्के समागमे होते. जानोजी बोवांनीं आपले घराची चाल टाकून शिर्क्यांचे तऱ्हेचें पागोटें बांधावें व सेमले सोडावे. याजमुळें बाबासाहेबाची मर्जी फार खपा झाली. त्यासमयीं ते मग शिर्के यांजवरही रागास भरले कीं, मुलास खराब केलें असें झालें. या पूर्वी पासून जानोजी बाबावर व साबाजी

५ समला=पागोट्याचा टोंक

ही वाढले. गोविंदरायांचा[२१] सरंजाम घेतला. वरकडही किरकोळ कामें केलीं. शेरें[२२] जहाले. त्यांचीं हीं राजकारणें कीं, नाईक आम्ही एकत्र होतों. कर्नाटकास येतों. रामदासपंतांनीं आणखी फिरंगी[२३] गाडदी ठेवावे. खामखां[२४] आज्ञावर मनसबा[२५] मागती करावा. बाह्यात्कारें सलूख काहीं दिवस दाखवावा व मागे जानबा आमचे मित्रें[२६] पुणियांत तीन महिने येऊन बसले. नित्य आम्हास म्हणत कीं, " मोंगलाजवळ तुम्हीं नवी जागीर मात्र न मागावी. म्हणजे आह्मी त्याची तुमची पूर्ण निखल [ स ] ता करून देतों. " लहान सहानें[२७] आम्हांस लिहीत कीं, " हे सर्व लटके. हे एकाएकीं येऊन तुमचीं घरें जाळतात. " आम्हास वाटे कीं, " लोक आफवेवर काय आहे ? व जानबा आमचे मित्र आहेत, सहसा आह्मास फसवणार नाहींत. " शेवटीं जें जहालें तें दृष्टीस पडलें. बहुत लोक ह्मणतात कीं रामदास पंतानें जानबा याच कामासाठीं पाठविले कीं, तुम्हीं स्नेह मानून गाफील रहावें. जानबा तो दाखवितात कीं, त्यानें लबाडी केली. असो. याचा अंत ईश्वर जाणे. एकदा मात्र तुह्मास लिहिलें होतें कीं, याउपर गाजुदीखानाचें येणें कामाचें नाहीं यांचा आमचा स्नेह होत आहे. परंतु बिघाड जहाल्यापासून निरंतर हेंच लिहितों कीं, " खामखा गाजुदीखानास आणावें. वजीराचा लेक सुभा[२८] करून आणिला तर मागें कुंचेदे[२९] दिल्लींत करितील[३०]. व येथें मोंगल, मराठे भेटणार[३१] नाहींत. गाजुदीखान आलिया सहेल[३२] पडेल. मोंगल व मराठे मातबर सर्व बऱ्हाणपुरावर येऊन भेटतील. एक फिरंगी गाडदी नवी फौज मात्र राहील[३३]. पठाण[३४] कर्नाटकांत बलावले आहेत. महमद अलीखानें[३५] त्रिचनापल्लीस बलाविला आहे सर्व गाजुदीखानास अनुकूळ पडतील. दुसरे, तुम्ही तिकडून, गाजुदीखान दहा पंधरा [हजार, ] आह्मी हिकडून, येणेंप्रमाणे मनसबा उभा राहतांच सर्व कामें होऊन जा-

---

२१. गोविंदराव चिटणीस असावे. हे पेशव्यांच्या पक्षांत होते.

२२. शेर=समर्थ, जबरदस्त.

२३. येथें फिरंगी म्हणजे फ्रेंच.

२४. खामखां=कसेंही करून, सर्व यत्न करून

२५ मनसबा=स्वारी, हल्ला

२६. 'मित्र' ही व्याजोक्ति आहे मित्र ह्मणविणारे पण खरे शत्रु.

२७ लहानसहान सरदार, जाहागिरदार

२८. वजीराचा लेक सुजा उद्दौला.

२९ कुंचेदे=खटपटी, कारस्थान.

३०. गाजुदीखान यास आणिल्यास पाठीमागें ते दिल्लीस कारस्थान करतील, असा भाव

३१ वजिराचा पुत्र सुजा यास दक्षिणचा सभा करून आणिल्यास त्यास इकडील मुसलमान अगर मराठे अनुकूळ होणार नाहींत, असा भाव

३२ सहल=सोपें, सोइचें.

३३ फ्रेंच व दुसरी नवी फौज.

३४ पठाण—हे कर्नोळ, कडपा व सावनूर येथील नवाब असावे

३५. महमदअली हा अर्काटचा नवाब

तीळ. सारांश रामदासपतानें अब्रू घेतली ही एकदा हरतजवीज करून त्यास पुर्ती जरबें[३६] देणें घडल्याबांचून तुम्हांस कैलासवासी[३७] यांणीं वाढविलें, व तुह्मी इराण तुराण पावेतो लौकिक केला, तो सर्व व्यर्थ ! आम्ही ही रा-[३८]यांचे वशीं व्यर्थ जन्म घेतला[३९]. या उपरि तुम्हीं खामखा त्यांसे[४०] आणावें अथवा त्यांनीं दसरा करून मागून यावें. तुम्हीं खामखा देशास यावें. शपथपूर्वक हा मनसबा करावा तरच उत्तम आहे. मागें यावें यावें हें लिहित गेलों. न आ-ला. आतां त्याचा पुढील रग जाणून सर्व विस्तारें लिहिलें आहे. याउपर याल यात संशय नाहीं. या पत्राचे उत्तर यथार्थ सत्वर पाठवणें. गुजराथचे कामास फौज गेली. श्रीकृपेनें काम होत चाललें. जेव्हां म्हटलें तेव्हा जवळ आहे. या उपर गाजुदीखानास पूर्ण भरवसा देऊन वजिराशीं लगाम राखून शेवटीं न तोडितां दक्षणचे कामास उपयोगीं पडत तें करून यावें. सर्वस्व वेचून एकदा रामदासपत मोडावा[४१]. ते आम्हावर मनसबा करितात यांत संशय नाहीं. तुम्हीं हल्लीं लिहिल्याप्रमाणें केलिया सहजच ते हतप्रभ होऊन मोठें यश तुम्हास येतें. या उपर तुम्ही न आलिया मनसब्यास वाईट, मनास वाईट, यास्तव मनसबा सिद्ध करून यावे. कदाचित गाजुदीखान नामर्द, फौज न ठेवी, बाहेर न निघे, तर दुसरा कोणी पधरा हजाराचा धनी आणावा. निदानीं तुम्हीं यावें. येथेंही फौज फार आहे. रामदासपतास तुम्हीं आम्ही एकत्र जहाल्यास अगाध[४२] नाहीं. रघोजी बावाही येतील. लाभही उत्तम होईल. हें सर्व मनन करून उत्तर सत्वर पाठवावें. येथेंही तरतू [ द ] करीत आहो. ऐवजाची मात्र मोठी वोढ आहे. तुम्हीं आलिया सर्व वारेल. सांप्रत नवें वर्तमान कीं, त्रिंबकें[४३] आम्ही न दिला यासाठीं रामदासपंत औरंगाबादेस येणार. मग किल्लाही कदाचित देणें पडेल. जागिरीचा जाबसाल त्याकडूनही अद्याप जहाला नाहीं. मोठा लबाड दगाबाज आहे. सारांश एकदा त्यास जरब द्यावी तरच सर्व सार्थक आहे. छ २१ जमादिलावल. लेखनसीमा. पौ छ ३० जमादिलावल[४४].

---

३६. जरबदेणें=खोड मोडणें.

३७. कैलासवासी बाजीराव बल्लाळ.

३८ यावरून आपणास जो तह करावा लागला त्यानें व मराठेशाहींत रामदासपत जी ढवळाढवळ करीत होता तिनें बाळाजी रावास फारच संताप आला होता असें दिसतें

३९. गाजुदीखानास

४० सफदरजंगाशीं स्नेहभाव ठेवून

४१. पेशवे फारच हैरेस पडले होते वर टीप १८ पहा

४२ रामदासपतास मोडण्यास कठीण नाही असा भाव.

४३ कबूल केलें ( वर पहा ) पण देण्यास उशीर लाविला असा भाव ?

४४ हें पत्र मोठ्या कारस्थानाचे आहे पेशव्यावर अनेक संकटें उत्पन्न झालीं असतां त्यांतून साम दाम दंड भेद यांणीं ते त्यांतून कसे पार पडले वगैरे गोष्टी या

( पुढे चालू )

[ १६२ ] श्री.

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेो॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित असिलें पाहिजे. विशेष. तुम्हीं जयनगरहून निघालियावर एक पत्र आलें त्या आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तुमची व नवाब वजीर यांची भेटी जाली, यमुना पार होऊन कादरगंजा जवळ दहा हजार पठाण सरदार सुद्धां बुडविला, तेंही वर्तमान परभारेंच येऊन पोंचले. तदोत्तर अहमदखां पठाण बंगस प्रयागास खासेरा करून होता तो उठऊन फरोखाबादेस येऊन लढाईस नमूद जाहाला. त्याची तुमची लढाई सुरू जाहली. अहमदखां बंगशानीं फरोकाबाद सोडून गंगातीरास बेहडा अडचण जागा पाहून आरावा रचून त्याची तुमची नित्य लढाई होऊं लागली. तथापि वर्तमान लिहिलें नाहीं. याजवरून अपूर्वता, आश्चर्य वाटलें. प्रस्तुत राजश्री दामोदर महादेव यांचें पत्र छ ७ जमादिलावरचें छ ५ रजबीं येऊन पावले कीं, "अहमदखा बंगस बाहादूरखां रोहिल्यास शरण जाऊन त्यास दहा बारा हजार स्वार व प्यादे यांजसीं कुमकेस आणिलें. सुरेंदाराची फौज व जाटाची फौज व नवाब वजीराची फौज गंगापार होऊन छ ३ जमादिलाखरीं लढाई जाली. बाहादुरखां रोहिला बुडविला. हजारो घोडीं घेतलीं. हत्ती पाडाव केले. हें वर्तमान बंगशानीं ऐकून घाबरा जाला. दुसरे दिवशीं पळून गंगापार गेला. लष्कराच्या लोकांनीं घोडीं पाडाव फार आणलीं. तोफखाना पाडाव केला." म्हणोन लिहिलें तें श्रवण होऊन संतोषा-

---

(मागील पृ० )

वरून चांगल्या लक्षात येतील. गाजुदीखानाच्या मसलतीचा हेतु हा होता कीं, दक्षणचा सुभा आपले कबजांत राहवा, किंबहुना पुढें मागें सर्व दक्षण आपले अमलात यावी.

हें व पुढील ४ मिळून पांच पत्रें रा० रा० काशिनाथ कृष्ण लेले इंदुरकर यानीं आम्हास दिलीं. हीं सर्व असल आहेत. वरील पत्रांतील शेवटचा बराच मजकूर खुद्द खाशाच्या हातचा आहे. आम्ही नकला घेऊन अस्सल पत्रें लेले याजकडे परत केलीं.

४५. नवाब वजीर=अयोध्येचा नबाब सफदरजंग

४६ प्रथम अफगाणिस्थानांतून जे मुसुलमान आले त्यांस पठाण म्हणण्याचा प्रघात आहे

४७. खासरा म्हणजे ? आसरा तर नव्हे ?

४८ नमूद=दजू, उद्युक्त.

४९ बेहड=नाल्याच्या प्रवाहामुळें झालेली खोल भेग

५०. आरावा=तोफखाना

५१. हे कोण ?

५२ शिंदे होळकराची.

५३ सुरजमल्ल जाट

५४. पाडाव केले=धरिले

च्या कोटी[५५] जाहल्या. शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी-रुस्तुमीची[५६]! व शाबास लोकाचा! आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुना गंगा पार होऊन रोहि-ले पठाणांसीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न जालें! तुम्ही एकनिष्ठ, कृतकर्मे सेवक. या दौलतीचे स्तंभ आहा!! जें चित्तावर धरि-तां तें घडून येतात. पहिलीं यशावह कर्में संपादिलींत ततोद्यधिक हें यश सं-पादिलेंत. या यशास जोडाच नाहीं! परंतु केल्या मनसुबियाचा अर्थ किमपि लिहीत नाहीं ऐसें नसावें. सर्वदा आपलें कुशल वृत्त लिहित जाणें. तेणें करून संतोष होत जाईल. मोठीं मनसबा कठीण होता. नानाप्रकारचीं येथें वर्तमानें उठतात. तुमचें पत्र तो येत नाहीं. याजमुळें चित्त चिंतेंत होतें. इराण *तुरान पावेतों लौकीक जाला कीं, वजीर मोडला, पळोंलीं असतां फि-रोन फत्तेच्या मसनदीवर बसविला. याजहून यश कोणतें अधिक आहे ? या उपरि तेथील रंग भरून, स्वकार्य साधून, आपलें मुलुखांत येणें योग्य आहे. छ ७ रजब बहुत काय लिहिणें[५९]. लेखनसीमा.

[ १६३ ]  ॥ श्री ॥

राजश्री सांबाजी सिंदे गोसावी यांसि.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद सु॥ इसने खमसेन मया व अलफ तुम्हाकडून पत्र येऊन वर्त-मान कळत नाहीं ऐसें नसावें. सर्वदां आपलें कुशल वृत्त लिहीत जावें यंदां सरदारांनीं मोठा अवघड मनसुबा करून, यमुना भागीरथी पार होऊन, पठाण रोहिल्याशी गांठ घालून, युद्धप्रसंग करून पन्नास साठ हजार फौज बुडविली. तुम्हीं सर्व लोकांनीं जिवाची तमा न धरितां साहेब-कामावरीच दृष्टि देऊन शत्रु शासनाक्रांत केलात. तुमची निष्ठा दृढोत्तर, तद्योगें यश रामेश्वर इराण *तुरान

---

५५ संतोषाच्या कोटी=अति आनंद

५६ दिलेरी-रुस्तुमीची=धारिष्टाची व पराक्रमाची

५७ येथपासून वृद्ध भाऊंच्या हातचें अक्षर आहे

५८ सफदरजंगास पठाण लोकांनी पदच्युत केलें होतें, त्यास पुन वजीरी दिली

५९ हें पत्र वाचून हल्लींच्या हतवीर्य लोकांसही क्षणभर स्फुरण येईल नेव्हां वर्गानीं असे पराक्रम केले त्या लोकास हा स्वामिगौरव अमृताहूनही गोड लागून त्याचें शरीर दुणावलें असेल यांत संशय नाहीं !

६० साबाजी शिंदे हे राणूजीचे कोण हें समजत नाहीं. भाऊसाहेबांच्या बखरींत साबाजी शिंदे यास दादासाहेबांनीं लाहोर येथें ठेविलें होतें असें आहे. भा० सा० ब० पृष्ठ ५१ व ५७ पहा. तेच साबाजी हे असावे. हे हल्लीं जयाजी शिंद्यांच्या लष्करांत होते असें दिसतें.

६१ शिंदे होळकर

६२ साहेब काम=स्वामिकार्य 'स्वामी साहेब इरिल' रा० न्य० को०

* 'इराण' असेंही होईल.

पर्यंत प्रफुल्लित जालें शाबास सरदाराची! व शाबास तुम्हां लोकांची आहे!! दुसरियास हें यश फार दुर्लभ असे. इकडील वृत्त राजश्री जयाजी शिंदे यांस लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. अतःपर माघारें यावें. रवाना छ २६ रजब बहुत काय लिहिणें. लेखन सीमा.

[ १६४ ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजीत राममान्य राजश्री आपाराव स्वामींचे सेवेशीं.

पो। बाळाजी जनार्दन सा। नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. तुम्हीं छ १४ सवाल छ २१।२४ व छ २९ जिलकादचीं पत्रें पाठविलीं ते पावलीं. तह प्रकर्णीं राजश्री पाटील बाबांचें व इंद्रसेनांचें बोलणें जालें त्यांतील मजकूर कलमबदी लिहून पाठविला तो सविस्तर कळला. पाटील बाबांनीं लिहिल्याप्रमाणें तहनामा व डौलें शिक्यानशीं लौकर आलें पो। येविशींचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास येविशींचे मजकुराचीं पत्रें पाटील बाबाचीं ही तीन चार रवानग्यांचीं आलीं. त्यांत लिहिलें कीं, "श्रीमंत दादासाहेबांस इंग्रजानीं स्वाधिन करावें असें पक्कें करून घेतलें आहे व येथून कलमाची याद पाठविली होती त्यांपैकीं कांहीं कलमें बोलून करारांत आणिलीं आहेत. परंतु पूर्वीं पारशी नक्कल तहनाम्याची येथें पाठविली, त्याप्रमाणें शिक्का करून तहनामा पाठवावा; व एक डौल शिक्का करून पो।, शिक्याचा तहनामा इंद्रसेनास *दाखवून. येणें करून त्यास इतबार पुरेल व जावयाची जलदी करणार नाहीं. हा तहनामा आम्ही आपल्या जवळ ठेवूं, त्यास देणार नाहीं. दादासाहेबांचें कलम वगैरे कलमें ठरावांत आलीं, त्याप्रमाणें डौलांत भरून त्याप्रमाणें इंद्रसेनाकडून कलम त्याचा तहनामा आणवून मग हा देऊं." असें लिहिलें. आणि मुदतीचीं पत्रें पाठविलीं त्यावरून तहनामा शिक्यानशीं व डौल पो। आहे. परंतु दादासाहेब यास अगोदर स्वाधीन करून घ्यावें. मग किल्ले मुलुख सरकारचा सरकारांत घ्यावा. तरच तह करावा. याप्रमाणें होत नसल्यास करूं नये म्हणून राजश्री पाटील बाबाचे पत्रीं लिहिलें आहे व नारो शिवदेव यांस ही विस्तारें करून लिहिलें आहे. त्याजवरून तुम्हास सविस्तर कळेल. तुम्हीही पाटील बाबाशीं

---

६३ येथे बाजूवर पेशव्याचा शिक्का आहे

६४ पाटील बाबा=महादजी शिंदे.

६५. इंद्रसेन—हा इंग्रजाचा वकील किंवा दुभाष्या हा जातीचा कोण तें स्पष्ट कळत नाहीं तरी बंगाली बाबू असावा असें अनुमान होतें

६६ डौल=सही, शिक्का करून पाठविलेला कोरा कागद ज्यावर तहाचीं कलमें लिहून इंग्रजांचे तो स्वाधीन करावयाचा होता

* म्ह० दाखवूं

बोलून अमलांत आणावें. इंग्रे[६७]जाचे तहाचें काम फार नाजूक व मोठें आहे. कोठें कसे पेच बसतात व पुढें बसतील हें सविस्तर अर्थ मशारनिलेचे पत्रीं लिहिलें आहेत. साराश दादासाहेब स्वाधिन होत असेल तरच [ त ] ह करावा व हैदरखा[६८]नाचे कलमाचा पर्याय लिहिला आहे. हीं दोन कलमें, वरकड साधेल तेथवर, याप्रमाणें जहालें तरच करावें. नाहीं तर करू नये. मग श्रीमताचे दैव आहे. रवाना छ १५ मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असों दिजे हे विनती. पौष शुद्ध ९ रविवार. मुक्काम बिलोटी [ बलोटी, बमेटी? ]

[ १६५ ] ॥ श्री ॥

राजेश्री आपाजीराव स्वामीचे सेवेशीं.

विनती उपरि तुम्ही छ ११ जमादिलाखरचे पत्र पाठविलें तें पावलें. धुं[७०]-ळपानीं इंग्रजाचे त[७१]रांडियासि लढाई देऊन धरून नेली त्याविशीं इंद्रसेनास मुंबईकरानें वर्तमान लिहून पाठविलें. त्यानें राजश्री पाटीलबावास सांगोन पाठविलें. त्यावरून पाटीलबावांनीं स्वामीस पत्र लिहिलें आहे. व पांडुरग रघुनाथ यांणींही सविस्तर लिहिलें आहे. त्यास करारप्रमाणें गोष्टी अमलांत याव्या. धुळपास ताकिद होऊन तराडीं माघारीं देवावीं म्हणून विस्तारें करून लिहिलें ते सविस्तर कळलें. त्यास धुळपानीं तरांडीं वरील सरदार व लोकसुद्धां द[७२]स्त केलीं ते तह जाला त्यापक्षीं सोडून द्यावयाचीं त्यात मुंबेकराचें पत्रही आलें. त्यावरून तेव्हांच धुळपास लिहून सोडून दिल्हीं. राजश्री पाटीलबावास उत्तर लिहिलें आहे. रवाना छ १५ रज्जब हे विनती.

[ १६६ ] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंबा[७३]जीपत स्वामी गोसावी यांसि

सेवक बाजीराव साष्टांग नमस्कार विनति उपरि येथील कुशळ तागाईत ज्येष्ठ कृष्ण सप्तमी गुरूवार पर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहिणे. विशेष–तुमचीं

---

६७. येथपासून खुद्द नानाचें अक्षर आहे

६८ हैदरअली म्हैसूरचा

६९. सालब्याचा तह महादजींचे मार्फत इंग्रजांशी झाला ( १७८२ ) त्या संबधाचें हें पत्र आहे. वरील आपाराव कोण तें समजत नाहीं

७०. आनंदराव धुळप देवगडकर याजकडे पेशव्यांचे आरमाराचा भाग होता धुळपानीं इंग्रजाच्या तारवाशीं रत्नागिरीच्या सुमारास लढाई करून त्यांचा पुष्कळ नाश केला या धुळपावरील एक पवाडा ‘ विविधज्ञानविस्तार ’ या पुस्तकात छापिला आहे

७१ तरांडीं=तारवें

७२ दस्तकेलीं=जिंकून घेतलीं.

७३ अंबाजीपत पुरंदरे तासघडकर यास मो॰ रा॰ आबाजी असें ह्मणतात ती चुकी होय.

दोन तीन पत्रें व बाळाचें[७४] पत्र व राजश्री स्वामींचीं[७५] पत्रें ऐशीं काहीं काळीं परवा ऐशीं पावलीं. त्यांत साराश कीं, "छावणी केली उत्तम केलें. खर्चास व लोक राजश्री स्वामी पुरवितात. प्रतिनिधीस व सरलष्कर, कृष्णाजी दाभाडे रवाना केले. महाडास येतील[७६]. उदाजी चव्हाणाकडील कारकुनास सांगोन दोन हजार प्यादे आणविले आहेत तेही येतील. संभूसिंग चव्हाण यासही बोलाविलें आहे. तेही आलियावर रवाना होतील. सचिवासही निरोप दिल्हा." म्हणून सविस्तर लिहिल्याप्रमाणें कळलें. परतु येथील मनसबा ऐसा आहे. शेखजी[७७] आम्हास भेटले. खो क री ची वाट मात्र त्यांणी दाखवून दिल्ही. काम करिता इतकेच केलें. येथें येतांच दुसरे दिवशीं त्यास बोलावून हत्ती, वस्त्रे देत होतों. खर्चाची रदबदल करू लागले. तेव्हा बोली करून तूर्त दहा हजार रुपये त्याचे पदरीं घातले. बहुमानासाठीं बहुतसा आग्रह केला. परतु ते करून घेईनात. लोक कोणी त्याजवळ राहिले नाहींत. सारे उठ-उठोन आपापले कबिले[७८] काढावयास गेले. तेव्हां गड सुटले नव्हते. आतां गड सुटले. सारे कबिले मुलखातच मागती राहिले. लोकांस मागती बोलावू पाठविले आहे. येतील तेव्हां खरें. पहिले लोक कोणी शें दोनशें भेटले त्यांस अटक करून ठेवावें तरि कौल दिल्हा कार्य होतें[७९] कौलाचेंच होतें यास्तव त्यास अटकही करिता नये. यास्तव निरोप दिल्हा. आतील राजकारण होतें ते तो पहिलेच दिवशीं वारलें. आता प्रस्तुत काही शेखजीच्याने कार्य होत नाहीं. बरेंही वाटत नाहीं. चार महिने येथें राहिल्या उपरि मग त्यांच्यानें तरतूद होईल ते करतील. खर्चास मागतील तसे देणे लागेल. गड घेतले त्यांपैकीं अवचितगड त्याचे हवाली कबिले ठेवावयास करावा असे झालें. तोही त्याचे हवाली केला. न करावा तरि बेदील होतो. करावा तरि ईतबारही[८०] पुरेना. परतु करणें प्राप्त झाला. केला. या जातीचे त्यांचें वर्तमान आहे. खानजादा थोरला मेला. त्याचा लेक बाहेर होता तो आम्हाजवळ आहे. आणि लहान भाऊ त्याचे सहाजण आहेत. हाही मूल शहाणाच आहे. आंत सिद्दीसमूल व सिद्दीअबर अ फ ला नी ऐसे आहेत. बाराशें माणूस किलियावर आहे. पहिले थोडके होते. आलीकडे अंजनवेली व *उंदेरीहून मदत त्यास आली. एकूण भरती झाली

---

७४ बाळा=बाळाजी बाजीराव

७५. स्वामी=शाहू

७६ हें पत्र हबशी याच्या मसलतीच्या सबधाचें आहे.

७७ शेखजी--हा जजिऱ्यातील एक फितुरी

७८. कबिले=कुटुंबें

७९. येथें अक्षर गेलें आहे.

८०. इतबार=विश्वास

८१ शिद्दीच्या मुलापैकीं वडील

* उंदेरी कीं खांदेरी तें स्पष्ट नाहीं तरी पुढील सदर्भावरून उंदेरीच असावे

आहे. अंजनवेलही मजबूतच आहे. उंदेरीही मजबूतच आहे. चारी जंजिरें[८२] त्याचे बरे खबरदार मुसलमानच आहेत. अंजनवेलीस काहीं मराठे असतील. त्यांकडे विजयगड, गोवळचा कोट दोन आहेतच. तिसरा मंडणगडही त्यानें वळाविला आहे. रायगडावर तीन चारशें माणूस मुसलमान आहेत. चार पांचशें मराठे आहेत. गड म [ ? ] वळाविला आहे. जुजतात. काहीं पैंगामही वरील लागला म्हणून गेले आहेत. ते लिहितात सत्य मिथ्या त ही कै क तह किंवा नाहीं कळलें नाहीं. वर्तमान येईल तें लिहून पाठवून. ऐसें वर्तमान आहे. सविस्तर कळावें म्हणून लिहिलें असे. लोभ असो दिजे हे विनती. छ २२ जिल्हेज शनवारीं.

[ १६७ ]     ॥ श्री ॥

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५२ प्लवग संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं* राजश्री अंबाजी त्र्यंबक यांसि आज्ञा केली ऐसीजे. मनसुब्यांचा अर्थ सविस्तर राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस लिहिला आहे त्यावरून कळेल. तरि तुम्हीं पंडित मशारनिल्हेस चार गोष्टी विचाराच्या सांगोन अमित्रांचे पिछावरि * * ८७* कु य त फितूर तुटे तो अर्थ करणें. तुम्हीं स्वामीजवळ बोलोन गेलां काय, करितां काय, हा विचार कळत नाहीं. राजश्री प्रधानाचे व राजश्री सेनापतीचे चित्तीं विचार काय आहे हा तर्‍ही शोध घेऊन लेहून पाठवणें. त्यावरून स्वामी निश्चिती मानितील. गुज काढावयाचा विचार चित्तात येत नसेल तरि इलाज काय? वारवार त्याहावयाची सीमा झाली. परंतु कार्यभागाचा विचार दिसत नाहीं. या उपरि तरि गुज काढावें. फितूर तुटावा ऐसे चित्तांत असेल तरि पत्रदर्शनीं फौजेनिशीं अमित्राचे पिछावर येऊन त्याची वाताहात करणें[८८]. वर्हुतें काय लिहिन.

---

८२. जजीरा जजीरा=पाण्यातील किल्ला

८३ तहकीक= तथ्य, खरें वर्तमान

८४ हें सर्व पत्र बाजीराव बल्लाळ यांच्या हातचें आहे. अक्षर चांगलें वळणदार नाहीं हें पत्र व पुढील काहीं आम्हांस श्री० रा० नाना साहेब पुरंदरे सासवडकर यांणीं दिलीं या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों

*येथें कोरी जागा आहे

८५ हा 'मनसुबा' कोणता ?

८६. अमित्र=शत्रु, गनीम

८७ येथें कोरी जागा आहे.

८८ वरील सेनापतीच्या उल्लेखावरून हा त्याचा फितूर निजामुल्मुल्क याजकडे झालेला असावा असें दिसतें तो फितूर नाहींसा करण्यास निजामावरच हल्ला करावा असा शाहूचे लिहिण्याचा भाव दिसतो

८९ येथून खुद्द महाराजाचें अक्षर.

शिरावाँल घालोनिया वाम जानू । ह्मणे गूण तूझे किती काय वर्णूं ॥
बळी तू बळाचा दुजा स्वामि कैंचा । वदे विक्रमू सत्य जो सत्यवाचा ॥ १२१ ॥
तरी अंगदें सूचना सर्व केली । यथार्थे तरी मीं बहू जाणवीली ॥
रघूनाथ विख्यात पुरुषार्थ ज्याचा । मरीचीसि तो घाय वारा जयाचा ॥ १२२ ॥
सुबाहू रणीं पाडिला एक बाणें । अधीं ताटिका मारिली थोर त्राणें ॥
शिवें चाप दीलें तया भार्गवाला । बळें भग्न केलें महा दर्प ज्याला ॥ १२३ ॥
असा राम जो साह्य त्या सुग्रिवासी । बळें ताड छेदूनि छेदी गिरीसी ॥
कशी वेळ आली अशा वाळिला हे । इया ऊपरी काळ तो क्षीण आहे ॥ १२४ ॥
किती बोलिल्या काहिं केल्या न राहे । वदे मागुता मागुता घोर आहे ॥
तुजेलागीं त्या राघवें मुक्त केलें । परी भाग्य सौभाग्य माझेंचि गेलें ॥ १२५ ॥
बहू ताप संताप ऊदंड केला । रघूराज तो सन्मुखी देखिपेला ॥
प्रभूशीं तशी बोलती शीघ्र जाली । असभाग्य ते स्तुति ऊदंड केली ॥ १२६ ॥
दिनोद्धारणा कारणा भक्त-पाळा । रघूनायका दीन-कारुण्य-लीळा ॥
तुझें नाम विश्राम लोकत्रयासी । निजध्यास विश्वास मोठा शिवासी ॥ १२७ ॥
नव्हे न्याय अन्याय दीसूनि आला । कसा साह्य जालासि त्या सुग्रिवाला ॥
तया रावणालागिं बांधोनि घाली । तशा वाळिशीं मैत्रिकी कां न केली ॥ १२८ ॥
अयोध्येसि तो भरतू राज्यकारी । सिता रावणें चोरिली दिव्य नारी ॥
तुझा शत्रु जो सोडिले कां तयाला । कपी वाळिनें काय अन्याय केला ॥ १२९ ॥
पुढें वाळिची मूर्छना शांत जाली । रवी-सूत ऊभा वरी दृष्टि गेली ॥
बहुतां परी सुग्रिवा हीत सांगे । झळंबे मनीं लोभ तेणें प्रसंगें ॥ १३० ॥
जगन्नाथ हा राम कारुण्य सिंधू । कृपाळूपणें भेटला दीनबंधू ॥
महासूकृतें जोडले पाय तूझे । बहूता परी आदरें साह्य कीजे ॥ १३१ ॥
कपी सर्व घेऊनि जा त्रीकुटासी । रघूनाथ मारील त्या रावणासी ॥
सिते विश्वमातेसि आणूनि देईं । तयाऊपरी तू पुरीमाजि जाईं ॥ १३२ ॥
पुढे सर्वदां सख्य त्याशीं करावें । कदा ही अणूमात्र रीतीं नसावें ॥
तुला थोर आधार हा जाण भावे । पुरीमाजि त्वां राज्य सूखें करावें ॥ १३३ ॥
महा थोर हें राज्य किष्किंधपूरी । असावें बहू विक्रमें नामधारी ॥
परी पाहतां सर्व ही तूज आहे । परी युक्तिनें बुद्धिनें नीति राहे ॥ १३४ ॥
बरें पद ते मंत्रिया अंगदाला । जसा मी तसा तू चि आहेसि त्याला ॥
किती सांगणें तूं भला दक्ष आहे । बरी कीर्ति जे ते चि ते ऊरताहे ॥ १३५ ॥
अती नीरवूं मी तुला काय कीं ते । असे मृत्यु त्याची तुवा पाळिजेतें ॥
प्रवृत्तीजनामाजि हे गोष्ट आहे । परी सांगतों जीव माझा न राहे ॥ १३६ ॥

पुढें अंगदा देखतां कंठ दाटे । बहूसाल नेत्रोदकें पूर लोटे ॥
प्रसंगीं महा मोह आला कपीसी । रुदे बोलतां अंगदा कूमरासी ॥ १३७ ॥
अरे अंगदा अंतरीं फार होतें । मज देखतां राज्य देईन तूतें ॥
परी कल्पिलें हें कदा ही घडेना । विधीसूत्र निर्माण हें लोटवेना ॥ १३८ ॥
बहूतां परी बोलिलों सुग्रिवासी । मशीं साम्य रे मानिं तू आदरेशीं ॥
महा सूकृतें जोडली रामसेवा । अखडीत हा भाव पायीं असावा ॥ १३९ ॥
बहू शोकवीलें तया अंगदाला । पुढें लक्षिता जाहला राघवाला ॥
म्हणे धन्य हें भाग्य ती भेटि जाली । करूणा स्वरें स्तूति ऊदंड केली ॥ १४० ॥
किती साधनें साधिती योगधारी । गिरीकंदरीं उग्रता पूर्णहारी ॥
तयालागिं तूं किंचिती भेट देसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४१ ॥
महा पातकी घातकी थोर वाला । किती ब्रह्महत्या वदे कोण त्याला ॥
असंख्यात नामें तया भेटलासी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४२ ॥
अहल्या शिळा कष्टली त्या वनातीं । सदा सर्वदा तूज चिंतीत होती ॥
बहूतां दिना दीन तूं उद्धरीसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४३ ॥
वनामाजि भिल्ली महा भक्त होती । अखडीत ते मानसीं पाय चिंती ॥
उचिष्टें तरी सेविसी त्या फळांसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४४ ॥
कळेना लिला राहिले वेद चारी । बहू शीणला वर्णितां सृष्टिधारी[२४] ॥
अकस्मात पायींच धाऊनि येसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४५ ॥
नसे अल्प ही स्वल्प ही पुण्य कांहीं । बहू चंड ऊदंड पाखंड देहीं ॥
महा सूख अद्भूत वालीस देसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४६ ॥
तुझें नाम हें [ ची ] महा पुण्य भासे । तुझे दर्शनें हेतु तो सर्व नासे ॥
करें बाण या हृदयीं स्पर्शलासी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४७ ॥
परी अल्प ही होय देहासि वेथा । कृपासागरा सोडवावें समर्था ॥
तुझा बाण निर्वाण जाला न सोडी । दयाळा तुझा तूं चि येऊनि काढीं ॥ १४८ ॥
प्रसंगें वदे वालि हा दैन्यवाणा । कृपाळूपणें ऊठिला रामराणा ॥
उरीं पाय देऊनियां बाण काढी । मुखीं रामनामें चि तो प्राण सोडी ॥ १४९ ॥
सुरांचा नभीं सर्व मेळा मिळाला । बहू तोष तो पुष्पवर्षाव केला ॥
अनंदें बहू गर्जना रामनामें । बळें वाजली टाळिलें विघ्न रामें ॥ १५० ॥
पुढें सर्व गंधर्व तेथें मिळाले । अकस्मात स्वैंगांगनानृत्य[२५] केले ॥
मनोरम्य आरंभिलें गायनासी । अलापें चि तो रोध सिंधूंजळासी[२६] ॥ १५१ ॥

---

२४ सृष्टिधारी=शेष. २५. स्वर्गांगना=अप्सरा. २६. सिंधुजळासी रोध आला=समुद्राचें पाणी (गाणें सुस्वर ऐकून) स्तब्ध झालें.

दमामे बहू रागसंगीतरंगें । फैणी तो भ्रमें ऊर्ध्व धावे प्रसंगें ॥
स्वरांच्या स्वयें कोंधळ्या देवकोटी । फणी जाणते त्या कळे स्वर्गलोटी ॥ १५२ ॥
पुढें नारदादीक कीतेक आले । समस्ता मनें सूख उदंड जाले ॥
कथाभाग तो पाहिजे चालवीला । प्रसंगें तया वाळिला मृत्यु आला ॥ १५३ ॥
अती लोळ कल्लोळ कोल्हाळ जाला । महाशब्द नानापरी घोष जाला ॥
बहू दुःख जालें तया सुग्रिवाला । कृपाळूपणें राम बोले तयाला ॥ १५४ ॥
उभा राम निष्काम लावण्यखाणी । मुनी देव गंधर्व गाती पुराणीं ॥
धनुष्यासि टेकोनियां वाम बाहे । कृपाळूपणें सुग्रिवालागिं बाहे ॥ १५५ ॥
विचारें अवीचार कां प्राप्त जाला । उजेडासि अंधार जिंकोनि आला ॥
महाज्ञानिया तो भवीं बूडवीला । असें दीसतें भासतें या मनाला ॥ १५६ ॥
सुबुद्धा तुवां शीघ्र आतां उठावें । विधीयुक्त तें कर्म सर्व करावें ॥
बहू शोक केल्या पुढें काय आहे । जनीं जाणता तूं विचारूनि पाहें ॥ १५७ ॥
असभाव्य दुःखानळें प्राण फूटे । प्रभू बोलतां वीर तात्काळ ऊठे ॥
रविप्रीयांच्या बोलिले हृदयासी । विधीयुक्त आरंभिलें या विधीसी ॥ १५८ ॥
महा पाप त्या नाम घेतां न राहे । असा राम विश्राम दृष्टीस पाहे ॥
दहेवेशघातासि सपादियेलें । यथासांग जे कर्म तें सांग केलें ॥ १५९ ॥
पुढें राम भेटी कपीराज गेले । उभे हात जोडूनि ऊदीत ठेले ॥
रघूनायकें सुग्रिवा बैसवीलें । प्रधानाप्रती आदरें वाक्य बोले ॥ १६० ॥
तुम्हीं सर्व तात्काळ पूरीसि जावें । कपीलागिं भद्रासनीं बैसवावें ॥
प्रधानीं तिहीं राम आज्ञे प्रमाणें । महावीर सुग्रीव नेला स्फुराणें ॥ १६१ ॥
समस्तीं विधीयुक्त तो पट्ट दीला । कपीराज भद्रासनीं बैसवीला ॥
रघूनाथनामें चि निर्घोष केला । निशाणीं बहू वाद्य कल्लोळ जाला ॥ १६२ ॥
कपीं अंगदा लागिं प्राधान्य दीलें । समस्ता मनीं सूख ऊदंड जालें ॥
पुरी सर्व शृंगारमंडीत केली । रघूनाथनामें गुढी ऊभवीली ॥ १६३ ॥
प्रधानासि घेऊनि ये राम भेटी । त्वरें चालिला जाहली थोर दाटी ॥
पुढें राम सनीध येऊनि ऊभा । वदे राम लक्षूनि कंदर्पगाभा ॥ १६४ ॥
समर्था तुवां दीन उद्धार केले । तयेंची प्रमाणें कृतकृत्य जाले ॥
मनीं वाटतें हें जरी भक्ति भावें । दयाळा यथायुक्ति तूला पुजावें ॥ १६५ ॥
अनूपम्य तो राम मंजूळ वाणी । कृपाळूपणे बोलिला चापपाणी ॥
व्रतस्थी अम्हीं पट्टणातें न यावें । सदा दंडकारण्यवासी फिरावें ॥ १६६ ॥

---

२७. फणी=शेष २८ भद्रासन=सिंहासन. २९ पट्ट=मुकुट कंदर्पगाभा=मदनाचा पुतळा ३१. चापपाणी=धनुष्य आहे हातीं ज्याच्या असा. ३२. पट्टण=शहर

कपींद्रा तुवां शीघ्र पूरीस जावें । चतुर्मास पर्यंत सूखीं क्रमावें ॥
अह्मी या ऋषीपर्वतीं निश्चयेशीं । प्रज्यन्यासि जातां चि यावें त्वरेशीं ॥ १६७ ॥
रघूनायका सव्य घेऊनि वेगीं । नमस्कार साष्टांग केला प्रसंगीं ॥
कपीराज गेला निरोपें पुरीसी । रघूराज सौमित्र आरण्यवासी ॥ १६८ ॥
बहू सूख जालें तया सुग्रिवासी । पुरी आणि तारा दिली आपणासी ॥
प्रभू थोर सामर्थ्य याचें कळेना । श्रुती भांडती त्यां कदा आकळेना ॥ १६९ ॥
चतुर्मास गेल्या कपी रीस येती । शिळासेतु बांधोनि लंकेस जाती ॥
दशग्रीव मारूनि तेतीस कोडी । रघूराज हा आदरें देव सोडी ॥ १७० ॥
दिनानाथ हा दीन चिंता पहातो । जनीं भाक्तिभावार्थ हा ही पहा तो ॥
मनीं दृढता भक्ति केली जयानें । स्वयें घेतले जन्म सर्वोत्तमानें ॥ १७१ ॥
दहा ही बरे वेश[१३] सर्वोत्तमाचे । पहील्या प्रसगींच शंखासुराचे ॥
दुजा कूर्मरूपें धरी भारधारी । तिजा ही तसा दाढ देऊनि वारी ॥ १७२ ॥
चतुर्था मधे भक्त प्रल्हाद पाहे । धरी खूजटू पंचमा माजि देहे ॥
पुढें साहव्या माजि क्षत्री च नाहीं । दिलें राज्य विप्रासि सर्वत्र कांहीं ॥ १७३ ॥
बळें सप्तमामाजि तो देव सोडी । पुढें अष्टमा कंस झाडूनि पाडी ॥
प्रसगीं असे बौद्ध मौनावतारी । कलकी मलेच्छासि होता चि मारी ॥ १७४ ॥
दहा सार अव्तार सर्वोत्तमाचे । तयामाजि दोनी च प्रसिद्ध साचे ॥
क्रिडा आठव्यामाजि गोपाळपाळीं । रघूराज हा वानरीं रीसमेळीं ॥ १७५ ॥
असे भिन्न नामें परी भक्त त्याचा । चिरंजीव हा दास विख्यात ज्याचा ॥
कळेना मला अल्प ही बुद्धि नाहीं । दयाळा कृपाळा कृपादृष्टि पाहीं ॥ १७६ ॥
बहूसाल विस्तारली कीर्ति तूझी । कळेना बळें आकळे वाणि माझी ॥
परी राहवेना चि मी दीन तूझें । किजे हो क्षमा अल्प अन्याय माझे ॥ १७७ ॥
किती पीडिलें वाळिनें सुग्रिवासी । बहूतां परी राज्य दीलें तयासी ॥
कृपाळूपणें पावला राम तेथें । दीलें राज्य कांता तयाची तयातें ॥ १७८ ॥
अशी हे कथा ऐकतां सर्व भावें । तयाला रघूनाथ तात्काळ पावे ॥
पुढें ही कदा दुःख होणार नाहीं । सदा छंद आनंद ऊदंड देहीं ॥ १७९ ॥
बहू पापतापासि हें नाम वारी । हरामानसीं गूज जे सौख्यकारी ॥
म्हणोनी कथा राघवाची करावी । सदा सर्वदा सृष्टि सूखीं भरावी ॥ १८० ॥
सदा सर्वदा येकयेका चि श्लोकीं । अरे ऐकतां होइजे धन्य लोकीं ॥
नसे हो नसे जन्ममाळा तयाला । पुढें सतसगें चि तो मुक्त जाला ॥ १८१ ॥

॥ इति श्रीरामदासकृत किष्किंधाकांड समाप्त ॥

---

१३ वेश=अवतार.

## श्रीरामदासकृत

# भीमरूपि स्तोत्रें[1].

## १.

भीमरूपी महारुद्रा । वज्रहनुमान मारुती ॥
वनारी[2] अंजनी-सूता । रामदूता प्रभंजनां[3] ॥ १ ॥
महाबली प्राणदाता । सकळां ऊठवी बळें ॥
सौख्यकारी शोक-हर्ता । धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥
दिनानाथा हरीरूपा[4] । सुंदरा जगदंतरा ॥
पाताल-देवता-हंता । भव्य-शेंदूर-लेपना ॥ ३ ॥

---

१ रामदासस्वामींनीं एकंदर बारा मारुती स्थापिले असें पुढील लेखांत महिपती ह्मणतो —

समर्थें आपुल्या हातें निश्चिती । बारा हनुमंत स्थापिले असती ॥
पहिला टाकळीस असे मारुती । तो मागें संतीं ऐकिला ॥ २२ ॥

संतविजय अ० १६

मागिले अध्यायीं निरूपण । अकरा हनुमंत समर्थानें ॥
आपुल्या हातें मूर्ति करून । केलें स्थापन तयांचें ॥ ७ ॥
त्यांचीं स्थानें कोणकोणतीं । तीं मागें श्रवण केलीं संतीं ॥
विसर पडला असेल चित्तीं । तरी सांगतों पुढती ऐका ॥ ८ ॥
नासिकासंनिध टाकळीस । मूर्ति स्थापिली रामदासें ॥
तें पहिलें चरित्र अति सुरस । ऐकिलें सावकास सज्जनीं ॥ ९ ॥
या विरहित कृष्णा-तीरीं निश्चिती । समर्थें स्थापिले अकरा मारुती ॥
चांफळ-खोऱ्यांत दोन मूर्ति । जागृत असती देदीप्यमान ॥ १० ॥
सिंगणपुरासि एक जाण । तिसरें मसुरेंत अधिष्ठान ॥
शहापुरांत चवथा हनुमान । आणि उमरजेंत स्थान पांचवें ॥ ११ ॥
साहावा मारुती निश्चित । स्थापिला बत्तीसशिराळ्यांत ॥
सातवी मूर्ति जरंडयांत । आणि टेंभीस म्हणत आठवा ॥ १२ ॥
नववा गांवडोंगरांत । तेथें नववा मारुती असत ॥
दहावें स्थान ऊर्णबाहु ह्मणत । चरित्र अद्भुत तयाचें ॥ १३ ॥
हीं दहा स्थानें ऐशा रीति । परी चांफळ खोऱ्यांत दोन मूर्ति ॥
यास्तव हे अकरा मारुती । संप्रदायी जाणती सकळ ॥ १४ ॥

संतविजय अ० १७वा

या मारुतींस उद्देशून च हीं स्तोत्रें रचिलीं असावीं असें दिसते. २ वनारी=रावणाचे अशोकवन मोडणारा. ३. प्रभंजन=वायु (वायुपुत्र). ४ हरी=वानर.

लोकनाथा जगंनाथा । प्राण-नाथा पुरातना ॥
पुण्यवंता पुण्यशीला । पावना परतोषका ॥ ४ ॥
ध्वजांगे उचली बाहो । आवेशें लोटला पुढें ॥
कालाग्नी कालरुद्राग्नी । देखतां कांपती भयें ॥ ५ ॥
ब्रह्मांडें माईल नेणों । आवळे दंत-पगती ॥
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा । भ्रुकुटी ताटिल्या बळें ॥ ६ ॥
पुच्छ ते मुरडिलें माथां । किरीटी कुंडलें बरी ॥
सुवर्ण-घटि कासोटी । घटा किंकिणि नागरा ॥ ७ ॥
ठकारे पर्वता ऐसा । नेटका सडपातळू ॥
चपलांग पाहतां मोठें । महाविद्युल्लते परी ॥ ८ ॥
कोटिच्या कोटि उड्डाणें । झेपावे उत्तरेकडे ॥
मंद्राद्री सारिखा द्रोणू । क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥
आणिला मागुती नेला । आला गेला मनोगती ॥
मनासी टाकिलें मागें । गतीशीं तुळणा नसे ॥ १० ॥
अणूपासूनि ब्रह्मांडा । एवढा होत जातसे ॥
ब्रह्मांडाभोंवते वेढे । वज्रपुच्छ घालवू सके ॥ ११ ॥
तयाशीं तुळणा कोठें । मेरू-मंदार धाकुटे ॥
तयाशीं तुळणा कैशी । ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ १२ ॥
आरक्त देखिलें डोळां । गिळीलें सूर्य-मंडळा ॥
वाढतां वाढतां वाढे । भेदिलें शून्य मंडळा ॥ १३ ॥
भूत-प्रेत-समन्धादी । रोगव्याधी समस्त ही ॥
नासती तुटती चिंता । आनंदें भीमदर्शनें ॥ १४ ॥
हे धरा पधरा-श्लोकी । लाभली शोभली भली ॥
दृढ देहो निसंदेहो । संख्या चंद्रकळा गुणें ॥ १५ ॥
रामदासी अग्रगणू । कपिकूळासि मंडणू ॥
रामरूपें अंतरात्मा । दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥
इति श्री भीमरूपि स्तोत्र संपूर्ण ॥ १ ॥

२.

जनीं ते अंजनी माता । जन्मली ईश्वरीतनू ॥
तनूमनू तो पवनू । एक ची पाहतां दिसे ॥ १ ॥
त्रैलोक्यीं पाहतां बाळें । ऐसें तो पाहता नसे ॥

५. नागरा=सुंदर ६. शून्यमंडळ=आकाशमंडळ.

अतूल तुलना नाहीं । मारुती वात-नंदनू ॥ १ ॥
चळें तें चंचळे नटे । बाळ मोंवाळ साजिरें ॥
चळवळी चळताहे । बाळ लेवाळ गोजिरें ॥ २ ॥
हात कीं पाय कीं सांगों । नखें बोटे परोपरी ॥
दृष्टिचें देखणें मोठें । लांगूळ लळुलळीतसे ॥ ३ ॥
खडोखाडी दडे तैसा । पीळ पेंच परोपरी ॥
उड्डाण पाहतां मोठें । झेंपावे रवि मंडळा ॥ ५ ॥
बाळानें गिळिला बाळू । स्वभावें खेळतां पहा
आरक्त पीत वाटोळें । देखिलें धरणीवरी ॥ ६ ॥
पूर्वेसि देखतां तेथें । उडालें पावलें बळें ॥
पाहिलें देखिलें हातीं । गोळिलें जाळिलें बहू । ७ ॥
थुंकोनी टाकितां तेथें । युद्ध जालें परोपरी ॥
उपरी ताडिला तेणें । एक नाम चि पावला ॥ ८ ॥
हा गिरी तो गिरि पाहे । गुप्त राहे तरूवरी ॥
मागुता प्रगटे धांवे । झेंपावे गगनोदरीं ॥ ९ ॥
पळ ही राहिना कोठें । बळें ची घालितो झडा ।
कडाडां मोडती झाडें । वाडवाडे उलंडती ॥ १० ॥
पवना सारिखा धांवे । वावरे विवरे बहू ॥
अपूर्व बाळ-लीला हे । रामदास्य करी पुढें ॥ ११ ॥
इति श्रीभीमरूपिस्तोत्र संपूर्ण ॥ १ ॥

२.

कोपला रुद्र जे काळीं । ते काळीं पाहवे चि ना ॥
बोलणें चालणें कैचें । ब्रह्म-कल्पांत मांडला ॥ १ ॥
ब्रह्मांडाहून जो मोठा । स्थूळ उंच भयानकू ॥
पुच्छ तें मुरडिलें माथां । पाऊलें शून्य-मंडळा २ ॥
त्याहून उंच वजावा । सव्य बाहो उभारिला ॥
त्या पुढें दुसरा कैंचा । अद्भूत तुळणा नसे ॥ ३ ॥
मार्तंड-मंडळा ऐसे । दोन्ही पिंगाक्ष तावीले ॥
कर्करा घर्डिल्या दाढा । उभे रोमांच ऊठिले ॥ ४ ॥
अद्भूत गर्जना केली । मेघ ची बोळले भुमी ॥
तुटले गिरिचे गाभे । फुटले सिंधू आटले ॥ ५ ॥

७. लांगूल=शेपूट. ८. मार्तंड=सूर्य. ९. सिंधु=समुद्र.

अद्भुत वेश आवेशें । कोपला रण कर्कशू ॥
धर्म-संस्थापनेसाठीं । दास तो ऊठिला बळें ॥ ६ ॥
इति श्री भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ३ ॥

४.

अंजनी सुत प्रचंड । वज्रपुच्छ कालदंड ॥
शक्ति पाहतां वितंड । दैत्य मारिले उदंड ॥ १ ॥
धगधगी तसी कळा । वितंड शक्ति चंचळा ॥
चळचळीतसे लिळा । प्रचंड भीम आगळा ॥ २ ॥
उदंड वाढला असे । विराट धाकुटा दिसे ॥
त्यजून सूर्य मंडळा । नभांत भीम आगळा ॥ ३ ॥
लुलीत बाळकी लिळा । गिळोनि सूर्य-मंडळा ॥
बहूत पोळतां क्षणीं । थुंकिला तो तत्क्षणीं ॥ ४ ॥
धगधगीत बूबुळा । प्रत्यक्ष सूर्य-मंडळा ॥
कराळ काळ मूख तो । रिपूकुळासि दुःख तो ॥ ५ ॥
रूपें कपी अचाट हा । सुवर्ण कट्ट कासतो ॥
फिरे उदास दास तो । × × × ॥ ६ ॥
झळक झळक दामिनी । वितंड काळ कामिनी ॥
तयापरी झळाझळी । लुलित रोमजावळी ॥ ७ ॥
समस्त-प्राण नाथ रे । करी जना सनाथ रे ॥
अतूळ तूळणा नसे । अतूळशक्ति वीलसे ॥ ८ ॥
रूपें रसाळ बाळकू । समस्त-चित्त-चाळकू ॥
कपी परंतु ईश्वरू । विशेष लाधला वरू ॥ ९ ॥
स्वरुद्र क्षोभल्यावरी । तयासि कोण सांवरी ॥
गुणागळा परोपरी । सतेजरूप ईश्वरी ॥ १० ॥
समर्थ दास हा भला । कपी-कुळांत शोभला ॥
सुरारि काळ क्षोभला । त्रिकूट जिंकिला भला ॥ ११ ॥
इति श्री भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ४ ॥

५.

हनुमंता रामदूता । वायुपुत्रा महाबला ॥
ब्रह्मचारी कपी नाथा । विश्वंभरा जगत्पते ॥ १ ॥
दानवारी कामांतका । शोकहारी दया निधे ॥
महारुद्रा मुख्य प्राणा । मूळमूर्ती पुरातना ॥ २ ॥

अंजळि दास तुज पुढें हा तव माहात्म्य जाणता रचितो ॥ ४३ ॥
गंगे देवि द्रुणाखे भव्यगुणा खेदनाशका तीरा ॥
पावेल तुझ्या नीरा सेवुत जें प्रिय शिवा महाधीरा ॥ ४४ ॥
बहिरोबा दादा हे गातात सदुक्ति रामदासाच्या ॥
गंगे तुजहुनि न उण्या त्या स्वाश्रितसर्वकामदा साच्या ॥ ४५ ॥
साधु महादेवतनय राघोबा रामदास जनदास ॥
तव ओघास विलोकुनि नाचो जैसा मयूर वैनदास ॥ ४६ ॥
गंगे दारिद्र्य श्रम देते गोपाळनायका याचें ॥
अघ नाशीं स्वस्मरणें हे वाक्य नव्हे चि नायकायाचें ॥ ४७ ॥
गंगे भुजगनायक काय करिल यासि तू चि आण कसी ॥
श्रीविष्णुपदी प्रभु तू मज तुजला घालवेल आण कसी ॥ ४८ ॥
कृष्णद्विज करदीकर याची निष्ठा सदाशिवीं मोटी ॥
याचा उद्धार किती गंगे तारिसि असे सदा कोटी ॥ ४९ ॥
गंगे बहु काय वदों बहु कष्टी दीन देवबा होतो ॥
त्यातें समीप सत्वर दीनाचा बधु देव बाहो तो ॥ ५० ॥
जो बाबुराय कृष्ण श्रीगंगे बहु गरीब हा याला ॥
भेटुनि कृतकृत्य करीं तव कीर्ति च बहु बरी बहायाला ॥ ५१ ॥
गंगे दोष हरावा त्वां राघोपंत कोतवाळा जो ॥
भवजलधि गिळिसि तुज जळकण गिळितां कां न तो तवा लाजो॥५२॥
गंगे तव भव्य तटीं पावो आचार्य आवजी वास ॥
त्वत्पुण्यदृष्टि होतां येतो वायास औंव जीवास ॥ ५३ ॥
दहने कोण प्रतिभेंट ऐसें म्हणतां म्हणेल ओ घीस ॥
परि अघनगीं लक्ष तुझ्या ऐकाया हि न शकेल ओघास ॥ ५४ ॥
शुनदि जिभेते म्हणतो उपकार सुपुण्य परि सये राहें ॥
वद गंगा गंगा कीं अधिक स्वदुक्तिपरिस येरा हे ॥ ५५ ॥
प्राकृतजन संकोच हि न शके वारावयासि रसना मीं ॥
बहु नाहीं काय तुझ्या गंगे तारावयासि रस नामीं ॥ ५६ ॥
रसना साध्वी मान्या सकोच असाधु या उडीव सये ॥
मम यजमानजना म्हण मत्तीरीं जो असे कुडी वस ये ॥ ५७ ॥
श्रीभागीरथि यावें धांवत संतानतें तम रसाचें ॥
पान स्नान घडो तव तीर्थाचें हरियशासमरसाचें ॥ ५८ ॥

---

८१ वनद=ढग. ८२ आब=हिंमत. ८३ भट=योद्धा ८४ घास=गवत ८५ नग=डोंगर.

गंगे तूंचि भवार्णवमग्नांचे पूर्ण करिसि काम तरी[86] ॥
तो चिमणाजी पाठक पाठ करू तव सहस्रनाम तरी ॥ ५९ ॥
बारामती पुरीचा तव वेंकटराय देशमुख दास ॥
पात्र करीं गंगे जे तव दर्शन या चि परम सुखदास ॥ ६० ॥
देशमुख श्रीबाबूराय प्रिय शूर मान्य मायाजी ॥
तत्पुत्रांतें गति मति देती देईल न भ्रमा या जी ॥ ६१ ॥
बारामतिस्थ जे त्यां पाळीं तू सर्व देशपाड्यांतें ॥
जगदंबे जंतूतें जपसि तशी पक्षिणी न आंड्यांतें ॥ ६२ ॥
अमरनादे देशपांड्या बापू हा पूत तोयें[87] तव सेवू ॥
स्नाता ची अन्यत्र क्षण ही स्वर्गी त्यजूनि न वसे वूं[88] ॥ ६३ ॥
मुक्त करावे गंगे त्वां जे बारामतींत कुलकरणी ॥
पतितोद्धृति हे पाडी शुनादि तुझी बहु बुधांसि भुल करणी ॥ ६४ ॥
बारामतीपुरीचे जे पाटिल चौगुले तदघ भंगे ॥
रंगे स्वस्मरणीं तरि तच्चित्त सदां असें करीं गंगे ॥ ६५ ॥
तव तीर्थी स्नान करूनि गंगे पितरांसि उद्धरू चिमाजी ॥
लोक ह्मणोत कसें तरि तुज तों वाटेल शुद्ध रुचि माजी ॥ ६६ ॥
शिंपी मैराळ ढबू हे साधू स्वर्प्रसूसि[89] घेवूत ॥
येवूत श्रीगंगे वत्स तसे तव पैंयांसि[90] सेवूत ॥ ६७ ॥
श्रीगंगे त्वां द्यावें दर्शन जो हेंदरा सुभाना त्या ॥
हें उचित होय माता तू प्राणी बाळ या शुभा नात्या ॥ ६८ ॥
जो राम कृष्ण ऐसें देवि पहाटे म्हणे सदा सांजे ॥
तो साधु शिंपा हो तव चरण उपेक्षिति [कदा] न दासां जे ॥ ६९ ॥
गंगे तूं कल्पलता देसी पुरुषार्थ न करितां वांणी[91] ॥
वांणी व्यय कां न करूं तारीं सिदराम आदि ते वाणी[92] ॥ ७० ॥
गंगे त्वां तारावे कुंभार सुतार परिट लोहार ॥
जोहार म्हणायाचा जो प्रभुचा होय देवि तो हार ॥ ७१ ॥
गंगे सद्गति सर्वां हैबतरायादि बाबराला हो ॥
खळ हांसोत मज भले म्हणातिल घेतासि बा बरा लाहो ॥ ७२ ॥
बारामतींत वसती जे तारावे चि देवि तेलि हि ते ॥
जड अरि हेयें[93] पुराणीं तरि कां हरि कीर्ति सेविते लिहिते ॥ ७३ ॥

---

८६ तरी=होडी. ८७ तोय=पाणी ८८ वू=डोक्यात होणारी ऊ. ८९ प्रसू=आई. ९० पय=पाणी, दूध. ९१ वाणी=कमताई ९२ वाणी=शब्द. ९३ हेय=त्याज्य.

उद्धरिले सगरसुत ब्रह्मद्वेषी सहस्र जे साठ ॥
पाठ अवाची पुरविसि हे विद्या देवि तुज बरी पाठ ॥ ७४ ॥
काय महत्त्व कबीरीं हरिभक्ति न दे सुरापगे यवनीं ॥
त्वत्सेवनें [हि] पावे स्थिति शक्राच्या सुराप गेय वनीं ॥ ७५ ॥
तुज भेटोनि निवावे गंगे शेटे महाजन हि सारे ॥
दीनासि तूं चि म्हणसी शक्राधिक भजुनियां मज दिसा रे ॥ ७६ ॥
आर्यप्रार्थित पुरतें आश्रय करितां चि कल्पवल्लीला ॥
तव यश काय वदावें देवि तुझ्या शेषतल्पवल्लीला ॥ ७७ ॥
मद्गुरुपुत्र सदाशिव यज्ञेश्वर यासि भेट दे यश तें ॥
जें शुचि निवविसि गंगे तू चि स्वजना अदेय देय शतें ॥ ७८ ॥
चरशील सहाध्यायी साधु सदाशिव तयासि तूं गंगे ॥
दर्शन दे द्रवसिल तरि विघ्न न करितील सर्वथा दंगे ॥ ७९ ॥
श्रीविठ्ठलभजनाचा बहु काशीनाथ साधु या लाहो ॥
श्रीगंगे प्राप्त तुला इतरा तव पाथसा धुयाला हो ॥ ८० ॥
गंगे देवि त्रिंठोबा दादा श्रीविष्णुभक्त शिवशील ॥
एतद्गीत हरियशश्रवणें काशीसमेत निवशील ॥ ८१ ॥
याचा परम प्रेमळ नदन भैरवळ तो तथापि कसा ॥
येतो जो पंढरपूर चूतवनीं करितसे कथा पिकसा ॥ ८२ ॥
हरिजनसग तुज रुचे गंगे सादर अशांसि पाचार ॥
साचार कथारस घे प्रेम स्वाश्रितजना हि हा चार ॥ ८३ ॥
तीर्थपद श्रीविठ्ठलमूर्ति स्थापूनि आदरें भजतो ॥
श्रीगंगे गोसावी गोविंद गमेल दूर कां मज तो ॥ ८४ ॥
जो अमरसिंह जाधव या धवल प्राज्य यश जसें मातें ॥
लोक हि लोकहितावह दे जें शिवभक्तिच्या रसें मातें ॥ ८५ ॥
गंगेसदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त नानातें ॥
जग लोक माय तू हें पूर्ण करु मनोरथासि या नातें ॥ ८६ ॥
यावे प्रभु प्रतापा करुनि पुढें तुज नमावया फडके ॥
गंगे तवें तेजें तों विघ्नाचें उर कठोरही तडके ॥ ८७ ॥

---

१४ सुराप=मद्यपी. १५ गेय=वर्णनीय १६ शेषतल्पवल्लीला=शेष + तल्प–वत् + लीला=शेषावर निजणाऱ्या विष्णूसारखी लीला म्ह० क्रीडा १७ शिव-शील=कल्याणकारक आहे स्वभाव ज्याचा. १८ चूत=आंब्याचें झाड. १९ पिक=कोकिल. २० प्राज्य=पुष्कळ

व्हावे कृतार्थ गंगे यावे पूजावया तुला शास्ते ॥
हा स्तेनांसि म्हणवितें पाठिव निजदूत परचमूशास्ते ॥ ८८ ॥
यावे द्युनदि खळांतें श्रीमाधवराय पेशवे दमुनी ॥
व्हावे श्रीरामजयें हृष्ट जसे सर्व देश वेद मुनी ॥ ८९ ॥
देवि अहल्याबाई यानी भेटावयासि सत्वर ती ॥
तूं पुण्यकीर्ति हे ही गंगे दोघी जणी हि सत्वरती ॥ ९० ॥
सद्गति जडांसि गंगे सपत्ति क्षेत्रवासि विप्रकुळा ॥
तुजला कीर्ति मिळेल प्रीति हरिहरांस ही न जीस तुळा ॥ ९१ ॥
भगवति भगवद्भक्त श्रीधर-हृदयांत न व्यथा राहो ॥
ब्रह्मकुटुंबशतभरण भवऋणभर हरुनि भव्य थारा हो ॥ ९२ ॥
द्यावी सद्गति गंगे त्वां माझ्या अग्रजांसि जो भावें ॥
तुज भेटे स्त्रीपुत्र त्यागुनि जेथें अवश्य लोभावें ॥ ९३ ॥
देवि मम पितृव्याचे सुत सुतरी कष्टपात्र रक्षावे ॥
लक्षावे मात्र तुझ्या दृष्टीनें सर्व दोष भक्षावे ॥ ९४ ॥
गंगाधर नारायण मैन्मातुळपुत्र जे तदानयनें ॥
गंगे कुळ तारावें निववावीं तापलीं सदा नयनें ॥ ९५ ॥
मद्बंधूचे माझे तारावे श्वशुर मेहुणे साडू ॥
धाडूं चित्त तुजकडे गंगे न च मोह मैज्जना नाडू ॥ ९६ ॥
मम बाळमित्र सर्व हि गंगे तूं अच्युतप्रमुख तारीं ॥
वारीं संसारश्रम सारीं प्राचीन पातकें सारीं ॥ ९७ ॥
बाबूराय तव सुत चि न शके तत्प्रेमवर्णना तुंडें ॥
कुरवाळीं तदपत्यें भरूत यशें साधुकर्ण नातुंडें ॥ ९८ ॥
श्रीगंगे उरले ही वांचीव क्षुधित जीव सैत्रप ते ॥
म्हणति असें जेउनि जे स्वजना नाभी न होति सैत्रप ते ॥ ९९ ॥
देवि तव पथ्य प्रमुदित बहु सुरभीतनुभवा परि समीर ॥
हा स्वजनाच्या मार्गे या तुझिया अनुभवापरिस मोर ॥ १०० ॥
तुज ऐकविलि मयूरें सर्वजनहितोदया स्तवनवाणी ॥
हे द्याया आहेस प्रभु करिसिल देवि यास्तव न वाणी ॥ १०१ ॥
जो पांडुरंगरायें दिधली या सुयश दे वकीलीला ॥

१ स्तेन=चोर २ चमू=फौज ३ अग्रज=वडील भाऊ. ४ पितृव्य=चुलता. ५ मातुल=मामा ६ मज्जन=मत् + जन=माझे जन ७ सत्रपते=अन्नछत्र घालणारे. ८ सत्रप=सलज्ज.

ऐकोत तुझ्या हि सुखें श्रीगौरी अदिति देवकी लीला ॥ १०२ ॥

॥ श्लोक ॥ त्वा दीन गंगे अति धन्य केला । ध्याता तुज श्रीपतिकन्यकेला ॥
तूं जेंवि दीनासि असीम हाते । लोकीं न देणार असी महातें ॥ १०३ ॥
तारिले अघ निवारुनि गंगे । सर्व दास मज पावन तातें ॥
दाखवूं चरित कीर्ति करावी । सर्वदा समज पाव नतातें ॥ १०४ ॥
केली तुवा ख्याति महानदीनें । कीं मानिला स्वर्ग ल्हान दीनें ॥
शंभुत्व विष्णुत्व हि अर्पितीस । ज्ञानामृतें जतुसि तर्पितीस ॥ १०५ ॥
कळाविद्या जाणे स्तुति करि रसें तो कवि नवी
तदन्य प्रेमें जो प्रिय तुज जसें तोक विनवी ॥
स्तवें भगे गंगे दुरित समजे हा तव दया
न भी ऐसें चित्तीं तरि नुचलितां हाल वद या ॥ १०६ ॥

॥ आर्या ॥ जो सज्जनरंजन सुत दादा मार्गीत पावला मरण ॥
स्मरण धरुनि करावें गंगे त्वां तद्भवव्यथा-हरण ॥ १०७ ॥

॥ दोहा ॥ काढीं जो नतजनमनीं दुःसह तो भवकील ॥
वुनादि मयूरयशोधनीं हा कृतलोभ वकील ॥ १०८ ॥

॥ आर्या ॥ गुरु माझे श्रीराम श्रीमत्केशव गणेश हरि चवधे ॥
यांचा प्रसाद वदला गंगामृत पी यथेष्ट बरि चव घे ॥ १०९ ॥

॥ इति श्रीरामनंदनमयूरविरचित श्रीगंगावकीली संपूर्ण ॥

## उपसंहार.

आज पर्यंत आह्मीं मोरोपंतकृत ५४ सुरस प्रकरणें छापिलीं. यांत ग्रंथ सुमारें तीन हजार आला आहे. हीं स्फुट प्रकरणें फारच मनोरंजक आहेत हें वाचकांचे लक्षांत येऊन चुकलें असेलच. या ५४ प्रकरणांत "विष्णुपद-वकीली" व "गंगा वकीली" हीं ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां फारच महत्वाचीं होत. या दोहोंत पंतानीं आपले विषयीं काहीं गोष्टींचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांचा भाऊ आबाजीपंत होता व भावजय सगुणाबाई होती असें विष्णुपद वकीलीच्या ६८व्या आर्येवरुन स्पष्ट होतें. त्यांची स्त्री रमाबाई इनें काशीस जाण्याविषयीं प्रथम प्रेरणा केली असें त्याच प्रकरणाच्या ६०व्या आर्येवरुन दिसतें. त्याचे यजमान बाबूराय जोशी यास कृष्णराय, पांडुरंगराय, व नीळकंठराय असे तीन पुत्र होते असें गंगावकीलीच्या आर्या ७,८,९ आणि विष्णुपद-वकीलीच्या आर्या १३,१४,१५ यावरून दिसून येतें. या तिघांच्या आया ताई व आबई होत्या असें गंगावकीलीच्या १०व्या आर्येंत सांगितलें आहे. यावरून बाबूराय यास दोन बायका होत्या असें वाटतें. या प्रकरणाच्या ९व्या आर्येंत बाबुराय याबद्दल

चुकोनें आढ्याय असें पडलें आहे. पंतांच्या बाळमित्रांत एक अच्युत नांवाचा मित्र होता असें गंगावकीलीच्या १०व्या आर्येत आहे. गंगाधरपंत पराडकर यानें पंतास काशीस जाण्याच्या कामीं मदत केल्याचा उल्लेख विष्णुपदवकीलीच्या १०व्या आर्येत आहे. ज्या ‡ अमरसिंग जाधवानें पंतांस काशीस नेलें त्याचा उल्लेख गंगावकीलीची आर्या ८५ व विष्णुपदवकीलीची आर्या १ यांत आहे. त्यांचे चवदे गुरु यांचा उल्लेख गंगावकीलीच्या १०३व्या आर्येत आहे. काशीस जातांना वाटेंत दागा या नांवाचा पुरुष मृत झाला असें त्याच प्रकरणाच्या १०७ व्या आर्येत लिहिलें आहे. त्याच प्रकरणाच्या प्रकरणाच्या १३व्या आर्येत पडोळ नांवाचा, १४व्या आर्येत चुलत भावाचा, १५ आर्येत मामेभाऊ गंगाधर व नारायण यांचा उल्लेख आढळतो. बारामतीकर जोशी यांचे मुख्य कारभारी दाजीबा होते असें त्या प्रकरणाच्या १२व्या आर्येवरून होतें. विष्णुपदवकीलीच्या ६०व्या आर्येत सांगितलेली आका ही बाबूरावाची बहीण असावीसें वाटतें. आपलें निवासस्थान जी बारामती तिचा निर्देश गंगावकीलीच्या आर्या ६०, ६२, ६४, व ७३ यांत पंतांनीं केला आहे. त्यांचे गुरुपुत्र सदाशिव आणि यज्ञेश्वर या नांवाचे होते व त्यांतून सदाशिव हा त्यांचा सहाध्यायी होता असें त्याच प्रकरणाची आर्या ७८ व ७९ यावरून दिसून येतें. पेशव्यांच्या पदरचे सरदार फडके व रास्ते यांचा उल्लेख आर्या ८७ व ८८ यांत व अहल्याबाई होळकरणीचा आर्या ९० यांत आहे. खुद्द सवाई माधवराव पेशवे यांस विजय प्राप्त व्हावा अशी प्रार्थना आर्या ८१ यांत केली आहे. ८६व्या आर्येतील नाना हे नाना फडणीस असावेसें वाटतें. २७व्या प्रकरणांत वामन, तुळसीदास, चांगदेव, व निवृत्ति यांचें वर्णन पंतांनीं केलें आहे. शके १६८४*त झालेल्या भक्तविजय ग्रंथाचा कर्ता जो ताहाराबादकर महिपति त्याची स्तुति १८व्या प्रकरणांत आहे. तिच्या ७व्या आर्येवरून महिपतीचा पुत्र विठ्ठल या नांवाचा होता असें दिसतें. १६व्या प्रकरणांत भगवद्गीतेचा भाष्यकार शंकराचार्य व टीकाकार मधुसूदन यांचा उल्लेख ७व्या आर्येत असून प्राकृत टीकाकार ज्ञानेश्वर व वामन यांचा उल्लेख त्या प्रकरणांत आहे. या आर्येवर आम्ही पूर्वी दिलेली टीप चुकली आहे. ज्ञानेश्वरीची थोरवी त्या प्रकरणाची आर्या १–१० यांत वर्णिली आहे. आठव्या प्रकरणांत पैठणकर एकनाथ स्वामींचें रसाळवर्णन आहे. सारांश हीं ५४ प्रकरणें फार मनोरंजक असून यांत बरीच उपयुक्त माहितीही आहे. पंतांचें चरित्र या ग्रंथारंभीं दिलें आहे त्यांत त्यांच्या गोत्राचा उल्लेख आला नाहीं म्हणून तत्संबंधीं आर्या एथें दाखल करून हा अल्पलेख आटपतों —

> वा पाव जामदग्न्या ! रामा ! तूं शत्रु मृगकुळीं हरिसा ।
> मज तव गोत्रोत्पन्ना पीडिति कामादि नित्य हे अरि सा ।। १२ ।।
>
> महद्विज्ञापना

समाप्त.

---

‡ धनाजी जाधवाचे नातु यांचे वंशज श्री० शंभुसिंग जाधव माळेगांवकर हे पुणें हायस्कुलांत इंग्रजी अभ्यास करीत आहेत.

> शके सोळाशें चवऱ्यायशीं । चित्रभानुनामसंवत्सरासी ।।
> वैशाख वद्य द्वादशीसी । ग्रंथ सिद्धीसी पावला ।। २१५ ।।
> प्रवरे पासूनि दक्षिणेस । ताहाराबाद गांव पांच कोस ।।
> भक्तविजय आनुरस । झाला असे ते ठायीं ।। २१६ ।। अ० ५७.
>
> भक्तविजय

# मोरोपंती प्रकरणांची अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक | प्रकरणाचें नांव | पृष्ठ | ग्रंथसंख्या | वृत्त. |
|---|---|---|---|---|
| १. | मोरोपंताचें चरित्र | १ | | |
| २. | पूर्णमंत्र भागवत | १६. | १०९. | आर्या |
| ३. | गोपी गोडघा. | २५ | ६१. | ,, |
| ४. | मारुति स्तुति. | ३०. | ४०. | अनुष्टुभ्. |
| ५. | दुर्वासभिक्षा. | ३३ | २३६. | ओव्या. |
| ६. | भृगुचरित्र. | ४५ | ४७. | श्लोक. |
| ७. | दशावतार | ५०. | १०. | आर्या |
| ८. | श्रीनाथ चरित्र. | ५१. | २६. | ,, |
| ९. | दुर्गास्तव | ५३. | ४१. | ,, |
| १०. | ध्रुवचरित्र. | ५६. | १०७ | साक्या |
| ११. | प्रश्नोत्तर रत्नमाला. | ६३. | ७९ | आर्या |
| १२. | राजापुरस्थ गंगा प्रतिनिधि. | ६९. | २६. | ,, |
| १३ | सन्मनोरथराजि | ७१. | ७१. | ,, |
| १४. | श्रीविठ्ठलप्रणिधि | ७६. | ४१. | ,, |
| १५. | श्री काशीस्तुति | ७९. | २६. | ,, |
| १६. | भगवद्गीतास्तुति | ८१ | १५. | ,, |
| १७. | साधुस्तव. | ८३. | ८. | ,, |
| १८. | महिपति स्तुति. | ८३. | १३. | ,, |
| १९. | सत्संगस्तव. | ८५. | ६०. | ,, |
| २०. | मुरलीपंचक. | ८९. | ५. | ,, |
| २१. | नामसुधाचषक, | ९०. | १२६. | ,, |
| २२. | रामगीति | ९१. | १०३. | ,, |
| २३ | विष्णुपदवकीली | १०७. | १०० | ,, |
| २४. | भस्मासुराख्यान. | ११४. | ४२ | श्लोक. |
| २५. | साधुरीति. | १२०. | ५०. | आर्या |
| २६. | पदें. | १२३. | ३ | पदें |
| २७. | वामनादि कीर्तन | १२४. | ४. | अनुष्टुभ् |
| २८. | श्रीकृष्णा माहात्म्य. | १२५. | ११०. | अनेक वृत्तें |
| २९. | पदें. | १४०. | ३. | पदें. |
| ३०. | विठ्ठल स्तोत्र. | १४१. | १२. | श्लोक. |
| ३१. | गोपीगोडव्याच्या शेवटचीं पदें | १४२. | २. | पदें |
| ३२. | राधाकृष्ण संवाद. | १४३. | ४७ | आर्या. |
| ३३. | रामप्रार्थना. | १४६. | ४०. | अनुष्टुभ् |
| ३४. | हरिहरस्तव | १४९. | ११. | आर्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५. | पदें. | १५०. | २. | पदें. |
| ३६ | दत्तदयोदय. | १५०. | १०२. | आर्या. |
| ३७. | पद | १५७. | १. | पद |
| ३८. | दत्तात्रेयाची आरती. | १५८. | १ | आरती. |
| ३९. | पतिव्रता कीर्तन | १५८. | ५१ | आर्या. |
| ४०. | पुंडरीक प्रार्थना | १६० | ३७. | अनुष्टुभ्. |
| ४१. | विठ्ठलविज्ञापना. | १६३. | ६७ | ,, |
| ४२. | प्रार्थना. | १६८. | १० | ,, |
| ४३. | मुक्तांजलि अथवा गुरुस्तुति | १६८ | ११०. | आर्या |
| ४४. | सवाय्या | १७६. | ६. | सवाय्या |
| ४५. | अवतारमाला. | १७७. | ३१०. | आर्या. |
| ४६. | गंगास्तव | २०१. | ३७. | श्लोक. |
| ४७. | आरती. | २०६. | १. | आरती. |
| ४८. | विठ्ठलपदपद्मस्तुति. | २०६. | ६. | आर्या. |
| ४९. | बालमनरामायण | २०६. | २५३. | ,, |
| ५०. | त्रिस्थळी यात्रा. | २२६. | १५. | ,, |
| ५१ | श्रीगुरुस्तुति. | २२७. | ११ | ,, |
| ५२ | द्विचत्वारिंशल्लिंगयात्रा | २२८. | ४३. | ,, |
| ५३ | साधुसत्कार | २३१ | ३५. | ,, |
| ५४ | गंगावकीली | २३४. | १०१ | ,, |
| ५५. | उपसंहार | २४१. | | |


एकूण २९८१.

रमणी रमणीव या सुवासा रमणानंदविधायिनींदुवक्त्रा ॥
अतिरम्यपयोधरा धरायामुदितेवामरभूर्भुवं विजेतुम् ॥ १६ ॥
वज्रित्रस्ताः शैलसंघा विशंकं वासस्थानं निर्भयं नाध्यगच्छन् ॥
वासोराशिव्याजतो यां समेत्य हट्टे हट्टे संवसंतीति मन्ये ॥ १७ ॥
विनिमयं वितनोति यदापणे रजतकांचनकैः सततं जनः ॥
व्यवहृतिस्तु न कुप्यमयी तथा कदशनं वसनं मलिनं न च ॥ १८ ॥
गृहैः कलत्रैः शिशुभिः पुरस्ताज्जलैः सदन्नैर्वसनैश्च पश्चात् ॥
आकर्षितं पांथमनस्तु यत्र चक्रे निजं लक्षणमेव सत्यम् ॥ १९ ॥

प्रतिवर्षं सुवर्णं इष्ट अनतिक्रम्य इति यथेष्टमेव लभते ॥ १५ ॥

रमणीति । रमयति सा रमणी । शोभनो वासो यस्यां सा सुवासा । अन्यत्र शोभनो वासो वसतिः यस्याः सा । यद्वा सातमिदं शोभनानि वासांसि वस्त्राणि यस्यां सा सुवासा । अन्यत्र शोभन वासो वस्त्र यस्याः सा सुवासाः । रमंते ते रमणाः विलासिनः तेषा आनद विदधातीति रमणानदविधायिनी । अन्यत्र रमणस्य भर्तुः आनद अन्यत् समान । ताच्छील्येणिनि. नांतत्वात्ङीप् । इंदुरिव वक्रं पुरद्वारं यस्याः सा अन्यत्र इदुरिव वक्त्र मुख यस्याः सा इदुवक्त्रा । धरतीति धरा । पचाद्यच् । अति रम्यं यत्पयः उदक तस्य धरा धर्त्री । अतिरम्यौ पयोधरौ यस्याः सा अतिरम्यपयोधरा या नगरी रमणीव सुदरीव अमराणां भूः स्वर्लोकः तस्याः भवतीति अमरभूभूः अमरावती तां अन्यत्र अमरभूभुव अप्सरस विजेतुमिव उदिता । उत्प्रेक्षोपमाश्लेषाणांससृष्टिः ॥ १६ ॥

वज्रीति । वज्री इद्रः तस्मात् त्रस्ताः भीताः । सुत्रामागोत्रभिद्वज्रीत्यमरः । शैलाना पर्वताना सघाः निर्भय निःशकं वासस्य स्थानं नाध्यगच्छन् न प्रापुः । अतः यां नगरीं समेत्य वाससा राशयस्तेषां व्याजः मिष तस्मात् इति वासोराशि-व्याजतः हट्टे हट्टे आपणे आपणे सवसतीति मन्ये । यस्या वाससा राशयः पर्वत-समानाः हट्टे हट्टे सतीत्यर्थः । उत्प्रेक्षालकारः ॥ १७ ॥

विनिमयमिति । जनः यस्याः आपणे रजतकाचनकैः विनिमयं क्रयविक्रयं सतत करोति । कुप्यमयी ताम्रादिमयी व्यवहृतिः नास्ति । तथा कुत्सित अशनं कदशनं मलिन वसन च न नास्ति ॥ १८ ॥

गृहैरिति । यत्र यस्यां नगर्यां स्वकीयैः गृहैः कलत्रैः । कलत्र गेहिनी गृहमिति धनजयः । शिशुभिः बालैश्च पुरस्तात् अग्रे आकर्षित । यत्र यस्यां नगर्यां जलैः सदन्नैः वसनैश्च पश्चात् आकर्षित पांथमनस्तु निजमेव लक्षण सकल्पविकल्पात्मकं

१. '०वामरराड्पुरीव०' पा० भे०.

विलोक्य बुद्ध्या विकलीकृतं तत् क्लीबैरपि क्लीबतरं तु यत्र ॥
वर्षास्विहैवावसतिर्विधेया सिद्धांतमेवं निजमेव नीतम् ॥ २० ॥
ऋणत्रयं भूमितले प्रसिद्धं तथा चतुर्थं व्यवहारजन्यम् ॥
ऋणत्रयान्नैव नरोऽविमुक्तस्तुरीयकं यत्र तु नैव दृष्टम् ॥ २१ ॥
भक्तं सुगंधि युवतीं सुगुणां तनूजं
वश्यं सुसूक्ष्मवसनं दधि माहिषं च ॥
हैयंगवीनमपि शम्भुरता लभन्ते
लोको निदर्शनमदोविषये यदीयः ॥ २२ ॥
प्रासादशैलशिखरोपगृहाधिरूढा ।
बालाः शरत्सकलचंद्रजिदाननाब्जाः ॥

मन' इति लक्षणं सत्यं चक्रे । गृहगमनस्यात्यावश्यकत्वात् एतन्नगरीवासस्याप्यत्या-वश्यकत्वान्निश्चयं नाधिजगामेत्यर्थः ॥ १९ ॥

विलोक्येति । यत्र यस्यां नगर्यां बुद्ध्या क्लीबैरपि गृहादिभिः । यद्यपि शिशु-शब्दस्य न नपुंसकत्वं तथापि छत्रिन्यायेन तत्राप्यारोपितं । विकलीकृतं अतिशयेन क्लीबमिति क्लीबतरं पांथमनः विलोक्य वर्षासु इहैव अस्यामेव नगर्यां आवसतिः विधेया इति निजं सिद्धांतमेव नीतं । निश्चयात्मिका बुद्धिरिति लक्षणमस्या ज्ञेयं । एतेन स्वगृहाद्यपेक्षया अत्रत्यजलादीनामाधिक्यं दर्शितं ॥ २० ॥

ऋणत्रयमिति । ऋणानां त्रयं ऋणत्रयं देवऋणं ऋषिऋणं पितृऋणमिति-त्रिविधं ऋणं भूमितले प्रसिद्धं तथा व्यवहारजन्यं चतुर्थं प्रसिद्धं यत्र ऋणत्रयात् अविमुक्तः नरः न नास्ति । सर्वोपि ऋणत्रययुक्त एवासीदिति भावः । तुरीयकं चतुर्थं व्यवहारजन्यं । चतुरश्छयतावाद्याक्षरलोपश्चेति छप्रत्ययांताच्चतुःशब्दात् स्वार्थिकः । यत्रनैव दृष्टं । यत्र सर्वेपि यज्ञकर्तारः वेदपाठकाः पुत्रवंतः धनवंतश्चासन्निति भावः ॥ २१ ॥

भक्तमिति । शंभौ रताः शंभुरताः शिवभक्ताः शोभनः गंधो यस्येति सुगंधि । गंधस्येदुत्पूतिसुसुरभिभ्य इति इत्वं । भक्तं ओदनं । भिस्सास्त्रीभक्तमंधोन्नमोदनो-स्त्रीसदीदिविरित्यमरः । सुगुणां युवतीं तनूजं वशागतः वश्यः तं वश्यं स्वाधीनं वशागतं इति यत् । सुसूक्ष्मं च तद्वसनं च सुसूक्ष्मवसनं महिष्याः इदं माहिषं । तस्येदमित्यण् । दधि ह्यस्तनगोदोहोद्भवं हैयंगवीनं घृतं नवं । हैयंगवीनं संज्ञायामिति निपातनात् साधुत्वं । लभंते अमीषां विषये अदो विषये यस्याः अयं यदीयः । वृद्धाच्छ इति छप्रत्ययः । लोकः निदर्शनं दृष्टान्तः । शाल्यन्नमन्नं नवं घृतं मुद्गसूपमयं माहिषं दधि । सूक्ष्मवस्त्रमबला च कोमला को लभेत शिवपूजनं विनेति श्लोकोक्तफलभाजः सर्वेपि यत्र शिवभक्ताः संतीति भावः ॥ २२ ॥

प्रासादेति । शरदि यः सकलः पूर्णः चंद्रः शरत्सकलचंद्रः शरत्सकलचंद्र

दिव्यांगना इव विभांति सदैव यत्र ।
पीनोन्नतातुलकुचास्तडिदंबराढ्याः ॥ २३ ॥
अधिकं सुखदा पुरी सुराणामिति यज्ञान् मनुजा विधाय जग्मुः ॥
नहि तत्र सुखं तथेति मत्वा भनिपातस्य मिषेण यां व्रजन्ति ॥ २४ ॥
जलाशयानां मिषतः पयोधिः शुद्धो हि यस्यां प्रतिरथ्यमास्ते ॥
क्रमेण मां वाडवनामवह्निर्जक्षेदितीवापभयो विलीनः ॥ २५ ॥
दुग्धादीनां सिंधवो यत्र लीना भीता नूनं वाडवाद्गोषु सर्वे ॥
सायं प्रातः प्रत्यह दुग्धदोहा यद्यप्येताः सर्वदा यत्क्षरन्ति ॥ २६ ॥
तस्यां वसन्नभसि मास्यखिलद्विजेभ्यो ।
दत्वा पितुः समधिक स तु दक्षिणां ताम् ॥
सम्रारके नृपतिसन्निहितः प्रजानां ।
कार्याणि शास्त्रमनुसृत्य चकार धीरः ॥ २७ ॥

जयतीति शरत्सकलचद्रजित् शरत्सकलचद्रजित् आननाब्ज । यासां ताः शरत्सकलचद्रजिदाननाब्जाः । पीनौ उन्नतौ अतुलौ कुचौ यासां ताः तथोक्ताः तडिदिव अंबर वस्त्र तेन आढ्याः युक्ताः । प्रासादा एव शैलाः पर्वताः तेषां शिखराणि ऊर्ध्वप्रदेशाः तेषु यानि उच्चगृहाणि सौधानि तानि अधिरूढाः बालाः दिविभवाः दिव्याः दिव्याश्च ता अगनाश्च दिव्यांगना ता इव सर्वकालं यत्र यस्यां नगर्यां विभांति शोभंते । सर्वांगनापेक्षया सौंदर्यात् सौवर्णवसनत्वात् उच्चगृहाधिरूढत्वाच्च देवागना इव विभान्तीत्यर्थः ॥ २३ ॥

अधिकमिति । मनुजाः सुराणां पुरी अमरावती अधिक पुण्यनगर्यपेक्षया अधिक सुखदा इति हेतो यज्ञान् विधाय तामितिशेषः । जग्मुः अनंतरं तत्र अमरावत्यां तथा पुण्यपुरीसदृशं सुख न इति मत्वा भाना ताराणा मिषेण पातः पतन तस्य मिषेण या नगरीं व्रजति गच्छंति ॥ २४ ॥

जलाशयानामिति । वाडवह्निः वडवानलः क्रमेण प्रथमं क्षाराब्धिग्रासे प्रवृत्तः अनंतरमिक्षुरसोदं ग्रसेदिति क्रमेणांतिम मांग्रसेत् इतीव यस्यां विलीनः शुद्धः पयोधिः शुद्धोदकसमुद्रः अपभयः सन् जलाशयाना मिषतः व्याजात् रथ्यायां रथ्यायामिति प्रतिरथ्य आस्ते । यथार्थेऽव्ययीभावः ॥ २५ ॥

दुग्धादीनामिति । दुग्धादीनां क्षीरादीना सिंधवः समुद्राः वाडवाद्वह्नेर्भीताः संतः यत्र यस्यां वर्तमानासु गोषु लीनाः अंतर्हिताः नून । यत् यस्माद्धेतो एताः गवः साय सध्याकाले प्रातः प्रातःकाले अहनि अहनीति प्रत्यह दुग्ध निष्काशित. दोह क्षीर यासां ताः दुग्धदोहाः यद्यपि तथापि सर्वदा सर्वकालं क्षरति स्तनद्वारा स्रवति ॥२६ ॥

---

१ 'ध्मा' पा० भे० ।

दाता नृपालगणमूर्धजमौलिमाला-
संघोद्गलत्प्रचुरगंधरजः समृद्ध्या ॥
संरंजितामलपदो जयति प्रकामं ।
श्रीशाहुनाम नृपतिर्भुवि कल्पवृक्षः ॥ २८ ॥
यस्मिन् शासति भारतं द्विजवरा यज्ञक्रियातत्परा ।
राजानो जितवैरिणो निजमहीलोकान् मुदा बिभ्रति ॥
वाणिज्याप्तसमस्तभोगनिचया वैश्यास्तदन्ये सुखं ।
क्रीडन्ति स्वपुरेषु नित्यमुदिता देवैः सदा वर्षति ॥ २९ ॥
दानप्रदातृजनसंस्तवनप्रसंगे विद्वत्सदस्युपमितिः स बभूव कर्णः ॥
तावन्न यावदुदियाय नरेंद्रवंद्यपादारविंदयुगलो भुवि शाहुराजः ॥३०॥

तस्यामिति । तस्यां नगर्यां वसन् वीरः बल्लालः नभसि मासे श्रावणे मासे अखिलद्विजेभ्यः पितुः बाजिराजात् समाधिकं यथास्यात्तथा तां प्रसिद्धां दक्षिणां दत्ता अनतर सपारके नृपतिसन्निहितः शाहुसमीपस्थः सन् शास्त्र नीतिशास्त्र अनुसृत्य प्रजानां लोकाना कार्यं चकार । दातेति । नृन् पालयति ते नृपालाः राजानः तेषा गणाः संघास्तेषां मूर्धजाः मूर्धस्थिता ये मौलाः मुकुटाः तेषु याः मालाः माल्यानि तेषा संघः समूह तस्मात् उद्गलत् यत्प्रचुरगंध रजः परागः तस्य समृद्धिः वृद्धिः तया संरंजिते अमले निर्दोषे पदे चरणौ यस्य तथोक्तः भुवि कल्पवृक्षः श्रीयुक्तः शाहुनामनृपतिः प्रकाम अत्यंतं जयति सर्वोत्कर्षेण वर्तते ॥ २८॥

यस्मिन्निति । यस्मिन् भारत भरतखंड शासति सति । द्विजवराः ब्राह्मणाः यज्ञक्रियाया तत्पराः आसन्नितिशेषः । जितवैरिणः राजानः क्षत्रियाः निजा या मही पृथ्वी तत्संबंधिनो लोकान् मुदा हर्षेण बिभ्रति पुष्णाति वैश्याः वाणिज्याप्त समस्तभोगनिचयाः आसन् । तदन्ये शूद्रादयः नित्यमुदिताः संतः स्वपुरेषु आसन् स्वस्ववृत्या सर्वेपि हृष्टा आसन्नित्यर्थः । देवः पर्जन्यः सदा सर्वकाल वर्षति ववर्ष । वर्तमानसामीप्ये वर्तमानवद्वेतिवर्तमाने लट् ॥ २९ ॥

दानेति । सः कर्णः विदुषां सदः विद्वत्सदः तस्मिन् विद्वत्सदसि । स्त्रीनपुंसकयोः सद इत्यमरः । दानप्रदातारः ये जनास्तेषां संस्तवयन तस्य प्रसंगः तस्मिन् उपमितिः उपमानं तावद्बभूव यावत् नरेंद्रवंद्यपादारविंदयुगलः शाहुराजः भुवि न उदियाय नोदितः ॥ ३० ॥

---

५. 'श्रीशंभुभूपतनय शिवनामभूप' 'द्विजकल्पवृक्षः' इति च पा० भे० । ६. 'भूतल' पा० भे० । ७ 'कालेहरिर्वर्षति' पा० भे० । ८. '०शिवनामभूप.' पा० भे० ।

दधाति पादं न गदोऽपि यस्य राज्ये रिपुभ्योऽभिभवः कुतो नु ॥
वर्षंति मेधा नितरां स्वकाले घोराभिभूतेस्तु कुतोऽत्र वार्ता ॥ ३१ ॥
स शाहुराजो जयति प्रकामं सुदक्षिणो दक्षिणदिक्पतिर्यम् ॥
संप्राप्य विप्रा निजमर्थितार्थं सद्यो लभन्तेऽल्पितकल्पवृक्षम् ॥ ३२ ॥
वार्ध्यब्जनाकबलिसद्मसु कामिनीनां ।
बिंबाधरेऽमृतमयं स्वरुचिप्रपञ्चः ॥
मन्ये तृणेषु तदमुष्य यतो द्विषंतो ।
धृत्वा मुखे मृतिभयं समरे त्यजन्ति ॥ ३३ ॥
तस्मिन्नृपे पालयति प्रजास्ताः कालोऽतियातः सुमहाननेन ॥
तुल्यं करिष्यंति न केऽपि चक्रू राज्यं कलौ दारितवैरिणेह ॥ ३४ ॥
तपःप्रभावं प्रसमीक्ष्य तस्य कलिः स्वकृत्ये न बभूव शक्तः ॥
अपत्यवीतत्वमलं विधाय नृपे प्रहृष्टः स बभूव नीचः ॥ ३५ ॥
सिंहासनारोहणवर्षतो यः सैकं नृपो विंशतिवर्षयुग्मम् ॥
चकार राज्यं जितशत्रुवर्गः सुराधिपाराधनलब्धकीर्तिः ॥ ३६ ॥

दधातीति स्पष्टार्थमेतत् ॥ ३१ ॥

स इति । सुतरां दक्षिणः कुशलः सुदक्षिण ॥ ३२ ॥

वार्ध्यब्जेति । वार्धि. समुद्रः अब्जश्चंद्रः । नाकः स्वर्गः । बलिसद्म पाताल कामिनीनां युवतीनां बिंबमिव अधरः तस्मिन् अमृत अयं स्वरुचेः प्रपच. विस्तारः । तत् अमृत तृणेषु अस्तीत्यह मन्ये । यत् यस्माद्धेतोः अस्य द्विषतः मुखे धृत्वा समरे संग्रामे मृतिभयं मरणभयं त्यजंति ॥ ३३ ॥

तस्मिन्निति । तस्मिन् नृपे ता प्रजाः पालयति सति महान् कालः अतियातः अतिक्रांतः । अस्मिन् कलौ अनेन तुल्य केपि राजानः राज्य न चक्रुः अग्रे केपि न करिष्यंति । किं भूतेन दारिताः वैरिणो येन तथोक्तेन । ॥ ३४ ॥

तप इति । कलिः तस्य राज्ञः तपसः प्रभावं सामर्थ्यं प्रसमीक्ष्य स्वस्य कृत्ये शक्तः समर्थः न बभूव । नीचः सः कलिः नृपे अपत्येन वीतः रहितः तस्य भावः तत्त्वं विधाय अलं अत्यंत प्रहृष्टः बभूव । यद्वा अपत्यवीतत्वमेव मलः तं विधाय ॥ ३५ ॥

महाराजाधिराज श्रीराजराजेश्वर गुणगुणालंकृत परमपवित्र श्री राजेसाहेब पंडित प्रधान श्रीमत माधोराव साहेबजी जोग्य लिखितं-मुरली जोतेश रायके अनेक आशीर्वाद बाँचणें महाराजके गृह विचार करके माघमास विषे पत्र भेजाथा सो महाराजने देषा होगा. जानोजी घोसले को ऐसे लिया जैसे सिंव्हके आगे मृग. मैंने विचार लिषाथा महाराजपर मालूम है या नाही हमारा लिषा जो कागद है उस्से अमानत् रषिएगा देष लेना. जद् लडाई फते करा करोगे तद् देष लेना. अब् और विचारांश लिया है बाडे बडो मुहीम और लडाईयाँ फते करोगे. जे तुमसे रूजू नही ते हाथ बांधके मिलेंगे. दुशमन भाग जावे, मारे जावे, पकडे जावे. जो मनसुबा बिगड गया होवे सो. श्रीमंतके हातसो सारे पातशाह वजीर चवकशी सो दोस्ती होवे. जैश तमाम शहरोंमे होवे. जो दुष्ट हैं सो दब् जावें. राजतेजकी वृद्धी होवे. जन्म पत्रकी नकल उतारके भेज देवो. मूझे अपने इष्टकी शपथ है किसी कौं दिषावनेका नही. मैं तुझें आसीर्वाद देता हो. छोटे *नानानें तुमारी कृपा हमपर कराई अब ह उमेदवार हैं हमपर मेहेरबानी करनी. हमारे नामपर जो षिजमत फरमावो तिसकी सनद कर भेजों. पातशाहका और उमरावोंका जबाब सवाल इस ब्राह्मण कौं फरमाया. मैं निहाल भया मेरी फरदपर दसषत स्व हस्ताक्षरोंसे कर भेजों. जो घातरजमा सौं घबर सार जबाब सवाल भेजा करौं. पै॥ छ १५ स्वदरसला.

[ १७७ ]   ॥ श्री ॥

चिरंजीव राजेश्री नाना यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष. तुम्हांस जाऊन बहुत दिवस जाहले खामा स्वारी कार्तीक बहुळ पंचमीस डेरे दाखल जाहले आजि कूच होऊन येवतावर मुक्काम होईल. फौज जमा होत चालली परतु

२६. येथपासून खुद्द खाशाचें अक्षर.

२७. हें पत्र पाणिपतची लढाई झाल्यावर लिहिलेंसें दिसतें

२८. हे 'मुरली ज्योतशराज' कोण होते ते कळत नाहीं तरी प्रयाग किंवा काशी येथील असावेसें वाटतें.

२९ देषा=देखा

३०. 'घोसले' बदल 'भोसले' असावें.

३१ लिषाथा=लिखाथा पुढेही 'ष' बदल 'ख' समजावा

३२ म्ह० देख लेना

३३ जश=यशकीर्ति

* छोटे नाना=नाना फडणवीस.

मुक्काम होत नाहीं. दरमजल कृष्णातीरास जातों. तुम्हीं मुक्काम होतील, सावकाश जाऊं, ह्मणोन चित्तात आणाल. तर न आणितां सत्वरें येऊन स्वारीचे मुहूर्तें करून लष्करांत येऊन पोहचणें. विलंब न लावणें. चाकरीचे दिवसांत नेहमीं यात्रे समक्षीन रहाणें. पत्र पावतांच सत्वर येणें. रवाना चंद्र १९ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

[ १७८ ] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री महिपतराव त्रिंबक यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणें. विशेष—राजश्री स्वामींस किल्यावर नेऊन ठेवणें आणि तुम्हीं निघोन पुण्यास येणें. हे आशिरवाद रवाना छ १९ सवाल. हे आशिरवाद.

[ १७९ ] ॥ श्री ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री महिपतराव त्रिंबक यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्ही विनंती पत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. राजश्रींस किल्यावर न्यावें त्यास ते किल्यावर जात नाहीं या अन्वयें राजश्रीचे जाबसाल कित्येक तपशीलवार लिहिले ते सविस्तर कळले. ऐशियास राजश्रींस आरोग्य झालेंच आहे. तरि हर तजवीज करून किल्यावर घेऊन जाणें. तुम्हीं आपला मजकूर हुजूर येण्याविषयीं लेखन केला त्यास तुम्हीं तूर्त न येणें. रवाना छ ६ जिलकाद बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

[ १८० ] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री नाना यांसि प्रती माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहिणें. विशेष. सरकारचा जामदारखाना पुरधरीं पेशजी होता तो प्रस्तुत कोठें आहे, जिन्नस व दागिने काय काय आहेत, ते सर्व तुह्मांस ठाऊक आहेतच. हल्लीं तो जामदारखाना कोठें आहे तो लिहून पाठविणें. जामदारखानियांत दागिने व जिन्नस जो असेल त्यांची कुल याद लिहून पाठविणें. तुमचे समजाविशीचा प्रकार कसा झाला हें लिहिणें. तुम्ही याल कधीं हें कळलें नाहीं. तरि सत्वर लिहिणें. रवाना छ १४ साबान बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

[ १८१ ] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री बज्याबा यांसि प्रती माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद

---

३४ यावरून माधवरावाची तब्येत व शिपायगिरी कशी होती तें थोडेंसें समजेल.

३५. येथून खुद्द खाशांचें अक्षर.

३६. कुल्=सर्व, तपशीलवार.

उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्रींस वर न्यावयाचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास आमचें येणें तिकडे होईल असा निश्चय नाहीं. यास्तव पहिलें लिहिलें आहे त्याप्रमाणें सत्वर करणें. कां कीं प्रस्तुत काळ खालीं राखावयाचा नाहीं. यास्तव लिहिल्याप्रमाणें करणें. वरकड चाकरी करून दाखवावी ह्मणून लिहिलें त्यास तुमच्या स्वरूपास हेंच योग्य आहे कीं आपल्या मातबरी सारखी चाकरी करून दाखवावी. यांतच सर्व आहे. कोणी ह्मणतात कीं चाकरी करतों हेंच मोठें काम आहे. असेही कित्येक आहेत. आपलें स्वरूप काय आणि सरकारची तैनात काय खातों हें मनांतच येऊ नये आणि जी चाकरी करतों हें फार मानून कित्येक आहेत. तुमची उमेद आहे याचप्रमाणें काम तुह्मांपासून घ्यावें हेंच मनांतून येथून ही आहे. समयानसार व प्रसगानसार घडेल. तुमची मातबरी अशी आहे कीं सर्वांपेक्षां चाकरी अधिक करावी. यांतच स्वरूप आहे. बाबापासूनही असेंच आहे. पत्र फाडून टाकणें. दीक्षितासी बोलून निरोप दिल्हा आहे. येतील. तुम्हीं त्यांचें स्वरूप राखीत जाणें. बाहेर वांकडें न पडे तें करणें. आधिक उणें आढळेल तें निराळें पत्र पाठवीत जाणें. पत्र दुसऱ्यास नच कळावें. येथून माझ्या आंतेंचें जाईल तें अथवा तुमचें दोन्ही पत्रें नच कळावीं. महिनाभर राहणें. कन्यागताचें स्नान करून येणें. रवाना छ ५ जिल्काद हे आशिर्वाद.

[ १८२ ] श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबक सदाशीव स्वामी गोसावी यांसि पोष्य नारायणराव बल्लाळ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुम्हांकडून पत्र येऊन शरीरप्रकृतीचें वर्तमान कळत नाहीं तर तुमची शरीरप्रकृति कशी आहे तें सविस्तर लिहून पाठविणें. तीर्थरूपांकडील वर्तमान तर जुंज होऊन दादासाहेबांची फौज लुटली. दादासाहेब किल्यावर गेले. एक दिवस मध्यें जाऊन दुसरे दिवशीं भेटी झाल्या. दादासाहेबांनीं तीर्थरूप रावसाहेबांचे स्वाधीन किल्ले, कोट, मुलूख वैगेर सर्व कारभार केलीं. हें सविस्तर वर्तमान राजश्री बजाबांनीं लिहिलेंच असेल. रवाना छ ३० मोहरम गुरुवार सध्याकाळ बाकी दिवस प्रहर. बहुत काय लिहिणें हे विनंती. पौ. छ. १ माहे सफर.

[ १८३ ] श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बजाबा स्वामी गोसावी यांसि पोष्य

३७. ' हातचें ' या अर्थी.

३८ हे पत्र धोडपच्या किल्याजवळ दादाच्या फौजेचा मोड झाल्यावर लिहिलें आहे.

त्याला च हे सुत नृपा बाप असें मानिती दशरथा रे ॥ १४ ॥
नामें करूनि बापा सद्गुणसौजन्यधाम हा राम ॥
हा लक्ष्मण दोघेही शौर्यश्रीचे नृपा [१६]महाराम ॥ १५ ॥
येणें चि पूर्ण केला मदाज्ञ वधूनियां त्वनीक वनीं ॥
याच्या च सतत रिझला भूपा [१७]वल्मीकभू मुनी कवनीं ॥ १६ ॥
याच्या च मार्गणीं ती भूपा सत्कारि ताटका [१९]असुनीं ॥
पावे सद्गति कीं ते पावति दुर्गति न देति जे असुनी ॥ १७ ॥
येणें सुबाहु वधिला हें तरि किति शौर्य रामरायाचें ॥
एतत्करें च सर्व हि राक्षसगण भूवरा मराया चे ॥ १८ ॥
जे स्त्री होय शिला तें कौशल्य याच्या च ना पदरजाचें ॥
हा तो च नृपा धरितो [२०]घननादाचा हि बाप दरें ज्याचें ॥ १९ ॥
भूपवरा हे आले स्वयंवरमहोत्सवा पहायास ॥
न कळे बाल्यें दुष्कर कीं सुकर [२२]ज्याधिरोप हा यास ॥ २० ॥
मग तो शौर्य श्रीधर अवडे रघुराज तेंवि जनकमना ॥
देश जसा उजांत स्त्री वररूपा राजते [२३]विजैन [२४]कमना ॥ २१ ॥
बहुवार रघुवरा मग पाहे वर्णुनि मनांत ही अपणा ॥
निंदी जनक स्मरुनी अविचारकृतेशधनुर्विभंगपणा ॥ २२ ॥
मग आदरें बसविला सभेंत कौशिक सशिष्य सर्विगण ॥
तें तीत शोभती ते रविशशिसे [२६]भास्करान्वयाभरण ॥ २३ ॥
गुरुसह सभेंत येउनि बसतां सूर्या[२७]न्ववायहीरमणी ॥
म्हणति मनीं भूप तुज्या लभ्य न रामाशिवाय ही रमणी ॥ २४ ॥
तें येक सखी वर्णुनि गुण भूपां दाखवी [२८]धराजेतें ॥
तें ऐकुनि तोषविती चित्ता क्षणमात्र विविध राजे ते ॥ २५ ॥
हा तू पहा महा गे गुणशाली [२९]गुर्जरावनीप कधी ॥
न त्यजुन यास सीते विषय करी [३०]निर्जरावनीपकधी ॥ २६ ॥
यद्दडभयें परधनवस्त्रा न शिवोन वायु वावरतो ॥
जो नाथ [३१]अवंतीचा रूचल तरी गे नवा [३२]युवा वर तो ॥ २७ ॥

---

१६ महाराम=मोठे बाग १७. वल्मीकभू=वाल्मिकी. १८. मार्गण=बाण १९ असु=प्राण. २० घननाद=मेघनाद ( रावणाचा पुत्र ) २१ दर=भीति. २२ ज्याधिरोप=धनुष्यांला दोरी लावणें २३. विजन=एकांत. २४ कमना=सुंदर.- २५. ईशधनुर्भंगपण=शिवाचें धनुष्य मोडण्याचा पण २६ अन्वय=कुळ, वंश २७. अन्ववाय=वंश. २८. धराजा=सीता. २९ गुर्जरावनीप=गुजराथचा राजा ३० निर्जरावनीपकधी=इंद्राचें मन. ३१ अवंती=उज्जनी सभोंवतालचा मुलूख ३२ युवा=तरणा

हा शौर्यौदार्यश्रीसदन मदनसा कालिंगनवराजा ॥
सत्वर वर हा च दिसे सीते तुज योग्यसंग नवरा जा ॥ २८ ॥
हा तरि पहा सुलक्षणशौर्यनिधी नाथ [३३]बंगवसुधेचा ॥
हाच तुझा भोग करो एक जसा देवपुं[३४]गव सुधेचा ॥ २९ ॥
हा तैलंगमहीपति ज्याच्या राज्यांत विप्र तोकास ॥
प्राशुनि राखिति अमृतद [३५]सुरभीची जेवि विप्रता कास ॥ ३० ॥
तो दाविता पहा वर सारुनि भूपाल [३६]अंगदें शाला ॥
यातें वरूनि सीते शाश्वत तूं पाल अंगदेशाला ॥ ३१ ॥
तो निषधनाथ सीते जो शोभितसे महीप हारमणी ॥
याची हो तूं हा ची येक जगीं रिपु[३८]महीपहा रमणी ॥ ३२ ॥
हा काश्मीरमहीपति ज्याचीं पिळदार परम ही पगडी ॥
वक्र तुला हा च दिसे योग्य सये विजितप[३९]रमहीप गडी ॥ ३३ ॥
किंचिद्वक्रितकंधर सखि तो च नरेंद्र मालवा वाहे ॥
मन्मन याजवळ तुझा व्हीनें मुखचंद्रमा लवावा हे ॥ ३४ ॥
केरलभूप पहा सखि बसलासे घरूनि तो कठार करीं ॥
जो बाल्यीं च रिपुगणा करिस जसा सिंहलोक ठार करी ॥ ३५ ॥
या परि नाना भूपां दावुनि मग ते रघूत्तमा दावी ॥
तैं सीतेचें किंचित् व्हीनें आंत चि मुखाब्ज मोदावी ॥ ३६ ॥
किति मधुर पहा दिसतो सीते वीरासनस्थ हा राम ॥
धामनिधि श्यामतनु क्षाम नसे कामसा महाराम ॥ ३७ ॥
कुंडलमंडितगंड [४०]श्रीखंडक्षोदलिप्त भुजदंड ॥
चंडद्युति[४१]कुलमंडन शोभवि यत्तनु अखंड कोदंड ॥ ३८ ॥
भूप त्वदर्थ सारे वहाति मनीं जरि वहोत देवाचें ॥
ध्यान परी मन्मानस याचें नि तुझें च होतदेवाचें ॥ ३९ ॥
सीता वदे मला ही रुचला राघव शरत्सुधा[४२]कर हा ॥
परि हे तातपणस्मृतिसवत वदे दाखऊन धाक रहा ॥ ४० ॥
अतिमधुरमृदुलतनु हा रघुनंदन वज्रसार हें चाप ॥
उचली कसा अशा गे कां फसला घालुनी पणा बाप ॥ ४१ ॥

---

३३. वंगवसुधा=बंगाल प्रांत ३४. देवपुंगव=देवश्रेष्ठ. ३५ सुरभी=गाय. ३६. अंगदें=बाहु भूषणें. ३७ शाल=शालजोडी. ३८ रिपुमहीपहा=शत्रुनाशक ३९ विजितपरमहीप=जिंकिले आहेत शत्रुरूपी राजे ज्यानें ४०. श्रीखंड क्षोदलिप्त=चंदनाची पूड ज्याला चोपडली आहे असा ४१. चंडद्युतिकुलमंडन=सूर्यवंशभूषण ४२ सुधाकर=चंद्र

तों कथिलें घ्या हें शिवधनु सगुण हि भूपजन करा ज्यानें ॥
करिजेल तद्वधू ही सीता हें स्पष्ट जनकराजानें ॥ ४२ ॥
ऐकुनि तें वच पाहुन चड हि कोदंड नृप विचारांत ॥
पडले किति किति म्हणती जाउ पळुन तरि असे दिन न रात ॥ ४३ ॥
किति वदति अह्मा बांधुनि सीतावरणोत्सवें न दाव्यानें ॥
आणिलें इथें हराया तेज कशाचा विवाह दाव्यानें ॥ ४४ ॥
थकले ज्यास अणाया अनेक हस्त्यश्ववृषभकासर[४३] हा ॥
तें धनु सज्य कराया नृप हो कसता कशास कास रहा ॥ ४५ ॥
सीतामिष करुनि पुढें घालू पाहे धनुष्यभंग गळां ॥
प्राण हराया कळला जनकाचा बेत हा अह्मां सगळा ॥ ४६ ॥
किति वदती सीतेस्तव काय म्हणुन हें धनू सजा उचला ॥
पडली न वोस पृथ्वी मिळल दुजी स्त्री पुरास जाउ चला ॥ ४७ ॥
तों रावण माशीरस्थित वीर्यग्राम[४४] कडकडा गाजे ॥
तैं दचकले नृप तसे पशु हि न ते प्राप्त कडक डागा जे ॥ ४८ ॥
अभिमुख जाउनि मग त्या बैसविलें अणुनि यातुरायास[४५] ॥
सत्कारुनि हि नृप ह्मणे हार तसा लावु या तुरा यास ॥ ४९ ॥
पडतां दृष्टि अकस्मात दशवदनाचा विरूप काय महा ॥
पळती दडती मानुनि सीतेसह सर्व नायका यम हा ॥ ५० ॥
मग तद्गुरू वदे हा सीतार्थ अला स्वयें च दे यास ॥
जोड नृपा सख्य सुता कोणास तरि हवी च देयास ॥ ५१ ॥
परि जनकें सूचवितां मंत्रिमुखें ज्याधिरोप दशवदनें ॥
करुनि स्मयें[४६] हि विस्मय केली प्रोफुल्लगल्ह दश वदनें ॥ ५२ ॥
बोले जनका न कसी मत्कीर्ति अली श्रुतींत सुरसा रे ॥
कीं घातले दशमुखें जिंकुनि कारागृहांत सुर सारे ॥ ५३ ॥
म्यां तो शैल उचलिला सेश्वर ही भूप जो नगामाजी[४७] ॥
मग या न कांबटावर शक्ति नृपा चढल काय गा माजी ॥ ५४ ॥
आणि सांगतो नृपा हें धनु गुरुचें शंभुचें जरी नसतें ॥
तरि म्यां मघां च उचलुनि मोडुन हीं टाकिलें किं रे असतें ॥ ५५ ॥
मग नृप वदे हंसुनि तुज आली येथें च रावणा शंका ॥
गुर्वपमानाचि नगोद्धारिं न वदतोस काय निःशंका ॥ ५६ ॥

---

४३. कासर=रेडा, टोणगा. ४४ ग्राम=समूह ४५. यातु=राक्षस ४६ स्मय=हसणें. ४७. नग=पर्वत

मग रोषभरें रावण उचलूं धनुरुत्तमा जवर धावे ॥
तों विघ्नार्थ हराचे आरभी स्त्रीसमाज वर धावे ॥ ५७ ॥
लावुनि विंशति भुज ही कष्टें तेणें धनू उभें केलें ॥
परि गरिमगुणें रावणबला न गणुनी अनल्प घे झोलें ॥ ५८ ॥
तितक्यांत तो उचलिलें धनु द्या सीतेस म्यां च शर्वाचें ॥
गर्वाचें सदन वदे तों होय म्लान तोंड सर्वांचें ॥ ५९ ॥
परि त्या झोल न साहे मग धनुसह भूतलीं अपटला जें ॥
दुःख न तें त्यास परी स्मितमुख भूभृद्गणा निपट लाजे ॥ ६० ॥
रावणगतितें पाहुनि सर्व नृपांच्या भरें उरीं धडकी ॥
रडकी होय मुखश्री म्हणति न गति आज हो दिसे धड की ॥ ६१ ॥
हट्टत धनु मग काढुन सावध ही करुनि तोषवी राजा ॥
त्या अणि सचिवा सांगे उठिव अनां या अशेष वीरां जा ॥ ६२ ॥
मग तैं सचिवें कथितां नृप हो धनुला गुणास योजावें ॥
कथुनि निमित्या वदले न उठूं आम्ही तुह्मीं पुढे जावें ॥ ६३ ॥
ते नृपदशा विलोकुनि बोले मिथिलेश तप्त रागानें ॥
राहो धनु हें ऐका नृप हो सोडुनि तरी दरा गानें ॥ ६४ ॥
राहो गुणाधिरोपण परि एकहि भूप उचलुं ही न इला ॥
शक्त धनुर्वल्लीला झालि कशी हंत वीरहीन इला ॥ ६५ ॥
झाली निर्वीर धरा हें वच रामा न शल्यसें साहे ॥
राहे विमनस्क क्षण आज्ञेच्छू मग गुरुकडे पाहे ॥ ६६ ॥
द्या आज्ञा या धनुतें उचलुन वोढुन गुणाहि चढवीन ॥
कढवीन हृदय रिपुचें न वद कुवच हें नृपाहि पढवीन ॥ ६७ ॥
हें जीर्ण धनुष्य किती न पुरल माझ्या बलास हेमगिरी[५४] ॥
परि सानुकंप द्यावा गुरुजी कर वरद हा मदीय शिरीं ॥ ६८ ॥
गुर्वाज्ञा मग घेउनि उचलाया चाप राम तो कास ॥
कासि तें होय मुनिजना मुद्भर तदधिक तदीय तोकासैं ॥ ६९ ॥
मग दडपिता पदाग्रें अग्रीं रामे उभेंच तें राहे ॥
धनु म्हणती मुनि भासे जाया मुनिचीच नीट हेरा हे ॥ ७० ॥

---

४८. गरिमगुण=मोठेपणा ४९ शर्व=शिव ५०. भभृद्गण=राजसमूह ५१ गुण=दोरी ५२ इला=पृथ्वी ५३ विमनस्क=दुःखी ५४ हेमगिरी=मेरुपर्वत ५५. सानुकंप=सकृप. ५६. मुद्भर=आनंदातिशय. ५७. तोक=बालक.

वांकवि वैरिमुखासह कीर्तिसह हि त्या गुणास मग जोडी ॥
थोडी सीता चित्तासह भृगुजाहकृतीसहित मोडी ॥ ७१ ॥
होतां भंग धनूचा कडकड भीम ध्वनी जगीं पसरे ॥
घसरे रविरथ विसरे रामजपा जानकी वरू हि सरे ॥ ७२ ॥
मिटले डोळे किटले कान जगाचे समुद्र हि अटले ॥
तुटलें नभ [?] तों फुटलें ब्रम्हांड भये झरे नगा सुटले ॥ ७३ ॥
म्याले दिग्गज बोले नभ मेले भीरू भूमितल डोले ॥
सोले अहिशिर न्हाले घर्मभरें लोकपति भया ल्याले ॥ ७४ ॥
विधि मातृहिंसकाच्या शिवलें तें बहुत हस्तराजीवीं ॥
शुध्यर्थ म्हणुनि वाटे रामकरीं करुनि दे त्वरा जीवा ॥ ७५ ॥
वधिले तद्योगें बहु नृप रामें करुनि जित्वराजीवा ॥
शुध्द्यार्थ म्हणुनि वाटे रामकरीं करुनि दे त्वरा जीवा ॥ ७६ ॥
जातां पण सिद्धिस तो नृप कौशल्यादि सर्व ज्या माता ॥
अणवि दशरथा ही की हो राघव शास्त्रपूर्व जामाता ॥ ७७ ॥
मग आनंदें जनक स्वसुतेचा सविधि हो विवाह करी ॥
तैं वाटलें समस्तां पडली साक्षाद्रमा विवीह-करीं ॥ ७८ ॥
जातां विवाह अटपुनि राम स्वपुरास होय हो अडवा ॥
कडवा बहु तो भार्गव नृपकुलजलधीस मूर्त जो वडवा ॥ ७९ ॥
तैं रामातें सूचवि लक्ष्मण ते कार्तवीर्यबाहु तरू ॥
झाले यत्परशुदर्वी दशशत ही त्वरित जेंवि वा हुत रू ॥ ८० ॥
वधितां जेंवि हरीने पति कापति बहु करेणुकापोत ॥
तेंवि नृपत्री म्हणुनी झाला जो एक रेणुकापोत ॥ ८१ ॥
जेणे रुधिरक्षालित केलि करुनि भूमिभृद्रण कुठार ॥
ज्याचा च ख्यात जगीं एक नपति शोणितार्णव कुठार ॥ ८२ ॥
तो हा गुरुधन्वधक्षुभितमना पातला असे वाटे ॥
जमदग्निसूनु तरि त्या साधु वचे लाव राघवा वाटे ॥ ८३ ॥
तो भज्यद्धनुरारवरुष्ट वदे भार्गवर्षि रामातें ॥
वरिली कोणी शिवधनु मोडुनि भा वर्गवार्षि रामा ते ॥ ८४ ॥

५८. भृगुजाहकृति=परशुरामगर्व. ५९ मातृहिंसक=आईला मारणारा (परशुराम) ६०. राजीव=कमल. ६१ विवाह=विष्णु (गरुडवाहन) ६२ वडवा=वडवाग्नि. ६३. रू=कापूस. ६४. करेणुकापोत=हत्तिणीचे बच्चे. ६५. क्षु=पृथ्वी ६६. शोणित=रक्त ६७. भज्यद्धनुरार-वरुष्ट=मोडलेल्या धनुष्याचे आवाजानें रागावलेला.

राम ह्मणे धनु मोडे मत्करयोगें स्वयें च किडकें कीं ॥
नसतां मंतु[68] वदाया गरुडा ही धरिल काय भिड केकी[69] ॥ ८५ ॥
रे भंगिलेंस रामा स्त्र्यर्थ शिवधनू न तें अघ स्मरतां ॥
परि जाण म्यां न धरिली अर्जुनी क्षत्रियकुलीं अघस्मरता[70] ॥ ८६ ॥
राम वदे ते च न या द्विजभंगद शक्ति भार्गवा रामीं ॥
होइल तें हो हा तव परशूद्धृत भुजगमार्ग वारा मी ॥ ८७ ॥
मग मुनि बोले कोपुनि घे नव मच्चाप राम हा मोड ॥
मग तुज ह्मणेन राघव कुलांत रिपुव्रातसह महा मोडें[71] ॥ ८८ ॥
मग तें हि धनू चढवुनि दावाया राघव प्रताप सतां ॥
ईशत्व हरी मग तो अवलंबी भृगुज विप्र तापसता ॥ ८९ ॥
मग तो निर्विघ्नपणें सवधू श्रीराम पावला गांवा ॥
गावा ध्यावा वाटे हाचि मला सत्त्वभाव लागावा ॥ ९० ॥
इति श्रीज्योतिर्विद्राजजीवसूनु चिंतामणिविरचितः सीतास्वयंवरः समाप्तः ॥

---

६८. मंतु=अपराध. ६९. केकी=मोर. ७०. घस्मरता=घातुकपणा ७१ मोड=अंकुर.

## धुंडिकुमार मोरेश्वरकृत

# चंद्रावळी[1]-आख्यान.

कुटिलें विमला मतिनें वंचितसे जो व्रजांत जायातें ।
नमुं त्या श्रीहरिचरणा दुर्धर संसार व्रजिनें जायातें ॥ १ ॥
श्रवणीं वंशी वंशिध्वनि संचरतां स्मरोनि कुंजातें ॥
युवतिजन चालिला त्या सुरभिसमयसमलता निकुंजातें ॥ २ ॥
त्या एकसरें उठल्या वाटाते गोकुलघनांतुनी चपला ॥
किंवा व्रजकुडांतुनि निघति स्मरवन्हिच्या शिखा चपला ॥ ३ ॥
स्वस्व गृहांतुनि सर्वाहि गोरसविक्रय करावया रमणी ॥
निघतां सत्वर मार्गीं पाहति सहसा मुकुंद जारमणी ॥ ४ ॥
गोपावृत गोपाळा पाहुनि गोपी सशंक चालाया ॥
होउनि काय करावें म्हणती पशुपाळका कुचाळा या ॥ ५ ॥
चंद्रावळि या नावें मुखरिण गोपी बहीण राहीची ॥
धीट सुरूपा चतुरा संगति अवघ्या दृढा धरा ईची ॥ ६ ॥
या परि निश्चय करुनी चालति मार्गें समस्त ही वनिता ॥
वनिं तांडव करि खांडव-रिपुचा सारथिहि आत्मभूजनिता ॥ ७ ॥
तो पथिं पेंधाप्रमुखा धांवति शिशु मुररिपू दयालु गडी ॥
अवरोधुनि तरुणीजन शोधति अर्वाच्य फेडुनी लुगडीं ॥ ८ ॥
सरकुनि चंद्रावळिनें पेंधा बडवुनि सवेग टाळीला ॥
स्फुंदत स्फुंदत सांगे हरि चल आणूं तये खटाळीला ॥ ९ ॥
अतिरूप सुवय यांनीं मानी तृणतुच्छ ऊर्वशी रंभा ॥
हंसगती पादिं चमके गमनीं नमिताति ऊर्वशी रंभा ॥ १० ॥
सूच्यग्रा परि मुष्ठिचा खंडित दिसतो वलित्रया माज ॥
विश्रुत मदनास तशा जपुनि चला हरि हरीं तिचा माज ॥ ११ ॥
पीनोन्नत कुच वर्तुल स्मरदुर्जयदुर्गयुग्मसे दिसती ॥
तनुवाङ्मन अति चचल म्हणवी कुटिलालका अनादि सती ॥ १२ ॥

---

१ चंद्रावळी=राधेची बहीण २ कुटिला=कपटी. ३ व्रज=गोकुल. ४ व्रजिन=पाप, मल ५ वंशिध्वनि=मुरलीरव. ६ सुरभिसमय=वसंतकाळ ७ चपला=विद्युल्लता ८ शिखा=ज्वाळा ९ चपला=चापल्य युक्ता. १० राही=राधी (राधा) ११ खांडवरिपु=अर्जुन. १२ आत्मभूजनिता=मदनदेवाचा बाप (कृष्ण) १३ माज=कंबर. १४ माज=उर्मटपणा. १५ पीनोन्नत=पुष्ट व उंच. १६ कुच=स्तन १७ स्मर=मदन १८ कुटिलालका=कुरळकेशी.

अति मृदुला करवल्ली सल्लील हि जी सनाल कीं कमळें ॥
अद्भुत वदनश्रीची सुषमा[19] जो पाहतां मृगांक[20] मळे ॥ १३ ॥
विद्रुम[21] भंगाचे परि शोभे अधरोष्ठ नासिका सरला ॥
तिलसुम शुकचचूचा[22] पाहुनि मदगर्व सर्व ओसरला ॥ १४ ॥
सर्वोत्कृष्ट विराजे चपलायत दृष्टि ते निकी लाली ॥
लज्जित शतपत्रश्री[23] मज्जन करिते गभीर कीलालीं[24] ॥ १५ ॥
यापरि सौंदर्याची सीमा कथितां हरि त्वरें उठिला ॥
खंडिन गर्व तियेचा दाखवि मजला कुठे उभी कुटिला ॥ १६ ॥
पेंधा श्रीकृष्णातें दाखवि दुरूनी सगोरसा महिलें[25] ॥
जीच्या सौंदर्यातें साम्यचि न मिळे ससागरा महिला[26] ॥ १७ ॥
चंद्रावळिच्या रूपा पाहुनि इच्छी हरी मनीं सुरता ॥
ते क्षणि मूर्च्छित होउनि देवहि दवडी समग्र तो सुरता[27] ॥ १८ ॥
ऐशा मतिनें यदुकुलभूषण तेव्हां सर्व किशोरींसी[28] ॥
घेउनि गोपस्त्रीला मागत दधि दुग्ध तो यशोरासी ॥ १९ ॥
मस्तुमिषें[29] निजवस्तुसि याचित निस्तुलगुणी[30] स्त्रियांजवळीं ॥
कस्तुरिलिप्त-स्तनिंच्या चित्तें [हरूनी?] हरी समाज वळी ॥ २० ॥
शपथपुरःसर करिसी जरि तू सकल्प देहदानाचा ॥
तरिच घडेल सुकृत बहु नातरि यापरि घना सदा नाचा ॥ २१ ॥
बोलुनि मिथ्या पदरीं दुष्कृत कां व्यर्थ घेसि वाचाळा ॥
ठकविसि गोकुळतरुणी या तो स्थाळिं सोड सर्व ही चाळा ॥ २२ ॥
नायिकसी चंद्रावळि जरि साधुलें मदुक्ति या परमा ॥
दाविन जनदृष्टीसी निरसुनि चैलां[31] दिगंबरा परमा ॥ २३ ॥
सर सर परता दुष्टा क्लिष्ट न बोलें वरिष्ट मी जाया ॥
काय वदूं तुजसगें पशुपा तटलें निजाश्रमीं जाया ॥ २४ ॥
दुर्धर सर्पिणि देहा स्पर्शिल हस्तानें कोण तो भलता ॥
रक्षक असतां विपिनीं[32] रंका लाभेल केंवि पुष्पलता ॥ २५ ॥
गरुडध्वजगारुडिया भारुड हें तूं किमर्थ दाखविसी ॥
तुजविषयीं मी न ढळें पंचाक्षरिमंत्र ज्या सदा खविसी[33] ॥ २६ ॥

---

१९ सुषमा=शोभा २० मृगांक=चंद्र. २१ विद्रुम=पोंवळं. २२ शुक=पोपट. २३ शतपत्र=कमल. २४ कीलाल =पाणी २५ महिला=स्त्री २६ ससागरामहिला=समुद्रवलयांकित पृथ्वी २७ सुरता=देवपणा. २८ किशोर=मुलगे २९ मस्तु=लोणी ३० निस्तुलगुणी=निरुपम आहेत गुण ज्याचे असा ३१ चैल=वस्त्र ३२ विपिन=वन ३३ खविसी=जखीण

अर्भक गगनफळातें रडतां श्रमले करोनि लोळणिसी ॥
त्यापरि यत्न मृषा[३४] ते मज तूं करिसी समर्थ गौळणिसी ॥ २७ ॥
एक पदाही न पुरे त्या सुरवर्यी फळे कसी जगती ॥
रवि शशि तारागण हे मुष्टित अवघी धरील हें जग ती ॥ २८ ॥
विधिवर्जित[३५] पुरुषातें लाभेल किं काय खाणि परिसाची ॥
दैवहता गुणहीना करिसी तृष्णा तया परी साची ॥ २९ ॥
नाना परि बडबडुनी मिरविसि लोकीं मृषा सदा शीला ॥
परिसांची मीं सदनें बाधुनि दिधलीं स्वदासदाशीला ॥ ३० ॥
श्रोत्रियें[३६]शालातरिंची अरणी[३७] कैसी मिळेल मातंगी[३८] ॥
अथवा सिंहवधूसीं सगम कैंचा घडेल मातंगीं[३९] ॥ ३१ ॥
जगरक्षणयज्ञीं मी दीक्षित अध्वर्यु वीतिहोत्राही ॥
नरसिंह मि तव वदनें वदविन हरि तूं आम्हासि हो त्राही[४०] ॥ ३२ ॥
यापरि केशिनिहता या सकेतासि गोप-जायांतें ॥
बोलुनि सत्वर उठिला निजसदनाप्रति सगोप जायातें ॥ ३३ ॥
गोपाळे गोरक्षक सनिध बसउनि अनेकधा त्यांसीं ॥
गोष्टी बऱ्या शिकविल्या सृष्टिक्रमयुक्ति तेवि धात्यासी ॥ ३४ ॥
मायामय ची तेची मी धरितों सांग जगन्सूत्रा मा ॥
रुचिराकृति राहीची नुमजे ते व्यक्ति विशद सूत्रामीं[४१] ॥ ३५ ॥
नटवेषाकृति योषा होउनि दास्यत्व अंगिकारावें ॥
सर्व हि अति सौंदर्यें भासति जीतें तिला स्विकारावें ॥ ३६ ॥
सर्वाधीश निदेशें वनितावेषे शिशूतती[४२] व्रजिची ॥
चंद्रावळिच्या मागें निघति अहकृतिमदोर्मि[४३] तीव्र जिची ॥ ३७ ॥
श्रीमद्वृष्णिकुलेंशें सुदर वरिलें स्वरूप राहीचें ॥
लीलानिधिगर्भींचें रत्न चि निर्मळ नवे पराईचें ॥ ३८ ॥
श्रीहरि चंद्रावळिच्या कृत्रिम वेशें गृहा करी गमन ॥
भागिनी आश्लेषांची[४४] उत्कट धरितो स्पृहा करीगमन[४५] ॥ ३९ ॥
प्रेमालिंगन घडतां ठसली दृढताष्ट सात्विका भावी ॥
चंद्रावळि भागिनीच्या मोहें ते मूर्ति आत्मिका भावी ॥ ४० ॥

---

३४ मृषा=व्यर्थ. ३५ विधिवर्जित=दैवहीन ३६ श्रोत्रिय=अग्निहोत्री ३७ अरणी=समीध ३८ मातंग=अतिशूद्र ३९ मातंग=हत्ती ४० त्राही=रक्षण कर. ४१ सुत्रामा=इंद्र. ४२ तति=समूह ४३ ऊर्मी=लाट, अतिशय ४४ आश्लेष=आलिंगन. ४५ करीगमन=हत्तीसारखे चालणे आहे ज्याचें असा

शिणली बाई म्हणउनि घडिघडि कुर्वाळुनी वरा ईतें ॥
घेत असे परि न कळे सुरवरऋषि मोहिनी बलाईतें ॥ ४१ ॥
व्रतदानादिक सुकृतें देव हि जाले वसुधरे वरिले ॥
तुज पहतां त्रिभुवनिचें वाटे साम्राज्य सुंदरी वरिलें ॥ ४२ ॥
अष्टावष्टसहस्रा असतां युवती करीत जो जारी ॥
म्हणवी श्रेष्ठ नियंता खळजनहता बहूत जोजारी ॥ ४४ ॥
तव वदनें ऐकावी वाटे मनिं कांतलोभवार्ता ते ॥
पुण्यश्लोका ललिता ऐकत सुख देति कीं भवार्तातें ॥ ४३ ॥
श्रीवल्लभ तुजसंगें रतिविरतीतें कसा धरी संगें ॥
अनुमत होउनि विवरीं बहु दिन राहे प्रबुद्ध रीसां गे ॥ ४५ ॥
असती बहु जरि योषा तोषा मजविण नये सये हरिला ॥
गर्व प्रमदावलिच्या मजसीं अनुरक्ततान्वये हरिला ॥ ४६ ॥
भामाप्रमुखा सवती शिकविति कुमती हरीस एकांतीं ॥
परि अनुरागें माझ्या न दिसे अणु वक्रता सये कांतीं ॥ ४७ ॥
पडतां वदनें जडली तत्पतिसुखकर कथावली श्रवणें ॥
प्रेमोत्कर्षं हृदयीं चंद्रावळि बहु सुखावली श्रवणें ॥ ४८ ॥
अतिशय अनुरागलें कौस्तुभपद्मादि उत्कटा ठेवी ॥
हरि ठेवी मजपाशीं का करिसी या सये उठाठेवी ॥ ५० ॥
प्रक्षाळुनि पदकमळा कमळाक्षी ते न लाविला उशिरा ॥
शिशिरांबु प्राशविते ऐलाकर्पूर घोळुनी उशिरीं ॥ ५१ ॥
पाय धुतां पायातें पाहुनि पुसते स्वसर्षे पर्याई ॥
हरिपदपाद्मिचि चिन्हें दिसती तरिही कसीच पर्याई ॥ ४९ ॥
आंगीं लाउनि बाई लेप चमेली सुगधरायाचा ॥
ठेउनि वसनें व्हावें नाहीं संशय तुजा धरायाचा ॥ ५२ ॥
स्वकरें ग्रथि खुणेची दिधली हरिनें निरीस कंचूला ॥
विघड पडे जैं त्यातें जाचिल मजला धरूनि कचूला ॥ ५३ ॥
विंचरूनि वेणि करितो हरि तो घनकांतिजिंवरां कशां ॥
मृगमदंतिलक ललाटीं स्वकरें करिताति वक्र राकेशीं ॥ ५४ ॥
वदती उत्तम हे कीं लोकीं पतिचा निदेशे मानावा ॥
त्यांत यशश्रीकीर्ती चढते सुषमा पराक्रमा नावा ॥ ५५ ॥

---

४६ एला=वेलदोडा. ४७ उशिरा=वाळा (पाण्यांत घालण्याचा) ४८ स्वसा=बहीण. ४३ घनकांतिजिवर=काळे कुरळकुळीत ५० मृगमद=कस्तुरी. ५१ राकेश=चंद्र. ५२ निदेश=आज्ञा.

अस्ता दिनमणि जातां जनार्दना तूं विवंचना रीतें ॥
उठवी भुक्तिसि जीची करणें सुरतीं विवच नारी ते ॥ ५६ ॥
गोष्टि असो हे जाली भुक्तिचि तुझिया बहु त्वरा मातें ॥
म्हणुनि कराब्जीं धरुनी ये निज सदनांत गोपरामा ते ॥ ५७ ॥
बहुविध पक्वान्नोदन खीरादि लेह्यादि षड्रसें भरित ॥
कर्मठि पापड शाका कोशिंबिरि तिक्त फारसें भरित ॥ ५८ ॥
तिखटें विविध वरान्नें रुचिकर वडिया किसूनि कुष्मांड ॥
जेववितें बहिणीतें ते जरि आली करोनि कुष्मांड ॥ ५९ ॥
पक्तिसि सारुनि भुक्ती बोलत युक्ती स्वकेलिगेहांत ॥
स्वस्थ निजूं वो सखये तेथ म्हणत धरुनि चाल गे हात ॥ ६० ॥
रात्री राहुनि विपिनीं रक्षिति पति साभिमान गे झाला ॥
व्याघ्रवृकादि ससेही जागृत चढउनि कमान गे झाला ॥ ६१ ॥
ऐकुनि वचनें राही लीलासदनांत सत्वरा गेली ॥
पूर्विल चंद्रावळिचें पाहुनि जे नामसत्व रागेली ॥ ६२ ॥
सरस सुपारी चिकणी वीडया करुनी सुपक्व पानाच्या ॥
भगिनीस देत जीच्या तृष्णा दिसताति ओष्ठपानाच्या ॥ ६३ ॥
विविध सुगंध द्रव्यें शय्या मृदु गेह चित्र शालेचें ॥
प्रावर्ण हि ज्या स्थानीं कार्पासान्वित विचित्र शालेचें ॥ ६४ ॥
सुखगोष्टी विमलांगी बसुनि पलंगीं परस्परें करितो ॥
स्वस्वपतींचीं चरितें प्रणयाचरितें तशाच लोकरिती ॥ ६५ ॥
झोंपेस जातां गोपी जगदाटोपी त्यजोनि वेषातें ॥
जो पीनस्तनि वोपी कर अति सोपी करोनि योषा ते ॥ ६६ ॥
गाढालिंगन ओष्टग्रह कुचपीडा क्रमें रमाकांतें ॥
सुरतारंभण केलें वंचक मतिनें मनोरमाकांतें ॥ ६७ ॥
निधुवन निज कांताचें मानुनि बाला खलद्गिरा पतिला ॥
राहि असे शेजारीं पाहुनि विधि हा चढेल कोप तिला ॥ ६८ ॥
दुजिया संनिध रमतां दोष विशेषें अयोग्य हें करणें ॥
त्यांतहि माझे बहिणी देखत अर्वाच्यता कशी करणें ॥ ६९ ॥
सुरतायासें तरुणी जागृत होउनि बरें विलोकी जो ॥
हृदयावरी मुरलीधर रमतो व्रजवेष दावि लोकीं जो ॥ ७० ॥

---

५३ करणें=इंद्रियें ५४ कुष्मांड=कोहळा. ५५ केलि=क्रीडा ५६ प्रावर्ण=पांघरुण. ५७ कार्पास=कापूस. ५८ शाल=काश्मिरांतील लोकरीचें उत्तम वस्त्र. ५९ निधुवन=सुरत.

थरकुंनि सरकुनि पाहे परी मुकुंदें चहूं भुजीं धरिली ॥
निरखुनि रागें गरकुनि बोले बरि खुण समग्र उद्धरिली ॥ ७१ ॥
शिव शिव करुणामूर्ते सांबा मति घोर सकटीं पडली ॥
विपिना माजी निशिं या व्याघ्रकरीं जेंवि धेनु सापडली ॥ ७२ ॥
कृष्णा पुरविलि तृष्णा लावुनि माझ्या कलंक वंशातें ॥
वंचाया कुलयुवती फिरसी स्वकरीं धरूनि वंशातें ॥ ७३ ॥
आज्ञापावीं तनु ते श्रीहरि हरिसुतनुता सुवास्तव्या ॥
स्थिरचर विश्वव्यापक मूर्ती जे हीच मानवा स्तव्या ॥ ७४ ॥
भरतां मन्मथ देहीं सुरतीं तेही रती धरी दुपटा ॥
निष्कपटा श्रीहरिसीं विहरे गतवास कंचुकी दुपटा ॥ ७५ ॥
चतुरधिकाशिति बंधे करुनि मुकुंदे बृहत्तरा रजनी ॥
रत केलें परि कोणा न कळे तिळमात्रही विचार जनीं ॥ ७६ ॥
गोपि सकामा केली अतिशय निष्काम पूर्णकामानें ॥
दीनोद्धरतनुसंगें युवतीं अपवर्ग कामुका मानें ॥ ७७ ॥
श्रीमच्छ्रीपतिहस्त स्पर्शें गोपांगना सदाचरणीं ॥
राहुनि नटली कुटिला मति ते त्यागुनि सुखें सदाचरणीं ॥ ७८ ॥
सदसद्वस्तुविचारें चिन्मयपदलाभ जोडला सहजें ॥
अद्वयवातें उडती आनंदाब्धित तरंग त्या सह जे ॥ ७९ ॥
सुरतांतीं हृदयावरि टेऊनि कर चीर सत्रपा हुडकी ॥
वस्त्र न दे हे जाणुनि म्हणते हा नंदपुत्र पाहुड कीं ॥ ८० ॥
नम्र मुखें सखि विस्मित होउनि सुस्मित हरीस मागतसे ॥
देइ दयाळा लुगडें उघडे वपु नष्टकांति भासतसे ॥ ८१ ॥
वास न दे तो कालिय-शासन ललना कृशानुसी दिसते ॥
कुतुकें बोले तिजला नाठविसी काय मानसीं दिस ते ॥ ८२ ॥
सामर अमरावतिचें जेणें वैभव दिलें शतक्रतुला ॥
त्या प्रति नेणासि म्हणसी नेदीं दधि दुग्ध लेश तक्र तुला ॥ ८३ ॥
सर्व असो तें प्रस्तुत घडलें हें मान्य कर्म योगानें ॥
देउनि वसनें माझीं सुकृत तनू हो गृहोपयोगानें ॥ ८४ ॥
त्या नतर यदुराजें त्या व्रजभाजेस देउनि वासा ॥
प्रेमें हृदयीं धरुनी इच्छित गमनासि देव नीवासा ॥ ८५ ॥

---

६० चतुराधिकाशि=चव्ऱ्यायशी आसनें. ( हीं कामशास्त्रीं प्रसिद्ध आहेत ) अनंगरंग दहावा भाग पहा ) ६१ अपवर्ग=मोक्ष. ६२ कालियशासन=कृष्ण. ६३ कृशानु=अग्नि.

धन्य तुझी करणी हे कृष्णा जननी तुतेंचि हो व्याली ॥
व्रजजन यापरि सर्व हि गाती विटचौर्यशौर्यवोव्याली[64] ॥ ८६ ॥
तुटती यातायातें जे नर भज ते अनन्य वोळगती ॥
निरसुनि दुरहकृतितें देइन त्यातें सखे विशाल गती ॥ ८७ ॥
बकशाकटादिक कपटा ब्रह्मेंद्रकृता निवारि घोषांच्या[65] ॥
उभवति कामे गुढिया उभवति इहपर सुकीर्ति घोषाच्या ॥ ८८ ॥
यमनियमाद्यष्टांगे जें पद न मिळे महर्षि सिद्धांतें ॥
तें गोपीप्रति दिधलें धुडिति जें शास्त्र वेद सिद्धांतें ॥ ८९ ॥
यापरि करूणापांगें सुख करि अज्ञान बधुरा जीवा ॥
तोषवि सर्वां जैसा समुदित शतपत्रबधु[66] राजीवां[67] ॥ ९० ॥
बहुविध युक्ति विचारें बोधुनि आभीरभीरु[68] माकांतें[69] ॥
दर्शवितां निजरूपा त्यांजिना मग सर्वहि भ्रमा कां ते ॥ ९१ ॥
चंद्रावळिसह सुरतें क्रमिली राहुनि तिचे गृहीं दोषा[70] ॥
जगदीशें या कलिच्या विलया ने जो समग्र ही दोषा ॥ ९२ ॥
आश्वासुनि गोपस्त्री अभिरत जी कांत नाथ गोकुळिचा ॥
निजसदना प्रति जाया उठिला निस्तुल शिशू शशीकुळिचा ॥ ९३ ॥
शिशुपालांतक शिशुंतें अवध्या जागें करुनि वेशाला ॥
सोडुनि सत्वर गेला सार्भक सूर्योदयीं निवेशाला[71] ॥ ९४ ॥
हरि तो प्रातःकाळीं कालिंदितटीं निकुंजकांतारीं[72] ॥
गोप शिशूसह विहरे जो निजभजनेंचि भावुकां[73] तारी ॥ ९५ ॥
कर्कश रूप सितेचें[74] प्रथमाचि अम्लस्वभाव गोस्तनिचें[75] ॥
चंद्रावळिचरितात्री क्षीर हि नीरस समग्र गोस्तनिचें[76] ॥ ९६ ॥
क्षैण्यविगर्हित[77] लोकीं एकचि सकलंक चंद्रमा विधिनें ॥
जाणुनि चंद्रावळि ही सृजिली[78] निर्दोष अब्द या विधिनें ॥ ९७ ॥
बहुत चरित्रें बहुता कविनीं केलीं तथापि या चरितीं ॥
गुणरसिका पुरुषांचे अद्भुत श्रद्धादि भाव आचरितीं ॥ ९८ ॥

---

६४ विटचौर्य शौर्यवोव्याली=जार कर्म, चोरी, शौर्य यांविषयींच्या ओव्यांचा समूह ६५ घोष=गोकुळ. ६६ शतपत्रबधु=सूर्य. ६७ राजीव=कमल ६८ आभीरभीरु=गवळण. ६९ माकांत=कृष्ण ७० दोषा=रात्र ७१ निवेश=घर. ७२ कांतार=वन. ७३ भावुक=भाविकभक्त ७४ सिता=खडी साखर. ७५ गोस्तनी=द्राक्षा. ७६ गोस्तन=गाईचा स्तन. ७७ क्षैण्यविगर्हित=क्षीणत्वामुळें निंद्य ७८ सृजिली=निर्मिली.

पर्युषितत्वें कथना सांडुनियां जरि दुर्जनेंचि वानावें ॥
धीरोदारगुणोत्तर या सम तरि कोण दाखवा नावें ॥ ९९ ॥
धुंडलिं धुंडिकुमारें हिंडुनि निगमादिकें भ्रमें श्रमुनि ॥
परि फळ तें त्रजि लाभे शोधिति जें निग्रहें अजस्र मुनी ॥ १०० ॥
अग्निपुराणीं कथना सांगे जें सूत शौनकप्रमुखा ॥
त्या कथनीं आज्ञापी श्रीहरि मोरेश्वराख्य विप्रमुखा ॥ १०१ ॥

चंद्रावळी चरित समाप्त.

---

७९ पर्युषितत्व=शिळेपणा. ८० धीरोदारगुणोत्तर=चातुर्य व औदार्य या गुणानीं युक्त. ८१ अजस्र=निरतर.

*आनंदतनयकृत-

## कंदुकाख्यान.

कोणी ते प्रमदा[1] तया व्रजपुरा[2] जातां रणन्नूपुरा[3] ।
तेथे ये त्रिपुरारिचा[4] प्रियसखा तो योग वानू[5] पुरा ॥
शोभे कल्पतरूतळीं करतळीं पांवा तथा मोहरी ।
वाहे मंजुळ कंजलोचन[6] जना नांदे हरी मोहरी ॥ १ ॥
ज्याची भासुर[7] भा[8] प्रभाकर[9]-निभा व्यापूनि लंघी नभा ।
तो हा सतसभाभिवंदित उभा ते दिव्य देखोनि भा ॥
भ्याली बल्लववल्लभा[10] मग इभा[11] ऐशी रमावल्लभा ।
चाले दूरूनि हा धरील म्हणुनी शके जगदुर्लभा ॥ २ ॥

याची सदां समजते बरि लोकलीला । मातें करीं धरिल देखुनि येकलीला ॥
चाले चुकावुनि पुढें चमकोनि घोषों[12] । बिंबाधरा[13] शशिमुखी पिकमंजुघोषा[14] ॥ ३ ॥
भ्याली पुढें सरकली गजराजचाली[15] । कित्येक दूर पथ लंघुनियां निघाली ॥
ये पाठिशीं हरि दयाघन मंद वाहे । जातां विलोलनयना परतूनि पाहे ॥ ४ ॥
परतुनि जंव पाहे गोकुळा जातजातां । निकट चि हरि आला वंद्य जो वेदसंतां ॥
पदर धरुनि तीचा जो उभा ज्ञानगाभा । पशुपयुवति जाली पात्र चिद्भाग्य लाभा ॥ ५ ॥

---

* विजापूर तालुक्यात आनदराव नावाचा अरणीगावचा कुळकरणी होता, त्याचा पुत्र आनदतनय. हा शिवाजीचा बाप शहाजी याचा गुरु होता असें म्हणतात. याची यमकबद्ध कविता असून पदेही पुष्कळ यानें केलीं आहेत शिवाजीचा जन्म शालिवाहन शके १५४१त झाला त्यामुळें त्याचा बाप जो शहाजी त्याचा गुरु आनदतनय हा सोळाव्या शतकाच्या आरंभींच असला पाहिजे असें दिसतें बहुत करून अरणीकर आनदतनय व पैठणकर एकनाथ स्वामी (शके १४७०–१५२१) हे उभयतां समकालीन असावे असें वाटतें पंत या कवीच्या यमकरचनेविषयीं ह्मणतात कीं —

आनद-तनय अरणीकर शोभवि फार कवन यमकाहीं ।
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचें पाहे न भवन यम काहीं ।

सन्मणिमाला.

१. प्रमदा=स्त्री. २. व्रजपुर=गोकुळ ३ रणन्नुपुरा=खुळखुळत आहेत पैजणें जीचीं अशी. ४ त्रिपुरारि=शिव ५. वानू=वर्णू ६. कंजलोचन=कमळासारखे आहेत डोळे ज्याचे ७. भासुर=तेजस्वी. ८ भा=कांति ९. प्रभाकर=सूर्य. १०. बल्लववल्लभा=गवळ्याची स्त्री. ११. इभ=हत्ती १२. घोष=गवळवाडा १३. बिंबाधरा=तोंडल्यासारखा आहे लालचा ओंठ जीचा अशी. १४. पिकमंजुघोषा=कोकिलासारखा आहे मंजुल स्वर जीचा अशी १५. गजराजचाली=उत्तम हत्तीसारखी मंद आहे गति जीची अशी.

ते सोडवी धरुनि अंचळ चंचळाक्षी । बोटी बळें स्वबळ बांधव लोकसाक्षी ॥
पायीं तुझ्या हरि पडेन म्हणे कृपाळा । रे सोडिं सोडिं मज फार उशीर जाला ॥ ६ ॥
मी योषितें वंशधरा सुशीळा । का झोंबसी वंशधरा सुशीळा ॥
शौरी म्हणे मानवतो अशीलें । न स्वीकरी मानव तो अशीलें ॥ ७ ॥
प्रार्थी गोपशिखामणीस रमणी गोपींगणीं तूं धनी ।
राणी हे करणी उणीव सखया कोणी गणीना धनी ॥
पाण्यालागुनि गौळणी बहुजणी येतील येथें क्षणीं ।
बोटीं त्या धरितील तूज तरूणी होती मला गाजणी ॥ ८ ॥
ऐशी बोलत ते उभी हरि न भी ते भीरू पाहे दिठी ॥
हा आभीर गभीर भूपति असा सोडी च ना ते मिठी ॥
ते बोटी परि हा न सोडि च गडी ते हात जोडी सती ।
ते जोडी मज भासते स्मररती दोघें तशीं दीसती ॥ ९ ॥
येरीकडे नंदवधू यशोदा । धुंडी तया भक्तदयायशोदा ॥
खेळावया बाळक सगसंगें । गेला असे क्रीडत रंगरंगें ॥ १० ॥
निघाली बाहेरी हुडकित हरीतें चहुकडे ।
फिरे नाना मार्गी करिं धरुनि त्याचे संवगडे ॥
पुसे ज्याला त्याला तुह्मि निरखिलें मूल सखये ।
उठावे खेळाया सहज गुण त्याचा जगति ये ॥ ११ ॥
ऐशी शोध करीत हंसगतिने लक्षीत आली पथा ।
तानें देखुनिया दुरी मग हरी लीला करी अन्यथा ॥
गोपीतें पदरीं न सोडि च करीं लोळे धरारगणीं ।
दावी स्फुदन मंद रूदन मुखीं भांबावली गौळणी ॥ १२ ॥
आला राग तिला म्हणे युवतिला का गे खट्याळे कशी ।
नाहीं लाज तुला मुलासि धरुनी रानीं उभी ठाकसी ॥
नेणें कांहिं च मी स्वभाव-गतिने मामी घरा जातसें ।
मार्गी हा पदरीं धरी मज हरी नेणा तुम्ही का तसें ॥ १३ ॥
श्रीहरी परम स्फुदत लोळे । बाष्पयुक्त बहु दाखवि डोळे ॥
वाटला कळवळा जननीला । घे कडेवरि तदा घननीळा ॥ १४ ॥

---

१६ योषिता=स्त्री १७. वंशधरा=कुलीन १८. वंशधर=मुरलीधर १९ अशीला=अशा प्रकारचीला २० अशीला=शील रहित ह्मणजे वाईट स्वभावाची. २१ गोपशिखामणि=गवळ्यांत मुख्य ( कृष्ण ) २२- आभीर=गवळी. २३ भक्तदयायशोदा=भक्तांवर दया करून त्यांस यश देणारा * मामी=सासूबाई.

देवीयं सुरनिम्नगा किमु वरा कृष्णाथ वेत्थं पुरा
विज्ञातुं सुरलोकभूतल इमे पात्रे तुलाया विधौ ॥
कृत्वा संतुलयत्यहो हि गुरुतायोगाद्भुवं नात्यजत्
कृष्णा स्वर्गनदी स्वनाम निखिलं याथार्थ्यमेवानयत् ॥ ५२ ॥
कृष्णे कृष्णजले त्वदीयसलिले मज्जंति ये मानवा
दिव्यैर्यानवरैः प्रयांति हि यदा वैकुंठलोकं तदा ॥
निंदंति स्वतपांसि यज्ञनिकरान् स्वर्गंगता मानवाः
कृष्णास्नानफलं प्रपश्यत सुराः श्रीकृष्णरूपा इमे ॥ ५३ ॥
गोदां याति वियन्नदीति निखिला जल्पंति लोकाः स्फुटं
व्यासश्चापि लिलेख मंदमतिभिर्नो दृश्यते तत्र सा ॥

तस्मिन् मनुजाः निर्मलाः निर्दोषा जायते च परं दिव्यं स्वर्गं व्रजंति त्वं यत्स्वरूपः साक्षात् श्रीहरिः श्रीविष्णुरेव असीति शेषः । अतःमृत्योः भयात् विमोचयसि चेत् तव आश्चर्यं न । हरेरवतारो वामनः दितिपुत्रेद्बुष्टा ब्राह्मणद्वेष्टेति गूढाशयः तस्य वामपदादिपरपरया उत्पन्नायाः भागीरथ्याः एतत्सामर्थ्यं त्वं तु ब्रह्मपत्नीशापेन नदीत्वं प्राप्तः श्रीविष्णुरेव । कृष्णा कृष्णतनुः साक्षाद्वेण्या देवो महेश्वर इत्यादि वचनप्रामाण्यात् असि । अतः मृत्युभयवारण तव नाघटितमित्यर्थः ॥ ५१ ॥

देवीति । विधौ ब्रह्मणि इयं देवी सुरनिम्नगा भागीरथी वरा श्रेष्ठा किमु अथवा कृष्णा वरा इत्थं विज्ञातु सुरलोकश्च भूतलं च सुरलोकभूतले इमे पात्रे कृत्वा सतुलयति सति अहो इत्याश्चर्ये कृष्णा गुरोर्भावः गुरुता जाड्यं तस्य योगात् सबधात् । वोलोगुणवचनादिति विकल्पात् ङीषभावः । भुवं नात्यजत् स्वर्गनदी भागीरथी निखिलं स्वनाम याथार्थ्यमेव अनयत् । स्वर्गनद्याः भूनदीत्वं न युक्तमिति-उपरिगतेतिभावः ॥ ५२ ॥

कृष्णे इति । कृष्णं जलं यस्याः सा कृष्णजला तत्सबुद्धौ हे कृष्णजले हे कृष्णे तव इदं त्वदीयं त्वदीयं च तत् सलिलं च त्वदीयसलिलं तस्मिन् ये मानवाः मज्जति स्नाति ते यदा दिव्यैः यानवरैर्विमानैः वैकुंठलोकं व्रजति तदा स्वर्गं गताः मानवाः स्वतपांसि श्रमसाध्यानि केचिद्यज्ञनिकरान् ज्योतिष्टोमादीन् श्रमसाध्यान् निंदति । निंदनेकारणमाह । हे सुराः हे देवाः इमे मानवाः श्रीकृष्णरूपाः सरूपतामुक्तिभाज इत्यर्थः इदं कृष्णास्नानफलं प्रपश्यत । अल्पायासेन महत्फलं प्राप्तमेतैरस्माभिस्तु बह्वायासैरल्पफलं क्षयिष्णु च लब्धं धिगस्मान् धिगस्मत्तपांसीत्यर्थः ॥ ५३ ॥

गोदामिति । वियन्नदी भागीरथी सुरपूजिते कन्यायां सति गोदां याति इति

१३ 'पर' पा॰भे॰ ।

कन्यायां सुरपूजिते स्फुटतरं त्वां सा तु संयाति यत्
तन्मन्ये जनपापसंघहरणोपायव्रतं शिक्षति ॥ ५४ ॥
वैकुंठः परिमाणवान् भगवती पाथोधिजैका तथा
यस्तु त्वत्सलिले निमज्जति नरो विष्णुत्वमागच्छति ॥
एवं विष्णुशतैर्निरंतरमितैर्लोके प्रपूर्णे पुरः
स्थास्यंति क्व नु विष्णवो जलधिजाहेतोर्विवादे कथम् ॥ ५५ ॥
इदमष्टकमष्टसिद्धिदं पठतां पापचयापहं परम् ॥
पुरुषोत्तमतुष्टिकारकं पठनीयं मनुजैरुपस्यदः ॥ ५६ ॥
एवं स्तुत्वा राजराजो नदीं तां तस्यास्तीरे दक्षिणे संस्थितः सन् ॥
विप्राग्र्येभ्यः सर्वदानानि दत्त्वा नत्वा सर्वान् मीलिताक्षो बभूव ॥५७॥
शर्वं सांबं संस्मरन् प्राणवायुमूर्ध्वं नीत्वा सूर्यमध्यं विभिद्य ॥
हित्वा देहं पंचभूतैरुपेतं नाकं यातो दिव्यदेहं दधानः ॥ ५८ ॥

निखिलाः जनाः जल्पति वदति । व्यासश्चापि लिलेख पुराणेषु इत्यर्थः । सा भागीरथी तत्र गोदाया मंदमतिभिः अज्ञैः न दृश्यते चर्मचक्षुरगोचरेत्यर्थः । सा तु भागीरथी तु स्फुटतर स्पष्ट महाबलेश्वरपर्वते प्रवाहरूपेणोत्तरत आगत्य त्वां सयाति यत् तत्तस्माद्धेतोः जनाना पापसघहरणे यः उपायः तस्य व्रत शिक्षते अभ्यस्यति इति अहं मन्ये । तव तदपेक्षया ज्येष्ठत्वात् ज्ञानाधिक्याच्च पापहरणोपायाभ्यसनार्थमेवायातीवेत्यर्थः ॥ ५४ ॥

वैकुठ इति । वैकुठः परिमाणवान् इयत्तावान् भगवती पाथोधिजा लक्ष्मीः एका यस्तु त्वत्सलिले नर. निमज्जति सः विष्णुत्वं आगच्छति एव निरतर इतैः गतैः विष्णूना शतै. लोके वैकुठलोके प्रपूर्णे सति पुरः अग्रे विष्णव. क्वस्थास्यतिजलधिजाहेतो. विवादे कथ स्यात् ॥ ५५ ॥

स्तोत्रपाठफलमाह इदमिति । अष्टसिद्धयस्तु । अणिमा महिमा चैव गरिमा लघिमा तथा । ईशत्व चवशित्वं च प्राप्तिः प्राकाम्यमेवचेत्यमरः ॥ ५६ ॥ अथास्य देहत्यागप्रकारो द्वाभ्यामाह एवमिति । मीलिते अक्षिणी येन स. मीलिताक्षः शर्वमिति ॥५७॥

दिवमिति । अवनतानां जनाना आनदस्य करणे साधनीभूते । यद्वा अवनतजनानां शरणागताना आनंदक' रणो यस्य तस्मिन् दिव स्वर्गं याते गते सति नगरस्य ये नराः नार्यश्च तेषां नयनानि तेभ्य. विनिर्यातां वारां उदकानां चपलतरधाराः तटवर्तीं कृष्णाख्यां नदीं अखिलैर्नागरजनैः अनुल्लघ्या विदधुः चक्रुः । अतिशयोक्तिरलकार. ॥ ५९ ॥

---

१ ७ ०स पा० भे ।

दिवं याते तस्मिन्नवनतजनानन्दकरणे
रणे शूरे वीरे नगरनरनारीनयनतः ॥
विनिर्याता वारां चपलतरधारा तटवती-
मतीवानुल्लंघ्यां विदधुरखिलैर्नागरजनैः ॥*

नाम्नैव कृष्णा तटिनी पुरा या तां वर्णतश्चापि तदैव चक्रुः ॥
नार्यः सरोजायतलोचनांतर्वर्त्यंजना निंदितचंद्रवक्त्राः ॥ ५९ ॥

बल्लालनामा स तु वीरवर्यस्तद्देहकृत्यं विहितं तदीयैः ॥
चक्रे धनं चापि ददौ द्विजेभ्यो दंतिव्रजग्रामतुरंगमादीन् ॥ ६० ॥

चिताभुवि स्थापितमत्र लिंगं दृषन्मयं प्रावृषि तज्जलौघैः ॥
मुहुर्मुहुश्चालितमप्यनेजन्नृपस्य पुण्येन तथाधुनापि ॥ ६१ ॥

चंद्रसप्तरसभूमिसंमिते (१६७१) शालिवाहनशके नृपोत्तमः ॥
कीर्तिमत्र विनिधाय सुस्थिरां दिव्ययानवसतिर्दिवं ययौ ॥ ६२ ॥

शाहोः सुतो राम इति प्रसिद्धो रम्यैरगण्यैः सहितो गुणौघैः ॥
तस्मादभूच्छाहुनृपः प्रतापप्रतापितारातिजवो जनेशः ॥ ६३ ॥

नाम्नैवेति । निंदितः चद्रः यैस्तानि निंदितचंद्राणि निंदितचंद्राणि वक्त्राणि यासां ताः सरोजानि कमलानीव यानि आयतानि विस्तृतानि लोचनानि तेषां अंतर्वर्ति अजन कज्जल यासां ता तथोक्ता. नार्यः या नदी पुरा पूर्व नाम्नैव कृष्णा आसीदितिशेषः । तां वर्णतः कृष्णेन वर्णेन तदैव कृष्णां नीलां चक्रुः । पूर्वं या कृष्णेति सज्ञा तां तस्मिन् राज्ञः वियोगक्षणे एव यथार्थां कृतवत्यः न तु सर्वदा ॥५९॥ बल्लालेति । बल्लालनामा प्रधानराट् तदीयैः राजबांधवैः विहित तत्कालोचितं उत्तरकृत्य चक्रे । दतिनां व्रजाः समूहाः यद्वा दतिनो गजाः व्रजा गवा गोष्ठाः तान् ददौ ॥ ६० ॥ चिताभुवीति । अत्र कृष्णाया चितायाः भूः चिताभूः तस्यां चिताभुवि स्थापित दृषन्मय पाषाणप्रचुर तत् लिंगं शिवलिंग प्रावृषि वर्षाकाले जलाना ओघैः मुहुर्मुहुश्चालितमपि एजतीति एजत् न एजत् अनेजत् अकपमान अस्ति नृपस्य शाहो. पुण्येन अधुनापि अस्मिन्नपि काले तया अनेजत् अकपमान अस्ति प्रवाहेपि तिष्ठतीत्यर्थ. ॥ ६१ ॥ चद्रेति । दिविभव दिव्य दिव्य च तत् यानं च दिव्ययान विमान तत्र वसतिर्यस्य सः नृपोत्तम अत्र अस्मिन् लोके ॥ ६२ ॥ अथास्य दत्तपुत्रान्वयमाह यावत्समाप्ति । शाहोरिति । राम इति प्रसिद्धः शाहोः सुतः दत्त आसीदितिशेष । तस्मात् रामात् पुन शाहुः अभूत् ॥ ६३ ॥

---

१८. धीरे पा० अधिकोऽयं श्लोक क्वचित्

तदात्मजोयं रिपुदंतिसिंहः प्रतापसिंहो जगतीं सपत्नैः ॥
ह्रतां पुनः स्वामपहृत्य सर्वामास्तेऽधुना तां परिपालयन् सन् ॥६४॥
यदीयं प्रतापं समाकर्ण्य सर्वे द्विषंतः प्रभीताः प्रजग्मुर्दिगन्तान् ॥
द्विजानां व्रजा आययुर्यत्समीपं प्रतापादिसिंहो जयत्येष राजा ॥ ६५ ॥
भानौ प्रतापो म्रदिमा न तत्र चंद्रे मृदुत्वं नहि तत्र तापः ॥
प्रतापसिंहे द्वयमप्यदर्शि व्यवस्थया शत्रुजने नते च ॥ ६६ ॥
भूपालाधीश राजन् तव रिपुनिचयो भीतभीतोऽपयातो
देशात्स्वीयाद्दिगंतात्तदनु झटिति ते कीर्तिदूती प्रणुन्ना ॥
धर्तुं याता तमेनं चपलतरमतेस्तस्य दृप्तापकीर्ति-
र्योद्धुं याता प्रयागेऽसितसिततटिनीव्याजतो युध्यतस्ते ॥ ६७ ॥
क्षमां त्वदीयां धरणी गृहीत्वा जनापराधान् सहते नितांतम् ॥
उदारतां कल्पतरुस्त्वदीयामभ्यस्य नूनं वितरत्यनंतम् ॥ ६८ ॥
इति श्रीशिवकाव्ये पुरुषोत्तमविरचिते एकादशश्चमत्कारः ॥ ११ ॥
॥ पूर्वार्धं समाप्तमेतत् ॥

अथ अस्मिन् काले वर्तमान प्रतापसिंह वर्णयति यावत्समाप्ति । तदेति । रिपव एव दंतिनो गजाः तेषां सिंहः ॥ ६४ ॥ यदीयमिति । प्रताप· प्रतापशब्द· आदिर्यस्येति प्रतापादिसिंह, प्रतापसिंह इत्यर्थ· । तदाख्य· राजा जयति सर्वोत्कर्षेण वर्तते ॥ ६५ ॥ भानाविति । भानौ सूर्ये प्रकृष्टस्ताप प्रताप· तत्र भानौ मृदोर्भावः म्रदिम्ना मृदुत्वं । पृथ्व्यादीना इमानिज्वक्तव्यइति इमानिच् । चद्रे मृदुत्वं वर्तते इतिशेषः । तत्र चद्रे तापः न । प्रतापसिंहे राज्ञि शत्रुजने नते शरणागते च विषये व्यवस्थायां द्वयमपि अदर्शि दृष्ट ॥ ६६ ॥ अथ प्रतापसिंह प्रतिसभायां यदुक्तं तदेव श्लोकद्वयेनाह हे भूपालेति । भूपालाना अधीश सार्वभौमराजन् तव रिपूणा निचयः भीतभीत· सन् व्याख्यातमेतत्पूर्वं स्वीयाद्देशात् दिगंत दूरदेश अपयात· गतः । तदनु तदनतरं ते तव कीर्तिः दूतीव कीर्तिदूती प्रणुन्ना प्रेरिता सती त रिपुनिचय धर्तुं याता गता चपलतरा मतिर्यस्य तस्य रिपुनिचयस्य दृप्ता गर्विता अपकीर्तिः योद्धुं याता प्रवृत्ता ते अकीर्तिकीर्त्यौ प्रयागे असिताच सिताच असितसिते असितासिते च ते तटिन्यौ च असिततसिततटिन्यौ असिततसिततटिन्योः यमुनाभागीरथ्योः व्याजात् इति व्याजत·-मिषात् युध्यतः युद्ध कुरुत· ॥ ६७ ॥ क्षमामिति । स्पष्टार्थमेतत् ॥ ६८ ॥

इति श्रीशिवकाव्यव्याख्याया काव्यप्रकाशिकाख्याया स्वयकृतायामेकादशश्चमत्कारः । पूर्वार्धसमाप्तिमगात् । भगवान् गोपालकृष्ण· प्रीयतामेतेन व्याख्यानेन ॥

---

१९. ‘स शाहुनृपो राजते राजवर्य’ पा॰ भे॰ । २० ‘॰यस्मिन्नृपे तद्वय॰’ ‘शाहौनृपे’ इति च पा॰ भे॰ । २१. ‘॰त्यभीक्ष्णम्’ पा॰ भे॰ ।

अथार्चनं ॥ गोंऽतस्थितोऽमृतरसस्तुष्ट्यै पुष्ट्यै च नो गवाम् ॥
सभाजनगतो नित्यं सेवितस्तुष्टिपुष्टिकृत् ॥ १८० ॥

नैरंतर्येण यस्मिन्नतिसुलभतया जायते स्वस्य लाभः
श्रीरामाराधनं तत्सुखरमहितं हंत संत्यज्य लोकैः ॥
सेव्यंते ते नरा अप्यतिकठिनतराराधना अप्यधन्या
हा हा हा कोऽयमेषां कलितिमिरकृतो नष्टचाक्षुष्कभावः ॥१८१॥

नारायणे नेच्छति यो निरंतरं नरः सहावस्थितिमेष यत्नतः ॥
पुरा श्रयेद्दक्षविनिर्मितां सतां मूर्तिं मतां तां वरधर्मसंस्कृताम् ॥१८२॥

स्रग्गंधसुंदरीगीतं नैव श्रीफलमिष्यते ॥
तदेव श्रीफलं येन पूज्यते गिरिजापतिः ॥ १८३ ॥

ह्ये किमर्थं खल्विति स्वस्थः सन् पुनर्वर्धते जलध्यात्मजत्वात् पुनःपुनराकल्पमेतदेवेति जलधिः समुद्रः जडधीश्च ॥ १७९ ॥

क्रमप्राप्तमर्चनमाह । गो इति । यथा गवामंगेषु स्थितोऽमृतरसस्तासां तुष्टये पुष्टये च न भवति तं ताभ्यो दुग्ध्वा भाजनगतं कृत्वा ताभ्यः पायितश्चेत्तुष्टिपुष्टिदो भवति तथाऽमृतरसो ब्रह्मरसो गोंऽतः मनआदिष्विंद्रियेषु अभिव्यज्यमानोऽप्येव परमसौ तत्तुष्टये पुष्टये न भवति तर्हि सभाज्यते पूज्यतेऽस्मिन्निति सभाजनं पूजाधिकरणं प्रतिमादि तत्रावाह्य सेवितश्चेत्तुष्टिपुष्टिद इति ॥ १८० ॥

भगवत्पूजां विहाय द्रव्यार्थं प्रयतमानान् निंदति नैरंतर्येणेति । अखंडतया स्वलाभः आत्मलाभो द्रव्यलाभश्च कथं नैरंतर्येणात्र द्रव्यलाभ इति चेत् श्रीः राः मा राः धनमिति एव च धनमयमपि श्रीरामाराधनं विहाय धनार्थं येन राः सेव्यंते ते तु न राः द्रव्यं न भवंति । अधन्याश्च सत्सु तेषां धन्यता नास्ति धन्या धनहेतवश्च न भवंति । आराधनमपि तेषामतिदुष्करं ॥ १८१ ॥

नारायण इति । दक्षेण चतुरेण शिल्पिना निर्मितां सतां विदुषां मतां यथोक्तलक्षणसंपन्नत्वात् वरेण धर्मेण प्रतिष्ठाविधिना संस्कृतां मूर्तिं प्रतिमां श्रयेत् अर्चनं कुर्यादिति यावत् यथा दक्षेण प्रजापतिना उत्पादितां मूर्तिं नाम कन्यां वरः पतिर्यो धर्मः एतन्नामा ऋषिस्तेन संस्कृतां विधिवत् पाणिगृहीतामाश्रित्य नरस्य नारायणेन सहावस्थानं तथा धर्मस्य दक्षदुहितरि मूर्तौ नरनारायणौ यमलौ जाताविति भागवतादौ ॥ १८२ ॥

किं च सत्यपि द्रव्ये तस्य फलं भगवत्पूजनमेवेत्याह स्रग्गंधेति श्रीफलं लक्ष्मीफलं बिल्वं च ॥ १८३ ॥

कुंदात्सौगंधिकाद्या न वहति तुलसी गंधमेषा तथापि
प्रेष्ठा दृष्ट्वा मुकुंदं प्रति कति यदहो पत्रमात्रेण यस्याः ॥
सोऽमुष्मै स्वात्मभावं प्रदिशति यमिनां दुर्लभं यत्सदोग-
तृष्णं कृष्णप्रियार्थे त्यजति न सुरसाऽद्यापि वृंदावनं या ॥ १८४ ॥
तुलसी रामचंद्रस्य प्रेयसीति किमुब्रुवे ॥
यदस्याः पश्य दासोऽपि प्राणप्रियतमोऽभवत् ॥ १८५ ॥
यस्त्वमार्गमपोह्यास्ते स भातु धृतशेखरः ॥
पश्यापामार्गपत्रं हि हरिर्मूर्ध्नाऽभिनंदति ॥ १८६ ॥
रामाग्रतो विरचयन् सह गीतनृत्यं
नित्यं नयेदुपनतं पुरुषः प्रदोषम् ॥
संशिक्षयन्निति जनान् भगवान् महेशः
शक्रादिभिः किमिव नृत्यति भृत्यवर्गैः ॥ १८७ ॥

प्रसंगात्पूजासाधनेषु प्राधान्यतया तुलसीं वर्णयति द्वाभ्यां कुंदादिति । तुलसी कुंदादिभ्योऽधिकगंधा यद्यपि न भवति तथापि मुकुंदस्य कियन्नाम प्रेयसी यस्याः पत्रमात्रेण दलमात्रेण लेखमात्रेण च स्वात्मभावं कृष्णः समर्पकाय प्रयच्छति एतावत प्रेष्ठत्वं कुत इति चेत् पुरा किल कृष्णस्य वृंदावने गोपीभिर्विहारः परमः श्रेष्ठोऽभूत् युगांते तु भगवान् गोप्यश्च गताः यदि पुनर्भगवंतं प्रति वृंदावनविहारेच्छा स्यात् तदा तत्र तं रमयितुं कापि नास्तीति कृत्वा यत्र यत्र वृंदावननाममात्रं तत्र सुरसा सती अद्यापि वसतीत्थं भगवदुपरि तस्या महानुपकारभारस्तेन यस्याः पत्रमात्रेणापि प्रार्थिकमुद्धरति सुरसा सशृंगाररसा तुलसी च वृंदावनं प्रसिद्धं इष्टकादिना निर्मितं तुलसीनिवासस्थानं च ॥ १८४ ॥

किं च तुलसीति । अस्या दासस्तुलसीदासः तन्नामा कश्चिद्वाराणसीस्थो महाभगवद्भक्तश्च भगवान् रामभद्रः साक्षाद्येन सह शारिकापीडनं कुर्वन्नभूदिति आविद्वद्बालं प्रसिद्धिः ॥ १८५ ॥

प्रसंगान्महरिप्रियमपामार्गं वर्णयति यस्त्विति यः अमार्गमपोह्यास्ते तेनात्र शेखरं धृत्वा वर्तितव्यं निःशंकतयेति यावत् सोऽत्यंत साधीयानिति पश्य यस्य पत्रं दलं विलिखितं च हरिर्मूर्ध्नाभिनंदति अपोहितः अमार्गो येन सोऽपामार्गः ॥ १८६ ॥

किं च भगवदग्रे नृत्यगीतादिकमपि कार्यमित्याह रामाग्रत इति । रामाग्रतः श्रीरघुपतेरग्रतः भक्तैः सह संभूय नृत्यं गीतं च कृत्वा नित्यमुपनतमुत्पन्नं प्रदोषं प्रकृष्टदोषं नयेत् दूरीकुर्यादिति शिक्षयन् भगवान् भवो रामाग्रतो गौर्यग्रतो नृत्यं कुर्वन्नित्यनुपनतमागतं प्रदोषं कालविशेषं नयति क्रमयति रामा स्त्री रामचंद्रश्च ॥ १८७ ॥

दानोदकार्द्रः सततं दधद्धरिमिहादरम् ॥
करः कटकशोभाढ्यः स वै नागस्थितो मतः ॥ १८८ ॥
भगवति परमेश्वरे निवेशो भवतु ममेति यदीहसे तदाशु ॥
रचय मनस एव सुष्ठुभावं सुमनस ईशतनौ हि निविशंति ॥ १८९ ॥
धन्यानहं तु कथयामि कुजन्मिपादान्
क्षेत्रं गतान् घनरसाप्लुतिमादधानान् ॥
पाश्चात्यया ससुमनस्कतया सशोभा
ये स्वात्मनः सफलयंति हरीभवंतः ॥ १९० ॥
सत्तारकं नादि नांतं यस्यांतर्वर्तते स्थितिः ॥
अतो नयन ते सख्यं भवेन्मुख्यं मुरारिणा ॥ १९१ ॥
पृथुरुच्चपदे सहसा कथमारोक्ष्याम्यहं विनापचितिम् ॥
इति मधुवनसेवनतो व्यधादुदारः सदात्मनोऽपचितिम् ॥ १९२ ॥

हरेः पूजनेनैव करस्य निरपराधत्वमित्याह दानेति । दानार्थमुदकेनार्द्रः हरौ महांतमादरं दधानः कटकस्य करभूषणस्य शोभयाढ्य. स न आगः अपराध स्थितः दानोदकेन मदधारया हरेः सिंहान्महांतं दरं भयं कटवैव कटकी करटी तच्छोभयाढ्य. करः शुंडादंडो नागस्थितः गजस्थितः हरिपूजनमंतरेण 'शावौ करौ नो कुरुतः सपर्यां हरेर्लसत्काञ्चनकंकणौवेति' शुकेन गर्हितत्वात् ॥ १८८ ॥

पुष्प वर्णयति भगवतीति । सुमनसः पुष्पाणि साधवश्च ॥ १८९ ॥

भगवद्यात्रोत्सवलिंगनिरीक्षणादेरप्याराधनहेतुत्वात्तदुपयुक्तावयवानुद्दिश्याह । भगवद्यात्रार्थं यौ पादौ पुण्यक्षेत्राणि न गच्छतस्तौ निंदन्नाह धन्यानिति । कुजन्मिपादाः वृक्षमूलानि क्षेत्रं काश्यादि केदारं च घनरसाप्लुवं तीर्थस्नानं जलार्द्रभावं च सुष्ठु मनः सुमनस्तेन सहित' ससुमनस्कस्तद्भावस्तत्ता तया सुमनोभिः पुष्पैः सहिताश्च सफलयंति कृतार्थीकुर्वंति फलसहितान् कुर्वंति च हरिभूता हरिरूपाश्च ॥ १९० ॥

सत्तारकमिति । हे नयन त्वं सती तारका यस्य तत् हरिरपि सत्तारक' त्वं नादि नकारः आदिर्यस्य तत् आदिरहितश्च त्वं नांतं नकारात सोऽतरहितश्च यस्य यकारस्यांतर्मध्ये स्थितिरस्ति त्वयि यस्य हरेरंतर्यामित्वेन स्थिति' समानशीलत्वेन सख्यं भवति त्वमेकदा भगवद्विग्रहं पश्य ततस्तव तेन विना न क्षम्येतेति तात्पर्यं ॥ १९१ ॥

यत् पृथुराजा प्राधान्येन पूजां कृतवांस्तद्युक्तमेवेत्याह पृथुरिति । यश्च पृथुः पीवरतनुस्तेनोच्चैः पटुभिरपि दुरारोहे पदे सहसा गंतुं कथं शक्यते विना देहस्य कार्श्यं तदर्थं स पृथुरिति कृत्वा उदार. सन् सतां आत्मा कः हरिस्तस्यापचितिं पूजा व्यधात् उदार इत्यनेन शरीरकृशीकरणे उत्साहोऽभिधीयते स भगवन्मंदिर-

अथ वंदनं॥ सर्वांगेषु वरांगता तव कृता नैतावता सार्थता
गुह्यं देशमपीह शब्दनिपुणाः स्त्रीणां वरांगं जगुः ॥
तस्माच्छ्रीरघुनंदनस्य चरणं ब्रह्मादिवंद्यं मुहु-
र्नत्वा याहि वरांगतां मम सखे मूर्धन्सतां संमताम् ॥१९३॥
भूषणोत्तमकिरीटकलाभादुद्धतत्वमिह मा वह मूर्धन् ॥
यन्मुकुंदपदपंकजयुग्मं सर्वदैव नमति स्म किरीटी ॥ १९४॥
अक्रूरोऽहमपि प्रसंगवशतो भाता मम क्रूरता
श्रीमद्गोकुलवासिनां भगवतः प्राणप्रियप्राणिनाम् ॥
हेतोस्तस्य हरिर्ममोपरि पुनारुष्टस्तु न स्यादिति ॥
प्राप्ताशंकतया क्षमापनकृते श्रीशं ववंदे मुहुः ॥ १९५॥

अथ दास्यं ॥
ज्ञानेन मुक्तिः किल तत्तु सत्वतस्तत्सिद्धये श्राम्यसि रे वृथा कुतः॥
त्वं नित्यदासत्वमुपाश्रय प्रभोस्तस्मिंस्तु सत्वं किमु नास्ति नित्यदा ॥ १९६ ॥

ज्ञानादेव तु मुक्तिरेवमवदन् वेदांतिनस्तत्पुनः
श्रद्धावाँल्लभते न चान्य इति हि श्रीवासुदेवो जगौ ॥

समार्जनसेचनोपलेपनजलाहरणपुष्पगंधादिसंपादनं स्वयमेव राजा सन् चक्रे अथ च कार्श्यमापादितवान् मधुवन वृंदावन तत्र स आसीदिति कूर्मपुराणे प्रसिद्धं अन्यच्च मधु क्षौद्रं वनमुदकं च तस्य सेवनात् सतोवर्तमानस्यापचितिरपचयो भवति तथा च वैद्याः 'शिशिरांबु पिबेन्मधुप्रयुक्त गणनायोऽपि भवत्किलास्थिशेष इति ' ॥ १९२ ॥

अथ वंदनं वर्णयति सर्वांगेष्विति । 'वरांगं मूर्धगुह्ययोरित्यमरः' ॥ १९३ ॥

भूषणेति । सर्वेष्ववयवेषु ममैव किरीटामिति गर्वं मा वह किं तु हरिचरणं प्रति नम यान्नित्यदा कीरीट्यपि अर्जुनोऽपि नमति स्म ॥ १९४ ॥

अक्रूरो हि प्रधानतया वंदनभक्तिमेव चकार तद्युक्तमित्याह अक्रूरोहमिति । भाता भासते स्म अपराधक्षमापनं हि यथा दृढपादपीडनेन भवति तथा नान्योपायेन ॥ १९५ ॥

अथ दास्य ज्ञानेनेति । नित्यं यद्दासत्वं तन्नित्यदासत्वं तन्मध्ये नित्यदा सर्वदा सत्व नास्तीति न तस्माद्भगवद्दास्येनैव सुगमा मुक्तिरिति ॥ १९६ ॥

ज्ञानादेवेति । 'ज्ञानादेव तु कैवल्यं' 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानमिति' प्रमाणद्वयमुक्त सत्वेश्रद्धा इत्यत्र प्रमाणमिति प्रसिद्धमित्याह ललनाइति सत्वे गर्भे सत्येव श्रद्धा

सा सत्त्वोदय एव तव ललना अप्यादुरेतत्कृते
नैवान्यत्कुरु हे सखे भव सदासत्त्वोदयः श्रीपतौ ॥ १९७ ॥
सोऽहंसोऽहमिति स्थितिं स्पृहयसे चेत्तर्हि सर्वात्मना
भ्रातः श्रीखगगामिनो भगवतो दासोऽहमित्थं स्मर ॥
अभ्यासाद्दृढमादृताद्विगतदाकारोभवार्थादथ
स्यात्ते किं न मनोरथः सुफलितोऽतोऽन्यद्वृथा मा कृथाः ॥ १९८ ॥
स्यानंदभाक् श्रीरघुनंदनस्य दास्यान्नरः स्याद्विषयाकुलोऽपि ॥
यदंजनानंदपदं हनूमान्निरंजनानंदपदं बभूव ॥ १९९
कुतः श्रियै त्वं यतसे निकामं श्रीरामदासो भव मानव त्वम्
श्रीरामदासस्य पराङ्मुखस्य सदानपायिन्युपतिष्ठते श्रीः ॥ २०० ॥
निष्कारणं सेवनमीहमानो जनस्तनोत्यस्य मनोविनोदम् ॥
तथा धनोपाधि न हीति युक्तं वित्तापहार्यव्यय एष हीशः ॥ २०१॥
श्रीरामं न विना गती रविकुले तत्पक्षपातो ध्रुवं
दृष्टो वालिसुकंठयोः स कलहे संजातमात्रस्त्वहम् ॥
तस्यार्कस्य वहेलनं विहितवांस्तं स्वापराधं प्रभु-
र्दास्येनैव सहेत नान्यत इति श्रीरामदासोऽभवत् ॥ २०२ ॥

दोहदं 'दोहदं दोहलश्रद्धेति' यादवः सदासत्वोदयः दासत्वस्य दास्यस्योदयस्तेन सहितः सदासत्वोदयस्तत्र सदा सर्वदा सत्वोदयोऽस्त्येवेति ॥ १९७ ॥

सोहमिति । खगगामिनो गरुडगामिनो दासोऽहमिति स्मरणाभ्यासे दृढे सति विना गच्छतीति विगो गरुडगामी तेन सह तदाकारो भव समुद्रे गगांबुवद्विगतो दाकारो यस्मादिति च एवच दासोऽहमिति स्मरणाद्दाकारो गतश्चेत्सोऽहमित्येवावतिष्ठते इति यत्तवाभीष्टं तदर्थात्सिध्यतीति ॥ १९८ ॥

स्यानंदेति । अंजनाया एतन्नाम्न्यामातुरानंदस्थानं अंजनेन विषयसंबंधेनानंदस्तत्पदं च ॥ १९९ ॥

धनाद्यर्थोऽपि श्रीरामदास्येनातिसुलभ इत्याह । कुत इति । त्वं श्रियै यतसे श्रीस्तु त्वां प्रति पराङ्मुखी रामदासस्तु श्रियं प्रतिपराङ्मुखो भवति । श्रीस्त्वनपायिनी तं प्रति सम्मुखी उपतिष्ठते । यथा श्रीरामदास इति पराङ्मुखं चेत् सदामरा श्रीरित्यक्षराण्युपतिष्ठते । सदा अमरा अनपायिनी श्रीरित्यर्थः 'सबिंदुकाबिंदुकयोः सविसर्गाविसर्गयोरित्यैक्यात्' पक्षे सविसर्गत्वमेष्टव्यं ॥ २०० ॥

अहेतुकं दास्यमेव भगवतेऽतीव रोचत इत्याह । निष्कारणमिति । वित्तापं सतां तापं हरति वित्तं चापहरति । अव्ययो नाशरहितः कृष्णश्च ॥ २०१ ॥

हनुमान् प्राधान्येन दास्यमेव चकार तदुक्तमित्याह श्रीराममिति । सुकंठः सुग्रीवः

अस्त्येषा परिपाटिका सुमनसां यः स्यात्पितुः पोषक-
स्तत्पुत्रोऽपि करोतु निष्कपटतस्तस्यैव दास्यं विभोः ॥
वायोर्नंदन एष आशुगभृतं पश्यन् जगन्मंडले
स्वेकं श्रीरघुनायकं सुचरितस्तत्तस्य दासोऽभवत् ॥ २०३ ॥
दासश्चेत्परमेश्वरस्य भविता तर्ह्येव धीमानसौ
दासो यो हि स एव धीवर इति स्पष्टं जगुः शाब्दिकाः ॥
पश्याम्यप्यमृतस्थितिं पुनरसावित्रेह धत्तेतरा-
मेवं स्वात्मनि चिंतयन् पवनजः श्रीरामदासोऽभवत् ॥ २०४ ॥
न स्वस्मिन्विपरीतभाव उदयेद्योऽनर्थकारी कदा-
प्येवं श्रीरघुनंदनं परमया भक्त्या भजेयं सदा ॥
इत्येवं सुकृती कृती दृढमतिः सर्वात्मना यः सदा
दासः सन् रघुनंदनस्य हनुमान् वन्योऽपि धन्योऽभवत् ॥ २०५॥

अथ सख्यं ॥ क्षमा दया सत्यमुदारभावो संगो विरागः समता प्रबोधः ॥
एते गुणा यस्य हरेः सखाऽसौ शीले समाने हि वदंति सख्यम् ॥
॥ २०६ ॥

मैत्री चेद्विहिता समं भगवता स्वात्मप्रियावाप्तये
स्यादेवेत्यनुभूतमस्ति सकलं पूर्वेऽवतारे विभोः ॥

वहेलन अवहेलनमनादरं ॥ २०२ ॥

अस्त्येषेति । आशुगो बाण. वायुश्च त बिभर्ति धारयति पोषयति च ॥ २०३ ॥

दासश्चेदिति । अमृतस्थितिं मोक्षस्थितिं जलाशये स्थितिं च धीवरा हि सर्वदा जलाशय एव तिष्ठति ॥ २०४ ॥

न स्वस्मिन्निति । विपरीतभावो यत्र भक्तौ कदाऽपि नोत्पद्येत तथाऽहं भजेय यो हि सदादासोऽहमिति ब्रवीति स कदापि स्वामिभावं नापद्यते कदाचिदुत्पन्नोऽपि सोऽनर्थकारी न भवति । अनर्थकारी स्वार्थहानिकरः उभयत्र समान दासरूपोऽर्थ· शब्दाभिधेयं च तादृशभक्तिस्तु दास्यमेव न यजनादि तथा हि सदादासो यस्तस्मिन् विपरीतभावे कदाचित् के उत्पन्नेऽपि अनर्थकृन्नभवति सदादास एतत्पदं वैपरीत्येन पठितमपि सदादासरूपमेवार्थं वक्ति कनकवत् यजनरूपायां तु भक्तौ वैपरीत्यं चेन्नजयइत्यर्थांतरमनर्थोपादक भवति । वय तु वन्याः ज्ञान शून्याः अतः सर्वतो मुख्यस्वार्थायामेव भक्तौ अभियोक्तव्यमिति दासएवाभवादीति तात्पर्यं॥ २०५ ॥

अथ सख्यमाह क्षमेति । क्षमादयो हि गुणा भगवति विलसति अत. कति-पयतादृशगुणवत्तामतरेण सख्यं कथ स्यात् ॥ २०६ ॥

अर्जुनो मुख्यत्वेन सख्य कृतवांस्तदुक्तमित्याह मैत्रीति । पूर्वेऽवतारे रामावतारे

शक्रांशः स इति स्म बुद्धिनिपुणो मध्यः पृथायाः सुतः
सख्यं मुख्यतयाऽकरोदिव हरेः सर्वासु तद्भक्तिषु ॥ २०७ ॥

अथात्मनिवेदनं ॥ श्रियस्ताः शतं या विरागादिनिष्ठा
अधिष्ठाय भाव्यं मयेतीहसे चेत् ॥
अहं श्रीश तेऽस्मीति नारायणाग्रे
सदा ब्रूहि कामं स्वमापूरयस्व ॥ २०८ ॥

धृता याऽल्पात्मत्वादहह विपुलाशा भगवता
गताशंकं योऽहं सपदि सफलां तां व्यरचयम् ॥
महाभूतस्यास्य त्रिभुवनगुरोः किं बलिरयं
निहन्यां तन्वाशामिति स सहसाऽत्मानमददात् ॥ २०९ ॥

नाचर स्वहितजातघातकं पातकं तु निरये निपातकम् ॥
शंभवे स्पृहय मानसानिशं शं भवेऽपि भवतो भवेद्भृशम् ॥ २१० ॥

आशाविरहितो यस्तु नाशस्तस्य न विद्यते ॥
यतो न संति यस्याशा अनाशः सोऽभिधीयते ॥ २११ ॥

आशाविरहितो यस्तु स मुक्त इति तर्क्यते ॥
आशा अपगता यस्य सोऽपाशः सद्भिरीर्यते ॥ २१२ ॥

तावच्छक्रो वालिरूपांशेनासीत् कृष्णावतारे पार्थरूपांशेन तत्रार्जुनो विचारितवान् आत्मप्रियावाप्तिरपेक्ष्यते चेद्भगवता मैत्री कार्या यथा सुग्रीवेण मैत्री कृताऽभूत्तेन तस्य आत्मप्रियावाप्तिरभूत् स्वस्त्रीलाभोऽभूत् । तदपहारकवालिघातेन इद सर्वं मयापूर्वेऽवतारे अनुभूतमतः सैव कर्तव्येति निश्चित्य तामेव कृतवान् ॥ २०७ ॥

आत्मनिवेदनमाह । श्रिय इति । वैराग्यज्ञानादिनिष्ठाः याः सर्वाः शोभास्ताः अधिष्ठाय मया भाव्यमितीच्छचिद्भगवते आत्मनिवेदनं कुरु तत्प्रकारमाह । अहमित्यादि एवमात्मनिवेदने कृते तत्र तव कामः सिद्ध एव अह श्रीश तेऽस्मि इति वचने श्रीणां शत तत्र अहमस्मीत्यर्थांतरमुपलभ्यत एवेति ॥ २०८ ॥

यद्बलिनाऽऽत्मार्पणं कृतं भगवते तद्युक्तमित्याह । धृतेवेति । भगवता अल्पात्मत्वाद्वामनत्वाद्विपुलाशा महती आशा पृथ्व्या आशा च धृता । यो हि अल्पो भवति स बह्वाशां करोतीति युक्त तामह सफलितवान् । अधुना महाभूतेन तेन तदनुरूपा तन्वाशा अल्पाशा देहस्य मम आशा च कृता तामह किं विहन्यामिति आत्मार्पण कृतवान् ॥ २०९ ॥

सर्वथा हेयान्याह । नेति । भवेऽपि श सुखं भवेत् ॥ २१० ॥

आशेति । न संति आशा यस्य सोऽनाशः नास्ति नाशो यस्य सोऽपि च स एवेति ॥ २११ ॥

याचनायां प्रवृत्तस्य का का नाम न दुर्दशा ॥
चेतश्चेत्क्रियते यस्यां यातनैवोपतिष्ठते ॥ २१३ ॥
आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ॥
यदाशासहितस्तांतो निराशः शांत उच्यते ॥ २१४ ॥
स्त्री सतीयं ममास्त्रीति प्रतिभाति विनिश्चितम् ॥
भवंति मूर्छिता शूरा अपि यद्गवलक्षिताः ॥ २१५ ॥
यदधरतुलाप्रसंगात्सद्यः प्रज्ञां हरत्यहो तुंडी ॥
तस्याः साक्षात्संगः किं किं न हरेदिदं न जानीमः ॥ २१६ ॥
यत्रेहैत्र जघन्यकर्मवशतोऽधःपातमेति स्वयं
सद्यः संगभृतां तनोति महतां पुंसां च्युतिं तेजसाम् ॥
इत्थं नित्यममंगलं समुदितानंगं कुरंगीदृशा-
मंगं तत्र तु संगमः सुमनसां मा भूत्प्रसंगादपि ॥ २१७ ॥
मुखेन रम्या याः कांता नित्यं रेफांतराश्च याः ॥
नरका इति ता मन्ये तासु सज्जेत कः पुमान् ॥ २१८ ॥

आशेति । अपगता आशा यस्य सः अपाशः न संति पाशा यस्य सोऽप्यपाशः यश्च पाशरहितः स मुक्त एव ॥ २१२ ॥

याचनायामिति । याचना कार्येति मनस्यानीतं चेद्यातनैव उपतिष्ठते याचना-शब्दे चे चकारस्थाने तकारः कृतश्चेद्यातनैवेति ॥ २१३ ॥

आशेति । तांतो ग्लानिमापन्नः तमुग्लानी आशासहित इति शब्दस्तकारांतः निराश इति शब्दस्तु शांतः ॥ २१४ ॥

'न तथाऽस्यभवेत्क्लेशो बंधश्चान्यप्रसंगतः' 'योषित्संगाद्यथा पुंसो यथा तत्सं-गिसंगतः' इति भागवतोक्तेः स्त्रीणां हेयत्वमाह । स्त्रीति । अस्त्रमस्ति यस्य सः अस्त्री यस्या गावौ नेत्रे ताभ्यां लक्षिता विलोकिता यस्य गावः बाणास्तैर्लक्षीकृताः 'गोरताद्धितलुकाति' गोशब्दात्ष्टच् ॥ २१५ ॥

यदधरेति । स्पष्टं । 'सद्यः प्रज्ञाहरी तुंडी सद्यः प्रज्ञाकरी वचेति' ॥ २१६ ॥

स्त्रीणामंग परममंगलमित्याह । यत्रेति जघन्यकर्म नीचं कर्म मैथुनं च अधः-पातो नरकावाप्तिः रतिप्रयोगार्थं अधःपतनं च संगः सहवासः समागतश्च । तेजः माहात्म्य रेतश्च । इह केनचिन्निंद्य कर्म कृतं चेत्तस्याधःपातरूपं फलं प्रेत्य भवति अस्य तु अत्रैव महद्भिरसज्जनसहवासः कृतश्चेत् कियता कालेन सत्तेजश्च्युतये भवति इदंतु सद्यएवेति सत्तेजश्च्युदेव भवति ॥ २१७ ॥

स्त्रियः केवल नरकरूपा इत्याह । या मुखेन रम्या रमणीया यद्वा मुखे नकारेण रम्याः स्वापेक्षितसुखविषयेऽपि या नकारमेव प्रयुंजते । रेफ कुत्सित अतरं मनो

हा हंत संहारमुरोजमंडलं स्त्रियाः क्रमं लोचनयोश्च रौरवम् ॥
पश्यन्त्रतास्यां रमतेतरां जनो मनोभवो हंत दुरंतविक्रमः ॥ २१९ ॥

एकांतेंकगता स्वविभ्रमभरं संदर्शयंती मुहुः
सीत्कारं नखलेखने विदधती व्यक्तानुरक्ता सती ॥
आनंदं जनयेत् क्षणं मधुरतावेशेन पामेव रे
रामेयं पुनरंततः किमपि यत्कुर्वीत तच्चिंतय ॥ २२० ॥

नूनमुन्नतपयोधरो भवेत्कारणं घनरसस्य भूयसः ॥
तेन पूर्णतमताजलाशये तत्र विप्लुततया निमज्जनम् ॥ २२१॥

यासा बहिः साध्वीभावं दर्शयत्योऽपि अंतः केनापि पुरुषविशेषेण सगता इति भावः । तादृशः कांता नरकाएव शब्दतोऽपि या मुखे आदौ नकारेण रम्याः रेफः स्वर्ण अंतरे मध्ये यासां याः कांताः ककारांताः एवं च नरक इति सिध्यति ॥ २१८ ॥

हाहंतेति । सहारं सम्यग्हारयुक्तं संहारनामा नरकविशेषः । रुरोः कृष्णसारस्याय रौरवः एतन्नामा नरकविशेषश्च 'महारौरवरौरवाः' 'संहारः कालसूत्रंचेत्यमरः' । चकारात्कालसूत्र कंठ ॥ २१९ ॥

कांतासगजन्य सुखं क्षणिक सदंते अतीव क्लेशदमित्याह । एकांत इति । इयं रामा एकांते अंकगता समीपगता उत्सगगता वा स्वस्य विभ्रमः विलासः सस्मितनयनचमत्कारादिः तमादौ दर्शयति । ततोऽकुरितकामेन कांतेन स्तनपीडनचुंबनादिबाह्यसुरते आरब्धे सीत्कार तनोति ततो बाह्यरतेनानुराग गता सती मधुवत् स्वादु मादक च यद्रत तत्र यआवेशस्तेन कांत रमयती सती क्षणमानद जनयति न तु चिर परमते परमसतापकारिणी भवेदिति चिंतय । कथ यथा पामा साऽप्यंकगता प्रायेणास्ते तत्कंडूयन लज्जावशाज्जनसमक्षं न भवति स्वयमेकांते यदा एकएवावतिष्ठते तदा सा स्वविभ्रमं कडूवतिशय दर्शयति ततो नखैर्लेखने खर्जने आरब्धे सीत्कारो भवति ततः व्यक्त रक्तं यस्या सा किंचिद्रक्तोद्गमे जाते मधुरता पुनः पुनः खर्जनविषयिका रुचिस्तया यआवेशः उत्साहस्तेन क्षणं सुख स्यात्परमनंतर भगभगायितः सतापो भवति तथा ॥ २२० ॥

स्त्रीणां प्रसगेन निमज्जतीति युक्तमित्याह । उन्नत स्तनमडलं सान्द्रशृंगाररसस्य कारण भवति ततो जडानां मूढाना आशये तेन पूर्णतमता तत्र विप्लुतता व्यसनिता तया निमग्नो भवति यथा उन्नतमेघोदयो बहुजलस्य कारण तेन जलाशयानां पूर्णता तत्र विगत प्लुत प्लवनं जलतरणपाटव यस्मात् तत्तथा निमज्जनं युक्तमेव प्लुङ् गतावित्यस्य धातोः उडुप तु प्लवः कोल इत्यादौ जलतरणरूपार्थ दर्शनात् भावे क्त । विप्लुतो व्यसनाविह्वल इति हेमचंद्रः ॥ २२१ ॥

यो रामभजने सक्तः स रामां दूरतस्त्यजेत् ॥
रामाभक्तिर्यतो वक्ति भक्त्यभावं रघूत्तमे ॥ २२२ ॥
उद्वाहः प्रथमार्तवोत्सवविधिर्गर्भाहितिः पुंसवः
सीमंतोन्नयनं प्रसूतिरसकृज्जातक्रियाश्चाखिलाः ॥
आकल्पा मणिमौक्तिकादिखचिता वासांसि सूक्ष्मोत्तमा-
न्येवं वै पुरुषार्थहानिकरणे सृष्टाः स्त्रियो वेधसा ॥ २२३ ॥
लोके प्रथमताभाजः कांता रसहितांतराः ॥
तारका इति ता मन्ये दुस्तरे भवसागरे ॥ २२४ ॥
परमैव या स्वभावादपकारं प्रापिता यदपि ॥
सा किं स्वावस्थित्या दैन्यापादनकरी भवेत्पुंसः ॥ २२५ ॥
पुत्रदारादिसंबंधोऽमृतश्चुदिव भासते ॥
तत्प्रसंगः पुनः पुंसां सेहुंडइव तापदः ॥ २२६ ॥
मोदिष्यसे मनश्चेत्स्यात्सदामोदरसद्रवम् ॥
रोदिष्यसि त्वं हृदयदारकार्तस्वरो ध्रुवम् ॥ २२७ ॥

यइति । रामाभक्तिरित्युक्ते रामे अभक्तिः प्रतीयते ॥ २२२ ॥

उद्वाह इति । आकल्पा भूषाः पुरुषार्थो जन्ममरणातीतभवन पुरुषद्रव्यं च ॥ २२३ ॥

लोकइति । प्रथमता श्रेष्ठ्य या लोकेन साध्वीयमित्युच्यते रसो हित च भर्तृ विषयके अंतरे यासां तादृश्यः मदालसाचूडालाप्रभृतयः ससारसागरे तारका भवति याभिः स्वकांता ब्रह्मभावमापिताः तारकस्योत्सर्गत· तया पुधर्मतया पुस्त्वनिर्देश. शब्दतोऽपि याः प्रथममादौ तां ताकारं भजति रेण रेफेण सहितमंतर यासां याः कांताश्च ककारांता· एवं चादौ ता मध्ये र. अंते कः इति तारकपदं निष्पद्यते ॥ २२४ ॥

परमैवेति । या स्वभावतः परमा सा अपकारं प्रापिताऽपि भर्तुर्दैन्यापादनकृन्न भवति उत्तमत्वात् परमा हि अपकारं पकाराभाव प्रापिताऽपि रमैव भवति या रमा सा किं दैन्यापादनकरी ॥ २२५ ॥

पुत्रेति । अमृत सुधां श्चोतति तत् तत्रातीव आसक्तिश्चेत्तापाय यथा सेहुंडो वृक्षविशेषः शेरइति भाषया तत्संबंधः अमृतं क्षीर स्रवति तत्रात्यतं प्रसंगश्चेत्तापाय ॥ २२६ ॥

मोदिष्यस इति । दामोदरस्य य· सद्रव. उत्तमशब्दः वेदरूपः रामकृष्णादिनाम रूपो या तेन सहित यन्मनस्तत्सदामोदरसद्रव । हृदये दाराः कार्तस्वर च यस्य सः हृदयदारका. आर्तस्वरा यस्येति च ॥ २२७ ॥

स्यात्पुंसां तु यथा यथाऽधिकतरो योषित्कुमारादिषू-
ल्लेखस्तत्र तथा तथा नवनवा प्रादुर्भवेन्माधुरी
तत्पश्चादनुरक्तता तु यदहो संतापयुग्जीवनम् ॥
प्रेष्ठं तत्र निदर्शनार्थमवमां पामां समालोकये ॥ २२८ ॥
पुरुषझषः संसाराकूपारप्रसृतकामिनीजाले ॥
पतितोऽपि बलान्निरियात् बालिशवेधः परं विनाशाय॥२२९॥
वित्तं चित्तभ्रमकरं जिज्ञासो मा स्म संग्रहीः ॥
वित्तस्य तस्य तु त्यागे नूनं विदुपलभ्यते ॥ २३० ॥
कोऽयं हंत महामोहग्रहग्रस्तोऽखिलो जनः ॥
अर्थस्यार्थे कदर्थः सन् परमार्थं त्यजत्यहो ॥ २३१ ॥
मधुपोऽपि कुजन्मिसंगतोऽपि प्रविजह्याद्यदसौ सुवर्णगंधम् ॥
अमुना किमु ना यदात्तगंधाः शतधाऽमी सुमनोगणाः क्रियेरन् ॥२३२॥
अविवादि धनं यत्तु नैव स्यात्तद्विबाधनम् ॥
यन्निकारेण मिलितं तद्धनं निधनं भवेत् ॥ २३३ ॥

स्यात्पुंसामिति । योषिदादिषु यथा यथा अधिकमधिकमुल्लेखः परिचयस्तथा तथा तत्र माधुरी रुचिरुत्पद्यते ततोऽनंतरमनुरक्तता भवति सा च कीदृशी यत्र संतापयुक्तमपि जीवनं प्रेष्ठं भवति यदीयभरणेन संतापेऽपि माभूदितः परमतिनिर्वेदो न भवति यथा पामायामुल्लेखः उल्लेखनं च तत. माधुरी सुखास्वादः ततोऽनुरक्तता अनुगतरुधिरता तत्र संतापयुक्तमपि उष्णमपि जीवनं जलं प्रेष्ठं भवति ॥ २२८ ॥

पुरुष इति । अकूपार. समुद्रः जाल आनायः जालके पतितमत्स्यानां मध्ये कश्चिद्बलेन बहिर्निरेति । बालिशः अपत्यं बलिशस्याय बालिशः । डलयोरैक्य । कदाचित्प्रियामपि स्त्रिय त्यक्त्वा कश्चित् गच्छेत् परं बालिश त्यक्तुं न शक्नुयात् यथा मत्स्यो जालात् बलेन निरियात् पर बडिशेन विद्धो म्रियेतैवेति ॥ २२९ ॥

द्रव्यं हेयमित्याह । वित्तमिति । हे जिज्ञासो वित्त मा संग्रही. तत्संग्रह मा कुरु यद्वित्तस्य तस्य त्यागे दाने वित् ज्ञानमुत्पद्यते ' धन तु धर्मैकफलमिति ' भागवता द्वित्तशब्दसंबंधिनस्तकारस्य त्याग वित् इत्यवशिष्टं शेत ॥ २३० ॥

कोयमिति स्पष्ट ॥ २३१ ॥

मधुप इति । मधुपः मद्यपः भृगश्च । कुजन्मिनः नीचाः वृक्षाश्च । सुवर्णगंध स्वर्णलेश स्वर्णचंपकगंध च । आत्तगंधाः पराभूताः गृहीतगंधाश्च । सुमनोगणा. साधवः पुष्पाणि च ॥ २३२ ॥

धनमपि न्यायोपार्जितमुत्तममित्याह । अविवादीति । अस्ति विवादो यत्र तद्विवादि तद्धनं विबाधन न भवति यत्तु निकारेण शाठ्येन मिलितं तन्निधन मरणहेतुः

रे नानारामगानां सुरुचमधुनि सौम्य पाद्मकोशेषु ॥
लंपटतया द्विरेफो भ्रमरश्चादिह बत नरोऽपि सन् मा भूः ॥ २३४ ॥
स्रष्टा सर्वस्वहान्यै स्वत इव जगतो निर्ममौ वस्तुनी द्वे
शस्त्रीत्येकं तथान्यन्निधनमिति ततः शंकितः को नु चेते ॥
स्वीकुर्वीतेति वर्णं प्रथममथ तयोः कोविदो गोपनार्थं
विच्छिद्यापातरम्यैर्मधुरिमलिवहै रंजयामास भूयः ॥ २३५ ॥ युग्मम् ॥
तत्राशेषा विदग्धा अपि बत विविधापातमाधुर्यमुग्धाः
स्निग्धाः संतो रमंते कलयति कुशलः कोऽपि नैतत्स्वभावम् ॥
विच्छिन्नं वर्णयुग्मं तदिह शनिरभूद्दृष्टिमार्गं गतोऽसौ
कीदृक्षोऽस्तीति पूर्णं विमृश मम सखेऽद्यापि बुध्यस्व तूर्णम् ॥ २३६ ॥
सृष्ट्वा पक्षिमृगादिकानि विविधानीशः पुराण्यात्मना-
तुष्टस्तैरुचितांतरोऽथ पुरुषः सृष्टोऽभवत्तुष्टये ॥

शब्दतश्च अविवा इत्यानुपूर्वीआदिर्यस्य तदविवाधन । बवयोरभेदादविबाधन निकारेण यत्संगत तद्धन निधन ॥ २३३ ॥

उक्तस्त्रीधनयोरासक्त्या त्वं निंद्यो माभूरित्याह । रेति । अनेकस्त्रीमुखसंबंधि-मधुनि लक्ष्म्या कोशेषु च लंपटो भूत्वा भ्रमरइव द्विरेफः द्वाभ्यां कारणाभ्यां रेफः कुत्सितो मा भूः नरः सन् नाना ये आरामास्तत्संबंधि मधुनि पुष्परसे पद्मानामिमे पाद्माः ते च ते कोशाः कोरकाणि तेषु लंपटः सन् भ्रमरो द्विरेफो भवतीति युक्तं यतो भ्रमतीति भ्रमरः अज्ञानी तिर्यक्त्वात् रेफद्वयविशिष्टश्च त्वं तु नरो ज्ञानवान् स्वर्णरहितश्च ॥ २३४ ॥

स्रष्टेति । विश्वकर्तेदं जगत् स्वत इव संसरणाय कल्पतामिति वस्तुद्वयं निर्मितवान् । एका शस्त्री अन्यत् निधनं शस्यते हिंस्यते ऽनया शस्त्री तरवारिः निहन्यते अनेन निधनं एतयोरुभयोराकलनया स्वत एव नाशो भविष्यतीति अथ शंकितः एते दारुणे को नाम ज्ञातांगीकुर्यादिति ततः स तत्प्रज्ञानभंगाय आदिमवर्णं अपहृतवान् ततः अवशिष्टं स्त्रीधनमिति तत्रापि आपातमाधुर्यरूपेण रागेण रंजितवान् येन सर्वथा तत्स्वभावो माविर्भूदिति तदिमे सर्वे चतुरा अपि तन्माधुर्येण मोहं गताः सक्ताः भवंति परं कोऽपि निपुण एतयोः वास्तवघातुकं पूर्वस्वभावं न वेत्ति स चावशिष्टरूपेण कदापि नज्ञातुं शक्येत माधुर्यरंजितत्वात् अतः तज्जिज्ञासा चेत् तयोर्यौ वर्णौ अपहृत्य निहतौ तत्र रंजना नास्तीति तत्र एतयोर्वास्तवस्वभावज्ञानं स्यात् अतस्तदवलोकय स च शनिः स च दृष्टौ संगतः सर्वसहान्यै भवतीति सर्वजनीनं तद्वदेते अपीति ज्ञात्वा तत्र प्रसंगं माकार्षीरिति तात्पर्यं ॥ २३५ ॥ ३६ ॥

सृष्ट्वेति । परमेश्वरो हि नानाविधान् प्राणिनः सृष्ट्वाऽपि नातुष्यत् ततः उचित

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छाया येषां निषेव्य महौजसा
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक ६. नोवेंबर १८८२. अंक ११.

हें मासिक पुस्तक

पुणें येथें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत

छापिलें

किंमत ॥ आणे.

## वर्गणीदारांस सूचना.

**काव्येतिहास-संग्रहाचा** आज कोणता अंक आपणांकडे येत आहे हें सांगणें नको. तथापि बऱ्याच गृहस्थांकडून वर्गणी येणें राहिली आहे, असें त्यांचे हिशेबावरून समजतें. सप्रबरामध्यें अशा गृहस्थांकडे बिलेंही गेलीं आहेतच. तेव्हां त्याप्रमाणें आपआपल्या बाकीचा निकाल करून टाकण्याची मेहेरबानी त्यांनीं करावी, म्हणजे उभयतांसही हितकारक आहे. सुज्ञांस विशेष लिहिणें नको. हे विनंती.

**का० सं० व्यवस्थापक.**

---

पत्रें यादी वगैरे पृष्ठ १४१ टीप ६५ यांत " इंद्रसेन " याजबद्दल शंका होती ती आमचे स्नेही रा० रा० विष्णु रामचंद्र नातु यांणीं आम्हास पत्र पाठवून दूर केली. " हा अंडरसन साहेब शिंद्यांकडे इंग्रजांचा वकील होता तो होय. " अंडरसन याचा " इंद्रसेन " हा अपभ्रंश आमचे ध्यानांत एकदम आला नाहीं. नातूंनीं पत्र पाठवून कळविलें ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

**का० सं० व्यवस्थापक.**

---

### पोंच.

#### सन १८७८ ते १८८२ पैकीं

रा० रा० दा० गो० लळीत कारकून ... ... ... २।२।६
" " ग० व्य० जोशी ... ५।८
रा० रा० वा० शि० गोरे ८
" " वि० गो० चिपळूणकर. ७।६

#### सन १८८३ पैकीं

श्री० रा० रा० बाळासाहेब चंद्रचूड ४
रा० सा० रा० गो० भांडारकर ... ३।६
" " न० पु० टिळक ... ... २।६
" " ज० स० गाडगीळ ... २।६
रा० रा० गो० जैक० गडीकर... . ३।६
" " मो० ब० देशपांड्ये ... ३।६
" " दा० गो० लळीत कारकून ३।६
" " रा० ये० मराठे ... .. ३।६
" " से० बुलाक लायब्ररी ठाणें. ३।६
" " से० नै० ला० मलकापूर ३।६
" " ख० भि० बेलसरे ... ... ३।६
रा० रा० बा० म० वारकर .. ... ३।६
" " मा० स० पागेदार . . ३।६
" " वि० ना० केळकर ... ३।६
" " का० पा० परब . ... ३।६
" " तु० स० महाम्ब . ३।६
" " बा० के० भातखणकर ३।६
" " ल० र० मोडक . . ३।६
" " नि० स० पटवर्धन... . . २।६
" " ना० न० फडणीस .. ३
" " वि० रा० पुराणीक ... ३।६
" " से० एशियाटिक सोसायटी ५।८

# जा हि रा त.

**काव्येतिहास संग्रहाच्या** मागील अंकाकरितां पुष्कळ मागणीं येतात. परंतु [illegible]शिलक नसल्यामुळें पुस्तकें देतां येत नाहींत. याजकरितां **संग्रहाची** दुसरी [illegible] काढण्याचा आमचा विचार आहे. तेव्हां प्रथम पासून तों सन १८८२ [illegible] अखेरी पर्यंतचे सर्व अंक ज्यांस पाहिजे असतील त्यांणीं आम्हास आपलें नांव आपल्या पत्यासह कळवावें. दर वर्षाची किंमत रूपये ३ प्रमाणें पाच वर्षांची एकदर किंमत रूपये १५ पडेल. तीनशें वर्गणीदाराच्या सह्या आल्या बरोबर ही दुसरी आवृत्ति छापण्यास आरंभ करूं. आवृत्ति छापून तयार झाल्यावर टपाल खर्च काय पडेल तो संग्रहाचे मळपृष्ठावर कळविला जाईल. कळावें. तारीख १२ सप्तंबर सन १८८३.

**का० सं० व्य०.**

---

## विषयक्रम.

**बखरी.**


धाकटे रामराजे यांचे चरित्र ........................ ९-२४


**मराठी कविता.**


**अनेक कवि**—आनंदतनयकृत कंदुकाख्यान, आनंदतनयकृत बालचरित्र, वामनपंडितकृत जयद्रथवध, वामनपंडितकृत संकलित रामायण, आनंदतनयकृत पूतनावध ........................ २०७-२२२


**संस्कृत काव्यें.**


पंतविठ्ठलकृतं-सुश्लोकलाघवम् ........................ ५३-६८

१ येशवंतराव महादेव खासनिवीस पोतनीसँ[38].

१ भगवंतराव रामचंद्र बावडेकर यांस अमात्यपद दिल्हें.

११

शके १६७२ प्रमोदनाम संवत्सरे सन इहिदे खमसेन मया व अलफ.—

१ रघुनाथ घनःशाम यांस मंत्रीपद.

१ सुमंत महीपतराव अनंत.

१ तुळाजी आंगरे सरखेलपद.

१ भवानी शंकर राजाज्ञापद.

१ रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा.

१ मानाजी आंगरे वजारतमाब पद.

१ नागोराव मेघःशाम तोफखाना.

१ नारोपंत बक्षी.

१ बापूजी खंडेराव, जिवाजी खंडेराव चिटणीस यांचे बंधु, यांस सरदारी दिल्ही.

१ जगजीवन परशराम कैदेंतून सोडून त्यांस फिरोन प्रतिनिधी पद दिल्हें.

किरकोळ सरदार व सरंजामी यांचे किताब व सरंजाम करार केले.

१ हरजी यादव पागेची सरदारी.

१ राजजी नळवडे हत्तीमहाल.

१ मानाजी देवकाते.

१ गोपाळराव पांढरे फत्तेजंगबहादर.

वरकड सरलष्करचे सरंजामी यांचे किताब सरंजाम करार केले.

१ संताजी आटोळे समशेरबहादर.

१ मानकरी शिर्के व मोहिते व महाडीक व शिंदे व जाधव, भोंसले, निंबाळकर व खानवेलकर व पालकर वगैरे यांस वस्त्रें देऊन सरजाम करार करून दिल्हे.

१ सुभानजी महार्णव फत्तेजंग बहादर.

१ निंबाजी वागमोडे सेनाबारसहस्त्री.

१ हैबतराव कांकडे.

१ मानसिंगराव कडू रुस्तुमराव समशेरबहादर.

१ उदाजी पवार विश्वासराव.

याप्रमाणें सांगोले मुक्कामीं सर्व राज्यकारभाराचा बंदोबस्त व पदें व मुलुक, महाल सदाशिव चिमणाजी यांणीं रामचंद्र बाबा शेणवी व गोविंदराव चिटणवीस यांचे विद्यमानें महाराज यांचे विचारें केलाँ[39]. यावरून बाळाजीपंत नाना यांचे मनांत कांहीं विषम वाटलें जे, आम्हीं सातारा मुक्कामीं जावें, तेथें त्यांनीं येऊन आमचे विचारें [ हें सर्व ] व्हावें, तें न करितां परभारें सारीं कामें विल्हे

३८. 'पोतनीस' हा शब्द इ० प्रतींत नाहीं

३९. मागें टीप ३१ पहा.

लाविलीं. याजमुळें बाळाजीपंत नाना व सदोबा भाऊ व महादोबा पुरंदरे यांचे ठायीं विकल्प वाढला. हें करणें कारस्थान विकल्प वाढवण्याचें रामचंद्र बाबा यांचें [होय.] नाना यांचे चित्तांत विकल्प आला असें समजोन सदाशिव भाऊ व रामचंद्र बाबा महाराजांचा निरोप घेऊन पुण्यास गेले. आईसाहेब याचे मानस सर्व कारभार करणें तो आपण करावा. तें न होतां परभारें महाराज व कारभारी मिळोन स्वारींतच कामें विल्हेस लाविलीं. याजमुळें किल्ले सातारियावरि जाऊन, तेथील हवालदार व सुभेदार व कारखानीस व लोक याचा भेद करून, त्यांस सर्वांस अनुकूळ करून घेऊन शफता घेतल्या. आणि बक्षिसें देऊन आपले ऐसे करून घेतले. दोन्ही राण्या समागमें घेऊन किल्यावर जाऊन राहिलीं. तों सांगोल्याहून महाराज व सर्व हुजुरातचे लोक फौजसुद्धां श्रीमहादेव सिंगणापूर करून कार्तिक अखेर सातारा मुक्कामीं आले. ते खालीं वाड्यात राहिले. पंतप्रधान यांचे चित्तांत महाराजाचा कारभार त्यांचे खासगीचे कारभारी हाताखालीं घेऊन, माहीत होऊन, त्यांचा त्यांनीं पाहिजे तसा करावा. आईसाहेब यांचा विचार एक प्रकारचा पडला. त्यास महाराजांनीं मातोश्रीस दाबून सर्व बंदोबस्त करावा ऐसें मानस. परंतु त्यांचें तेज न पडे. तेव्हां रामचंद्रपंत बाबा यांणीं सदाशिवपंत भाऊ यांस समजाविलें जे, आईसाहेब व राजे यांचे वाकडेपणांत आपण न पडतां होईल तें पहावें. गोविंदराव व महादोबा पुरंदरे यांचे जुग फुटल्यावाचून नाना यांची मर्जी ठिकाणीं येत नाहीं. ते विकल्प पाडोन महादोबा कारभारी नसावे, राजद्वारचा कारभार आपल्या इतल्यां[20] शिवाय होऊ नये, येविशीं कारस्थान करून महादोबा पुरंदरे यास घरीं बसवून रामचंद्र बाबा कारभार करू लागले. सातारियाचे हवालदार व सुभेदार कारकून[21] सह गोविंदराव चिटणवीस यांचे लक्षांत होते त्यांस पालख्या व सरंजाम करार करून पक्केपणें आपले ऐसे आईसाहेबीं केले. जवळ कारभारी पुराणीक होते ते बहुत प्रियकर, त्यांणीं मसलत दिल्ही. गोपाळराव यादव व बाजीराव यादव मसलतींत घेऊन मनसुबा केला. गोविंदराव चिटणवीस व येशवंतराव खासनिवीस व देवराव लपेटे हे कारभारी महाराजांपासून सर्व राज्यकारभार चालवू लागले. प्रधानपंत त्यास अनुकूळ झाले. आईसाहेब यांचा विचार एकीकडे राहिला. त्यास महाराज कोणत्याही युक्तीनें किल्यावर आणून आपणाजवळच दाबून ठेवावे, आणि जुने कारभारी गाळून पुढें राज्यकारभार आपण करावा ऐसें सिद्ध केलें. पंतप्रधान यांणीं गुजराथ निमे आपणाकडे तालुका करून घेतला, व सुरत अठ्ठाविशी अमदाबाद त्याचा अंमल बसव-

२०. इतल्या=सल्ला, अनुमत. | २१. 'कारखानिस' इं० प्र०.

वण्यास शिंदे, होळकर यांच्या फौजा देऊन रघुनाथ बाजीराव रवाना केले. ते अमल बसवून परत आले. महाराज किल्याखालींच होते. त्याणीं आईसाहेबांचें मनोधारण करावें, आणि किल्याखालीं आणावी, म्हणोन बोलण्याकरितां मध्यस्त घातले. तेव्हां किल्लेकरी व पुराणीक कारभारी कोणताही विचार चालूं न देत. त्याजवरून आपणच जाऊन समजूत करून आणावी ऐसें मनात आणिलें. आणि शागिर्दपेशा लोक व बापूजी खंडेराव चिटणवीस यांचे लोक सुद्धां बराबर घेऊन मार्गशीर्ष शुद्ध ५ [ रोजीं ] किल्यावर गेले. शके १६७२ प्रमोदनाम संवत्सरे सन इहिदे खमसेन मया व अलफ. आईसाहेब याणीं महाराज यांस निराळे काढून बहुत प्रकारें कुबुद्धि भेद केला जे, "तुम्ही आम्हापाशीं किल्यावरतें च रहावें. कारभारी गोंळून[४२] प्रधानपंत सहवर्तमान दाबून राखावे. आपले लक्षा-[४३]चे प्रतिनिधी वगैरे फौज सुद्धां बोलवावे." ऐसे उपदेश केले. तें यास मानलें नाहीं. तेव्हां निरोप घेऊन खालीं येतां किल्लेकरी वगैरे यांचा बेरोंख[४४] विचार पाहून बापूजी खंडेराव सावध होऊन पालखी भोंवते लोक सुद्धां राहिले आणि दरवाज्यास किल्लेकरी वगैरे जमा झाले असता दाबून महाराजांसहवर्तमान खालीं आले. नंतर आणखी आईसाहेब यांणीं महाराजांकडे[४५] बोलणार पाठविले[४६]. जे षष्ठीचे पारण्यास किल्यावर यावें. तेव्हां बापूजी खंडेराव वगैरे याणीं "किल्यावर जाणें, मातुश्रींचा कारभार ठीक दिसत नाहीं, दुर्बुद्धि धरिली आहे, जावयाचें नाहीं" असें सांगितलें असतां होणारानुरूप बुद्धि झाली. कोणी लोक व बापूजी खंडेराव बराबर न घेतां व कोणासही कळू न देतां अकस्मात मातुश्रीस निखालसता दाखवावी म्हणोन किल्यावर गेले. हें कळतांच सर्व जमा जाले. तों किल्यावर जाऊन पावले. भोजन करून बापूजी खंडेराव दरवाज्या खालीं गेले तों मनाई केली. महाराजांची स्वारी परत दरवाज्याजवळ आली असें [ त्यांस ] सांगितलें. आईसाहेबीं महाराजांस या उपरि खालीं जाऊ नये, येथेंच रहावें, असा बहुत आग्रह केला असतां, स्वारी तयारी करून महाराज दरवाज्याजवळ येऊन पावले. त्या समयीं हवालदार व सुभेदार वगैरे गडकरी सर्व जमा होऊन स्वारीस आडवे जाले जे, आई साहेब यांची परवानगी खालीं स्वारी जाण्याची नाहीं. ऐसें बोलले. तेव्हा महराज जवळ पाहतात तों कोणीं लोक

---

४२. 'गांठून' असेंही होईल,

४३. आपल्या लक्षाचे=आपल्याकडे लक्ष ठेवणारे आपल्या तर्फेचे.

४४. बेरोंख=बदललेला, फितुरीचा

४५ 'महाराजाकडील' चि० प्र०.

४६. "पाठविले गोकुलअष्टमीचे" असा चिटणीस प्रतीचा पाठ आहे पण मूळचे '०जे षष्ठीचे' खोडून त्याजवर शोध घातला आहे. हे खंडोबाचे दिवस.

नाहींत, शागिर्दपेशा मात्र आहे. तेव्हां महाराजांस विषाद येऊन तसाच घोडा चालविला. तों दरवाजी कारखानीस वगैरे लोकांनीं दाटी करून घोड्यानजीक आले. आणि दरवाजे महामूर[४७] करून दरवाजे, दिंड्या लाविल्या. स्वारी परत वाड्यांतच जावी, ऐसें बोलले. महाराजास हिंमत अथवा धैर्य व मनसबा, चातुर्य किंवा माहितगारी विशेष नाहीं, याजमुळें बुद्धींत खंबीरता कमी पडले. महाराज निरुपाय पाहून परत माघारे वाड्यांत गेले. धनिणीही बरोबर होत्या. तसेच राहिले. वाड्यांतही बंदोबस्त चौकी पहारे ठेवून दरवाज्यास बंदोबस्त आईसाहेबीं केला. जवळ इतबारी लोक होते ते खालीं घालविले. दरवाज्याखालीं लोक व बापूजी खंडेराव होते त्यांस खालीं उतरोन जावें, नाहीं तरि धोंडी लोटूं व गोळ्या घालूं, असें सांगितलें. तेव्हां ते खालीं उतरले.

त्यानंतर आईसाहेबीं मनसबा केला जे, पंतप्रधान व गोविंदराव चिटणवीस हे आपले लक्षांत येत नाहींत. पुण्यास वगैरे बोलणीं जालीं जें करणें तें आमचें विचारें करावें. असें असतां राजे यांजपासोनच सर्व कारभार करविला. याजकरितां आपले लक्षांतील सर्वांस एक करून यांचें पारपत्य करावें. राजे बायकां सुद्धां आपले स्वाधीन होणें ते जाले. नबाब व प्रतिनिधी वगैरे आपले लक्षाचे दाभाडे, गायकवाड हीं राजकारणें करावीं ऐसा उद्योग केला.

या समयीं शाहू महाराज असतांच महमदशाहा[४८] पादशाहा वारिले. अहमदशाहा[४९] पादशाई करूं लागले. निजाम उन्मुलुखही वारले[५०]. नासरजंग[५१] वारले. सलाबतजंग सुभा करूं लागले. त्यांनीं या संधींत शाहू महाराज वारले, ताराबाई यांणीं रामराजे बसविले ते नजरबंद करून आपणापाशीं ठेविले, त्याचें राजकारण आलें म्हणोन रामदासपंत[५२] व सलाबतजंग नबाब मातबर फौज मुस्सा बुस्सी फरासीन पलटणां सामान सुद्धां साठ हजार जमाव करून कुकडी[५३] नदी पर्यंत चालून आले. कोरेगाव व भीमानदी पर्यंत येऊन पुणें पहावें ऐसा विचार केला. आणि रामदासपंत यांणीं प्रधानपंत यांस नमस्कार सांगोन पाठ-

---

४७. महामूर=बंद.

४८. महमदशाहाची कारकीर्द, इसवी सन १७१९–१७४८

४९ अहमदशहा हा महमदशाहाचा मुलगा याणें सरहिंद येथें लढाई मारून अहमदशहा अबदाली याचा पराभव केला होता (१७४८) पुढे याची कारकीर्द इ० सन १७४८–१७५४ पर्यंत.

५०. निजाम् उल्मुल्काचा मृत्यु इ० स० १७४८.

५१ निजामास ६ पुत्र होते पैकीं हा दुसरा. यास कर्नूल, कडापा येथील पठाणानीं १७५० सालीं दगा करून मारिलें.

५२. रामदासपंत हा सलाबतजंगाचा दिवाण हा मेंचास प्रथम पासून अनुकूल असे याजकडे ताराबाईनें राजकारण लाविलें त्याबद्दल हकीगत 'पत्रें यादी वगैरे' या सदराखालीं प्रसिद्ध केलेल्या १६१ पत्रांत सांपडेल.

५३ कुकडी–जुन्नर तालुक्यात आहे

विला. तेव्हां पंतप्रधान [ यांस ] ही तयारी करोन नबाबाचे मसलतीस जाणें प्राप्त जालें. त्याची मातबर फौज असतां, त्याचा हिसाब न धरितां, चालून जाऊन त्यास घेरलें. आणि चहूंकडून रसदबंदी केली. वेढा घातला. लढाई देऊ लागले. त्या समयांत प्रधानपंत यांणीं त्रिंबक सूर्याजी प्रभू यास त्रिंबक किल्याचें राजकारण करण्यास पाठविलें. त्यांनी जाऊन, शिड्या लावून, कोळी लोक जमा करून मोठे जवांमर्दीनें त्रिंबक किल्ला घेतला. हें वर्तमान येतांच त्या रोखें नबाब चालले. प्रधानपंत [ यांणीं ] भोंवतीं फौज घालून, कहीं व रसद मारून, मोंगली फौज घाबरी केली. तेव्हां अखेरीचे बरसातीचे दिवस प्राप्त जाले. यावरून पुढे बाजतबरसात मसलत करण्यास येईल म्हणोन मागें सरत सरत [ मोगल ] छावणीस भागानगर प्रांतीं परत गेले. प्रधानपंत भालकी चिटकोदेंपर्यंत लढाई देत गेले आणि नबाब यांनीं तह केला.

या नंतर रघुनाथ बाजीराव यांजबरोबर शिंदे, होळकर सरदार हल्लीं गुजराथ प्रांतींचा अमल घेऊन हिंदुस्थानांत जावें म्हणोन रवाना केले. ते गुजराथेंत जाऊन अमदाबाद व पलीकडील अमल काठेवाड वगैरे उगवून हिंदुस्थान प्रांतीं जाऊन कमाऊंचे पहाडापर्यंत राजेरजवाड्यांच्या खंडण्या घेऊन तीन वर्षे तिकडे छावणी केली. अयोध्या, दिल्ली वगैरे सर्व अमल बसवून बहुत खजिना मेळविला. प्रधानपंत कर्नाटकांत जाऊन सर्व खंडण्या घेऊन श्रीरंगपट्टण पर्यंत अंमल बसवून बहुत द्रव्य मेळवून पुण्यास आले. हिंदुस्थान कर्नाटकांतून द्रव्य जसा नदीचा प्रवाह ऐसें येऊं लागलें.

या सधींत दाभाडे व दमाजी गायकवाड यांजकडे आईसाहेबीं राजकारण केलें होतें. नबाब तिकडून यावे. तुम्हीं इकडून तयारी करून यावें. ते जमून यावयास निघाले. सातारियास प्रधानपंत यांणीं कारभारी मुतालीक त्रिंबक सदाशिव धाकटे नाना ठेविले होते. त्यांनीं विचार केला कीं, महाराजास आई साहेबीं ठेवून घेतलें. किल्या भोंवत्या चौक्या बसविल्या. रोखे पत्रें वगैरे मनस्वी करूं लागले. लोक नवे पायदळ तीन हजार ठेविले. राजकारणें मोंगल, गायकवाड याजकडे केलीं. हे गोष्ट ठीक नाहीं. राज्य बुडवावयाचा विचार आरंभिला. त्यास चौक्या उठवाव्या, लोक नवे धुडावून लावावे, [ असा विचार केला. ] तेव्हां गोविंद खंडेराव व बापूजी खंडेराव यांणीं सांगितलें कीं, तीं

---

५४. रसद=दाणा वैरण वगैरेचा पुरवठा.
५५ जवामर्दी=शौर्य, साहस.
५६. कही=सर्पण, वैरण आणणाऱ्या टोळ्या.
५७. बाजतबरसात=पर्जन्यकाळ गेल्यावर.
५८. 'मानती' इं० प्र०.
५९. 'पिलाजी' चि० प्र० इडुरप्रतींत गायकवाडाचें नाव नाहीं.

धणीच आहेत. युक्तीनें मर्जी ठिकाणीं आणून, पूर्वीं किल्लेकरी आमचे लक्षीं होते त्यांशींही बोलणें करून, पहावें. राजे खालीं येण्याचा विचार झाला तरि उत्तम. नाहीं तरि करणें तें करावें. म्हणोन बोलणेंही करविलें. प्रधानपंत यांस लिहिलें. त्यांनीं गोविंदराव चिटणवीस यांस पत्रें पाठविलीं जे, राजे खालीं येण्याचा विचार तितका करावा म्हणोन लिहिली गेलीं. त्यांत हेही आई साहेबांचे लक्षांत लागलें किंवा काय असा संशय प्राप्त जाला. त्यांनीं साम उपचार करणें तो केला. परंतु महाराज खालीं येणें घडून येईना. तेव्हां प्रधान पंतांशीं आपली निखालसता करणें तशी केली.

या उपरि त्रिंबक सदाशिव पुरंदरे यांणीं किल्या खालच्या चौक्या उठवणें, नवे लोक यांस जरब देणें, घालवणें, असें करूं लागले. प्रधानपंत नबाबाचे मसलतीस[६०] गुंतले, असें समजोन दमाजी गायकवाड पंधरा हजार फौजेनिशीं जलदी करून, येशवंतराव दाभाडे यांस घेऊन, सातारानजीक येऊन पावले. शहरास धीर न निघे. मातबर मातबर लोक व सावकार यांणीं मुलें माणसें काढिलीं. त्रिंबकराव सदाशिव नाना पुरंदरे व गोविंदराव चिटणवीस व बावाजी बावा कैंडू व इंद्रोजी कदम हे, पुण्यास रखवालीस फौज होती ती, व आणखी जमाव करून पुणियास जावें म्हणोन निश्चय करून पुण्यास गेले तों सालप्याचे घाटें सेनापती व गायकवाड सातारियास येऊन पावले. आई-साहेबीं सरकारी कारखाने सर्व लोक पाठवून किल्यावर नेले. आणि शहरास चौक्या बसविल्या. गायकवाड वेण्यातीरीं मुक्काम करून, किल्यावर जाऊन, आईसाहेब यांचें दर्शन घेऊन, फौजेंत येऊन राहिले. त्रिंबकराव सदाशिव व गोविंदराव चिटणवीस हे फौज जमाव करून गायकवाड यांचे पिच्छावर जावें म्हणोन निघाले. फौज पंधरा वीस हजार जमावानिशीं येऊन आरळें वडुथ येथें कृष्णातीरीं मुक्काम करून राहिले. आणि तेथून तयारी करून निघाले. वेण्यातीरीं जाऊन आपणही उतरावें म्हणोन निंबखिडीनजीक आले. तों गायकवाडही तयार होऊन चालून आले. त्या नंतर लढाई बहुत झाली. त्यांत

६०. सन १७५१ मध्यें मुजफरजंग मारला गेल्यावर सलाबतजंगास फ्रेंचानीं सुभेदार करून ते त्यास हैदराबादेस घेऊन येत होते इकडे गाजीउद्दीन याचा पक्ष पेशव्यांनीं धरून त्याचा अंतर्मित्र जो सय्यद लष्करखान औरंगाबादचा सुभेदार याजपासून १५ लक्ष खंडणी म्हणून खर्चास घेऊन सलाबतजंग यास अडवून तो हैदराबादेस जाऊं न पावे अशा करिता कृष्णातीरीं सुमारें ४०० मैलाच्या अंतरावर पेशव्यांची स्वारी जाऊन दोन्ही सैन्यांची गांठ पडते न पडते तों ताराबाईच्या कारस्थानाची खबर त्यांस लागली. त्यामुळें सलाबतजंगाचें तहाचें बोलणें प्रथमच आलें होतें त्या प्रें॥ तह करून १३वे दिवशीं स्वारी परत आली.

६१. याजबद्दल 'बापूजी बाकडे' असें इं० प्रतींत आहे.

प्रधानपंत यांजकडील फौजेचा मोड झाला. तसेच निघोन पुन्हा कृष्णातीरीं जमले. आणि फौजेची निवड करून, महाराजांचे पायाचें स्मरण करून घोडे घालावे, यश येणें [ तें ] जर त्यांचे पायाची निष्ठा व राज्य त्यांनीं करावें ऐशी आमची असली तरि यश येईल. नाहीं तरि मरोन जावें. परंतु अपेश घेऊं नये. त्या लढाईंत बापूजी खंडेराव होते. त्यांनीं फिरोन चालून जावें, आपण लढाई मारितों, असें सांगितलें, आणि लागलेच चालून आले. घोडे घातले. लढाई बहुत झाली. बरानजी मोहिते गोळी लागून पडले. त्यांत गायकवाड व सेनापति यांचा मोड करून उधळले. बापूजी खंडेराव यांनीं शिपायगिरीची तरवार बहुत केली. त्रिंबकराव यांनीं त्याचा तळ घेऊन वेण्यतीरीं तळावर उतरले. गायकवाड यांस धीर न निघे. म्हणोन डोंगराचे आश्रयास जाऊन जोरखोऱ्यांत[62] उतरले. दोहींकडील छबीने[63] उभे रहावे ऐसे सावधतेनें राहिले. पंतप्रधान यांस बातमी गेली. ते जलदीनें येऊन सातारियास वेण्यातीरींच उतरले. आणि गायकवाड याची रसदबंदी केली. दाणा वैरण मिळेनाशी झाली. आपली कुमकही येऊन पावावयाची नाहीं, लढाई देऊन परीणाम नाहीं, असें समजोन गायकवाड बहुत खजिल झाले. तेव्हां तह करून भेटावें ऐसा विचार करून पिलाजी जाधव यांचे पुत्र आपाजी जाधव यांजकडे राज्यकारण करून बोलणें लाविलें. त्यास त्यानीं तेथून निघोन आमचे जवळ येऊन उतरावें ऐसें सांगोन पाठविलें. तेव्हा ते तसेच येऊन उतरले.

या नंतर गुजराथ निमे सुभा आम्हांकडे जाहाला तो आमचे मामलेदार व फौज जाईल त्यास वाटून देण्याविशीं बराबर तुमचे कारकून द्यावे म्हणोन सांगितलें. वडील उमाबाई [ दाभाडे ] आहेत त्यांचे विचारें करणे तसें करावें म्हणोन [ गायकवाड यांचें ] आग्रहाचें बोलणें पडलें. तेव्हां प्रधानही आग्रहास पडून या उपरि असेच बखेडे होतील, फौजा येऊं लागतील, आईसाहेब उमजत नाहींत, महाराजांस खालीं येऊं देत नाहीं, म्हणून त्यांचे गोटाभोंवतीं फौज उभी करून त्यास लुटून घेतलें. येशवतराव सेनापती याजबराबर लोक देऊन तळेगांवीं रवाना केले. दमाजी गायकवाड व त्यांचे लेंक व पुतणे यास धरून बेड्या घातल्या. आणि लोहगडावर रवाना केले. लोक त्यांचे चोहोंकडे उठून गेले. कांहीं लुटले. नतर आई साहेब याजकडेही निरोप पाठविले जे "महाराज

६२. प्रतिनिधि वगैरे दुसरे फितूरी येऊन मिळतील अशा उद्देशानें गायकवाड जोरखोऱ्यांत गेले. 'ईदुरमतींत 'मेढखोऱ्यांत' असें आहे

६३. छबीना=राउताचा पहारा.

६४ गुजराथेंतून कुमक येणें ती कोंकणचे सुभेदार शंकराजीपंत याणीं आडवून धरिली. घाटावरील प्रतिनिधी वगैरेची फौज नाना पुरंदरे याणीं रोंखून धरिली.

खालीं उतरावें. आपण वडीलपणें कोणताही बखेडा न करितां किल्यावर किंवा खालीं असावें. कामकाज राज्यकारभार सर्व कारभारी घेऊन महाराजांनीं चालवावा हे उत्तम गोष्ट आहे." असें सांगून पाठविलें. परंतु ती गोष्ट मातुश्रींचे विचारास येईना. बोलणेंही पाठवीनात. तेव्हा किल्यासच मोर्चे देऊन जबरदस्तीने महाराज उतरोन घ्यावे, परंतु दुर्लौकिक हरामखोर ऐसा चहूंकडे होईल. कांहीं फौज कारभारी खालीं ठेवून विचारें करून त्यांचे मनांत विचार येईल तसें करावें म्हणून निश्चय ठरवून कूच करून पुण्यास गेले. आणि सर्व राजमडळचा लवाजिमा ज्याचे त्याजकडे तालुके व महाल सरंजाम गांव जमिनी चालवून, जो येईल त्याचें आगत्य धरून, सर्व कारभार आपणांपाशीं बहुत करून ओढूं लागले.

आई साहेब जेथें हात चालेल तेथें मामला अथवा गांव महाल विल्हेस लावावा, दरमहाचे नेमणुकी ऐवजावर वराता कराव्या, हुजरे पाठवावे, आणावे इतकेंच करून, या करण्यांत राज्यभार आटोपात आला याचा विचार न करितां मातबर कोणी अथवा कारभारी याचा संग्रह करावा, आणावे, तें न करितां कारभारी जुने चिटणवीस वगैरे यांचा द्वेष तिरस्कार करून जवळ सर्वांध्यें पुराणीक वगैरे लहान माणसें कारभारी हे मात्र ठेऊन, चिटणीशी लिहिणें यास मोरो शिवदेव थिटे वाईकर चिटणीसाकडील कारकून लिहिणार त्याचे हातें काम चालवून करूं लागलीं. प्रधान यासि राजकारण किंवा त्यांचे विचारें चालावें, महाराजांस आपण नजरबद केलें यात अपाय आपणांस जाला, हें चित्तांत न आणितां प्रधानपत व कारभारी यांचे पारपत्याचे उपाय, [व] नबाब वगैरे याचीं राजकारणें करणें, हेंच चालविलें. जवळ कोणी बुद्धिवाद सांगावया जोगे नाहीं. तत्रापि कोणी म्हटलें कीं, राजे यांस मोकळे ठेवून त्याचे हातें कामकाज राज्यभार चालवावा, तरि इतराजी करून बेड्या घालाव्या, डोचकीं मारावीं, ऐसें करूं लागलीं. सर्व खजीना जवाहीर मोडून लोकास द्यावें, जवळ कांहीं नसावें, ऐसें केलें. नबाव सलाबतजग [ यांच्या ] व आणखी राजकारणांस पैका बहुत नाश केला. कांहीं एक करणें सिद्धीस जात नाहीं याचा विचारच नाहींसा जाला. जगजीवन परशराम सोडून प्रतिनिधीपद दिल्हें त्याचे हातें ही कांहीं होत नाहीं म्हणून बाबूजी नाईक याजकडे राजकारण केलें. त्यास प्रतिनिधीपद द्यावें म्हणोन उभे करून त्यांनीं प्रधान याचें पारपत्य करावें म्हणोन सातारां आणिलें. ते हजार पांचशें जमाव करून प्रतिनिधी याचे वाड्यात उतरले. आणि हुजरातचीं पतकें लोक वगैरे घेऊन प्रतिनिधी यांचा तालुका आधीं घ्यावा, म्हणोन रवाना केले. ते तांदुळवाडीनजीक गेले. तों जगजीवनपंडित प्रतिनिधी चालून आले.

---

६५ 'सर्व भटे पुराणिक' ई० प्र०.

लढाई मातबर जाली. नाईकास जखमा लागल्या. शिपायगिरी बहुत केली. परंतु मोड जाला. पळून शहरांत येऊन राहिले. पिच्छावर प्रतिनिधी येऊन राहिले. तेव्हा नाईक मशारानिल्हे आठ चार दिवस जखमा बांधून आपले करणें सिद्धीस जावयाचें नाहीं ऐसें समजोन बारामतीस निघोन गेले.

या नंतर आनंदराव जाधव हवालदार यांनीं विचार केला जे, हे गोष्ट चांगली जाली नाहीं. प्रधानपंत, सचिव, चिटणवीस यांणींही बहुत रीतीनें सांगून पाठविलें, "तुम्ही हवालदार जुने लोक किल्ला तुमचे स्वाधीन, तुम्ही राजे यांस आटकेंत ठेवण्याचे मसलतींत मिळालां हें युक्त नव्हे." तेव्हां त्यांणीं सर्व लोक यांचा गोंहा करून महाराजांस खालीं घेऊन उतरावें, ऐसा विचार केला तों बारीक बातमी आईसाहेबांस कळोन सदरेस बोलाविलें. हेही काहीं लोक तयारीनेंच गेले. तों बाबाजी जाधवराव शिंदखेडकर याजपासून सदरेसच आनंदराव जाधव हवालदार यास खलबतास म्हणून नेऊन शिरच्छेद करविला. लोक सरदार वगैरे फार मारिले. आणि राजे यास चौकशीनें प्रतिबंध बहुत जपून करूं लागलीं. सर्व कारभार पुराणीक व बाबाजी जाधव करू लागले. संभाजी राजे याजकडे आईसाहेबीं राजकारण केलें. त्यांनीं तयार होऊन यावें, प्रधान यांचें पारपत्य करावें, [ असें ठरलें. ] ते निघाले तों जिजाबाईनीं या कामांत पडूं नये म्हणोन माघारे नेलें.

या नंतर प्रधानपंत यांणीं विचार केला जे, "आईसाहेब यांणीं अविचार शेवट पर्यंत आरंभिला. नेहमीं सातारियास बखेडे होतात. फौज लोक जमा होते. प्रतिनिधी दोन तीन हजार फौजेनें राहिले. यांची उपेक्षा [ करणें बरें नाहीं. ] धणी आहेत उमजोन राज्यभार रक्षण्याचे विचारें चालतील म्हणतां घडत नाहीं. राजे यांस कैदेंत ठेवून बहुतच यातना चालली. महाराज यांचे ठायीं पराक्रम किंवा मनसबा, धैर्य, आंगेजणी,[67] हे बहुत दिवस बाहेर लघुसहवासीं राहण्यानीं काहींच गुण आले नाहींत. मोंगलाकडे मनसबा नेहमीं चालला. यांस आणून राज्यांत घालून बंदोबस्त करणार. आम्ही जे गोष्ट त्यांचें पारपत्य करून आपले दाबांतून रक्षितों, त्याशीं यांचा मनसबा. तेव्हां याचें राज्य फिरोन यवनाचे हातीं जातें. याजकारितां सातारियानजीक दहा पांच हजार फौज नेहमीं ठेवावी. म्हणजे बखेडे होणें ते बंद होतील." म्हणोन दादोपंत बाघ याजबरावर पांच हजार फौज देऊन रवाना केलें. ते चंदनवंदन किल्यानजीक आऊन उतरले. तेव्हां सातारा कोणी येणें तें बंद जालें.

आईसाहेब यांणींही मनसबा बहुत करून पाहिला. कोणतेंही सिद्धीस जाई-

---

६६. 'जमाव' इ० प्र० | ६७. अंगेजणी=( स्वताचें ) साहस.

ना. जवाहीर सर्व खराब झालें. प्रधान यांची फौज बाहेर नेहमीं येऊन उतरली, महाल मुलुख परभारें विल्हेस लाविले, म्हणोन निरुपाय जाला. परतु आणखी नबाबाशीं राजकारण केलें. नबाब सलाबतजंग याजपाशीं रामदासपंत कारभारी होते. ते शिबंदीनीं रस्त्यांत मारले [69] गेले.

रघुनाथ बाजीराव गुजराथींत शिंदे, होळकर फौजा घेऊन अंमल उगवायास गेले. तेव्हा अमल खंडण्या येणें त्या गायकवाड यांणीं या उपरि आपले लक्षें चालावेंसें करून, बेडी तोडून, गुजराथेंत जाण्यास बराबर दिल्हे. रघुनाथपंत अंमल नीट करून पुण्यास[70] आले. तेव्हां शिंदे, होळकर यांची रवानगी हिंदुस्थानांत केली. त्यांणीं जाऊन पादशहाचा बंदोबस्त करून सलाबतजग हे नेहमी बिघाड करून रहातात म्हणून गाजुदीखान यास सुभा करार करून त्यांणीं खानदेश, बऱ्हाणपूर, असेरी, दौलताबाद किल्ले द्यावे ऐसें करून घेऊन आले.

आईसाहेब यांचेही चित्तास आलें जे, प्रधानपंत यांसि वांकडे चालून परिणाम नाहीं. त्यांशीं सलूख करावा. यावरून चिंतो अनंत देवस्थळे धाकटे देवडी[71] कडील चिटणीविशी लिहिणार कारकून व मोरो शिवदेव थिटे आईसाहेब यांपाशीं चिटणीशी कडील कारकून लिहिणार होते ते व विष्णु नरहर थोरले देवडीचे दिवाण व शिदंभट ठकार यांणीं बाबाजी जाधवराव यांशीं समजोन, मसलतींत घेऊन, प्रधानपत यांजकडे बोलावयास आले. या उपरि तुमचे विचारा खेरीज चालावयाचें नाहीं. म्हणोन राजकारण केलें. या प्रमाणें होऊन पुण्यास येण्याचा विचार केला. आणि महाराजांस बराबर आणिलें. परतु निराळे आपले वांचून [ न ] ठेवणें, व त्यांजकडे कोणी जाण्याचा प्रवेश नाहीं, जें करणें तें आपणच, असा राज्यकारभार करण्याचा लोभ धरून प्रधान याशीं ही राजे यांचें नांव काढों नये, माझे विचारांत चालावें, आम्ही तुम्हां खेरीज चालत नाहीं, जुने कारभारी गोविंदराव चिटणवीस वगैरे नसावे, आम्हास खर्चास देणें तें नख्त तुम्हांकडील मातबर कारभारी ठेऊन देत जावे. याप्रमाणें बायकांचा विचार, अल्पबुद्धी, लोभ धरून बोलून घेतलें. प्रधान याणींही मतलब साधावा हें मनांत आणोन, आईसाहेबांची मर्यादा बहुत रखोन, मेजवान्या वगैरे केल्या. महाराजानीं स्वतंत्र असावें, माहीत होऊन राज्यभार यांचे हातीं आपण बसून चालवावा, हा विचार करून बोलून पाहिलें. तें-

६८ 'बसालतजग' चि० प्र०.
६९ इ० स० १७५२ एप्रिल ता० ७
७०. गुजराथेंत अमदाबाद घेऊन हिंदुस्थानांत जाऊन नंतर पुण्यास आले इ० स० १७५४.
७१ धाकटी देवडी=धाकटी राणी.

[ आईसाहेबांचे ] मर्जीस न माने. आपणच राज्य करावें हेच इच्छा. यावरून आईसाहेब यांचे मर्जी अन्वयें रुकार देऊन, सन्मान करून, त्रिंबकराव विश्वनाथ मामा कारभारी बराबर सातारियास देऊन रवानगी केली. आईसाहेब सातारियास गेलीं. वृद्धापकाळ, किल्यावरील हवा मानत नाहीं, खालीं रहाण्याचा बेत करावा, असें त्रिंबकराव याणीं सांगोन, राजवाड्याचें काम खराब जालें तें नीट करावें तोंपर्यंत फत्तेसिंग भोंसल्याचा वाडा लगत तयार करून तेथें राहिलीं. रामराव चिटणवीस व लक्ष्मणराव गोविंदराव यांचे पुत्र लहान ते जवळ ठेविले. गोविंदराव पुण्यास राहिले. त्रिंबकराव याणीं बहुत च मर्जी राखून जें पाहिजे तें द्यावें, अशी मर्जी प्रसन्न करून घेतली. आणि किल्लेकरी फंद करून चालतात, आणि हरामखोरी करितात, त्यांचा बंदोबस्त करण्याची परवानगी घेऊन त्यांशीं राजकारण बहुत ममतेचे केलें व बक्षिसें देऊन नख्त रुपयेही बहुत दिल्हे. आणि किल्ला पहावयास जाऊन आपले लोक वरती नामजाद हवालदार व सुभेदार व दरकदार व गडकरी सर्व उतरून खालीं आणिले. सुभेदार कारखानीस वगैरे कैद केले. बक्षिसें दिल्हीं तीं माघारीं घेतलीं. गडकरी लोक पुण्यास आणोन त्यांच्या पोटापाण्याचा बंदोबस्त सनदा व जमिनी चालवून चाकरी नेमिली. सिंदखेडकर बाबाजी जाधवराव कारभारी होते ते लावून द्यावे असें जेजोरीचे मुक्कामीं प्रधानपंत आईसाहेब यास पावावयास आले, तेथें ठरवून लावून दिल्हे. सातारियांतील सर्व बंदोबस्त करून त्रिंबकराव मामा कारभारी होऊन गेले. त्याजपाशीं बहुत रीतीनें राजे यांस काढावे असें सांगितलें. त्याजवरून त्याजपाशीं आप्त पुराणीक व चिंतो अनंत देवस्थळे व मोरो शिवदेव थिटे व विष्णु नरहर यांस त्रिंबकराव यांणीं गांव इनाम व सरंजाम देण्याचे करार करून, आपले लक्षांत आणोन, त्यांजपासून प्रयत्न तितका सामोपचारें बलात्कारें केला. ऐसें केलें असतां आईसाहेब यांस बुद्धि न जाली. राजे यांणीं तरी पराक्रम किंवा ईर्षा धरून आईसाहेब यांचा बंदोबस्त करून आपण राज्य करावें हे बुद्धिवैभव त्यांजमध्येंही नाहीं. ऐसें जालें. तेव्हा मोठ्या मोठ्या मसलती व राजकारणें चाललीं पाहिजेत, सर्व सरदार फौज महाराजांनीं ज्यास जे तालुके सरंजाम दिल्हे व तालुकेदार यांजकडील ठरावाचे ऐवज येणे हें व कोणास इनाम गांव व जमिनी वगैरे देणे ते कानावर घालावें. राजपत्रें करून द्यावीं. यास आज्ञा आईसाहेब यांची घ्यावी. हुजरोन तालुकदार, भोंसले गाईकवाड, मंत्री, सचिव, प्रतिनिधी, यांजवर वराता नेमणुकेच्या होतील त्या कार्याकारण पावते करून सर्व कारभार [करण्यास] आपले कारभारी

त्रिंबकराव ठेविले. त्यांचे विद्यमानें करावें ऐसें करून मातोश्रींची मर्जी राखून सर्व आपण करू लागले.

गाजुदीखान सुभा घेऊन शिंदे होळकर आले. प्रधानपंत यांस मरातब व बहुमान पादशाई दिल्ही ते घेऊन आले. प्रधानपंतही फौज घेऊन पुढे गेले. भेटी जाल्या. परस्परें बहुमान होऊन भागानगरावर जावें ह्मणोन चिटकोरे प्रांतीं गेले. तिकडे सलाबतजंग व बसालतजंग अदवानीचा सुभा करून होते ते, निजाम अल्लीखान व मीर मोंगल ऐसे चौघे भाऊ व कारभारी शहाजवानखान तिघेही तयारी करून चालून आले. युद्ध जालें. त्यांत सलाबतजंग पराभव पावले. आणि तह केला. गाजुदीखान यांणीं करार केले त्याप्रमाणें खानदेश सुभा प्रां। नाशीक व जालनापूर प्रांत अशेरी दौलताबाद हे किल्ले दिल्हे ते घेतले. गाजुदीखान याचा सुभा कायम केला. औरंगाबाजेस गेले. प्रधानपंत कर्नाटकचा सुभा घेतला तो अमल बसवून पुण्यास आले. गाजुदीखान शहरास राहिले. त्यास निजाम अल्लीचे आईनें विष घालोन विश्वास देऊन मारिले.

त्रिंबक विश्वनाथ कारभारी ठेऊन बंदोबस्त आईसाहेबांची मर्जी रखून केला. आईसाहेबीं पाहिजे तें देतात, आज्ञेंत चालतात, पाहून बाहेरील राजकारणें करणें तें सोडून चालू लागलीं. राजे यांची मर्जी रखून त्यांसही पाहिजे तें देणें घेणें, कागदपत्र इनाम कोणास राजपत्रें देणें, मोठी मसलत पडली [ तर ] तिकडे जाणेविशीं आज्ञा आणोन जावें, जाऊन आल्यावर अमुक मसलत करून आलों अशीं पत्रें पंतप्रधान यांणीं पाठवावीं, दर्शनासही जाऊन मर्जी संपादून यावें. खासगीस वाई, कऱ्हाड, व्याघ्रगड, जावली व शिरोळ वगैरे ऐवज इंदापूर देशमुखी वगैरे मामलेदार हुजूरून पाहिजेत ते पाठवावे. ऐवज खर्चास आणावा. शिवाय गायकवाड व भोंसले व सचिव व मंत्री याजकडे नेमणुकेचे ऐवज पागा, हत्तीमहाल, कार्य प्रयोजनास हुजूरून वराता करून, हुजरे पाठवून आणावे. याप्रमाणें चालविलें.

रघोजी भोंसले शके १६७४ अंगिरानाम संवत्सरे सन सल्लास खमसेनांत वारले. त्यांचे पुत्र धाकटे स्त्रीचे परंतु वडील, अधीं जन्म जाला, ते जानोजी भोंसले. वडील स्त्रीचे परंतु मागून जाले ते मुधोजी भोंसले. यांत पद कोणास द्यावें असें पडलें. तेव्हा प्रधानपंतांनीं आईसाहेब व महाराजाच्या विचारें प्रथम पुत्र जानोजी भोंसले जाले तेच वडील अशी आज्ञा घेऊन सेनासाहेब सुभा पद बहुमान त्यांस दिल्हा मुधोजी भोंसले यास नवेंच पद सेनाधुरंधर असें देऊन त्यास कांहीं तालुका नेमून दिल्हा. त्या समयीं जगजीवन परशराम प्रति

निधी यांणीं प्रधानपंत स्वारीस गेले पाहून, गोविंद खंडेराव यांजवर आईसाहेब यांची प्रशस्तता नाहीं, रामराव जीवाजी चिटणवीस व लक्ष्मणराव यास राजे यांजपाशीं ठेवून तुम्ही एकीकडे रहावें अशी पत्रें प्रधानपंत यांणीं पाठविलीं त्याजवरून उभयतांस राजे यांजपाशीं ठेऊन कुटुंब सुद्धां आपला कोले दातेगड तालुका यास देऊन तेथें जाऊन राहिले, त्याशीं कटाक्ष करावा ह्मणोन प्रतिनिधी चालून गेले. पाच सात हजार फौजेनिशीं येऊन कोळ्यास मोर्चे दिले. बापूजी खंडेराव यांणीं त्याचे मोर्चे मारणें वगैरे लढाई देऊन नऊ महीने ठाणें व किल्ले लढविले. पांच सात हजार फौज ठेऊन लढाया मारल्या. प्रधानपंत यांणीं दोहींकडील कुमक आईसाहेब यांचे आज्ञे खेरीज करितां नये ह्मणोन परभारें कांहीं पथकें गोविंदराव यास देविलीं. लढाईही जाली. रिकामी स्पर्धा वाढवून पेचांत येणें ठीक नाहीं तेव्हां तह करून तालुका प्रतिनिधी यांजकडे दिल्हा. दातेगड वगैरे कांहीं हुजूर ठेविले. प्रतिनिधी यांणीं इनाम गांव वगैरे देऊन समजूत पाडिली. आणि तालुका चिटणीस यांजकडील घेतला. शके + + + +

तुळाजी § आंगरे यांणीं हुजूरचे नेमणुकेचा ऐवज न देतां प्रधानपंत यांशीं उद्दामपणें चालू लागले. याजवरून फौज व सरदार रामाजी महादेव व त्रिंबकजी केशव व माणकर वगैरे रवाना केले. आणि इंग्रज यांजकडे मुंबईस राजकारण पाठवून त्याचे आरमार लोक पाण्यांतून कुमकेस आणविले. आणि त्यांचे तालुक्यात जाऊन किल्ले व जंजिरे यांस मारागिरी करून मोर्चे दिल्हे. बहुत जेर केले. तत्रापि उद्दामपणा न सोडितां तह व ऐवज कांहीं न बोलत. त्याजवरून हल्ला करून विजयदुर्ग* व सुवर्णदुर्ग किल्ले घेतले. त्यांत तुळाजी आंगरे धरिले. कुटुंब सुद्धा कैद करून आणिले. बेडी घालून किल्यावर टाकिले. त्यांजकडे तालुका व किल्ले सत्तावीस खुषकीचे व जंजिरे होते ते एक महिन्यात सर्व घेतले. शके १६७८ श्रीमुखनामसंवत्सरे सन आर्बा खमसेन मया व अलफ.

रघुनाथ बाजीराव याची रवानगी अमदाबाद प्रांतीं शिंदे, होळकर सरदार देऊन प्रधान पंत कर्नाटकात जाते समयीं केली. ते जाऊन गुजराथ अमदाबाद येथील अमल बसवून हिंदुस्थान प्रांतीं गेले. ते कमाऊचे पहा-

---

§ आंग्रयांची उत्पत्ति मोठी चमत्कारिक असल्याचें अलीकडे प्रसिद्ध झालें आहे एक शिद्दी हिंदुधर्मांत शिरून चांचेपणा करू लागला व हिंदूशी त्याचा लग्न संबंध झाल्यावर त्याच्या मूळच्या शिद्दीपणाची आठवण नाहींशी होऊन त्याचे वंशज मराठ्यांत मोडू लागले

* हा किल्ला घेण्यांत इंग्रजांचीं सर्वथैव मदत होती. क्लैव व वाटसन यांणीं घेरिया किल्ला घेतला ह्मणून प्रसिद्धी आहे तो हाच. इ० स० १७५६.

डपर्यंत जाऊन कच्छ भूज वगैरे जोतपूर, जयपूर, उदापूर येथील राजे रजवाडे व पहाडी राजांच्या खंडण्या घेऊन बहुत पैका मेळवून, तीन वर्षे तिकडे छावणी करून, यश संपादून आले. कर्नाटक प्रांतीं ठाणीं व संस्थानीं बहुत त्यांचा अंमल यावा म्हणोन तोफखाना बहुत तयार केला. आणि माधवराव पानशे† यांचे वडील महाराजापाशीं तोफखान्याचे दरोगे होते, ह्मणून त्यांस काम सांगोन दर वर्षास कर्नाटक प्रांतीं स्वारी पाठवावी, अंमल व खंडण्या आणाव्या, ऐसें केले.

बाळाजी बाजीराव प्रधान यांस पुत्र तिघे जाले. वडील पुत्र विश्वासराव, धाकटे पुत्र माधवराव, त्याहून धाकटे नारायणराव. त्यांत विश्वासराव प्रबुद्ध यांजपासून स्वारी करवावी ह्मणून फौज मातबर शिपाई लोक बापूजी खंडेराव चिटणवीस व दत्ताजी शिंदे वगैरे ऐसे देऊन रवाना केले. ते नबाब औरंगाबादेस होते त्यांस शह देऊन बसले. लढाया सुरू जहाल्या. प्रसंगीं रामचंद्र जाधवराव यांस तयार होऊन मोंगलांनीं आणविले. ते येतात ऐसें कळतांच दत्ताजी शिंदे त्यांचे तोंडावर रवाना केले. त्यांची आंच सोसणे अवघड जाणून जाधवराव शिंदखेडच्या ठाण्यांत आश्रयास गेले. शिंदे यांणीं मागें जाऊन ठाण्यास मोर्चे दिल्हे. आणि आपले मातबर सरदार गांठून जेर केले ह्मणोन सलाबतजंग यांणीं निजाम अलीखान यास फौज देऊन कुमकेस पाठविले. ते शिंदखेडास जाऊन पावले. निजाम अलीखान गेले ते लागलेच शिंदखेडचे दरवाज्यापर्यंत जाऊन, जाधवराव यास आपले अंबारींत घेऊन, त्याची आपली फौज सावरून निघाले. तों विश्वासरावही जाऊन पावले. आणि आपली फौज व शिंदे यांची फौज एकत्र करून लढाई बहुत तारफेची दीड प्रहरपर्यंत दिल्ही बापूजी खंडेराव बराबर दिल्हे होते त्यांणीं विश्वासराव यांचे अंबारी पुढें राहून, आपण तरवार करून, विश्वासराव यांचा हत्ती चालवून, तिरंदाजी त्यांजपासून करविली. मोंगलाई फौज घाबरी केली. तेव्हा तहाचे बोलणे नबाबांनीं पाठविलें. ते समयीं पंचवीस लक्षाचा जागीरचा अंमल याचे महाल आणखी नेमून [७२] घेतले. विश्वासराव रवाना केले ह्मणोन प्रधानपंत व सदाशिवपंत आणखी फौज घेऊन नगरास जाऊन राहिले होते. तों विश्वासराव यश घेऊन तेथे आले. त्यांच्या यांच्या भेटी नगरावरि जाहल्या. मों-

---

† सोनोरी ऊर्फ मल्हारगड, तालुके पुरंदर, हे यांचें ठिकाण

७२ ग्रांट साहेबांची बखर पृष्ठ ३६ ते ३८ पहा. मां० इ० म्हणतात हा तह निजामअली यानें परस्पर गुप्त रीतीनें केला.

गलांनींही भेटी व्हाव्या ऐसें ठराविलें. ते येऊन भेटी, मेजवान्या परस्परें निःखालसता होऊन नबाबास निरोप दिल्हा.

या मसलतींत रघोजी भोंसल्याचे पुत्र जानोजी भोंसले यांस सेनासाहेब सुभा जाला होता [ ते ] बोलाविले असतां आले नाहींत ह्मणोन पंतप्रधान गंगातीरास जाऊन तसेच घाटमाथापर्यंत वराडांत जावें ह्मणोन गेले. तों भोंसले येऊन भेटले. निखालसता बोलणीं बोलावीं [ ऐसें झालें. ] तेव्हां कुमकेस येत जावें ऐसें होऊन त्यांस निरोप दिल्हा. आणि पुणियास आले.

[ इकडे ] शाहानवाजखान कारभारी नबाबाचे त्यांचे व निजाम अल्लीखान यांचे बनेनासें जालें. यावरून शाहानवाजखान यांस मारिलें. आणि आपण निघोन आळजपुरास गेले.

मानाजी आंगरे वजारतमाब बहुत मर्द शिपाई ह्मणून प्रधान यांणीं महाराजांस विनंती करून यांसच वजारतमाब [ व ] सरखेल दोनी किताबाचीं वस्त्रे [ दिलीं. ] शके १६७६ भावानाम संवत्सरे सन खमस खमसेन मया व अलफ. जगजीवन परशराम वारले नतर श्रीनिवास गंगाधर यांस प्रतिनिधी पदाची वस्त्रे बहुमान दिला. शके १६७६ भावानाम सवत्सरे सन खमसखमसेन मया व अलफ. मानाजी आंग्रे वारले. यानंतर त्याचे पुत्र राघोजी आंगरे यांस वजारतमाब सरखेल किताब व तालुका करार करून देऊन वस्त्रें दिल्हीं. शके १६८० बहुधान्यनाम सवत्सरे सन तिसा खमसेन मया व अलफ.

प्रधानपत कर्नाटकास जावें म्हणून कृष्णातीरीं गेले आणि महादाजी अंबाजी फौज व मुजाफरखान गारद देऊन रवाना केले. प्रधानपत सिंहस्थ म्हणून गंगा त्र्यंबकेश्वरीं गेले. महादाजी अंबाजी खडण्या घेऊन येते समयीं मुजाफरखान रुसवा करून सावनूरकर पठाणाकडे गेले. आणि मनसबा करावा ऐसें केलें. मुराररावघोरपडे यांजकडे राजकारण करून त्यांस सामील करून घेऊन फौज जमविली. हें वृत्त प्रधान पत यांस कळलें. यावर प्रधानपंत व सदाशिव पत भाऊ व विश्वासराव व माधवराव व मल्हारजी होळकर व नारो शंकर राजेबहादर व विठ्ठल शिवदेव हे सरदार घेऊन निघाले. व जानोजी भोंसले यांस आणविलें. ते फौज सुद्धां आले. नबाबें[७३] याजपाशीं वकिलीस परशरामपत होते त्यास लिहून नबाबांनीं कुमकेस यावें ऐसें केलें. ते फौज सुद्धां आले. या नंतर सावनुरास मोर्चे लावून, आपला व नबाबाचा तोफखाना सुरू करून, दोन प्रहरपर्यंत एकसाह मार केला. तेव्हां सावनूरचे नबाब व मुजाफरखान व मुराररावघोरपडे यांची हिम्मत निघोन गेली आणि होळकर

७३. नबाब–हैदराबादचे

यांजकडे तहाचें बोलणें लाविलें. त्यांस दरम्यान घेऊन येऊन भेटले. घोरपडे यांस संस्थानीं जावयास निरोप दिल्हा. व सावनूरकर यांजपासून प्रांत व ठाणीं तहांत घेतलीं. आणि कर्नाटकांत जाऊन खंडण्या घेऊन पुण्यास आले.

निजाम अल्लीखान यांणीं सलाबतजंग यांस या समयांत कैद करून आपण सुभा व दौलत करूं लागले. दोन तीन वर्षेपर्यंत सलुखानीं निजाम अल्ली चालून [ पुढें] बिघाड करावा हें मनांत आणिलें. तेव्हां सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव फौज सुद्धां रवाना केले. नगरपर्यंत गेले. ते नगरचे किल्लेदार कविजंग याचें [ नबाबाशीं ] वाकडें पडलें. त्यांणीं यांशीं राजकारण केलें. त्याचा बंदोबस्त करून देऊन नगरचा किल्ला घेतला. आणि भागानगैर प्रांतीं जावें ह्मणोन उदगिरीपर्यंत गेले. इकडोन निजाम अल्लीखान पोख्त सामान करून तोफखाना सुद्धां चालोन आले. लढाई सुरू झाली. नबाब यांस भोंवतें घेरून, मुलूख जाळून लुटून, रसद बंद केली. जिकडे जात तिकडे घेरून घेतलें. तेव्हां नबाब तोफखाना मागें पुढें ठेऊन हळू हळू किल्यानजीक जाऊन पावले. यांणीं मधीं मधीं घोडे घालून फौज मारावी, लुटावी, आणि लांब जावें, दुंमदारीचे सरदार चंडोलें धरून आणिले. नबाब औवसे येथें जाऊन पावले. तेव्हां हल्ला केली. नबाबांनीं तोफखाना जंजालांचा मार बहुत केला. तो सोसून त्यास आंचं लाविली. तीन दिवस पर्यंत दाणापाणी बंद केलें. तसें तहाचें बोलणें लाविलें. ते समयीं साठ लक्षांचा मुलूख साल्हेर[८१] मोल्हेर किल्ले व बिजापूर प्रांत दरोबस्त करून घेतला. शके १६८१ प्रमोदनाम संवत्सरे सन सितेन मया व अल्लफ. ह्या स्वारीस जातां सदाशिव पंत भाऊ यांस मारेकरी यांणीं डेरियांत हात टाकिला तो खांद्यावर लागला- मारेकरी[८३] धरिले. त्यांणीं नांव मुजफरखानाचें घेतलें. तेव्हा त्यास व त्याचे

७४ सलाबत यास कैद पुढें केलें. तथापि ह्या वेळीं दिवाणगिरी निजामअल्लीकडेच होती.

७५. गोंवळकोंडें येथील एका शहाची "भागा" नावाची कचनी होती तिच्या प्रीत्यर्थ जो थोडया अंतरावर पुरा वसविला त्याचें नाव 'भागानगर' असें पडलें. पासच पुढें 'हैदराबाद' हें नांव प्राप्त झालें.

७६ रसद=दाणा वैरण वगैरे सामुग्री.

७७ दुंमदारी=पिच्छाडी.

७९. आवसें? कोठें?

८०. आंच=इजा, पीडा

८१. सालेर, मुलेर हे किल्ले बागलाणात प्रसिद्ध आहेत. हल्लीं ते नासिक जिल्ह्यात मोडतात.

८२. भाऊ साहेबांची बखर पृष्ठ ८५।८६ पहा.

८३ हा मारेकरी मुजफरखानाचा जांवई होता असें अन्यत्र आढळतें. ग्रां० डु० यांचें म्हणणें हें कृत्य पेशव्याच्या घराण्यात ... तेंच फल होय.

नेणें चि मीं कांहिं विदोष दोषा । ते भीत बोले पशुपाळयोषा ॥
तेव्हां तया सज्जनलोकपोषा । माता दटावीत वदे सरोषा ॥ १५ ॥
दटाविते माय तया हरीतें । चरित्र ज्याचें दुरितें हरीतें ॥
मारावया धांवलि कृष्णजीतें । तो वाटला त्रास्य अचाट जीतें ॥ १६ ॥
व्रजांगना सांगत येत होत्या । यथार्थ वार्ता गमल्या अहो त्या ॥
मारावया घे मग फोक हातीं । समग्र ही लोक तया पहाती ॥ १७ ॥

पशुपयुवति ऐशी दाटली लोकराजी ।
अनिमिष नयनानें पाहती श्रीधरा जी ॥
तंव हरि जननीतें स्फुंदस्फुदोनि सांगे ।
अमइ निरखिली ह्यां चोरटी चौंदिसां गे ॥ १८ ॥

हे अशी च अमणी करि चोरी । मागतां प्रगट ते शिरजोरी ॥
नंदसुंदरि म्हणे तिजलागीं । कां असें करिसि होसि बजागी ॥ १९ ॥

तेव्हां व्याकुल ते वदे कुळवधू हा शब्द माझ्या कुळा ।
कल्पांतीं न लगे चि मां सहज मीं जातां घरा गोकुळा ॥
याची मात खरी म्हणूनि धरितां हे आण घ्या मामिसें ।
नेणें कूड कदापि मी करि हरी विस्तार नस्त्या मिसें ॥ २० ॥

आम्हीं सर्व मुलें बिदींत अमई चेंडूफळी खेळतां ।
अम्री उंच उफाळला क्षितितळीं तो येथ आंदोळतां ॥
तो आला इचिये घरीं मग इणें चोरूनियां ठेविला ।
नेदी मागति मागुता म्हणुनियां चैलांचळीं गोंविला ॥ २१ ॥

अगइ सत्य वदे किति वैखरी । गमतसे सकळांस हि ते खरी ॥
हरि वदे मनिं कल्पुनि मामिसें । मज धरी पदरीं भलत्या मिसें ॥ २२ ॥
करूनियां विक्रय गोरसाचा । मी ये घरा भाव असा च साचा ॥
याचा मला कंदुक तो न ठावा । माझ्या कुळा बोल असा उठावा ॥ २३ ॥
रोषें वदे शपथपूर्वक सारसाक्षी । नेणें चि मी कपट कृत्रिम भूमि साक्षी ॥
मिथ्या कदापि न वदें चि म्हणे मुरारी । चेंडू इच्या जवळि साक्ष असे पुरारी ॥ २४ ॥
वक्षस्थळीं सहज उन्नतता स्त्रियांसी । हें तों तुझां विदित संशय कासयासी ।
चेंडू म्हणूनि बहुधा भ्रम या मुलाला । नाहीं म्हणोनि उचकीन करें फुलाला ॥ २५ ॥
हरि म्हणे जरि सोडिल कचुकी । तरि घरोसि पडेल नव्हे चुकी ॥
व्रजवधू मग दावि ते घडी । कुचपटा चळचचळ उघडी ॥ २६ ॥

---

२४. वैखरी=वाणी  २५. कंदुक=चेंडू.  २६ सारसाक्षी=कमला सारखे आहेत डोळे जीचे ती.

न दाविता दाटुनि होय चोरी । म्हणोनि जाऊं तरि जाय थोरी ॥
आतां करूं काय जना समोरी । टाकू कशी मां हंसताति थोरी ॥ २७ ॥
वक्षोजें[२७]गोळ अळुमाळ[२८] तमालनीळें[२९] । लक्षूनि मंद रुदना करिजे सुशीळें ॥
माता म्हणे रुदसि कां लटकें वदोनी । चेंडू तुझा उसळला न कळे उडोनी ॥ २८ ॥
हरि म्हणे अमये कमळेक्षणा । जरि पटा उकलील सुलक्षणा ॥
हरपला इशिं कंदुक सांपडे । अनृत हें न वदें धरणी पडे ॥ २९ ॥

तों ते गोपवधू विधूतवसनीं[३०] सोडी [३१]निवीग्रंथिका ।
झाडी वस्त्र पुनः पुन्हा गमतसे आश्चर्य या पांथिका ॥
चेंडू भव्य पटींहुनीं क्षितिनटीं अदोळला कौतुकें ।
देखोनी जन हांसतीं खदखदां आले तदां जीवुकें ॥ ३० ॥

गोपी तदा विसरली तनुभावनेला । कृष्णें तिचा निजगुणें तनुभाव नेला ॥
ऐशी चरित्ररचना रचिजे अनंतें । संसारसिंधु तरिजे चि जगें अनंतें ॥ ३१ ॥
ज्याची अतर्क्य करणी धरणीधराला[३२] । ठावी नसे आजि तया करुणाकराला ॥
ज्या गौळणी प्रियतमा हृदयाभिरामा । आनंदनंदन म्हणे वरिलाति रामा[३३] ॥ ३२ ॥

॥ इति श्रीकंदुकाख्यान समाप्त ॥

---

## आनंदतनयकृत

# बालचरित्र.

यादवेंद्रचरितामृत सेवा । लोक हो श्रवण सज्जुनि सेवा ॥
त्या सुखें तुह्मि नमाल जगीं या । भारती अजि पदर्थ मदीया ॥ १ ॥

नाना छंद करी हरी व्रजपुरीं बालस्थिती आदरीं ।
मातेला पदरीं धरी निज करीं मोत्याचिया झालरी ॥
ज्याचें नाम उमा सदाशिव सदा जो चिंतिती अंतरीं ।
तो हा कृष्ण विभू जपे जननिची नामावळी साजरी ॥ २ ॥

घरा येता जातां दधि घुसळितां पाक करितां ।
विडे घेतां देतां सहज दुहिता दुग्ध भरितां ॥
नदी पाण्या जातां जन निरखिता हीं परिसतां ।
फिरे माते मागें पदर धरुनी छंद नसता ॥ ३ ॥

---

२७ वक्षोज=स्तन. २८. अळुमाळ=किंचित. २९ तमालनीळ=तमालपत्रासारखा नि- ळा ३० वसन=वस्त्र ३१ निवी=ओढीळ. ३२. धरणीधर-शेष ३३ रामा=स्त्रिया

फिरसि कां उगा पाठिसी हरी । सरसिजाननाᶟ⁴ सांग लौकरी ॥
हरि म्हणे मला घेउनी कडे । स्थिरपणें उगे बैस ईकडे ॥ ४ ॥
जननि हासली खदखदा तदा । सकळ काम हें मी करूं कदा ॥
करिसि कां बहू छंद बा उगा । उठ मुलांसवे खेळ जा उगा ॥ ५ ॥
जा जा खेळ मुला सवें मज नको कां जेविसी तें नको ।
कृष्ण दूध पिसी नको निज घरा बाहेर येसी नको ॥
चेंडू देउ तुला नको निजवितें ये ऊठ तें ही नको ।
नारी ह्या तुज नोवऱ्या करिन मी तेव्हां म्हणेना नको ॥ ६ ॥
हूं हूं यशोदे मजलागिं तें दे । राधे उरीं कचुकिमाजि तें दे ॥
हांसोनि बोले जननी यशोदा । मागों नये रे उगला मुकुंदा ॥ ७ ॥
कृष्णा घेउनि कडे निज सौधा । चालिली नयननिर्जितपद्मा ॥
हालवी जननि पालखे शय्या । सज्जनीं सरम गात जि जो या ॥ ८ ॥
निजेला कीं जागा म्हणुनि जननी जों निरखिती ।
दयाब्धीची मूर्ती तव उघड नेत्रींच दिसती ॥
कशी येना निद्रा तुज गुणसमुद्रा यदुपती ।
पुन्हा गाऊ लागे तव वदत देवो मृदुगती ॥ ९ ॥
माते मला झोप न ये चि कां कीं । तू काहणी सागसि पूर्विकां कीं ॥
तेणे गुणें येइल नीज माते । निजेलिया या पुरुषोत्तमातें ॥ १० ॥
कृष्ण मूर्ति किति सुंदर शाहणी । सागणें म्हणत पूर्विल काहणी ॥
हालवी जननि पालख माउली । ते कथा वदत शीतळ साउली ॥ ११ ॥
होता राम म्हणोनि हू क्षितिसुता तत्पत्नि हूं तत्पिता ।
वाक्यें दडक हिंडता दशमुखें ते चोरिली योषिता ॥
निद्रेलागिं कथा अशी जननि ते सागे हरी ऐकतां ॥
दे दे बाण धनुर्धनुष्य अनुजा बोले उठे तत्वता ॥ १२ ॥
यावें शंकरजी बसा अजि असे डावीकडे धातया ।
स्कंदा क्षेमें सुराधिपा कुशल कीं वित्तेशजी येथ या ॥
ऐसा शब्द निजेलिया हरिचिया माता मुखीं ऐकुनी ।
कां कां वोसणसी मुला म्हणउनी धू धू करीं घेउनी ॥ १३ ॥
जागे करी जननि त्या गरुडध्वजाला । तो बैसुनी मुदित सावध शीघ्र जाला ॥

३४ सरसिजानन=कमला सारखें तोंड आहे ज्याचें असा. ३५. सज्ज=घर ३६. नयननिर्जितपद्मा=डोळ्यांनी जिंकलें आहे कमल जीनें अशी. ३७. पालख=पाळणा. ३८. स्कंद=कार्तिकस्वामी. ३९ क्षेम=कुशळ ४० वित्तेश=कुबेर.

पुसी मुखांबु जननी नयना स्वधारीं । दावी असें कपट नाटक सूत्रधारी ॥१४॥
मी नंदनंदन शिशु व्रजभूमिवासी । हें नाठवे निज हिता नत बांधवासी ॥
कीं मींच राघव अशी गति दाखवीतों । आनंदनंदन विभू रस चाखवितो ॥१५॥
इति श्रीबाळचरित्र संपूर्ण ॥

## वामनपंडितकृत

# जयद्रथ-वध.

सौभद्र[४१]शोकविवशें[४२] रचिलें पणातें । कुंतीसुतें समजल्या विण आपणातें ॥
तें वाक्य सत्य करवी तव पूर्वजाचें । श्रीकृष्ण नाम भज त्यासि अपूर्व ज्याचें ॥१॥

मी मारीन जयद्रथासि समरीं जों भानु आहे नभीं ।
नाहीं होमिन देह हा हुतवहीं[४३] सर्वात्मना ही नभीं ॥
ऐसें बोलुनि वाक्य त्या परिस तो केला असा नेम रे ।
रक्षू त्यासि बळें घडो मग तसें तो स्वापमानें मरे ॥ २ ॥

यानंतरें जयुनि कौरवराजसेना । आली कसी अवनिमंडळ जें दिसेना ॥
तों पार्थसैन्य हि सर्वेचि निघे रणाला । ज्या इंद्र ही परि नव्हे क्षणवारणाला ॥ ३ ॥

सूचीव्यूह तयात पद्म रचिले राहे तदभ्यतरीं ।
राजा सैंधव[४४] तो जयद्रथ तरी चिंता करी अंतरीं ॥
व्यूहाच्या वदनीं कृतांत समसा आचार्य राहे बळें ।
जे जे ज्या स्थाळीं ठेविले नृपवरें ते राहिले तुंबळें ॥ ४ ॥

वदे कृष्ण पाहें नरा द्रोण हा रे । समच्छास्त्रवत्ता रणीं जो न हारे ॥
जयाचे शरव्रात[४५] भाल्यांत कोरे । तयाशीं वृथा झुंज लावूं नकोरे ॥ ५ ॥

पंचाशीति[४६] जयासि वर्षगणना आपाडुंता[४७] मस्तकीं ।
युद्धीं द्रोण तथापि दुर्धर दिसे हस्ती असा मस्त कीं ॥
पार्था तूं न भिडें तयासह नको तो आजि नाटोपतो ।
पाहा दुःसह वाटतो मज रणीं यान्चा खटाटोप तो ॥ ६ ॥

नमस्कार दूरोनियां सव्यसाची[४८] । करी बाणयोगें गुरूला तसाची ॥
सवेगें पुढें तो पृथापुत्र धांवे । यदर्थ प्रतिज्ञा तयातें वधावें ॥ ७ ॥

आले वीर समस्त धीर धरुनी जे सैनि कीर्तिस्वरें ।
कोपाविष्ट विशिष्ट दीप्ति मिरवे ज्याची सुवार्तास्वरें ॥

४१. सौभद्र=अभिमन्यु ४२. शोकविवश=दुःखाधीन. ४३. हुतवह=विस्तव. ४४. सैंधव=सिंधु देशाचा. ४५ शरव्रात=बाण समुदाय. ४६ पंचाशीति=पंचायशी ४७. आपाडुंता=पांढरे केंस ४८ सव्यसाची=अर्जुन.

सोडी बाण अनेक पार्थ समरीं बाणासि ने मस्तकीं ।
वीराचा शर एक ही न चुकतां लागेच नेमस्त कीं ॥ ८ ॥
सव्यापसव्यकृतसायकताडवानें । केलें पराजित रणीं रण पांडवानें ॥
घालूं शके कवण या वरि वीर घाला । जैसा मृगात मृगरा⁴⁹ज तसा निघाला ॥९॥
कौंतेयाप्रति देवकीय वदला हे भागले वा⁵⁰ह रे ।
जाले फार तृषार्थ यत्न करणें जेणे पिपा⁵¹सा हरे ॥
बोले पार्थ जळासि यासि जपतों मी वारुणास्त्रा रणीं ॥
या वीरांस हि वारितो गज जसा सक्रोध आधोरणीं ॥ १० ॥
तत्काळ वापी रचिली च पार्थे । वारोनियां वीरबळें अपार्थे ॥
केले युगां⁵²पासुनि मुक्त देवें । सर्व चि ते घोटक⁵³ वासुदेवें ॥ ११ ॥
आर्द्रपृष्ठ हय पाजुनि पाणी । दो करीं चतुर नीरजपाणी ॥
देखती कुतुक सैनिक सारे । बोलती प्रबळ पार्थ कसा रे ॥ १२ ॥
धों धों दुंदुभि वाजल्या उचलला सैन्यीं धुरोळा नभा ॥
गेला सर्व दिशा तमोमय पहा जाला रवी हीनभा ॥
मारावा व्यसनस्थ पार्थ वदती आहे रथावेगळा ॥
होतां सज्ज कदापि हा न उतरे काळाचिया ही गळां ॥ १३ ॥
राजे भद्रप शाल्व सैंधव शिबी त्रैगर्तकाबष्ठ जे ॥
होगधांग कलिंग वंग यवन प्राग्ज्योतिषावंत जे ॥
इत्याद्यद्भुत कोप कोपनिभृत स्वाकर्ष चाप स्वरें ॥
आले सन्मुख ते क्षणीं विमुख ते केले प्रतापें नरें ॥ १४ ॥
शाखामृ⁵⁴गध्वज बहूत विशाळ वाटे । यासी भिडाल तरि लाविल मृत्युवाटे ॥
गांडीव मुक्त शर वाजति हे सणाणा ॥ ऐसा धनुर्धर कसा स्वमनासि नाणा ॥१५॥
कां उकावत असा परतावें । आमुच्या तरि मतें परतावें ॥
गर्जतो विजय दुर्गम रा⁵⁵वें । का अशासि खवळोनि मरावें ॥ १६ ॥
संजोगिले तुरग शीघ्र रथासि देवें । केले पहा सुकृत पांडुसुतें सदैवें ॥
दे हात पार्थ चढतां स्वरथावरी तो । एक्या करें हयचतुष्टय सांवरीतो ॥ १७ ॥
होता असा अरुपदाहक कैठभारी । बोले नरा मन तुझें न भया उभारी ॥
अस्ताचला स्वतिलकीकृत भानु गेला । वेळ्या जयद्रथ बधास्तव तूं भुकेला ॥१८॥

४९. मृगराज—सिंह ५०. वाह=घोडे. ५१. पिपासा=तहान. ५२ युग=जूं. ५३. घोटक=घोडे ५४. शाखामृगध्वज=वानर आहे ध्वजाच्या ठायीं ज्याचा असा अर्जुन. ५५. राव=शब्द.

हे क्लिष्ट वाक्य पडतां श्रवणीं विलोकी । सूर्याकडे मग म्हणे मुख कोंवि लोकीं ।।
दावूं अतःपर करूं न शके पणातें । हें वाक्य सत्य करिं होमिन आपणातें ।।१९।।
अच्यूत हें समजला जगदांतरात्मा । बोले शतक्रतु[56]सुताप्रति तो महात्मा ।।
कां धाकलास इतक्यांत चि या वधाया । पाहें कशी रचितसें निज योगमाया ।।२०।।

तुझें उणें या स्वजनीं दिसावें । रथीं तुझ्या म्यां मग कां बसावें ।।
मनीं असे कार्य तुझें सजावें । उगेचि वाटे मज तूं खिजावें ।। २१ ।।
साधावया अर्जुनकामनेला । अस्तासि मार्तंड[57] निकाम नेला ।।
प्रमोद जाला धृतराष्ट्रजाला । कीं आज हा सैंधव थोर झाला ।। २२ ।।
समीप आले नृपलोक सारे । पाहों मरे अर्जुन हा कसा रे ।।
कोणी नरासी करिती खटाळी । ते मारिती हांसुनि मूर्ख टाळी ।। २३ ।।
पार्था वो रवि हा जयद्रथ हि हा हें लक्ष लावीं बरें ।।
बोले अर्जुन लाविलें हरि वदे मारीं जगच्छेसरें[58] ।।
ऐसें त्याप्रति बोधितां झडकरी त्या सैंधवांचा[59] गळा ।।
गेला तोडुनि अर्धचंद्र विशिखें[60] कीं मस्तका वेगळा ।। २४ ।।
आधीं च पार्था सुचवोनि देवें । तो वारिला योग हि वासुदेवें ।।
तो देखिला भास्कर सैनिकांहीं । उपाय तेव्हां न चले चि कांहीं ।।२५।।

दुर्योधनादिक सशोक सलज्ज जाले । त्यांचे प्रमोदभरदीपक ते विझाले ।।
केला जई विजय दुर्जय वासुदेवें । हें वाचिजे हरिकथामृत कीं सदेवें ।। २६ ।।
श्रीशक्ति कर्ण मग भीमसुतासि[61] मारी । त्याचा प्रताप बहु तीव्र विरांसि मारी ।।
तें आयका वदत वामन लीन वाचा । मेला पुढें तनय द्रोण अशी कुवार्चीं[62] ।।२७।।

---

## वामनपंडितकृत

# संकलित[1] रामायण.*

करिति चरण तूझे जे शिळों[2] दिव्य रामा[3]
हरुनि दुरितें[4] माझें होउ तें सौख्य रामा ।।

---

५६ शतक्रतुसुत=इंद्रपुत्र अर्जुन. ५७ मार्तंड=सूर्य. ५८. जगच्छेसर=कृष्ण ५९. सैंधव=जयद्रथ ६०. विशिख=बाण ६१ भीमसुत=घटोत्कच ६२ यावरून घटोत्कचवध व द्रोणवध हीं प्रकरणें वामनानें रचलीं असावीं असा ध्वनितार्थ निघतो

१ संकलित=संक्षिप्त. * हें प्रकरण मौजे चिंचोडीं तालुके खेड जिल्हा पुणें एथील देशपांडे यांजकडे मिळालें त्यांचे एथें वामनी प्रकरणाची एक चांगली लिहिलेली व सकलादीनें बांधलेली वही आहे तींत वामनी प्रकरणें आणखी पुष्कळ आहेत. परंतु तीं सर्व पूर्वी छापून प्रसिद्ध झालेलीं आहेत. २ शिळा=अहल्या शिळा. ३ रामा=स्त्री ४ दुरित=पाप.

भ्रमरमन पदाब्जीं पावविं त्या विरामा
भव हर भवचापध्वंस विश्वाभिरामा ॥ १ ॥
जगीं तू असा कीं घटीं एक माती । गुण श्लोक कोटींत तूझे न मीती ॥
निरूपीन त्या सिंधुच्या बिंदुमात्रा । पुरे ते चि संसाररोगास मात्रा ॥ २ ॥
महा औषधांतूनि थेडें चि कांहीं । करी सेवितां नाश वातादिका ही ॥
पुरे आमुची हे अविद्या मराया । तुझें एकलें नाम जी रामराया ॥ ३ ॥
जरी नाशिली आमुची जी अविद्या । जितां ही दिली मुक्ति देऊनि विद्या ॥
तुझी कीर्ति मुक्तीहुनी गोड वाटे । शुकादीक ही चालती याच वाटे ॥ ४ ॥
म्हणोनि जे भागवतीं शुकानें । लीला तुझी वर्णिलि कौतुकानें ॥
टीका तिची मी क्षितिलोकवाणी । करीन जेथें न सुखास वाणी ॥ ५ ॥
बहू ग्रंथीं वृद्धी न करुनि वदावी यशसुधा ।
प्रतिश्लोकीं जे कां करि अमृतसतृप्ति वसुधा ॥
समश्लोकी टीका म्हणुनि करितों जी रघुपती ।
जिला मंत्रप्राय स्मरति वदती लोक जपती ॥ ६ ॥
निजाश्रमा राघव कौशिकानें । नेला कथा तेथुनि हे शुकानें ॥
आरंभिली मंगळ त्यास गातें । गातो मुनी उद्धरि जो जगातें ॥ ७ ॥
चाले वना प्रति पुलस्त्यसुतास मारी । पाळी स्वकोसल घरा सह भूकुमारी ॥
या मंगळाचरणपद्यरसें शुकानें । संक्षिप्त वर्णिलि कथा प्रिति कौतुकानें ॥ ८ ॥
टाकी तातार्थ राज्यावॅन वन विचरे त्या पदीं ज्यास वाटे ।
सीताहस्ताब्ज भारी अनुज कपिपती सेविती नित्य वाटे ॥
बोलें निर्नासिकेच्या असुर जनकजा ने तई क्रोध लेशें ।
बांधी दापूनि सिंधू वधि रिपुकुळ त्या रक्षिजे कोशलेशें ॥ ९ ॥
अहो विश्वामित्रें दशरथ नृपा प्रार्थुनि जयीं ।
स्वयज्ञातें नेला प्रभु असुर मारूनि विजयी ॥
तया संगें जातां करूनि मिथिला ग्राम गमनीं ।
शिळा शापें मार्गें करि पदरजें हंसगमनी ॥ १० ॥

---

५ अब्ज=कमल ६ अभिराम=सुंदर. ७ माती=मावती (राहाती) ८ अविद्या=अज्ञान. ९ क्षितिलोकवाणी=देशभाषा (मराठी भाषा). १० वाणी=कमताई. ११ सुधा=अमृत. १२ टीका=भागवता नवव्या स्कंधांत संक्षित रामायण आहे त्याची ही टीका होय. १३ कौशिक=विश्वामित्र. १४ पुलस्त्यसुत=रावण. १५ कोसल=देशविशेष १६ भूकुमारी=सीता १७ अवन=रक्षण १८ कपिपति=वानरस्वामी सुग्रीव). १९ निर्नासिका=जिचें नाक कापिलें आहे अशी शूर्पणखा २० असुर=राक्षस (रावण) २१ जनकजा=जनकाची कन्या (सीता) २२ हंसगमना=स्त्री

सीतास्वयंवरगृहीं भवचाप[२३] हातीं । भंगी मुख क्षितिपैं[२४] वीर अहो पहाती ॥
लीले करूनि गजबाळक इक्षुदंड[२५] । मोडी तसा भय करी ध्वनि तो उदंड ॥११॥
जिंकोनि ने स्वगुणरूपवयें समान । सीता रमा स्वहृदयावरि लब्धमान ॥
निःक्षत्रिया क्षिति करी हरि गर्व वाटे । त्याच्या जया नृपतिबीजें[२६] असह्य वाटे ॥१२॥
जो स्त्रीस लंपट सकाम तथापि त्याची । मायां धरूनि करि गोष्टि खरी पित्याची ॥
राज्यादिकें त्यजुनि जाय वनास दार[२७] । प्राणावरी जित चि मुक्त जसा उदार ॥१३॥
लंकापतीभगिनिच्या[२८] मुखदूषणातें । केलें महारण तया खरदूषणातें ॥
मारी चतुर्दश सहस्र हि चाप हातीं । कोदंडें[२९] चंड वनिं कष्ट मुनी पहाती ॥१४॥
सीताकथा परिसता स्मरविव्हळानें । जो निर्मिला दशमुखें मृग हो खळानें ॥
मारीच तो युधिं तया प्रभुकार्यदक्षा[३०] । जाऊनि दूरि शिव संहरि जेंवि दक्षा ॥१५॥
तों राक्षसाधम हरी जनकात्मजा ते । नेतां वृकें[३१] जसि अजा[३२] प्रतिदीन जाते ॥
तेव्हां वनीं रघुपती अति शोक दावी । कीं स्त्रीप्रियास गति शेवटिं हे वदावी ॥१६॥
जातां स्वकार्य मृत देह कबंध मारी । जे मित्र होति कपि शोधुनि भूकुमारी ॥
वाळीवधा उपरि सांगति ते च वेळे । ये विश्ववंद्य मग त्यां सह तो सुवेळे ॥ १७ ॥
सक्रोधलोचनभयें चि पडे समुद्रा । आंदोळतां जळचरें अति मीन मुद्रा ॥
जाला समूर्त[३३] शिरिं घेउनि पूजनातें । ये पाय वंदुनि वदे भवभंजनातें[३४] ॥ १८ ॥
जो तूं अनंतसम जो न कुबुद्धि त्यातें । कूटस्थ आदि पुरुषा जगपाळित्यातें ॥
देव प्रजाधिपति भूतपति क्रमानें । मायापती सृजिसि सत्वरजस्तमानें ॥ १९ ॥
मानें तसें जलधितें अजि लंघि मातें । श्री पाव मारुनि पुलस्त्यसुताधमातें ॥
पाषाण तारिं पसरे यश जेंवि लोकीं । गातील कीर्ति नृप सेतुपथा विलोकीं ॥ २०॥
सुग्रीव नीळ हनुमत कपींद्रसेना । ते आणितां गिरिशिखा[३५] नभ तें दिसेना ॥
त्या सेतुनें रघुपती कपिदग्ध लंका । देखे बिभीषण वदे मति निष्कलंका ॥२१॥
वेष्टूनि ते नगरि वानर ते निघाले । लंकेत घालिति गृहादि करूनि धाले[३६] ॥
हस्ती जसे डहुळिती ह्रदिंच्या[३७] जळाला । देखोनि रावण अहो हृदयीं जळाला ॥२२॥
पुत्र प्रहस्त अतिकाय त्रिकंपनादी । धूम्राक्ष दुर्मुख दिशा भरिती स्वनादीं ॥
सर्वांस त्यांस सह कुंभ निकुंभ धाडी । तों कुंभकर्ण हि उठे जग झोडि धाडी ॥२३॥

---

२३ भवचाप=शिवधनुष्य. २४ क्षितिप=राजे. २५ इक्षुदंड=ऊस. २६ नृपतिबीज=राजांचें बीज. २७ सदार=स्त्रीयुक्त. २८ लंका- पतिभगिनी=रावणाची बहीण ( शूर्पनखा) २९ कोदंड=धनुष्य. ३० प्रभुकार्यदक्ष=प्रभु रावण त्याचें काम करण्याविषयीं कुशल. ३१ वृक=लांडगा ३२ अजा=शेळी. ३३ समूर्त=सशरीर. ३४ भवभंजन=संसारनाशक ( राम ). ३५ शिखा=शिखर ३६ धाले=हल्ले ३७ ह्रद=डोह पाण्याचा.

येतां निशाचरचमू[३८] अतिवीर्यशक्ती । हातीं धनुष्य शर तोमर शूळ शक्ती ॥
सुग्रीव लक्ष्मण मरुत्सुतें[३९] ऋक्ष[४०] नीळ । या अंगदादि सह ये प्रभु मेघनीळें[४१] ॥२४॥
त्या अंगदादि रघुनायक-वानरांनीं । शस्त्रीं गदा गिरि तरू शर तोमरांनीं ॥
ते मारिली निघनिघों चतुरंगसेना[४३] । सीतापहारक[४४]-दळीं शुभ तें दिसेना ॥ २५ ॥
लंकेश लक्षुनि बळें क्षय कोपतापें । ये वाहनावरि चढोनि महाप्रतापें ॥
तों ये सुरेंद्ररथ[४५] त्यावरि रामराया । हाणी शर त्रिशत रामशरें मराया ॥ २६ ॥
बोले रघूत्तम खळा मळ राक्षसांचा । तू श्वान शून्य गृह भोजन भक्ष साचा ॥
सीता परोक्षीं[४६] हरिसी तुज निस्त्रपातें[४७] । मी काळ मारिन अमोघ[४८]बळास्त्रपातें ॥२७॥
जों घे दशानन असा व्यवसाय[४९]कानीं । दापूनि त्यास रघुनायक सायकानीं[५०] ॥
भेदूनि उर यधि आननिं रक्त नाकीं । जैसा व्यथे[५१] सुकृत संचित रिक्त नाकीं[५२] ॥२८॥
रघुपति विजयी त्या रावणातें वधूनी । श्रमबहु परि केला राक्षसांच्या वधूनीं[५३] ॥
शुक मग विभुलीला[५४] दिव्य जे तीस वर्णी । स्वपितृकृत[५५] वदे हे श्लोक बत्तीसवर्णी[५६] ॥२९॥

श्लोक वृत्त कथिलें यमकानीं । गाति त्यांस न पडे यम कानीं ॥
पावतील रघुनाथपदातें । जे सदा स्मरति नाथपदातें ॥ ३० ॥

अष्टाक्षरी चरण तो यमकीं न साजे । लीला च त्यांतिल सुखावह मानसा जे ॥
नेत्रांस ही दिसति ज्यास बरें कदापी । कीं काळ मृत्युस तदर्थ चि एक दापी ॥३१॥

समश्लोकीमध्यें रघुपति करीतो नियम कीं
कथावे श्लोकार्थ स्वगुणरचनायुक्त यमकीं ॥
अनुष्टुप्पदातें म्हणुनि विषदच्छंदें निकरीं[५८]
करीतों रामाचे चरण शिरिं ते वदुनि करीं ॥ ३२ ॥

मृता राक्षसाचीचिया वृंदसेना । रडे आफळे अत दु:खा दिसेना ॥
स्त्रिया आणि मंदोदरी शोकरीती । निघोनी पुरींतूनि भारी करीती ॥ ३३ ॥
मेले सुमित्रात्मजसायकानीं । आलिंगुनी त्यांस हि बायकानीं ॥
केला बहू शोक अनेक रीती । उच्च स्वरें रुदन ज्या करीती ॥ ३४ ॥

---

३८ निशाचरचमू=राक्षससेना ३९ मरुत्सुत=वायुपुत्र (मारुती) ४० ऋक्ष=अस्वल. ४१ मेघनीळ=घनश्याम. ४२ तोमर=शस्त्रविशेष. ४३ चतुरंग=रथ, घोडा, पायदळ, व हत्ती हे चार प्रकार जींत आहेत अशी. ४४ सीतापहारकदळीं=रावणाचे सैन्यांत. ४५ सुरेंदरथ=इंद्राचा रथ ४६ परोक्ष=नकळत. ४७ निस्त्रप=निर्लज्ज. ४८ अमोघ=सफळ. ४९ व्यवसाय=उद्योग ५० सायक=बाण ५१ व्यथे=दु:ख पावे ५२ नाकीं=स्वर्गी ५३ वधूनीं=बायकांनीं. ५४ विभुलीला=रामाची लीला. ५५ स्वपितृकृत=शुकाचा बाप व्यास [illegible] केलेले. ५६ बत्तीसवर्णी=ज्यांत बत्तीस अक्षरें आहेत असे अनुष्टुप छंदाचे श्लोक [illegible]वत. ५८ निकर=समुदाय.

रडनि दशमुखाच्या त्या स्त्रिया नाथ! नाथ!
तुजविरहित लंका आणि आम्ही अनाथ ॥
नगरिवरि रुसोनी वीरसेजे निजावें
तरि शरण पुरीनें आजि कोणास जावें ॥ ३५ ॥

होउनी वश तुवां मदनातें । आणिली प्रभुवधू सदनातें ॥
क्षोभली जनकराजकुमारी । जे प्रभाव चि असा तुज मारी ॥ ३६ ॥

लंका स्त्रियां सहित ते विधवा चि केली । गृध्रा न ते तनु हि जे विषयीं भुकेली ॥
सद्वंशभूषण हि तो नरकासि जासी । केला अनर्थ सकळां तनुजानुजासी ॥ ३७ ॥

पुसोनि रामास बिभीषणानें । क्रिया मृताच्या कुळभूषणानें ॥
केल्या स्वशास्त्रें परलोकरीती । तिलोदकें लोक जसे करीती ॥ ३८ ॥

देखे रघूत्तम अशोकवनांत सीते । नेत्रीं स्रवे विरहशोकवना तशी ते ॥
नाहीं च बिंदुभरि ही जल जात कंठीं । कठीतसे दिन अशी जलजातकंठी ॥ ३९ ॥

पावली स्वविरहें तनु कंपा । राम तीवरि करी अनुकंपा ॥
होय तो चि सुखवासर सीते । ध्यान राम सुखवा सरसी ते ॥ ४० ॥

जवळि अनुज सीता राम बैसे विमानीं । कपिपति सह जातो बंधुतें जेंवि मानी ॥
दशमुखअनुजा दे उत्तमश्लोक लंका । पवनज सह यानीं घे तया निष्कलंकीं ॥ ४१ ॥

प्रभु करि चिरजीवी शत्रुच्या सोदरासी ।
रवि शशि गगनीं जों राज्य दे मोदरासी ॥
रघुपति परते हो तें सुरां सौख्य वाटे ।
स्तविति कुसुमवर्षे त्या विमानांत वाटे ॥ ४२ ॥

गोमूत्रपक्व जव भक्षुनि वाट पाहे । येणें तदर्थ भरतावरि हो कृपा हे ॥
कीं स्थंडिलीं वरि निजेक्षण कल्प कठी । तो प्राण ठेउनि असे बसला स्वकठीं ॥ ४३ ॥

श्रवणिं भरत ऐके राम आला अयोध्ये । अभिमुख विभुतें ये येति अमात्य योद्धे ॥
पुरजन गुरुसंगें पादुका मस्तकांतीं । करिति रवि शशीच्या ज्या अहो ध्वस्त कांती ॥ ४४ ॥

वसे नंदिग्रामीं परि हृदय रामीं भरत तो ।
विना त्याचे पाय त्रिभुवनिं न जो लाभ रततो ॥
वसे वेदध्यायी धरि इतर ठायीं न मन तो ।
करी वाद्या गीता सहित पदपद्मा नमन तो ॥ ४५ ॥

---

५९ तनुजानुज=पुत्र व बंधु. ६० शोकवन=शोकोदक (अश्रु) ६१ जलजातकंठी=जलजात म्ह० शंख त्याचे सारखा आहे कंठ जीचा अशी ६२ अनुकंपा=कृपा. ६३ दशमुख अनुज=बिभीषण ६४ निष्कलंक=निष्पाप ६५ सोदर=बंधु ६६ मोदरासी=आनंदरासी ६७ गोमूत्रपक्व=गाईच्या मुतांत शिजविलेले ६८ जव=सातु (धान्य). ६९ [illegible] स्थंडिल=तुसत्या जमीनीवर ७० कल्प=अतिदीर्घकाळ. ७१ अमात्य=प्रधान

कनकमयपताका वृंद चित्र ध्वजांचे ।
रथ चपळ तुरगी स्वर्णसन्नाह[७२] ज्याचे ॥
कवच सहित योद्धे मुख्य मुख्य प्रजांचे ।
प्रभुप्रति मुळ[७३] येती दास पादांबुजांचे ॥ ४६ ॥

चिन्हें महा विभव राजविलास मुद्रा । आणी पुढें भरत त्या करुणासमुद्रा[७४] ॥
प्रेमें पदावरि पडे विसरोनि देहा । आलिंगनें प्रभु भुजा पसरूनि दे हा ॥ ४७ ॥

प्रथम शिरिंहुनी त्या पादुका पादपद्मा[७५] ।
जवळि भरत ठेवी ज्या पदीं नित्य पद्मा ।
मग चरणिं पडे त्या क्षेमें[७६] दे सूल भावा ।
प्रभु नयन जळीं सप्रेम न्हाणी स्वभावा ॥ ४८ ॥

ब्राह्मणासि करि वंदन पादीं । हे मला प्रिय असे उपपादी ॥
लक्ष्मणा क्षितिसुते सह पायीं । लोक वंदिति जयासि उपायीं ॥ ४९ ॥
कोसलाधिपति कोसललोकीं । देखिला बहु दिशा अवलोकीं ॥
नृत्य वस्त्र उडवूनि करिती । पुष्पवृष्टि वरि कौतुकरीती ॥ ५० ॥

धरी भरताकिं पादुका व्यजनें चामरें[७८] वीजिती[७९] ।
बिभीषण कपींद्र जे निज सुखें तयाच्या जिती ॥
सुधाकर धरी मरूत्सुत असीतपत्राकृती ।
प्रवेश करि राघव स्वनगरीं पवित्राकृती ॥ ५१ ॥
धरूनि सधनु भाते दास्य शत्रुघ्न मानी ।
धरि करिं जळझारी रामकांता विमानीं ॥
धरियलि तयिं जैसी अंगदें ऋक्षपाळें ।
विभव नगर लोकां दाविलें लोकपाळें ॥ ५२ ॥

रघुपति अति शोभे पुष्पकीं व्योम वाटे । द्विजगुरु सह नेत्रा उत्पळा सोमें[८०] वाटे ॥
नटति युवति गाती कीर्ति बंदी[८१] विमानीं । प्रियतम जन आत्मा आपुला जेवि मानी ॥ ५३ ॥

रचित कुसुम आले श्रीअयोध्यापुरीतें ।
जन अमृत रसाच्या वाहती त्या पुरीतें ॥
नृप गृहिं गुरुपत्न्या माउल्या त्यांस भावी ।
नमन करि तयांते तोषले बंधु भावीं ॥ ५४ ॥

---

७२ सन्नाह=घोड्याचें सामान ७३ मुळ येती=सामोरे येती. ७४ करुणासमुद्र=कृपासागर ७५ पद्मा=लक्ष्मी ७६ क्षेम=आलिंगन. ७७ एथें "स्वशिरिं" असें असतें तर छंदोभंग न होता ७८ व्यजनचामरें=विंझणे व चवऱ्या ७९ वीजिती=वारा घालिती. ८० सोम=चंद्र. ८१ बंदी=भाट, स्तुतिपाठक.

वंदिलें अवघिया वडिलां हो । धाकुट्या स्वपदवंदनलाहो ॥
राम लक्ष्मण धरातनया ही । घेतलें पुजुनि पूजन यांहीं ॥ ५५ ॥

वसे नंदिग्रामीं जननि हि विना राम नयनीं ।
न पाहे शत्रुघ्ना सह भरत जो भूमिशयनीं ॥
म्हणोनी चौघां ही भिजविति तिघी एक समयीं ।
तनुप्राणन्यायें नयनजळिं माया रसमयी ॥ ५६ ॥

मग उकलि जटा ते राम कोदंडपाणी ॥
कुळगुरु जइं न्हाणी ये चतुः सिंधुपाणी ॥
त्रिदशगुरु सुरेंद्रा ये रिती रामचंद्रा ।
द्विज वडिल हि देती मान वंशाब्धि चंद्रा ॥ ५७ ॥

सुस्नात होउनि असा करुणांबुराशी । अंगीकरी मग विभूषण-अंबुराशी ॥
प्रार्थूनि दे भरत वंदुनि आसनातें । घेतो पद प्रभु दरा कमळासनातें ॥ ५८ ॥

प्रजा स्ववर्णाश्रमधर्म वाटे । लवी जया बाप चि राम वाटे ॥
प्रजा गमे संतति त्या पित्याला । स्पर्शों न दे दुःख कदापि त्याला ॥ ५९ ॥

त्रेतायुगीं कृतयुगापरि काळ जाला । देखूनि राज्य करितां रघुवंशजाला ॥
धर्मज्ञ राम सुख दे सकळां प्रजाला । प्रेमें प्रजा भजति त्या भरताग्रजाला ॥६०॥

वनें नद्या पर्वत सर्व खंडे । द्वीपां समुद्रा सहितें अखंडे ॥
हे कामधेनू सकळा प्रजाला । देखूनि होती भरताग्रजाला ॥ ६१ ॥

बहु भिति यमलोका श्रीवरा रामराया ।
जनन मरण पावे जो न वैसे मराया ॥
वळखति न जराधीव्याधिशोकादिकां या ॥
क्रमभय असुखातें नेणती लोक काया ॥ ६२ ॥

रघुपती निज एकवधूव्रता ॥ शिकवि हो जनाचित्त सध्रुवर्ता ॥
स्फुट करी गृहधर्म समस्त कीं । धरुत लोक कथारस मस्तकीं ॥ ६३ ॥

करि जनककुमारी नित्य निर्व्याज सेवा ॥
तुम्हि हि जनमती हो हा महाराज सेवा ॥
सगुण कुलज सीता भाव जाणे पतीचे ।
मन हरित पतीचें प्रेमसल्लाप तीचे ॥ ६४ ॥

---

८२ लाहो=लाभ ८३ सिंधु=समुद्र ८४ करुणांबुराशी=कृपासागर. ८५ विभूषण अंबुराशी=दागिन्यांचा समुद्र म्ह० पुष्कळ दागिने ८६ आधीव्याधि=मनोव्यथा व शारीरपीडा. ८७ एकवधुव्रत=एकपत्नीव्रत ८८ सध्रुवता=सदृढपणा ८९ निर्व्याज=निष्कपट. ९० भाव=मनोगत ९१ सल्लाप=भाषण

रामवृत्त कथिलें यमकांनीं । गाति त्यांस न पडे यम कानीं ॥
भिन्न अर्थ रचना सम जावी । काव्यरीति चतुरीं समजावी ॥ ६५ ॥
तदुपरि शुक सांगे राम मांडी मखातें[१२] ।
निजपद चि यजी जे हें जगद्धाम खातें ॥
गुरुवचन विधानें लंकनायारि पूजी ।
सुरमय सुर सेवी तद्रिपूचा रिपू जी ॥ ६६ ॥
दिशा पूर्व होत्यां[१३] दिली दक्षिणा हो । दिली ब्रह्मयातें दिशा दक्षिणा हो ॥
प्रतीची स्वअध्वर्यु देतो जयाला । उदीची दिशा देत उद्गातयाला ॥ ६७ ॥
आचार्य जो मध्यम भू तयाला । देतां महा उत्सव दातयाला ॥
हे निस्पृहो ब्राह्मण सर्व लाहे । गोडी म्हणे राममतीस लाहे ॥ ६८ ॥
तनुस अंबर[१४]मात्र चि भूषणें । इतर सर्व दिलें रघुभूषणें ॥
करि असें रघुनंदन दान कीं । उभि समंगळसूत्र चि जानकी ॥ ६९ ॥
घेऊनियां ब्राह्मण सर्व लाहो । ते बोलती ब्राह्मणवत्सलां हो ॥
जो ब्राह्मणांचा स्वयमेव देव । प्रभूसि त्या बोलति भूमिदेव[१५] ॥ ७० ॥
न जी दीधलें काय आम्हांसि देवा । दिले फार याहूनि ही देवदेवा ॥
प्रकाशोनि चित्तीं अविद्यातमातें । हरी देखतों त्या चि सर्वोत्तमातें ॥ ७१ ॥
सर्वज्ञता दशशतानन[१६] ही न मोजी । ब्राह्मण्य देव रघुराज तुतें नमो जी ॥
तूं पुण्यमूर्त्ति अजि मस्तकरत्न[१७] देवा । जो दे स्वपाद रज हंसजनां[१८] सदैवा ॥ ७२ ॥
जयाचा जगीं कीर्तिसल्लाप हा तो । स्वयें गूढ रातीं जना हो पहातो ॥
वदे एक कोणी स्वभार्येस वाचा । तिनें आयके श्रोत्र तो राघवाचा ॥ ७३ ॥
स्वयें जासि दुष्टे पराच्या गृहातें । नव्हें राम मी कीं धरूं तूज हातें ॥
दशग्रीव लावूनि ने हात सीते । वधूलुब्ध[१९] अंगीकरी हा तशी ते ॥ ७४ ॥
दुराराध्य जे अज्ञ ते लोक रीती । न जाणोनि वार्ता अशा ही करीती ॥
म्हणूनी सितेतें वियोगश्रमातें । करी जाय ते वाल्मिकी आश्रमातें ॥ ७५ ॥
ऋषिजवळि असे ते गर्भिणी रामराणी ।
वन विभव हि मानी डोहळ्याची शिराणी[१००] ॥
कुश लव सुत दोघे होति ते दिव्य काळीं ।
मुनि करि विधिकर्में उत्सवाच्या सुकाळीं ॥ ७६ ॥

---

१२ मख=यज्ञ. १३ होता, ब्रह्मा, अध्वर्यु, व उद्गाता असे चार ऋत्विज यज्ञांत असतात १४ अंबर=वस्त्र. १५ भूमिदेव=ब्राह्मण. १६ दशशतानन=शेष. १७ मस्तकरत्न=शिरोभूषण. १८ हंसजन=परमहंस. म्ह० सन्यासीजन. १९ वधूलुब्ध=स्त्रीलंपट. १०० शिराणी=आवड.

ऐसे च लक्ष्मणकुमार हि वंशकेतू । तो एक अंगद दुजा सुत चंद्र केतु ॥
तक्षाख्य पुष्कळ अशी भरतात्मजाचीं । नामें कुळें बहुत विस्तरणार ज्याचीं ॥७७॥
शत्रुघ्नपुत्री स्वसमाजसाची । नामे सुबाहू श्रुतसेन साचीं ॥
शत्रुघ्न मारी असुरास आणी । तद्वित्त रामार्पण हेतु आणी ॥ ७८ ॥
शत्रुघ्न नाम गत दाखवि अर्थ साचा । कीं पुत्र जो लवण त्या मधुराक्षसाचा ॥
मारूनि तो मधुवनीं मधुरा सॄजी कीं । जीमाजि कृष्णतनु राम खळास जिंकी ॥७९॥
पतीची पदें काननीं रामरामा । स्मरोनी ह्मणे आननीं रामरामा ॥
मुनीच्या करीं पुत्र आणूनि घाली । क्षितींत स्वयें माय पोटीं निघाली ॥ ८० ॥
आयकोनि जरि शोक निवारी । चालिले चि नयनांतुनि वारी ॥
राखिले गुण तिचे हृदयातें । नावरे चि अजि त्या सदयातें ॥ ८१ ॥
सीता हेतु क्लेश आधींत रामा । एवं लोकीं दुःखमूळाच रामा ॥
थोरां थोरा कष्ट यांच्या चि सगें । दावी ऐसें राम सीताप्रसंगें ॥ ८२ ॥
जया ही वरी अग्निहोत्रादि याजी । करी ब्रह्मचर्य स्वयें तो क्रिया जी ॥
अखडाग्नितें राम हस्तीं अ होमी । करी ख्याति कीं कर्म कर्त्ता अहो मी ॥८३॥
पदयुग मृदु जें कां पल्लवातुल्य वाटे । तदपि तुडवि कांटे दंडकारण्य-वाटे ॥
स्मरति चरित त्याला ठेउनी तो चि ठेवा । गमन करि मनीं ते लोक हे पाय ठेवा॥ ८४॥
आश्चर्य कीं अधिक साम्य जया असेना । त्याला सहाय समरीं कपिऋक्षसेना ॥
बांधी समुद्र वधि रात्रिचरादिकां ही । हे कीर्ति तारक हि त्यास न थोर कांहीं ॥८५॥
गाती ऋषी नृपपतीप्रति या यशातें । पापघ्न शुभ्र करि दिग्गज तो दिशातें ॥
तो राम मी शरण तच्चरणांबुजातें । सभाविती सुरनरेंद्र किरीट ज्यातें ॥ ८६ ॥

रघुपति-चरणाचा दर्शन स्पर्श लाहो ।
निघति परम योगी भाग्य तें कोशला हो ॥
उठत बसत चिंती राघवस्पर्श लाहो ।
जित चि भव जयाचा राघवीं नाशला हो ॥ ८७ ॥
पुरुष रघुपतीच्या आयके जो कथा रे ।
भवभय नत याचे हे घरीं एक थारे ॥
तुटति सकळ कर्मे होय दुःखाग्नि हिंसा ।
परम करुण मूर्ती होय टाकूनि हिंसा ॥ ८८ ॥

१ केतु=ध्वज २ एथें दुर्बोध आहे. ३ "श्रुतसेन" याबद्दल "बहुश्रुत" असें नांव रघुवंशकाव्यात आढळतें. ४ सृजी=निर्माण करी. ५ कृष्णतनु=मेघश्याम. ६ रामरामा-चो=रामाची स्त्री सीता. ७ मायपोटीं=आईच्या उदरात. ८ वारी=पाणी, अश्रु ९ रामा=स्त्रिया १० एथें कांहीं अपपाठ असावासें वाटतें. ११ रात्रिचर=राक्षस. १२ हिंसा=धडसा १३ हिंसा=जीव हानि.

नृप पुसत शुकातें वर्तला केंवि राम ।
स्वजन अनुज लोकीं सर्व लोकाभिराम ॥
वद सकळ जनीं ही केंवि तो पूर्णकाम ।
प्रियतर वरिला जी हा करी पूर्ण काम ॥ ८९ ॥

सिंहासनीं बसलिया वरि ही जयातें । धाडी स्वबंधुवश सर्व हि तेज यातें ॥
भृत्यांसह प्रभु फिरे नगरीस पाहे । श्रीमूर्ति दाखवि जनास करी कृपा हे ॥ ९० ॥

गजमदसलिलांचे कीं सडे चंदनाचे ।
सुरवरमुकुटांचे शोंबसे चंद नाचे ॥
नगर विविध दावी भाव हे मानसाचे ।
रघुपतिपदपद्मीं लाधले मान साचे ॥ ९१ ॥

गोपुरें उपरमाडिया सभा । हेमकुंभ वरि देति यास भा ॥
मंदिरीं सुरगृहीं ध्वजांचिया । साउल्या निबिड नित्य ज्यांचिया ॥ ९२ ॥
प्रतिद्वारिंरंभा दिर्पूगी फळांचे । तरू घोंस केले फुलांपोफळांचे ॥
प्रभा तोरणांमाजि कीं आरशांची । महादीप्ति हेमांबराफारशांची ॥ ९३ ॥
स्थळीं स्थळीं आणुनि पूजनातें । ते पूजिती लोक निरंजनातें ॥
ते बोलती पाळि अजी क्षितीतें । पूर्वी तुवां उद्धरिलें चि तीतें ॥ ९४ ॥

देखोनि काळें बहु राघवास त्या । त्या पाहती टाकुनियां गृहें सत्या ॥
ज्या सुंदरी वेंघति मंदिरोपरी । पुष्पें बहू वर्षति हो परोपरी ॥ ९५ ॥
ये त्यावरी निज गृहाप्रति जेंवि राजे । कीं देखिलें सकळ पूर्ण जयांत राजे ॥
वस्तू अमूल्य गणना न धना कदापी । जें कां कुबेरवरुणेंद्रगृहास दापी ॥ ९६ ॥

स्वयभा वैडूर्यी करुनि रचिले स्तंभ बरवे ।
तया च्यारी पंक्ती क्षितिवरि बरी पाच मिरवे ॥
प्रवाळांची द्वारें स्फटिकमय भिंती विरचिता ।
गृहाच्या रामाच्या सकळ रचना दिव्य उचिता ॥ ९७ ॥

शृंगारिल्या चित्रविचित्र हारीं । मुक्तादिकीं रात्रितमोपहारीं ॥
सर्वोपभोगार्थ समृद्धिकारी । सर्वे गृहीं त्या प्रभु निर्विकारी ॥ ९८ ॥
सुगंधीं सदा धूपदीपीं विराजे । जन स्वामि त्याच्या गृहीं जेंवि राजे ॥
स्त्रिया जेंवि देवांगनीं दासदासी । अशा मंदिरीं चित्त रामीं उदासी ॥ ९९ ॥

---

१४ अभिराम=सुंदर १५ सलिल=उदक. १६ भा=कांति १७ रंभा=केळ. १८ पूग-फळ=पोफळ, सुपारी. १९ वैडुर्य=रत्नविशेष. २० देवांगना=अप्सरा.

प्रभु करि सह सीता त्या गृहीं लोकलीला
श्रवणपठणमात्रें नाशिती ज्या कलीलें[21] ॥
स्वसुखरतविरक्तां सेव्य जो राम होतो
स्मरत दुरत काळीं श्रीघनश्याम हो तो ॥ १०० ॥
स्वधर्मानुकूळ प्रभू भोग सारे । यथाकाळ भोगूनि वर्णी असा रे ॥
बहू वर्षवृंदें[22] जरी राहिलाहो । दिला वामनाला पदध्यानलाहो ॥ १०१ ॥
॥ इति श्रीसंकलित रामायण संपूर्ण ॥

---

## आनंदतनयकृत

## पूतना-वध.*

राया सादर बादरायणि[1] म्हणे एकें जगत्पालकें ॥
केलें अद्भुत बाळकें रिपुकुळां भंगोनि भृंगालकें[2] ॥
जेव्हां दुर्धर पूतना निर्वटिली[3] कृष्णासि तैं बारसें
लोकाश्चर्य अनंत वीर्य मिरवे गांभीर्य नाना रसें ॥ १ ॥
सांग तो मज सविस्तर गाथा[4] । पुण्य पावन करी मुनिनाथा
ऐक गा श्रवणभाग्यनिधाना । श्रीहरी-कृत चरित्र-विधाना ॥ २ ॥
जन्मोनि कृष्ण मथुरेंत जगीं लपाला । तेणें भयें चकितबुद्धि तया नृपाला ॥
भासे दिठीं सजन कानन कृष्णरूपें । मानी जसा भ्रमित शुक्तिदलासि[5] रूपें[6] ॥ ३ ॥

---

[21] कलि=कलियुग संबधीं पाप. [22] वर्षवृंदें=वर्षसमूह.

* आनंदतनयकृत कद्रुकाख्यानाच्या आरंभीं आम्हीं या कवीचें थोडें वृत्त देऊन तो अरणी एथें राहणारा होता असें लिहिलें आहे. आज जें प्रकरण छापण्यास आरंभ केला आहे त्याच्या अखेरीस त्यानें आपणास "आरणीचा शिपायी" म्हणजे अरणी येथील शूर असें म्हटल्याचें वाचकांस आढळून येईल. हा कवि एकनाथाचा समकालीन असावा असें अनुमान आम्ही मागेंच कळविलें आहे. माधवचंद्रोबाच्या सर्वसंग्रहांत व आमच्या काव्येतिहास-संग्रहांत मिळून आजपर्यंत या कवीचीं श्लोकबद्ध प्रकरणें अकरा छापून प्रसिद्ध झालीं आहेत त्याची ग्रंथसंख्या येणेंप्रमाणें—

१ सीतास्वयंवर—७१, २ सेतुबंध—४१, ३ सुदामचरित्र—४१, ४ गणिका उद्धार—१३, ५ शबरीआख्यान—२१, ६ उमारमासंवाद—१३, ७ मार्कंडेयाख्यान—६०, ८ ताटकावध—५०, ९ कद्रुकाख्यान—३२, १० बालचरित्र—१५, ११ पूतनावध—४८, एकूण ४१३ चारशें तेरा. या वरून आजपर्यंत या कवीचा चारशांवर ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला असें होतें.

१ बादरायणि=बादरायण म्हणजे व्यास त्याचा पुत्र शुकाचार्य. २ भृंगालक=भुंग्यासारखे काळेकुळकुळीत आहेत केंस ज्याचे असा ३ निर्वटिली=मारिली. ४ गाथा=हकीकत. ५ शुक्ति=शिंपला. ६ रूप्य=चांदी.

सोऽयं चेन्निजलिंगहायमहह स्यादीसमेतांतर-
स्तुष्ट्यै स्यात्कथमीश्वरस्य परमामोदोद्गमोल्लासिनः ॥ २३७ ॥
त्यजाक्षवशतां तात या महानर्थकारिणी ॥
यया विनष्टसर्वस्वा युधिष्ठिरनलादयः ॥ २३८ ॥
जगत्यामत्र जनता मता का मरणोन्मुखी ॥
प्रश्नवागियमेवैतदुत्तराय प्रजायते ॥ २३९ ॥
वृथैव रे कामरतोऽसि शत्रुं दुरासदं तं भगवानवादीत् ॥
जनो महाराष्ट्रगतोऽपि न त्वां किमाक्षिपत्येव कृपार्द्रचित्तः ॥ २४० ॥
रागो न्यक्क्रियतामये द्विजनिना दोपस्थितेर्ज्ञापकः
पश्यास्य क्षणिकप्रसंगवशतः सन्मार्गवर्त्यप्यसौ ॥
आदित्यो मधुपौघचुंबितमहापद्मिन्यभीष्टायय-
त्कोशेषु स्वयमर्पयन् श्रियमयं न प्रेक्ष्यतां गाहते ॥ २४१ ॥

स्वनीरीक्षणयोग्यं अतर बुद्धिर्यस्य त पुरुष सृष्ट्वा तुष्टोऽभवत् तथा च भागवतं "सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयात्मशक्त्या वृक्षान् सरीसृपपशून् खगमत्स्यदंशान् तैस्तैरतुष्टहृदयः पुरुष विधाय आत्मावलोकधिषण मुदमापदेव इति" यदि स पुरुषः स्वीय उचितांतरस्वरूप निजलिंग हित्वा ईसमेतातरः स्यात् इः कामः ईः श्रीस्ताभ्या समेतातर' तर्हि परमामोदोद्गमोल्लासिन' आनदरूपस्य तस्य तुष्ट्यै किं स्यात् यदर्थमनेन उत्पादितस्तदकर्ताऽयमिति शब्दतोऽपि पुरुषो हि उचितांतरः उना उकारेण चित अंतर मध्य यस्य पुरुषइत्यत्र मध्यमवर्णे रेफे उकारः सगतोऽस्ति तदुचितातरत्व विहाय ईकारेण समेतः स्याच्चेत् पुरुष इत्यस्य पुरीषं इति जायते यच्च पुरीष तत्परमामोदैरुत्कृष्टसुगंधैः समाहितस्य तुष्ट्यै कथं स्यात् स तन्मनसा न स्मरति न च पश्यति न शृणोतीति ॥ २३७ ॥

इंद्रियवशो माभूरित्याह । त्यजेति । अक्षाणि इंद्रियाणि अक्षाः पाशाश्च यया अक्षवशतया द्यूत कृत्वा सर्वस्व हारितवंत इति ॥ २३८ ॥

जगत्यामिति का जनता मरणोन्मुखी मता उत्तर कामरणोन्मुखी कामरणः वेश्याभिः सुरतोत्सव' जनता जनसमूह' ॥ २३९ ॥

वृथैवेति 'जहि शत्रु महाबाहो कामरूपं दुरासदमिति गीतासु आक्षिपति निषेधति वृथैव रे का मरतोसि महाराष्ट्रभाषानुकरणमिद ॥ २४० ॥

राग इति द्विजनिना त्रैवर्ण्येन राग' कामः तिरस्क्रियतां यस्माद्दोपस्थितेर्ज्ञापकः सः तदेवाह यस्य क्षण प्रसगे सन्मार्गवर्ती त्रय्यात्मा वैदिकोऽपि मद्यपानां गणैश्चुंबितामपि पद्मिनीमुत्तमवेश्यां वशयितु तत्कोशगृहे स्वसपत्तीरर्पयेत् जनैरस्य पापिनः मुखमपि नावलोक्यते तादृग्भवति यथा सन्मार्गः आकाशस्तद्वर्ती त्रय्यात्मा सूर्यः

कामः क्रोधश्च लोभस्त्रयमपि परमं कष्टमाहुस्तथापि
द्वावाद्यौ तत्र सौम्यौ कथमपि हि परं त्वंतजोऽत्यंतचंडः ॥
यस्यातां पंगुलौ द्वौ रतिरसविरतावादिमोऽन्यो विरोधि-
ध्वंसे त्वेतस्य लाभादुपरि पदचतुष्कप्रतिष्ठा हि दृष्टा ॥ २४२ ॥
देहदारकदारादौ यावन्मोहाकुलः पुमान् ॥
तावन्न वित्तविषयतर्कसंपर्कवर्जितः ॥ २४३ ॥
नरकोपस्थितिं नाम नान्यां मन्यामहे वयम् ॥
या चैषा दृश्यतेऽमुष्मिन् नरे कोपस्य रे स्थितिः ॥ २४४ ॥
बिंदुमात्रेण यो हि स्यादंतरे समदः पुमान् ॥
स मंद एवेत्येतस्मिन्न कस्याप्यस्ति संशयः ॥ २४५ ॥
मत्सरः समुपादेयो यागेऽभ्युदयकारणात् ॥
पणनात्तु पुनर्मृत्युहेतुर्ब्राह्मण्यहानिकृत् ॥ २४६ ॥
अनेकधातुश्रेष्ठं यत् कल्याणं संगृहाण रे ॥
कल्याणसंग्रहे तात नैव दुर्गतिभाङ्नरः ॥ २४७ ॥

मधुपाः भृंगाः पद्मिनी कमलिनी कोशः कोरकः श्रीः शोभा अप्रेक्ष्यतां 'नेक्षेदुद्यन्तमादित्यमिति' स्मृते. एतत्केनेति चेत् क्षण रागप्रसंगेण स च द्विजकृताः निनादाः यत्र तस्या. उषःस्थिते. प्रातःकालावस्थितेर्ज्ञापकः ॥ २४१ ॥

काम इति कामः सुरतावसाने पंगुलः. क्रोधः प्रतिरोधिनाशे पंगुलः लोभस्तु तत्तल्लाभेऽपि पंगुलो न भवति किं तु पदचतुष्टयमग्रत एव यथा लाभः लीभः लूभः लेभः लोभः लाभोपर्यंतस्य मात्रेष्यपि बोध्यं ॥ २४२ ॥

देहदारकेति दारका अपत्यानि मोहेनाकुलः मायायाः संपत्तेर्विषये ये ऊहास्तर्कास्तैराकुलश्च ॥ २४३ ॥

नरकोपेति नरे मनुजे या कोपस्थितिः अवस्थानं सैव नरकोपस्थितिः ॥ २४४ ॥

बिंदुमात्रेणेति अंतरे मनसि बिंदुमात्रेण समदः मदसहितः स मंद एव अंतरे मध्यमवर्णे बिंदुना युक्तत्वात् ॥ २४५ ॥

मत्सरइति यागादौ मत्सरः उपादेयो भवति अमुना पशुनेष्टं मया ज्योतिष्टोमेनेष्टेति पापकृन्न भवति पणनं व्यवहारस्तं प्राप्य कृतश्चेदनिष्टे हेतुः यथा मत्सरः सोमवल्लीयागे उपादेयस्तस्य पणनं विक्रयः कृतश्चेदनिष्टकः 'सोमविक्रेता हतव्यः बहिष्कार्योवेति' श्रौतसूत्रे प्रसिद्धं ॥ २४६ ॥

अथोपादेयमाह अनेकेति अनेकप्रकारेण यच्छ्रेष्ठं कल्याणं साधु कर्म तत्संगृहाण 'न हि कल्याणकृत् कश्चिद्दुर्गतिं तात गच्छतीति' गीतोक्तेः अनेकेषु धातुषु श्रेष्ठं कल्याणं स्वर्णं दुर्गतिं दारिद्र्यं निरयं च ॥ २४७ ॥

यस्तु नित्यं शमापन्नः सर्वत्रोत्सृज्य लोलताम् ।
स नैव सुखमापन्न इति कः पंडितो वदेत् ॥ २४८ ॥
शमस्य साधनं तात कर्तुं यदि न शक्यते ॥
शमो भविष्यति शनैः शमलं त्वमलं कुरु ॥ २४९ ॥
शमीक एवं परिपृच्छ्यमाने प्रश्नोऽयमेवोत्तरतां बिभर्ति ॥
परीक्षिता यः परिहेलितोऽपि निर्भर्त्सयामास सुतं शपंतम् ॥ २५० ॥
नूनमविद्याविजयाजनितो देहोऽहमिति मदो भूयान् ॥
तस्यैक एव सद्भिः प्रतिकूलो दृढतमो दमो दृष्टः ॥ २५१ ॥
यः सर्वदा संश्रितरामपादो दांतं तमेनं सहजं ब्रवीमि ॥
यः केवलं स्याद्धठनिरुद्धशुक्रः स क्रांत एवेह भवेन्न दांतः ॥ २५२ ॥
स्याच्चेदुपरमः सौम्य भवतश्चित्तमंदिरे ॥
स साक्षाच्छ्रीनिवासोऽयमिति निश्चिनुमो वयम् ॥ २५३ ॥
येषां सदासमाधानो दृश्यते ह्यंतराशयः ॥
इंदिराधिपतिस्तत्र वसतीति प्रतीयते ॥ २५४ ॥

सामान्यत उक्तं विशेषेणाह शमइति शम आपन्नः शमापन्नः श आपन्नश्च श सुखं ॥ २४८ ॥

शमस्येति अरे त्वं शमलं पापं अलं कुरु मा कार्षीः तेन शनैः शनैः शमः स्यात् शमलं अल लकाररहितं कृतं चेत् शमइति भवति ॥ २४९ ॥

शमीक इति शमः शमयुक्तः कः इति प्रश्ने इदमेवोत्तरं शमीक एतन्नामा मुनिः यस्य कृतसमाधेः कंठे परीक्षिता मृतसर्पकलेवरं प्रतिमुक्तं निर्भर्त्सयामास तपोव्ययो नास्माकं धर्मः किं तु शांतिरेवेति त्वया मूढेन तस्मै शापो दत्तस्तदसांप्रतमिति ॥२५०॥

दममाह नूनमिति देहोहमिति मदः अविद्यैव विजया मदद्रव्यं भांग इति लोके तज्जनितः तस्य प्रतिकूलः दम एव बाह्येंद्रियनिग्रहः स च परंपरया ज्ञानद्वारा तन्नाशको भवति दमइति मदस्य प्रतिकूल एवेति ॥ २५१ ॥

य इति 'हरेः प्रसादो येन स्यात्तादृशं साधनं कुरु' तच्च रामपदसेवनं तत्र कृते दमः सहजः संश्रितरामपादो हि दांत एव तदकृत्वा केवलं हठेन शुक्रनिरोधः कृतः दमो न तेन स क्रांत एव स्यात् न दांतः शुक्र इति पाठे क्रांतः सर्वैराक्रांतः दांतः दकारांतः क्रांतः ककारांतः क्रकारांतश्च ॥ २५२ ॥

स्याच्चेदिति उपरमः इंद्रियाणां भगवद्विषयव्यतिरिक्तविषयेषु निर्वेदः उप समीपे रमा यस्य सः इति च ॥ २५३ ॥

येषामिति सदा समाधानेन सहितः दासी चासौ मा च दासमा तस्या आधानं स्थितिस्तत्सहितः हरेरावासं विना श्रियआवासो न संभवतीति ॥ २५४ ॥

यस्यां तु दृश्यते श्रद्धा बुद्धिः सा सत्त्वभाविता ॥
अदूरादेव बोधाख्यं तनयं जनयिष्यति ॥ २५५ ॥
आढ्योऽयमित्थं क्षितिपोऽयमित्थं किं भूयसा श्रीपतिरेव इत्थम् ॥
अर्हंति वक्तुं विबुधा भवंतं सर्वे यदि त्वं बहुलक्षमोऽसि ॥ २५६ ॥
यो वर्तते शुचित्वेन स वैश्वानर उच्यते ॥
यो वर्ततेऽशुचित्वेन स वै श्वा नर उच्यते ॥ २५७ ॥
नूनं ब्रह्मभवः कृतोपनयनोऽनड्वाहमारूढवां-
स्तस्याप्यस्य महेशितुः शिरसि रे दोषाकरः संगतः ॥
कार्याकार्यतयोपदिष्टमिह यच्छ्रीवेदराजेन त-
त्रोल्लंघेत जनः कथं कथमपि प्राज्ञः समर्थोऽपि सन् ॥ २५८ ॥
यथा कथं चिद्वर्णस्य ग्रहणाद्वर्णसंग्रहः ॥
विनाऽर्थलाभाद्वेदानां सामर्थ्यं तु न संभवेत् ॥ २५९ ॥
परमार्थस्य निदानं परमार्थं श्रुतिगतं समुत्सृज्य ॥
अर्थकृते प्रतिसदनं श्रुतिमातरमहह नर्तयंत्येते ॥ २६० ॥
वेदानधीत्य यो व्यर्थः स स एवेति तर्कये ॥
तत्रैव यः समर्थः स स एवेति न को वदेत् ॥ २६१ ॥

यस्यामिति श्रद्धा विश्वासः दोहल च तच्च सत्त्व विना न संभवति तस्मात्सा सत्त्वभाविता सत्त्व गर्भः सत्त्वगुणश्च ॥ २५५ ॥

आढ्योयमिति बहुला क्षमा यस्य स क्षांतिमानित्यर्थः बहुलक्षप्रमाणा धन मपनिर्यस्येत्याढ्यपक्षे ननु किं धनसपत्त्या यदि सत्ता नास्ति बहुला क्षमा भूमिर्यस्येति नृपपक्षे ननु किमल्पीयस्या सत्तया बहु लक्ष चित्तावस्थितिर्यस्याः सा तादृशी मा रमा यस्मिन् स इति श्रीपतिपक्षे ॥ २५६ ॥

शौचमाह शुचि शुद्धः अग्निश्च वैश्वानरः अग्निर्यः अशुचिः स नरः श्वा शुनकः वै निश्चयात् ॥ २५७ ॥

वेदोक्तमेव कुर्यादित्याह ब्रह्मभवः ब्राह्मणः शिवश्च स हि ब्रह्मणो ललाटादुत्पन्न इति प्रसिद्धं कृत उपनयन व्रतबध. तृतीयनेत्रं दोषाकरश्चंद्रो दोषसमूहश्च ॥ २५८ ॥

यथा कथंचिदिति वर्णानां वेदाक्षराणां गुरुमुखात् सम्यग्ग्रहणेन वर्णसग्रहः दौर्ब्राह्मण्य गत भविष्यति पर यद्वेदपठनेन सामर्थ्यं तदर्थलाभ विना न स्यात् वर्णा अक्षराणि ब्राह्मणादयश्च सामर्थ्यं शक्तिः सप्राप्त्यर्थत्व च ' योऽर्थज्ञ इत् सकलं भद्रमश्नुतइति ' श्रुते. ॥ २५९ ॥

परमार्थेति परमार्थो मोक्षः परम. निर्बाधः योऽर्थ. वेदार्थः अर्थकृते धनार्थं तां श्रुतिमातरमहह प्रतिगृह नर्तयाति मूढा. ॥ २६० ॥

वेदार्थज्ञो हि नाकस्य पृष्ठमारोक्ष्यतीति चेत् ॥
पृच्छ्यते पश्य तत्रासौ प्रश्न एवोत्तरायते ॥ २६२ ॥
विनाशास्त्रं तु यद्धर्मं विनाशायैव केवलम् ॥
अमाधवस्तु यः पंथाः स महातामसः स्मृतः ॥ २६३ ॥
धिगस्तु काव्यव्यासंगं मूलमासुरसंपदाम् ॥
अतो भागवतं सत्त्वापादकं शीलयामहे ॥ २६४ ॥
काव्येनासुरसंपत्तिर्नाटके प्राकृतक्रमः ॥
न रामताऽलंकारित्वे वरा भागवतस्थितिः ॥ २६५ ॥
बालकानां यथा माता तथा गीता हितावहा ॥
अमेध्यहारिणी सद्यः स्वस्थयाऽमृतदायिनी ॥ २६६ ॥
ब्रह्मचर्यनिरतास्तपस्विनो दूरमुज्झितगृहा विवेकिनाः ॥
यद्वदंति सुरतार्थिनोऽपि तद्विस्मयाय विपुलाय जायते ॥ २६७ ॥

वेदानधीत्येति व्यर्थ· विगतोऽज्ञातोऽर्थो येन स व्यर्थ एव अकृतार्थ एवेत्यर्थः यः समर्थः संप्राप्तोऽर्थो यस्य स सएवेत्यर्थः ॥ २६१ ॥

वेदार्थज्ञ इति वेदार्थज्ञः ना नर· कस्य पृष्ठ आरोक्ष्यतीति पृष्टे नाकस्य पृष्ठ मित्युत्तरं नाकः स्वर्गः ॥ २६२ ॥

विना शास्त्रेति अशास्त्रीयं यद्धर्मं तद्विनाशस्य अस्त्रमेव ' तस्माच्छास्त्रं प्रमाण ते कार्याकार्यव्यवस्थिताविति ' गीतोक्तेः माधवेन रहिता य· पथा सः अमाधव. अमा अमावास्या तस्याः धव. पतिः अमा तमस्विनी तत्पतिरर्थान्महातामस ॥ २६३ ॥

धिगस्त्विति काव्य कादबर्यादि तच्च आसुरसंपद. रजस्तमोमय्याः मूल शृंगारादिपरत्वात्काव्यः शुक्र. तन्मूलकैवासुरसपत् भागवत तु सत्त्वापादक सत्त्व सत्गुवणः साधुत्व देवत्व च शुद्धसत्त्वस्य भगवतस्तत्र वर्ण्यमानत्वात् ॥ २६४ ॥

काव्येनेति काव्येन कादंबर्यादिना शुक्रेण च आसुरसपत्तिः ' ईश्वरोऽहमहभोगीत्यादि ' रूपा नाटके प्राकृतक्रमः बालभाषाप्रचारः प्राकृतजनप्रचारश्च अलकारशास्त्राभ्यासेन अलंकारित्वे सपादिते रामत्व नास्ति लकाया अरि· शत्रु· तत्त्वे सति रामत्वं अतः भागवते स्थितिः निष्ठा वरा या हि भागवतस्थितिः सा भगवतएव स्थितिः भगवतः इय भागवती सा चासौ स्थितिश्चेति विग्रहे स्त्रिया· पुवदितिपुवद्भावः सा च साधारणी न किं तु भागवतः महाभाग्यवतस्तत्र स्थितिः न त्वल्पभाग्यस्य ॥ २६५ ॥

बालकानामिति बालकाः शिशवः अज्ञाश्च या माता अमेध्यं मूत्रपुरीषादि हरति स्वय निष्कासयति स्वस्य हृदये तत्स्थस्तने भव यत् अमृत दुग्ध तत्प्राशयित्री अमेध्य दोषजालं स्वस्यात्मनः हरेर्यत् हृद्यं प्रियं अमृत मोक्ष भक्ति वा ददाति ॥ २६६ ॥

संपूर्णप्राणभृत्त्राणाविश्राणनपरायणः ॥
यथार्थं राजतेऽत्यर्थं सकलत्रः किलाश्रमः ॥ १६८ ॥
यो नित्यं मार्गणंबिभ्रत्सवै देही वरो मतः ॥
यो नित्यं मार्गणंबिभ्रत्स वैदेहीवरो मतः ॥ २६९ ॥
विप्राः शांताश्च दांताः सकरुणमनसः सात्विकाः सत्यशीलाः
सप्रज्ञाश्चेति दृष्ट्वा निपुणतरमथाध्याश्रमं श्रीमतैषाम् ॥
संन्यासः स्थापितोऽभूत्स यदि विधिवशाल्लभ्यते येन पुंसा
युक्ताचारं विचारं स च रचयति चेद्धीयते किं स्वलाभः ॥ २७० ॥
सूत्रं शिखामप्यविहाय दंभान्नरश्चतुर्थाश्रममाश्रितोऽपि ॥
विधाय साहाय्यकमस्य कृष्णः क्षिप्रं सुभद्रावगमं तनोति ॥ २७१ ॥
कर्ममार्गे यथा शूद्रा एकगोत्रावलंबिनः ॥
मोक्षमार्गेऽपि ते तद्वदेकगोत्रावलंबिनः ॥ २७२ ॥
आदौ यत्परिशील्यते दृढतरं तच्चाग्रतो धावती-
त्यर्थो डिंडिमकर्णशृंगनिनदैर्लोकेषु संभावितः ॥
तस्माद्वाञ्छसि सत्पदं यदि सखे मद्वाक्यमंगीकुरु
प्रेम्णा संश्रय सत्पदं भवमहाकूपारपारप्रदम् ॥ २७३ ॥
दोषोद्रेकभवे प्रभूततमसि व्यासे द्विजानां व्रजो

नैष्ठिक ब्रह्मचारिणं वर्णयति गृह गेह भार्या च सुरत मथन सुरता देवत्व च ॥ २६७ ॥

गृहस्थं वर्णयति विश्राणन दान कलत्रेण सहित सकलान् त्रायत इतिच ॥ २६८ ॥

योनित्यामिति मार्गण याचक अतिथिं बाण च स देही वरः श्रेष्ठ. स वैदेही सीता तस्या वरः राम बिभर्ति पोषयति धारयति च ॥ २६९ ॥

सन्यासं वर्णयति श्रीमता भगवता केनचिदाढ्येन च विप्रा योग्याइति कृत्वा अध्याश्रम गृहेषु आश्रमेषु च सन्यासः चतुर्थाश्रम सम्यक्न्यासश्च द्रव्यनिधिः स्थापित. क्षत्रवैश्ययोस्तयोरनधिकारात् स यस्य विधिवशाल्लब्ध. लब्धेआचारविचार च करोति तस्य द्रव्यलाभः स्वरूपलाभश्च कदापि न हीयते सम्यगाचारविचाराभावे तु निधेर्वीतत्वात् सन्यासस्य भ्रष्टत्वात् स्वलाभाद्धीनो भवतीति ॥ २७० ॥

सन्यास प्रस्तौति सन्यासवेषमात्रमपि फलद किं पुनः सत्यतया यथाऽर्जुनेन दंभसन्यासे क्रियमाणेऽपि भगवता साहाय्य कृत्वा सुभद्रावाप्तिः कारिता अन्यत्र नरः मानव सुभद्रं कल्याण तदवगमश्च ॥ २७१ ॥

कर्ममार्गइति एक काश्यपमेव गोत्र येषां तथा एक गोत्र भगवन्नामैव साधन नान्यत् ॥ २७२ ॥

उक्तज्ञानभक्तिवैराग्याणां सत्सगएव मूलकारणमिति तं प्रस्तौति आदाविति स-

मूढो नष्टसुदृक् समीपगमपि स्थाणुं परं स्वाश्रयम् ॥
द्रष्टुं न क्षमते चरंति परितो यञ्चाश्मघोषद्विषो
हंसस्तत्र यदृच्छया समुदितश्चेत्स्थास्समृद्धं हितम् ॥ २७४ ॥
शुचिमानसावगम इह हंससमागमवशाद्द्विजेंद्राणाम्
तदमृतनशा शांताः संतो विहरंति कुवलयेऽथ सुखम् ॥ २७५ ॥
स्वर्गांधादुपभोगेषु विरक्तस्य वने सतः ॥
नरस्य रामावाप्तिस्तु नूनं हंससमागमात् ॥ २७६ ॥
सृष्टिं वर्णमयीं सलेखकपतिः पश्यन्नदो दृष्ट्वा-
न्नत्रस्थं सदपीदमक्षरमसंवेशेन बाह्ये स्थितम् ॥
वर्णास्तेनविना भवेयुरहहानर्थाकुलाः केवलं
तस्माद्धंसपदं कृपावरवशस्तल्लब्धये निर्ममौ ॥ २७७ ॥
प्रमादाद्विस्मृतं यत्तद्बाह्येऽवस्थितमक्षरम् ॥
अनायासेन तल्लब्ध्यै नान्यद्धंसपदं विना ॥ २७८ ॥

त्पदं ब्रह्मपदं साधुचरणं च कर्णो वाद्यविशेषः ॥ २७३ ॥

दोषोद्रेकइति इदंपद्यं पूर्वम् व्याख्यातं हंसः परमहंसः साधुः सूर्यश्च ॥ २७४ ॥

शुचिमानसेति द्विजेंद्राणां विप्राणां पक्षिणां च शुचिमानसं शुद्धांतःकरणता शुचि शुद्धं यन्मानसं सरोवरं हंसः परमहंसः प्रसिद्धश्च अमृतं जलं स्वरूपलाभश्च कुवलये कमलखंडे पृथ्वीवलये च द्विजानां सत्समागमेनांतःकरणशुद्धिद्वारा ज्ञानसंप्राप्तिर्भवति ततो जीवन्मुक्तत्वेन सुखं चरति यथेतरपक्षिणां मानसप्राप्तिस्तदुदकलाभस्तत्रत्यकमलवनविहारश्चेत्येषा वाञ्छा चेद्धंससमागममंतरेण न सफला स्यादिति ॥ २७५ ॥

स्वर्गेति यथा नलस्य हंससमागमेनैव दमयंतिस्त्रीलाभः तथा नरस्य रामस्य भगवतः प्राप्तिर्हंससमागमादेवेति ॥ २७६ ॥

सृष्टिमिति लेखाएव लेखका देवास्तेषां पतिरीश्वरः वर्णा द्विजादयस्तत्प्रधानां सृष्टिं कृत्वापश्यत्तावत्तेन दृष्टं अत्रस्थमेव एकाक्षरं सद्बाह्येस्थितं असमावेशेन सृष्टिर्हिपरब्रह्मणि एकदेशेविवर्तरूपा तच्चानुपहितमित्युच्यते वर्णानां तत्प्राप्तिस्तत्त्वमस्यादिवाक्येन लक्ष्यांशेन नास्ति चेद्वर्णाअनर्थं संसारादिरूपं गताः स्युः तस्माल्लब्धे साधुपदं निर्मितं ततश्च तत्त्वमस्यादिवाक्योपदेशेन अनुपहितेन सहैक्यवर्णा मुक्ताः स्युरिति यथा कश्चिल्लेखकानां पतिः वर्णमयीमक्षरमयीं सृष्टिं पुस्तकं लिखित्वा पश्यति अहो यल्लिखितं श्लोकादि तस्यैकमक्षरमसमावेशात कल्पितपत्त्यपेक्षया बाह्ये लिखितं ततः वर्णानां सर्वेषां वाक्यार्थो न संगतो भवेदिति तज्ज्ञानार्थं हंसपदं अलक्तकेन निर्माति तेन बाह्यस्थितस्याक्षरस्यप्राप्तिर्भवति ॥ २७७ ॥

सत्यपि व्यापके दिव्ये परमे तीव्रतेजसि ॥
स्यात्ते पाकस्य संसिद्ध्यै सन्मण्युदितमेव तत् ॥ २७९ ॥
कौटिल्यं स्वगतं स्वबंधकमिदं युक्तं पुनर्मुक्तये
सांद्रानंदकदंबकाग्निसुरताविर्भावकर्तुः परः ॥
संगः स्यात्पुरुषोत्तमस्य निभृतानंगप्रसंगान्न किं
स्पष्टं दृष्टमिदं कचेषु कुचयोः कामं कुरंगीदृशाम् ॥ २८० ॥
स्तोतुं कथं नु कल्पेय संगं सुमनसामहम् ॥
मलिनोऽपि गतो येन मधुसूदनतामलिः ॥ २८१ ॥
स्वामोदहेतुसुमनः समयं श्रितो यः
पश्चात्कृतः सपदि तेन भगप्रसंगः ॥
सर्वत्र चात्र किल चैत्रविलासभाजः
श्रीमाधवः सविध एव भवत्यमुष्य ॥ २८२ ॥

प्रमादादिति गतार्थमिदमुक्तश्लोकार्थेन ॥ २७८ ॥

सतीति यथा तीव्रेऽपि सूर्यतेजसि सति पाकसिद्धिर्न किं तु मध्ये सूर्यकांते कृते तज्जन्येन तेजसा तथा ब्रह्मणि सर्वत्रानुस्यूतेपिपाकः ब्रह्मलाकारेण परिपाको न भवति मध्ये सता मणयः श्रेष्ठास्ते कृताश्चेत्परिपाको भवति ॥ २७९ ॥

कौटिल्येति कुचे कोटिः अणिस्तदाकारश्चूचुकं त लाति कोटिलः तद्भावः कौटिल्य कचे तु वक्रता तत्कौटिल्य स्वगत स्वबधक कुचयोः कचुकेन बधः कचाना मुक्तादामादिना धमिल्लकरणं उभयोर्बद्धयोर्मुक्तिकारण तु सुरतस्याविर्भाव कर्तुः पुरुषोत्तमस्य रतिकलाकोविदस्य सग' तथा स्वगतदुर्वासनाभिर्बद्धस्य नरस्य मुक्तभाव. सुरता देवत्व तच्छिष्यस्यात्मनि आविर्भावयति ॥ २८० ॥

स्तोतुमिति सुमनसां साधूना पुष्पाणा च मधुसूदनता भ्रमरत्व माधवत्व च ॥ २८१ ॥

स्वामोदेति स्वामोदः निजानदः सुष्ठुगंधश्च तस्य हेतु. यः सुमनसां साधूनां समयः आचारः पुष्पसमयो वसतश्च भगप्रसगः स्त्रीश्रीलोलुप्य भगः एतदाख्य-देवता तदुपलक्षित. फाल्गुनमास: ' उत्तराफल्गुनीनां भगो देवतेति ' ज्योतिषे प्रसिद्धं तन्नक्षत्रस्य तद्व्यपदेशकत्वात् भगेत्यनेन स विवक्षितश्चैत्रसबधी यो विलासः चित्राणा लेख्यानामय चैत्रः स चासौ विलासश्च माधवो हरिर्वैशाखश्च यथा यो वसंतमाश्रित-स्तेन फाल्गुनः पश्चात्सारितएव वसतेऽपि चैत्रविलासं भुक्तवतः वैशाख' समीपएव तथा सतामाचारमनुतिष्ठता श्रीस्त्रीलोलुप्यमपसारित स्यात् ततः सर्वत्र जगति चित्र-तुल्यता पश्यतः माधव. समीपएव यथामृन्मयगजभानेऽपि मृत्तबुद्धिस्तथा जगद्भानेऽपि चैतन्यबुद्धिर्यस्येति चित्रविलासत्व ॥ २८२ ॥

अपत्रपा अपि प्रायः सर्वथाऽपि कुजन्मिनः ॥
सुमनः समयस्थाश्चेद्धरीभूय स्फुरंत्यहो ॥ २८३ ॥
यस्तु द्विजेंद्रः कुटिलो मंतव्योऽपूर्ण एव सः ॥
यस्तु पूर्णत्वमापन्नः स सद्वृत्तो हि दृश्यते ॥ २८४ ॥
पुण्यक्रियादौ फलनिःस्पृहत्वं बोधो विशुद्धोऽप्यथ भक्तियोगः ॥
मोक्षः क्रमेणेति तु यत्र पंच सोऽयं पुमान् स्यादिति मे मनीषा ॥२८५॥
यदृच्छलाभसंतुष्टाः परदारपराङ्मुखाः ॥
स्वच्छंदचारिणः केचिद्द्विजा विष्णुपदानुगाः ॥ २८६ ॥
योगं यः प्रथयन् हरेरिह पुनर्भोगं महांतं स्वयं
वाञ्छेदेष हि शेष एव स पुनर्याता वताधोगतिम् ॥
आकल्पं विपुलादिभारगहने स्थाता न भोगस्तु यः
सुव्यक्तं द्विजनायकः किल शुकः सोऽव्यक्तवाङ्मुक्तिभाक् ॥२८७॥

अपत्रपा इति कुजन्मिनो वृक्षाः पत्ररक्षणमकुर्वंत. वसतोपनतौ पूर्वपत्राणि– पतंतीति सुमनःसमय वसंत प्राप्ताश्चेद्धरितभाव वहतो विराजते तथा पापयोनयोऽपि निर्लज्जा अपि साधूनामाचारमनुतिष्ठतो हरिरूपा भवंतीति ॥ २८३ ॥

यइति द्विजेंद्रः विप्रादिः चद्रश्च कुटिलः दुर्वृत्तो वक्रश्च सद्वृत्तः सुशीलो वर्तुलश्च ॥ २८४ ॥

पुण्येति यत्र पुंसि पुण्यक्रियादौ फलनिःस्पृहत्वं विशुद्धो बोधो भक्तियोगो मोक्ष- श्चेति क्रमेण दृश्यते स एव पुमान् नान्यः पुमान् इत्युक्ते पुः पवर्गः विद्यते यस्य पुमान् शब्दतोऽप्ययमर्थो भवति स च उक्तपचपदाद्यक्षरैर्घटितएवेति 'बोधोत्तर भक्तियोगो ज्ञानीचभरतर्षभेति' भगवदुक्तेः ॥ २८५ ॥

यदृच्छेति केचिदित्यनेन चटकादय. न कुक्कुटादय' चटकादयः केचिद्युग्मत्वेनो- त्पद्यंते मिथुनीभावश्च तयोरेव नाय कुक्कुटादौ नियमः विष्णुपद आकाश' हरि- चरणं च ॥ २८६ ॥

योगमिति यः हरेर्योग कुर्वन्नपि महांतं भोगं वांछेत् स शेषएव न तु मुच्येत प्रत्युत अधोगतिं याता किं च आकल्पं विपुलो य आधिभारः दुःखजालं तदेव गहनं कष्ट तत्र स्यात् यथा हरेर्योगं शयनसबंधिनं प्रथयन् महांत भोग सर्पदेहं वांछति सशेष एव अधोगतिं पातालमूल गतः कल्पपर्यंत च विपुलायाः पृथिव्याः अधिको यो भारस्तदेव गहन तत्र स्थितश्च अथ यो हरेर्योग भक्तियोग प्रथयन् नभोगः नास्तिभोगो यस्य विषयपराङ्मुख स द्विजनायक' सुव्यक्त शुकएव मुक्तिभाक् अव्यक्तं मौनि यद्वा अ. वासुदेवः व्यक्तवाचि यस्य कीर्तनपरइत्यर्थः य- था हरेः हरिद्वर्णस्य योग प्रथयन् नभोग. आकाशगामी द्विजनायकः पक्षींद्रः शुक.

रोमांचोऽगेषु कंपो वचनविरचनाऽपाटवं नेत्रचंद्र-
ग्रावद्रावस्तमोद्रागपसरति चचिचंद्रिकोव [?] त्यकस्मात् ॥
मन्येऽहं तस्य धन्येशितुरमलतपोयोगमासाद्य सद्यः
शीतोल्लासाधिवासोऽधिहृदयगगनं रामचंद्रोऽवतीर्णः ॥ २८८ ॥

श्रीरामाविर्भावो यत्र स इह दृश्यते महत्त्वेन ॥
यदनेकतारकत्वं पुनर्वसुत्वं च सर्वजनासिद्धम् ॥ २८९ ॥

जातुचिन्नैति विकृतिं कुसंगप्रभवैर्गुणैः ॥
सर्वत्र तु सदामोदमाधत्ते सुमनोगणः ॥ २९० ॥

प्रसिद्धः सुमनस्त्वेन सर्वदामोदसंभृतः ॥
स्वत्वं कुसुमवन्नैव शिरश्छेदेऽपि मुंचति ॥ २९१ ॥

द्विजिव्हपीडिताश्चापि विक्रियां नैव तन्वते ॥
परतापोपशमने गुरवोऽगुरवो जनाः ॥ २९२ ॥

लाभेषु नूनमखिलेषु वदंति संतो
मुख्यः कुलाभ इति तस्यकृतेऽपि नाशे ॥

कारएव स च मुक्तिभाक् स्वच्छंदचारी अव्यक्तवाक्च ॥ २८७ ॥

रोमांचइति यस्य हृदये सीताया उल्लासस्थानं रामचंद्रः तपोयोगमासाद्याव-तीर्णः तस्य एतानि चिन्हानि भवंति तद्युक्तमेव यतः तपोयोग. माघयोगः तमासाद्य यश्चंद्रः स शीतोल्लासाधिवासः अत्यंतं शीत वर्षति सशयोरैक्यात् अतएव रोमांच॰ कंप: वचनापटुत्व च सपद्यते तमोऽज्ञान तामिस्र च ॥ २८८ ॥

श्रीरामेति यत्र पुंसि रामस्याविर्भावः स्फूर्तिः स महान् अनेकेषां च तारको भवति पुन. पुनर्वसु द्रव्यं यस्मिन् समृद्ध इत्यर्थः यथा यत्र नक्षत्रे रामावतारः तत् महत्वेन दृश्यते तत्पुनर्वसु नक्षत्र द्वितारिकमिति ॥ २८९ ॥

जातुचिदिति कुसगो दुःसंग॰ विकृतिः शाठ्यादि मूर्द्रधश्च सदामोद सर्वदानंदं उत्तमगंधं च सुमनसां साधूनां पुष्पाणां च ' आमोदं कुसुमभवमृदेव धत्ते मृद्गंध न हि कुसुमानि धारयतीति ' ॥ २९० ॥

प्रसिद्धइति शिरः अद्याक्षर तस्य छेदेऽपि सिद्धः इति कृत्वा न स्वत्वं गतं यथा कुसुमं स्वाशिरश्छेदेऽपि सुमं तथापि न स्वत्वापगमः ' कुसुमं सुमामित्यमर ॥ २९१ ॥

द्विजिव्हेति द्विजिव्हाः सर्पा॰ खलाश्च गुरवो महांतो जनाः अगुरवः गुरवो वयमिति न मन्यमाना. अगुरवश्चंदनाश्च ' अगरु अगुरु ' इत्युभयमपि को-शप्रसिद्ध ॥ २९२ ॥

लाभेष्विति कुलाभः भूमिलाभ. कुइति वर्णस्य लाभश्च तस्यापहारेकृतेऽपि

नैव त्यजंति सहजश्रवणाः कुलीनाः
शुद्धात्मनः कुसुमवत्परमात्मभावम् ॥ २९३ ॥
उपसर्गप्रकारोऽपि निर्मितः संमुखे यदि ॥
नैव स्वभाववैकल्यं वराणां जायते क्वचित् ॥ २९४ ॥
गतोऽपि द्विजराजो यः क्षयं वा वृद्धिमेव वा ॥
नैव विष्णुपदं जह्यात्सचामृतकरः स्मृतः ॥ २९५ ॥
हृदयप्रणिहितकृष्णो नित्यं यो विष्णुपदभजनधुर्यः ॥
क्षपयन्स्ववपुर्विबुधान् पुष्णात्येनं द्विजेंद्र इति मन्ये ॥ २९६ ॥
शूरः स एव यो वै विष्णुपदस्थः प्रचंडकरपालः ॥
नक्षत्रलोपकृद्यः सद्यो द्विजसंघदैन्यभंगकरः ॥ २९७ ॥
कृतपर्यस्तिकाबंधो जलामृतविवेचने ॥
यः शुचिः स्वात्मना नित्यं स द्विजो हंस उच्यते ॥ २९८ ॥
यद्भिन्नकठिनविषयजरसं रसाज्ञा रसाकुला दधते ॥
विशदस्वभावसुभगास्त एव मुख्या द्विजा विराजंते ॥ २९९ ॥

कुलीना उच्छृंखला न भवंति लीनाएव स्युः कुसुमस्यापि कूपहारे सुमवत् ॥ २९३ ॥

उपसर्गेति वरस्य समक्षं उपसर्गः उपद्रवः न्यक्कारादि तस्य प्रकारे निर्मितेऽपि न स्वभावं मुंचति वरस्य संमुखे पुरस्तात् उपसर्गो यः प्रकार. तस्य आसजनेऽपि प्रव रो भवति पूर्वावस्थातोऽप्यधिको भवति ॥ २९४ ॥

गतइति द्विजराजः विप्रादिश्रेष्ठः चंद्रश्च क्षय आपत्ति कलाक्षय च वृद्धि संपत्तिं कलावृद्धिं च विष्णुपद भगवच्चरण आकाशच अमृतं मोक्षः करे यस्येति अमृतरूपा करा. यस्येतिच ॥ २९५ ॥

हृदयेति य. कृष्णध्यानपर. तद्गुणश्रवणकीर्तनादिपरायणः स्ववपुश्चदनवत्क्षपयन् विदुषः प्रीणयति सएव द्विजश्रेष्ठ॰ यथा चंद्र॰ कृष्ण कालिमान मंडले दृश्यमान यं अकमिति वदति आकाशे नक्षत्रजने धुर्यः कृष्णपक्षे स्वमडल क्षपयन् अमृतेन देवान् पुष्णाति अतएव द्विजेंद्रः ' पर्यायपीतस्य सुरैर्हिमांशोः कलाक्षयः श्लाघ्यतरो हि वृद्धेरिति कालिदासः ॥ २९६ ॥ शूरइति ॥ २९७ ॥

कृतेति पर्यस्तिका परिकरः जलामृतं चिऽज्जडयोग. जलदुग्धयोश्च शुचि पवित्रः शुद्धश्च द्विजोविप्रादिः पक्षीच हस: परमहस. प्रसिद्धश्च ॥ २९८ ॥

यद्भिन्नेति यथा मुखे भवाः द्विजाः दतास्तएव मुख्याः के यै. भिन्ना. चर्विता. ये कठिनविषयाः खर्जुरीक्षुरूपास्तज्ज रस रसज्ञा जिह्वा दधते बिभर्ति दधधारणइत्यस्य रूप किं च विशदः शुभ्रः य. स्वभाव तेन सुभगाः तथा यैर्भिन्नाः

निजमहिममदं न मनाग्ज्ञानघना आत्मना जना दधते ॥
यस्माच्छुकोऽपि हंसो हंसः सन्नप्यहंस इति मनुते ॥ ३०० ॥
या साध्वसंगता युक्तं जनता साध्वसं गता ॥
या साधुसंगता चित्रं जनता साऽध्वसंगता ॥ ३०१ ॥
उत्तममूर्धन्येऽस्मिन् जगतीतलभूषणायिते पुरुषे ॥
उपकारित्वं मुख्यं मन्ये किल तदनुरूपयुक्तत्वम् ॥ ३०२ ॥

सम्प्रार्थितो भव्यजनो न कालतः
स्यात्पूर्वभावस्थितिरस्य यद्यपि ॥
भ्राम्यन्स्वयं स्पर्शनमल्पशोऽप्ययं-
स्तोषं स जोषं तनुयाद्विशेषतः ॥ ३०३ ॥
नूनं भवेद्विगलितं बहुलोहजालं
व्यक्तिं गते किल यदंतरनंतदेवे ॥

स्पष्टतां नीता ये कठिनाः दुःखगाह्याः विषयाः शास्त्रसिद्धांतास्तज्ज्ञ रसं रसज्ञाः रसिका. दधते दधति धाधातोरिदंरूप बहुवचनात विशदः शुद्धः ॥ २९९ ॥

निजेति शुको हि श्रेष्ठ. पक्षी काकाद्यपेक्षया स हसतां गतः हंस' सन्नपि तत्त्वगर्वं न भजते शुक. व्यासपुत्र' परमहंसोऽपि अहंसः सोह सोहमिति मनुते न हसो हसइति ॥ २०० ॥

येति या जनता जनसहति. साधुषु असंगता सा साध्वस भय प्राप्तैवेति युक्तं पर तु या साधुसंगता सा साध्वसगतेति चित्रं सा अध्वसगता सन्मार्गलमेति विरोधपरिहारः ॥ २०१ ॥

उत्तमेति पुरुषो हि परमेश्वरेण यः सृष्टः स उत्तममर्धन्य इति सृष्ट. कस्मात् पश्य उत्तमः अत्य मूर्धन्य' षकारो यस्य अन्यदपि स्पष्टं किं मुख्यं उपकारएव कार्यइति कस्मात् पश्य मुख्य आद्याक्षर उपकारयुक्त उकारयुक्त पकारयुक्त चास्ति नन्वस्य रूपेणैव मुख्यता भवतु नैव तच्च तदनतरं न तु मुख्य कुत. पश्य पु इत्यक्षरादनतरमेव रुणा रुवर्णेन उपयुक्त दृश्यते तस्मादुक्तमनवद्यं ॥ २०२ ॥

संप्रार्थितइति यो हि भव्यः उत्तमः जनः स' अर्थाय प्रार्थितः तस्य कालवशात् पूर्वभावस्थिति पूर्ववत्समृद्धता यद्यपि नास्ति तथापि यत्र क्वापि स्वयंभ्रमन् किंचित्सपाद्य अल्पमपि स्पर्शन दान ददत् तोष कुर्यादेवेति एतच्च युक्तमेव यो हि भव्यजनः तस्य पूर्वभावस्थिति. पूर्वो यो भकारस्तदवस्थानं न चेद्व्यजनो जातः यश्च व्यजन' स' स्वय भ्राम्यन् अल्पश स्पर्शन वायु ददत्तोषयत्येव व्यजनस्य पुरुव कोशांतरे दृष्ट ॥ २०३ ॥

नूनमिति यदतर्भगवानाविर्भूतस्तस्य बहव' ऊहास्तर्का न सति बहु लोकोनां

यस्माच्च्युतानि सहसा वसुदेवकारा-
गारे स्वयं निगडतालकशंखलानि ॥ ३०४ ॥
जानद्भिः परमं ज्योतिः सल्लब्धधिषणैरपि ॥
किं नाद्रियेत सद्योगकरणं चोत्तमा तिथिः ॥ ३०५ ॥
जानंति ये परं ज्योतिस्ते तु धन्यतरा नराः ॥
येषां लीलावतीमध्ये पश्य व्यासोऽप्यवास्थितः ॥ ३०६ ॥
जातस्त्वात्मपरीपाको नन्वपामार्गशेखरः ॥
रंजनायेह जायेत नाप्रत्यक्प्रवणात्मनाम् ॥ ३०७ ॥
सन्नाथमंडलस्था भजंत इह जंतवोऽमृतं संतः ॥
यद्विषयमाननस्था दुरंतमृत्युं तदप्युचितमेतत् ॥ ३०८ ॥
निलयः कष्टाय स इव वनिता स्वहिताय जायते सेव ॥
यं प्रति किल स्वलौल्यं तदिव स हि जनो विराजते विरलः ॥ ३०९ ॥
बहुतरहिते रसातल उत्तिष्ठंते हि सुमनसस्तपांसि ॥
कांतारैजनवेगं विषह्य सद्रसफलास्तु विरलाः स्युः ॥ ३१० ॥

जातं बहु तच्च तल्लोहजात तालक कुलुप इतिलोके शृखल कडीति ॥ ३०४ ॥

जानद्भिरिति परमात्मज्ञानपूर्वकं सति ब्रह्मणि लब्धा धिषणा येषा ब्रह्मनिष्ठा अपि उत्तम योगं अष्टांगं करण वर्णाश्रमकर्माणि उत्तमातिथिपूजनं न त्यजति पूर्वानुवृत्याऽचरंत्येव न तु यथा दैवज्ञा गमनादि मुहूर्तदाने लग्नमेव प्रबल मन्यते तत्र सति संभवे नक्षत्रयोगकारणतिथीनामुत्तमानामादर न कुर्वंतिति न ॥ ३०५ ॥

जानतीति लीलावत्य· स्त्रिय· तन्नामा ग्रंथश्च व्यासः वेदव्यास· वृत्तादीनां विस्तारश्च एतासां अत्युत्तमानां साक्षात्सहवासस्तु पवित्रएव पमासांस्त्रीणां सहवासोऽपि ज्ञानफलायेति कृत्वा तत्रव्यासोऽवस्थितो भवति ॥ ३०६ ॥

जातइति अपामार्गशेखरः अपामार्गा. सन्मार्गस्था· तेषां मध्ये शेखरइव जातस्त्वात्मपरिपाकः अप्रत्यक्प्रवणात्मनां विषयिजनानां रजनाय न स्यात्परिपक्का अपामार्गमजरी प्रतिलोम आस्फालयतां यथेति ॥ ३०७ ॥

सन्नाथेति सतां नाथाः साधुश्रेष्ठास्तेषा मंडले निविष्टाः सतः अमृतं मोक्ष भजते यादि च विषयाणा मानने सत्कारे स्थिता दुरतमृत्युमित्युभयमपि युक्तं सतां नक्षत्राणां नाथश्चंद्र· अमृतं सुधां विष गरलं यमश्च तयोरानने मुखे स्थिताः ॥ ३०८ ॥

निलयइति निलय. गृह रलयोरैक्यात् निरय नरकः वनिता वनमस्यास्तीति वनी तद्भावः वनिता वनवास· सा वनिता स्त्री स्वस्य आत्मन· लौल्य आत्मज्ञानोत्कठा तत्रलौल्य द्रव्यलोलुपता च ॥ ३०९ ॥

बहुतरेति कर्मभूमित्वात् देवाअपि अत्र जन्म याचंतइत्यत्यताहितकारके रसातले

पंकोद्भूतीरजोभिः कलुषितहृदयः कंटकासंगबद्ध-
श्चेत्सूर्यात्तप्रसादो भ्रमरहित इह स्यात्सदामोदपूर्णः ॥
तं धत्ते वासुदेवो निजकरकमले पद्मवत्सादरं तत्-
किं वाच्यं तत्र लक्ष्मीर्निवसति निभृतं नित्यदा निर्व्यलीकम् ॥३११॥

यः प्रीतिमानपि सदैव कलिप्रवृत्तौ
संकीर्तयन्नटति कृष्णयशः पवित्रम् ॥
स ब्रह्मभूत इति सुप्रथितस्त्रिलोक्यां
दृष्टा करेऽस्य सततं महती प्रतिष्ठा ॥ ३१२ ॥

वीणाया अपि भुवनत्रयश्रियोऽपि
मायाया अपि निपुणं गुणान् महत्याः ॥
धुन्वानः समभिदधान आजिहानो
दिव्यात्मा विहरति नारदो जगत्सु ॥ ३१३ ॥

तपसि तपोविषये सुमनसः साधवः बहव उत्तिष्ठते उदोऽनूर्ध्वकर्मणीत्यात्मनेपदं उत्थिता भवंति परं तत्र अंतरायभूत कांताः स्त्रियः राः द्रव्य जनाः अनुबाधिन इतरे च तद्विषयकं वेग संसक्तिरूपं विषह्य सद्रसः ब्रह्मरसः फल येषा तादृशाः विरलाः तथा च गीतासु 'मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वत' इति अयमेव दृष्टांतः यथा बहु इति भिन्नपद तरहिते तकाररहिते रसातले तकारापहारे सति रसालइति जात तत्र आम्रे तपसि माघमासे सुमनसः पुष्पाणि बहु यथास्यात्तथा उत्तिष्ठते पर कांतारं वनं तत्संबंधि यत् एजन वातादिना कंपनं तस्य वेग विषह्य सन् उत्तमो रसोयेषु तानि फलानि येषां तादृशरूपेण अल्पाएवावतिष्ठतइति ॥ ३१० ॥

पकेति पापयोनिरपि रजोगुणव्याकुलितोऽपि फलसंग्यपि चेत् सूरिभ्यो ज्ञानिभ्यः सकाशात् प्रसादः अनुग्रहोलब्धः तर्हि भ्रमेण रहितः सदामोदेन हर्षेण पूर्णः स्यात् वासुदेवोऽथ त करे धत्ते कथं पद्मवत् तदपि कर्दमोत्पन्नं परागपूर्णं कंटकैः शूकैः सगत दक्षिणापथे हि सरसीषु महापद्मदंडेषु कटका दृश्यंते 'दंडे चुंबति पद्मिन्याः सह कर्कशकटकइति' दंडिप्रयोगाच्च तच्चे त्सूर्यादात्तः प्रसादःफुल्लता येन तर्हि भ्रमरेभ्यो हितः सन् आमोदो गंधस्तेन पूर्णो भवति ततस्तं पद्म हरिर्हस्ते करोति अथ किं वाच्य तत्र पुरुषे मोक्षलक्षणा लक्ष्मीर्निवसेदिति यथा तादृशपद्ममेव तस्या आलयः तथाऽयमपीति ॥ ३११ ॥

सामान्येन साधून् वर्णयित्वा विशेषाकारेण स्तौति तत्र नारद इति कलिर्युगं कलहश्च सः ब्रह्मरूपः नारदश्च महती प्रतिष्ठा महतीनाम्न्या वीणायाः प्रतिष्ठा स्थितिश्च ॥ ३१२ ॥

प्रल्हादप्रमुखा हि बालमतयो विष्णोर्गुणग्राहिणो-
ऽभूवन्नारदसंगजं फलमिति प्रस्तौमि यावद्भृशम् ॥
तावत्तु स्मृतिमार्गमागतमिदं यत्पर्वतः सर्वतो
गायन्विष्णुगुणान्स ह व्रजति मद्वाचस्ततो मुद्रिताः ॥ ३१४ ॥
हीनजातिरपि यच्छ्वर्यभूच्छ्रीरमेशकरुणारसस्पदम् ॥
इत्यवेक्ष्य बदरीफलं मुनिस्तद्वने वसति बादरायणः ॥ ३१५ ॥
कृष्णं द्वैपायनं वंदे महाभारतमोदिनम् ॥
पुराणपुरुषं ब्रह्मविद्यां निदधतं नरे ॥ ३१६ ॥
यद्ब्रह्मसूत्राणि विधाय कंठे सपर्ययं ब्राह्मणभावमेति ॥
वेदोपदेष्टारमिमं पुराणाचार्यं मुहुर्व्यासमहं नमामि ॥ ३१७ ॥
आशावसाना लोकेषु निजगुह्यप्रकाशकाः ॥
उपहासास्पदं प्रायो नूनमेकं शुकं विना ॥ ३१८ ॥
द्विजेषु शुक एवेह मुनीनां सुमनः स्थितम् ॥
रसमास्वादमास्वादं सुखं चरति सर्वतः ॥ ३१९ ॥

वीणायाइति महत्या वीणाया गुणान् तन्त्रीः धुन्वानः महत्याः बृहत्याः त्रिभुवनश्रियः भगवद्रूपायाः गुणान् कथयमानः महत्या मायाया गुणान् हेयोपादेयविषयरूपान् त्यजन् ॥ ३१३ ॥

प्रल्हादेति पर्वतो नाम नारदसहचारी कश्चिद्गायकः पर्वतः सन् हरिगुणान् गायन् व्रजति किं पुनः सचेतना प्रल्हादध्रुवप्रभृतयइति तस्माद्वर्णयितु वाक् न प्रसरतीति ॥ ३१४ ॥

व्यासं वर्णयति त्रिभिः हीनजातिरिति स्पष्ट ॥ ३१५ ॥

कृष्णमिति कृष्ण व्यास हरिं च द्वीपे अतर्जलतटेऽयन यस्य तस्य पराशरस्य पुत्र द्विपस्य गजस्य इद द्वैप तच्च तदयन गजेद्रगतिं महाभारतेन मोदते महान् यो भारः सएव तमः तस्य तमसः दिन दिवसरूप पुराणवक्तारं पुरुष अनादिं च नरे मनुष्ये पार्थे च ब्रह्मविद्या ब्रह्मसूत्ररूपा गीतारूपा च ॥ ३१६ ॥

ब्रह्मेति यत्प्रणीतब्रह्मसूत्राणि अथातो ब्रह्मजिज्ञासाइत्यादीनि यज्ञोपवीतानि च ब्रह्मणत्वं ब्रह्मज्ञत्व च वेदविभाजकं च वेदमध्यापयतं पुराणाचार्यं पुराणवक्तार॥३१७॥

शुक वर्णयति त्रिभिः आशा दिश वसाना. दिगबराः आशाकुलाश्च निजगुह्यं आत्मतत्त्व गुह्यदेशं च शुकस्तु आशानामवसानं यस्य तादृशः ॥ ३१८ ॥

द्विजेष्विति मुनीना ऋषीणां अगस्तिवृक्षाणां च शुद्धांतःकरणगतं ब्रह्मरस पुष्पगतरस च ॥ ३१९ ॥

द्राक्षानिंबफणिज्येषु यस्य साधारणी रुचिः ॥
तादृशः शुक एवेह द्विजेंद्रेषु विलोक्यते ॥ ३२० ॥
सदुपासनसंपन्ना कृतस्वारिपरिक्षिया ॥
अबला शबरी नूनं शरधारी परः पुमान् ॥ ३२१ ॥
शबरी कोलवितरणादपि भवजलधेर्महोर्मि घोरस्य ॥
पारं परं गतवती येन स लाघवसमाश्रयो जयति ॥ ३२२ ॥
आत्यंतिकं स्वकुशलं परिलिप्समानाः
सेवंत एव सुजना बहुशोऽपिरामम् ॥
सर्वेषु तेषु रघुनाथ गृहीतसेवा
सैकेव भाति शबरी परिशुद्धभावा ॥ ३२३ ॥
महाकपिः श्रीरामांघ्रिसरसीरुहतत्परः ॥
विलोपितांतको यस्मात्तस्माद्वाच्यो महाकविः ॥ ३२४ ॥
सत्त्वं सुखे संजयतीति हि स्मृति-
श्चेन्नित्यदा सत्त्वमथानिशं सुखम् ॥
इतीव विद्वान्पवनस्य नंदन-
स्तन्नित्यदासत्वमसौ दृढं दधौ ॥ ३२५ ॥

द्राक्षेति फणिज्जं क्षुपमरीच मिरचीति लोके कमपि रसविशेषं नावैति ॥ ३२० ॥

शबरीं वर्णयति त्रिभिः सदुपासनेति उपासन उपास्तिः शराभ्यासश्च अरिः कामादि खरदूषणादिश्च अवला स्त्री बलातिबला नबला अबला च शबरी बकारहीना चेत् शरी भवति स च रामएवेति ॥ ३२१ ॥

शबरीति कोल बदरीफलं तद्वितरण दान लाघवं लघुत्वं राघवश्च महतो भवजलधेः पार कोलेन चर्मावनद्धवंशविदलनिर्मितभांडेन टोकराख्येन गतुमशक्य तथापि गता तत्र हेतुः लाघवसमाश्रयः योह्यतीव लघुः तूलप्रायस्तेन शक्येतैव गतु गुरुभूतेन परमशक्यं ॥ ३२२ ॥

आत्यंतिकमिति सेवापरिचर्या 'मुष्टिप्रमाणं बदरसेवमित्यभिधीयते' इति भोजनकुतूहले वचनात् सेवानि बदराणि ॥ ३२३ ॥

महेति विलोपितोऽतको येन स महाकपिः हनूमान् महाकविर्वक्तव्यः विना विकारेण लोपितः अंतः अत्यवर्णः विकारो यस्य स तादृशएव भवति ॥ ३२४ ॥

सत्त्वमिति स्मृतिर्भगवतो गीतारूपा 'सत्त्व सुखे संजयतिरजः कर्माणि भारत' इति नित्यं यद्दासत्व दास्य तन्नित्यदासत्वं नित्यदासत्वमगीकृतं चेत्तत्र नित्यदासत्वमस्यैव नित्यदा हि सत्त्वे अनिश सुख यतः 'सत्त्वं सुखेसजयतीति भगवानेवाहेति ॥ ३२५ ॥

# जा हि रा त.

**काव्येतिहास संग्रहाच्या** मागील अंकाकरितां पुष्कळ मागण्या येतात. परंतु प्रती शिल्लक नसल्यामुळें पुस्तकें देता येत नाहींत. याजकरिता **संग्रहाची** दुसरी आवृत्ति काढण्याचा आमचा विचार आहे. तेव्हां प्रथम पासून तों सन १८८२ सालच्या अखेरी पर्यंतचे सर्व अंक ज्यास पाहिजे असतील त्यांनीं आम्हास आपलें नांव आपल्या पत्यासह कळवावें. दर वर्षाची किंमत रुपये ३ प्रमाणें पांच वर्षांची एकदर किंमत रुपये १५ पडेल. तीनशें वर्गणीदाराच्या सह्या आल्या बरोबर ही दुसरी आवृत्ति छापण्यास आरंभ करूं. आवृत्ति छापून तयार झाल्यावर टपाल खर्च काय पडेल तो संग्रहाचे मळपृष्ठावर कळविला जाईल. कळावें. तारीख १२ सप्तंबर सन १८८३.

**का० सं० व्यवस्थापक.**

---

## विषयक्रम.

**बखरी.**


धाकटे रामराजे यांचें चरित्र ........................ २५–४०


**मराठी कविता.**


**अनेक कवि**—आनंदतनयकृत पूतनावध ............ २२३–२२८

अनेककविकृत प्रकरणाची अनुक्रमणिका .......... १–२

श्रीरामदासकृत भीमरूपि-स्तोत्रें– .................. १२१–१२४

मोरोपंतकृत प्रकरणाचें मुखपत्र ..................... १–२

अनेककविकृत प्रकरणाचें मुखपत्र ................ १–२


**संस्कृत काव्यें.**


पंतविठ्ठलकृत–सुश्लोकलाघवम् ....................... ६९–८४

औंचे [ यांस ] बोलावून आणून डेरियांत मारिलें. रामचंद्र नारायण प्रभु कारभारी होते त्यांस धरून आणून बेडी घातली.

या समयात अबदाली गिलच्या दिल्लीवर चालून येतो ह्मणून कुमक करण्याचीं पत्रें नानासाहेबांस आलीं. या नंतर रघुनाथ बाजीराव हिंदस्थानात स्वारी करितात, मोठा पराक्रम आटकेपर्यंत जाऊन [ करून ] आले. सदाशिवराव भाऊही पराक्रमी, परंतु घरचे कारभार करणें व महाराज सुटावयाचा उद्योग न करितां आपणच सर्व राज्य आटोपावें हे अयोग्य करणें [ यात ] मसलत पद्धती हें अयुक्त, कल्याणदायक नाहीं, महादोबा पुरंदरे घरीं बसविले, इत्यादि विकल्प आंतून मनांत प्रधान पंतीं आणोन बोलों लागले. तेव्हा सदाशिव पंत यांणीं आपण जाऊन पादशाहीचा बंदोबस्त करून दिल्लींत अंमल बसवून हिंदुस्थान निरकुश करून येऊं ऐसें बोलणें घातलें. विश्वासराव बरोबर द्यावे ह्मणोन फौजेची तयारी करून बहुत फौज, तोफखाना, सरदार शिंदे, होळकर, गारद जंगी सामान घेऊन हैंथावर ध्वज लावून निघाले. ते हिंदुस्थान प्रांतीं चालले. बरोबर त्रिंबकराव सदाशिव पुरंदरे, बळवतराव गणेश व महिपतराव आवजी चिटणीस व बाळाजी जनार्दन फडणीस हे कारभारी दिल्हे. व लक्ष्मण बल्लाळ, भवानी शंकर ही बराबर दिल्हे.

या समयीं हबशी यांणीं बिघाड करून मावळ वगैरे जागां स्वारी करूं लागले. त्याजवर रामाजी महादेव व शंकाजी नारायण व माणकर हशम वगैरे देऊन रवाना केले. मानाजी आंगरे वजारतमाब यांस कुमकेस जावें असें लिहिले. व आरमार पाठवून हबशी जेर केले. तेव्हा तह केला. उंदेरी किल्ला त्याजकडे होता तो जेर करून घेतला.

सदाशिवराव भाऊ व विश्वासराव दर मजल गेले. त्या प्रांतीं जयाजी शिंदे व त्याचे लेक जनकोजी शिंदे व त्याचे चुलते दत्ताजी शिंदे व मल्हारजी होळकर होते ते फौज सुद्धा येऊन भेटले. पाऊण लाख फौज जमा जाली. या उपरि दरमजल जाऊन दिल्लीस पावले. अहमदशहा कैद करून अलम-

---

८४. हा भाचा असून मुजफरखानाच्या कन्येशीं त्याचें लग्न झालेलें असावें किंवा लग्न करण्याचें ठरलें असावें

८५. हा परभू गृहस्थ या कटांत सामील होता.

८६. ही गोष्ट वरील उदगिरीच्या मोहिमेच्या पूर्वी झाली.

८७. या प्रसंगाची अस्सल [illegible] पेशव्यांच्या घराण्याची हकीगत जेथें जेथें येते तेथ तेथें ती अस्पष्ट व घोंटाळ्याची असते भाऊ साहेबाची बखर पृष्ठ ८५ ते ९० पहा

८८. " स्थावर " असे मूळात दिसतें.

८९. जयाजी व दत्ताजी हे या पूर्वीच सरकार कामास आले होते जयाजी हा मारवाडात नागूर येथ मारेकऱ्याच्या हातून मरण पावला. दत्ताजी दिल्लीनजीक दुराणीशीं लढतांना पडला भाऊ साहेबाचा बखर पृष्ठ १७ व ७० पहा.

गीर[१०] यास पादशहीवरि बसविलें. दिल्ली भोंवतीं गीर्द[११] फौजेची देऊन बहुत पैका घेतला. पादशहाचा खर्च नेमून देऊन आपला बदोबस्त अमल केला. पादशाही तख्त व दिवाणाखाना यास सोने रुपे दहा वीस लक्षाचें होते तें काढून फौजेस वाटलें. ते समयीं त्रिंबकराव सदाशिव व होळकर वगैरे बहुतांनीं तख्त फोडूं नये असें सांगितलें. तेव्हा आमचें तख्त रायगडचें त्यांचें सोने रुपे काढून नेलें. हें काढावयाचें, आणि विश्वासराव यास तख्तावर बसवावयाचें ऐशीं बहुत उमेदीचीं भाषणें केलीं. आणि खजीनाही काढला. बाळोजी पलांडे बादशहापाशीं कारभारी आपले ठेविले. विठ्ठल शिवदेव कांहीं फौज देऊन शहरचे बदोबस्तास ठेविले. दोन महिने दिल्लींत राहिले.

तों गिलचे चालून आले. त्याजवर फौज सुद्धां चालून गेले. मध्यें कुंजपुरा येथें कुतुबशा पठाण दहा वीस हजार फौजेनिशीं होते त्यास मोर्चे लाविले. हल्ला करून कुंजपुरा घेतला. तेव्हां कुतुबशा लढाईस चालून आला त्यास मारून लुटून घेतले. गर्दीस मेळविलें. लूट व द्रव्य बहुत सांपडलें. या समयीं अबदाली गिलच्या लाख फौजेनिशीं आले. त्याजवर दिल्लीहून निघोन पाणपतावर गेले. तों अबदाली यास सुजाउद्दौला, उमरावगिरी गोसावी व नजीबखान रोहिले सामील जाले. पादशाही बुडविली, पठाण कापून काढिले, मराठी फौज वेढा देऊन रसदबंद करतील, व पळतील, मुलुख मारतील, याचा विचार कसा करावा, हा गिलच्यास विचार प्राप्त जाला. तेव्हां मल्हारजी होळकर यांजकडे वकील पाठवून सलुख्याचें बोलणें लाविलें. दोहींकडील फौज भारी. रसद बंद जाली. पैका मुबलग, परंतु दाणा मिळेना. महागाई पडली. तेव्हां गोविंद बल्लाळ बुंदेले यास लिहिलें. ते फौज खजिना रसद घेऊन निघाले. हे बातमी गिलच्यास कळली. त्यांनी बुंदले यांजवर फौज रवाना केली. वाटेत गांठून लढाई जाली. गोविंदराव बल्लाळ मोडले. त्यांस धरून शिर कापून नेलें[१४]! खजीना व रसद फौज लुटून घेतली. लढाई मातबर झाली. पाच हजार गिलचे कापून काढिले. परंतु यश आलें नाहीं. गिलचे यांचें बोलणें होळकर यांचे विद्यमानें तीन कोट रुपये तुम्हीं घेऊन माघारें जावें, आम्ही पादशाही बदोबस्त करूं, असें लागलें. तें यांस मानेना. वीरश्रीस पडले. भोंवता खदक करून, तोफा मांडून, रहावें ऐशी मसलत केली. तेव्हां सर्वत्र बोलले जे, "अशी लढाई करणें आपले फौजेचे [ हातून ] कधीं शिवाजी महाराजांपासून

१० अलमगीर याजबद्दल 'जवानबख्त' असें असावें.

११. गीर्द=चौकी, पहारा.

१२. भा० सा० न० पृष्ठ १०० ते १०२ पहा

१३ याचें आडनांव खेर. याजकडे झांशी, सागर वगैरे प्रांत होता

१४. भाऊसाहेबाची बखर पृ० १०७ पहा.

आजपर्यंत जालें नाहीं. दूर राहोन मोंगलास वेढोन जेर करावें." मल्हारजी होळकर यांणींही बहुत प्रकारें सांगितलें, "ये समयीं पैका तीन क्रोड येतो तो घेऊन कांहीं दिवस मसलत सांवरून करावी." तें न ऐकतां, जनकोजी शिंदे यांचे चुलते दत्ताजी शिंदे भागीरथीचे घांटीं गिलचे पूल करून येणार म्हणोन घांटावर ठेविले. त्यांजवर गिलचे यांणीं फौज पाठविली. लढाई बहुत जाली. दत्ताजी शिंदे त्या लढाईत पडले. जाटाची फौज मदतीस आली. तेव्हां यांची मसलत वांकडी आहे, खंदक करून गनीमी फौजेशीं लढणें घडणार नाहीं, म्हणोन निघोन गेले. अबदाली गिलच्या याणीं लढाईस आपले लेक चाळीस हजार फौज देऊन रवाना केले तहाचें बोलणें ऐकत नाहींत, होळकर मध्यस्त केले, तेव्हां लढाई देणें प्राप्त म्हणोन पाठविले. ते चालून आले. त्यांजवर बळवंतराव गणपत फौज देऊन रवाना केले. मागून जनकोजी शिंदे फौज देऊन पाठविले. बळवंतराव यांची त्यांची गांठ पडली. लढाई जाली. त्यांत बळवंतराव याचा मोड होऊन शीर कापून नेलें. हें कळतांच जनकोजी शिंदे जाऊन बहुत शर्तीची लढाई करून गिलचे कापून काढिले. मोडले. त्यांचे लेकाचें शीर कापून आणिले. गिलच्या कडील सरदार फौज उठोन येऊ लागली. हे आपण ठेऊ नयेत म्हणोन सर्वांनी सांगितलें. परंतु ऐकिलें नाहीं. पांच हजार लोक एकदम आले. तेहां [98]ठेविले. गिलच्यांस भागीरथीनें उतार दिल्हा. ते आलिकडे चालून आले. ते समयीं देशीं लिहिणें, कुमक बोलावणें, किंवा लाख जाऊन त्यांचे भोंवतें फिरणें हें विरेस पडोन सोडिलें. प्रधानपंत यास पत्र देखील येईनों. तेव्हां सावकारी बातमी आली. यावरि नाना प्रधान पूर्वील विमनस्कता चि-[त्तांत] आणोन कशास जावें [100]बोलले. तेव्हां महादोबा पुरंदरे यांणीं सांगितलें जे, सर्व लोक बुडाले, विश्वासराव गेले. आतां विचार न करितां निघावें. म्हणोन सांगितलें. त्याजवरून निघण्याचा विचार करून निघाले. इकडे सदाशिवपंत

---

१५. भा० सा० ब० पृष्ठ ४५ ते ७० पहा

१६ हे बळवंतराव मेहेंदळे प्रसिद्ध आपा बळवंत यांचे तीर्थरूप बळवंतराव व त्यांची स्त्री यांचे परस्पर प्रेम फार होतें. यांच्या शेवटच्या प्रसंगाची हकीकत वाचून अंतःकरण कळवळून येतें व भारती स्त्रीपुरुषांचें स्मरण होतें. आपा यावेळी १२ वर्षांचे होते भा० ब० पृ० ११४-११६ पहा

१७ मराठ्यांकडे.

१८. या बद्दल दुसरे ठिकाणीं कोठे दाखला नाहीं मात्र चिटणीस यांजकडे काहीं दुराणी लोक होते ते मात्र पुढें प्रसंगीं फितूर झाले असें कोठें कोठें आढळतें

९९ विश्वासराव याणीं पत्र लिहिलें होतें. परंतु भाऊस हें कळल्यावर त्याणीं तो क्रम बंद करविला. भा० ब० पृ० १०६ पहा

१००. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्या जोगी आहे. तथापि दोघामध्यें अशा प्रकारचें वितुष्ट असल्याचा दुसरा दाखला आढळत नाहीं.

भाऊ यांचे लष्करांत रसद येऊन पावेना. चहूंकडून गिलचे यांच्या फौजा हिंडू लागल्या. तेव्हां सर्व सरदार समशेर बहादूर व येशवंतराव पंवार व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व खंडेराव दरेकर सरलष्कर, घाटगे, निंबाळकर, पाटणकर, व दाभाडे व भोंसले सर्व सरदार त्रिंबकराव सदाशिव, महिपतराव आवजी चिटणवीस व लक्षुमण बल्लाळ यांनी विचार केला जे, लढाई देणें त्या अर्थी बसोन खराब होऊ नये. इभ्रामखान गारदी व सरदार सुद्धां चालोन जाऊन लढाई द्यावी. म्हणोन शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे सन इहिदे सितेन मया व अलफ पौष शुद्ध दशमीस पुढें तोफखाना, त्याचे मागें गारद, त्याचे मागें फौज ऐशी करून चालोन गेले. तोफांचे मारगिरीनें गिलचे बहुत मारिले, जेर केले. तेव्हां त्यानींही निश्चय करून चालून येऊन गारदी यांजवर घोडे घालून कापिले. इभ्रामखान याचा हात उडाला असता लढाई मारिली. हे शेवट ठार जाले. तेव्हां गिलचे पुढें चालले. हे पाहून विश्वासराव यांणीं हत्ती चालविला. मानकरी हुजरात फौज यांणीं फितूर ठेविले-त्यांनीं जोडगोळ्या अवारींत टाकिल्या. विश्वासराव ठार जाले. पडले. हें वर्तमान सदाशिवपंत भाऊंस कळतांच या उपरि काय वांचावयाचें म्हणोन जनकोजी शिंदे व समशेर बहादर ऐसे घोडे चालविले. बहुत लोक कामास आले. लढाई मानबर जाली. तों फौजेचा धीर सुटला. सरदार मागें कोणी नाहीं. विश्वासराव पडले. भाऊही लढाईत मिसळले. म्हणोन पळू लागले ते समयीं गर्दी जाली. भाऊ व समशेर बहादर व जनकोजी शिंदे ठार जाले. ठिकाण नाहीं. गिलचे शेर होऊन बहुत लोक मारिले. लुटू लागले. फौज बुनगे सर्व लुटून बायका सर्व नेल्या. बाटविल्या. ज्यांनीं हत्यार टाकिलें त्यास सोडावें ऐशी ताकीद गिलच्यांनीं केली. त्यांत दहा हजार माणूस जखमी लागले. ते निघाले. बाकी पाऊण लाख फौज सर्व बुडविली शके मजकूर. मल्हारजी होळकर कांहीं फौजेनिशीं निभावून निघाले. त्रिंबकराव सदाशिव व महिपतराव चिटणवीस व बाळाजी जनार्दन फडणवीस व दमाजी गायकवाड हे जखमी जाले. आणि कंगालांत निघोन भिंड येथें बहुत प्रयासें पधरा दिवस, कोणास महिना, अन्न नाहीं व वस्त्र नाहीं ऐसे लोक येऊन भिंड येथे राहिले.

या समयांत गिलच्या भारी, खंदक करोन विरेस पडोन भाऊ लढणार म्हणोन

---

१ 'पौष शुद्ध ८मी' असें असावें
२ 'काकडे' चि० प्र०.
३. 'हे शेवटवर झाले' चि० प्र०
४ फितूर ठेविले' इ० प्र० दोनीही पाठ अस्पष्ट आहेत
५ कामास आले=लढाईंत पडले
६ शेर=( वाघ, सिंह ) वरचढ, विजयी

पंतप्रधान काहीं फौज तयार करून मागें जावें म्हणोन निघाले. वराडप्रांताकडोन जानोजी भोंसले आणिले. तेही आले. त्या मार्गेच पुढें जावें ऐशी सल्ला महादोबा पुरंदरे यांणीं दिल्ही. तसेच चालले. सुरूज भेलसें या मैदाना पावेतों गेले. तों तिकडून पाणपती फौज बुडाली हे वर्तमान आले. तेव्हा बहुतच पुत्र बधु गेले, फौज सरदार सर्व बुडाले, हें बहुत दुःख जाले. भेलसें येथें पळांतील लोक आले. ते कांही फौज पाठवून आणिले. ते येऊन भेटले. त्याचा सन्मान बंदोबस्त केला. पुढें मसलत करणें ते देशीं जाऊन सांवरल्या वांचून होत नाहीं, छावणी करून रहाणे ठीक नाहीं. ते समयीं प्रधानपंत याचे चित्तास भ्रम जाला. शरीरीं पीडा जाली. तेव्हां परत देशीं आले. पुढें ग्वालेरी पर्यंत फौजा पाठवून सर्व पळ निभावून आणिला. होळकर व त्रिंबकराव सदाशिव येऊन पावले.

या नतर पुढें जावयाचा निजध्यास प्रधानपंत यांणीं धरिला. श्रीप्रयागीं जावें, तेथें नावेमध्यें बसोन नाव बुडवावी, ऐसे चित्तभ्रमें करून विचार बोलों लागले. तेव्हां सर्वांनीं विचार ठीक दिसत नाहीं, ऐसा निश्चय करून 'पुढे कूच जालें' ऐसें समजावून दरमजल पुण्यास येऊन पावले. या नंतर महादोबा पुरंदरे यांस क्षय होऊन ते वारले. शके १६८२ विक्रमनाम सवत्सरे सन इहिदे सितेन मया व अल्लफ. त्यांस पुत्र नीळकंठ महादेव होते. दिल्लीस नजीबखान रोहिले व सुजाउदौले यांणीं सर्व पराक्रम केला. गिलचे निघोन आपले स्थळास गेले. दिल्लीस पादशहा अल्लीगवर बसविले. शके मजकूर.

बाळाजीपंत नाना यांणीं विचार मनांत आणिला जे, आईसाहेब यांणीं आग्रह करून राजे कैदेंत ठेविले. सदाशिवपंत भाऊही त्या समतांत मिळाले. त्या योगें अशी गोष्ट जाली. आपलेही शरीरीं स्वस्थ नाहीं. रामराजेही राज्याचा आटोप करावया जोगे नाहींत. त्यास दुसरे राजे मांडीवर घेऊन बसवावें त्याचें राज्य त्यांनीं करावें. म्हणोन महादजी राजे खानवटकर आणोन बसवावे. याचा सिद्धांत करून माधवराव पुत्र व त्रिंबकराव सदाशिव नाना पुरंदरे यास सातारा रवाना केले. गोविंदराव चिटणीस यास पत्र पाठविलें. त्यास त्याजवळ रामराव चिटणवीस जिवबा यांचे पुत्र व लक्ष्मणराव तुमचे पुत्र यांस महाराजांपाशीं ठेवून तुम्हीं यावें म्हणोन पाठविले. शके १६८३ वृषानाम सवत्सरे सन इसन्ने सितैने मया व अल्लफ छ १९ सवाल माधवराव सातारियास आले. आई

७. प्रतिकूल प्रसंग येऊं लागले म्हणजे एकदम येतात. ही गोष्ट या सालीं व पुढें १७१४,१५ सालीं जीं थोर कर्तीं माणसें उपरपा नाहींशीं झालीं त्यावरून स्पष्ट होते.

८. राजपक्षाच्या लोकांचा असा तर्क होणे साहजिक आहे

९. 'इसन्ने तिसैन' चि० प्रतींत आहे तें चुकीचें आहे.

साहेब यांचे मर्जीचा विचार पाहिला. तों त्यांचे चित्तांत दुसरा दत्तक करावयाचा नाहीं असा आग्रह दिसला. इतक्यांत प्रधानपंत यांस क्षयाची व्यथा होऊन ते वारले. तेव्हां माधवराव निघोन पुण्यास परत गेले. दत्तक करण्याचें प्रकरण राहिलें. शके मजकूर.

आईसाहेब असतां कारभारी जवळ ठेविले [ ते ] प्रथम त्रिंबकराव विश्वनाथ, या नंतर विसाजीपंत, याजवर गोविंदराव गोखले, यानंतर त्र्यंबकाजी माणकेश्वर पोतनीस, विष्णु नरहर याप्रमाणें ठेविले होते. संभाजीराजे करवीरकर वारले. शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध १२.

यानंतर बाळाजीपंत नाना यांचें उत्तरकार्य दानधर्म बहुत करून दिवस सपादून माधवराव बल्लाळ व नारायणराव बल्लाळ व रघुनाथ बाजीराव होते त्यांणीं केलें. नंतर त्रिवर्गही सातारियास आले. महाराजांस नजरा मेजवान्या केल्या. आणि तेथील खर्चाचा वगैरे बंदोबस्त करून देऊन माधवराव यांस प्रधानपदाचीं वस्त्रें महाराजांनी दिल्हीं. शके १६८३ वृषानाम संवत्सरे आषाढ शुद्ध ५. रघुनाथराव पंडित किताब वस्त्रे दिल्हीं. नीळकंठ महादेव यांस पेशवाईचे मुतालकीचीं वस्त्रे दिल्हीं. आपले दौलतीचे बंदोबस्तास आज्ञा घेऊन पुण्यास आले.

ताराबाई साहेब यांणीं शेवटवर महाराजांनीं स्वतंत्र राहून राज्यभार करावा हें घडों दिल्हें नाहीं. आपले नजरबंदींत ठेविलें. आपणच सर्व कारभार करावा या इच्छेनें केलें. त्यांत प्रधानपंत यांनीं सर्व आटोप करून चालले. नंतर आईसाहेब बहुत करून वृद्ध जालीं. शरीरीं व्यथा होऊन वारलीं. शके मजकूर.

पूर्वीं बाळाजीपंत नानांचा संकल्प राजाराम यांणीं स्वतंत्र राहून राज्यभार चालवा, ऐसा होता. परंतु आईसाहेबाचे आग्रहानें चालले नाहीं. तें सिद्धीस जावें, [ असें माधवराव यांच्या चित्तीं आलें. ] नाना प्रकारचे बखेडे जाले, पाणपतावर दौलत गर्द जाली, सदोबा भाऊ व विश्वासराव गेले, नानासाहेब यांसही एक प्रकारचें दुखणें होऊन गेले, [ हें मनांत येऊन ]महाराजांनीं खालीं राहून [ कारभार करावासे ] केलें. आपणाकडील कारभारी एक जवळ मुतालकीचे कामावर राहिले [ ते ] आणि महाराजांकडील सर्व कारभारी अमात्य व सचिव चिटणीस व खासनीस कारखानदार रहावे. हुजूरचे महाल वतनें किल्ले ठाणें वगैरे यांचे मामलेदार करणें ते महाराजांनीं पाहिजेत ते करावे. गायकवाड, सेनासाहेब सुभा व सचिव व मंत्री व सरदेशमुखी, आंग्रे वगैरे यांच्या नेमणुका ऐवज ठराव येणें ते हुजूर द्यावे. असे करून त्रिंबकराव सदाशिव पुरंदरे यांचे पुत्र महिपतराव त्रिंबक [ हे मुतालिकीवर ] ठेविले. महाराज वाड्यांत राहोन वाडा नीट करणें

१० गर्द=नष्ट.

यांस तालुकदाराकडे वराता करून ऐवज आणून नीट करविला.' सर्व मुत्सद्दी नवळ राहून काम कारभार कागदपत्र, व मामले विल्हेस लागणें करूं लागले. महाराजांस कन्या दोन्ही जाल्या. त्यांचे लग्न करावयाच्या वराता भोंसले, गायकवाड यांजकडे ऐवजाच्या करविल्या.[11]

माधवराव बल्लाळ वस्त्रें घेऊन पुण्यास आल्यानंतर निजाम अलीखान यांणीं बिघाड करून भागानगराहून चालून आले. माधवराव प्रधान व रघुनाथ बाजीराव फौजेची तयारी करून चालून गेले. म ज र था [?] नजीक गांठ पडली. नबाब बेदरचा घाट उतरोन आले. तेव्हां [12]हेरोळीस मोंगल अल्ली नबाबाचे भाऊ व रामचंद्र जाधवराव होते. त्यास भेद करून रामचंद्र जाधवराव यास सेनापतीपद व जागीर देण्याचें ठरावून मोंगल अल्लीस सुभा द्यावा ऐसें करून त्यास फोडून आणिलें. नबाब हलके [13]पडले. परंतु तसेच चालून आले. लढाई सुरू जाली. या लढाईंत दमाजी गायकवाड यानी तरवार केली. प्रधान याणीं [14]गनीमी भोंवतीं फौज फिरवून लढाई करूं लागले. नबाब पारगाव भीमा नजीक तसेच आले. पुण्यास यावें, लुटावें हें मनांत धरिलें. तेव्हां भोंवतें जाळोन रसद बंद केली. दाणा वैरण मिळेना याजमुळें आयासे[15] आले. आणि तह करून निघोन माघारे गेले. प्रधानपंत पुण्यास आले.

यानंतर कर्नाटकचे स्वारीस गेले. बराबर त्रिंबकराव विश्वनाथ पेठे घेतले. कर्नाटकच्या खंडण्या घेऊन सिरें पर्यंत जाऊन माघारे पुण्यास आले. शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे सन सल्लास सितेन मया व अल्लफ. जवळ कारभारी त्रिंबकराव विश्वनाथ व बाबूराव फडणीस व गोपाळराव गोविंद पटवर्धन [16]आत्मीक जाले. रघुनाथराव यांजमध्यें किंतु वाढला. तेव्हा रघुनाथ बाजीराव निघोन गंगातीरास गेले. त्याजपाशीं कारभारी नीलकंठ महादेव पुरंदरे व सखाराम भगवंत त्यांचे पदरचे होते ते बहुत शहाणे मनसब्यांत निपूण निघाले, व महिपतराव त्रिंबक चिटणवीस व नारो शंकर राजे बहादर व विठ्ठल शिवदेव हे आपले लक्षीं घेतले. प्रधानपंतही तयारी करून चालून गेले. रघुनाथपंत फौजसुद्धां चालून परत आले, भीमातीरीं गांठ पडली. लढाई मातबर जाली. यांत माधवराव यांचा पराभव जाला. फौज पळूं लागली. तेव्हा प्र-

---

११ महाराजांस याप्रमाणें स्वतंत्रता दिली ही गोष्ट माधवरावास मोठें भूषण होय. यावरून त्यांचें औदार्य व पोक्तपणा हे गुणही व्यक्त होतात.

१२ हरोळी=टेहळणी करितां पाठविलेली टोळी, अवाडी.

१३. हलके=कमी, कमजोर.

१४. गनीमी=हें विशेषण 'लढाई'कडे घ्यावें.

१५ हयास ? हयास आले=थकले.

१६. आत्मिक=अंतरस्थ, मेहरबानींतले ?

धानपंतीं वडील आहेत, करतील तें करोत, म्हणोन जाऊन भेटले. तेव्हां त्यांज-पाशीं आपले लोक कारभारी येऊन नजरबंद दाखल ठेविले. गोपाळराव गोविंद मिरजेकडे गेले. त्रिंबकराव निघोन पुण्यास आले.

या नंतर शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे सन सल्लास सितेन मया व अलफ यांत राजाराम साहेब यांच्या उभयता कन्याचीं लग्नें जहालीं. एक महादजी नाईक निंबाळकर याजकडे दिल्ही व एक दुर्गोजी महाडीक तारळे-कर यांजकडे दिल्ही. मोठा समारंभ केला. भोंसले, गायकवाड, आंग्रे याज-वर वराता खर्चाच्या करून, हुजरे पाठवून, ऐवज व हत्ती, घोडे, जिन्नस आणिला.

[इकडे] मोंगल व भवानराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव व भोंसले जानोजी सेनासाहेब सुभा व गोपाळराव गोविंद पटवर्धन व पिराजी नाईक निंबाळकर ऐसे सर्व एक होऊन पुणे, सातारा येथें चालून येणार हें कळवि-ल्यावर माधवराव बल्लाळ प्रधान व रघुनाथ बाजीराव फौजसुद्धा त्याजवर रवाना केले. हुजूर खासगीचे महाल व गाव वतनी अमल यास अमलदार नवे जुने करून करार केले. हुजूरचे कारखाने हत्ती पागा वगैरे सर्व वहिवाट व नेमणु-की ऐवज खर्चास येणें ऐसें चाललें. दमाजी गायकवाड यास सेनाखासखेल पदाचीं वस्त्रें दिल्हीं गोविंदराव गायकवाड मुतालीक व येशवंतराव कारभारी याप्रमाणें महाराजांनीं वस्त्रें दिल्हीं. शके मजकूर.

माधवराव यांनीं निजामअल्ली यांजकडे राजकारण पाठविलें होतें. कुमकेस यावें म्हणोन बालेघाटीं आले. प्रसंग जाला. नबाबाचे कारभारी विठ्ठल सुंदर होते. त्यांनीं रघुनाथपंतांकडे राजकारण भेटीचें पाठविलें. आणि नबाबासुद्धां आले. परस्परें निखालसता होऊन मेजवान्या नबाब व कारभारी यांच्या होऊन नबाब माघारीं गेले. रघुनाथ बाजीराव प्रधानपंत सहवर्तमान पुण्यास आले. शके १६८५ सुभानुनाम संवत्सरे सन अर्बा सितेन मया व अलफ.

[यानंतर] सर्व कारभार रघुनाथपंत करूं लागले. आणि सखाराम भग-वंत कारभारी कुलकुला[१७] जहाले. अष्टप्रधान यांच्या पदांच्या घालमेली कराव्या, सातारां महाराज यांचा बंदोबस्त आपले लगामीं असावा, हा विचार करून गोपाळराव गोविंद पटवर्धन निघोन गेले त्यांचें पारपत्य करावें, यावरून सातारियास गेले. आपणासही पद मोठें असावें, प्रधान वडील [?] तेव्हा त्याचे बराबरीचें असावें. भास्करराव पुत्र जहाले होते, त्यांचे नांवें करावें. परंतु लहान तेव्हां त्यांचे नायब नारो शंकर राजे बहादर प्रतिनिधी करावे. ऐसें निश्चयांत आणोन महाराजास मेजवानी वगैरे मनोधारण करून प्रतिनिधी पद राजे बहादर यांस देविलें.

---

१७ कुलकुला=कुलकुला=सर्व प्रकारचा । अधिकार आहे ज्यास–कुल्मुख्त्यार.

विठ्ठल शिवदेव यास न्यायाधिशी पद देविलें. सेनापति पद दाभाडे याजकडी-ल दूर करून रामचंद्र जाधवराव यास देविले. सरलष्करपद कान्होजी मोहिते यास निंबाळकर याचे काढून बाळाजीपंत नाना यांणीं दिल्हे होतें तें काढोन खंडेराव दरेकर यास सरलष्कर पद देविलें. आणि महाराजांची आज्ञा घेऊन मिरजेस गोपाळराव यांजवर मसलत करून मिरज किल्ला घ्यावा म्हणोन गेले. ते समयीं बाबूराव फडणीस व त्रिंबकराव विश्वनाथ पेंठे हे बाबूजी नाईक जोशी यांणीं रदबदली करून भेटविलें[१८]. मिरजेस मोर्चे दिल्हे. सवा महिना किल्ला लढला. नंतर घेतला. तो शिवाजी बेळाळ याचे स्वाधीन केला. गोपाळराव गोविंद याजवर फौज रवाना केली. लढाई झाली. ते मोड होऊन पळून मोंगलाईंत गेले. प्रतिनिधीपदाची घालमेल जहाली म्हणोन भवानराव प्रतिनिधी व यमाजी शिवदेव, गमाजीपंत प्रतिनिधीचे मुतालीक हे नवाबाकडे निघोन गेले. बाबूराव फडणीस याचे पुत्र मोरो बाबूरावही मोंगलाईंत गेले. यमाजीपंत व गमाजीपंत व गोपाळराव गोविंद यांणीं विठ्ठल सुंदर याचे हातें नवाबासही बोलणें राजकारण सिद्ध करून जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा, व विठ्ठल सुंदर, विनायकराव, व भवानराव प्रतिनिधी, यमाजीपंत, सदाशिव रामचंद्र, पिराजी नाईक निंबाळकर यांशीं राजकारणें करून आणविले. आणि नबाब भोंसले सुद्धा चालोन आले. आणि सखाराम भगवंत, मल्हारजी होळकर वगैरे यांनीं मसलत केली जे, प्रथमच लढाई देणें ठीक नाहीं. भोंवतें हिंडून किल्ले, कोट, स्थळें याचे बंदोबस्त राखावे. पुणें पर्यंत ते येणार तेव्हां शहर उजाड करावें. आपण भागानगर प्रांतीं जावें. म्हणून माधवराव याजपाशींही निखालसतेचीं बोलणीं करून प्रधानपंत फौजेसुद्धा भागानगर प्रांतीं निघोन गेले. नबाब यांनीं विचार केला जे, यमाजीपंत व गमाजीपंत व गोपाळराव हे माहीतगार यांनीं फौजा घेऊन किल्लेकोट घ्यावे. सातारां जाऊन किल्ला घेऊन राजे यास घेऊन यावें. यावरून दोन टोळ्या यमाजीपंताचे पुत्र गमाजीबावा, सातारियाकडे फौज सुद्धा निघोन मुलुक मारीत खंडणी घेत चालले. यमाजीपंत व गोपाळराव येऊन पुणें पर्यंत शहर लुटून हवेल्या जाळल्या. सिंहगड लोहगड येथील माच्या लुटल्या. किल्ले वेढूं लागले. सातारां राजकारण सिद्ध न जालें. महाराज किल्यावर गेले. प्रांत लुटला, जाळला. "मोंगलास मिळाले, मोंगलाई करणार म्हणोन राजकारणास गेले; त्यास आम्ही उतरावयाचे नाहीं" असें महाराजांना सांगितलें. ते गमाजीपंत माघारे फिरले. प्रधानपंत

---

१८ यांचें व दादांचें वांकडें असण्याचें कारण हे दोघेही पूर्वी माधवरावाच्या पक्षांत सामील होते.

१ हे माधवरावाचे श्वशुर असावे.

भागानगरीं जाऊन पुरे मारिले. प्रांत लुटला हें वर्तमान आलें. व यमाजीपंत व गोपाळराव हेहीं फिरले. किल्ले येणें वगैरे सातारा राजे येणें कांहींच न जालें. तेव्हां नवाबांनीं ही गोष्ट ठीक नाहीं म्हणोन माघारे फिरले. आगोट आली, छावणी औरंगाबादेस करून पुढें मसलत करणें ती करावी, ऐसा निश्चय करून गंगातीरीं आले. त्या समयीं भोंसले वगैरे सरदार मुत्सद्दी यांस राजकारण पाठविलें जे, गोष्ट जाली ते मनांत न आणितां सर्व कामें पदें ज्यांचीं त्याजकडे चालवून राग कोणाचा न करावा. ऐसें मल्हारजी होळकर यांचे विद्यमानें तह दरम्यान होळकर यावेसें करून सर्वांनीं नवाबापासून भोंसले सुद्धां निघावेंसें राजकारण सिद्ध केलें. नवाब शहरास जाणार तेव्हां भोंसले गंगातीरीं रहातों म्हणोन त्यांस सोडून राहिले. नवाब गंगा उतरून खासा पलीकडे गेले. तोफखाना उतरावा तों पाणी गंगेस बहुत आलें. तेव्हां नावेवरून उतरून नंतर आपण उतरावे म्हणोन सडी फौज कांहीं ठेवून घेऊन विठ्ठल सुंदर व विनायकदास अलीकडे राहिले. हे बातमी प्रधानपंत व रघुनाथपंत यास कळली. यावरून चालून गेले. त्याचीं यांचीं लढाई बहुत तारफेची जाली. बहुत लोकांनीं कामें केलीं, यांत बापूराव हरी व सखाराम हरी याणीं शिपाय गिरी बहुत केली जखमा लागल्या. यावरून वाढविले. महिपतराव चिटणवीस यांणींही तरवार मारिली. त्यासही पृथक सरंजाम देऊन वाढविलें. विठ्ठल सुंदर व विनायकदास व मुरादखान यांणीं अंबारींत बसोन तिरंदाजी करून बहुत लढले. तेव्हां विठ्ठल सुंदर व विनायकदास यांस गोळ्या लागून ठार जाले. फौज बुडविली व लुटली. विठ्ठल सुंदर मारले. शके १६८५ सुभानुनाम संवत्सरे छ १९[21] मोहरम सन आर्बासितेन मया व अैलफ[22].

नंतर नवाब निघोन औरंगाबादेस गेले. प्रधानपंताचीही फौज मागून जाऊन शह दिल्हा. तेव्हां तह करून कांहीं जागीर दिल्ही. ते घेऊन पुण्यास आले. नवाब निघोन भागानगरास गेले. भोंसले निघोन नागपुरास गेले.

यानंतर माधवरावपंत प्रधान फौजेची तयारी करून कर्नाटकचे स्वारीस दुसरे वर्षीं निघाले ते खंडणी घेत श्रीरंगपट्टणापर्यंत गेले. ते समयीं हैदरनाईक म्हणोन जमातदार गार्दी याचे सरदार होते. त्याणीं श्रीरंगपट्टणचे राजे[23] यांस कैद करून आपणच तें स्थान बळावून होते. त्याची गांठ पडली. तेहीं फौज

---

२० हे दोघेही परभू गृहस्थ होत. पैकीं सखाराम हरी दादाचा परम मित्र होता. बापूराव हा सखाराम हरीचा बंधु असावा

२१ 'छ २०' इंदूर प्रत

२२ ही राक्षसभुवनची लढाई

२३ हा कुंमार राजा शालिवाहनाचा वंशज असल्याबद्दल कोठें कोठें लेख आढळतात

सुद्धां चालून आले. लढाई मातबर झाली. त्यांत हैदरनाईक याचा मोड झाला. पळून झाडींत गेले. तेव्हां बरसात आलियावरून बालानदी आलीकडे येऊन छावणी नरेंद्रगडानजीक केली. पलीकडे हैदरनाईक यांणींही झाडींत छावणी करून राहिले. पंतप्रधान यांणीं श्रीगणपती चतुर्थीचा उत्छाह तेथेंच केला. रघुनाथ बाजीराव पुण्यास येऊन निघोन गंगातीरास आनदवल्ली येथें गेले. प्रधानपंत याणीं आबदुल गनीमखान सावनूरकर पठाण व हिंदुराव मुरारराव घोरपडे यांस कुमकेस बलाविले. ते तयार होऊन आले. मुरारराव याणीं बोलणे घातलें जे, पूर्वीं आपले वडील संताजी घोरपडे याणीं बहुत सेवा श्रम साहस केलें. राज्यवृद्धीचे कामास आले. संस्थान चालतें, परंतु सेनापतीपद आपणास द्यावें आणि पुढे आणखी सेवा घ्यावी. ऐसें बोलणें घातलें. ते समयीं रामचंद्र जाधवराव यांजकडे सेनापतिपद रघुनाथपंत याणीं देविलें होते. ते गुजराथ प्रांत आपणाकडे द्यावा ऐसें बोलू लागले. तेव्हां निमे प्रांत प्रधानपंत यांजकडे व निमे गाईकवाड व दाभाडे यांजकडे तो काढून देणें न जालें. यावरून जाधवराव फिरोन मोंगलाईंत गेले. प्रधानपंतांनीं महाराजांस सातारियास पत्रें पाठविलीं जे, [ घोरपडे ] पूर्वींचे पदरचे पदाधिकारी व हल्लीं या मसलतीचे उपयोगी यास्तव पद वस्त्रें यास द्यावी. त्यावरून पदाचीं वस्त्रें पाठविलीं. शके १६८७ पार्थिवनाम संवत्सरे सन सितेन मया व अलफ. घोरपडे यास बहुमान वस्त्रें देऊन सेनापतीपद दिल्हें. व सहा लक्षाचे महाल कर्नाटक प्रांतींचे नेमून दिल्हे.

यानंतर दसरा जालियावरि कूच करून धारवाडास गेले. तेथें किल्यास मोर्चे बसविले. आणि सुरंग लावून हल्ला चढविला. तोफांनीं मारगिरी करून किल्ला जेर केला. तेव्हा किल्लेकरी याणीं कौल घेऊन किल्ला स्वाधीन केला. तेथें ठाणे बसविलें. तदनंतर हैदर नाईक बिदनूरचे झाडींत शिरून राहिले होते त्याजवर चालून गेले. तेव्हा हैदरनाईक यांणीं जागाजागां बतेरे[२४] बांधून तोफा चढवून फौज बारींत[२५] येऊ नये अशी मजबुदी करून झाडींत गारद[२६] ठेविले. त्याचा हिसाब न धरितां तोफा लावून बतेरे घेऊन मुरगूडचे ठाण्यास मोर्चे देऊन घेतले. व आणखीही ठाणीं घेतलीं हैदरनाईक बिदनूरचे आश्रयास गेले. ते समयीं रघुनाथपंत वडील गंतातीरीं गेले ते समजून आणोन सख्य करून चालावे म्हणोन चिंतो अनंत देवस्थळे पाठविले. यावरून तेही येऊन पावले. प्रधानपंत कर्नाटकांत झाडींत शिरून अनंतपुरास मोर्चे लावून घेतले. हैदरनाईक

---

२४. बतेरे=बुरूज, धमधमे
२५. बारी=अरुंद मार्ग, खिंड.
२६. गारद=कवायती लोक

यांणीं विचार केला जे, आपणास या उपरि बुडवितात. असें समजून तहाचें राजकारण केलें. खडणी सालाबाद पंधरा लक्ष रुपये व मैसैलतीचा पैका कबूल केला ते राजकारण रघुनाथपंत यांचे विचारें सिद्ध केलें. प्रधानपत [यांणी] ये समयीं निकर्ष आग्रह करावा तरि वडिलाची मर्जी जाती ऐसें समजोन तहाचें बोलणें ऐकून तह करून पुण्यास आले.

यानतर दुसरे वर्षीं प्रधान कर्नाटकांत स्वारीस निघाले. रघुनाथ बाजीराव हिंदुस्थानची स्वारी करावी म्हणोन तिकडे गेले. माधवराव प्रधानपत जाऊन शिरें येथें मोर्चे देऊन किल्ला घेतला. तेथें मुकुंद श्रीपत किलियांत ठेविले. पुढें जाऊन मदगिरी व चेनरायदुर्गही घेतले. यानतर होसकोट व *चिकबाळापूर व थोरलें बाळापूर घेऊन अमल बसविला. सर्व राज्य सोडविलें आणी आरकाटची स्वारी करावी असा रोख धरिला. आरकाटावर प्रधानपत येतात हें समजोन महमदअल्ली पठाण यांणीं वकील पाठवून तह ठरविला. सालाबाद खडणी ठरविली.

यानतर सर्व संस्थानीं व पाळेगार देशक यांणीं येऊन खडण्या ठराविल्या. शरणागत झाले. याप्रमाणे फत्ते करून पुण्यास यावें म्हणोन देशीं आले. तों रघुनाथराव दादासाहेबही स्वारी करून कासारबारी चढून आले. म्हणोन माधवराव साहेबही पुढें भेटीस गेले. ते समयीं कांहीं बोलणीं जालीं विकल्प वाटून भेटीचा बेत न ठरला. दादासाहेब आनदवल्लीस गेले. प्रधानपंत पुण्यास आले या उपरि बहुतच किंतु उभयतांचें बोलणें वाढत चाललें. रघुनाथपंत यांचें बोलणे आपणास प्राप्त वाटून द्यावा. तेव्हां फौजा धरून गंगातीरी आले. प्रधानपतही गेले. धोडपच्या किल्यानजीक त्याची याची लढाई जहाली. यांत रघुनाथपत यांची फौज मोडली. तेव्हां त्यांस घेऊन पुण्यास आले. या उपरि वाड्यांत स्वस्थ स्नान संध्या करून असावें, जवळचे लोक व कारभारी यांणीं जवळ जाऊ नये, म्हणोन ऐसें करून चौक्या ठेऊन बंदोबस्त केला. तेव्हा वाड्यातच राहिले. पंतप्रधान कर्नाटकातून देशीं येतां त्रिंबकराव विश्वनाथ पेठे मुख्य सरदार फौज देऊन सखाराम हरी यांस फौजेचें काम सांगोन

२७ मसलत=मोहिम.

२८ यावेळी हैदर इतका जेरीस आला होता कीं त्याजपासून आपला मुलुख व पैका मिळाला असता पण तहाप्रकरणीं सव बोलण दादाकडे त्याच्या समजावणी खातर सोंपविल असल्याकारणानें असा तह केल्यावर माधवरावास ज्यास्त बोलता येईना.

* चिक=धाकटें

२९ "थोरलें सोलापूर" चि० प्रत-हे चुकीचें दिसतें.

३०. देशक=देशमुखासारिखे वतनदार कामगार.

बरावर दिल्हे. त्यांनीं हैदरनाईक याशीं लढाया बहुत तारफेच्या केल्या. सडी फौज नेहमी पांच हजार सखाराम हरीनीं घेऊन छाप घालणें, प्रांत मारणें, केलें. शेवटीं गाठ पडून लढाई मातबर जाली. लोकानीं कामें बहुत शर्तेचीं केलीं. हैदरनाईक मोडून लुटून घेतले. पाय उतारा सडे पळून श्रीरंगपट्टणास गेले. तीन वर्षें छावणी करून सर्व प्रांत हस्तगत केला. आणि पुण्यास यावयास निघोन आले. पुढें जानोजी भोंसले याचा काळ शके १६९४ नंदन नाम संवत्सरे सन सलास सबैन मया व अलफ यांत जहाला. दत्तक रघोजी भोंसले हे मुधोजी भोंसले याचे पुत्र दिल्हे. त्यास सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें दिल्हीं. मुधोजी भोंसले यास सेनाधुरधरपदाचीं वस्त्रें दिल्हीं. प्रतापगड किल्ला हुजूर होता तो माधवराव पिंगळ यांचे स्वाधीन होता त्यास दहा हजाराचा सरंजाम देऊन आपणाकडे असावा म्हणोन त्यास पुण्यास आणोन महाराजाकडे किल्याचा फितूर जहाला. त्याचें रक्षण जालें पाहिजे असें समजोन सनदा आणोन घेतल्या शके * * * * *

तदनंतर रायगड किल्ला महाराजांचे खासगीस होता तो विठल येशवंत खासनवीस याजकडे तालुका सुद्धा होता त्यास प्रधानपंत यांनीं वाड्यांत बोलावून नेऊन बसविलें. आणि जबरदस्तीनें सोडचिठ्या घेतल्या. किल्लेकरी याणीं सनदा खेरीज देत नाहीं म्हणोन किल्ला लढवूं लागले. दिल्हा नाहीं. हिंदुस्थान प्रांतीं स्वारीस दादासाहेब याचे जाणें राहिलें. तेव्हां रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण हे सरदार नेमोन तुकोजी होळकर व महादजी शिंदे फौज सुद्धां देऊन रवाना केले रामचंद्र गणेश यांचें व शिंदे यांचें बनेनासें जालें. तेव्हां माघारे आणिले. व विसाजी कृष्णाच मुख्यत्वें नेमून बाबूराव हरी वगैरे सरदार फौज बराबर दिल्ही. मल्हारजी होळकर वारले. त्याचे पुतणे कर्ते तुकोजी होळकर यांसच सरदारी दिल्ही. व जनकोजी शिंदे पाणीपतीं राहिले त्याची सरदारी राणोजी शिंदे याचे पुत्र महादजी शिंदे कर्ते निघाले त्यांसच सरदारी दिल्ही. विसाजी कृष्ण व शिंदे, होळकर हिंदुस्थानांत गेले. त्यानीं त्या प्रांतीच्या सर्व खंडण्या घेऊन संस्थानिकांचीं पारिपत्यें करणें त्याचीं केलीं. नजीबखान रोहिले याणीं पूर्वीं पाणीपतीं घालविलें त्याचें पारिपत्य करावें म्हणोन गेले. नजीबखान याचे लेक जाबीदखान होते. तेव्हा भागीरथीची प्रार्थना प्रधानपंत याचे फौजेनें केली. ते समयीं उतार दिल्हा. पलीकडे गेले. जाबीदखान तयार होऊन लढाईस आले. मातबर लढाई जाली. रोहिले बहुत मारिले, त्यांचा मोड जाला. जाबीदखान धरिले. फत्तरगड त्याची राहती जागा, बहुत नामी

किल्ला तो घेतला मालमत्ता बहुत नामी सांपडला तो घेऊन शिंदे होळकर फौजा देशीं यावयास निघाले.

माधवराव साहेब प्रधान याचे शरीरीं राजयक्ष्मा रोग प्राप्त जाला. त्या योगें करून बहुत क्लेश होऊं लागले. यावरून चित्तांत कल्पना केली जे, दादा साहेब यांस नजरबंद ठेविलें. त्याचें अनुष्ठान बहुत उग्र. सर्वकाळ सूर्य अवलोकन हरणाचें दूध भक्षण चाललें. त्याचे प्रतिबंध मोकळे करावे त्याचे मर्जीनें वागावेंसें केले. परंतु त्यानीं आग्रहानें चालविलें. महाराजास पीडा होते ते होऊं नये, त्यानीं आपला संतोष करून आपला खर्चवेच डौलाचा बंदोबस्त करावा, त्यांचे मर्जीनुरूप चालावें. ये विशीचे बंदोबस्तास मोहिपतराव त्रिंबक बनाजी पुरंदरे कारभारी सातारा ठेविले. त्यानीं महाराजाचे विचारें चालावेंसें केलें. जगजीवन परशराम प्रतिनिधी वारले. तेव्हां भवानराव यासि प्रतिनिधीपद दिल्हें. मध्ये भगवतराव यास प्रतिनिधीपद दिल्हें होतें, तें फिरवून भवानराव यास दिल्हें. माधवराव साहेब याचे शरीरीं पीडा जाली थोडक्या वयांत मसलती व पराक्रम बहुतच केले. परंतु शरीरीं रोगाची प्रबलता विशेष, सर्वकाळ अंगाचा दाहा. तेव्हां केळीच्या पानाच्या सुरळ्या आणोन त्याजवर निजावें. तेव्हां कांहीं चैन पडावें. ऐसें जालें. ते समयीं थेऊर येथें जाऊन राहिले. कर्ज आपले कारकीर्दीचें वारावें म्हणोन खासगी खजीना वगैरे तेथील एक कोट रुपये देऊन कर्ज वारिलें. नारायणराव धाकटे बंधु यास बोलावून नेऊन आपले तीन हेतु राहिले [ ते कळविले.] महाराजास पीडा होती, स्वामिद्रोह घडतो, याजकरितां तेथील मर्जी रक्षून पूर्वी सांगोले मुक्कामीं तह ठरले आहेत, त्याप्रमाणें चालावें. सदाशिवपंत भाऊनीं निग्रह केला ते पाणीपतीं बुडाले, नानासाहेब यांचे बुद्धीची खंबीरता ढळली, आमचे शरीरीं अशी पीडा जाली, यास्तव तेथील मर्जी रक्षून चालावें. दादा साहेब वडील त्याचे आज्ञेनें दौलत त्याचे विचारें चालवावी. तिसरे रयतेस जलाल जाजती होऊं नये, पदरचीं व दौलतींतील मनुष्यें लहान मोठीं आहेत त्यांचें मनोधारण रक्षून त्यांचे योग्यतेनुरूप चालावें. सर्वांचें संरक्षण करावें. म्हणजे तुम्हास यश प्राप्त होईल. दौलत यथास्थित चालेल. याप्रमाणें सांगितलें.

यानंतर माधवराव साहेब याचे शरीरीं बहुतच क्षीणता होऊन थेऊर येथें शके १६९४ नंदननाम संवत्सरें सन सल्लास सबैन मया व अलफ. कार्तीक मासीं वारले. रमाबाई सहगमन गेलीं. पोटीं संतान नाहीं. तेव्हां नारायणराव यानीं त्यांचें उत्तरकार्य करून, सातारियास महाराजांकडे गेले. महाराज सामोरे येऊन बहुत सन्मान केला. महाराजांचें मनोधारण जे जे आज्ञा जाली

से ते मुद्दे यांणीं करून देतों ऐसे करार ठरविले. प्रधानपदाचीं वस्त्रें सुमुहूर्तें करून मार्गशीर्ष मासीं शके मजकुरीं दिल्हीं. बहुमान सांप्रदायाप्रमाणे जवाहीर व हत्ती, घोडे, शिक्केकटार, पट्टा ऐसें दिल्हें. यानीं महाराजास मेजवान्या वगैरे करून मनोधारणान्वयें बंदोबस्ताच्या यादी करून पुण्यास जाऊन तेथील बंदोबस्त करून स्वामींचे आज्ञेप्रमाणें येथील करितों ऐसें बोलोन निरोप घेऊन निघाले. याजमुळें महाराजाची मर्जी राहिली नाहीं. रायगड किल्लेकरी भांडत होते. तेव्हां हबशी यानीं फितूर केला ऐसे महाराजास समजावून सनदांची परवानगी आणोन किल्ला घेतला. शके १६९५ विजयनाम संवत्सरे सन आर्बा सबैन मया व अलफ. चैत्र शु॥ १.

यानंतर दादा साहेब यांची कन्या पांडुरंगराव बारामतीकर यांस देऊन समारंभें करून लग्न केलें. पुणियास येऊन दौलतीचा व फौजेचा बंदोबस्त करून एखादी स्वारी करून पराक्रम करून दाखवावा हे उमेद बहुत धरिली. शरीरीं दृढ, वयहीं नूतन हरी बल्लाळ फडके, बाबाजी बर्वे हे कारभारी बहुत कोंत वागू लागले. सखारामपंत बोकील व बाळाजी जनार्दन फडणीस व त्रिंबकराव महादेव व मोरो बाबुराव फडणीस वगैरे मोठीं माणसें जवळ होतीं. त्रिंबकराव कर्नाटकांत तीन वर्षे राहून फत्ते करून येऊन भेटले. विसाजी कृष्ण हिंदुस्थान फत्ते करून येऊन पावले. शिंदे होळकर येऊन भेटून फिरोन निरोप घेऊन हिंदुस्थानात रवाना जाले. दादासाहेब यांचे ठायीं चित्तशुद्धि न जाली. अधिकच बंदोबस्त निक्षीचौं केला. याजमुळे सुमेरसिंग व खरगसिंग व महमद इसफ जमानदार गारदी वगैरे मिळोन फितूर जाला. एकाएकीं वाड्यांतील चौक्याचे लोक फितूर करून वाड्यांत तलबेसाठीं म्हणोन जाऊन गर्दी केली. तेव्हा नारायणराव यांजला गलबल फितुराचीशी कांहीं समजल्यावरून धांवून रघुनाथराव याजकडे गेले. तेव्हा त्यांनीं पुढें होऊन नारायणराव यास पोटाशीं धरिलें. मारू नये म्हणोन सुमेरसिंग वगैरे यांस सांगत असतां त्यानीं ऐकिलें नाहीं. गर्दी जाली. तरवार चालली. तेथें ठार जाले. आणखीही लोक इच्छारामपंत ढेरे व चापाजी टिळेकर खिजमतगार वगैरे ठार मारिलें. तेव्हां दादासाहेब यानीं वाड्यातील बंदोबस्त केला. हें वर्तमान बाहेर सर्व कारभारी मिळोन फौजा तयार करून उभे राहिले. त्यांस आंत काय काय जाले, हें काहीच न समजे. तें सांगोन पाठविलें आणि कारभारी मंडळी बज्याबा दादा पुरंदरे व त्रिंबकराव विश्वनाथ व भवानराव प्रतिनिधि ऐसे मिळो-

---

३१. या बऱ्याविषयीं विशेष माहिती ऐकिवात नाही

३२. निक्षीचा=निकराचा, कडक

३३. तलब=पगाराची बाकी

न आत वाड्यांत गेले. दादासाहेब यांची भेट जाली. सर्व वृत्त जालें तें समजलें आणि मडळी गेली. त्याचा दीलदिलासा करून सर्व बंदोबस्त केला. शके १६९५ विजयनाम संवत्सरे. सन आर्बा सबैन मया व अलफ. भाद्रपद शुद्ध १३ त्रयोदशी. नारायणराव यांणीं माधवराव याचे मागें नऊ महिने राज्य केलें. राघोजी आंगरे कुलाब्याहून आले. त्याची भेट घेऊन वाड्यात आले. तेंच दिवशीं गर्दी होऊन नारायणराव मारले गेले. त्याची स्त्री गरोदर होती.

पुढे अश्वीनमासीं रघुनाथ बाजीराव यांनीं फौजेची तयारी करून डेरा दाखल जाले. आणि नवाबाशीं बिघाड करून त्याजवर स्वारीस जावें. ऐशी मसलत केली. अश्वीन शुद्ध १० दशमीस सन मजकुरीं स्वारीस निघाले. सातारियास जाऊन वस्त्रे घ्यावीं तें न करिता परभारें भीमातीरीं जाऊन प्रधानपदाचीं वस्त्रे रघुनाथराव दादा यांणीं आपले दत्तपुत्र अमृतराव आनदवल्लीस घेतले होते ते व महिपतराव त्रिंबक पुरदरे यास सातारा रवाना केलें. वस्त्रे आणविलीं. स्वारी फते करून नतर दर्शनास येऊ ऐसें सांगून पाठविलें. वस्त्रे घेऊन अमृतराव आले, तेव्हां भीमातीरींच होते. शिक्का नवाच केला त्यात रामराम हे नाव न घालतां शाहू महाराज हे नाव घालून केला. आणि दरमजल निघोन बेदर प्रातीं गेले. नवाबही तेथें चालून आले. रघुनाथराव दादा यांणीं भोंसले यास बोलाविलें. ते समयीं मुधोजी भोंसले सेना धुरधर फौज सुद्धा पूर्वींच जाते समयीं सिद्धटेकीं येऊन भेटले. तेथें रघोजी भोंसले याचे नावें सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रे दिल्हीं. सन मजकूर.

बेदरास नवाब यांचे भोवतालचे फौजेनें घेरा दिल्हा. नवाब किल्यांत गेले. यानीं किल्यास महांकाळी वगैरे तोफा लाविल्या. याजवरून कृष्णराव बल्लाळ वकील तेथें होते. त्यास नवाबानीं वीस लक्षांची जागीर घेऊन तह करावा म्हणोन पाठविलें. परंतु रघुनाथ बाजीराव याणीं आग्रहच धरिला. ते समयीं नवाब स्वांसा व रूकनुद्दोला कारभारी याणीं बातमी कळू न देता सडे शें दोनसें स्वारानिशी डेऱ्यासमीप येऊन आम्ही भेटीस आलों असें सांगोन पाठविलें. हें कळताच डेऱ्या बाहेर दादासाहेब आले. तों ते येऊन पोंहोचले. भेटी जाल्या. डेरियांत जाऊन बसले तों नवाबांनीं एक वान[३४] गळ्यातील काढून व दाली[३५] तरवार पुढें टेंविली. दौलत तुमची आहे पाहिजे तसें करावें. दाली फिरोन पाहिजे तरि बाधावी, किंवा घ्यावी ऐसें बोलले. तेव्हां दादासाहेब

---

३४ वान. ?

३५. दाली=तरवार बाधावयाचा पट्टा.

कंसभूपति असा बहु भ्याला । कृष्णरूप चि दिसे जग त्याला ॥
बैसला निजसभासदलोकीं । अंतरीं मन बुडे भयशोकीं ॥ ४ ॥
चाणूरमल्लादिक दैत्यकोटी । तो मेळवी भीति धरोनि पोटीं ॥
पाचारुनी पातकि पूतनेला । वधावया कृष्ण विचार केला ॥ ५ ॥
बोले रोषुनि पूतना प्रभु म्हणे कां वाहतां काळजी
काळातें दमणार मी उमगितें बांधोनियां बाळ जी ॥
पाताळीं नभमंडळीं क्षितितळीं तो जेथ जैसा असे
तैसा शोध करोनि साधिन तुझें कार्यार्थ राया असें ॥ ६ ॥

॥ दिंड्या ॥

कंसरायें देऊनि चीरें माळा । महा तोषाचा घेउनी उमाळा ॥
प्रेरियेली पूतना नाम बाळा । जगीं धुंडाया देवकिच्या बाळा ॥ ७ ॥
कथा ऐकें कल्याण कौरवेशा । बाळकृष्णाच्या पहा महावेशा ॥
फिरे फेरे फीरता फार सारे । ग्राम कुग्राम पुऱ्या अग्रहारें ॥ ८ ॥
मुलें सर्वत्र हि जीं तिं सकूमारें । तशा सर्वांच्या पेटालिसे मारें ॥
होति कृष्णा जन्मोनि दिवस दाहा । तशा बाळा देखुनी उठे दाहा ॥ ९ ॥
कामरागादिक मोह जिथें साहा । तेथ कैंचा विवेक फारसा हा ॥
हरी साठीं बाळकें लक्षकोटी । जिणें भक्षीलीं दीर्घ दंतकोटी ॥ १० ॥
गोकुळासी येतां चि तदा मोटी । दिसे माया चेटकी कपट पोटीं ॥
वयें सोळा वर्षांत उभी ठेली । सुतारुण्यें तारुण्य गुणठेली[10] ॥
नंदपुत्राच्या दर्शना भुकेली । दिंडि ऐशी आनंदसुतें केली ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥

एथें असेल बहुधा शिशु कंसहंता । शोधोनि साधिन म्हणे धरुनी अहंता ॥
लक्ष्मीविलास दिसतो नगरांत भारी । तो सांपडेल मज दानवबल्लभारी ॥ ११ ॥
जेथें पद्मवनें अपार तुलसी जेथें बहू गोधनें
जेथें वैष्णव वेदपाठ करिती सद्वाक्य संबोधनें ॥
जेथें पुष्पफळीं सपल्लवदलीं शृंगार आला वना
तेथें क्रीडतसे हरी कविवरीं हे वर्णिली भावना ॥ १२ ॥
पूर्वीं हे स्थिति हा विलास सुख हें नाहीं च या गोकुळीं
आला साच रमे हरी नरहरी या नंदजीच्या कुळीं ॥

---

७ चीर=लुगडें. ८ बाळा=स्त्री. ९ दाहा=आग. १० गुणठेली=गुणांची पिशवी.

सालंकार सु[11]बल्लवी मिरवती सौवर्णवल्ली वनीं
तैसी होइन मी न मजुनयना मी येउनी यौवनीं[12] ॥ १४ ॥
जाली तत्काळ रंभा दिसत मृदु जिचे ऊरु[13] कर्पूररंभा[14] ॥
गंगेच्या चंचंदभा[15]सम तरळ गळा हार त्याली सदभा ॥
